BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIII] **QUARTERLY** [No. 1

(49)

June, 1932.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १३ वें] **त्रैमासिक** [अंक १ ला

(४९)

आषाढ १८५४

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press, House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन.

नवीन वर्षाचा पहिला अंक नेमक्या ठरल्या तिथीला प्रसिद्ध करीत आहोंत. पुढील अंकहि असेच काढतां आल्यास मनास मोठें समाधान वाटेल.

या अंकांत न्या. मू. केशवराव यांच्या दुःखद निधनाचें वृत्त दिलेंच आहे. तदोत्तर अकोल्याचे रावबहादुर रामभाऊ महाजनी व न्यूयार्कचे डॉ. जस्टिन् ॲबट या मंडळाच्या दोन प्रसिद्ध व सन्माननीय सभासदांच्या मृत्यूचीहि वार्ता प्रसिद्ध झाली आहे. दोघांचेंहि मंडळाला सहाय्य होतें. डॉ. ॲबट यांच्या महाराष्ट्रसंतविषयक इंग्रजी ग्रंथमालेची माहिती पुष्कळांस असेल. आतां हा उद्योग थांबेल अशी भीति वाटते. डॉ. ॲबट यांचें प्राचीन मराठी वाङ्मयावर निस्सीम प्रेम होतें. कै. रामभाऊ हे वर्ग २ चे व खि.वा. ॲबट हे वर्ग १ चे तहाहयात सभासद होते.

नवें कारभारी मंडळ शके १८५४ ते ५६ अखेर या तीन वर्षांसाठीं निवडलेलें शेवटीं दिलें आहे.

ह्या अंकांत कै. श्रीमंत सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे यांचें चित्र छापून प्रसिद्ध केलें आहे. छापाचें (ब्लॉक) काम औंध स्टेट प्रेसकडून सुबक व वेळेवर करून दिल्याबद्दल आम्ही श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांचे आभारी आहोंत.

दर अंकांत असें एक चित्राचें पान घालावें असा विचार आहे.

तसेंच संमेलन व आषाढचा वाढदिवस या दोन मोठ्या सभांप्रमाणेंच आश्विन, व पौष या महिन्यांत दोन मोठ्या सभा भरवाव्या, त्यावेळीं ऐतिहासिक प्रदर्शनाचा भरदार कार्यक्रमहि जोडीला ठेवावा, एखादा विषय अगाऊ मुक्रर करून त्यावर भरपूर, साधार व शास्त्रीय चर्चा व्हावी असा नवा कार्यक्रम आंखण्याचें ठरविलें आहे.

श्रीशिवचरित्रकार्यालयाकडून श्री. दि. वि. काळे याहि सालीं पूर्वीप्रमाणचें मंडळाकडे काम करीत असून जोड चिटणीस म्हणून आपलें काम करतील हें कळविण्यास आम्हांस फार संतोष वाटतो.

मंडळाचें काम अधिक उत्साहानें व नेटानें करण्यास सर्वांकडून प्रेमपूर्वक सहाय्य मिळेल असा भरंवसा आहे.

शके १८५४ आषाढ शुद्ध प्रतिपदा. } **चिटणीस.**

भारत इतिहास संशोधक मंडळ चित्रमाला क्र. ५.



श्री सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे.

(ब्रह्मावर्त – वाड्यांतील मुळावरून.)

जन्म :– शके १६५२ अ. भाद्र. शु. १.] [मृत्यु :– शके १६८१ पौष शु. ८.

संग्राहक :– रा. ळ. ना. जोशी, पुणें.) (संपादक :– प्रो. द. वा. पोतदार.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १३ वें] त्रैमासिक [अंक १ ला.

१ महाराष्ट्र देश व मराठी भाषा.*

(श्री. चिं. वि. वैद्य)

१ महाराष्ट्र देश.

महाराष्ट्र देश हें नांव अगोदर किंवा मराठे अर्थात् महारट्ठी हें नांव गगोदर या प्रश्नासंबंधें मी या लेखांत प्रथम विचार करणार आहे. फ्रेंच र्थें राहतात तो फ्रान्स, जर्मन राहतात तो जर्मनी, इत्यादि उदाहरणांवरून रट्ठी जेथें राहिले तो महाराष्ट्र असा कित्येक तर्क करतात. प्रसिद्ध तहास-संशोधक राजवाडे यांच्या मतें महाराजिक हें प्राचीन लोकांचें नांव दलून महाराष्ट्रिक झालें व ते बौद्धधर्मास कंटाळून मगधांतून महाराष्ट्रांत म्हणून महाराष्ट्र देश (राधामा. चंपू. प्रस्तावना पहा). पण महा- जक याचें महाराष्ट्रिक हें रूप कोणत्याहि रीतीनें होणार नाहीं. शिवाय राष्ट्रांत आर्य बुद्धपूर्व इ. स. पू. ६०० सु. आले असें निश्चित आहे ण्डारकर). ऐतिहासिक उल्लेख पाहतां महाराष्ट्र हें देशवाचक नांव पुलकेशीच्या लेखांत (इ. स. ५०० सु.) प्रथम येतें हें खरें आणि महारट्ठ हे लोकनाम तत्पूर्वी-आन्ध्रभृत्यांच्या लेखांत येतें (इ. स. १०० सु.). पण मूळ लोकांचें नांव राष्ट्रिक होतें तें अशोकाच्या शिलालेखांत आहे. राष्ट्रिक शब्दाची व्युत्पत्ति राजवाड्यांनीं 'तत्र नियुक्तः' या पाणिनिसूत्रावरून ४-४-६९) देशांतील अधिकृत लोक अशी दिली आहे. पण अशो- च्या लेखांत हा अर्थ अभिप्रेत नाहीं. कारण तें तेथें विशेषनाम आहे. ष्ट्रांतील अधिकारी या अर्थानें हें सामान्यनाम कोणत्याहि देशास लागूं ल आणि असा उपयोग मनुस्मृति १०-२१ मध्यें आहे. पण अशोक-

---

* २० वें संमेलन.

लेखांतील राष्ट्रिक हें पैत्तनिकसाहचर्यानें विशेषनाम आहे. माझ्या मतें पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक या देशांतील राहणाऱ्यांचें हें वाचक आहे. प्रतिष्ठानचे राहणारे पैत्तनिक तसे वरील राष्ट्रांतील राहणारे ते राष्ट्रिक राष्ट्रेषु (विशेषनाम) अधिकृतः किंवा वासः अशा व्युत्पत्तीनें ठक् प्रत्यय होईल (अभ्यंकरशास्त्री). पुढें आन्ध्रभृत्यांचे वेळीं हे सर्व लोक एका सत्तेखालीं आले, तेव्हां भोज–महाभोज याप्रमाणें राष्ट्रिक अथवा रट्ट हे महारट्ट झाले. एकवंश, एकदेश व एकभाषा यामुळें व आदरानेंहि या प्रान्तांतील दाक्षिणात्य लोकांना महारट्ट ही संज्ञा मिळाली. तथापि आन्ध्रभृत्याच्या सत्तेखालीं असलेल्या देशास महाराष्ट्र नांव मिळालें नाहीं. तें पुलकेशी महाराष्ट्रराजा झाल्यानें उत्पन्न झालें. तरीहि तीन महाराष्ट्र त्यावेळीं होते (अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रयाणाम्). हे तीन महाराष्ट्र, विदर्भ पूर्व महाराष्ट्र, पाश्चिम महाराष्ट्र कोकणसुद्धां, आणि कुंतल दक्षिण महाराष्ट्र होत, हें अन्यत्र मीं दाखविलेंच आहे. राष्ट्रकूटांच्या वेळीं अस्सल मराठे राजे झाले, व पुढें यांस मराठदेश ही संज्ञा मिळाली.

थोडक्यांत मागील ऐतिहासिक लेखांचा विचार करतां, महाराष्ट्र हें नांव महाभारतांत नाहीं (इ. स. पू. ३५४). बौद्ध वाङ्मयांत दीपवंशो–महावंशोपर्यंत (इ. स. ३००–५००) नाहीं. पेरिप्लस टालमीमध्यें न (इ. स. १५०). त्यांत कोकणास Ariake व घाटावरच्या देशास आन्ध्रापर्यंत Inner Araeke असें नांव आहे. वराहमिहिराच्या देशांच्या यादींत हें नांव नाहीं (इ. स. ४५०). दण्डीनें ‘ महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ’ यांत प्रथम योजिलें आहे. पुलकेशीच्या शिलालेखांत तें सांपडतें (इ. स. ५०० नंतर). राजशेखर दाक्षिणात्य देश म्हणतो. (इ. स. ९००). पण त्यांत अनेक देशांचा समावेश केला आहे. अल्बेरुनीच्या लेखांत ‘ नर्मदेच्या दक्षिणेस ‘ मराठ देश ’ असें नांव प्रथम आलें आहे (इ. स. १०००). मराठ हा शब्द यापुढें उपयोगांत येऊं लागला, कारण मराठी भाषा यावेळीं उत्पन्न झाली होती तें आपण पुढें पाहूं.

महाराष्ट्र देशांत प्रथम कानडी बोलणारांची वस्ती होती असा कित्येक सिद्धान्त मांडतात. पण आर्य विंध्याच्या दक्षिणेस आले तेव्हां येथें दण्डकारण्य होतें. कृष्णेपर्यंतचा प्रान्त बहुतेक अरण्यमय होता. दुसरें, आर्य येथें आले तेव्हां ते नागवंश–मिश्रित होते. नागवंशी लोक उत्तर

हिंदुस्थानांत गंगायमुना किनाऱ्यानें राहात, असें महाभारतांत(आदिपर्व) वर्णन आहे. हे नाग लोक द्रविडवंशी होते हें खरें, पण द्रविड शब्द व्यापक आहे. द्रविडवंशांत अनेक भिन्न भिन्न जाती होत्या. हे नाग सुन्दर असत असें राजवाडे म्हणतात. कृष्णेपलीकडील द्रविडापेक्षां हे लोक कमी बसक्या नाकाचे असावेत. पण नाग–कन्या म्हणजे अत्यन्त सुन्दर ही राजवाड्यांची समजूत चुकीची असून ती कविकल्पना होय. यांशीं आर्यांचें उत्तर हिंदुस्थानांतच मिश्रण झालें व या आर्यांबरोबर अनेक नाग लोक महाराष्ट्रांत उतरले. राजवाड्यांनीं दाखविल्याप्रमाणें नागपूरपासून नागोठण्यापर्यंत हे नागवंशी लोक वसले. हे संस्कृत किंवा महाराष्ट्री बोलणारे होते, यामुळें महाराष्ट्रांत गांवांचीं नांवें सर्व संस्कृतोत्पन्न आहेत हें राजवाड्यांनीं विस्तारानें दाखविलें आहे. महाराष्ट्रांतील मराठे, ब्राह्मण व क्षत्रिय, आर्यवंशी असून त्यांचें नाक आर्यवंशी आहेच, पण येथील शूद्र देखील दक्षिणेंतील द्रविडांहून भिन्न आहेत. निरनिराळ्या द्रविडवंशी लोकांत जातिपरत्वें काळेपणा, नाकाचा चपटेपणा व उंची कमी अधिक आहे. या गोष्टीची जास्त माहिती प्रत्यक्ष मापें घेऊन मिळविली पाहिजे. पण सामान्य निरीक्षणानें असें म्हणतां येईल कीं, कृष्णेपलीकडील द्रविडवंशी लोकांहून महाराष्ट्रांतील कोकण व घाट प्रदेशांतील शूद्र, आगरी, कोळी वगैरे अधिक उंच व कमी काळे व कमी चपटे नाकाचे आहेत. कातकरी लोक मात्र अधिक चपटे नाकाचे दिसतात. त्याखेरीज बाकीची महाराष्ट्रांतील शूद्र वस्ती नागवंशी आहे असें मानण्यास हरकत नाहीं. रामायणाचा मूळ पुरावा आपल्यासमोर असून किष्किंधा ही द्रविडांची विशेष वस्ती कृष्णेपलीकडे होती. गोदावरीपर्यंत प्रथम ब्राह्मण थोडे थोडे अरण्यांत राहिले. गोदावरीच्या दक्षिणेस कांहीं राक्षसांची वस्ती लंकेकडून आलेली असून ते नरमांसभक्षक बहुतेक मारले गेले किंवा कृष्णेपलीकडे हकलले गेले. हल्लीं तामिल प्रान्तांत हे राक्षस म्हटलेले, काळे, राकट, चपट्या नाकाचे, तांबडें वस्त्र नेसलले द्रविडवंशी लोक दिसतात. तात्पर्य, महाराष्ट्र देश कृष्णेपर्यंत बहुतेक अरण्यमय असून तेथें प्रथम आर्यांनीं व नागवंशीयांनीं वस्ती केली हा सिद्धान्त मानावा लागतो. याला भाषेचा पुरावा विरोधी आहे असें कित्येकांचें मत आहे, म्हणून मराठी भाषेचा या दृष्टीनें विचार करूं.

२ मराठी भाषा.

मराठी भाषेसंबंधानें पूर्वीं बरेच गैरसमज असून ती मुळांत द्रविडभाषोत्पन्न आहे अशीं विधानें अजूनहि ऐकूं येतात. न्यायमूर्ति रानडे यांच्या

Rise of the Maratha Power या पुस्तकांत पुढील विधान आढळतें. "The base of the Marathi Language is Dravidian but its growth and structure are fashioned by Aryan influences." हा गैरसमज कांहीं कानडी शब्द मराठींत दिसतात त्यावरून उत्पन्न झालेला आहे. पण भाषेचा जीव व्याकरण आहे शब्दसमूह नाहीं हा सिद्धान्त लक्षांत घेतला पाहिजे. मराठीचें व्याकरण केवळ संस्कृतसंबद्ध आहे. शिवाय मराठींत कानडी शब्द फार थोडे आहेत. या दोहोंविषयीं थोडें जास्त विवरण करूं.

पाणिनीपर्यंत आर्यलोक संस्कृत बोलत, किंबहुना पाणिनींत संस्कृत हा शब्द नसून नुसता 'भाषा' शब्द आहे. यानंतर देशाच्या निरनिराळ्या भागांत आर्येतरांचें मिश्रण होऊन आर्यद्रविडमिश्र लोक संस्कृत भाषा उच्चार सोपे करून बोलूं लागल्यानें प्राकृत भाषा उत्पन्न झाल्या. पैशाची, शौरसेनी, मागधी, व महाराष्ट्री या चार भाषा पंजाब, शूरसेन (यू. पी.) मगध (बहार–बंगाल) व महाराष्ट्र या प्रांतांत उत्पन्न झाल्या. महाराष्ट्री ही सर्वांत जुनी प्राकृत हा गैरसमज वररुचीच्या व्याकरणावरून उत्पन्न झाला आहे. कारण त्यानें मुख्यतः महाराष्ट्रीचें व्याकरण देऊन ' शेषं महाराष्ट्रीवत् ' असें शेवटीं इतर भाषांचे फरक देऊन म्हटलें आहे. पण असें करण्याचें कारण माझ्या मतें महाराष्ट्रींत उत्तम वाङ्मय झालें होतें हें आहे किंवा वररुचि महाराष्ट्रीय असावा. आर्यांचा प्रसार पाहतां महाराष्ट्रांत शेवटचा प्रवेश झाल्यानें महाराष्ट्री ही अलीकडची प्राकृत हा निश्चय होतो. शिवाय राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत दाखविल्याप्रमाणें महाराष्ट्रीचीं रूपेंहि अलीकडचीं दिसतात; त्यांनीं उदाहरण दिलेलें देतों. सं–कृत, पैशा–कित, शौर–किद, महारा–किअ. असो वररुचि अथवा कात्यायनानें दाखविलेल्या प्राकृत भाषा व्याकरणानें व भाषेनें संस्कृतोत्पन्न आहेत व त्यांत एकादाच देशी शब्द येतो. या महाराष्ट्रीचें पुढें अपभ्रंशांत रूपान्तर झालें, व श्रीमत् शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा विजय होऊन बौद्ध व जैन धर्म मागें पडल्यानंतर संस्कृताचा विशेष आदर होऊन संस्कृताच्या सहाय्यानें मराठी भाषा व इतर प्रान्तांत हिंदी, पंजाबी, बंगाली, वगैरे हल्लींच्या प्राकृत भाषा ९-१० शतकांत उत्पन्न झाल्या. याचा विस्तृत उहापोह मी विविधज्ञानविस्तार यांतील दोन लेखांत केला आहे. याप्रमाणें मराठीचा आत्मा–व्याकरण व शरीर–म्हणजे शब्द–हे दोन्ही संस्कृत, संस्कृतोत्पन्न महाराष्ट्री व अपभ्रंश आहेत.

याचें मुख्य स्वरूप म्हणजे या नव्या भाषांत संस्कृत तत्सम शब्द जसेच्या तसेच येतात. पूर्वीच्या प्राकृतांत केवळ तद्भव व थोडेसे देशी शब्द असत.

मराठीचा संबंध कानडी किंवा तेलंगीशीं आहे असें भ्रान्त विधान कर- ण्याचें एक कारण असें दिसतें कीं, मराठींत 'ळ' हें अक्षर व उच्चार बराच आहे. मला मुख्यतः आजच्या लेखांत या ळ विषयीं कांहीं नवीन विचार सांगावयाचे आहेत. मला असें दिसतें कीं हा ळ मराठींत ज्ञानेश्वरी- नंतर तेलंगणांतून शिरला. याचें मुख्य गमक हें कीं महाराष्ट्रींत व अपभ्रशांत ळ नाहीं इतकेंच नव्हे तर या भाषा नष्ट होऊन जी मराठी उत्पन्न झाली व ज्ञानेश्वरा- पर्यंत बोलली गेली तींत ळ नव्हता. राजवाड्यांनीं जी जुनी ज्ञानेश्वरी छापली आहे तींत कोठेंच ळ नाहीं. सर्वत्र ठिकाणीं ल आहे. (उफलौनि इत्यादि रूपें पहा). या ज्ञानेश्वरीला एकनाथानें जें स्वरूप दिलें त्यांत सर्वत्र ल च्या जागीं ळ घातला. यावरून असें दिसतें कीं, बेदरच्या अमलाखालीं तेलंगी भाषेचें वळण मराठी भाषेला लागलें. एखाद्या महा- कवीच्या भाषेचा प्रभाव सर्व लोकांवर कसा पडतो हें हल्लींच्या केसरी वर्त- मानपत्राच्या भाषेनें कोकणची कोकणी भाषा कशी नष्ट होत चालली आहे यावरून लक्षांत येईल. एकनाथी भागवत व ज्ञानेश्वरी यांच्या अभ्यासानें महाराष्ट्रांत मराठींत ळ घुसला म्हणजे इ. स. १३०० नंतर १४०० पर्यंत घुसून नंतर सर्वत्र प्रचारांत आला.

याचें एक आणखी प्रमाण असें आहे कीं, कोकणच्या अशिष्ट लोकांत अद्याप ळ नाहीं. ते लोक नारिएल असेंच महाराष्ट्री रूप अजून वापरतात. हे लोक जर कानडी असते तर त्यांच्यांत ळ विपुळ (विपुल) असता. आपण ळ शुद्ध समजतों याचें कारण महाराष्ट्रांताल सुशिक्षित लोकांनीं ळ घेऊन त्याला शिष्ट बनविलें आहे.

येथें एक महत्त्वाची गोष्ट आपल्यास सांगितली पाहिजे कीं महाराष्ट्र ऋग्वेदी ब्राह्मणांच्या पाठांत जो ळ शिरला आहे तो या ळ हून भिन्न आहे. " तस्माद्विराळजायत " असें हे वैदिक म्हणतात. पण हा 'ळ' 'ड'च्या जागीं आहे. 'ल'च्या नव्हे. मराठीला ड वावडा नाहीं किंबहुना मराठीचा तो आवडता आहे आणि उत्तरेकडील लोक मराठीची चेष्टा करतांना तुमारा 'इकडं' 'तिकडं' समजमें नहीं आता ' असें म्हणतात. वैदिकांना ल वावडा नाहीं. ' दशांगुलम् ' वगैरे पहा. तेव्हां वैदिक पाठांत हा 'ड'च्या जागीं 'ळ'

केव्हां घुसला हा प्रश्न महत्त्वाचा आहे, पण तो येथें विवक्षित नाहीं. येथें मराठींत 'ल'च्या जागीं 'ळ' ज्ञानेश्वरानंतर आला असा निश्चय राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीवरून होतो तो कोठून आला हा प्रश्न आहे. वररुचीच्या प्राकृत प्रकाशाच्या धर्तीवर एक नवीन सूत्र येथें देतों. " मराठ्यां अनादेर्लस्य प्रायो ळः " अनादेरिति किम् लांकुड लोक इत्यादौ न भवति। प्रायः इति किम् गलबला, भला इत्यादौ आदर्शनात् । स्वार्थे लस्य न भवति विठ्ठल गेला इत्यादिवत् । याप्रमाणें या 'ल'चा 'ळ' होण्याचा थोडक्यांत प्राचीन पद्धतीनें नियम देतां येईल. हा 'ळ' आणि वैदिक 'ळ' एकाच वेळीं आले नसावे. कारण तेलंगणांत ऋग्वेद कमी आहे.

'ळ'संबंधानें मी एका तेलंगी गृहस्थापाशीं विचार-विनिमय केला. तेव्हां असें कळलें कीं तेलंगींतहि ळ कानडींतून आला आहे. हल्लीं तेलंगींत ळ पुष्कळच आहे. परिमळ, कोकिळ वगैरे संस्कृत शब्दांतहि तो घुसला आहे. पण त्याचें म्हणणें असें दिसलें कीं, मूळ तेलंगी शब्दांत ळ नाहीं. तेव्हां ळ हा मुळांत कानडी, पण तो मराठींत बेदरच्या राज्याच्या वेळीं तेलंगींतूत आला असावा. मुसलमानादि मराठींत तो दिसत असल्यानें हाच तर्क संभवतो.

परिशिष्ट

मराठींत कांहीं कानडी शब्द आहेत असें मानलें तरी दहा पांच शब्द अन्य भाषांतून येणें अपरिहार्य आहे. शिवाय जे शब्द चुकीनें कानडी समजले जातात ते येथें सांगितले पाहिजेत. आई शब्द कानडी नाहीं. तो अस्सल मराठी आहे. त्याची व्युत्पत्ति अयि या संस्कृत अव्ययावरून दिसते. कानडींत आईवाचक शब्द ताई आहे. बाई शब्द कानडी नाहीं. बाई शब्दाची व्युत्पत्ति माझ्या दृष्टीनें अशी दिसते. राजवाड्यांनीं दाखविल्याप्रमाणें बाप हा शब्द वप्तृ यावरून प्रथम बप्प रूपांतून आला. याचीं अनेक रूपें मराठींत झालीं. बाप्पा, (गणपति बाप्पा) बाबा, बा, ब (आई). यांपैकीं बा टोपण सन्मानार्थी नामाला लावूं लागले. विठोबा, राघोबा, मोरोबा, इ०. तेव्हां स्त्रियांच्या नांवांना सन्मानार्थी बाई हा शब्द लागूं लागला; लक्ष्मीबाई, पुतळाबाई वगैरे. बाईचे बाय होऊन पुढें बायको हा शब्द निघाला. अक्का, अब्बा, अप्पा हे शब्द कानडी आहेत.

पण ते बहुधा कृष्णेच्या दक्षिणेस वापरतात आणि विशेषतः कानडी स्त्रीपुरुषांविषयीं वापरतात. कांहीं लेखांत कानडी घराण्यांतून आलेल्या राजास्त्रियांना अव्वा उपपद लागलेलें आढळतें.

मुंबईंत प्रथम कानडी बोलणारे कोळी होते अशी मुंबई शहरच्या गॅझेटिअरमध्यें कांहीं चुकीची माहिती दिली आहे. याचा पुरावा म्हणून दिलेला नागपाडा आगरीपाडा यांतील पाडा शब्द कानडी नाहीं असें विश्वेश्वर अय्यानीं निश्चित सांगितलें. पाडा शब्द संस्कृत पाटक शब्दावरून निघाला आहे. किंवा म्हशीचा पाडा या अर्थावरून नवीन झालेला लहान गांव अशा अर्थीं मराठी आहे. उ. जांभुळपाडा वगैरे. मुंबईतील मूळचे कोळी कानडी बोलणें शक्य नाहीं. आरबी प्रवाशांनीं कोकणांत 'लारी' भाषा बोलतात असें लिहिलें आहे. लारी हा लाटीचा अपभ्रंश. मुंबईच्या पहिल्या कायद्याचें भाषान्तर कानडींत केलें गेलें अशी त्यांत दिलेली माहिती चुकीची म्हणतां येत नाहीं. पण हें भाषान्तर जुन्या कानडींत आहे कीं नव्या हें पाहिलें पाहिजे. हें बहुधा विजापूरच्या माहितीसाठीं केलें असावें. विजापूर आपली सत्ता यावेळीं मुंबईवर सांगत होतें.

तात्पर्य, मराठी भाषा कानडीशीं जिव्हाळ्याचा संबंध ठेवीत नाहीं. तर महाराष्ट्री व संस्कृत यांशीं ठेवते. धुळयास नवीन निघालेल्या त्रैमासिकांत राजवाड्यांनीं केलेला एक प्रयत्न छापण्यास सुरवात झाली आहे. ज्ञानेश्वरींतील प्रत्येक ओवीचें संस्कृतीकरण व्याकरणदृष्ट्या व शब्ददृष्ट्या करून दाखविण्याचा हा प्रयत्न आहे, त्यावरून ही गोष्ट चांगली प्रत्ययास येते.

---

२ हर्ष–पुलकेशी युद्ध काल व कारणें.*

(प्रो. अ. स. अळतेकर, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी)

ऐहोळे येथील इ. स. ६३४ मध्यें लिहिलेल्या प्रशस्तीवरून चालुक्य घराण्यांतील दुसऱ्या पुलकेशीनें हर्षवर्धनाचा पराभव केला होता ही गोष्ट प्राचीन हिंदुस्थानच्या इतिहासकारांस पुष्कळ दिवस माहीत आहे; पण

* २० वें संमेलन.

सदरहू हर्ष–पुलकेशी युद्ध नक्की केव्हां झालें याबद्दल अद्याप निश्चित माहिती नाहीं. ऐहोळे प्रशस्तीच्या कालापूर्वी म्हणजे इ. स. ६३४ च्या पूर्वी कधीं तरी ही लढाई झाली होती हें उघड आहे, पण त्यापूर्वी किती वर्षें झाली असावी याविषयीं विद्वानांमध्यें मतभेद आहे. डॉ. फ्लीट यांनीं सदरहू युद्ध इ. स. ६१२ पूर्वी झालें असलें पाहिजे असें आपलें मत नमूद करून ठेवलें आहे[1], व त्याच मताचा अनुवाद डॉ. राधाकुमुद मुकर्जी यांनीं कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या आपल्या हर्षावरील पुस्तकांत केला आहे[2]. उलटपक्षीं स्मिथ यांनीं विशेष कांहीं कारणें न देतां सदरहू युद्ध इ. स. ६२० च्या सुमारास झालें असावें असें मत प्रगट केलें आहे[3] व भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनीं त्याच मताचा अंगीकार केला आहे.[4] प्रस्तुत लेखामध्यें हर्ष-पुलकेशी युद्ध इ. स. ६३० ते ६३४ चे दरम्यान झालें असावें हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

इ. स. ६१२ पूर्वी प्रस्तुत युद्ध झालें असावें याबद्दल पुढें मांडण्यांत येणारीं कारणें फारशीं संयुक्तिक दिसत नाहींत. पुलकेशीच्या उत्तराधिकाऱ्यांच्या ताम्रपटांमध्यें सकलोत्तराधिपति हर्षाचा पराभव केल्यामुळें पुलकेशीस ' परमेश्वर ' हा किताब मिळाला असें विधान अनेकदां केलेलें आढळतें. पुलकेशीच्या हैद्राबादच्या इ. स. ६१२ च्या ताम्रपटामध्यें ज्याअर्थी त्यास सदरहू ' परमेश्वर ' ही पदवी दिलेली आहे त्याअर्थी हर्षाचा पराभव ६१२ च्या पूर्वी झाला असला पाहिजे असा डॉ. फ्लीट यांचा पहिला युक्तिवाद आहे. पण त्यामध्यें फारसें स्वारस्य नाहीं. महाराजाधिराज, परमेश्वर, परम भट्टारक वगैरे पदव्या ताम्रपटलेखक प्रशस्तिविषयीभूत राजासंबंधीं मन मानेल तशा वापरीत हें प्राचीन इतिहासज्ञांस अवगतच आहे. आणि जर ६१२ सालाच्या पूर्वी हर्षाचा पराभव पुलकेशीनें खरोखर केला असेल, तर हैद्राबादच्या ताम्रपटामध्यें, नुकत्याच मिळविलेल्या या अपूर्व विजयाबद्दल एकहि शब्द आढळूं नये हेंहि चमत्कारिकच होय. हर्षविजय व परमेश्वर पदवी यांचा जर खरोखरच निकट कार्यकारण संबंध असेल तर पुलकेशीच्या ६३० सालच्या लोहणेर ताम्रपटामध्यें, व ६३४ सालच्या ऐहोळे प्रशस्ती-

---

1 *Dynasties of the Kanarese Districts*, p. 35,

2 *Harsha, (Rulers of India Series)* p. 31

3 *Early History of India*, 4th Edition, p. 353

4 *History of Medieval Hindu India*, Vol. I p. 23

मध्यें त्यास त्याच्या स्वतःच्या आश्रित कवींनीं ही पदवी देण्याचें कां वगळावें हें समजणें कठीण आहे. ऐहोळे प्रशस्तीमध्यें तर रविकीर्ति हर्ष पराजयाचें रसभरित वर्णन करितो, पण या पराजयामुळें पुलकेशीस परमेश्वर ही पदवी मिळाली असें विधान मुळींच करीत नाहीं. पुलकेशीकालीन प्रशस्तीमध्यें हर्षविजय व परमेश्वरपदवी यांचा कार्यकारण संबंध मुळींच आढळून येत नाहीं; त्याच्या मुलाच्या ताम्रपटामध्येंच तो प्रथम प्रतिपादलेला दिसतो; तेव्हां ६१२ सालच्या हैदराबाद् ताम्रपटामध्यें जरी हर्ष पराजयाचा साक्षात् उल्लेख नसला तरी तेथें पुलकेशीस परमेश्वर ही पदवी दिलेली आहे एवढ्याच कारणावरून हर्ष–पुलकेशी युद्ध ६१२ च्या पूर्वी झालें असलें पाहिजे असा सिद्धान्त निश्चितपणें काढातां येत नाहीं.

युआन च्वांगच्या वृत्तांतावरूनहि हर्ष-पुलकेशी युद्ध ६१२ च्या पूर्वी झालें असें ठरत नाहीं. हें खरें कीं युआन् च्वांग हा असें विधान करितो कीं, राज्याभिषेकानंतर ६ वर्षें हर्षानें अविरत युद्ध करून शत्रूंना नामोहरम केलें व मग ३० वर्षेंपर्यंत शस्त्र न उचलतां तो राज्य करिता झाला.[१] पण यावरून असा सिद्धांत काढतां येणार नाहीं कीं, ६१२ च्या पुढें हर्षानें कोणाशींच युद्ध केलें नसलें पाहिजे, व त्याचें पुलकेशीशीं युद्धही ६१२ च्या पूर्वी झालें असलें पाहिजे. ६१२ नंतरचा हर्षाचा शस्त्रसंन्यास हा अक्षरशः खरा नव्हता ही गोष्ट हर्षाची युआन च्वांगशीं ६४२ च्या सुमारास ज्यावेळीं गांठ पडली, त्यावेळीं तो ओरिसामध्यें लढाईमध्यें गुंतला होता ह्यावरून सिद्ध होतें. मूळामध्यें 'शांततेनें राज्य केलें' याबद्दल 'चुइ' हा शब्दप्रयोग आहे, व त्याचा अर्थ, वॉल्टर्सनें म्हटल्याप्रमाणें, 'न्यायानें व सुखानें राज्य केलें' असा होतो, बिलकूल लढाई न करितां राज्य केलें, असा होत नाहीं.

फ्लीटचा असा समज झालेला दिसतो कीं, ऐहोळे प्रशस्तीमधील श्लोक १७—२४ मधील लढाया झाल्यावर पुलकेशीला राज्याभिषेक झाला व त्याचें वर्णन श्लोक २५ मध्यें दिलेलें आहे. सदरहू समजूतहि निराधार आहे. पुलकेशीनें आपल्या चुलत्याचा राज्य बळकावण्याचा व्यूह कोसळून कसा पाडला, गोविंद व आप्पयिक यांची गट्टी फोडून, एकास आपल्या बाजूचा करून, दुसऱ्याचा धुव्वा कसा उडविला, वनवासी, कोंकण, लाट,

१ Walters, on Yuan Chwang, Volume I p.343.

मालव, गुर्जर, वगैरे राजे कसे आपले अंकित करून घेतले व हर्षास भीतीनें कसें लढाईतून परत पळत जावयास लाविलें, हें १७—२४ या श्लोकांत सांगून, प्रशस्तीच्या २५ श्लोकांमध्यें तिन्ही महाराष्ट्रांचा राजा बनून पुलकेशी दक्षिणदिगधिपति सम्राट बनला असें सांगितलें आहे, हें पुढें दिलेल्या त्या श्लोकावरून उघड होईलः—

विधिवदुपचिताभिः शक्तिभिः शक्रकल्पैः ।
तिसृभिरपि गुणौघैः स्वैश्च माहाकुलाद्यैः ॥
अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणाम् ।
नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रयाणाम् ॥

या श्लोकामध्यें आपल्या चुलत्याच्या पराभवानंतर पुलकेशीस झालेल्या इ. स. ६१० मधील अभिषेकाचा मुळींच उल्लेख नाहीं.

६१२ च्या सुमारची राजकीय परिस्थिति पाहिली तर पुलकेशी व हर्ष यांची लढाई ६१० ते ६१२ च्या दरम्यान होणें शक्य नव्हतें हें सहज आढळून येईल. युआन् च्वांगच्या वृत्तांताची जर काळजीपूर्वक छाननी केली तर हर्षाची दक्षिणेवरील स्वारी इ. स. ६१२ नंतरच झाली असावी हें आढळून येईल. चिनी यात्रेकरू म्हणतो कीं, 'मग जे राजे त्याचें आधिपत्य कबूल करण्यास तयार नव्हते त्यांचा पराभव **पूर्वेकडे चाल करून** हर्षानें केला, व सहा वर्षें अनवरत युद्ध करून पांचीं हिंदुस्थानें आत्मसात् केलीं.' दुर्दैवानें 'पांच हिंदुस्थानें' म्हणजे कोणतीं हें अद्याप निश्चित नाहीं; पण **पूर्वेकडे चाल करून** या शब्दावरून पहिल्या सहावर्षांतील स्वाऱ्या पूर्व हिंदुस्थानांतच केल्या गेल्या हें उघड होतें. युआन् च्वांग पुढें सांगतो कीं, 'मग असा राज्यविस्तार केल्यावर हर्षानें आपलें सैन्य वाढविलें, त्याचें हस्तिदल ६०००० चें व घोडदळ १,००,००० चें झालें.' पूर्वेकडील वंशपरंपरागत शत्रूंचा पहिल्या सहा वर्षांत पराभव केल्यावर जेव्हां त्याचें सैन्य असें संख्येनें व बलानें वाढलें तेव्हांच हर्षाच्या मनांत मध्य, पश्चिम व दक्षिण हिंदुस्थान यांवर स्वारी करण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली असावी, त्यापूर्वीं ती होणें असंभवनीय होतें.

पुलकेशी हा देखील ६१०–१२ या कालावधींत हर्षाचा पराभव करण्यास असमर्थ होता. प्रथम त्यास आपल्या चुलत्याशीं आपलें राज्य

मिळवण्याकरितां घनघोर युद्ध करावें लागलें. या युद्धाचा फायदा घेऊन जे गोविंद, आप्पयिक इत्यादि मांडलीक त्याच्या उलट उठले त्यांचा त्यास समाचार घ्यावा लागला; आणि मग त्यास वनवासी, कोंकण, कारवार इत्यादि ठिकाणीं आपली सत्ता स्थापावी लागली. ऐहोळे प्रशस्तीवरून हें उघड दिसतें कीं पुलकेशीला आपल्या पैतृक राज्यांतील बहुतेक सारे प्रांत पुन्हां युद्ध करून परत जिंकावे लागले. हें सर्व करण्यामध्यें, ६१० मध्यें त्यास राज्याभिषेक झाल्यावर, त्याचीं बरींच वर्षे गेलीं असलीं पाहिजेत. ६१०–६१२ या अवधींत हर्षाचें आव्हान स्वीकारून त्याबरोबर यशस्वी युद्ध करण्यास पुलकेशीस वेळ व शक्ति हीं दोन्ही नव्हतीं, वर दर्शविल्याप्रमाणें या वेळीं हर्षहि इतरत्र गुंतला होता. तेव्हां या अवधींत हर्ष-पुलकेशी युद्ध शक्य दिसत नाहीं.

माळवा, गुजराथ व काठेवाड हे प्रांत कधीं मौर्य, गुप्त, गुर्जर, प्रतिहार यासारख्या उत्तर हिंदुस्थानी साम्राज्यांत मोडत असत, तर कधीं ते चालुक्य, राष्ट्रकूट, या सारख्या दक्षिण हिंदुस्थानी साम्राज्यांत अंतर्भूत होत असत. हे प्रांत आपापल्या साम्राज्यांत खालसा करावेत अशी हर्ष व पुलकेशी या दोघांसहि ६२५ च्या सुमारास इच्छा झाली व त्यामुळें त्यांमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें असें दिसतें. ऐहोळे प्रशस्तीमध्यें क्रमवारच माहिती दिलेली आहे असें जरी निश्चित नसलें, तथापि श्लोक २२ मध्यें सांगितलेलें लाट, मालव व गुर्जर राजांचें मांडलिकत्व श्लोक २४ मध्यें वर्णिलेल्या हर्षाच्या पराभवापूर्वीं फार थोडा काळ घडून आलें असावें असें दिसतें. पुलकेशीनें ज्यावेळीं उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणांत असा चंचुप्रवेश केला, तेव्हां ज्याचें सैन्य अमर्याद वाढलें होतें त्या उत्तराधीश हर्षाला अर्थातच त्याचे बरोबर लढाई करावी असें वाटलें असावें. हर्षानें प्रथम माळव्यावर स्वारी करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला असावा, आणि मगच काठेवाडामध्यें ध्रुवभटावर स्वारी केली असावी. माळवा जिंकल्यामुळें चिडून गेलेल्या पुलकेशीनें वलभीच्या राजास आपल्या पंखाखालीं घेऊन हर्षाचा बेत निष्फल करण्याचा प्रयत्न केला. हें खरें कीं, वलभीपतीस हर्षाच्या उलट संरक्षण दिल्याचें श्रेय दद्द प्रशांतराग यास उत्तरकालीन ताम्रपटांमध्यें दिलेलें आढळतें. पण दद्द हा १–२ जिल्ह्याचा छोटा संस्थानिक होता व त्यास एकट्याला हर्षासारख्या बड्या सम्राटाच्या उलट जाणें शक्य नव्हतें.

ऐहोळे प्रशस्तीमध्यें गुर्जरनृप (अर्थात् दद्द प्रशांतराग) हा पुलकेशीचा मांडलिक होता असें विधान आढळतें. तेव्हां दद्दानें जो ध्रुवभटास हर्षाविरुद्ध आसरा दिला तो पुलकेशीच्या प्रोत्साहनानें व सहाय्यानें दिला असला पाहिजे. शिलालेखांमध्यें अशीं अनेक उदाहरणं सांपडतात कीं, जेथें मांडलिक राजे हे आपल्या सार्वभौमाच्या विजयाचें श्रेय सर्वस्वीं आपणाकडे घेतात. गुर्जर ताम्रपटांची गोष्टही तशापैकींच असावी. गुर्जराधीशांचे स्तुतिपाठक दद्दाची स्तुति करतांना, तो ज्याचा मांडलिक होता, त्या पुलकेशीच्या वांट्यास ते आजीबात विसरले असावेत.

चालुक्य–गुर्जर–वलभींचें हें जें त्रिकूट जमलें त्याचा काल सु.६२५-६३० हा असावा. दद्द प्रशांतराग ह्याचे सन ६२९,६३४ व ६४० चे लेख उपलब्ध आहेत. गुर्जर घराण्याचा जो इतिहास अवगत आहे त्यावरून सन ६२९ च्या फार पूर्वी दद्द गादीवर आला नसावा असें उघड दिसतें. तेव्हां वलभीशानें जो दद्दाचा आश्रय घेतला तो सुमारें ६३० मध्यें असावा.

वलभीपतीचा पराभव करून अगर त्यास आपली मुलगी लग्नांत देऊन हर्षानें चालुक्य–गुर्जर–वलभी त्रिकूट प्रथम फोडलें व मग दाक्षिणेवर स्वारी केली. असें विधान कांहीं वेळां केलेलें आढळतें कीं, जेव्हां दक्षिण हिंदुस्तानांत त्याची मात्रा चालेना तेव्हां मग हर्षानें माळवा गुजराथ काठेवाडकडे आपला मोर्चा फिरविला असावा. पण इतिहासाकडे जर नजर फेकली तर उत्तर हिंदुस्थानांतील सम्राटांना विंध्य पर्वत ओलांडण्यापूर्वी माळवा, गुजराथ व काठेवाड हे प्रांत हस्तगत करणें जरूर व सोयीचें वाटत होतें. मौर्यांनीं प्रथम गुजराथ, काठेवाड खालसा करून मग दक्षिणेकडे मोर्चा फिरवला. गुप्तांना माळवा–गुजराथ–काठेवाड प्रांत जिंकणें हें दाक्षिण देश जिंकण्यापेक्षां सोयीचें आढळून आलें. मुसलमानांनीं ज्यावेळीं प्रथम माळवा–गुजराथ–काठेवाड खालसा केलें त्याचवेळीं मग देवगिरीवर स्वारी केली. बगलेकडे माळवा गुजराथ सारखे स्वतंत्र प्रांत तसेच ठेवून हर्षास दक्षिणेवर स्वारी करणें फार धोक्याचें होतें. तेव्हां ६२८–६३० च्या सुमारास झालेली वलभीवरील हर्षाची स्वारी ही पुलकेशीशीं घडलेल्या युद्धाच्या पूर्वीची असली पाहिजे.

भारत इतिहास संशोधक मंडळामार्फत श्री. खरे यांनीं जो मध्ययुगीन दक्षिण हिंदुस्तानच्या इतिहासाचा साधन खंड प्रसिद्ध केला आहे, त्यामध्यें प्रथम छापलेल्या लोहणेर येथील पुलकेशीच्या ताम्रपटावरूनही वर

विवेचन केल्याप्रमाणें हर्ष—पुलकेशी युद्ध ६३० च्या नंतर झालें असावें असेंच दिसून येतें. श्री. खरे यांनीं मार्मिकपणें दाखविल्याप्रमाणें सदरहू ताम्रपटाचा काल ज्या ‘ द्विपंचाशदधिके शकाब्दपंचके ’ शब्दसमुच्चया-मध्यें सांगितला आहे त्यामधील ‘ शकाब्द ’ या शब्दामध्यें ‘ शताब्द ’ ही दुरुस्ती करणें जरूर आहे. नाहीं तर ताम्रपटाचा काल शक ५२ हा होईल, आणि त्यावेळीं चालुक्य घराणें किंवा दुसरा पुलकेशी हे दोघेही नव्हते. तेव्हां या ताम्रपटाचा काल शक ५५२ किंवा इ.स. ६३० हाच होतो.

या लोहणेर ताम्रपटामध्यें पुलकेशीस ‘ विजयी,’ ‘ साहसैकरति, ’ ‘ अनेक चतुर्दन्तसंग्रामजनितप्राणतयास्वभुजलब्धविक्रमाख्यः ’ ‘ प्रसभा भिमृष्टान्यनृपयशाः ’ अशीं त्याच्या पराक्रमाचें वर्णन करणारीं विशेषणें लावलेलीं आहेत, पण हर्षाच्या पराभवाचा मुळींच ओझरता देखील उल्लेख नाहीं. अनुल्लेख हें सामान्यतः तितकेंसें स्वपक्षसमर्थक्षम कारण नसतें हें खरें; पण लोहणेर ताम्रपटलेखक पुलकेशीचा पराक्रम वर्णन करण्यास लागला असतांना देखील त्यास हर्षविजयाची आठवण झाली नाहीं हेंहि विसरतां येत नाहीं. हर्ष, पुलकेशी, गुर्जर व वलभीयांच्या आतांपर्यंतच्या ज्ञात इतिहासावरून हर्ष-पुलकेशी युद्ध ६२८-९ चे पूर्वी होणें कसें अशक्य आहे हें वर मीं दर्शविलेंच आहे. ६३० मधील लोहणेर ताम्रपटांतील अनुल्लेखही त्याच मतास पुष्टी देतो. तेव्हां सदरहू युद्ध फ्लीट—मुकर्जी म्हणतात त्याप्रमाणें ६१२ चे पूर्वी, अगर स्मिथ—वैद्य मानतात त्या-प्रमाणें ६२०चे सुमारास झालें नसून लोहणेर ताम्रपटाचे कालानंतर, म्हणजे इ. स. ६३० चे नंतर, व ऐहोळे प्रशस्तीचे कालापूर्वी म्हणजे इ. स. ६३४ चें पूर्वी, झालें असावें असें जवळ जवळ निश्चितपणें विधान करतां येईल.

---

३ मौजे कोंढणपूर,—शंभरवर्षांपूर्वी व आज*

(प्रो. वा. गो. काळे.)

पुण्याच्या दक्षिणेस सुमारें सतरा मैलांवर देवीच्या यात्रेसाठीं प्रसिद्ध असलेल्या कोंढणपूरचें शंभर वर्षांपूर्वींचे गांवाच्या हिशेबाचे कागद आपले मित्र, श्री. बाबासाहेब देशपांडे यांनीं श्री. बळवंतराव मुजुमले, सिंहगडचे

---

* २० वें संमेलन.

मुजुमदार यांचेकडून मिळविले आणि कृपा करून मला पहावयास दिले, त्यांसंबंधानें एक टांचण मी आपणांपुढें आज वाचणार आहे. हे कागद शके १७४४ ते १७५६ च्या दरम्यानच्या बारा वर्षांतले असून त्यांमध्यें मौजे कोंढणपूरसंबंधाचे लागणपत्रें, आकारबंद, कुळवार, जमाबंदी चिठ्या, वसुलाच्या व दुसऱ्या याद्या आणि खंडें इत्यादि कागद आहेत.

महाराष्ट्राचा आर्थिक, राज्यकारभार विषयक व सामाजिक इतिहास समजण्याचे व तयार करण्याचे कामीं असल्या कागदांचें विशेष सहाय्य होण्यासारखें आहे हें सांगावयास नको. येथील पेशवे दप्तरांत 'जमाव दप्तर' म्हणून एक भाग आहे; त्यांत सालोसाल तयार केलेल्या अनेक गांवांच्या हिशेबांचा उत्कृष्ट संग्रह आहे. त्यांत सर्व महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक इतिहासाचीं कांहीं महत्त्वाचीं साधनें सांठविलेलीं आहेत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होण्यासारखी नाहीं. सकृद्दर्शनीं हे गांवांचे हिशेब कायम ठशाचे व रूक्ष असे वाटण्याचा संभव आहे. परंतु कोणत्याहि एका गांवाचे पांच पन्नास वर्षांचे उत्पन्नाचे कागद तपासल्यास त्यांमध्यें त्या काळांत झालेल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी प्रतिबिंबित झालेल्या दिसल्यावांचून रहावयाच्या नाहींत. गांव दप्तरांत अर्थातच सरकारी वसुलाच्याच दृष्टीनें माहिती दिलेली असणार; तथापि अलीकडील जमीनमहसुलाबाबतच्या सेटलमेंट रिपोर्टावरून खेडगांवाच्या फक्त आर्थिक परिस्थितीचें ज्ञान होण्यास एक महत्त्वाचें साधन उपलब्ध होतें तशाच प्रकारचें उपयुक्त साधन जुन्या गांवदप्तरावरून तयार करतां येण्यासारखें आहे; आणि त्या दिशेनें पद्धतशीर यत्न होणें आवश्यक आहे. जमिनींतून काढण्यांत येणारीं पिकें, त्यांची पैदास, बाजारभाव, प्रचलित चलनपद्धति, जमीन महसूल पद्धति, लोकसंख्या, खेडेगांवांतील लोकांस राज्यकारभार व गांवकारभार चालण्यासाठीं द्यावे लागणारे निरनिराळे कर, त्यांचे व्यवसाय, त्यांचीं घरें व रहाणी आणि उद्योगधंदे व व्यापार वगैरे अनेक प्रकारची माहिती, गांवदप्तरांत मिळण्यासारखी असते. कोणत्याही गांवाचे पांच दहा वर्षांच्या हिशेबाचे कागद पाहिल्यास त्यांमध्यें पुष्कळ सारखेपणाच आढळेल, व पाऊसपाण्याच्या, रोगराईच्या किंवा राजकीय धामधुमींच्या परिस्थितीमुळें जमीनमहसुलाच्या बाबतींत वर्षानुवर्ष किरकोळ फरक दिसून येतील; परंतु आर्थिक किंवा सामाजिक महत्त्वाचे फेरबदल झालेले दिसून येणार नाहींत. तरी एखाद्या गांवाचे पांच

चार पिढ्यांचे कागद उपलब्ध झाल्यास त्यांत असल्या प्रकारचे बदल आढळल्यावांचून रहावयाचे नाहींत; आणि त्यावरून आर्थिक व सामाजिक स्थितीचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करणें शक्य होईल. गांवदप्तरांतल्या कागदांच्या महत्त्वाकडे मंडळाचें लक्ष्य वेधणें हा प्रस्तुत टांचणाचा मुख्य उद्देश आहे.

कोंढणपूरच्या उपलब्ध झालेल्या कागदांपैकीं सुमारें १०—१५ कागद प्रस्तुत टांचणाकरितां मीं निवडले आहेत आणि त्यांवरून आपणांस काय माहिती मिळते तें येथें पहावयाचें आहे. प्रारंभींच दोन महत्वाच्या गोष्टी नमूद करणें जरूर आहे. कोंढणपूरचा ‘ तनखा ’ उत्पन्न कागदांमध्यें ४०० रु. + ४० रु. सरदेशमुखी =४४० रुपये असें दिलें असून एकदोन ठिकाणीं रुपयांच्या ठिकाणीं “ टक्के ” असा शब्दप्रयोग करण्यांत आला आहे. तेव्हां, मीं माझ्या मागील एका निबंधांत प्रतिपादन केल्याप्रमाणें, जुन्या मराठी कागदपत्रांत “ टका ” शब्द ३—४ रुपयांचें चलन आणि क्वचितप्रसंगीं रुपया ह्या अर्थांनीं वापरलेला आहे. टका म्हणजे पैसा असाहि अर्थ कांहीं जागीं संदर्भानें घ्यावा लागतो, हें मीं पुढें केव्हां तरी मागें अभिवचन दिल्याप्रमाणें दाखविणार आहे. नमूद करण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे कोंढणपूरच्या कित्येक कागदांत हिशेब रुपये, आणे, पै मध्यें करण्याऐवजीं रुपये, पावले आणि रेस ह्यांमध्यें केलेला आहे. शंभर रेस म्हणजे पावला; आणि चार पावले म्हणजे रुपया हें कोष्टक येथें उपयोगांत आणिलेलें आहे. सांगण्यासारखी तिसरी गोष्ट म्हणजे कोंढणपूरचा जमीनजुमला अमूक चाहूर किंवा ‘ टके ’ असा दिलेला नसून तो खंडीच्या मापांत आहे. तेथील एकंदर जमीन १७॥ खंडी असून जमीन वाहणारांवर खंडीस ३४। रुपये ह्याप्रमाणें महसूल आकारण्यांत आला आहे. फसली १२३८ मध्यें कुंपणी सरकारनें जमीनीची मोजणी व दरठरोती केली व त्याप्रमाणें एकंदर क्षेत्र १५५४ एकर भरलें. इसवी सन १८२७ मध्यें कंपनी सरकारनें रेग्युलेशन्स केले त्यांचा ह्या बाबतींत उल्लेख केलेला आहे.

ह्या नंतर शंभर वर्षांनीं म्हणजे आज कोंढणपूरच्या गांवदप्तरांत जमीनीचें एकंदर क्षेत्र सुमारें १३०० एकर दिलेलें आहे. जुन्या कागदांत मौजें कोंढणपुरास एक मजरा ‘सिंदेवाडी’ या नांवाचा जोडलेला आहे;

सध्यांची वाडी ‘ अवसरवाडी ’ आहे. गेल्या शंभर वर्षांत गांवाच्या क्षेत्रांत कांहीं फेरबद्दल झालेला असणें साहजिक आहे, ह्यासाठीं असल्या आंकड्यांचा तुलनात्मक विचार करतांना सावधगिरी बाळगणें जरूर आहे. शंभर वर्षांपूर्वी दुमालदारांचा दस्त धरून एकंदर सरकारी उत्पन्न सुमारें ६०० रुपये होतें. आज मितीस लोकलफंडसुद्धां सरकारी सारा सुमारें १,००० रुपये आहे. पूर्वीं गांवांत घरें सुमारें ५०–६० होतीं. व दर घरास ५ माणसें असा हिशेब केल्यास एकंदर लोकसंख्या २५०–३०० असावी असें अनुमान निघतें. आज मितीस घरें ११३ असून लोकसंख्या ७०० आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या कागदांत गांवचीं एकंदर कुळें ५४, त्यांपैकीं जमीन करणार २६ आणि अडाणी २८ असें म्हटलें आहे. आज जमीनीचे मालक २३२ आहेत. हिंदुस्थानांतील लोकसंख्या सारखी वाढत चालली असून त्यामानानें लोकांचीं उपजीविकेचीं साधनें वाढत नाहींत, ह्या कारणानें देशांत दारिद्र्याचा फैलाव होत आहे असा हिंदी अर्थशास्त्राचे अभ्यासक सिद्धांत मांडतात. त्यास वरील आंकड्यांच्या योगानें पुष्टी मिळत आहे. जुन्या कागदांत महामारीसारख्या रोगांचें व माणसांच्या आणि जनावरांच्या मृत्यूचे उल्लेख असून त्या कारणांनीं कित्येक कुळें नादार होऊन परागंदा झाल्याचीं उदाहरणें आहेत. जुन्या कागदांत गांवचालीचे नांगर १२ दिले असून, सध्यां तीनच आहेत. पूर्वीं गाड्या मुळींच नव्हत्या; आज तेथें २० गाड्या आहेत. पूर्वीं गांवाला एकही विहीर नव्हती, आजकागदांत ११ विहिरी नमूद आहेत. शंभर वर्षांपूर्वीं दर घरास एक म्हैस होती; आज ११३ घरांस मिळून ७२ म्हशी आहेत. अधिक चौकशी केल्यावांचून या आंकड्यांवरून ठाम अनुमानें काढण्याची माझी इच्छा नाहीं. तथापि दोनतीनशें वर्षांची पिढी दर पिढीची एकाद्या गांवची तपशीलवार माहिती मिळाल्यास तिचा किती उपयोग होईल, ह्याची कल्पना येण्यास वर दिलेले आंकडे पुरे होतील असें वाटतें.

जमीनमहसुलाशिवाय लोकांस नानाप्रकारचे किती कर द्यावे लागत असत ह्या विषयींची माहिती, कोंढणपुरांत कोणत्या पट्ट्या होत्या त्याचा निर्देश केला असतां मिळण्यासारखी आहे:– गांवखर्चपट्टी, हक्कदार पट्टी, आंबे पट्टी, काकडीभोपळा, वनचराई, इनाम, तिजाई, गवतकटाई, बट्टा, घरपट्टी, म्हैसपट्टी, भेट बकरा इत्यादि.

शेवटीं मला सूचना करावयाची आहे, ती ही कीं, गांवचे जुने कागद जेवढे मिळतील तेवढे मिळविण्याची सर्वांनीं खटपट करावी. हे कागद लांबलचक व तपशिलाचे असतात म्हणून मंडळाच्या त्रैमासिकांत छापून प्रसिद्ध करणें अवघड होईल. तथापि कांहीं कागद नमुन्यादाखल प्रसिद्ध केले जावे आणि इतरांचा गोषवारा लिहून प्रसिद्ध करावा. इकडे मंडळाचें व सभासदांचें लक्ष्य जाईल अशी आशा आहे.

---

४ श्री. सदाशिवराव भाऊसाहेबांची तसबीर.*

(प्रो. द. वा. पोतदार.)

पानिपत लढविणारे भाऊसाहेब यांची विश्वसनीय तसबीर प्रसिद्ध नाहीं. कलकत्ता येथील व्हिक्टोरिया मेमोरिअल्मध्यें एक तसबीर आहे असें ऐकिलें आहे. वरील तसबिरींची परंपरागत विश्वासार्हता कितपत आहे, तें कळलें नाहीं. आणि तसबिरींच्या बाबतींत विश्वसनीयता पुष्कळ प्रसंगीं निखालसतेनें ठरविणें जड जातें. यास्तव प्राचीन ऐतिहासिक थोर पुरुषांच्या तसबिरा जितक्या मिळतील तितक्या आपणांस पाहिजेतच. एकाच व्यक्तीच्या अनेक तसबिरा मुकाबल्यास घेतां येतील तर फायदाच होईल. किंकेडपारसनीस कृत इतिहासांत खण्ड ३ मध्यें सदाशिवराव भाऊ म्हणून एक चित्र छापलें आहे. त्याचा आधार वगैरे माहिती कांहीं दिलेली नाहीं. तें चित्र भाऊसाहेबांचें असावें असें वाटत नाहीं. शंकेचें मुख्य कारण एक तर उघड असें कीं, डोकीवरील पागोटें तत्कालीन ब्राह्मणी वळणाचें दिसत नाहीं. आपणांजवळ बाजीरावसाहेब, दौलतराव मुरार, माधवरावसाहेब व इतर पेशवे मंडळी यांचीं चित्रें मूळच आहेत. त्यांत ब्राह्मणी पागोट्यास कोचकी उभीच फार करून दिसते. नानाफडणीसासारखे जे कोणी असे असत कीं, त्यांस पागोटें बांधतांच येत नसे. (पहा, हरिवंशाची बखर) त्यांची गोष्ट विचारांत घेतां येत नाहीं. परंतु इतर समकालीन ब्राह्मणांची व पेशवे घराण्यांतील पुरुषांची चाल पाहतां किंकेडपारसनीस यांचे ग्रंथांतील चित्र भाऊसाहेबांचें नाहीं इतकेंच नव्हे तर ब्राह्मणी चित्रहि तें नाहीं असा ग्रह होतो.

* २० वें संमेलन.

पाटण्याचे रावब. राधाकिसन जालान—यांनीं शेरशहाच्या गढीवरील आपल्या नव्या बंगल्यांत दुर्मिळ प्राचीन वस्तुसंग्रह ठेवला आहे— यांचे संग्रहांत एक हस्तिदंतावरील अप्रतिम कारागिरीची तसबीर आहे. तिच्या मागें फारसींत सदाशिवराव पेशवा अशा अर्थाचा शेरा आहे. परंतु ती तसबीर पाहतांच कंगणीदार पगडी पाहून कोणा थोरा मोठ्या मराठे सरदाराची—बहुधा जनकोजी शिंदे यांची—ती तसबीर असली पाहिजे हें चटकन् ध्यानांत येतें. मागील फारसी शेरा कोणीतरी अज्ञानानें किंवा गैरसमजानें मागाहून लिहिला असावा.

या दृष्टीनें प्रस्तुत मला उपलब्ध झालेली भाऊसाहेबांची तसबीर आपणांस अभ्यसनीय, प्रेक्षणीय व संग्रहणीय वाटेल असा मला भरंवसा आहे.

ही तसबीर म्हणजे मूळ तसबिरीचा फोटो आहे. याची एकच प्रत पुण्यांतील एक जुने अनुभवी लेखक व ग्रंथकार रा. **ल. ना. जोशी** यांनीं मला मोठ्या ममतेनें दिली व ती प्रत भा. इ. सं. मंडळास योग्य वाटल्यास नजर करण्याची परवानगी दिली. याबद्दल सर्वांनीं रा. जोशी यांचे आभारी असलें पाहिजे. रा. जोशी यांचे मेहुणे कै. विष्णु वामन वर्तक यांनीं चाळीस वर्षांपूर्वी हे फोटो जोशी यांस दिले. वर्तकांचे कोणी पूर्वज बाजीरावसाहेबांबरोबर ब्रह्मावर्तास गेले होते. बाजीरावांच्या निधनानंतर ते पुण्यास आले. येतांना त्यांनीं हे फोटो बरोबर आणिले. १८५७ च्या प्रसंगांतील जनरल हे नांवाचे लष्करी अधिकारी नानासाहेबांचे स्नेही असत. हे फोटो त्यांनीं नानासाहेबांच्या ब्रम्हावर्तातील दिवाणखान्यांतील जुन्या रंगीत तसबिरांवरून पूर्वपद्धतीच्या फोटोग्राफीनें घेतले असें वर्तक सांगत.

इतर पेशव्यांच्या या संग्रहांतील तसबिरी प्रसंगानुरोधानें आपल्यासमोर ठेवीन. मात्र या बाजीरावप्रभृतींच्या तसबिरी उपलब्ध अस्सल तसबिरींशीं चेहेरेपट्टींत अगदीं चांगल्या मिळतात यांत कांहीं संशय नाहीं आणि ही भाऊसाहेबांची तसबीरहि त्यामुळें अस्सल विश्वसनीय ठरण्यास पात्र होते.

तसबीर.

प्रस्तुतच्या चित्रांत दिसणारा भाऊसाहेबांचा चेहेरा मोठा भव्य, पाणीदार, कपाळपट्टी उभी, प्रशस्त, डौलदार, आणि एकंदर ठेवण एकदम छाप

टाकणारी दिसते. पागोट्यांतील ऐटदार तुऱ्यानें चेहेरा खुलून दिसतो. या चेहेऱ्यांतली चमक व उमेद पारसनीस तसबिरींत दिसून येत नाहीं.

पेशवेमंडळी बहुतकरून आडवे गंध लावीत. पर्वतीचा देवदेवेश्वर त्यांचा त्यामुळें हें योग्यच दिसतें. तसेंच आडवें गंध या तसबिरींत आहे. वर बारीक तलम मलमलीचा अंगरखा आणि आंत किनखापाची पेटी घातली आहे. कानांत चौफुला असून गळ्यांत मोत्याचा कंठा आहे. एका हातांत तलवार उभी धरली आहे. दुसऱ्या हातांत एक फूल आहे. कमरेला घोड्याचे मुठीचा खंजीर आहे.

थोरले बाजीराव, माधवराव, नानासाहेब यांचेप्रमाणेंच सदाशिवराव भाऊंची आंगलटहि सडपातळच आहे हें या चित्रावरून दिसून येते.

पुढें उभा आहे तो इब्राहिमखान तर नव्हे? हुजऱ्यांनीं मांडचोळणे घातले आहेत. एक चौरी ढाळीत आहे. दुसऱ्यानें अब्दागीर धरली आहे असें वाटतें.

एकानें उभा नाम लावलेला स्पष्ट उमटला आहे. दोघांचीं अंगें बहुधा उघडीं असून वरून शेला किंवा दुपेटा टाकलेला आहे. तिसऱ्याचा उगीच थोडा भाग आलेला आहे.

अशी ही भाऊसाहेबांची उमदी तसबीर आहे. हिच्या उपलब्धीनें मराठेशाहींतल्या एका मोठ्या मोहऱ्याचें निरंतर घरबसल्या दर्शन घेऊन मनाची बहुत दिवसांची तृषा तृप्त करण्याची उत्तम संधि लाभली आहे.

---

५ कासीराजकृत अध्यात्मानुभव*

(श्री. ग. ह. खरे.)

प्रस्तुतचें बाड मला क्षेत्र माहुली जि. सातारा येथें श्री. बळवंतराव प्रभुणे यांचे घरीं त्यांचे येथील रुमाल शोधीत असतां मिळालें. यांत अध्यात्मानुभव, चांगदेवाचें ज्ञानेश्वरास व ज्ञानेश्वराचें चांगदेवास पत्र अशीं प्रकरणें आहेत. पैकीं फक्त पहिल्या प्रकरणाविषयींचें टिपण आपणापुढें वाचीत आहे. या प्रकरणाचें नांव वर दिल्याप्रमाणें 'आध्यात्म आनुभव'

* २० वें संमेलन.

असें आहे. हा ग्रंथ ओवीवृत्तांत लिहिला असून एकंदर ओवी २९४ + ३ =२९७ आहे. प्रत्येक ओवींत नियमानें चार किंवा साडेचार चरण आहेत असें नाहीं. कित्येकांत चार, कित्येकांत साडेचार, कित्येकांत तीन, तर कित्येकांत पांच किंवा जास्त चरण आहेत. प्रकरणाचा वेष गुरुशिष्यसंवादरूप असला तरी शिष्यानें फारसे प्रश्न विचारलेले दिसत नाहींत.

कर्ता–काळ–लेखक–या प्रकरणाचा कर्ता कासी, कासीराज किंवा कासी सुंदर या नांवाचा आहे. ग्रंथांत कोठेंही त्यानें आपले आईबाप, गुरु, वसतिस्थान वगैरेंचा उल्लेख केला नसल्यामुळें ती माहिती आपणांस मिळत नाहीं. ग्रंथसमाप्तीचा काळ ग्रंथाच्या शेवटीं श. १७४२ पौष कृष्ण १३ बुधवार, हस्तनक्षत्र, दिवसां पूर्व प्रहर असा दिला आहे. शके १७४२ च्या पौष कृष्ण १३ ला बुधवार येत आहे. नक्षत्र येतें कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. प्रकरणाचा लेखक कोणी नारायण अंबाजी नांवाचा गृहस्थ आहे. संतकविकाव्यसूचींत या ग्रंथाचें व ग्रंथकाराचें नांव नाहीं. अवचित सुत काशि (श. १५८४), काशिकवि (श. ?), काशिराज (श. १५४० ते १६००), दुसरा काशिराज अशा चारांचा उल्लेख आहे. परंतु पहिला व तिसरा यांचे काल प्रस्तुत कवीच्या कालाशीं जुळत नाहींत. दुसऱ्याचा काल ठाऊक नसून सूचीकारांनीं पहिला व दुसरा हे भिन्न आहेत काय असा प्रश्न केला आहे. सूचीकारांनीं चौथ्याच्या नांवावर 'पवन विजय' नांवाचा ग्रंथ दिला असून त्याचा काल श. १७४३ असा सांगितला आहे. तसेंच पवनविजयकार काशिराज रंगनाथ मोगरे याचा शिष्य सांगितला आहे. पण रंगनाथ मोगरे याविषयीं माहिती देतांना तो श. १५३० च्या सुमारास झाल्याचें नमूद केलें आहे. रंगनाथ मोगरे जर श. १५३० चे सुमारास होता असें धरलें तर प्रस्तुत कासी त्याचा शिष्य होऊं शकणार नाहीं. बाजारांत 'पवनविजय' नांवाचें चोपडें मिळतें पण तें मुकुंदराजाच्या नांवावर आहे. काशिराजाचा पवनविजय ग्रंथ मला अजून पहावयास मिळाला नाहीं. त्यामुळें प्रस्तुत कासीराज व पवनविजय कर्ता काशिराज एक कीं भिन्न हें सांगूं शकत नाहीं.

ग्रंथ वाचून पाहिला तर आपल्या ध्यानांत येईल कीं, ग्रंथाचें स्वरूप सामान्य आहे, त्यामध्यें नावीन्य असें कांहीं नाहीं. तरी पण ज्या शिष्याला गुरूंनीं हा ग्रंथ सांगितला त्याला गुरूंनीं " आरे बापा सिष्य नंदना ॥

कैशा समजल्या रे खुणा ॥ काय आनुभवोनि आले मना ॥ त्या आनुमानासी पा " असें विचारतांच शिष्यानें आपला संतोष व्यक्त करून संशय निवृत्त झाल्याची विस्तृत कबुली दिली आहे. तेव्हां गुरुंनीं त्यास ' तरी गुप्तपणें या लोकासी। सर्वदा विचरे' असें सांगितलें व शिष्यानें तसें वागण्याचें कबूल केलें आहे.

अंतः—

मग गुरु म्हणति सिष्यासी ॥ लाधलासी अैसीया सुखासी ॥
तरी गुप्तपणे या लोकासी ॥ सर्वदा विचरे ॥ २९० ॥
कलीचे जन बहु उध्धट ॥ म्हणोनी गुप्त आसे नव्हे प्रगट ॥
ऱ्हदई आनुभवाचा लोट ॥ जनी पष्ट न करावा ॥ ९१ ॥
वर्णाश्रमधर्म ॥ वीचारे आचरे आनुकर्मे ॥
आनुभवाची वर्मे ॥ गुप्तरुपे नामे विवरे ॥ ९२ ॥
तेची आज्ञा धरुनी शीरी ॥ आता विचरण संसारी ॥
कासी संतासी नमस्कारी ॥ आज्ञाधारी गुरुचा ॥ ९३ ॥
हा आध्यात्म आनुभव ॥ ग्रंथासी ठेउनीया नाव ॥
कासीराज सद्भाव ॥ नाही माव द्वैताची ॥ २९४ ॥
ईति श्री मत आध्यात्मसार ॥ विरचितायां कासी सुंदर ॥
हा आनुभव घेई सार ॥ श्रीगुरुप्रसादे ॥ १ ॥
शके सत्रासे वेताळीसी ॥ पौष कृष्ण त्रयोदसी ॥
बुध हास्तनक्षत्रेसी ॥ दीवा पुर्वप्रहरी समाप्तः ॥ १ ॥
हास्ताक्षर आजी नारायण आंबाजी ॥
लीखीत्वा कष्टेजी ॥ प्रतिपाळ करावा ॥ १ ॥

---

६ मंडळवृत्त.

विसावें संमेलन.

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें मंडळाचें २० वें वार्षिक संमेलन मिति वैशाख वद्य ८।९।१० शके १८५४ (ता. २७।२८।२९ मे इ. १९३२) शुक्रवार, शनिवार, रविवार रोजीं सकाळ संध्याकाळ मंडळमंदिरांत भरून

यशस्वी रीतीनें पार पडलें. या समारंभास पुढीलप्रमाणें प्रमुख सभासद व पाहुणेमंडळी हजर होती.

श्री. नानासाो वैद्य, रा. सा. बाबासाहेब देशपांडे, श्री. वा. सि. बेंद्रे श्री. वि. वि. देशपांडे, सर. खं. चिं. मेहेंदळे, श्री. के. वि. फणसे(सिहोरा), प्रो. ल. ग. लेलेशास्त्री, श्री. वा. प. मेहेंदळे (औंध), श्री. शं. ना.जोशी, श्री. शि. ह. गोखले. श्री. चिं. ग. कर्वे, श्री. के. भा. लेले, प्रो. श्री. व्यं. पुणतांबेकर (बनारस), श्री. श्री. कृ. साठे, श्री. य. न. केळकर, श्री. तात्यासाो केळकर, सर. आबासाो मुजुमदार, रा. सा. ना. गो. चापेकर, (बदलापूर), श्री. वि. ग. जावडेकर (धुळें),श्री. दि. र. लेले(सोलापूर), प्रो. वा. गो. काळे, श्री. ग. गं. जांभेकर, श्री. कृ. पां कुलकर्णी, प्रो. वा. वि. मिराशी (नागपूर), श्री. म. दा. साठे (यवतमाळ), श्री. एम्. व्ही. गुजर, श्री. य. ग. फफे, श्री. द. रा. लिमये, प्रो. श्री. नी. चाफेकर, श्री. ग. ह. ओक, श्री. अं. वा. फडणीस, श्री. व्ही. डी. देशपांडे, श्री. वि. म. कोल्हटकर, श्री. के. बा. देशमुख, श्री. ए. रा. आलेगांवकर (खडकी), श्री. स. ग. जोशी, श्री. वि. गो. दिघे, प्रो. शं. दा. पेंडसे (नागपूर), श्री. रा. ग. हर्षे, श्री. वि. वि. देशपांडे, श्री. वा. रा. मोडक, श्री. शं. ल. वैद्य, श्री. रा. दा. जोग (नागपूर), श्री. सि. र. तारकुंडे, प्रो. स. वि. आपटे, श्री. य. रा. दाते, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन (कोल्हापूर), श्री. ग. वि. देवधर,श्री. शं. द. देवधर, श्री. आर. डी. घोलप, श्री. सि. वि. चित्रावशास्त्री, श्री. गो. अ. मोडक, श्री. कृ. वा. पुरंदरे, श्री. मा. गो. भिडे, श्री. पु. ब. लेले, रा. सा. रा. शं. दीक्षित, श्री. अ. वि. पटवर्धन, प्रो. द. वा. पोतदार, श्री. का. वि. खानविलकर, प्रो. रा. पु. पटवर्धन (पुणें), प्रो. श्री. गो. बेरी, श्री. ज. कृ. उपाध्ये (नागपूर), श्री. व्ही. आर. अभ्यंकर, श्री. वि. के. सोहनी, श्री. प. सि. सबनीस, श्री. शं. प. भिडे, श्री. ना. श्री. देवधर, श्री. या. ब. मानकर (नागपूर), श्री. पु. वि. केसकर, श्री. एन्. के. मोडक, श्री. बा. ग. परांजपे, श्री. द. वि. आपटे, श्री. ग. ह. खरे, श्री. दि. वि. काळे, श्री. वि. वा. जोशी (बीरवाडी), श्री. वि. के. अभ्यंकर, प्रि. ध. रा. गाडगीळ, श्री. मा. कृ. कुळकर्णी, मुनशी अब्दुल अझीझ, श्री. बाळासाो ओक, श्री. वा. कृ. भावे, श्री. गो. के. देशकुलकर्णी. प्रो. रा. प. सबनीस.

प्रारंभीं मंडळाचे व संमेलनाचे अध्यक्ष श्री. नानासो वैद्य यांनीं सर्व सभ्यांचें स्वागत केलें आणि ते म्हणाले ' कित्येक लोक असें समजतात कीं, हें मंडळ हिंदुस्थानच्या इतिहासाविषयीं संशोधन करीत नसून फक्त महाराष्ट्रापुरतेंच संशोधन करतें. पण ही गोष्ट खोटी आहे हें कै. लोकमान्य टिळक व वा. दा. तळवळकर यांच्या लेखांवरून कळून येईल. येथें कागदपत्र मोठ्या श्रमानें मिळवून आणून त्यांचें सम्यक् शोधन केलें जातें. तसें करतांना खाणींत सांपडणाऱ्या सोन्याप्रमाणें कधीं माहिती कणशः निरनिराळ्या कागदांतून गोळा करावी लागते तर कधीं ही माहिती एकदम एकत्र मिळते. कै. दिवेकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या शिवभारताची गोष्ट अशीच आहे. असो. यंदा मंडळानें ही इमारत ज्या जागेवर उभी आहे ती जागा खरेदी केली आहे. मंडळाचें कामही अत्यंत व्यवस्थित चाललें आहे. सार्वत्रिक मंदीचा परिणाम मंडळाच्या आयावरही झाला आहे, ही मात्र दुःखाची गोष्ट आहे. इ. इ. श्री. नानासो वैद्य यांचें भाषण संपल्यावर मंडळाचे चिटणीस प्रो. पोतदार यांनीं प्रथम कै. केशवराव कोरटकर यांच्या निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव मांडला तो सर्वांनीं उभे राहून पास केल्यावर निरनिराळ्या ठिकाणाहून आलेले शुभ संदेश वाचून दाखविले. त्याच प्रमाणें कांहीं नवीन सभासद करून घेतल्यावर निबंधवाचनास सुरुवात झाली. तीन दिवस थोडाफार फरक करून छापील कार्यक्रमाप्रमाणें निबंधवाचनाचें काम पार पडलें. वाचलेल्या निबंधांची यादी पुढें दिली आहे. तिसरे दिवशीं सकाळीं प्रो. पोतदार यांचा निबंध वाचून झाल्यावर यवतमाळ येथील श्री. म. दा. साठे यांनीं तेथील शारदाश्रमाचा थोडक्यांत वृत्तांत सांगून आश्रमाचे वर्गणीदार होण्याबद्दल विनंति केली. नंतर श्री. खरे यांनीं निबंध वाचल्यावर प्रो. पोतदार यांनीं मंडळाचा शके १८५३ चा अहवाल, हिशेब, तसेंच ५४ सालचें अंदाजपत्रक वाचून दाखविलें. तो पास करण्याबद्दल प्रो. पुणतांबेकर यांनीं सुचविलें व प्रो. पटवर्धन यांनीं अनुमोदन दिल्यावर मंजूर करण्यांत आला. हिशेब तपासनीस म्हणून श्री. ग. स. मराठे यांसच नेमावें असें ठरलें. ९ ते १० च्या दरम्यान वेळोंवेळीं जाहीर केल्याप्रमाणें त्रैवार्षिक निवडणुकीचें कामही नियमानुसार पार पडलें तो प्रकार असाः— प्रथम निवडणुकींत मत देण्याचा हक्क असलेल्या सभासदांची यादी करून ती मतदार सभासदांकडे पाठविली व त्यांपैकीं कोणते लोक कोणत्या जागेवर निवडून यावेत याच्या याद्या

मागितल्या. त्या आल्यानंतर पुन्हां त्यांपैकीं कोणत्या जागेकरितां किती लोक निवडावयाचे आहेत व नवीन यादीपैकीं कोणते लोक कोणत्या जागीं यावेत याची निवड करणाऱ्या मतपत्रिका मागितल्या होत्या. त्या मतपत्रिका आलेलीं पाकिटें प्रो. पुणतांबेकर व प्रो. पटवर्धन यांनीं फोडून निवडणुकीचा निकाल लावला व प्रो. पोतदार यांनीं तो जाहीर केला. याच दिवशीं दुपारीं आरंभीं मोकळी चर्चा झाली. त्यांतील सूचनांचें स्वरूप असें:– सर्व सामान्य वाचकांना गोड वाटतील असे लेख असावेत. दर वर्षीच्या पहिल्या अंकांत मागील वर्षी संशोधनांत नवीन गोष्टी काय समजल्या याची थोडक्यांत माहिती द्यावी किंवा अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत वरील माहिती सांगावी. त्रैमासिकांत अगदीं नवीन अशी माहिती मांडली जावी, विस्तार करूं नये. त्रैमासिकाचें संपादकीय व निबंधनिवडीचें काम हल्लींहून जास्त कसोशीनें व्हावें. वर्षांतून ४ सभा संमेलनाच्या धर्तीवर भरवाव्या या व अशा तऱ्हेच्या इतर सूचनांचा कारभारीमंडळ सहानुभूतिपूर्वक विचार करीत आहे. सायंकाळीं निबंधवाचन झाल्यावर अध्यक्ष श्री. नानासो वैद्य यांनीं संमेलनांतील निबंधांचा आढावा घेऊन समारोप केला व संमेलन संपल्याचें जाहीर केलें.

सभासद:– गेल्या चैत्र ते ज्येष्ठ या तीन महिन्यांत झालेले नवीन सभासद.

क.	सभासदाचें नांव	गांवाचें नांव	वर्ग
१६७५	श्री. बळवंत सदाशिव दाते	सातारा	४
१६७६	प्रो. श्रीधर गोविंद बेरी	डे. कॉलेज	४ तहा
१६७७	श्री. नानासाहेब पांडुरंगराव थोपटे	भोर	२
१६७८	डॉ. रामचंद्र विष्णु राहतेकर	पुणें	२
१६७९	श्री. के. बी. अरकटकर	”	२
१६८०	श्री. नारायण विनायक पांडव	”	४
१६८१	श्री. दत्तात्रय गणेश आगाशे B.A., LL.B.	”	२
१६८२	श्री. बाळाजीराव भाऊराव ढमाले	”	३
१६८३	श्री. महादेव हरी थिटे	वाई	४
१६८४	श्री. यशवंत विनायक देशपांडे	जळगांव	३

क.	सभासदाचें नांव	गांवाचें नांव	वर्ग
१६८५	रावसाहेब गुरुनाथ व्ही. मडुरकर	सोलापूर	२
१६८६	श्री. दत्तात्रय परशुराम जोशी	पुणें	४ तहा
१६८७	श्री. व्यंकटेश त्रिंबक चाफेकर	"	४ तहा
१६८८	श्री. जाधवसिंग भवानसिंग रजपूत	नगरदेवळें	२
१६८९	श्री. दत्तात्रय गणेश ठोसर	कोल्हापूर	४
१६९०	श्री. गोपाळ कृष्ण साठे	पुणें	४
१६९१	श्री. विष्णु पांडुरंग नेने	बडोदा	३
१६९२	प्रो. स. ना. दातार	अहमदाबाद	२
१६९३	श्री. विश्वनाथ गणेश जावडेकर	धुळें	४ तहा
१६९४	श्री. दिनकर रघुनाथ लेले	सोलापूर	४
१६९५	श्री. केशव भास्कर लेले	पुणें	३
१६९६	श्री. श्री. मा. पळर्नाटकर	हैद्राबाद	३
१६९७	श्री. विनायक केशव अभ्यंकर	भतकुणकी	४
१६९८	श्री. काशिनाथ गोपाळ पिंगळे	ग्वाल्हेर	४
१६९९	श्री. हरीभाऊ पाटसकर	चाळीसगांव	२
१७००	श्री. जी. डी. कुळकर्णी	अकोला	४
१७०१	प्रो. दत्तात्रय गोपाळ कर्वे	पुणें ४	३
१७०२	प्रो. वि. आ. आपटे, एम्. ए.	सांगली	४
१७०३	प्रो. गो. वि. तुळपुळे, एम्. ए.	पुणें	४
१७०४	श्री सिद्धेश्वर मनोहर सुर्डीकर	पानगांव	२

पाक्षिक सभा— गेल्या चैत्र ते ज्येष्ठ या ३ महिन्यांत २ पाक्षिक सभा होऊन त्यांत पुढील निबंध वाचले गेले.

पा. स.	निबंध	लेखक.
१	१ सर्जाखानाचें मालोजी घोरपड्यास पत्र	श्री. द. वि. आपटे
	२ भुइंज येथील जाधवांचें घराणें	श्री. शं. ना. जोशी
	३ पेशव्यांचे वाड्यास आग व शांतीचे नवस	प्रो. द. वा. पोतदार
२	४ नारायणगांवचा शुक्रेश्वर—शिलालेख	प्रो. द. वा. पोतदार
	५ शिवापूरच्या नागेश्वरावरील शिलालेख	" " " "
	६ नानासो पेशवे यांचें वजन	श्री. दि. वि. काळे
	७ चांभारगोंदें येथील मुंगी पाटील	श्री. शं. ना. जोशी
	८ जेधे यांचीं महत्त्वाचीं फर्मानें	श्री. ग. ह. खरे

ग्रंथालय–मंडळास देणगीदाखल व अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
आयंगार एस. के.	हिंदू ॲडमिनिस्ट्रेटिव् इन्स्टिटयूशन्स् इन साऊथ इंडिया	रजिस्ट्रार युनिव्हसिटी ऑफ मद्रास
	ऑपरेशन्स ऑफ दि वार एक्स्प्लेन्ड् अँड इलस्ट्रेटेड	दि. वि. काळे
	इंडियन अटलास् (दिल्ली)	पोतदार द. वा.
इंडियन हिस्टॉरिकल रेकार्डस् कमिशन	प्रोसिडिंग्स् ऑफ् दि मीटिंग ॲट पाटना	गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया
एडवर्डस् जे. एफ्.	तुकारामबोवांचा सेतु	बॉंबे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटी
कॉटन् सी. डब्ल्यू. ई.	हॅंडबुक ऑफ् कमर्शियल इन्फॉर्मेशन् फॉर इंडिया	काळे दि. वि.
कुलकर्णी कृ. पां	संस्कृत ड्रॉमा ॲन्ड ड्रॅमॅटिस्टस्	कुलकर्णी कृ. पां.
केळकर स. के.	शिवछत्रपति	केळकर स. के.
	कै. शं. बा. दीक्षित (ज्योतिर्विद्) यांचें संक्षिप्त चरित्र का. म. प. मं.	आपटे म. वि.
गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया, मिलिटरी डिपार्टमेंट	फील्ड सर्व्हिस रेग्युलेशन्स् (ऑर्गनिझेशन अँड ॲडमिनिस्ट्रेशन) व्हा. १ पार्ट्स् १–२ (ऑपरेशनस्) व्हा. २	काळे दि. वि.
गव्हर्नमेंट ऑफ् बॉंबे.	ठाना गॅझेटियर	जोशी स. ग.
गव्हर्नमेंट ऑफ् बॉंबे	पेशवे दप्तर नं. २१-२२-२३	गव्हर्नमेंट ऑफ् बॉंबे
गव्हर्नमेंट ऑफ् बॉंबे	स्टॅटिस्टिकल् अटलास् ऑफ् दि बॉंबे प्रेसिडेन्सी	काळे दि. वि.
गव्हर्नमेंट ऑफ् मद्रास	ट्रायनीयल कॅटलॉग ऑफ् मॅन्युस्क्रिप्ट्स् १९२२-२३ ते १९२४-२५ व्हॉ. ५ पार्ट १ संस्कृत ए.बी.सी.	गव्हर्नमेंट ऑफ् मद्रास

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
घारे ह. श्री.	देशी जमाखर्चाचे धडे	काळे दि. वि.
जोशी वा. म.	अध्यक्षांचें भाषण (महाराष्ट्रसाहित्य संमेलन)	काळे दि. वि.
टाइम्स् ऑफ् इंडिया	इंडियन् इयर बुक १९१८	काळे दि. वि.
डोंगरे वा. पु. व जोशी शं. ना.	श्रीशिवाजी उत्सव पडघवली या संस्थेचा सप्तवार्षिक वृत्तांत व भोर संस्थानाधिपति पंतसचिव यांचा संक्षिप्त पूर्वेतिहास	खरे ग. ह.
तंजावर महाराजा सरफोजीज सरस्वती-महाल लायब्ररी.	डिस्क्रिप्टिव्ह कॅटलॉग ऑफ् संस्कृत मॅन्युस्क्रिप्ट्स् व्हाल्युम्स् १०-११-१२	टी. सांबमूर्तिराव ऑ.से.तं.म.स.स.ला.
तामसकर गो. दा.	अफलातूनकी सामाजिक व्यवस्था	काळे दि. वि.
तामसकर गो. दा.	कौटिलीय-अर्थशास्त्र-मीमांसा	काळे दि. वि.
तामसकर गो. दा.	कौटिल्यकालकी कुछ प्रथाएँ	काळे दि. वि.
तामसकर गो. दा.	मौलिकता	काळे दि. वि.
तामसकर गो. दा.	राज्यविज्ञान	काळे दि. वि.
नेदर्लंड्स-इंग्लिश वर्डबुक	त्वीद दिल्	काळे दि. वि.
पंतसचीव स. र. (प्रकाशक).	साहित्य तोरण अर्थात् भोर-संस्थान-लेखसंग्रह	श्री. स. र. पंतसचीव
परांजपे शि. म.	संमेलनाध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण (म. सा. परिषद) बेळगांव	काळे दि. वि.
पारसनीस द. ब.	पन्हाळा	पारसनीस अ. द.
पिसुर्लेकर पांडुरंग	पोर्तुगीज-इ-मराटाज कोमो से परदेन्, पार्त फोर्थ, बासीम	पिसुर्लेकर पांडुरंग
पोतदार द. वा.	महाराष्ट्र साहित्य परिषद्	काळे दि. वि.
भट वि. मो.	हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा सोपा व सचित्र इतिहास	खरे ग. ह.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
भट वि. मो.	हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा सोपा व सचित्र इतिहास	भट वि. मो.
मोडक वि. ब.	प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक चरित्र	मोडक वि. ब.
रत्नमणिराव भीमराव	गुजारातनु पाटनगर अमदाबाद	आठवले आर. बी.
वैद्य चिं. वि.	दि पोझीशन ऑफ दि अनटचेबल्स् इन दि सनातन धर्म	वैद्य चिं. वि
शिक्षण प्रसारक मंडळी, पुणें	रिपोर्टस् १९३०-३१	कोल्हटकर वि. म.
सरदेसाई गो. स.	चित्रमय हिंदी राजवंश (मोगल बादशहा)	सरदेसाई गो. स.
सरदेसाई गो. स.	मराठी रियासत, उत्तरविभाग भाग ३	सरदेसाई गो. स.
हिप्परगे खासगी शाळा	दशम वार्षिक वृत्तांत	श्रीयुत भातुंब्रेकर

कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, मंडळाचे एक उत्साही सभासद न्या. मू. केशवराव कोरटकर यांस नुकतीच पुणें येथें मधुमेहाचे विकारानें देवाज्ञा झाली. तन्निमित्त मंडळ एक दिवस बंद ठेवण्यांत येऊन मंडळाचे संमेलनप्रसंगीं पुढीलप्रमाणें ठराव करण्यांत आला.

दक्षिण हैद्राबाद येथील प्रसिद्ध महाराष्ट्रीय पुढारी केशवरावजी कोरटकर यांस पुणें मुक्कामीं नुकतीच एकाएकी मधुमेहानें देवाज्ञा झाली केशवरावजी हे मंडळाच्या कार्यकारीमंडळाचे बरींच वर्षे सभासद होते. खेरीज त्यांनीं मंडळाला मोठी देणगीही दिली होती. मंडळावर त्यांचें प्रेम फार दृढ होतें. दरसाल कोठेंही लांब असले तरी नियमानें मंडळाच्या संमेलनास ते हजर राहावयास चुकत नसत. मोंगलाईंत संशोधन करावयास पुष्कळच जागा आहे, त्यासाठीं ते स्वतः जातीनें प्रयत्न करीत, येथें माहिती वाचीत व इतरांस सहाय्य देत. त्यांच्यासारख्या अत्यंत वजनदार, सज्जन, चतुर व संग्राहक पुरस्कर्त्यांस मंडळ अंतरलें याबद्दल या सभेस परम खेद होत आहे.

संमेलनाचा कार्यक्रम.

(वाचलेले निबंध)

दिवस पहिला—शुक्रवार

(वैशाख वद्य ७।१८५४, ता. २७ मे १९३२)

सकाळ

(१) श्री. चिं. वि. वैद्य, एम्. ए., एल् एल्. बी.	(१) मराठी भाषा—कांहीं विचार.
(२) श्री. य. न. केळकर, वा. वि. (टिळक)	(२) खडकी अशी लढायांसंबंधीं पत्रें.
(३) श्री. वि. वि. काळे, एम्. ए.	(३) साधन-ग्रंथांची छपाई.
(४) प्रो. द. वा. पोतदार, बी.ए.	(४) श्रीमंत भाऊसाहेब पेशवे यांचे तसबीर.
	(५) चित्रांचे मसुदे.

सायंकाळ

(५) श्री. ग. ह. खरे	(६) कासी कविकृत अध्यात्मानुभव.
	(७) कांहीं चित्रें.
(६) श्री. शं. ना. जोशी	(८) शिवकालीन पाटीलकीचें वतन.
(७) श्री. स. ग. जोशी	(९) थिटेवाद व शाहूस न्यायदानाचे कामीं पडलेला पेंच.
(८) श्री. य. खु. देशपांडे.	(१०) सिंदखेडकर जाधवांचें एक निवाडपत्रक.
(९) श्री. का. कृ. लेले व श्री. शि. का. ओक	(११) माळव्यांतील मराठी राज्याची स्थापना.
(१०) रा. सा. गो. स. सरदेसाई, बी. ए.	(१२) पाटगांव येथील मौनी बावांच्या मठांतील कागद.

दिवस दुसरा-शनिवार

(वैशाख वद्य ८।१८५४, ता. २८ मे १९३२)

(११) श्री. मा. वि. गुजर, बी. ए.	(१३) छत्रपती शाहू, बाजीराव व निजाम.
(१२) श्री. ग. ह. ओक	(१४) पेशवे व दाभाडे.
(१३) श्री. कृ. पां. कुळकर्णी, एम्. ए.	(१५) मराठी भाषेची उत्पत्ति.

(१४) प्रो. **वा. गो. काळे,** एम्. ए. (१६) मौजे कोंढणपूर, शंभर वर्षांपूर्वी व आज.

सायंकाळ

(१५) श्री. **नानासाहेब चापेकर,** (१७) चिपळूणकरांच्या हिशेबावरील टिपणें.

श्री. **शं. ना. जोशी** (१८) शिवकालीन हक्क व पट्ट्या.

(१६) श्री. **वा. कृ. भावे,** बी. ए. (१९) पेशवाईतील सामाजिक परिवर्तन

(१७) श्री. **वि. वा. जोशी** (२०) खंडोजीराव माणकर.

प्रो. **द. वा. पोतदार,** बी.ए. (२१) हरिबोवा शिंपी रामदासी.

श्री. **ग. ह. खरे** (२२) संशोधन-वृत्त.

(१८) श्री. **वि. गो दिघे,** एम्. ए. (२३) मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश व दयाबहादूरचा पाडाव.

दिवस तिसरा—**रविवार**

(वैशाख वद्य ९।१८५४, ता. २९ मे १९३२)

सकाळ

प्रो. **द. वा. पोतदार,** बी. ए. (२४) महानुभाव व त्र्यंबकराज.

श्री. ग. ह. खरे (२५) कांहीं मोगली कागद

कारभारी कामें

सायंकाळ

मोकळी चर्चा

(१९) श्री. सर **गं. ना. मुजुमदार** (२६) औरंगजेबाचीं राजकारणी फर्मानें.

(२७) कोंकणांतील मोडक घराणें.

(२०) प्रो. **वा. वि. मिराशी,** एम्. ए. (२८) धाराधीश सिंधुराजाच्या चरित्रांतील एक प्रसंग.

(२१) ग. सा. **गं. के. ऊर्फ बाबासाहेब देशपांडे** (२९) त्रिंबकपंत डबीर व राघो बल्लाळ कोर्डे.

प्रो. **द. वा. पोतदार,** बी. ए. (३०) हरिपंत फडके यांचें एक स्वदस्तूरचें अस्सल पत्र.

(२२) प्रो. **अ. स. आळतेकर** (३१) हर्ष-पुलकेशी युद्ध, काल व कारणें

बाविसावा वाढदिवस-कार्यक्रम.

मिति आषाढ शु. १ शके १८५४ सोमवार ता. ४ जुलै १९३२

सकाळ ७ ते १०-३०

मंगलवाद्यः-चौघडा ७ ते ७-३०

प्रथम **अध्यक्ष** हे प्रास्ताविक भाषण करून अभ्यागतांचें स्वागत करतील.

नूतन सभासद्प्रवेश, वर्गबदली इ. रीतसर कामें सकाळदुपार चालतील.

निबंधवाचनः-

१ श्री. वा. सि. बेंद्रे	(१) हद्दीकत अलम् किंवा कुतुबशाहीचा इतिहास
२ श्री. शं. ना. जोशी	(२) हरिपंत फडके यांस पेशव्यांची देशमुखी
३ श्री. ग. ह. खरे	(३) पारनेर येथील पंधरा शिलालेख
४ श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, एम. एल. ए.	(४) श्रीछत्रपति-संभाजी-प्रताप-वर्णन
५ श्री. दि. वि. काळे, एम. ए.	(५) शिवकालीन प्रांतविभागणी
६ श्री. ग. ह. ओक	(६) जंजिरा मोहीम.
७ श्री. स. ग. जोशी	(७) भोर व हिरडस मावळचे म्हसवडे जोशी यांचा करीना.
८ प्रो. द. वा. पोतदार, बी. ए.	(८) गुणी ब्राह्मण हरकाऱ्यांच्या शंभर जोड्या !
	(९) बद्दामीची फत्ते ऐकून नानांस श्रीमंत सवाई माधवरावांचें स्वदस्तूरचें संपूर्ण पत्र

सायंकाळ ४ ते ७-३०

प्रथम मोकळी चर्चा ४ ते ४-३०

९ श्री. य. रा. गुप्ते, बी. ए.	(१०) आकोलें (नगर), अगर-आगर अगस्त्याश्रमासंबंधें संशोधन.

(ऐतिहासिक प्रदर्शन–रामाचें देऊळ, नाना फडणीस, आकोल्याच्या सिद्धेश्वराचे देखावे, योद्धयांच्या शिला, अगस्त्याश्रमाचे देखावे)

श्री. वि. वि. काळे, एम. ए. (११) पेशवाईंतील मुलकी व्यवस्था

श्री. ग. ह. खरे. (१२) सातारा जिल्ह्यांतील चार शिलालेख

प्रो. द. वा. पोतदार, बी. ए. (१३) टिपूच्या नाशासाठीं केलेले नवस व त्यांची फेड.

प्रदर्शन (१४) दोन चित्रें

(१५) महाराष्ट्रांतील धरणकिंप

१० श्री. द. वि. आपटे, बी. ए. (१६) पानिपत प्रकरणीं कांहीं पत्रें

११ प्रो. वा. गो. काळे, एम्. ए. (१७) कोंढूणपूरचें शंभर वर्षांपूर्वीचें चलन

१२ श्री. य. न. केळकर, (वा. वि.)(१८) पेशव्यांचीं खाजगी पत्रें

१३ रा. सा. बाबासाहेब देशपांडे–(१९) मलकरे यांची वंशावळ.

पेशवे दप्तर विषयक चर्चा व ठराव

तसबीर अनावरण समारंभ.

सुप्रसिद्ध ज्योतिर्विद् कै० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** यांच्या तैलचित्राचें अनावरण अध्यक्ष श्री. **चिंतामण विनायक वैद्य**, एम्. ए., एल्‌एल्. बी. यांचे हस्तें होईल. प्रथम रा. रु. शं. दीक्षित हे आपल्या पूज्य वडिलांचें तैलचित्र मंडळास अर्पण करतील, नंतर तैलचित्राचें अनावरण होईल.

कै. दीक्षित यांचेबद्दल भाषणें, चित्रकार प्रो. पिंपळखरे यांचा सन्मान, आभारप्रदर्शन वगैरे

वि. सू.:— चालू मितीपर्यंत निबंध हातीं आले त्या अनुरोधानें वरील कार्यक्रम तयार करण्यांत आला आहे. अधिक निबंध श्री. चिं. वि. वैद्य, श्री रु. पां. कुलकर्णी, श्री. वि. वि. देशपांडे, प्रो. शेख अबदुल कादिर इत्यादि विद्वानांचे येतील अशी आशा आहे. जरूरीप्रमाणें वरील कार्यक्रमांत थोडाफार फरक करावा लागेल.

११ रायाराव व गुंजण मावळचे देसाई

(श्री. स. ग जोशी)

ले. ७०५ } { श. १५५० चैत्र वद्य २
मू. चा. सं. } { इ. १६२८ एप्रिल १०

[७ ओळी फा. मज. २ फा. शि. *]

छ कौलनामे अज दिवाण मामले बंदर मैमून मुस्तफाबाद ताहारीर यात्फ बो हैबतराऊ वा बालाजी देसाई तपे गुजन माउळ सुहूर सन समान इसरीन अलफ कारणे दिल्हा कौलनामा येसा जे तुमचे बाबे मोकदमल इमसाल सुज्याआत अयार प्रतापराऊ रायाराऊ मालूम केले तमाम अहवाल मालूम जाहाले तरी तुम्ही आपुले घोडे राऊत वा हसम घेउनू हुजूर येइजे हुजूर आलेवरी तुमचे सरफराजी असे वा तुमचे रोजगाराचेही फिकीर बरवे करून तुम्ही खातीर खुद जमा करून येइजे कोण्हे बाबे अदेसा न कीजें कौल असे मोर्तब तेरीख १५ माहे साबा‌ान‌

---

१२ नाशिकचें तीर्थोपाध्येपण†

(श्री. शं. ना. जोशी)

ले. ७०६ } ॥ श्री गजानन प्रसंन् ॥ { श. १५३९ मार्गशीर्ष शुद्ध ७।८
मू. चा. सं. } { इ. १६१७ नोव्हेंबर २५

आज रत्खाने खुदायवंद मलिक शर्क मलिक अंबर खुदे दयांम दौलताबाद....व कारकूनानि व देशमूखानी मामले गुलशनाबाद बिदानद सुहुर सन समान असर अलफ गोमाजीभट्ट क्षेमकल्याणी कसबे नाशिक मामले मजकूर हुजुर येउन मालुम केले जे का मा गोदातीर आहे जो ग्रहस्त गौत-

---

* पा. स. † पा. स. १०।१८५३

मीस तीर्थास येतो ऋग्वेदी आगर चतुरवेदी त्यास प्रथम ब्राह्मण भेटोतो तो त्याचा तीर्थगुरू तेणे त्याची तीर्थविधि करावि वरकड कर्म ३ श्राद्धादिक आपुले शाखे करावे सालाबाद गहदम चालत आले हाली कसबे मजकुर ग्रामणी करूण लायणी खलेल करून हूजुर येउन माहालासि खुर्तखत केले तरी सालाबाद चालीले नाही नवी जीकीर हो नेदावि ये बाबे खुर्तखत य मालुम जाले प्रथम जो ग्रहस्त ज्यास भेटेल तो त्याचा तीर्थगूरू त्याणे त्याची तीर्थविधि कारिल व सालाबाद चालत आले असता हाली नवी जीकीर करणे काय दुरस्त आहे पूर्वापर चालत आले आहे तेणे प्रमाण पेस्तर चालवणे नवि जिकीर न करणे पेस्तर मालुमातिचे खुर्तखत आणिल त्यास ताकीत करणे सालाबाद चालीले आसे तेणेप्रमाणे पेस्तर चालवणे जो न चले त्यास ताकित करणे नवि जिकीर न होउ देणे पेस्तर फीर्यादी येउ न देणे तालीक घेउन असल फीराउन देणे परवाणगी प्रमाणगी हुजुर चंद्र साहवा जिल्हेद तारीख ६ जिल्हेद

ले. ७०७ } नकल { श. १५७२–७३
मू. चा. सं. } मोहर पारसीची { इ. १६५०–५१

समस्त ब्राह्मण माहास्तळ त्रींबक सुरसन् १०५१ ऋग्वेदी व यजर्वेदी आपणामध्ये आपण भाडत होते यावरी नीवाडा हुजुर केला ऐसा जे जो यजमान ऋग्वेदी व यजुर्वेदी येइल त्यास जे वेदीचा असेल तेणेच कर्म सागणे ऋग्वेदीचा ऋग्वेदी लावणे यजुर्वेदीचा यजुर्वेदी लावणे... स्नानवीधी करवणे जो यजमान समाराधना करील ते सुखे ज्याच्या मनास येइल तेणे जेवायास जावे ऐसा नीवाडा आहे

सदरहु प्रा नीवाडा जाला आहे येणेप्रमाणे वर्तणे मोरतब सुद

ले. ७०८ } { श. १५७१–७२
मू. चा. सं. } { इ. १६५०–५१

समस्त ब्राह्मण रुग्वेदी नीवाडा का। नासीक रघुनाथाचे देवाळयात व येजुर्वेदी माहास्तळ त्रींबक सुा। सन १०५१ तुम्ही आपणामध्ये आपण पोहेकरी या नीमीत्य करकसा करीत आहा यावरी ······· याचा नीवाड ········ केला ऐसाजे जे लीखे आहे ती समस्त ब्राह्मणाचे व जो तीर्था-नीमीत्य ऋग्वेदी व यजुर्वेदी येइल तो व च्यातुर्वेदी व काइत व ब्राह्मण येतील ते व रजपूत व शुद्र जो येइल तो व कीद कोळी येइल ते समस्त ब्राह्मण ऋग्वेदी व येजुर्वेदी वाटुन घेणे खेरीज जेवण जो जवायास जातील ती सुखे जेवो जेवण नीमीत्य येक दोन वोळ पुढे तुटली आहे [१]

ले. ७०९ } [१शि*] { १५६१ माघ शुद्ध ८
मू. चा. सं. } { १६४९ जानेवारी २१

देसमुखानि व धर्मातकर्णीयानि व माहाजनानी (फा. शि.) व समस्त ब्राह्मण रुगविदी व अजुरविदी माहाक्षेत्र त्रिंबक सुबे दक्षण सुा। आर्बेन सन १०४९ नरसीहभट पेडवले वगैरा ब्राह्मण क्षेत्र मजकूर हुजूरा येउनू मालुम केले जे ब्राह्मण आपणामधें आपण भाडितातां लाइणीचा करकसा करितातीं व कुफरान उठवितातीं जे कुल तीर्थास येते ते बा। जोरीन घेउनू जातातीं याकरिता माजुरी पुढे काही होत नाही तरी ये बाबे परवाना होये म्हणौन मालुम केले तरी जो कोन्ही ब्राह्मण आपणामधे आपण भाडोन आबादानीची खराबी करील ब्राह्मास आजार देईल तो पातशाही गुन्हेगार होईल व जे कुल क्षेत्रास येईल जे ज्यास आनकूल असेल ते त्याणे नेणे सालाबाद चालिले आसेल तेणेप्रमाणे वर्तणे यास तकरार केलिया ताकीद होईल मोर्तब सुद [अष्टकोनी शिक्का*]

[पाठीवर*] तेरीख ७ माहे सौवाल

---

१ हे तिन्ही लेखांक एकाच कागदावर असून ते बालबोधींत आहेत. नकल ऱ्हस्व दीर्घ कायम ठेवून मुळाबरहुकुम केली आहे.

१३ मलिक अंबर व चेऊल मामला.*

(प्रो. द. वा. पोतदार व श्री. वा. सि. बेंद्रे)

सदर असल कागद सुरु सन १०२६ शके १५४७ म्हणजे इ. स. १६२५ तील अर्थात श्री. शिवाजी महाराजांचे पूर्वी १ वर्षाचा आहे. आंतील मोडी अक्षर नमुनेदार व बघण्यालायक आहे. कागदावर मोडींत 'तालिक' व फारसींत 'मुकाबला' असें म्हटलें आहे, तथापि सदर नक्कल सरकारी कामासाठीं केलेली म्हणूनच सही शिक्याची आहे व त्यावर 'मुकाबलाकरदे-सुबाा असल' असा शेरा दाखल आहे. सदर कागद रा. बेंद्रे यांनी मिळविला.

ले. ७१० मू. दा. प.	[फा. शि. व. मज.]	श. १५४७ आषाढ शुद्ध ४ इ. १६२५ जून २८

जनाब कारकुनानी मामंले मुर्तजाबाद उरुफ चेउलु माा अंबर सळाम सुहुरु सन सीत इसरीन अलफ हेजीब मामले मजकूर हुजुरु मांलुम केले जे मामले मजकुरु हसम दिवाणकामांस पुरत नाहि रेवदंडा सारद आहे हाली नसरतखान गेला आहे फिरंगियांचा दगेदगा आहे याबदळ हसम येकसें १०० येकसें देववणें म्हणौनु तरी हसम ज्याजती येकसें संचणी करणें नीघादास्ती देखणें अर्जदास्त हुजुरु पाठवणें दफतरीं हुजती सादर होईळ पाा हुजुरु राा छ २ सौवालु

पौ छ १६ माहे सौवालु

मुकाबला करदे सु बााा असल

---

१४ प्रतापगडची अंबा भवानी†

(कै. पां. न. पटवर्धन)

शिवाजी राजे यांनीं प्रतापगड येथें अंबाभवानीची स्थापना केली. पुढें राजाराम महाराज यांचे कारकीर्दींत 'दुष्ट संसर्ग' झाल्यामुळें पूजा

---

* पा. स. २०।१८४० † पा. स. १७।१८४०

राहिल्याचा उल्लेख खालील सनदेंत आहे. ही सनद तेथील पुजारी वे. शा. सं. हडप यांचे संग्रहीं असून ती अस्सल आहे. राजाराम महाराज यांचे कारकीर्दीत अराजक माजलें, मोंगलांनीं पाठपुरावा केला, त्या वेळची ही हकीकत होय.

ले. ७११ }
मू. दा. प. }
श्री
{ श. १६१२ आषाढ शुद्ध २
{ इ. १६९० जून २८

राजमान्य राजश्री हरी विठल मजमदार दिमती श्री मु॥ किले प्रतापगड यांसी रामचंद्र निळकंठ नमस्कार सु॥ इहिदे तिसैन आलफ वेदमूर्ती विश्वनाथभट हाडप हे पुरातन राजश्री कैलासवासी स्वामीचे कारकिर्दीपासून श्रीचे पूजक आहेत ऐसियासी सांप्रत दुष्ट संसर्ग कांहीं एक दिवस जाला या निमित्य पूजा राहिली भट गोसावी स्थळ त्यागू जाले प्रस्तुत प्रतापगड घेऊन श्रीची स्थापना केली ते समयी भट गोसावी हजीर नव्हते पूजा चालिली पाहिजे म्हणून महाबळेश्वरकर विश्वनाथभट यासी सांगितली त्याणी ब्राह्मण देऊन पूजा चालती केली नंतरी विश्वनाथभट याणी आपले पुत्र निळकंठभट हुजूर पाठविले विश्वनाथभट पूर्वीपासून कैलासवासी स्वामीनी पूजा सांगितली असता दूर करिता येत नाही या कारणे जेणेप्रमाणे पूजेचा मामला यांस होता तेणेप्रमाणे करार केला असे तरी पहिलेपासून कैलासवासी स्वामीचे वेळेस जेणेप्रमाणे चालिले असेल तेणेप्रमाणे यासी चालविणे आणि माभलेश्वरकरभटास पूजेचा मामला सांगितला होता त्यांला पंडितरायाची मुतालिकी देऊन श्री देवीस पुराण श्रवण करावयाची आज्ञा केली असे तरी वेदमुहुर्ती विश्वनाथभट माभळेश्वर जो ब्राह्मण ठेवितील त्यापासून श्री देवीस पुराणश्रवण करवीत जाणे त्यांस जेणेप्रमाणे कैलासवासी स्वामीच्या वेळेस चालिले असेल तेणेप्रमाणे चालविणे विश्वनाथभट वृद्ध आहेत पर्वती राबता अनुकूल पडत नाही याकरिता त्याचा पुत्र निळकंठभट तेथे राहतील आणी श्रीची पूजा करितील जाणिजे छ २२ रमजान पा॥ हुजूर

पो छ १ सौवाल

१५ म्हसवड--माने*

(श्री. ग. ह. खरे.)

ले. ७१२ } [२ फा.शि.] { श. १५८२ वैशाख शुद्ध ७
मू. चा. सं. } { इ. १६६० एप्रिल ६

अज दीवाण ठाणा का। हाये पा। माण दहिगाऊ तां कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी का। म्हैसवाड व सा। बारा वाडिया पा। मा। मालूम दाद सुहूर सन सितैन अलफ दरी विला हुजुरून खुर्दखत बतारीख छ २० माहे रजब पौ छ ९ माहे शाबान सादीर सुद के मौजे हिंगणी सा। बारावाडिया दरवझ इनाम बदल तैनाती पालखी रताजी माने देसाई का। मा। यासी देखील माहासूल व नकदयाती कुलबाब कुलकानू दुबाला केले असे दुबाला कीजे देसाई मा। सिवाजी भोसलेचे फितरतीमधे[१] पादशाही मसलहत शेरीख होऊन गनिमासी गोशमाल दिल्हे अजी सबब देसाई मा। मरहामत केले असे हर साला खुर्दखताचे उजूर न कीजे तालीक लिहून घेऊन असल परतोन दीजे म्हणौऊन तरी बर हुकूम खुर्दखत मौजे हिंगणी कुलबाब कुलकानू दुबाला केले असे दुबाला कीजे तालीक लिहून घेऊन असल परतोन दीजे[नि*] मो। शुद [५० मो.०*]

[मागील बाजूस]

तेरीख ९ माहे शाबान

शाबान

ले. ७१३ } अलमपन्हा { श. १५८८ भाद्रपद वद्य १२
मू. चा. सं. } { इ. १६६६ सप्टेंबर १९

द मो। कारकुनानी व देसमुखानी का। भालवणी पा। माण दहिगाऊ रा (?) मलिक अजम मलिक सुदर कदीम नामजाद माहालानिहाये पा। कराड की सुा सबा सितैन अलफ दरी विला रताजी माने देसमूख का। म्हैसवड

---

* २० वें संमेलन

१ हा प्रसंग अफजलवधानंतर नेताजी पालकरानें व शिवाजी महाराजांनीं विजापुरापर्यंत केलेल्या दौडीच्या वेळचा असावा.

पा मजकूर यानी पादशाही कामावरी मसलतेसीं सबीत राहोन दौलतखोही जाहीर केली[२] यावरी हजरती साहेब मेहेरवान होऊन देसाई मजकुरासी वरतना इनाम मौजे कन्हेर का। दहिगाऊ व मौजे राजापूर का। अकलूज कुलबाब कुलकानू दिल्हे सा। मजकुरी जमाबंदीस दरसदे होन ९८ पांच प्रमाणे फर्मान मऱ्हामत केले असे तरी बा। फर्मान का। मजकुरी दर सदे होनू ९८ पांच दुमाला कीजे तालीक लेहून घेऊन असल परतोन दीजे हर सला खुर्दखताचा उजूर न कीजे[नि] मोर्तब [लं. व. मो.*]

[मागील बाजूस]

तेरीख २९ माहे रबिलोवल

ले. ७१४
मू. चा. सं.

[१शि]

श. १५८८ आश्विन शुद्ध ६
इ. १६६६ सप्टेंबर २२

अज दिवाण ठाणे का। वेलापूर ता। मोकदमानी मौजे निबगाऊ का। मा। सु॥ सबा सितैन अलफ बा। खु। रा। छ ७ रबिलोवल पो छ——— सादर जाले तेथे रजा जे दा। दरी विले राऊ अजम रताजी राजे माने देसाई का। म्हैसवड व माहालानिहाय पो। माण येही हुजूर येऊन मालूम केले जे अपणास खान अलीशान रफी अल मकान याबराबरी मसेलतस सरीख हेऊन मेहनत व मशखत केली[२] अपणास निवाला व पालखी तैनाती पाहिजे तरी साहबी राऊ अजमास सागोन का। मा। खालील मौजे निबगाऊ का। मा। अजरामरामती करून देविले पाहिजे म्हणौउनू रजा खान अलीशान व मालुमाती राजे मा।इलेस खातिरेसी अणौनू बा। निवाला व पालखी तैनाती मौजे मजकूर कुलबाब कुलकानू देखील नख्तयाती महसूल व बाजे उजाहती व बेट बेगारी व फर्मासी कुलबाब कुलकानू अजरामरहमती करून दिल्हे

२ सनदापत्रें पृ. २६ वर रताजीनें 'राजा जयसिंग यांचे युद्धांत जीवादारभ्य पराक्रम करून' असा उल्लेख आहे. तो प्रसंग व येथील प्रसंग एकच असावे.

असे दुमाले करणे तालीक लेहून घेऊन असल खुर्दखत इनामदार मााइलेस फिराऊन देणे पाा ह्यूा रा राऊ अजम अनंदराऊ म्हणौनू रजा रजे बाा सदरहू प्रमाणे मौजे मजकूर कुलबाब कुलकानू दुमाले केले असे दुमाले कीजे तालीक लेहून घेऊन असल मिसली इनामदार मााइलेस परतून देजे [नि*]मोर्तब सुद [ष. मो.*]

तेरीख ४ माहे रबिलाखर

---

१६ शिवपूर्वकालीन महजर*

(श्री. द. वि. आपटे)

(पहिला बंद गहाळ)

ले. ७१९	श. १५२०–२१
मू. दा. प.	इ. १५९८–९९

+ + + नाईक वा	हणगोजी देसाई वा
+ + + नाइकवाडी	जखजी देसाई
+ + + नाईक	नरसो पटेल
+ + सेटी परभणा	माही + + +
+ + हिपट	+ + + + +
.... माहाजन	सुराजी मालजी + +
+ + + + +	सोमणा

देहाये तपे मजकूर

मौजे रुग		मौजे कामेरी	
मकोजी पटेल	....पटेल	विठो पटेल	वरिसेटी
वा पा.... जी	काइगुडा	चापजी [प]	चौगला
पटेल	महिसकर	टेल	
....खदेउ + + +	ऋुस्णो राम		गोदोबा

---

* [illegible] १२।१८२१

पत्रे कुच जालियाचे आले नाही व बरसात याही वगैरा लिहून दीधले की मागती राज्याने जमातदारास पाठऊन रावास नेले रावाचे या साली इकडे येन होत नाही यावरून मधेस्त म्हनतात की च्यार देउ केले त्यामधे दोन पावले दोन नरबदा उतरोन येतील तरी देउ यैसा जाब देतात व तुम्ही चौपदार वेगले यादगारखानापासी पाठविले व आम्हास खानाही पुसले कीं तुम्हास रावाही काय लिहिले त्यास आपन म्हटले कीं तुम्हास लिहिले त्याप्रमान आपनासही लिहिले त्यावरी खान म्हनो लागले मुफसल नवाबाचे खतामधें लिहिले त्याजवरी म्हनो लागले की रावाही ज्याद तलबी लिहिल्या आहे तरी त्याचे जान नवाबाकडून आपन त्यास लिहिले आहे की जो करारदाद जाला त्याप्रमाने मतालब जाले यावरी तुम्ही हजुर याल आणि मुलाजमत कराल त्यानंतर तुम्हास रिसाला मुकरर जालियावरी मग तुम्ही फौज आनवीने बीलफैल तुम्ही थोडे जमयेतीनसी येन यैसे आपन नवाबाही लिहिले तुम्ही यैसे लिहिने म्हनो लागले त्याजवरी आपन त्याचे जाबसाल आयेकुन उतर दीधली की रावाही सतर हजार स्वार जमा केला अहे आनखीहि जमा करितात तीस लाख सो लोकास देऊन चुकले व दो लाखाचे इनाम लोकास दीधले मग म्हनो लागले की यैसा जमीयत बा। घेऊन आलियाने येथले लोक नवदीगर अर्ज करतील याकरिता तुम्ही रावास लिहिने तरी येथील वर्तमान याचे लिहिल्यावरून सर्वहि कलु येईल पुढ जे मुनासीब जानाल ते कराल तुम्ही सर्वज्ञ आहे मुफसल वर्तमान पूर्वीहि लिहिली आहेत त्यावरून कळले आसेल ज्यामधें उतम जानाल ते कराल बिशश काये लिहिने मागुन सेवहि वर्तमान सेवेसी लिहून पाठऊन देऊन हे विनंति

---

६० दतिया वोडसे प्रांतांतील खंडणी वसुली.

(श्री. द. वि. आपटे)

ले. २२४ } श्री { श.
मू. दा. प. } { इ.

छ २१ जिलकाद

पुरवणी राजश्री पंतप्रधान व राजश्री आपा गोसांवी यासि

विनंति उपरि आपण आमची रवानगी फौजसहवर्तमान उत्तरप्रांते करून बुंदीकोटे व दतिया वोडसें भदावर या प्रांती चाट (?) घ्यावयाची आज्ञा केली त्यावरून प्रथम बुंदीकोटे प्रांते जाऊन तेथील तहरह केला. आणि जाधवहटीतून नरवरप्रांतें आलो तेथील मामलयाची बोली करून दतीया वोडसें प्रांते यावें त्यास राजश्री मलहारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे याची पत्रें आलीं कीं बुंदीकोटे आमच असतां तुम्हीं मुलूक लुटून पैका घेतला अनुचित केलें दतिया वोडसे भदावर हे मुकासे आमचे आहेत तेथील ही पैका तुम्हास घ्यावयास प्रयोजन नाहीं म्हणून पत्रें पाठविलीं व अहीर डावा टाकून चंदेरीकडून वोडशाकडे आले पनास हजार रुपये वोडशाचे खंडले आम्ही दतियास येऊन येक लक्ष पांच हजार खंडले त्यास तेहि दतियास आलें मुकासा आपला निमे पैका आपणास देणे म्हणु लागले अनमान करून विकृत वाढवणे उचित नाहीं यास्तव निमे पैका त्यांस दिल्हा निमे आम्हांजवल राहणांर त्यांस तेथें पैका असिलयास खावंदाचा व येथे असिलयास खावंदाचा त्यांसच देणार अगर घेणार आपण खावंद आहेत, भदावरचे यंदा पनास हजार आम्हीं खंडले आहेत पचो खराके हरिसिंगाचा साल मजकुरी विसा हजारांस खंडला सुकलारी गुजगेरा कुरोली या तहीं स्थलास दाहा पाच हजार गुदस्तांस सोड देऊन खंडणें लागतील हा मुलुक गुदस्ता खराब जाहाला होता त्याहीमध्ये यंदा निकर्ष करणे तैसा केला परंतु या रानी पैका आहे नाही हे आपणास विदित आहे वोडशाचा पैका तो

अगदी त्याजकडेसच लागला नरवरचे त्रिपन हजार खंडले परंतु वसुल होणें कठीण आहे गुदस्तांचेच ढंग आहेत † यथुन पुढे दोनी यक होऊन पुढे जाण्यास जागा नाही सैदांचे कोठडी मात्र आहे तेथवरी जाऊ कस्त मेहनत करावयांसि आ········जा बल (?) नाही सेवेसी स्रुत होय बहुत काय लिहिणे हे विनंति

---

६१ नासिरजंग व नानासो यांचा स्नेह*

(श्री. द. वि. आपटे)

ले. २२५ }
मू. दा. प. }

श्री शंकर

{ श. १६७० मार्गशीर्ष वद्य ६
{ इ. १७४८ नोव्हेंबर ३०

छ २४ जिल्हेज

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सो

विनंति सेवक दामोदर माहादेव कृतानेक सा। नमस्कार विनंति येथील कुशाळ ता। छ १९ माहे जिल्हेज मुकाम लश्कर नवाब नासरजंग नजीक नळदुर्ग स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष पूर्वी अजुरदार कास दासमागमे सैन्यांत आल्याचें व नवाब मशारनिलेची भेटी जाल्याचें व बणगरांच्या वगैरे गढ्या पाडायाचें वर्तमान सविस्तर सारे लिहून पाठविलें त्याजवरून श्रुत जाहाले असेल सांप्रत महिंदरगीची गढी जेथे हैबतराव बणगराचे पांचाशा स्वारांचे ठाणे राहात होते तेही गढी घेऊन आपले ठाणे बसविलें शोलापूर व नळदुर्ग हे दोन्ही किले पाहून कलबरग्याकडे रोंख केला आहे सैद शरीफखां वराडचा सुभा येऊन भेटला रकारनामकाकडीलहि त्याचे विद्यमाने पैगाम आला आहे कीं मीहि आपल्या फौजनसीं सिध आहे जेथें आज्ञा कराल तेथें येऊन मुलाजमत करीन यैसा पैगाम आला होता परंतु स्वामीकडे

---

† येथून अक्षराचें वळण निराळें आहे. *पा. स. ६।१८४०

स्नेहाची मजबुती होत चालली व सार्वभौमाची मरजी कीं स्वामीस यांस येकत्र करून उमदी उमदीं कामें घ्यावीं याजवर नजर देऊन तिकडे चित न दीधले उदासीन वृतीनेच जाब दीधला सांप्रतं यांसीं कितीक राजकारणाचा मजकूर जाला तो आलाद्या पुरवणीस लिहिला आहे त्याजवरून श्रुत होईल राजश्री मोरोपंतास व आम्हांस दों तीं दिवसांत स्वामीचे सो [रवाणा करितात लवकरीच सो] येऊन पावतों आपल्या चाकरीचा मुजरा व्हावा सरकारची कार्यें व पातशाही कामांचा बंदोबस्त स्वामीच्या हातून घडावा महत्लौकिकास कारण व्हावें या हेतुस्तव हजुरात गोष्टमात पक्कीकरून यांसही येऊन पके केले मोरोपंतास घेऊन सो येतो सर्व गोष्टी निदर्शनास आणायास स्वामी समर्थ आहेत पत्राचे उत्तर अविलंबे येते केले पा नवाब नासरजंगाचे घरात या प्रहस्ता येवढी मातबरी कोणाचीहि नाही सैद लशकरखा वगैरे उदंड आहेत परंतु यास नवाब केवल अंतरंग जाणतात यास्तव बहुत अत्यग्रह करून याची रुकसती ठैराविली आहे स्वामीनी यास पत्र सिष्टाच्यारयुक्त जरूर लिहिले पाहिजे सेवेसी श्रुत होये बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

ले. २२१ मू. दा. प.	१६७० फाल्गुन वद्य ६ इ. १७४९ फेब्रुवारी २७

श्रीशंकर

छ. २० रबिलोवल

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सो

विनंति यैसीजे निजामुदौला नासरजंग याणी स्वामीच्या यैकत्वाचा विचाराची अर्जदास्त लिहिली त्यावरून हजरत जील सुभानी बहुत संतुष्ट होऊन बोलले कीं बाळाजीरायास मनःपूर्वक पातशाही कामावर नजर आहे आपल्या दोस्ती दुशमनीवर नजर नाहीं या गोष्टी या गोष्टीची आम्हांस परभारे शाहिदी पुरली याचा यैवज आम्हीं त्यांजवर काय तफजुल करावा आम्हीं विनंति केली कीं जे चाकर याप्रकारें आपली दोस्ती दुशमनी मंजूर

न ठीवितां स्वामीकार्यावर मस्तक घेऊन ज्यांनीसारसि उभे आहेत त्यांच्या मस्तकीं आपल्या मस्तकचेंहि भूषण काढुन ठीविले तर योग्यच आहे हे गोष्ट आइकून आज्ञा केली कीं मरातब पातशाहजाद्याचा आहे आम्हीं अर्ज केला कीं येसा फिदवी ज्यांनिसार यांजवर पातशाहजाद्या-प्रमाणे हितफजुल करणे सलाह दौलतच आहे आइकून विशेष प्रसंन होउन मस्तकचा बांधला चिरा स्वामी कारणे इनायत केला हजार हजार अफरीं केलिया गोष्टीचे आदाब बज्याऊन आणुन पातशाहांचे आज्ञेप्रमाणे उभयथा येकविचारें यांचे मनेप्सित निदर्शनास आणायास स्वामी समर्थ आहेत पोख्तगीने तीर्थरूप राजश्री दामोदर माहादेव यांस सत्वर पाठविल्या स्वामीच्या लौकिकास व तरकीस जोडा नांही सो श्रृत होये हे विज्ञापना

---

६२ माधवराव व रघुनाथराव.*

(श्री. द. वि. आपटे)

नानाफडणीसाकडे पुण्यात राहून कारभार करण्याचें काम सोपवून माधवराव धनगर टाकळीस पोचल्यावेळीं पहिलें पत्र लिहिलें आहे. या स्वारीचें पर्यवसान धोडपच्या लढाईत होऊन दादासाहेबांना कैदेंत राहण्याचा प्रसंग आला. दुसरें पत्र दादासाहेबांना कैदेंत ठेवल्यानंतर ते एके दिवशीं जबरदस्तीनें बाहेर पडून पर्वतीस जाऊन आले या संबंधीचें आहे. हीं दोन्हीं पत्रें साताऱ्याचे रा. वासुदेवराव जोशी यांजकडील आहेत.

ले. २२७
मू. दा. प.

श. १६९० ज्येष्ठ शुद्ध १५
इ. १७६८ मे ३१

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसि

विनंति उपरि इकडील मजकूर तर गाइकवाडास समागमे घेऊन आजच कुच करून धनगर टाकळीस मुकामास आलों माहादजी सिंदे व

---

* पा. स. ८।१८४०

गोपाळरावहि जवळ आले उद्या येऊन सामील होतील फौजहि रोजचे रोज यतच आहे चार हजार पर्यंत जमाहि जाली आहे दररोज येतहि आहे आठा पंधरा दिवसात दाहा बारा हजार पर्यंत जमा होईल तर्थिस्वरुपाजवळहि पाच सहा हजार फौज जमा होळकरसुधा जाहली आहे कळावयाजोगे वर्तमान असेल ते ल्याहावयास आज्ञा करावी म्हणुन लिहिले ऐसीयांस तुम्हास न कळावें असें काय आहे वरचेवर लिहिलें जाईल रा। × छ १२ मोहरम बहुत काय लिहिणे हे विनंति

पौ छ १४ मोहरम समान
जेष्ट बा। जासूद जथे बजाजी
नांईक सायंकाल

ले. २२८ } श्री { श. १६९० पौष शु. ६
मू. दा. प. } { इ. १७६९ जानेवारी १२

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसि

विनंति उपरि पुण्याहून कोणी कोणी ग्रहस्त लस्करात आले त्यांचे बोलण्यात कर्णोपकर्णी ऐकिले कीं तर्थिस्वरूप राजश्री दादासाहेब मार्गसीर्ष वद्य चतुर्थी सोमवारी अग्रहे करुनं गणेश दरवाज्यानें बाहेर निघोन पिंपळाचे पारावर अर्धी घटिका उभे राहून पर्वतसि देवदर्शन करून येतो म्हणौन बोलिले स्वार तयार होतेच पर्वतसि जाऊन फिरोन आले बाळाजी कृष्ण ठोसर याजवळ पर्वतीस जाण्याचा विचार पुसत होते तो तुम्हास पुसावयास आला इतकियात हे बाहेर येऊन उभे राहिले मग पर्वतीस गेले असे वर्तमान ऐकिलें हे खरें की काय कांही एक अविक्रोतर प्रकार जाला असला तर तुम्ही लिहितेस परंतु वर्तमान ऐकण्यात आले त्याजवरून पत्र लिहिले असे तर सविस्तर लेहून पाठवणे रा। × छ ४ रमजान बहुत काय लिहिणे हे विनंति

---

* येथून अक्षर खाशांचें

पौ छ १९ रमजान तिसा
पौष बा॥ कासीद देवा वा॥
दीपा जथे निगाई

---

६३ पिष्टपशूविषयीं संमतपत्र.*

(श्री. शं. ना. जोशी वांई.)

ले. २२९
मू. दा. प.

श्रीगणेश

श. १६६७ माघ वद्य १३
इ. १७४६ फेब्रुवारी ७

शके १६६७ क्रोधननाम संवत्सरे माघ वदि त्रयोदसी शुकुवार ते दिवसि श्रीवरखेडवाडग्राम येथिल समस्त विद्ववैदीक मुलुन श्री—मंदिरि च पत्र पाहुन उपक्रमोउपसंहार पुर्वक विचार करून पिष्टपशुविषईक समतपत्र केल असे जे श्री—मंदिरि पत्र केल असे ते सर्वास मान्य असे†

* पा. स. १६।१८५२

† अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ इत्यादि सात यज्ञ म्हणजे सप्तसोमसंस्था. त्यांमध्यें प्रत्यक्ष पशुहिंसा न करतां पिष्टपशूचा अवलंब करावा असें एकमत आहे. त्याबद्दलचा वाद वेळोवेळीं झालेला दिसतो व चालतोहि. अशापैकीं श. १६६७ (इ. १७४६) सालीं ह्या पिष्टपशूसंबंधीं प्रश्न निघाला असतां त्या वेळचें हें संमतीपत्र आहे. पत्राचा काल गणितदृष्ट्या अचुक असून पत्र अस्सल आहे. ह्या पत्रावर ३५ तज्ज्ञांच्या ' संमतोयमर्थः ' असें म्हणून केलेल्या सह्या आहेत. पण ज्या शास्त्रवचनानुरोधानें ही संमती येथें दिली गेली तो प्रामाण्याचा भाग पत्रांत मुळींच दिलेला नाहीं. नुसतें ' पत्र पाहून उपक्रमोपसंहारपूर्वक विचार करून...संमतपत्र केल असे' एवढेंच म्हटलें आहे. समतीची सभा वरखेडवाडग्राम येथील गणेश मंदिरांत झाली होती. पण हीं दोन वेगळीं गांवें असावींत असें, वरखेडकर व वाडगावकर अशा दोन प्रकारच्या वेगवेगळ्या सह्या आहेत त्यांवरून वाटतें. बहुधा हीं गांवें जवळ जवळ असावीं. हें पत्र पैठणच्या संग्रहांतलि आहे. त्यावरून निरनिराळ्या गांवांतील ' विद्वद्वैदिक ' मंडळीच्या सदर प्रश्नाबद्दल मागविलेल्या मान्यतापत्रांपैकीं हें एक संमतीपत्र दिसतें. पत्र औरंगाबाद येथें श्री. **अंबादास गंभीर** यांजकडील संग्रहांत मिळालें.

संमत.

संमतोयमर्थः नागेशभट शेवेकरी
अनंतभट वरखेडिसंमत्
संमतोयमर्थः कन्होडि नागेशः
संमतोयमर्थः मुंगीत्युपनामक अनंतस्य
संमतोयमर्थः देवगिरीकरोपनामक लक्ष्मणस्य
संमत अनंतभट्ट कुभारि
संमत दासंभट्ट हेरुरकर
संमत व्यंकटभट मंगलूरकर
संमत नरसिंभट मंगलुरकर
संमल लक्ष्मण जोसि
समत रामभट दैवज्ञ
संमत काकोबा वरखेडी
संमत रघुनाथ वरखेडी
संमत ज्योतिषि भीमभटः
संमत रघुनाथभट विटकर
संमत तिमणभट सारोलकर
समत विठलभट्ट दामोदरी
समत कोनरभट्ट इटकर
समत भीमभट वरखडेकर
समत अण्णा कन्हाडि
समत कृष्णा ?
संमत धोडेभट शेवेकरी
समत* पत्र बच्याजी अपदे
समत* वेकाजी गोपाल कुलकर्णी

१ पत्रार्थे समत घुगारोपनाम कमळाकर भटस्ये
१ पत्रार्थि संमत तुंगार मुकुंद भटस्य
१ पत्रार्थे संमत तुंगार सामराजस्य
१ समत कींभवनेगुंडभट्टस्य
१ समत कींभवने धोंडभट्टस्य
१ संमत व्यंकटभट करजगी
* समर्द बाबू कन्हाडी
समत ज्योतीशि गोंभटस्य
संमत दादा जोसी वाडगावकर
संमत धोंडी जोसि वाडगांवकर
समत हरिभट कन्हाडी

---

* हें अक्षर मोडी आहे.

अनुक्रमणिका.

कारभारी मंडळ.

(शके १८५४ ते ५६)

अध्यक्ष.

(१) श्री. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए., एलएल. बी.

उपाध्यक्ष.

(१) श्री. सरदार खं. चिं. मेहेंदळे बी. ए.

(२) श्री न. चिं. केळकर बी. ए., एलएल. बी.

चिटणीस.

(१) प्रो. द. वा. पोतदार बी. ए.

(२) श्री. सरदार गं. ना. मुजुमदार एम्. एल. ए.

खजिनदार.

(१) श्री. अ. वि. पटवर्धन बी. ए.

सभासद.

(१) श्री. सरदार गो. ब. पटवर्धन शास्त्री

(२) श्री. द. वि. आपटे बी. ए.

(३) रा. सा. ना. गो. चापेकर बी. ए., एलएल. बी. (बदलापूर)

(४) रा. सा. गं. के. उर्फ बाबासाहेब देशपांडे

(५) प्रो. वा. गो. काळे एम. ए.

(६) श्री. पां. के. शिराळकर (कऱ्हाड)

(७) श्री. मा. ह. घोरपडे

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIII] **QUARTERLY** [No. 2

(50)

September, 1932.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १३ वें] **त्रैमासिक** [अंक २ रा

(५०)

आश्विन १८५४

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press, House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन.

ह्या अंकांत पेशवे दप्तराबाबत विस्तृत माहिती द्यावयाचा विचार होता. अखेर तें घडून आलें नाहीं; पण उशीर मात्र व्यर्थ पदरीं पडला. तेव्हां तो विषय पुढें ढकलून हा अंक प्रसिद्ध करीत आहोंत.

महाराष्ट्रसंतवाङ्‌मयाचे एक अत्यंत प्रेमळ भक्त व सेवक उदारात्मे डॉ. जस्टिन ॲबट यांनीं मराठी कागदपत्र व पोथ्या यांच्या संरक्षणासाठीं व इमारतीप्रीत्यर्थ भा.इ.सं. मंडळाचे नांवें आपल्या मृत्युपत्रांत **तीस हजार डॉलर्सची** अश्रुतपूर्व देणगी ठेवून **मंडळास कायमचे ऋणी करून** ठेविलें आहे. या संबंधानें विस्तृत हकीकत प्रसंगानुरोधें प्रसिद्ध करूं. तूर्त इतकेंच कळविणें पुरें होईल कीं, सदरहू देणगीविषयीं ॲबट यांचे मृत्युपत्राचे व्यवस्थापकांकडून देणगीची माहिती मंडळाकडे आली असून त्यांनीं एक खेदकारक इषारा दिला आहे तो असा कीं, अमेरिकेच्या बिघडलेल्या सांपत्तिक परिस्थितीमुळें मरहूम ॲबट यांच्या मालमत्तेची आजच्या बाजारांत प्रत्यक्ष किंमत शेकडा **साठ टक्के** इतकी उतरण्याची भीति वाटते म्हणजे तसें झालें तर तीस हजार डॉलर्स ऐवजीं सुमारें बारा हजार डॉलर्सच मंडळाचे हातीं येतील. डॉलर्सचा हल्लीं तरी भाव बरा असल्यामुळें असें वाटतें कीं, सुमारें **चाळीस ते पन्नास हजार रुपये** पदरांत पडावे. परंतु तिकडून असेंहि कळविण्यांत आलें आहे कीं, अमेरिकन कायद्याप्रमाणें सावकारांस मागणी करण्यासाठीं सहा महिने मुदत द्यावी लागते. तेव्हां **निदान एप्रिल मे १९३३ पावेतों** वाट पहावी लागेल. तात्पर्य रकम प्रत्यक्ष हातीं येण्याचा सुयोग १८५५ चे संमेलनाचे प्रसंगीं येईल. रकम द्यावयाची ती येईल. डॉ. ॲबट यांनीं सर्व व्यवस्था उत्तम व पक्की केली आहे.

एकंदर २ लक्ष डॉलर्सच्या देणग्या या महात्म्यानें दिल्या आणि त्यांत बिनमिशनरी संस्था किंवा व्यक्ति यांस दिलेल्या देणग्यांत **सर्वांत मोठी देणगी**, आपल्या मंडळासच दिलेली आहे. ॲबट्र यांच्या छापील पुस्तकांचा संग्रह ठेवण्यास रे. एडवर्ड्स् व रा. नरहरपंत गोडबोले यांचे विनंतीवरून मंडळांत जागा दिली आहे. रकम हातीं येईपर्यंत अधिक न बोलावें हेंच बरें. डॉ. ॲबट्र यांस किती धन्यवाद द्यावे आणि त्यांचें किती ऋण स्मरावें याला माप नाहीं. त्यांचें उदाहरण केवळ अद्वितीय होय. मंडळांत त्यांचा आमचा जो महिनाभर सहवास झाला त्याला इतकें मधुर फल येईल अशी कल्पनाहि आम्हांस नव्हती ! अशीच देवदया अपरंपार असावी एवढीच इच्छा आहे.

मार्गशीर्ष शुद्ध १।१८५४ — चिटणीस

टीपः- मंडळसभासदांनीं पत्ते बदलले असल्यास कचेरीकडे कळविण्याची तजवीज करावी.

तालिकोटच्या लढाईचें एक दृश्य



विजयनगरकर रामराजा व मुसलमानी शहा यांचीं लश्करें एकमेकांत मिसळत आहेत.

तालिकोटच्या लढाईचें दुसरें दृश्य



बादशहा एका मनुष्याकडे खूण करीत आहे.

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ.

वर्ष १३ वें] त्रैमासिक [अंक २ रा.

७ धाराधीश सिंधुराजाच्या चरित्रांतील एक प्रसंग.*

(प्रो. वा. वि. मिराशी, एम्. ए., नागपूर.

हिंदी व विदेशी इतिहाससंशोधकांच्या अविरत प्रयत्नांमुळें माळव्याच्या प्रसिद्ध परमार घराण्यांतील विद्वान् व दानशूर राजांविषयीं पुष्कळ माहिती उपलब्ध झाली आहे. त्या घराण्यांतील सुप्रसिद्ध भोजराजाविषयीं गेल्या दोन वर्षांच्या संमेलनांत धारानगरीचे विद्वान् संशोधक रा. लेले व रा. ओक यांनीं दोन लेख वाचले होते. आज भोजराजाचा पिता सिंधुराज याविषयीं संस्कृतवाङ्मयांतील एका प्रसिद्ध काव्यावरून जी माहिती उपलब्ध होते ती येथील विद्वन्मंडळापुढें मांडीत आहे.

सिंधुराजाचा वडील बंधु वाक्पति–मुंज व पुत्र भोज यांचीं अनेक दानपत्रें प्रसिद्ध झालीं आहेत व संस्कृतवाङ्मयांतील अनेक ग्रंथांमध्यें त्यांच्याविषयीं उल्लेख आले आहेत त्यावरून या दोन्ही विद्वान्, गुणज्ञ व दानशूर राजांच्या कारकीर्दींतील पुष्कळ गोष्टी इतिहासज्ञांस परिचित झाल्या आहेत. पण सिंधुराजाचें तसें नाहीं. त्याचें एकही दानपत्र उपलब्ध झालेलें नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं धार संस्थानांत धरमपुरी येथें एक शिलाखंड सांपडलेला आहे. त्यावरील त्रुटित लेखांत नवसाहसांकदेवाचा उल्लेख आहे.[1]

---

* २० वें संमेलन.

१ डी. बी. डिस्कळकर- The chronology of the Paramar Rulers of Malwa. Journal of Indian History Vol. VI, Part I.

सिंधुराज आपल्या साहसप्रियतेमुळें[२] नवसाहसांक या नांवानें प्रसिद्ध होता त्यावरून तो शिलालेख त्याच्या कारकिर्दींत कोरला गेला असावा. पण तो अद्यापि अप्रकाशित असल्यानें त्यांत सिंधुराजाविषयीं काय माहिती आली आहे तें सांगतां येत नाहीं.

सिंधुराजाच्या चरित्राचें मुख्य साधन म्हणजे तत्कालीन पद्मगुप्त ऊर्फ परिमल या कवीचें नवसाहसांकचरित हें होय. संस्कृत वाङ्मयांत हें काव्य अत्यंत उत्कृष्ट असें गणलें आहे. याचा कर्ता पद्मगुप्त हा प्रथम मुंज व नंतर सिंधुराज याच्या दरबारीं राजकवि होता. हें काव्य लिहिल्यानंतर लौकरच त्याची सर्वत्र प्रसिद्धी व प्रशंसा झाली. पद्मगुप्ताचा समकालीन, 'दशरूपक,' या नाट्यशास्त्रविषयक ग्रंथाचा टीकाकार धनिक यानें आपल्या टीकेंत त्यांतून उदाहरणार्थ उतारे घेतले आहेत यांत आश्चर्य नाहीं. पण ५०।७५ वर्षांत त्याची इतकी प्रसिद्धी झाली कीं, दूरच्या काश्मीर देशांतही प्रसिद्ध आलंकारिक मम्मट यानें आपल्या 'काव्यप्रकाश' या सर्वमान्य ग्रंथांत ठिकठिकाणीं उदाहरणाकरितां त्यांतून वेंचक पद्यें उद्धृत केलीं आहेत. इतरही अनेक अलंकारशास्त्रावरच्या ग्रंथांत त्यांतून उतारे घेतलेले आढळतात.

असा हा सर्वोत्कृष्ट काव्यग्रंथ इ. स. १८८३ पर्यंत अज्ञात होता. त्यावर्षीं कै. पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर यांनीं भरतपूर येथें त्याची एक हस्तलिखित प्रत विकत घेतली व पुढें इ. स. १८९५ मध्यें बॉंबे संस्कृत सीरिजमध्यें त्यांनीं तें काव्य प्रकाशित केलें. हा ग्रंथ ज्ञात झाल्याबरोबर त्याच्या उत्कृष्ट काव्यगुणामुळें व त्यांतील ऐतिहासिक उल्लेखांमुळें युरोपीय पंडितांचें त्याच्याकडे लक्ष वेधलें व नंतर लौकरच इ. स. १८८६ मध्यें झखारिए व बुल्हर या विद्वानांनीं एका युरोपीय मासिकांत त्यावर वर्णनात्मक व चर्चात्मक विस्तृत निबंध लिहिला. त्याचें इंग्लिश भाषांतर इंडियन अँटिक्केरीच्या व्हॉ. ३६ मध्यें प्रसिद्ध झालें आहे. या निबंधाचा वर्णनात्मक भाग झखारिए यानें व ऐतिहासिक चर्चात्मक भाग डॉ. बुल्हर यानें लिहिला आहे. डॉ. बुल्हर याचा भारतीय प्राचीन इतिहासाचा व्यासंग सर्वश्रुत असल्यानें त्याचा हा नवसाहसांकचरितावरील निबंध अद्यापि प्रमाणभूत मानण्यांत येतो व अलीकडे प्रसिद्ध झालेल्या

२ नवसाहसांकचरित ११, १०२.

संस्कृतवाङ्मयेतिहासाच्या सर्व ग्रंथांत त्यांतील माहितीचा उपयोग केला आहे.

पण त्या लेखांत नवसाहसांकचरितांतील सिंधुराज व त्याचे पूर्वज यांच्या दिग्विजयाबद्दल जे प्रत्यक्ष उल्लेख आले आहेत त्यांचेंच डॉ. बुल्हरनें विस्तृत विवेचन केलें आहे. या काव्याचा मुख्य विषय जें सिंधुराजचरित तें यामध्यें इतक्या असंभाव्य रीतीनें व पौराणिक पद्धतीनें वर्णिलें आहे कीं, त्यांत कोणता व किती भाग ऐतिहासिक आहे हें तत्कालीन विश्वसनीय उत्कीर्ण लेखांच्या अभावीं आपणांस ठरवितां येत नाहीं अशी स्पष्ट कबुली डॉ. बुल्हरनें प्रांजलपणें दिली आहे.[३] पण सध्यां उपलब्ध झालेल्या उत्कीर्ण लेखांवरून या काव्यांत वर्णिलेला प्रसंग खरोखरीच घडला असला पाहिजे अशी खात्री होते.

हर्षचरित व विक्रमांकदेवचरित या संस्कृतग्रंथांत ऐतिहासिक कथाभाग पुष्कळच आहे हें संशोधकांनीं सिद्ध केलें आहे व मीही राजशेखराच्या विद्धशालभञ्जिकेवरून तत्कालीन इतिहासावर कसा प्रकाश पडतो हें इतरत्र[४] दाखविलें आहे. प्रस्तुत काव्यांत राजाचें पातालांत जाणें, नर्मदा नदीनें स्त्रीरूपानें राजाचें स्वागत करणें, रत्नचूड व शशिखंड यांचें अनुक्रमें शुक व कपि योनींतून मुक्त होणें इत्यादि अद्भुत गोष्टी वगळल्यास बाकीचा कथाभाग ऐतिहासिक असेल असें सकृद्दर्शनींच वाटतें. सिंधुराजानें एका नागराजाच्या प्रोत्साहनावरून वज्रांकुश नामक असुरराजावर स्वारी केली, त्या कामांत त्याला एका विद्याधर राजकुमाराचें सहाय्य झालें, पुढें त्यानें त्या नागराजाच्या कन्येशीं विवाह केला या गोष्टी प्रस्तुत काव्यांत प्रमुख आहेत. यातील नागराजा म्हणजे कोणी सर्पराजा नसून हिंदुस्थानांत सर्वत्र पसरलेल्या नागवंशांतील कोणी राजा असला पाहिजे अशी डॉ. बुल्हरलाही कल्पना आली होती. वज्रांकुश हाही कोणी ऐतिहासिक पुरुष असावा,

३ Cf. 'The story from the personal history of Sindhurâja which represents the true object of Padmagupta's work is unfortunately surrounded with so thick a mythological covering that it is impossible, without the help of accounts containing only sober facts, to give particular details with certainty.' Ind. Ant. Vol. XL p. 172.

४ Annals of the Bhandarkar Institute Vol. IX p. 288 ff.

कारण तसें नसतें तर त्याच्या राजधानीचें अंतर इतक्या निश्चितपणें दिलें नसतें; पण तो कोण असावा, तसेंच सिंधुराजाला सहाय्य करणारे विद्याधर हे कोण असावे हें सध्यां तरी निश्चित करणें अशक्य आहे[५] असें एपिग्राफिया इंडिकामध्यें उदेपूर येथील मालवराजप्रशस्तीचें संपादन करतांना डॉ. बुल्हरनें म्हटलें आहे. आपणांस सध्यां असलेल्या माहितीवरून विद्याधर राजकुमार शशिखंड हा कोणी स्वर्गीय पुरुष नसून शिलाहारवंशीय राजकुमार असावा असें म्हणतां येतें. कारण शिलाहार राजे आपणांस विद्याधरवंशीय जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत असत हें इतिहासज्ञांस माहीत आहे.[६] हे शिलाहार राजे कोठें राज्य करीत होते, त्यांचें सिंधुराजाशीं कां सख्य जमलें, वज्रांकुश हा असुर राजा कोठला, त्यावर सिंधुराजानें स्वारी करण्याचें कारण काय, शंखपाळाची राजधानी कोठें होती इत्यादि गोष्टींचा निर्णय करण्यापूर्वी तत्कालीन इतिहासाचें विहंगमदृष्ट्या निरीक्षण करणें अवश्य आहे.

कल्याणीचे चालुक्य व धारचे परमार राजे यांचे कित्येक पिढ्या हाडवैर होतें हें सर्वांस माहीत आहे. सिंधुराजाचा वडील भाऊ मुंज यानें कल्याणी चालुक्यांच्या घराण्याचा मूळ पुरुष तैलप याचा लढाईत सहा वेळ पराभव केला; पण सातव्या खेपेस रुद्रादित्य नांवाच्या आपल्या मन्त्र्याचा सल्ला न ऐकतां त्यानें गोदावरी पार करून चालुक्यांच्या राज्यांत प्रवेश केला. पुढें झालेल्या युद्धांत त्याचा पराजय होऊन तो पकडला गेला व कांहीं दिवसांनीं तैलपानें त्याचा शिरच्छेद केला इत्यादि इतिहास मेरुतुंगाच्या प्रबंधचिन्तामणीवरून आपणांस कळतो. इ. स. ९९५ च्या सुमारास मुंज मारला गेला असावा. मुंज निपुत्रिक असल्यानें त्याच्यामागून त्याचा भाऊ सिंधुराज गादीवर आला. मुंज हा मोठा शूर, विद्वान्, रसिक व उदार होता. त्यामुळें त्याचा अशा भयंकर रीतीनें शेवट झालेला पाहून सर्वांस हळहळ वाटली असेल. पण

५ Cf. Buhler's introduction to the Udepur Praśasti of the Rulers of Malwa, Ep. Ind. Vol. I p. 232.

६ cf.– अतः स्वकीयपुण्योदयात्समधिगताशेषपञ्चमहाशब्द महासामन्ताधिपति तगरपुरपरमेश्वर शिलाहारनरेन्द्रजीमूतवाहनान्वयप्रसूत...... .. श्रीमच्छित्तराजदेवे, Ep. Ind. XII p. 262.

पुढें लौकरच सिंधुराजानें आपल्या पराक्रमानें चालुक्यांचा पराजय करून त्यांनीं गिळंकृत केलेलें आपलें राज्य परत मिळविलें. या विषयींचा उल्लेख नवसाहसांकचरितांत आला आहे; पण त्याकडे विद्वानांचें अद्यापि लक्ष्य गेलेलें दिसत नाहीं. तो उल्लेख असाः—

आक्रान्तदिङ्मंडलकुन्तलेन्द्रसान्द्रान्धकारान्तरितं रणे यः ।
स्वराज्यमस्त्रारुणमण्डलाग्रो गृहीतवान् दीधितिमानिवाहः ॥१॥ ७४.

भावार्थः-ज्याप्रमाणें सूर्य दिङ्मण्डलास व्यापणाऱ्या अन्धकारापासून अरुणमण्डलाच्या साहाय्यानें दिवसास मुक्त करतो, त्याप्रमाणेंच सिंधुराजानें सर्व दिशा आक्रमण करणाऱ्या कुन्तलराजाकडून (चालुक्य राजाकडून) अस्त्रांनीं रक्तवर्ण झालेल्या आपल्या तरवारीनें स्वराज्य परत मिळविलें.

नवसाहसांकचरितांत दोन ठिकाणीं सिंधुराजाच्या पराक्रमाचें वर्णन आलें आहे. त्यानें कोसल (हल्लींचा छत्तीसगड), लाट (मध्यम व दक्षिण गुजराथ), वागड (कच्छचा पूर्वभाग), मुरल इत्यादि देशांच्या राजांचा व हूणाधिपतीचा पराभव केला होता असें या काव्यांत (सर्ग १०, १४–२०) वर्णन केलें आहे. तसेंच त्यानें अपरान्त देशांतही विजय मिळविला होता असें पद्मगुप्तानें वर्णिलें आहे. अपरान्त म्हणजे कोंकण. त्या वेळीं कोंकणांत शिलाहार राजे राज्य करीत होते. हे पूर्वी राष्ट्रकूटांचे मांडलीक होते. उत्तर चालुक्यांनीं राष्ट्रकूटांचा उच्छेद केल्यावर इतर मांडलिकांप्रमाणें नवीन सम्राटापुढें मान न वांकवितां प्रथम प्रथम तरी त्यांनीं स्वतंत्रपणें राज्य केलें. त्या वंशांतील अपराजितदेव नांवाचा राजा कोंकणांत राज्य करीत होता. याचे शके ९१५ व ९१९ (इ. स. ९९३ व ९९७) चे दोन ताम्रपट उपलब्ध आहेत. त्यांत त्यानें प्रथम उत्तर चालुक्यांची वंशावळ न देतां आपले पूर्वीचे सम्राट राष्ट्रकूट यांचीच वंशावळ दिली आहे व शेवटीं त्यांच्या उच्छेदाबद्दल अश्रू गाळले आहेत. इ. स. ९९७ नंतर त्यांचा चालुक्यांनीं पराभव केला असावा; कारण रण्ण नांवाच्या कानडी कवीच्या ग्रंथांत तैलपाचा मुलगा सत्याश्रय यानें अपराजिताचा पुरा मोड केला असें वर्णन आहे. असो. यानंतर अपराजित लौकरच वारला. त्याला केशिदेव ऊर्फ अरिकेसरी व वज्जड असे दोन मुलगे होते. वज्जडाचा मुलगा छित्तराजदेव याच्या भांडुप येथें सांपडलेल्या ताम्रपटावरून केशिदेव

हा वडील भाऊ होता असें दिसतें.[७] तथापि त्याला राज्य न मिळतां तें वज्जडानेंच बळकावलें. या वज्जडाचा एकही लेख उपलब्ध नाहीं. याच्या उलट अरिकेसरी यानें शके ९३९ (इ. स. १०१७) मध्यें दिलेला एक ताम्रपट सांपडला आहे.[८] शिवाय त्यानें दक्षिण कोंकणच्या शिलाहारांचा पराभव करून त्यांचें राज्य खालसा केलें होतें[९] व काठेवाडांत स्वारी केली होती[१०] इत्यादि इतर ताम्रपटांतील उल्लेखांवरून वज्जडानें थोडींच वर्षें राज्य केलें व नंतर केशिदेव ऊर्फ अरिकेसरी हा गादीवर आला असें दिसतें. सिंधुराजाची अपरांतांतील स्वारी वज्जडाच्या कारकीर्दींत झाली असावी व तिचें कारण केशिदेव ऊर्फ अरिकेसरी यानें आपल्याला गादी मिळण्याकरितां सिंधुराजाकडे मदतीची याचना केली असावी हें उघड दिसतें. अरिकेसरी हा आपल्या नांवाप्रमाणें शूर पुरुष होता. गादीवर आल्यावर लौकरच त्यानें दक्षिण कोंकणचें राज्य काबीज केलें. नवसाहसांकचरितांत वर्णिलेल्या शशिखण्डाचा पिता शिखण्डकेतु म्हणजे अरिकेसरीच असावा. संस्कृत कवींच्या संप्रदायाप्रमाणें पद्मगुप्तानेंही आपल्या काव्यांत समकालीन पुरुषांचीं नांवें किंचित् बदलून घातलीं आहेत असें दिसतें. शिखण्डकेतु व केशिदेव (अरिकेसरीचें दुसरें नांव) यांतील साम्य सहज लक्ष्यांत येईल. तेव्हां अरिकेसरीनें कृतज्ञतेनें आपल्या मुलाबरोबर सैन्य पाठवून सिंधुराजास या स्वारींत मदत केली असावी हें उघड आहे.

यानंतर सिंधुराजानें ज्या नागराजाच्या शशिप्रभा नामक कन्येशीं विवाह करून सख्य संपादिलें तो कोठें राज्य करीत होता याचा विचार करूं. डॉ. बुल्हरच्या मतें हा नागराजा राजपुतान्यांत किंवा मध्य हिंदुस्तानांतील असावा.[११] पण तें सयुक्तिक दिसत नाहीं. वज्रांकुशावर स्वारी

---

७ Cf. तस्माद्भूद्वज्जडदेवनामा ततोऽग्रजः श्रीकेशिदेवश्च । Ep. Ind. Vol. XII, p. 262.

८ Thana Plates of Arikesarin, Asiatic Researches Vol. I p. 357.

९ Fleet—Dynasties of the Kanerese districts p. 538.

१० Cf. Aparâdityas grant of Śaka 1049, ed. by Prof. Pathak Bom. Br. of R. A. S. Vol. XXI p. 505.

११ Ep. Ind. Vol. I p. 229.

करतांना सिंधुराजास नर्मदा पार करावी लागली व तसेंच पुढें जाऊन त्यानें शशिप्रभेशीं लग्न केलें यावरून शशिप्रभेचा पिता नर्मदेच्या दक्षिणेस कोठें तरी राज्य करीत असावा हें उघड आहे. शिवाय इ. स. च्या तिसऱ्या चौथ्या शतकांत नागराजे उत्तर हिंदुस्तानांत राज्य करीत होते यांत संशय नाहीं; पण ते इ. स. च्या दहाव्या अकराव्या शतकांतही उत्तर हिंदुस्तानांत प्रबळ होते याला पुरावा नाहीं. याच्या उचट त्या शतकांत सध्यांच्या मध्यप्रांतांतील कवर्धा व बस्तर या दोन संस्थानांत नागराजे राज्य करीत होते याला शिलालेखाचा पुरावा आहे.[१२] त्यांपैकीं बस्तर संस्थानांत त्या वेळीं राज्य करणारे राजे विशेष प्रबल होते. ते आपणांस फणिवंशोत्पन्न व भोगवती पुरवराधीश्वर म्हणवीत. नवसाहसांकचरितांतही शशिप्रभेस भोगवती नगरीला अदृश्य नागांनीं नेली व तेथेंच तिचें पुढें सिंधुराजाशीं लग्न झालें असा कथाभाग आला आहे. ही भोगवती नगरी कोठें होती हें अद्यापि निश्चित झालें नाहीं. तथापि ती बस्तर संस्थानांतच कोठें तरी असावी असें वाटतें. या राजांची त्या वेळची चक्रकोट्य ही राजधानी होती.[१३] चक्रकोट्य नगराचा अनेक शिलालेखांत व बिल्हणाच्या विक्रमांकदेवचरितांतही[१४] उल्लेख आला आहे. त्यावरून त्याचें तत्कालीन इतिहासांत महत्त्व दिसून येतें. या कालाच्या सुमारास तेथें नृपतिभूषण नांवाचा राजा राज्य करीत होता असें एका शिलालेखावरून समजतें.[१५]

चक्रकोट्यनगराधिप नागराजाच्या मुलीशीं विवाह करून सख्य संपादन करण्यांत सिंधुराजाचा कोणता उद्देश असावा याचा आतां विचार करूं. सिंधुराज गादीवर आल्यावर लौकरच तैलप वारला. त्याचा मुलगा सत्याश्रय हा महान् योद्धा व शूर पुरुष होता. पण याच्या संबंध कारकीर्दींत याला तत्कालीन बलाढ्य चोलराजांशीं झगडावें लागलें. या अवकाशांत

---

१२ See Rai Bahadur Hiralal's Descriptive List of Inscriptions in C. P. and Berar (First Edition) Page 144 and 162.

१३ ही चक्रकोट्य नगरी बस्तर संस्थानच्या मध्यभागीं होती हें रा.ब. हिरालाल यांनीं सिद्ध केलें आहे. त्यांचें List of C. P. Inscriptions पृ. १५० पहा.

१४ विक्रमांकदेवचरित सर्ग ४ श्लोक ३०.

१५ See Errakol Telagu Inscription of Gagdalpur. R. B. Hiralal's List of C. P. Inscriptions p. 150.

सिंधुराजानें संधि साधून आपला गेलेला मुलुख मिळविला व कोंकणच्या राज्यावर आपला स्नेही बसवून उत्तरेस चालुक्यांच्या सत्तेला पायबंद घातला. इ. स. १००८ मध्यें सत्याश्रय वारला. त्यानंतर पुढील सहा वर्षांत दशवर्मन्, पांचवा विक्रमादित्य व अय्यण असे तीन राजे होऊन गेले, त्यावरून त्या काळांत चालुक्यांच्या राज्यांत कशी बंडाळी व अव्यवस्था माजली होती याचें अनुमान करतां येतें. तेव्हां परमारांच्या सत्तेला चालुक्यांकडून उपसर्ग पोंचणें शक्य नव्हतें हें उघड आहे. पण या चालुक्यांच्या निर्बलतेमुळें दक्षिणच्या चोल राजांची सत्ता याच वेळीं प्रबळ झाली. या काळांत चोल वंशांतील महान् व महत्त्वाकांक्षी राजराज देव व त्यानंतर त्याचा पुत्र पहिला राजेंद्र चोलदेव हे राज्य करीत होते. यांपैकीं पहिल्या राजानें वेंगी, कूर्ग, पांड्य, सिंहल इ. जिंकून आपली सत्ता वाढविली[१६] व दुसऱ्यानें पुढें उत्तर हिंदुस्तानांत स्वारी करून बंगालच्या महीपालाचा पराभव केला व गंगानदीपर्यंत दिग्विजय केला. यावरून त्यांच्या महत्त्वाकांक्षेची व शौर्याची कल्पना येईल. चोलांच्या या वाढत्या सत्तेचें नियमन करण्याकरितां चक्रकोट्याच्या नागराजाचें सहाय्य असणें जरूर होतें व त्याकरितांच सिंधुराजानें हा विवाहसंबंध घडवून आणला असावा.

या विवाहसंबंधावरून नागराजाचाही फायदा झाला, हें नवसाहसांकचरितावरून स्पष्ट दिसून येतें. वज्रांकुश या आपल्या बलाढ्य शत्रूचा नाश करण्याकरितां नागराजास कोणाचें तरी सहाय्य अवश्य असून तें सिंधुराजानें दिलें असावें. वज्रांकुशाच्या क्रीडावापींतील सुवर्णकमळें शशिप्रभेच्या कर्णाभरणार्थ मागण्यांत शंखपालाच्या मनांत त्याचा नाश, पुरा पाडाव किंवा निदान मानहानि तरी व्हावी हाच हेतु असावा, यांत संशय नाहीं. हा वज्रांकुश म्हणजे रतनपुरच्या कलचुरींचे शिलालेख व ताम्रपट यांवरून ज्ञात झालेला छत्तीसगढांतील कोमो मण्डलाधिपति वज्जूक[१७] किंवा एका ताम्रपटांत म्हटल्याप्रमाणें वज्रुवर्मन्[१८]

---

१६ Smith-Early History of India (Third Edition) p. 465.

१७ कोमोमण्डलभूभर्तुर्वज्जूकस्य श्रुता सुता । नोन्नल्ला रत्नराजेन परिणीता नृपश्रिया । Ep. Ind. I, p. 22.

१८ नोन्नलाख्या प्रिया तस्य शूरस्येव हि शूरता । कोमोमण्डलनाथस्य सुता या वज्रुवर्म्मणः ॥ Amoda Plates of Prithvideva I, Ep. Ind. XIX p. 79.

हाच असावा. या बाबतींत कवीनें स्वकालीन ऐतिहासिक व्यक्तींच्या नांवांत थोडा फरक करून त्यांचें संस्कृतरूप योजिलें आहे हें सहज ध्यानांत येईल. इ. स. १११४ मध्यें लिहिलेल्या पहिल्या जाजल्लदेवाच्या शिलालेखावरून ह्या वज्जूकानें आपली मुलगी नोन्नल्ला ही जाजल्लदेवाचा पितामह रत्नदेव याला दिली होती व या लग्नसंबंधानें रत्नदेव प्रबळ झाला होता असें दिसतें. या कारणामुळें रत्नदेवाच्या वंशजांच्या अनेक लेखांतून—गुप्तांच्या लेखांत लिच्छविकुलोत्पन्न कुमारदेवीचें नांव येतें त्याप्रमाणें—या विवाहाचा गौरवपर उल्लेख आला आहे.[१९] रत्नदेवाचा पिता कमलराज हा त्रिपुरीच्या गांगेयदेवाचा समकालीन होता.[२०] गांगेयदेवाचा भोजानें पराभव केला होता[२१] म्हणून कमलराज हा भोजाचा समकालीन ठरतो. तेव्हां कमलराजाचा व्याही सिंधुराजापेक्षां वयानें थोडा लहान पण समकालीन असणें शक्य आहे. वज्रांकुश म्हणजेच वज्जूक असें मानण्यास दुसरेंही एक कारण आहे. रत्नवतीवर चाल करतांना सिंधुराजास वाटेंत वङ्कमुनीचा आश्रम लागला असें या काव्यांत वर्णन आहे. छत्तीसगढांतील कलचुरींच्या शाखेची प्रथम तुम्माण राजधानी होती हें उत्कीर्ण लेखांवरून सिद्ध झालें आहे. या तुम्माणांत वङ्केश्वर या नांवाचें एक शिवालय होतें.[२२] त्याची प्रसिद्धी इतकी होती कीं तुम्माण नगराला वङ्कोतुम्माण असें नांव एका ताम्रपटांत आलें आहे.[२३] हा वङ्केश्वर कोणा वङ्कुमुनीनें स्थापिला असल्याचा संभव आहे. निदान वङ्केश्वर या नांवावरून रत्नवतीवर चाल करून जातांना वाटेंत वङ्कुमुनीचा आश्रम घालण्याची कल्पना कवीला सुचली असावी असें आपणांस म्हणतां येईल. हें वङ्केश्वरालय जेथें होतें तें

---

१९ Cf. Amoda Plates of Jajalladeva II, Ep. Ind. XIX p. 209.

२० गाङ्गेयदेवविभवे समद्याच्छ्रियं यः।, Ep. Ind. XIX p. 76.

२१ See Dhar Praśasti of Arjunavarmadeva, Ep. Ind. VIII p. 96.

२२ श्रीवङ्केशसुरालयप्रभृतयो रत्नेश्वराद्यास्तथा यत्रोद्यानमसङ्ख्यपुष्पसुफलं चारूच्चमाम्रं वनम्। रत्नेशेन ससौधसद्मनिचितश्चारुश्रिया भूषितस्तुम्माणः समकारि लोचनसुखः संवीक्ष्यमाणो जनैः॥ Ep. Ind. I, p. 32.

२३ त्रिपुरीशानुजस्यासीद्वङ्कोतुम्माणभूभुजः। कालिंगराजस्तत्सूनुरासीत्कमलराड् नृपः। Ind. His. Quarterly IV p. 31.

तुम्माण नगर फार प्राचीन आहे. इ. स. च्या नवव्या शतकांत त्रिपुरी (सध्यांचें जबलपुराजवळचे तेवूर) येथील कलचुरींच्या घराण्यांतील एका शूर पुरुषानें तेथें आपली राजधानी केली होती व पुढें अकराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास रत्नदेवानें ती दुसरीकडे नेईपर्यंत ती त्याच्या वंशजांची राजधानी होती असें दिसतें. अर्थात् आपल्या कथानकाच्या वेळीं तें शहर भरभराटींत होतें यांत संशय नाहीं. हें शहर प्रथम काबीज करून नंतर रत्नवतीवर सिंधुराजानें चाल केली असावी असें वाटतें.

वरील विवेचनावरून रत्नवती हें सध्याचें रतनपुरच असावें असें कोणालाही सकृद्दर्शनीं वाटेल, पण यावर एक आक्षेप संभवतो, तो हा कीं, रतनपुर हें सिंधुराजानंतर थोड्या वर्षांनीं होऊन गेलेल्या रत्नदेवानें वसविलें असा स्पष्ट उल्लेख कित्येक उत्कीर्ण लेखांत आला आहे.[२४] यावर असें उत्तर देतां येईल कीं रतनपूर हें महाभारतकाळचें मणिपूर– जेथें एका नागराजाच्या चित्रांगदा नामक कन्येशीं अर्जुनानें लग्न केलें व तिच्यापासून त्यास बभ्रुवाहन नांवाचा शूर पुत्र झाला तें–होय, अशी समजूत फार प्राचीन काळापासून रतनपुरांत प्रचलित आहे असें जनरल कनिंग्हामचा सहाय्यक बेग्लर यानें आपल्या आर्किआलॉजिकल सर्व्हे–रिपोर्टांत म्हटलें आहे.[२५] तें खरें असल्यास रत्नदेवानें नवीन शहर वसविलें नसून मणिपुर या प्राचीन शहरास रत्नपूर हें नांव दिलें असें मानण्यास हरकत नाहीं. रतनपुर हें तुम्माणपासून ४५ मैलांवर आहे. रतनपुरच्या उत्तरेस सुमारें ३० मैलांवर कोमो नांवाचा गांव आहे. त्यावरून कोमोमंडळांत रतनपुरचा अंतर्भाव होत असावा व तेथेंच वज्जूकाची राजधानी असावी असें अनुमान करतां येतें. नवसाहसांकचरितांत नर्मदा नदीच्या भाषणांत ' येथून पन्नास गव्यूतींवर (म्हणजे सुमारें २०० मैलांवर) रत्नवती नांवाची वज्रांकुशाची राजधानी आहे ' असा स्पष्ट निर्देश आला असून तो वस्तुस्थितिनिदर्शक असावा. सिंधुराजानें नर्मदा कोणत्या ठिकाणीं पार केली हें या काव्यांत सांगितलें नाहीं. तथापि

---

२४ व्यधापयन्मां भुवि रत्नराजः श्रेष्ठीयशश्चेदधितिष्ठति स्म । वक्तीत्यदो रत्नपुरं समन्तान्मत्तोऽनयोर्यातु यशस्त्रिलोकम् ॥ Ep. Ind. I, p. 32.

२५ Archaelogical survey of India Reports Vol. X, p. 216.

ओंकार मांधाता या पवित्र स्थळाच्या आसपास सिंधुराजानें नर्मदा नदी ओलांडली असल्यास तेथून रतनपुर सुमारें २०० मैलच अंतरावर पडेल असें वाटतें.

सिंधुराज सुमारें इ. स. ९९५ मध्यें गादीवर आला. पण तो किती वर्षें राज्य करीत होता याविषयीं विद्वानांत एकमत नाहीं. त्याचा पुत्र सुप्रसिद्ध विद्वान् व दानशूर भोज यानें ५५ वर्षें ७ महिने ३ दिवस राज्य केलें असें भोजप्रबंधांत म्हटलें आहे. भोजानंतर गादीवर आलेल्या जयसिंहाचा वि. सं. ११११२ (इ. स. १०५६) चा एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे त्यावरून भोज वि. सं ११११ (इ. स. १०५५) मध्यें काल-वश झाला असावा व भोजप्रबंधकर्त्यानें दिलेली कालगणना खरी मान-ल्यास तो इ. स. १००० च्या सुमारास गादीवर आला असावा असें अनु-मान निघतें.[२६] पण या कालगणनेनें सिंधुराजाच्या कारकीर्दीस चारच वर्षें उरतात. या चार वर्षांत लाट, वागड, अपरान्त इत्यादि ठिकाणच्या राजां-वर व हूण नृपतीवर त्यानें विजय मिळविला, छत्तीसगढांत स्वारी करून वज्जूकाचा पराभव केला व चक्रकोट्य नगराच्या राजकन्येशीं विवाह केला; नंतर नवसाहसांकचरितांत शेवटीं म्हटल्याप्रमाणें[२७] पद्मगुप्तानें राजाज्ञेनें हें विविध अलंकारांनीं नटलेलें अठरा सर्गांचें काव्य लिहिलें, इतक्या गोष्टी घडल्या असणें संभवनीय दिसत नाहीं. नवसाहसांकचरितांत भोजाच्या नांवाचा उल्लेख नाहीं तेव्हां भोज त्यावेळीं युवराज झाला नव्हता असें डॉ. बुल्हरनें अनुमान काढलें आहे व सिंधुराजानें इ. स. ९९५ ते १०११-२ पर्यंत राज्य केलें असावें असें म्हटलें आहे[२८]. शशिप्रभा या नागकन्येवर सिंधुराजाचें फार प्रेम होतें व म्हणूनच त्यानें पद्मगुप्तास तिजविषयीं हें काव्य रचण्यास आज्ञा केली. कदाचित् भोज हा तिच्याच पोटीं आला असावा. तसें असल्यास सिंधुराजाची कारकीर्द सुमारें इ. स. १०१५-पर्यंत चालली असावी.[२९]

---

२६ See D. B. Diskalkar—The chronology of the Paramar Rulers of Malwa. Journal of Indian History IV Part I

२७ यच्चापलं किमपि मन्दधिया मयैवम् आसूत्रितं नरपते नवसाहसाङ्क । आज्ञैव हेतुरिह ते शयनीकृतोग्रराजन्यमौलिकुसुमा न कवित्वदर्पः ॥

२८ Ep. Ind. Vol. I, p. 282.

२९ व्हिन्सेंट स्मिथच्या मतें सिंधुराज १०१८ पर्यंत राज्य करीत होता. पण इ. स. १०१८ च्या पूर्वी चालुक्य जयसिंहानें भोजाचा पराभव केला. म्हणून १०१५

येथवर नवसाहसांङ्कचरितावरून सिंधुराजाविषयीं आपणांस काय माहिती मिळते तें आपण पाहिलें. या लेखाचा शेवट करण्यापूर्वी सिंधुराजानें कोंकणाच्या कारभारांत जो हात शिरकवला त्याचें पुढें काय परिणाम झाले हेंही पहाणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. सिंधुराजानंतर लौकरच अरिकेसरी हाही वारला असें दिसतें. त्यानंतर त्याच्या मुलास गादी न मिळतां कांहीं कारस्थानानें त्याचा पुतण्या छित्तराजदेव यानें ती बळकाविली असावी. इकडे धारच्या गादीवर भोज बसला होता. आपल्या पित्याचा मित्र व सहाय्यक अरिकेसरी याच्या मुलाचा हक्क छित्तराजानें दूर सारला असें पाहतांच भोजानें कोंकणावर चाल केली व तेथील राजाचा पराभव करून कोंकण आपल्या ताब्यांत घेतलें. कोंकण जिंकल्या वेळेस व तें आपल्या अमलाखालीं असतांना असे दोन ताम्रपट भोजानें वि. सं. १०७६ (इ. स. १०१९) या एकाच वर्षी दिलेले उपलब्ध आहेत.[२९] भोजाचें वय या वेळीं पंधरा वीस वर्षांचें असावें. इतक्या लहान वयांत कोंकणासारख्या दरच्या प्रदेशांत भोजानें स्वारी करण्याचें कारण काय झालें असावें याचा विद्वानांस समाधानकारक उलगडा झालेला नाहीं. डॉ. देवदत्तपंत भांडारकर हे तैलपानें केलेल्या मुंजाच्या वधाचा सूड घेण्याकरितां भोजानें ही स्वारी केली असावी असें म्हणतात;[३०] पण तें सयुक्तिक दिसत नाहीं. यावेळीं मुंजाच्या वधास चोवीस वर्षें होऊन गेलीं होतीं. शिवाय कोंकणचे शिलाहार आपल्या शासनांत उत्तर चालुक्यांची वंशावळ देत नसल्यानें ते त्यांचें मांडलिकत्व कबूल करीत असावे असें दिसत नाहीं. तेव्हां चालुक्यांवर सूड उगाविण्याकरितां शिलाहारांच्या मुलखावर स्वारी करणें म्हणजे वड्याचें तेल वांग्यावर काढण्यासारखेंच झालें असतें. तेव्हां या स्वारीची उपपत्ति मागें सांगितल्याप्रमाणें लाविली पाहिजे.

कोंकण फार दिवस भोजाच्या किंवा त्यानें गादीवर बसविलेल्या अरिकेसरीच्या मुलाच्या ताब्यांत राहिलें असावें असें दिसत नाहीं. कारण

च्या सुमारास भोज गादीवर आला असावा असें वाटतें. रा. नानासाहेब वैद्य यांचे मतें सिंधुराज इ. स. १०१० पर्यंत गादीवर होता. Hist. of Mediaeval Hindu India II, p. 123.

२९ Ep. Ind. XI, p. 181 and XVIII, p. 320.

३० Ind. Ant. XLI, p. 201.

पुढे पांच वर्षांनीं उत्तर चालुक्य वंशांतील जयसिंहानें कोंकणाधिपतीचा पराभव केला असें त्याच्या इ. स. १०२४ च्या मिरज येथील दानपत्रावरून दिसतें.[३१] कोंकणप्रांत जिंकून जयसिंहानें छित्तराजास दिला असावा कारण पुढें दोनच वर्षांनीं (इ. स. १०२६) छित्तराजानें आपला भांडुपचा ताम्रपट दिला आहे.[३२] असो.

याप्रमाणें शिलालेख व ताम्रपट यांच्या सहाय्यानें नवसाहसांकचरितांत वर्णिलेलें कथानक ऐतिहासिक आहे असें निर्विवादपणें आपणांस म्हणतां येतें.

---

८ महानुभावांचे चारित्रग्रंथ.*

(श्री. य. खु. देशपांडे, एम्. ए., एलएल्. बी., शारदाश्रम, यवतमाळ)

शारदाश्रम, यवतमाळ, या संस्थेंत हल्लीं महानुभावांचा आद्यचरित्रग्रंथ लीळा–चरित्र हा संपादावयास घेतला आहे. त्यानिमित्त चरित्रग्रन्थाच्या ६।७ हस्तलिखित प्रति जमविण्यांत आल्या आहेत. महानुभावी चरित्रग्रंथासंबंधानें पन्थाबाहेर अगदींच माहिती उपलब्ध नाहीं. लीळा चरित्रासंबंधानेंही फारच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. जी आहे ती महानुभावी मराठी वाङ्मय आणि महाराष्ट्र सारस्वत यांत आली आहे. कै. चांदोरकर यांना लीळासंवाद या नांवाचा ग्रन्थ मिळाला व त्यांतील कांहीं लीळा त्यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या इतिवृत्तांत प्रसिद्ध केल्या आहेत. लीळासंवाद या नांवाचा ग्रन्थ मुळींच नाहीं. प्रसिद्ध केलेल्या लीळा लीळाचरित्रांतील असतील. त्या बद्दल विवेचन लीळाचरित्राच्या प्रस्तावनेंत करण्याचें योजिलें आहे.

महानुभावांच्या चरित्रग्रंथांची एक स्वतंत्र पोथी असते. जींत संपूर्ण चरित्रें लिहिलीं आहेत असली एक पोथी महंत दत्तलक्षराज यांच्या संग्रहांतून त्यांच्या कृपेनें मिळाली आहे. ती पोथी लाहोर येथें सन

---

३१ cf. सप्तकोंकणाधीश्वराणां सर्वस्वं गृहीत्वा उत्तरदिग्विजयार्थं कोल्लापुरसमावासितनि जविजयस्कंधावारे &c. Ep. Ind. XII p. 303.

३२ Ep. Ind. XII p. 250.

* २२ वा वाढदिवस.

१९२७ मध्यें महंतजींना एका पंजाबी धर्मभगिनीनें दान दिली असा त्या पोथीवर उल्लेख आहे. पोथी सकळ लिपीमध्यें लिहिली असून १००।१२५ वर्षांपूर्वीं ती प्रत लिहिली असावी. हल्लीं चरित्रग्रंथाच्या ज्या पोथ्या मिळतात त्यांत श्रीदत्तात्रय चरित्र, श्रीकृष्ण चरित्र, श्रीचक्रपाणी चरित्र, श्रीऋद्धिपूर चरित्र अथवा श्रीगुंडम–गोविंदप्रभु चरित्र आणि लीळा चरित्र अशीं पांच चरित्रें असतात. क्वचित् शेवटीं नागदेवाचार्य चरित्रही दिलें असतें. लीळाचरित्राचे पुनः (१) एकांक (२) पूर्वार्ध आणि (३) उत्तरार्ध असे तीन भाग असतात. हे चरित्रग्रंथ प्राचीन मराठी गद्यामध्यें आहेत. नागदेवाचार्यचरित्र परशराम बास यांनीं रचिलें असून बाकींचीं पांचही चरित्रें महीन्द्र व्यासांनीं लिहिलीं आहेत. आजच्या लेखाचा विषय हीं पांच चरित्रें होत. महानुभाव पन्थांत जे पंचकृष्ण म्हणून पांच अवतार प्रसिद्ध आहेत त्यांचींच हीं चरित्रें होत. महानुभावोत्पात्ति आणि पंचकृष्ण या संबंधानें कै. चांदोरकर यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्तांत आणि अन्यत्रही जें विवेचन केलें आहे, तें पन्थांतील प्राचीन वाङ्मयाशीं संबद्ध नाहीं व तें पन्थास कमीपणा आणणारें आहे. पन्थांतील वाङ्मय प्रसिद्ध झाल्यावर त्याची सत्यता दिसून येईल; या संबंधानें अन्यत्र लिहिण्याचें योजिलें आहे.

भीष्माचार्य पाठ म्हणून चरित्रग्रन्थाची सुंदरी लिपीमध्यें लिहिलेली एक हस्तलिखित पोथी मिळाली आहे. तींत प्रथम इतिहास म्हणून भाग दिला आहे. त्यांत या चरित्रग्रन्थांच्या उत्पत्तीसंबंधानें इतिहास दिला आहे. श्रीचक्रधरस्वामी उत्तरापंथें बद्रीकेदारकडे गेल्यावर नागदेवाचार्य, बाईसा आणि महींद्रभट हीं सर्व मंडळी ऋद्धिपुरीं श्रीगोविंदप्रभूजवळ सेवा करीत असता वेळचा हा कथाभाग आहे. तो या चरित्रग्रन्थांच्या उत्पत्तीपुरता या पुढें पोथींतून जसाचा तसा उतरून घेतला आहे.

॥ एकदी महीभटीं [१]भटातें पुसिलें : हा भटो तूम्ही नीरंतर काइसयाचें मनन करीत असा : तूम्हासि [२]केव्हळाही मनना वेगळेंया न देखो : मग : भटी भणितिलें : सर्वज्ञ मज हीवरळीयेहूनि ऋद्धिपूरा पाठवीलें : तै मातें सर्वज्ञें भणितिलें : [३]वानरेया येथौनि नीरोपीलें वीचार : शास्त्र : अर्थ : ज्ञान : त्याचें श्रवण मनन नीदीध्यासन करावा : तेही एक स्मरणाचि कीं

१ नागदेवाची. २ केव्हांही ३ नागदेवाचार्य, चक्रधरांनीं ठेविलेलें नांव

गा : । १ । एथीची चरीत्रें आठवीजेति : आइकीजेति : ऊच्चारीजति : ते ही एक स्मरणाचि कीं गा : । १ । ऐसें सर्वज्ञ मज नीरोपीलें होतें : भणौनि ऋद्धिपूरी : श्रीप्रभुचिया केळीक्रीडा : जिया मीया देखीलीया : तेतूलीया ही आठवीतूचि असे : मग : रूद्धपूरीहूनि जोगेश्वरीसि मागौतेनि : सर्वज्ञांचया दर्शना आलो : दर्शन जालें : मग सर्वज्ञें संगमेश्वरी बीजें केलें : संगमेश्वरी रात्री मज : बाइसाकरवी पाचारूणि नेलें : मा मातें सर्वज्ञ पुसिलें : काइगा सर्वज्ञ पूर देखीलें : जी : देखीले : श्रीप्रभु देखीले : जी देखीलें : सर्वज्ञें भणितीलें : श्री प्रभुचीया केळीक्रीडा देखीलीया : जी : देखीलीया : सर्वज्ञें भणितिलें : पाहो तीया येथ सांगा पा : मीया भणितिलें : मा तीया काइ सांघो जाइजत असीजेति : सर्वज्ञें भणितिलें : कीरू ते तैसेंचि : परि : सांघा तऱ्ही पा पावो ऐसीया अनूभवीचिया दोनि च्यारि : मग : मीया अनूभवीचिया सांघो आदरीलीया : श्रीप्रभूचें नीत्य दीनी वर्त्तन : आन : जीया लीळा रूपा : [1]बाई : प्रधानः ऐसीया अनूभवीचीया पाच सात सांघीतलीया : सर्वज्ञ अनूकरुणि आइकीलीया : मग : मज : दा[2] : । १ । वरि बूद्धि होती : ते नीरसीली : मज सर्वज्ञ प्रतीति केली : मग : सर्वज्ञें भणितिलें : आवांकेया जे नीरूपण ये ते घेइजे ते नीकें : आपूलें जावो नेदीजे : । १ । दूना पथ्य घेइजे : । १ । ऐसें मज नीरोपीलें होतें : भणौनि मी जै लागौनि अनूसरला[3] : तै लागौनि मज : देखता जीया : सर्वज्ञांचिया लीळा वर्त्तलीया : तिया मी आवांकीतेंचि असे : जै मज पवांड[4] नसे : सर्वज्ञाचया सेवा दास्यालागी कव्हणीकडे जाए : तरि जीए : भक्तें सर्वज्ञा जवळि असे : त्यातें एऊनि पूसे : आन : मी अनूसरलो नव्हतो : तै : बाइसा देखता : जिया लीळा वर्त्तलीया : तीया मीया : सर्वज्ञातें पूसीलीया : आन : सर्वज्ञ प्रसंग प्राप्ति नीरूपीलें इतिहास : तेही आवांकीत असे : आन : सर्वज्ञ जे नीरोपीलें : परावर नीरूपण तेही आवांकीतूचि असे : आन : [5]अळजपूरीहूनि : सर्वज्ञ बीजें केलें : तेथौनि प्रतीस्टानपर्यंत : जीया लीळा वर्त्तलीया : तीया सर्वज्ञ प्रसंगें : भक्ताप्रती सांघीतलीया : तीया आठवीतूचि असे : आन : सर्वज्ञ जै एकांकी[6] राज्य केलें : तीया लीळा : सर्वज्ञ : प्रसंगें भक्ताप्रती

१ महदाइसी, माहादांबा. २ अनुग्रह घेतला. ३ आठवीत. ४ रीघ, सवड ५ एलिचपूर. ६ एकाकी, एकटे.

नीरूपीलीया : तीया ही आठवीतूचि असे : आन : सर्वज्ञ : [1]द्वापरीचीया लीळा : [2]द्वारावती काराचीया लीळा : श्रीदत्तात्रय प्रभूचीया लीळा : श्री [3]प्रभुचीया लीळा : प्रसंगें भक्ताप्रती नीरोपीलीया : तीयाही आठवीतूचि असे : मग : महीभटी भणितिलें : भटो : तूम्हासी : सर्वज्ञा : वरू : भणौनि : सर्वज्ञ नीरोपीलें ज्ञान : शास्त्र : आन : सर्वज्ञ जीया केलीया लीळा सांगितलीया लीळा : तूम्हासि आठवताति : तरि : आता : श्री चरण सन्निधानी : आम्हासि आन : पूढा जो सर्वज्ञाचा[4] मार्ग होइल : त्यासि तवं इतुके शास्त्र : न धरे : तरि : सर्वज्ञाचीया लीळा : तूम्ही सांगा : आन : लीहीन : भटी भणितिलें : हो का लीहीलें : तरि: मार्गासि उपयोगा जाइल : सर्वज्ञाते मार्गाची वृत्ति असे : का पा : सर्वज्ञें भणितिलें : शास्त्र घेइजे : घोकीजे : मग : काळें करूणी उपयोगा जाये : मग : महींभटी लेखन आरंभीलें : भट महीभट [5]वाजेश्वरी [6]वींजन करीत : एक प्रहर लेखन करीत : नगरांत दोघे भीक्षा करीत : उरलेंनि काळें : श्रीप्रभुचें सेवा दास्य करीत : ऐसें अवघे भटोवासी लीळाकथन केलें : ते महीभटी सा मासा लीहीलें : मग : भटी भणितिलें : महीभटो : जै मी : सर्वज्ञाते : अनूसरला नाही : तै बाइसा : अवीद्यमान जीया लीळा वर्तलीया : तीया त्याचीया अनूभवीचीया : त्यातें पूसावीया : जानोचीया अनूभवींचींया जानोतें पूसावीया : नाथोचींये अनूभवींचीया नाथोतें पूसावीया : येल्होचीये अनुभवींचींया येल्होतें पुसावीया : ऐसीयाचि परी ज्या ज्याचिये अनुभवींचीया लिळा त्या त्यासि पूसावीया : ऐसे माहादाइसातें महीभटातें भणितिलें : श्री प्रभुचा सन्निधानी जे जे भक्त होते : ते त्याचीये अनूभवीचीया लीळा त्यातें पूसावीया : महीभटी त्यातें पूस पूसौनी लीहीलीया : मग भटातें पूसौनि महीभट गंगातीरासि आले : मग : जया जया सर्वज्ञांचे दर्शन जालें होतें : त्यासि सर्वज्ञांचिया लीळा पुसत : आन : तीया लीहीत : ऐसे महीभट डखलेयाचीया गावासि आले : तेथ : सर्वज्ञांचिया लीळा पूसेति : डखले सेतासि आऊत वाहावया जाति : ते आऊत वाहात : आऊत वाहाता : तया सरीसे : महीभट सर्वज्ञांचिया लीळा त्यातें पूसेति : डखले आऊत वाहाता : सर्वज्ञांचिया लीळा सांघेति : त्या महीभट नमस्करोणि

---

१ श्रीकृष्णाच्या. २ द्वारावतीकर श्री चक्रपाणी. ३ श्री गोविंदप्रभु (ऋद्धिपूर). ४ पंथ. ५ ऋद्धिपुरांतील एक देवस्थान. ६ जात असत.

घेति : मग भीक्षा अवसरी जाति : भीक्षा करूणि गंगातीरी जेवीति : परि : तयाचें काही नेघेति : मग : एकदी महीभटी भणितिलें : × × × : मग महीभट तेथौनि नीगाले : ते प्रतीस्टानासि सारंग पंडितासि भेटले : मग महीभटी सारंग पंडितासि : सर्वज्ञांचिया लीळा पूसो आदरीलीया : सारंग पंडिती भणितिलें : आमचें काही जेवाल : तरि : मी सर्वज्ञांचीया लीळा सांघेन : महीभटी भणितिलें : जेवीन : × × × : तवं जेवीले : × × × : मग : सारंग पंडीती लीळा सांघीतलीया : तीया महीभटी लीहीलीया : मग तेथौनि नीगाले : बळ्हेग्रामासि आले : तेथ सर्वज्ञाचे भक्त होते : त्याते सर्वज्ञाचीया लीळा पूसौनि लीहीलीया : मग रावसग्रामा आले : तेथ : दादोस होते : त्यासि सर्वज्ञाचिया लीळा पूसौनि लीहीलीया : मग बीडासि गेले : मग पद्मनाभी देवातें पूसौनि सर्वज्ञांचिया लीळा लीहीलीया : ऐसें भटां अवीद्यमान : आन : बाइसा : अवीद्यमान : जीया लीळा तीया : महीभटी : जेथ जेथ सर्वज्ञ बीजें केलें होतें : तेथ तेथ जावौनि पूसौनि लीहीलीया : मग : महीभट : गूरूकूलांत ऋद्धिपूरा आले : श्रीप्रभुचे चरणा लागले : बाइसाते भटाते भेटले : अवघी क्षेमवार्ता सांघीतली : मग सारंग पंडीताची क्षेमवार्ता सांघीतली : भोजनावसरीचें प्रकरण सांघीतलें : × × × × : महीभटी भटापुढां लीळा वाचीलीया : भटी भणितिलें : हे सर्वज्ञाचे श्रीमुख शब्द होति : हे नव्हेति मग महीभटीः भटातें पूसपूसो जें श्रीमुखीचे नव्हते मोडीले : एक भटाचेनि संवादें अन्वयी[1] लाविलें : मग भटा अवीद्यमान जीया लीळा : वर्तलीया : तयासि महीभटी : पूर्वार्ध ऐसें नांव ठेवीलें : आन भटी जेतुकीया सांघीतलीया : तयासि ऊतरार्ध ऐसें नांव ठेवीलें : ऐसे दोनि वीभाग केले : महीभटी अकरा प्रकरणाचीया नीरूपणाची चरीत्र-बद्ध मोकळी वेगळी लीहीली : इतीहास वेगळें लीहीलें : ऐसी च्यारि रूपें केली : महीभटी चहू रूपाचीया आदी केलीया : मग तीया लीळा भटाचेनि पुढें : श्रीप्रभु संन्निधानी : लक्ष्मींधरभटी : १ कोथळोबासी : २ : देवता : भी : ये महादेव बासी : ३ : त्रीपूरारी बासी : ४ : घोकीलीया : ॥

आमचेया सर्वज्ञां बीजें केलेंया नंतरें : भटाते श्रीप्रभुचें चौदा वर्षें सन्निधानः मग श्रीप्रभु बीजें केलेंया नंतरें : महीभटी भटातें : पूसौनि : श्रीप्रभुचीया लीळा लीहीलीया : भक्ताचीये अनूभवीचीया : भक्ता : पूसी-

१ संगती लाविली

लीया : जनाचीया अनूभवीचीया : जनासि पूसीलीया : तयाचीया आदी[1] केलीया : श्रीप्रभु मागें : सा मास ऋद्धिपूरी होते : मग भट : ऋद्धिपूरी व्यवस्था करूणि [2]मातापूरा नीगाले : ॥

वरील उताऱ्यामध्यें चरित्रग्रन्थाच्या उत्पत्ति संबंधानें सविस्तर विवेचन असल्यामुळें तो येथें विस्तृत दिला आहे. त्यावरून दिसून येईल कीं, श्रीचक्रधरांनीं वेळोवेळीं श्रीदत्तात्रय, श्रीकृष्ण व श्रीचक्रपाणी यांच्या संबंधानें शिष्यांना वेळोवेळीं ज्या लीळा सांगितल्या त्या महींद्रभटांनीं ग्रथित केल्या आहेत. तसेंच श्रीचक्रधरांच्या लीळा नामदेवाचार्य भटांनीं व इतर शिष्यांनीं आठवणीरूपानें सांगितल्या त्या एकत्र केल्या आहेत. तसेंच भटांनीं श्रीगोविंदप्रभूच्या लीळा सांगितल्या त्याही महींद्रभटानें ग्रथित केल्या. स्वतः महींद्रभट श्रीचक्रधर स्वामी आणि श्रीगोविंद प्रभु यांच्या संन्निधानी होते तेव्हां त्यांच्या समक्ष घडलेल्या लीळाही या चरित्रग्रन्थांत आल्या आहेत. अशा तऱ्हेनें हे पांच चरित्रग्रन्थ तयार झाले. व या चरित्राच्या लीळा घोकून पाठ करण्याची प्रवृत्ति या पन्थांत सुरू झाली.

लीळा पाठ करण्याच्या प्रवृत्तीसंबंधानें खालीलप्रमाणें विवरण आहे " एकवेळ : महीभटी : पाचा[3] रूपा लीळांची पोथी लीहीली होती : तीं वरूणि केशो बास लीळा घोकीत होते : ते देखौनि भटी भणितिलें : केशव देया : हे शास्त्र काळाक्षरी[4] घालूनि न घोकावें : काळाक्षरापासूनि वेध[5] बोध नाही : गुरुमुखें : शास्त्र : श्रवणें सबीजता ए : तें कां पा ना : सर्वज्ञें भणितिलें : सर्वज्ञ स्वयंब्रह्म : वीद्या देति : का अधींकरणातें[6] अधीकरूणि देति : । १ । भणौनि : काळाक्षरापासौनि वेधबोध नाहीं : आन : केशो बासी : भटातें : पूसपूसो अवघीया लीळा घोकीलीया : तैसेचि बाइदेव बासी :ः अमुते बाइदेव पंडीती :ः कवीश्वरी :ः अनो बासी :ः नानी नागाइसी :ः पंडीताची हीराइसी :ः ऊपाध्याये कमळाइसी :ः कुमरें रेमाइसी :ः मदळसा : बाइसी : जायेदेव बासी :ः एल्हंभटी :ः वाकुडे दायं बासी :ः भटाते पूसपूसो घोकलीया : "

---

१ प्रत्येक लीळेचें आद्यवाक्य, लीळेचें विषयद्योतक वाक्य. २ माहूर. ३ पांच अवतारांच्या, पांच प्रकारच्या. ४ शाईनें लिहून. ५ ज्ञानप्राप्ति. ६ अधिकारी वर्ग.

प्रस्तुत चरित्रग्रन्थाच्या पोथीचा इतिहास या प्रमाणें लिहिला आहे. "भटी अंतकाळी बाइदेव बासासि पाचारूणि केशो बासाकरवी दंडवत घालवीलें : महीभटी : जे पाचा रूपा लीळेचें पुस्तक लीहीलें होतें; ते भटी केशो बासा करवी आणवीलें : प्रकरणाचें पुस्तक आणवीलें:आपूला हातीं घेऊनि बाइदेव बासाचा हातीं दीधलें:आन:भटी भणितिलें:बाइदेवया हा काळ पर्यंत:सर्वज्ञांचया वृत्ती: मीया सर्वज्ञांचा व्यापारु चालवीला: आता तूंवा चालवावा : मग : पंडीत केशो बास मुख्य करूणि समस्ता गुरुकुंळातें[1] भणितिलें: घाला गा तुम्ही समस्त बाइदेयासी : दंडवत : आता समस्त तुम्ही याचीये आज्ञे अनूज्ञे वर्तावें : मग : समस्ती बाइदेव बासासि : दंडवते घातली : भटांचे देहावसान जालें : मग : बाइदेव पंडीती अवघी तीर्थे नमस्करीली : तीर्थे नमस्करीता : सकळ स्थानें लीहीली : मग भटांउपरि बाइदेव बासाचें ती वर्षा देहावसान जालें : बाइदेव बासा ऊपरि वर्षा एक केशो बासाचें देहावसान जालें : केशो बासाऊपरि सा मासा पंडीताचें देहावसान जालें : पंडीती देहांती लीळाची पोथी कवीश्वराचा हाती दीधली : मग : जे गुरुकूळ ये ते कवीश्वरासि लीळा पूसपूसो घोकी : ॥

याप्रमाणें भटापासून महीभटानें लिहिलेला चरित्र ग्रन्थ क्रमानें बाइदेव बास, केसो बास, पंडीत इत्यादिकांच्या हातून शेवटीं कवीश्वर बास यांच्या हातीं आला. त्यानन्तर या चरित्रग्रन्थाचें काय झालें तें पुढील उताऱ्यांत सांगितलें आहे. " ऐसें असता दीलीचेनि[2] सुलतानें चालि केली: तेणें राजीक भेणें कवीश्वर कोकणा गेले : कमळाइसें वाल्हा राहीली : अनो बास झाडी[3] मंडळातु सीरपूरासि गेले : दंत्ते गोपाळ बास ते कोकणा न वचतीचि : ते घाटमाथाचि राहीले : कवीश्वर कोकणा जाता मार्गी चोर उठीले : तेही कोकणींचा घाट ऊतरता समस्त गुरुकूळ नागवीलें : पोथीयाची झोळी परसराम बासापासी होती : त्यांतूनि परसराम बासी एक पुस्तक काढीलें : ते भोइवरि तनात गाळीलें[4] : एर जवं गाळावी तंव एणें चोरें परसराम बासाचिये हातीची झोळी आसडूनि नेली : त्यांत आदी सहीत पाच रूपें चरीत्रें प्रकरणाची पोथी स्थानाची पोथी इतूकें गेले : मग : कवीश्वर कोकणांत गेले : राजक सामलें : देशी सुभैक्ष जालें :

१ पंथांतील लोक. २ दिल्लीचा बादशहा (खिलजी घराण्यांतील). ३ नागपूर कडील झाडी प्रांत. ४ गवतांत लपविलें.

मग : मागौते गंगातीरासि आले : जें पुस्तक वाचलें होतें : तेथ रत्नमाला स्तोत्र : ज्ञानभास्कर स्तोत्र : ज्ञानकलानिधी स्तोत्र : नरवीलाप स्तोत्र : नरींद्र कवीचें रुक्मीणी सैवर : पंडीताचें वत्साहरण : सीसूपाळ वध : एकादश स्कंध : इतुके तीये पूस्तकी होतें : मग : स्थीर जालेया नंतरें : अनो बास : कमळाइसें : कवीश्वर बास : यासी परस्परें भेटि जालि : xxx : मग काळांतरें : कवीश्वरासि देहावसान जालें : मग रामेश्वरबा अनो बासा पासि आले : xxxx : मग अनो बासापासूनि रामेश्वर बासासि अर्थसीद्धी जाली : मग तेतूलेया एका काळा अनो बासाचे देहावसान जालें :।: "

या प्रमाणें महींद्रभटानें पांच रूपा चरित्राची पोथी लिहिली होती ती गहाळ झाली याचा वृत्तांत आहे. परंतु हल्लीं प्रचारांत महींद्रकृत लीला चरित्र म्हणून प्रसिद्ध आहे एवढेंच नव्हे पण त्याचे निरनिराळे तेरा पाठ आहेत म्हणून महानुभाव पंथांत प्रसिद्ध आहे. तरी तो चरित्रग्रन्थ कसा निर्माण झाला व हे निरनिराळे पाठ कसे झाले याबद्दल ही प्रस्तुत हस्त लिखित पोथीमध्यें खालीलप्रमाणें उल्लेख आहे. " थोरलें पुस्तक गेलेंया नंतरें गुरुकुळांत आदी सहीत लीळाचें तेरा पाठ जाले : अनोबाची सीक्ष्य[1] हीरांबीका : ते ही अनो बासापासूनि लीळा घोकीलीया होतीया : मग हीराइसापासूनि त्याचा सीक्ष्यी हरी बासी घोकीलीया होतीया : मग हरी बासी जया जया भीक्षुकासि लीळाचा घोक होता : तया तया मान- लेंया तिया लीळा पूसीलीया : त्या त्या [2]वासना आन : हीराइसापासूनि घोकीला जो घोक : ऐसें याचें अन्वयी लावूनि पुस्तक केलें : तो **हीरांबा पाठ** : ॥ १ ॥ अनो बासाचे सीक्ष्य नागनाथ बास : तेही अनो बासा पासूनि लीळा घोकीलीया होतीया : तेही आपूलेया सीक्ष्यासि कवि मालो बासासि घोकवीलीया : मग मालो बासी आणीका मानलेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि अपुलेंया घोकेंसी अन्वयी पाहूनि पुस्तक केलें : तो **नाग नाथ पाठ** : ॥ २ ॥ अनो बासाचे सीक्ष्य हीरण्यगर्भ : तेही अनो बासा पासूनि लीळा घोकीलीया होतीया : तेही आपूलेंया सीक्ष्यासी चक्रपाणी भटासि घोकवीलीया : चक्रपाणी भटाचे सीक्ष्य : एकदेव पंडीत : तयासी : तेही लीळा घोकवीलीया : मग एकदेव पंडीती आणीका वासनेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयी पाहूनि पूस्तक केलें : तो

१ शिष्या. २ भेद, फरक, मत.

चक्रपाणी पाठ : ॥ ३ ॥ कवीश्वराचे सीक्ष्य रामेश्वर बास : तेही कवीश्वरा पासूनि लीळा घोकीलीया : आन : अनो बासापासूनि लीळा घोकीलीया होतीया : तेही आपूलेया सीक्ष्यासि गोपाळ बासासि घोकवीलीया : आन : गोपाळबासी आणीका वासनेंया आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपूलेया घोकेंसी अन्वयी पाहूनि पुस्तक केलें : तो **रामेश्वरबा पाठ** : ॥ ४ ॥ कवीश्वराचे सीक्ष्य परसराम बास : तेहीं कवीश्वरापासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलेया सीक्ष्यासि पेटे हरी बासासि घोकवीलीया : मग पेटे हरि बासीं आणीका वासनेंया आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपुलेया घोकेंसी अन्वयी पाहूनि पुस्तक केलें तो **परसराम पाठ** : ॥ ५ ॥ कवीश्वर बासाची धाडी नागाइसें : प्रज्ञावंते सीक्ष्येही होति : तेही कवीश्वरापासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलेया सीक्ष्यासी : मुनी राघो बासासि घोकवीलीया : मूनी राघो बासी आपूलेंया सीक्ष्या मेयां बासासि घोकवींलीया : मेयां बासी आणीका वासनेंया आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयी पाहूनि पूस्तक केलें तो **मूनीबा पाठ** : ॥ ६ ॥ मूनी राघो बासाचे सीक्ष्य नवगीऱ्हे रामदेव मूनी : तेही पूस्तक लीहीलें तोही भीन्न पाठ :॥: तीये पाठी क्षेपक नीरूपणें पडीली असे : तो **मूनीबा पाठ** : तोचि **बाइंबा पाठ** : ॥ ७ ॥ मद्ळसा बाइसें तीये भटाची सीक्ष्ये : तेही भटापासूनि लीळा घोकीलीया होतीया : तेही आपूलेंया सीक्ष्यासि वामदेव पंडीतासि घोकवीलीया होतीया : वामदेव पंडीती आणीका वासनेंया आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयी पाहूनि पूस्तक केलें : **तो मद्ळसा पाठ** : ॥ ८ ॥ भटांचे सीक्ष्य जायेदेव पंडीत : तेही भटापासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलेंया सीक्ष्या नृसींहदेव पंडितासि घोकवीलीया : नृसींह देव पंडीती आणीका वासनें या आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपूलीया घोकेंसी अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : **तो जायेदेव पाठ** : ॥ ९ ॥ जारवदेव पंडीत ते भटाचे सीक्ष्ये : तेही भटांपासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलेया सीक्ष्या नरहरी बासासि घोकवीलीया: नरहरी बासी आणीका वासनेंया आचार्याची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसि अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : **तो जारवोबा पाठ** : ॥ १० ॥ एल्हंभट ते भटाचे सीक्ष्य : तेही भटापासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलेंया सीक्ष्यासी बैजदेव मूनीसी

घोकवीलीया : वैजदेव मूनी बासी आणीका मानलेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : तो **एल्होबा पाठ** : ॥ ११ ॥ पंडीताची ब्राह्मणी हीराइसे : तेही भटापासूनि लीळा घोकीलीया : तेही आपूलया पुत्रासी महेश्वर पंडीतासि घोकवीलीया : महेश्वर पंडीत ते बाइदेव बासाचे सीक्ष्य : महेश्वर पंडीती आणीका वासनेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : **तो हिराइ पाठ** : ॥ १२ ॥ कूपरें रेवाइसें तीये भटांची सीक्ष्ये : तेही भटांपासूनि लीळा घोकीलीया : त्याची महादाइसें त्याचे मूनी कमळो बास : रेवाइसी मूनी कमळो बासासि घोकवीलीया : मुनी कमळो बासी आणीका वासनेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : **तो कुमार पाठ** : ॥ १३ ॥ भटांचे सीक्ष्ये उपाध्ये : त्याचे सीक्ष्ये कमळाइसे : तेहीं भटापासूनि लीळा घोकीलीया : पंढीत केशो बासा पासूनि नातीं नागाइसापासूनि लीळा घोकीलीया : कमळाइसी आपूलेंया सीक्ष्यासि अनंतदेव पंडीतासी घोकवीलीया : अनंतदेव पंडीतीं आणीका वासनेंया आचार्यांची वासनांतरें मेळवूनि आपूलेंया घोकेंसी अन्वयो पाहूनि पूस्तक केलें : तो **अम्नाय पाठ** : ॥ १४ ॥ कमळाइसाची सीक्षे हीराइसें : तेहीं कमळाइसापासूनि लीळा घोकीलीया : हीराइसी आपूलेया सीक्ष्यासी पाटकूले माळो बासासी सांघीतलीया : तेहीं लीळा लीहीलीया : त्यातेंही **हीराई पाठ** ऐसें भणति : ॥ १५ ॥ ऐसें थोरलें पूस्तक गेलेंया नंतरें मूखीचेनि घोकें लीळेसी तेरा अन्वयो जाले : तेरा अन्वयोकारा वेगळे आनीक लीळेचे पाठ :।: तेचि आइदेव बा :।: धाकूटे भाइदेव बा :।: काइदाये :।: बाल्हदाये :।: लिंगदेव बा :।: गोपाळ बा :।: मेयां बा :।: रायदेव मूनी :।: मुरारी बा :।: धाकूटे लक्ष्मीधर बा :।: पेटे हरी बास :।: दायं बास :।: रूपदेव बास :।: मेइ देव बा :।: बोचरी धानाइसे :।: धायाळें लुखाइसें :।: कानडी लूखाइसें :।: नामाइसें :।: लाखाइसें :।: नागाइसें :।: लुखाइसें :।: ळळीताइसें :।: धानाइसें : आन : शोधकार ओंकार बास : आन : भटांमागें भटाचया सीक्ष्याची नावें नाही आली : त्याची वासनांतरें : जया जया गुरुकूळासि आली : तयाची ओळखी एक भणिजे : एकी वासना ऐसी जाणिजे : ”

याप्रमाणें लीळाचरित्रांच्या भिन्न भिन्न पाठांचा एवढा प्रपंच आहे. त्यासंबंधानें इतिहास म्हणून विभाग लिहिणारा लेखक त्या भिन्न भिन्न पाठां-संबंधानें म्हणतो "भटां पासूनि समस्तें गुरुकुळीं लीळा घोकीलीया : तीया एकी समस्ता धरीलीया : एकी न धरतीचि : एक मूळ प्रती तीचे बोल विस-रले : परि : चरित्राचा भाव आठवत होता : त्या भावानुरूप आपूले बोल घालूनि चरीत्रें नीरोपीत : एका आठवत होते तेचि बोलीले : एक न बोल-तीचि : एकी चरीत्राचें व्याख्यान आइकीले : तेही चरीत्राचे व्याख्यान मीश्रीत बोलीली : एकी चरीत्रांतूल श्रीमुखीचे शब्द तेतूकेंचि धरीले : एका श्रीमूखीचे शब्द नाठवेत : भाव आठवत होता : ते ही श्रीमूखावरि घालूनि आपूले बोल कल्पीले : एकी जो श्रीमूख वचनाचा गुरुमुखें अर्थ आईकिला : तो हीं श्रीमुखोक्तचि : भणौनि मानीला : तो तेही चरीत्री लीहीला : एक नव गीऱ्हे रामदेव मूनी एवमादीक होते : ते ही श्रीमूखाचे मीषें स्वकपोल कल्पीत चरीत्रें केली : एकी परस्परें वीवादता आपुलीये अर्थसीद्धी लागी श्रीमूखावरि घालूनि चरीत्री स्वकल्पीत बोल लीहीले : एकें जे आपूलेंया बूझा[1] न मीळे ते ही श्रीमूखीचें गाळीलें : एकी पालटीलें : ऐसें पुरुषाचेनि बुद्धीदोषें : आन : अभी मानें लीळासि वासनांतरें जाती : भटांमागें तीसरें अधीष्टान[2] तयाची जे वासना ते मार्गरुढि :"

वरील विवरणावरून लीळाचरित्राचे अनेक पाठ निर्माण झाले आहेत हें दिसून येईल. त्यामध्यें भटांचे शिष्यांनीं आणि कवीश्वरांच्या शिष्यांनीं जे पाठ निर्माण केले त्यांना विशेष महत्त्व आहे. लीळाचरित्राचें संपादन करतांना वरील पाठच मुख्यतः आधारास घेतले आहेत. खास महींद्र भटानें लिहिलेली चरित्राची मूळ पोथी जरी उपलब्ध नाहीं तरी खास त्या पोथीवरून आणि नागदेवाचार्यांच्या देखरेखीखालीं ज्यांनीं लीळा पाठ केल्या त्यांनीं अथवा त्यांच्या शिष्यांनीं नागदेवाचार्यांच्या मागें २५।३० वर्षांतच हे पाठ निर्माण केले असल्यामुळें ते विश्वसनीय म्हणून म्हणा-वयास हरकत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, निरनिराळ्या पाठांमध्यें लीळांची संख्या भिन्न भिन्न असल्यामुळें पाठीमागून झालेल्या पाठांतील नवीन लीळांच्या सत्यासत्यतेची छाननी करण्याचें जबाबदारीचें काम संपादकां-वर येऊन पडलें आहे.

१ समज, माहिती. २ आचार्यांची पिढी.

पांच अवतारांचीं चरित्रें या ग्रन्थांत आलीं आहेत त्यांत श्रीकृष्ण आणि श्रीदत्तात्रय हे अवतार पौराणिक कालांतील असून प्रसिद्ध आहेत. श्रीचक्रधरांनीं वेळोवेळीं या अवताराच्या लीळा आपल्या शिष्यांना सांगितल्या त्या यांत ग्रथित आहेत. श्री चक्रपाणी, श्री गोविंद प्रभु आणि श्री चक्रधर हे अवतार जवळजवळ समकालीन असून अगदीं अलीकडचे म्हणजे चालुक्य आणि यादव राजवटीच्या सुमारास झाले आहेत. गोमतीच्या वाळवंटांत श्रीचक्रपाणीची भेट श्रीगोविंदप्रभूला झाली असून त्यांना श्री चक्रपाणी पासून अनुग्रह मिळाला. द्वारावती येथें चक्रपाणीचें गुहेंमध्यें निर्वाण झाल्याबरोबर भरवस (भडोच) येथें प्रधानपुत्राच्या मृत देहामध्यें प्रवेश करून चक्रधराच्या अवतारकार्यास सुरवात झाली. ऋद्धिपूर येथें श्री गोविंद प्रभूचा श्री चक्रधरस्वामींस अनुग्रह झाला असून त्यांनींच चक्रधर असें नांव ठेविलें. या पांचही अवतारांची लीळारूप चरित्रें आज माझ्याजवळ आहेत. लीळाचरित्राचा एकांक नांवानें प्रसिद्ध असलेला भाग संपादावयास घेतला आहे. गोविंदप्रभूच्या चरित्रांतील कांहीं उतारे श्री ऋद्धिपूर वर्णन या काव्यग्रंथांत परिशिष्टरूपानें दिले आहेत. श्री चक्रपाणीचरित्र अद्याप महाराष्ट्रभाषभिमान्यांच्यापुढें आलें नाहीं. तें लवकरच सादर करण्याचा विचार आहे. त्या चरित्राची प्रेस–कापी तयार आहे.

श्री चक्रपाणी चरित्राचा आरंभ असा आहे " सर्वज्ञासी प्रतीष्ठानी गणपति मठी महादाईसी पुसिलें : जी श्री चक्रपाणी राउळी कवणी ठाइ अवतार स्वीकरिला : सर्वज्ञें भणितिळें : बाइ : सर्वज्ञातें जीवांतें उद्धरावयाचीया प्रवृत्तिःधरातळी पूना[१] चाकणा[२] प्रदेशी फलेठाण[३] गावोःतेथ कऱ्हाडेया ब्राह्मणाचा घरी शक्ती रहीत ऊभय शक्ती अवतार स्वीकरिला :।: तो गर्भीचा अवतारः चक्रपाणी राउळ ऐसें नाम स्वीकरिलें:।: जनक नायेक पीताःजनकाइसें माताः श्रीचक्रपाणी राउळी फलेठाणी कीतीएक दीवस राज्य केलें : मग[४] सैह्याद्रीसि बीजें केलें :।: तेथौनि द्वारावतीयेसि बीजें केलें:।:" या चरित्रांत पुरंदर पर्वताच्या तळवटी फलटण नगरांत जनक नायक ब्राह्मण असे त्याचा पुण्याशीं व्यापार असे. जनकनायकाच्या पत्नीचे माहेर चाकणला होतें. जनकाईला पुत्र नव्हता म्हणून चाकणला चक्रपाणी नांवाची

१ पुणें, २ चाकण, ३ फलटण, ४ सिंहाद्री–माहूर येथील एका पहाडाचें (पर्वताचें नांव)

देवता होती. तिला नवस केला कीं, पुत्र झाल्यास त्याचें चक्रपाणी नांव ठेवूं. " पूणा नदीचा तीरी विख्यात चांगदेव नांवाची देवता होती तिलाहि जनक नायकांनीं नवस केला कीं, पुत्र झाल्यास चांगदेव नांव ठेवूं. या कारणामुळें जनक नायकाच्या मुलाचीं चक्रपाणी आणि चांगदेव हीं नांवें पडलीं. चक्रपाणीचें चाकणलाच तेराव्या वर्षी लग्न झालें. संसार करून नंतर मग माहूरला जाऊन श्रीदत्तात्रयाचें दर्शन घेतलें. संसाराचा त्याग करून गोमतीच्या तीरीं द्वारावतीस राहिले. अनेक चमत्कार करून व अनेक जीवांचा उद्धार करून शेवटीं कामाख्या नांवाच्या एलिचपूर येथील एका योगिनी वेश्येचें कथानक चरित्रांत येऊन श्रीचक्रपाणी अवताराची समाप्ती झाली. असा या चरित्रग्रन्थाचा त्रोटक सारांश आहे.

या चरित्रग्रन्थाची भाषा तत्कालीन म्हणजे तेराव्या शतकांतली आहे. याच चरित्रग्रंन्थांतील श्री चक्रधरस्वामीचीं वचनें निवडून सूत्रपाठ नांवाचा ग्रन्थ केशव व्यास यांनीं तयार केला आहे. तत्कालीन भाषा, तत्कालीन सामाजिक आणि ऐतिहासिक वगैरे अनेक बाबीवर चरित्रग्रंथांमुळें प्रकाश पडत आहे. त्या संबंधाचें विवेचन त्या त्या ग्रन्थांचें प्रकाशन होईल त्या वेळीं यथामति देण्याचें अभिवचन देऊन चरित्रग्रन्थांच्या उत्पत्तीसंबंधानें महानुभावांच्या प्राचीन ग्रन्थांच्या आधारानें केलेलें विवेचन पूर्ण करतों.

---

९ कौंढणपूर येथील शंभर वर्षांपूर्वींचें चलन*

(प्रो. वा. गो. काळे.)

गेल्या संमेलनप्रसंगीं, मौजे कौंढणपूर येथील शंभर वर्षांपूर्वींच्या गांवाच्या जमाबंदीसंबंधाच्या उपलब्ध झालेल्या कागदांत कोणत्या प्रकारची अत्यंत उपयुक्त अशी माहिती आहे त्याचें दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें मीं एक टांचण वाचलें होतें. सदरहु कागदांत अनेक प्रकारच्या झाडयांचा टिपांचा, चिठ्यांचा व खर्ड्यांचा भरणा आहे. त्यांपैकीं " तहसील " व " पोते–भरणा " ह्या नांवाचे कांहीं कागद आहेत व त्यांमध्यें गांवाचा क्रमाक्रमानें झालेला वसूल आणि त्याचा सरकारी तिजोरींत केलेला भरणा

---

* २२ वा वाढदिवस.

याचा हिशेब दिलेला आहे. असल्या प्रकारच्या कागदांत पोतेभरणा करतांना कोणत्या जातीचीं नाणीं जमा झालेल्या पैशांत होतीं व तीं पूर्ण किमतीचीं नसल्यामुळें त्यांबद्दल बट्टा किती घ्यावा लागला ह्याचा उल्लेख नेहमीं असतो. त्याविषयीं प्रस्तुत टांचणांत थोडीशी माहिती द्यावयाची आहे.

मराठेशाहींत व पुढें कंपनी सरकारचा रुपया एकमेवाद्वितीयम् ह्याप्रमाणें सर्वत्र चालू होईपर्यंत कित्येक वर्षें हिंदुस्थानांत अनेक प्रकारचे म्हणजे निरनिराळ्या टांकसाळींत पाडलेले रुपये व्यवहारांत वापरले जात असत. त्यांमध्यें, खरीं खोटीं, कमी जास्त वजनाचीं, सरभेसळीचीं असलीं नाणीं देवघेवींत आल्याकारणानें तीं सोनाराकडून वजन करून आणि पारखून घ्यावीं लागत, आणि ह्या कामीं बट्टा देण्याची जरूर पडत असे. सरकार देण्यांत हिणकस किंवा खोटीं नाणीं जमा झाल्यास त्यापासून होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याकरितां लोकांकडून एकप्रकारचा कर घेत असत, हें मीं मागें सांगितलेंच आहे. न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या " मराठी राज्यांतील टांकसाळी " ह्या लेखांत व नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या रावसाहेब ना. गो. चापेकर ह्यांच्या ' पैसा ' पुस्तकांत महाराष्ट्रांत चालू असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या रुपयांची यादी दिलेली आहे. त्यावरून चलन वैचित्र्यामुळें व्यवहारांत किती घोंटाळा व गैरसोय होत असली पाहिजे ह्याची सहज कल्पना येईल. अशा प्रकारचा नाण्यांच्या किंमतीचा गोंधळ सर्व देशांच्या चलनाच्या इतिहासांत कमी अधिक प्रमाणांत पहावयास सांपडतो. असो.

कोंढणपूरच्या वसूलाचा भरणा होतांना तीन प्रकारचे रुपये मुख्यत्वेंकरून त्यांत आढळतात व त्यांचें वर्णन " छापी, " " भातोडी " व व " कुलाबा " ह्या नांवांनीं केलेलें आहे. ह्या नाण्यांस निरनिराळ्या दराचा बट्टा आकारलेला आहे. कांहीं रुपये तर सरकार पोत्यांतून न स्वीकारले गेल्यामुळें अजीबात परत आले आहेत व हा प्रकार नेहमीं घडत होता असें दिसतें. इ. स. १८२५ च्या एका कागदांत ऐवज भरण्याचा हिशेब खालीं दिल्याप्रमाणें आहे: —" घोंडनाक महार मारफित आो रुपये ६२ पैकीं वजा परत ५; बाकी ५७ "

२९॥०॥...	...	छापी	३०	...	...	।≡॥
२५।- ...	...	कुलाबा	२७	...	...	॥≡
५४॥-॥			५७			२८=॥

त्याच वर्षाच्या दुसऱ्या एका कागदांत खालीलप्रमाणें हिशेब आहे:—

	छापी	
५४८=।...	... ५५	।।।-।।।
	भांतोडी	
२१।- ...	... २२	।।≡
	कुलाबा	
२१।।-...	... २३	१।≡
९७८।	१००	२।।।≡।।।

भरण्यामध्यें निरनिराळ्या जातींचीं व कसांचीं नाणीं ज्या प्रमाणांत असतील त्या मानानें शेंकडा २ ते ५ पर्यंत बट्टा पडलेला दिसतो. वरील तीन प्रकारच्या रुपयांशिवाय " बेलापुरी " रुपयाचा उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतो व एका ठिकाणीं " कमळगडी " रुपयाचा उल्लेख आलेला आहे, " रुपये तांब्याचे म्हणून परत " असा तपशील कित्येक ठिकाणीं आहे. एका कागदांत १८ रुपये भरणा झाला त्याचा तपशील एणेंप्रमाणें दिला आहे:— " पोता भरणा रवाना येसजी मुजमला रु. २० पैकी परत कमळगडी २; बाकी पटले."

नाण्यांच्या कसाच्या मानानें " निर्मळ " " मध्यम " व " नरम " असें रुपयांचें वर्गीकरण करण्यांत येत असे. खालील उदाहरणें नमुन्या दाखल देत आहें:—

" मौजे कोंढणपूर माहे अगटंबर सरकारांत भरणा केला ते बद्दल दाखला कीर्दीचा

७२ ता २० गु।। काळू सोनार रु ७५।। पैकीं वजा ता सोनार

१ रोख परत तांब्याचा

१ बेलापुरीचे बट्ट्यास रु. कमी

बाकी ७३।। रुपये

पैकीं वजा बट्टा

८।। मध्यम ४	·।।।·।। भातोडी २५
।।≡ नरम ४४	खुर्दा ·।।·
।।≡।।	·।।।·।।

१।।

बाकी रुपये ७२

ता. २० डिशंबर ।।। काळी सोनार व विठोजी पा. रु. ११६

१० निर्मळ	७॥७५	मध्यम ८	बट्टा ८२५
२ खुर्दा	५४।	भातोडी ५६	बट्टा १॥।
	३९।५०	नरम ४०	बट्टा ।॥५०
१२	१०१॥२५		२।७५

पुण्यापासून ५।६ कोसांच्या अंतरावर असलेल्या कोंढणपुरांत तीन चार प्रकारचेच रुपये आढळतात. रुपयांचे दुसरे प्रकार दिसून येत नाहींत हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. हें गांव प्रसिद्ध यात्रेचें एक स्थान आहे; ह्या मुळें अन्यजातीचे रुपये तेथें आढळावे अशी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे.

---

१० महानुभाव व बालबोधकर्ते त्रिंबकराज*

(प्रो. द. वा. पोतदार)

महानुभावी वाङ्‌मयाचें अलौकिक महत्त्व आतां सर्वमान्य झालेलें आहे. महाराष्ट्रांतील सनातनी वैदिक मंडळांत या पंथास विरोधी भावना असणें साहाजिकच आहे. नाथांच्या अभंगांतील असले विरोधी उद्गार श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं मंडळापुढें मांडले होते. महानुभावी वाङ्‌मय प्रत्यक्ष अभ्यासून ही विरोधी भावना व मत बनलें असावें असें विशेषसें दिसत नाहीं. विकाराचा त्यांत बराच भाग असावा.

नाथांच्या लगतच्या पूर्वीच्या काळांत **त्र्यंबकराजांच्या** बालबोधा सारखा नामांकित ग्रंथ दुसरा क्वचितच असेल. बालबोध हा एक अपूर्व नमुन्याचा ग्रंथ आहे. ग्रंथकर्त्याची विद्वता विशेष आहे. अनेक ग्रंथ, महावाक्यें वगैरेंचे उल्लेख या ग्रंथाइतकें अन्यत्र विरळाच सांपडतील. या ग्रंथाचें वैशिष्ट्य विविध प्रकारचें आहे. त्यांत एक प्रकार असा म्हणतां येईल कीं, त्यांत अनेक असंमत मतांचा केलेला विचार हा होय. अशा मतांत एके ठिकाणीं महानुभावांच्या मतांचा निर्देश करून त्यास विरोध

* २० वें संमेलन

दर्शविला आहे. या उल्लेखाकडे कोणाचें लक्ष्य गेलेलें दिसून न आल्यावरून आज हें टिपण लिहिलें आहे.

बालबोधाच्या पूर्वखण्डांत पुढील उल्लेख (पृ. १७६ । ७७) आहे. जीव प्रपचुं देवता आन । यासी ईश्वरु असे भीन्न । ये नित्य अैसें वचन । स्थापिलें तेहीं ॥ २६ ॥ जरी हा भेदु प्रमाण । तरी यासी मूळ ते कवण । हें प्रबुधाचें नित्य समान । परस्परें असे ॥ २७ ॥ ते ईश्वरीं सदा भिन्न । या लागी भाक्तिधर्मु अप्रमाण । प्रबुधाचें लोचन । देखतीं अैसें ॥ २८ ॥ जो सच्चिदानंद-पर । तें तो प्रत्यक्ष निराकार । तेथ घेती अवतार । आपाइते ॥ २९ ॥ चैत-न्यापर तो देहमुर्त्ति । त्याचा मागमोडी धावती । तत्वरहित ते म्हणती । पंच अवतार देव ॥३०॥ **लीळाचरित्र** सामर्थ्ये सर्व । अैसें वर्त्तती ते देव ! हें म्हणों तरी दानव । कोणें सामर्थ्यें उणें ॥३१॥ लीळा पीशाचे का बाळे । ऋषीचरीत्रें आगळे । ऐणें बोले नाडळे । पूर्ण देवपणपणें तें ॥ ३२ ॥ मूळामा काखे घालुनि नरीं । चोरुनि विकावा घरोघरी । तेणें अभोळ नरनारीं । नाडती चि तो ॥ ३३ ॥ ते आणू नये चोहटां । दूषण पावे नानवटा । अैसें या मतां कपटा । घेऊं नये ॥ ३४ ॥ कांनफुकीाचिं उत्तरें । तें आहाचें असारें । कां पूर्ण ब्रह्म तें अपुरें । अैसें नव्हे ॥ ३५ ॥ बोलीजे हळुवा गोष्टी । कां यक्रांति दाविजे दृष्टी । तेणे प्रपंचीकु संतुष्टी ॥ प्रबुधा सीणु ॥ ३६ ॥ ॥ इति भटमार्गु ॥ ६४ ॥

पृ. १७० वर " यास्तव कपाळी शैव शाभव । आणिकही महानु-भाव । येही सर्वांपरी सर्व । मन प्रतिष्ठिलें ॥ ५४ ॥ " असा उल्लेख आहे. त्यांतील 'महानुभाव' शब्द तन्नामधारक पंथाचा वाचक होय हें उघड आहे. कापालिकांच्या जोडीला महानुभावांस येथें बसविलें आहे. तसेंच पृ. २३० वरील वर आणखी एक उल्लेख आहे. " स्वरुप ज्ञानि अैसे नर । जे घेती देवदेवाचे अवतार । लिळा चरित्र निरंतर ! प्रिये तया ॥ ११ ॥ " (बालबोध) तोहि महानुभवपंथीयांस किंवा भटमार्गीयांस अनुलक्षून असावा असें वाटतें.

या ठिकाणीं **लीळाचरित्राचा** जो उल्लेख आहे तो त्या नांवाच्या महानुभावी ग्रंथाचाच असावा हें उघड दिसतें. आणि मग त्र्यंबकराज ज्याला 'भटमार्गु' म्हणतो आणि पृ. १७० वर ज्यांस महानुभाव म्हणून कापालिकांसमवेत गणतो त्या दोहोंत तो ऐक्यच कल्पीत आहे, असेंहि दिसून येतें.

आपला पंथ व संप्रदाय बालबोधकर्त्यांनीं जो सांगितला आहे तें वर्णन मोठें कौतुकावह आहे. (पहा बालबोध पृ. २०९,२३५ वगैरे)

" भटमार्गु " असा शब्द महानुभाव पंथीयास लावलेला कै. गो. का. चांदोरकर यांनीं १८३५ च्या इतिवृत्तांत ' मानभवोत्पत्ति कथा ' म्हणून जें टिपण प्रसिद्ध केलें आहे त्यांत आहे. शके १२५५ त " भटमार्गु " जाला वगैरे माहिती वरील टिपणांत आहे. अलीकडे जी माहिती महानुभाव पंथाविषयीं पुढें आली आहे, ती पाहतां महानुभावांच्या संबंधीं वरील रा. चांदोरकर यांच्या टिपणांतील लिहिणें यथार्थ वाटत नाहीं. एकतर्फी दिसतें. महानुभाव ग्रंथ शके १२५५ च्या पूर्वीचे निःसंशय वाटतात. तसेंच मातंग पंथ म्हणून जो निंदिला आहे तसा एक हीन पंथ निराळाच आहे व त्याचा एक मठ आपण नगर जिल्ह्यांत पाहिला असें डॉ. मॅक्निकल यांनीं मला सांगितलें होतें. तें कसेंहि असो, महानुभावांच्यावर सनातनीयांचा कटाक्ष बहुधा वर्णव्यवस्थेबाबतच्या महानुभावांच्या मतावरून व वर्तनावरून असण्याचा बराच संभव आहे. नाथपंत व महानुभव पंथ यांचा पक्का विरोध अगदीं प्रथमपासून असावा असें दिसतें. महाराष्ट्रांतील नाथपंथी ज्ञानेश्वरासारखे सत्पुरुष वैदिक मंडळांतच समाविष्ट झालेले आहेत. तसे महानुभावांचे झालेले दिसत नाहींत. साहाजिकच आहे कीं नाथपंथाविषयीं व वैदिक परंपरेविषयीं कडक अभिमान धारण करणाऱ्या त्र्यंबकराजांनीं महानुभावी पंथास "भटमार्गु" असें संबोधून चांदोरकरांनीं प्रसिद्ध केलेल्या जुन्या टिपणांतील मानभव विरोधी मताशी मिळतें असें मत प्रगट करावें !

त्र्यंबकराजांनीं ' भटमार्गु ' म्हणून जीं मतें दर्शविलीं आहेत तीं कितपत बरोबर आहेत हें महानुभावांच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांची अधिक माहिती झाल्याशिवाय नीटसें सांगतां येणार नाहीं.

श्रीचक्रधरांचीं सिद्धान्तसूत्रें रा. भवाळकर यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत त्यांत पृ. ३४ वर पुढील उतारा आढळतो.

" एकु नित्यवर्ग : " एकु अनित्य वर्ग—" तीनीं स्वरुपें नित्यें। जीवाचें : देवताचें : ईश्वरीचें : तै भेद कैसा । ना : नीत्यत्वें भेदु तिहीसि नाहीं। जैसा देहींची पींडस्थीं रायारंका सरी : ब्राह्मणा महारा सरी : तैसा ठावो की " इत्यादि.

हा उतारा वाचून बाळबोधांतील वर्णनास कांहीं प्रामाण्य मिळण्या सारखें आहे असें वाटतें.

बाळबोध ग्रंथ शके १४९४ ते १५०२ या काळांत झाला. यावेळीं महानुभावी मतांविषयीं अथवा भट्टमार्गाविषयीं कसा विरोध होता हें या टिपणावरून ध्यानांत येईल.

---

११ मंडळवृत्त.

२१ वा वाढदिवस समारंभ.

पूर्वीं जाहीर केल्याप्रमाणें मंडळाचा २२ वा वाढदिवस मंडळमंदिरांत आषाढ शुद्ध १ शके १८५४ (इ. १९३२ जुलै ४) सोमवारीं सकाळ दुपार साजरा होऊन पार पडला. त्या प्रसंगीं उपस्थित असलेले सभासद् व पाहुणे येणें प्रमाणें

श्री. गी. भि. नरे, प्रो. मावळंकर, श्री. गो. अ. मोडक, श्री. कीर्तने, श्री. मरकळे, श्री. दत्तोपंत मरकळे, श्री. घाटे इंजिनियर, श्री. चिं. वि. देशपांडे, प्रो. वामनराव गोडबोले, प्रो.चिं.ब.जोशी, श्री. कोराण्णे, डॉ. केळकर, श्री. भावे, श्री. बाबासो पटवर्धन, श्री. द्वि. वि. काळे, श्री. वा. सि. बेंद्रे, श्री. र. चिं. सोहनी, श्री. इनामदार, श्री. रा.सा. बाबासो देशपांडे, श्री.वि. वि. देशपांडे, श्री. शं. ना. जोशी, प्रो. वा. गो. काळे, प्रो. द. वा. पोतदार, श्री. सरदार आबासो मुजुमदार, श्री. पां. के. शिराळकर, श्री. द. व. फुलगांवकर, श्री. वि. म. कोल्हटकर, श्री. एस्. आर.तारकुंडे, श्री. सरदार तात्यासो मेहेंदळे, श्री. स. ग. जोशी, प्रो. श्री. व्यं. पुणतांबेकर, श्री. रा. वा. मोडक, श्री. भा. रा. गांधी, श्री. नानासो वैद्य, श्री. द. वि. आपटे, श्री. कृ. पां कुळकर्णी, श्री, ग. ह. खरे, श्री. द. ना. देवधर, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. ग. वि. देवधर, श्री. द. रा. लिमये, श्री रा. वि. पटवर्धन, श्री. मा. ह. घोरपडे, बॅरिस्टर गो. का. गाडगीळ, श्री. टी. रघुनाथ ठकार, प्रो. स. कृ. पिंपळखरे, श्री. वि. ज. दातार, श्री. रा. शं. दीक्षित, श्री. अ. वा. फडणीस, श्री. तात्यासो केळकर, श्री. एल. जी. गोखले. श्री. कृ. बि.

फाटक, श्री. कृ. गो. पुंडलीक, श्री. सरदार पटवर्धन शास्त्री, श्री. वि. मो. भट, रावसाहेब टी. नारायण स्वामी पिल्ले, श्री. म. ग. खोले, श्री. वाईकर केसरी कचेरी, श्री. वि. गं. लेले, प्रो. शं. दा. पेंडसे, श्री. शं. ल. वैद्य, प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर, श्री. शं. द. देवधर, श्री. ग. ह. ओक. इत्यादि

प्रारंभीं चौघड्याचें मंगलवादन झाल्यावर अध्यक्ष श्री. नानासाो वैद्य सभ्यांचें स्वागत करून म्हणाले ' आपण थोडे असलां तरी इतिहास-प्रेमी आहां. मंडळ जरी हल्लीं स्वतःच्या जागेंत असलें तरी कर्जांत आहे. प्रो. पोतदार व श्री. बाबासाो देशपांडे यांच्यासारखीं माणसें बाहेर पडतील तर हें कर्ज एका वर्षांत फिटून जाईल. ते बाहेर निघाले असेंही दिसेल. सध्यां शिवचरित्रकार्यालयाचें काम धीमेधीमे चाललें आहे. आज आपणास पेशवेदप्तराकडे लक्ष द्यावयाचें आहे. त्याविषयींचा ठराव आज आपणापुढें येईल. प्रत्येक राष्ट्रास दप्तर पाहिजे. कौटिल्याच्या अर्थ-शास्त्रांत दप्तराची माहिती आहे. अशोकाचें दप्तर म्हणजे त्याचे लेख. नंतर ताम्रपत्रें प्रचारांत आलीं. नित्य व्यवहार भूर्जपत्र व ताडपत्र यांवर लिहीत. राजकीय लिखाणास पूर्वीं नीलमत (Blue book) असें म्हणत. कल्ह-णानें राजतरंगिणी नीलमतें पाहून लिहिली. हर्षचरित्र, विक्रमांकदेवचरित्र वगैरे पुस्तकें राजलेख पाहून लिहिलीं आहेत. ती परंपरा शिवभारताच्या वेळींही चालू होती. इतिहासलेखनाची आवड मुसलमानांना फार. गिझनीच्या महमूदाचा चरित्रकार अल्उतबी यानें दप्तराचे दाखले दिले आहेत. बाबराच्या वेळीं रोजनिशा व पुढें नामे तयार होऊं लागले. इनाम कमि-शनच्या वेळीं लोकांचे खाजगी घरांतील कागद सरकारी दफ्तरखान्यांत गेले. हें पेशवेदफ्तर सरकारनें उघडें करावें त्यांत सरकारचा कोणताही तोटा नाहीं. इत्यादि. याप्रमाणें भाषण व स्वागत झाल्यावर प्रो. पोतदार यांनीं मंड-ळाच्या दोन सभासदांबद्दल दुखवट्याच्या ठराव मांडला. कै. रामभाऊ महा-जनि व खि. डॉ. जास्टिन ई ॲबट हे ते सभासद होत. दुखवट्यानंतर नूतन सभासद व वर्गबदली करण्याचें काम झाल्यावर निबंधवाचनाचें काम सुरू झालें. गेल्या अंकांत प्रसिद्ध केलेल्या कार्यक्रमाप्रमाणें बहुधा निबंधवाचनाचें काम झालें. निबंधवाचनाचे शेवटीं श्री. तात्यासाो केळकर यांनीं पेशवेदफ्तरा-संबंधींचा ठराव सभेपुढें मांडला व त्यावर पुढीलप्रमाणें भाषण केलें. इंग्रज सुधारलेले आहेत. त्यांनीं पेशवेदफ्तर नीट ठेवलें आहे, त्यांत लोकांना उपयोगी

असे कागद पुष्कळच आहेत. या दफ्तरांपैकीं एलिए नेशनच्या दफ्तराची व्यवस्था स्वतंत्र आहे. लोक आतां सरकारवर नवीन हक्क शाबीत करूं शकत नाहींत. त्याविषयीं सरकार भितें असेंही नाहीं. पण पेशव्यांच्या वेळचा इतिहास महाराष्ट्रांत जागृत आहे व हें दप्तर पाहिल्यानें लोकांत राजकीय स्फूर्ति उत्पन्न होईल या गोष्टीस सरकार भितें. इंग्रजी संस्कृति उच्च असल्यानें दप्तर पाहूं देत नाहीं असें त्यांच्यानें म्हणवत नाहीं पण अटीचें लोढणें घालतात. इंडिया ऑफिसमध्यें कोणी कागदपत्र पहावयास गेलें म्हणजे तेथील अधिकारी उल्हसित होतात. हँडलिस्ट किंवा हँडबुक यांच्या बाबतींत तर सरकारनें खेळच चालविला आहे. कागद चोरीला जातील अशी सरकारास भीति वाटते. चोरी सहसा होणार नाहीं. पण झालीच तर तिची इतकी फिकीर करावयाचें कारण नाहीं. रॉयल एशियाटिक सोसायटीचा व इतर संस्थांचा अनुभव गृहीत धरूनच चाललें पाहिजे. मी स्वतः दप्तर पाहण्याची परवानगी मागितली पण क्षुल्लक सबबीवर नाकारण्यांत आली. दफ्तर पाहण्याचे नियम केवळ दुःसह असे आहेत. सरकारानें हँडलिस्ट करण्याचें जरी अंगाबाहेर टाकलें तरी हँडबुक प्रसिद्ध करण्यास काय हरकत ? इत्यादि. यावर श्री. दि. वि. काळे यांनीं पेशवे दफ्तर पाहण्याचे कामीं काय अडचणी असतात याविषयीं स्वानुभव सांगून ठरावास अनुमोदन दिलें व ठराव एकमतानें पास झाल्यावर श्री. नानासाो वैद्य यांनीं समारोपादाखल भाषण करून वाढदिवस समारंभ संपल्याचें जाहीर केलें व कै. शं. बा. दिक्षीत यांच्या तैलचित्राच्या अनावरणाचा समारंभ सुरू झाला. त्याची हकीकत येणें प्रमाणें.

कै. शं. बा. दिक्षीत यांच्या तैलचित्राचें अनावरण.

प्रारंभीं प्रो. पोतदार यांनीं तैलचित्राचें अनावरण मंडळांत होण्याचा योग कसा जुळून आला याची हकीकत सांगितली. कै. दिक्षीत यांचें एक चिरंजीव श्री. कृ. शं. दिक्षीत यांनीं मंडळानें २२ वर्षांच्या आयुष्यांत लोकांमध्यें स्वेतिहासाविषयीं जागृति व आस्था कशी उत्पन्न केली आहे त्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून अशा संस्थेंत कै. दीक्षितांचें चित्र असणें कसें उचित आहे हें विशद केलें. तसेंच प्रो. पिंपळखरे यांनीं किती प्रयासानें चित्र काढलें आहे याची लोकांस कल्पना करून दिली.

नंतर श्री. द. वि. आपटे यांनीं दिक्षीतांनीं ज्योतिषशास्त्राच्या बाबतींत किती परिश्रम केले होते, तसेंच ज्योतिषाची प्रगति थांबण्याचें श्री. दिक्षीत यांनीं दिलेलें योग्य कारण व त्यांनीं वापरलेल्या ग्रंथांच्या पोथ्या पुन्हां मिळण्याची आवश्यकता यांचें प्रतिपादन केलें. श्री. तारकुंडे यांनीं कै. दिक्षीतांचीं 'रात्रीची चार घटका मौज' वगैरे पुस्तकें खरोखर किती मौजेचीं आहेत हें सांगितलें. श्री. बाबासाो पटवर्धन यांनीं कै. दिक्षीत यांनीं जे ग्रंथ लिहिले त्यांसाठीं त्यांनीं किती श्रम केले होते याची कल्पना चंद्राचीं कोष्टकें, उच्च व पात यांविषयीं त्यांनीं केलेलें गणीत, व ज्योतिष शास्त्राचा इतिहास लिहितांना केलेलें ग्रंथांचें आलोडन यावरून येईल व.कै.दिक्षीतांविषयीं खरी कल्पना येण्यास त्यांचे ग्रंथच पाहिले पाहिजेत असें सांगितलें. डॉ. र. पु. परांजपे म्हणाले 'मी संस्कृत व भारतीय ज्योतिषाचा विशेष अभ्यास केला नाहीं. पण कै. दिक्षीत यांस शोधकांत अग्रस्थान द्यावें लागेल याविषयीं शंका नाहीं. माझा व त्यांचा निकट परिचय होता. मी विलायतेंत असतां तेथील ज्योतिर्विदांस विचारण्यासाठीं कांहीं शंकाहि मला लिहून धाडल्या होत्या. त्यांचा भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास हा ग्रंथ अमूल्य असून आजही तो पाश्चात्यं भाषांत भाषांतर करण्यास योग्य आहे. भारतीय ज्योतिषाच्या इतिहासाविषयीं पाश्चात्य ग्रंथांतून अगदीं थोडी माहिती मिळते. युनिव्हर्सिटीचें शिक्षण न मिळालेल्या एका शिक्षकानें असा अपूर्व ग्रंथ लिहावा हें विशेष आहे.' श्री. गो. वा. जोशी यांनीं स्वकृत व कै. दिक्षीतांच्या गुणवर्णनपर अशा आर्या आपल्या मुलांकडून म्हणवून गुणवर्णन केलें. श्री. न. चिं. केळकर म्हणाले 'कै. दिक्षीत कधीं कधीं वाचण्यासाठीं कै. टिळकांकडे येत. त्यांना इंग्रजीचें विशेष ज्ञान नसतां त्यांनीं ज्योतिषाचा येवढा व्यासंग केला तेव्हां इंग्रजींत विशेष आहे असें नाहीं. कै. छत्रे यांनाही इंग्रजी नांवापुरतेंच येत असे; पण तेही उत्तम ज्योतिर्विद् होते. यांना जर इंग्रजीचा परिवर्तक मिळता तर त्यांची कीर्ती रवींद्रबाबूंप्रमाणें त्रिखंड झाली असती. कै. दिक्षीत यांनीं गीतेच्या शिकवणीप्रमाणें फलज्योतिषावरून लोकांना खऱ्या ज्योतिषाकडे आणलें. अशा गृहस्थाचें चित्र येथें अवश्य पाहिजे.' यानंतर अध्यक्ष श्री. नानासाो वैद्य यांनीं चित्राचें अनावरण करून पुढीलप्रमाणें भाषण केलें. 'मी संस्कृत, गणित, ज्योतिष व इतिहास या गोष्टी चांगल्या जाणतों. यामुळें मला कै. दिक्षीत यांच्या

ग्रंथाची योग्यता अनुभवानें माहीत आहे. त्यांनीं आपले ग्रंथ लिहिण्यासाठीं वेदांपासून अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. कै. दिक्षीत यांनीं वेदांचा जो काळ ठरविला तो आतां कोणासही बदलतां येणार नाहीं असें माझें मत आहे. त्यांनीं ऋग्वेदाचा कालही निश्चित केला. एवंच कै. दिक्षीत अतिशय मोठे संशोधक होते. इ. इ. नंतर श्री. दिक्षीतबंधूंनीं चित्रकार प्रो. स. रा. पिंपळखरे यांचा अनुरूप पारितोषिक देऊन सन्मान केला व मंडळाचे आभार मानले. प्रो. पोतदार यांनीं सभ्यांचे आभार मानल्यावर समारंभ संपल्याचें श्री. नानासाो वैद्य यांनीं जाहीर केलें.

सभासदः—गेल्या तीन महिन्यांत पुढील नवीन सभासद मंडळास मिळाले.

क्र. नं.	सभासदाचें नांव.	गांवाचें नांव.	वर्ग.
१७०५	श्री. केशव विश्वनाथ हेर्लेकर	पुणें	४
१७०६	प्रो. शंकर गणेश देशपांडे M. A.	अहमदाबाद	२
१७०७	श्री. गणपतराव विनायक नातू	पुणें	२ तहा.
१७०८	प्रो. चिंतामण बळवंत जोशी M.A.	,,	२
१७०९	श्री. लक्ष्मण गोविंद गोखले	,,	३
१७१०	श्री. नारायण दत्तात्रय आपटे B.A.	,,	४
१७११	श्री. नरहर दाजी डांगे, वकील	,,	४
१७१२	श्री. कृष्णाजी शंकर दिक्षीत	औंध	४ तहा.
१७१३	श्री. बाबासाहेब डफळे, चीफ ऑफ जत	जत	१
१७१४	कु. मैनाबाई शहाणे, एम्. ए.	पुणें	४
१७१५	श्री. हरी गणेश जानोरीकर	,,	४ तहा.
१७१६	श्री. यशवंत नारायण देशपांडे बी. ए.	कोल्हापूर	४
१७१७	श्री. भिकाजी शंकर मोघे	पुणें	४
१७१८	श्री. सदाशिव खंडो अळतेकर, बी.ए., एल्. एल्. बी.	कऱ्हाड	४

पाक्षिक सभा:— गेल्या ३ महिन्यांत ४ पाक्षिक सभा होऊन त्यांत पुढील निबंध वाचले गेले.

पा. स.		निबंध	लेखक
४	९	हरणाचा एक कसबी व श्री. सवाई माधवराव पेशवे.	प्रो. द. वा. पोतदार
	१०	केसरकर सनद	श्री. टी. आर. ठकार
	११	कांहीं नाणीं	श्री. ग. ह. खरे
	१२	रायगड व सूर्याजी पिसाळ	”
	१३	थिटे कागद	श्री. स. ग. जोशी
५	१४	भ्रमरगीत व कोकसार	श्री. पिंगळे, ग्वाल्हेर
	१५	वाईतील शिवकालीन सत्यनाथपुरी	श्री. शं. ना. जोशी
	१६	चंद्रराव मोरे यांचे नवीन कागद	” ” ”
	१७	वकील-इ-मुतलक म्हणजे काय ?	प्रो. द. वा. पोतदार
	१८	पेशव्यांचे इस्लामी आप्त	श्री. वि. गो. दिघे
६	१९	प्रो. सरकार यांची एक भ्रांत कल्पना	श्री. ग. ह. खरे
	२०	शिवकालीन बेकारी व तीवरील उपाय	”
	२१	युगे अठ्ठावीस, या आरतीचा उलगडा	श्री. वि. नी. छत्रे
	२२	रामचंद्र नीळकंठास वाईची तैनात	श्री. स. ग. जोशी.
७	२३	अल्लूर पालमपेटवर चढाई	श्री. ग. ह. खरे
	२४	राजारामकालचें राज्य देवाब्राह्मणांचें व लोकांचें	” ” ”
	२५	पेशवाईतील कुंडल्या	श्री. ना. द. आपटे

ग्रंथालय—मंडळास गेल्या तिमाहींत देणगीदाखल व अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
केळकर न. चिं.	संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन	काळे दि. वि.
कर्नाटकी श्री. ना.	डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचें चरित्र	कोल्हटकर वि. म.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
केळकर वाढदिवस मंडळ, पुणें	" केळकर "	केळकर वा. मंडळ पुणें
गोखले त्र्यं. रा.	गीतकुसुमहार	गोखले त्र्यं. रा.
देशमुख जी. बी.	अग्रिकल्चर् इन् ग्रेटर इंडिया	देशमुख जी. बी.
	पेनियल् (ए जर्नल फ्रॉम न्यू यॉर्क) (अभिप्रायार्थ)	संपादक, पेनियल्
पेशवे दप्तर	दि पेशवाज् कमिटमेंटस् ऑन् दि वेस्ट कोस्ट १७४०-१७७२	गव्हर्नमेंट ऑफ् बाम्बे
पोद्दार हनुमानप्रसाद	कल्याण	वैद्य चिं. वि.
डॉ. बालकृष्ण	शिवाजी दि ग्रेट, व्हॉल्युम नं. १	डॉ. बालकृष्ण
बी. बी. आर्. ए. सोसायटी	कॅटलॉग ऑफ् बुक्स ॲडेड् टू दि लायब्ररी ड्यूरिंग १९३१	
भट वि. मो.	हिंदुस्थानांतील मुसलमानी अमलाचा सोपा व सचित्र इतिहास	वैद्य चिं. वि.
मराया एरमेलिंदा दोस स्तुअर्तस् गोमेज	आयदेंतिफिकेकोज दी चंद्रपूर-इ-सिंदाबूर	मराया एरमेलिंदा दोस स्तुअर्तस् गोमेज
सरदेसाई गो. स.	मराठी रियासत, उत्तर विभाग नं. ३	वैद्य चिं. वि.
सरदेसाई गो. स.	नानासाहेब पेशवे	टी. रघुनाथ ठकार
सहस्रबुद्धे चिं. रा.	अबदलमर्दननाटकम्	सहस्रबुद्धे चिं. रा.
साठे टी. ए.	एव्हरीडे मॉरल्स्	वैद्य चिं. वि.

इतरवृत्त.

मंडळाच्या वाढदिवसाचे आदले दिवशीं म्हणजे रविवार ज्येष्ठ वद्य ३०।१८५४ (ता. ३ । ७ । १९३२) रोजीं सायंकाळीं ७ वाजतां प्रो. पोतदार यांचें श्री. नानासो वैद्य यांचे अध्यक्षतेखालीं ' पेशवेदप्तर ' या विषयावर व्याख्यान झालें. दुसरे दिवशीं पेशवेदप्तरासंबंधीं एक ठराव सर्वानुमतें पसार करण्यांत येऊन तो योग्य व्यक्तींकडे पुढील कामासाठीं पाठविण्यांत आला. ठराव पुढें दिला आहे.

गेल्या तिमाहींत सुमारें १०० सद्गृहस्थ मंडळ पाहण्यास आले; व सर्वांनीं समाधान व्यक्त केलें. तसेंच कोल्हापूर येथील ट्रेनिंग कॉलेजचे सुमारें ७५ विद्यार्थी आणि पुणें येथील शिवाजी स्कूलमधील ६० बाल-विद्यार्थी यांस संशोधनाविषयीं माहिती देऊन प्रदर्शन दाखविण्यांत आलें.

श्रावण शुद्ध २ व ४ (ता. ४ व ६ आगस्ट १९३२) रोज गुरुवार व शनिवार या दिवशीं श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि संस्थान औंध यांचीं अनुक्रमें महाराष्ट्रांतील किल्ले व अजंठा येथील भारतीय चित्रकला या विषयांवर माहितीनें भरलेलीं व सदीप अशीं २ व्याख्यानें झालीं. श्रीमंतांची चित्रकलेंतील तपश्चर्या, इतिहासाविषयीं आस्था वगैरे गुण सर्वविश्रुत असल्यामुळें व्याख्यानास अतोनात गर्दी होत असे. या व्याख्यानांच्या वेळीं दाखविलेच्या चित्रांचे फोटो व मूळ प्रतिमा या त्यांनींच मोठ्या परिश्रमानें तयार करविलेल्या आहेत. व्याख्यानें लोकांस फारच आवडलीं.

मिरज संस्थानचे अधिपति श्री. बाळासाहेब मिरजकर सी. आय. ई. यांची स्वारी चिटणीस व श्री. बाबासाहेब देशपांडे यांचे विनंतीवरून मंडळांत आली होती. सर्व मंडळ पाहून श्रीमंत स्वारी संतुष्ट होऊन गेली. श्रीमंतांचा चांगला आश्रय मंडळास मिळावा अशी सर्वांची इच्छा आहे.

---

12 Marathi Articles in this issue.

(1) An incident from the life of Sindhuraj, a King of Dhara, by Prof. V. V. Mirashi, is an attempt to show that the narrative of *Navasahasankacharita* is based on some

historical facts. He tries to identify some of the names occurring in the work with those in inscriptions.

(2) Biographical works of the Mahanubhava sect, by Mr. Y. K. Deshapande, gives an account of the way in which those works were composed. Account of six such important works is given in the article.

(3) Currency in the village of Kondhanpur a century ago, by Prof. V. G. Kale, deals with the said currency and gives the following types of rupees viz. *Chhapi, Kulaba, Bhatodi, Belapuri, Kamalgadi,* with varying prices, etc.

(4) Mahanubhava sect and Trimbakaraj, the author of Balabodha, by Prof. D. V. Potdar, deals with some allusions occurring about the sect in the book and the writer holds that Trimbakaraja was the earliest author who mentioned the sect.

Sources

Persian: (1) Adilshahi farmans from the Jedhe family among which Nos. 40, 43, 48 refer to some movements of the Adilshahi forces from 1645 to 1657 A. D. No. 48 is a royal order aganist the supporters of Shahaji Bhonslah and nominates Khandoji and Baji Ghorpade and not Khopade as given out by Prof. Sarkar (Ind. Hist. Quart. VII No. 2)[1]. (2) Two inscriptions from Parner (Ahamadnagar)[1]. (3) An inscription from Shirale (Satara)[1]. (4) 5 Farmans of Aurangzeb dealing with administrative and political matters.[2] (5) Some farmans from a Ghorapade family of Kolhapur[1]. *Pertaining to Shivaji's times:* (1) a mahjar dated A. D. 1598-99[3]; (2) Selldeed about the *Kulkarna* of Mungser[4]; (3) Chandrarao, Shivaji and Namdarkhan[4] (4) Some letters from the aforesaid Ghorpade family[5]. *Miscelaneous:*– Some letters about the well-known siege of Basien, campaign of Vitthal Shivdeva in Gujrath etc.[3]

पेशवे दप्तरासंबंधीं केलेला ठराव

१. पेशवे दप्तर पुणें हें इतिहासाच्या अभ्यासूंस अत्यंत उपयुक्त असल्यामुळें तें अभ्यासार्थ त्यांस खुलें होणें अगत्याचें आहे असें या सभेचें मत आहे. तरी या कामीं सरकारनें ताबडतोब जरूर ती व्यवस्था करावी.

---

1 By G. H. Khare 2. By Sar. Mujumdar 3. By D. V. Apte
4 By S. N. Joshi; 5 By D. V. Apte and G. H. Khare.

२. हल्लीं सदर पेशवे दप्तरांत कागद पाहण्याची परवानगी देण्याच्या अटी सोईस्कर नाहींत आणि अशा तक्रारी वर्तमानपत्रांतूनही जाहीर झाल्या आहेत. सबब दप्तरांत अभ्यासी मंडळींस रोज प्रवेश मिळावयास पाहिजे. आठवड्यांतून कांहीं मोजकेच दिवस व मोजकेच तास हा प्रवेश मिळाल्यानें वेळ अपुरा पडून फार गैरसोय होते.

३. त्याचप्रमाणें हरएक कागदाचें इंग्रजी भाषांतर करून पाठविण्याची हल्लीं अमलांत असलेली अटही गैरसोईची आहे. मुळावरून केलेलीं मराठी, मोडी किंवा फारसी टिपणें सरकारास आपल्या तज्ज्ञाकडे पसंतीसाठीं सहज पाठवितां येतील. यास्तव तशीच आवश्यकता असल्यास केवळ अपवादात्मक प्रसंगींच इंग्रजी भाषांतर मंजुरीस आवश्यक करावें.

४. अभ्यासूंस प्रवेश मिळण्यापूर्वी हल्लीं काय पाहण्याची इच्छा आहे तें सांगावें लागतें, हीहि पद्धति अत्यंत अशास्त्रीय व अडचणींची आहे. यास्तव दप्तरांत साधारणपणें कशा प्रकारचे कागद आहेत, त्याचा काल व स्वरूप वगैरे कसें आहे याची त्रोटक व बेतापुरती माहिती देऊन एक परिचय पुस्तक (हँडबुक) तावडतोब प्रसिद्ध करावें. किंबहुना या सभेचें असें स्पष्ट मत व मागणें आहे कीं, दप्तराप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चावर पहिला बोजा हा आहे असें समजावें.

५. या प्रकरणीं सभेच्या माहितिप्रमाणें एलिनिएशन किंवा हक्कप्रकरणीं सर्व व्यवस्था संपूर्ण व स्वतंत्र लागलेली असून त्या दृष्टीनें सरकारनें दप्तराची निवडही केलेली आहे. तेव्हां तसलीही हरकत नाहीं. यास्तव या सभेची सरकारास अशीहि सूचना आहे कीं, सदरहू दप्तर हें केवळ सर्वस्वी ऐतिहासिक नसलें तरी मे. लोगन साहेब यांनीं आपल्या यादींत म्हटल्याप्रमाणें आतां या दप्तराचें महत्त्व व योग्यता बहुतांशीं ऐतिहासिक दृष्टीचीच उरली आहे. तरी त्या दृष्टीनेंच याची जोपासना सरकारनें यापुढें करावी.

६. या कार्यासाठीं दप्तर शास्त्रज्ञ असा मोडी उत्तम वाचणारा व मराठी इतिहासाचा बारीक व सूक्ष्म अध्ययन केलेला असा स्वतंत्र दप्तरदार (कीपर ऑफ रेकार्ड्स्) सरकारनें लवकर नेमावा.

७. सरकारनें सांप्रत या दप्तरांतील बरेच उपयुक्त कागदपत्र हल्लींच्या हलाखीच्या स्थितींतही प्रसिद्ध केले आहेत याबद्दल ही सभा सरकारची आभारी आहे आणि सरकारनें शक्य तोंवर हा उपयुक्त क्रम पुढें चालविणें हें सरकारचें एक कर्तव्यच आहे. परंतु दप्तराची ऐतिहासिक दृष्टीनें निवड, लावणी, परिचयपुस्तकें व सूची यांची सिद्धता ही अधिक महत्त्वाची असून ती या अगोदरच सिद्ध व्हावयास पाहिजे. कारण तदभावीं या दप्तराचा अभ्यासूंस पाहिजे तसा उपयोग विशेषतः प्रौढ विद्यार्थ्यांस, निबंधलेखकांस वगैरे होत नाहीं, ही मोठी हानि आहे. आणि ती तावडतोब योग्य ते उपाय योजून सरकारनें टाळली पाहिजे.

६

ले. ३९ } हू-अल-खलील { श. १५५५ माघ वद्य ३०
हि. १०४३ साबान २८ } अल-मुल्कुलिल्लह { इ. १६३४ फेब्रुवारी १७

[फा. शि. *]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब हवालहदार व सर-नौबत व नायकवारियान किल्अह मूरबदेव आंकह आंचह बजहत ज-रवीरह व इस्तअदाद किल्अह मज्कूर [व*] देहा (देहहा) तहत मायह-ताज अज वक्त मलिक अन्बर व निज़ामशाह मुकासा रवानस्त बदां मूजब मुकर्रर व मुस्तकीम दाश्तह शुदह अस्त व बह जम्इयत कह मुकासा दादह अन्द नीझ करार दाश्तह ईम बहाल खुद मुकर्रर दानिस्तह कवी-दिल बूदह बसर-गर्मी तमाम बर जाद्दह दौलत-ख्वाही रासिख-दम व साबित-कदम बाशद कह मूजब सर-बुलन्दी ऊस्त तादानद तहरीरन फी २८ माह शअबान सनह १०४३

[समासांत*] परवानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश.

बादशहा → मूरबदेव (राजगड) किल्ल्याचा हवालदार, सरनौबत व नायकवाडी यांस

किल्ल्याची डागडुजी व दाणागोटा रसद वगैरे यासाठीं मलिकंबर व निजामशहा यांच्या कारकीर्दीपासून जो मुकासा चालूं आहे व त्या मुकाशास जी जमेत दिली आहे ती जमेत व तो मुकासा आजही मुकरर आहे असें जाणावें व दौलतीच्या सदिच्छेच्या मार्गावर दृढ असावें.ता. २९ साबान सन १०४३

७

ले. ४० सु. १०३७ } हू-अल-खलील { श. १५५९ आषाढ वद्य ९
हि. १०४७ सफर २३ } अल-मुल्कुलिल्लह { इ. १६३७ जुलै ६

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब कानोजी जेधे देसाई किल्अह रूहीरह आंकह अझ शुहूर सनह सब्अ सलसीन व अल्फ दर्गी-विला बदर्गाह अर्श-इश्तबाह रोशन गर्दीद कह ऊ अझ सिद्क-निय्यत व नमक-हलाली गायत तरद्दुद व मशक्कत जां-सिपारी दर मस्लहत बाद-

ऐ. फा. सा. खं. १-६

शाही बजा आउर्दह व मी आरद् व ई मअना मुस्तहसन खातिर अश्रफ शुदह व शाद्-बाश अक्नून बायद् कह बमुजर्रद् वसूल फर्मान वाजिब-उल-इज्आन दर तस्खीर किल्अह व दफअ हरामखोरान साबित-कदम व सर-गर्म बूदह नमक-हलाली व फिद्वियत बज़ुहूर रसानद् कह सर-अन्जामी व सर-अफ्राझी ऊ फर्मूदह ख्वाहद् शुद तादानन्द् तहरीरन फी २३ शहर सफर सनह १०४७

[समासांत*] परवानगी हूज़ूर अश्रफ अक्द्स अर्फअ हुमायून अअला बा-अलाम खान आली-शान सआदत-निशान रफीअ-उल-कद्र बुलन्द्-मकान इख्लासखान वझीर हुकूमत

सारांश.

बादशहा → कान्होजी जेधे देसाई किले राहिडा.

सध्यां दरबाराच्या ध्यानांत आलें कीं, कान्होजी यानें सद्धेतु व निष्ठा यांयोगें बादशाही मसलतीच्या बाबतींत प्राणार्पण करण्याचे कष्ट व अतिशय उपाय केले व करीत आहे. हा अर्थ आमच्या मनास पसंत पडला व सुख झालें. तेव्हां आतां हें फर्मान पोहोंचतांच किल्ला घेणें व हरामखोरांना दफे करणें यांत दृढ राहून नमकहलाली व चाकरी व्यक्त करावी म्हणजे व्यवस्था (इनामाची ?) व उत्कर्ष या बाबतींत हुकूम होईल. ता. २३ सफ़र सन १०४७

८

ले. ४१ सु. १०३८ हि. १०४७ जखर ६	हू-अल-खलील अल्मुल्कुलिल्लह	श. १५५९ कार्तिक शुद्ध ७ इ. १६३७ आक्टोबर १५

[फा. शि.*]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब कार्कुनान तपह रोहीरह आंकह अझ शुहूर सनह समान सलासीन अल्फ दर्रीं वला बदर्गाह वाला-जाह रोशन गर्दीद् कह कानोजी जधा देसाई तर्फ भोर किल्अह मज्कूर मशक्कत नमूदन तक्सीर न कर्द व मुत्मर्दा[1]नरा दफ्अ साख्तह बिना बरां अझ राह मराहिम पादशाहानह व फर्त अवातिफ खुस्रवानह मौज़अ चिखलगांव किल्अह मज्कूर दर वज्ह इन्आम कानोजी देसाई मज्कूर

१ हे मुठमर्द लोक कोण ?

मर्हमत फर्मूदह दहानीदह शुदह अस्त मी बायद कह देह मज्कूर मअ कुल-बाब व कुल-वजूहात दुन्बालह नुमायन्द बअद ऊ बअवलाद व अहफाद ऊ रवां दारन्द तअलीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मान बाझ दहन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तहरीरन फी-अत-तारीख ६ शहर जमादी-उस-सानी सनह १०४७[१] [२ फा. शि*.]

[समासांत*]पर्वानगी हुजूर अश्रफ अक्दस हुमायून अअला बाअलाम खान आली-शान सआदत-निशान रफीअ-उल-कद्र बुलन्द-मकान इख्लासखान वझीर हुकूमत[२]

९

ले. ४२ सु. १०३८ हि. १०४७ रमजान ३०	हू-अल-खलील. अल्मुल्कुलिल्लह	श. १५५९ फाल्गुन शुद्ध १ इ. १६३८ फेब्रुवारी ५

[फा. शि.*]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब आमिलान व देसायान किल्अह रोहिरह आंकह अझ शुहूर सनह समान व सलासीन अल्फ दरीं वला बद्गाह मुअल्ला रोशन गर्दीद कह मौजअ कोर्लह व मौजअ ऊर्तन्बी व मौजअ तितेघर किल्अह मज्कूर बाबत गन्गाजी देसाई

१ या फर्मानाचा तर्जुमा म्हणजे राजवाडे खंड १५ ले. ३३३ होय. पण तेथें लेखांकाची तारीख चुकली आहे. शि. च. सा. ले. २५२ त हें फर्मान पोटपत्र म्हणून आलें आहे. पण त्यांत तत्कालीन लेखकानें केलेल्या चुका फार आहेत.

या फर्मानाच्या तारखेबद्दल विनाकारण घोटाळा उडाला आहे. शिवचरित्र साहित्य खं. ३ ले. ५७९ व ' रामदास रामदासी ' अंक १२१ ' श्री ऐतिहासिक कागदपत्रें ' पृष्ठ ७ व १३ या तिन्ही ठिकाणीं जमादिलाखर ६ ही तारीख स्पष्ट आहे. या फर्मानांतही तीच तारीख आहे. असें असतां वरील मासिकाचे संपादक ' जमादिलावल हा महिना बरोबर असावा ' असें म्हणतात (सदर मासिक अंक १२९ पृ. १०). राजवाडे खंड १५ ले. ३३३ मध्यें ६ जमादिलोवल असें आहे. पण तें रूपांतर करणाराच्या हातून चुकीनें पडलें असावें असें दिसतें. रामदास रामदासीच्या १३ व्या पृष्ठावर जो कागद छापला आहे त्याची तारीखही संपादकांकडून चुकीची पडली आहे. फर्मानाचें भाषांतर करणारानेंही घोटाळा केला आहे.

२ ले. ४१, ४५, ४६ यांच्या पाठीवरील शेऱ्यांसाठीं शिवाजी निबंधावली भाग २ पृ. ७२ पहा.

पर्गनह वांई दरीं वक्त बह प्रान्जी सातिया रवां शुदह अस्त अक्नून अझ राह मराहिम पादशहानह व फर्त अवातिफ खुस्रवानह सह मौज़अ मज्कूर बाझ बदस्तूर कदीम दर वज्ह इस्तिकामत गन्गाजी मुशारुन-इलैह मुकर्रर फर्मूदह शुदह अस्त मी बायद कह देहाए मज्कूर दुन्बालह नुमायन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तहरीरन फी-अत-तारीख ३० शहर रम्ज़ान-उल-मुबारक सनह १०४७

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला बाअलाम खान आली-शान सआदत-निशान रफीअ-उल-कद्र बुलन्द-मकान इख्लासखान वझीर हुकूमत

सारांश.

महमदशहा→ किले रोहिड्याचे अंमलदार व देसाई

कोरले, वडटेंबी व थिटेघर हीं गांवें वाई परगण्याचा देसाई खकाजी (गंगाजी[1]) याजकडून काढून प्रान्जी साठ्या याजकडे चालू होतीं. आतां तीं पूर्वीप्रमाणें गंगाजी देसायाकडे दिलीं आहेत. तरी तीं गंगाजीच्या ताब्यांत देणें.

१०

ले. ४३ हि. १०४७ जिल्हेज ७	हू-अल-खलील अल्मुल्कुलिल्लह	श. १५६० वैशाख शुद्ध ९ इ. १६३८ एप्रिल १२

[फा. शि.*]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त आं कह मुकद्दम-उल-अम्साल व अल-अक्रान कानोजी जधा बइनायात बीगायात शाहानह सर-अफ्राझ बूदह बिदानद कह दरीं वला हुक्म जहां-मुताअ खूर्शीद-इर्तफाअ नाफिज गश्तह कह आं मुकद्दम-उल-अम्साल दर हवाले किल्अह रोहीरह बूदह न गुजारन्द कह[2]——अझ जाए खूद बजुन्बन्द मी बायद कह बमुजर्रद वसूल ई फर्मान आली-शान दर हाल खूदरा बा जम्इयत तमामी बहवाली किल्अह मज्कूर रसानीदह आंहारा जुन्बीदन न दहन्द दरीं बाबत ताकीद बलीग बलीग[3] दानिस्तह यक लिहज दिरन्ग व अहमाल न वर्झद व जहतह ई

१ हा गंगाजी म्हणजे सा. खं. २ ले. ३६९ मध्यें आलेला गंगाजी असावा. अर्थात् याचें आडनांव पिसाळ असावें.

२ येथें ज्या मनुष्यास हालूं द्यावयाचें नाहीं त्याचें नांव दिलें नाहीं.

३ हा शब्द गाळावा.

मअना[1]——महलदार रिकाबरा फिरिस्तादह शुदह अस्त तादानद बर हुक्म फर्मान अश्रफ रवद तहरीरन फी हफ्तुम शहर जी–अल–हज्जह सनह १०४७

[समासांत*] [पर्वा]नगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश.

महमदशहा → कानोजी जधा

हुकूम झाला होता कीं, त्यानें रोहिडा किल्ल्याजवळ जाऊन —— यांना स्वतःच्या जागेवरून हालूं देऊं नये. तरी हा हुकूम पावतांच स्वतःच्या तमाम जमेतीसह किल्ल्याजवळ जाऊन त्यांस तेथून हालूं देऊं नये. या बाबतींत सक्त ताकीद जाणून एक घडीचा दिरंग न करणें. या कामासाठीं ——महालदार पाठविला आहे. जाणावें. ता. ७ जिल्हेज सन १०४७

११

ले. ४४ सु. १०३९ हि. १०४८ साबान २४	हू–अल–खलील अल्मुल्कुलिल्लह.	श. १५६० मार्गशीर्ष वद्य १० इ. १६३८ डिसेंबर २०

[फा. शि. *]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब इज़्ज़त माब शेख अली हवालहदार व कारकुना[न*] हाल व इस्तिक्बाल किल्अह रोहीरह आंकह अझ शुहूर सनह तिस्अ व सलासीन अल्फ दर्रीं वला हाजिब उम्दह उझराए अज़ामँ झुब्दह उम्राए उम्राए[2] कराम सुलालह खवानीन रफीअ–मुकाम मअ्फूर–उल–कद्र व अल–इहतशाम फारस मिज़्मार शुजाअत मुबारिझ मैदान शहामत शायस्तह हझारान राफत व मक्रमत सझावार फरावान आतिफत [व*] मर्हमत खान आली–शान सआदत–निशान रफीअ–उल–कद्र व अल–मकान फीरोझी–आसार रुस्तुम झमान रन्दूलहखान सिपह-सालार बदर्गाह खलायक–पनाह इल्तिमास नमूद कह मौज़अ नातन्वी तपह भोर किल्अह मझ्बूर बइसावत कानोजी जेधा देसाई तपह मज्कूर अझ कार किर्द दर कारकिर्द उझरा भगोतह मीचलद नज़र इनायत फर्मूदह बहमां तरीक मुकर्रर नमूदह फर्मान अश्रफ आतिफत शवद बिनाबरां इल्तिमास बखातिर मुबारक अअला आउर्दह मौज़अ मज्कूर चुनांचह बझ-सावत व देसाई मज्कूर भगोतह रवानस्त बहमां तरीक मुकर्रर फर्मूदह शुदह अस्त मीबायद कह बहमां तरीक मुकर्रर दानन्द व बअद ऊ बअ-

१ महालदाराचेंही नांव नाहीं. 	२ हा शब्द गाळावा.

व्लाद व अहफाद रवां साझन्द व हर सालह उज्र फर्मानि मुजद्दद न कुनन्द तअलीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मानि सआदत-निशान बाझ दहन्द तादानन्द बर हुक्म फर्मानि अश्रफ अक्दस रवन्द तहरीरन फी बीस्त चहारुम शहर शअबान-उल-मुअज्ज़म सनह १०४८ [३ फा. शि.*]

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश.

महमदशहा → शेख अली हवालदार व कारकून किले रोहिडा

रणदूलाखान यांच्या हेजीबानें सांगितलें कीं, भोर तप्यांतील नाटंबी हा गांव कानोजी जेधा, उपर्युक्त तप्याचा देसाई, याजकडे इसाबत म्हणून चालू आहे. तरी त्यास फर्मान मिळावें. अर्जाचा विचार करून पूर्वीप्रमाणें तो गांव इसाबत म्हणून चालविण्याची आज्ञा केली आहे. तरी चालवावा. ता. २४ रमजान सन १०४८.

१२

ले. ४५ सु. १०४०	हू अल-खलील	श. १५६२ चैत्र वद्य ८
हि.१०४९ जिल्हेज२०	अल-मुल्कुलिल्लह	इ. १६४० एप्रिल ३

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब—— हवालहदार व कारकुनान हाल व इस्तिक्बाल अझ जहत अमानत व अझ जहत मुकासायान व देसमुकान व अद्कारियान किल्अह रोहीरह आंकह अझ शुहूर सनह अर्बईन व अल्फ दरीं वला कानोजी देसमूक तर्फ भोर किल्अह मज्कूर बद्रगाह जहां-पनाह इल्तिमास नमूद कह मौज़अ अन्बोरह मअ बाझार व मौज़अ कारी अझ कदीम बमूजब कारकिर्द मलिक अम्बर व हाली मर्हमत मौज़अ चीकलगांव व मौज़अ नातम्बी तर्फ मज्कूर जुम्लह चहार देह बइन्आम खूद मअ कुल-बाब व कुल-वजूहात व सायर कानूनात व लवाझिमात व जमीअ बाबहा व पतीहा बमूजब फर्मान निज़ामशाह व फर्मान कज़ा-जरियान शाह जम-जाह रवानस्त व खारिज ई हक लवाझिमह व पती पछोरी व साने-सारी नीझ जारी अस्त अम्मा दरीं वक्त अझ थानह उज्र ताकीद फर्मान पेश आउर्दह मुझाहिम मी शवन्द व झर बअज़े बाबहा कह सालाबाद बर देहा (देहहा)न बूद अन्दाख्तह मुझाहिमत मी रसानन्द इहतमाम शवद हर गाह कह देहात मज्कूर व गैरह बमूजब फर्मान निज़ामशाह व फर्मान हुमायून अअला रवां बाशद बाझ अझ थानह उज्र

ताकीद फर्मान पेश आउर्दह मुझाहिम शुदन व झर बअजे बाबहा कह गाही न बूद बइल्लत आं तस्वीश रसानीदन चह मअना दारद अक्नून मी बायद कह बमुजर्रद वसूल फर्मान कज़ा–जरियान शाही हर चहार देह मज्कूर मअ बाझार मअ कुल–बाब व कुल–वजूहात व साएर कानू नात व लवाझिमात व जमीअ पतीहाए व बाबहा बमूजब फर्मान निज़ाम-शाह व फर्मान हुमायून अक्दस मअ हक लवाझिमह व पती पछोरी व साने सारी व गैरह बइन्आम देसमूक मज्कूर मुकर्रर दानिस्तह दुन्बालह नुमायन्द व झर बअजे झकातपती व झकातहुन्दह व चीकलवेतह व बेलेकती व पायपोशी [व *] मेझबानी व नौ सेल बेल व खर्चपती व जन्गपती व पेशकशी व तकद्दमह वज्ह यक माह अहुद्दहदार व अन्ब-राई व पारेवार व पलन्ग सूतार व सोतर गुरव व मुहतर्फह व बेत व बींगार व फर्मास व गैरह महसूल व पतरकेनी व बअजे बाबहा आंचह कह हस्त व पेश्तर ख्वाहद शुद तअल्लुक देहहाए मज्कूर दुन्बालह ऊ फर्मूदह शुदह अस्त मिन्बअद मुझाहिम न शवन्द व बहेच वादी खलल न कुनन्द व बअद ऊ बअव्लाद व अहफाद ऊ जारी साझन्द दरीं मअना हर कह हर्कत कुनद गुनहगार दर्गाह बादशाही बाशन्द हर सालह उज्र फर्मान मुजद्द न कुनन्द तअ्लीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मान बाझ दहन्द तादानन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तहरीरन फी अश्रीन शहर जी अल–हज्जह सनह १०४९ †[२ फा. शि *].

[समासांत *] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

१३

ले. ४६ सु. १०४० } हू–अल–खलील { श.१५६२ आषाढ शुद्ध १४
हि. १०५० रवल १२ } अल-मुल्कुलिल्लह { इ. १६४० जून २२

[फा. शि. *]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब इझ्झत दस्तगाह मीर

† हें फर्मान शिवचरित्र साहित्य खंड २ ले. २१३ मध्यें पोटपत्र म्हणून आलें आहे. तसेंच याचें एक रूपांतर 'रामदास रामदासी' मासिकाच्या १२१ व्या अंकांत 'श्रीऐतिहासिक कागदपत्रें' या मथळ्याखालीं पृ. १०।११ वर छापलें आहे. येथें शुद्ध फारसी उच्चार दिले आहेत. याचा अर्थ या दोन्ही पत्रांवरून कळून येण्यासारखा असल्यामुळें तो येथें देत नाहीं.

मुहम्मदखान हवालदार व कारकुनान हाल व इस्तिक्बाल अमानत व अझ जहतह मुकासाई किलअह रोहीरह आंकह अझ शुहूर सनह अर्बईन व अल्फ अझ राह मराहिम शाहानह व फर्त अवातिफ खुस्रवानह झमीन धूरन्ग रकम आं शश तन्ख जिराअत बाबत मानकी दर सवाद मौज़अ वेन्हवरी तपह भोर किलअह मज्कूर दर वज्ह इन्आम अब्दी बइस्म मुक-द्दम-उल-अम्स़ाल कानोजी बिन नायकजी लकब जेदह देसाई तपह मज्कूर किलअह मझ्बूर दाखिल महसूल व नक्दियात व जमीअ लवाझिमात व बेत व बीगार व फर्मास व खर्चपती व सलबेल व झकात हुन्दी व चिकल वेतह व तहापती (?) व बेलेकती व जन्गपती व पेशकशी व पायपोशी [व*] मेझबानी व सायर अब्वाब नक्दी व जिन्सी कह आंचह दर दफातिर अअला स़बत अस्त व पेशतर अहदास़ ख्वाहद शुद मअ कुल-बाब मर्हमत फर्मूदह दहानीदह शुदह अस्त मीबायद कह झमीन मज्कूर हस्ब-उल-मस्तूर सद्रहू दुन्बालह देसाई मज्कूर नुमायन्द व रवां दारन्द व बअद ईशान बह अव्लाद व अहफाद ईशान अलामा तनासलू व तआकबू जारी साझन्द व हरसाल उज्र फर्मान मुजद्दद न नमूदह साल बसाल बर हमीं फर्मान रवां दारन्द व हर कस दरीं इन्आम खलल कुनद मनाअ—मुकय्यद—गर्दद तअलीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मान अश्रफ बाझ दहन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तादानन्द तहरीरन फी १२ माह रबीअ–उल-अव्वल सनह १०५० [३ फा. शि. *]

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश.

मुहम्मदशहा → मीर मुहम्मदखान हवालदार आणि मोकाशाचे व इतर कारकून किल्ले रोहिडा.

भोर तप्यापैकीं वेन्हवडी गांवांतील **माणकीची** सहा टाक जिराअत जमीन कांहीं हक्कांसह कान्होजी नायकजी जेधे देसाई तपे भोर यास इनाम दिली आहे. तरी ती देसाई मजकुराच्या ताब्यांत देणें व वंशपरंपरा चालविणें. ता. १२ रबिलावल सन १०५०

१४

ले. ४७ सु. १०४३ हि. १०५२ रमजान ११	हू-अल-खलील अल्मुल्कुलिल्लह	श. १५६४ मार्गशीर्ष शुद्ध १२ इ. १६४२ नोव्हेंबर २४

[फा. शि.*]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब शुजाअत व रफअत दस्तगाह शौकत व हश्मत इन्तिबाह झुब्दह दौलत-ख्वाहान वफा-कीश कुद्दह हवा-ख्वाहान खैर-अन्दीश सझावार मराहिम बीकरान शायस्तह अवातिफ बीपायान दौलत-ख्वाह दर्गाह जहां-पनाह सुलालह यक-जिहतान व यक-रन्गान नुस्रत-हम्राह खान आली-शान रफीअ-उल-कद्र बुलन्द-मकान अस्अद्खान सर हवालदार व इझ्झत माब मीर कासिम अली हवालदार व कारकुनान हाल व इस्तिक्वाल किल्अह रोहीरह आं कह अझ शुहूर सनह सलास् अर्बईन व अल्फ दर्रीं वला कान्होजी देशमुक तपह भोर किल्अह मज्कूर बदर्गाह मुअल्ला इल्तिमास नमूद कह खूद्रा इन्आमत देसमुकगिरी मझ्बूर मवाज़्अ अन्बोरह मअ बाझार व मौज़अ कारी व मौज़अ चीखलगांव व मौज़अ नातन्वी तपह मज्कूर बा कुल-बाब व कुल-वजूहात बमूजब फर्मान साबिक मुतअय्युन व रवानस्त व अझ कदीम-उल-अय्याम कारकिर्द दर कारकिर्दात भोगोतह जारी दारद दर्रीं वक्त तानह बीबी दूख्तर काज़ी हुसेन हाकिम शरअ कल्यान भीवन्दी गैर वाकअ मअ्लूम नमूदह मौज़अ चीखलगांव मज्कूर बदल इन्आम खूद नवीसानीदह गिरफ्तह अस्त व खूद लैलन व निहारन दर मुहिम्मात देसमुकी मझ्बूर मश्गूल बूदह तअदी दर्गाह जहां-पनाह नमूदह मी नुमायद इहतमाम शवद बिनाअन-अलैह बखातिर मुबारक अअला आउर्दह मौज़अ चिखलगांव मझ्बूर अझ तानह बीबी दूर नमूदह बदेसमुक मझ्बूर इन्आम अब्दी बदस्तूर साबिक मुकर्रर व मर्हमतह फर्मूदह दहानीदह शुदह अस्त मीबायद कह मौज़अ मज्कूर मअ कुल-बाब व कुल-वजूहाह व सायर कानूनात व बरात रिकाब व थानह नक्दी व जिन्सी कुल्ली व जुझ्वी आंचह दर दफातिर अअला सबूतस्त व पेशतर अह-दास् शवद इस्मी व रस्मी कल्मी व कदमी तमामन दुन्बालह ऊ दानि-स्तह बहेच वज्ह मिन-उल-वजूह मुझाहिम व मुआरिज़ बहाल देहाए मज्कूरह न शवन्द व हक लवाझिमह पतीपछोरी व सायनसारह व बअजे लवाझिमात चुंचह सालाबाद जारी बूदह अस्त हमीं नूई रवां दारन्द

ऐ. फा. सा. सं. १-७

बअद ऊ बअव्लादी व अहफादी ऊ अलामा तनासलू तआकबू जारी साझन्द अगर कस हिन्दू या मुस्लिमान बई इन्आम खलल कुनद क्लअनत ऊ व——— दर नफ़रानि हज़्रत रिसालत पनाही गिरफ्तार गर्दद तअलीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मान बाझ गुजारन्द तादानन्द तहरीरन फी–अत–तारीख ११ शहर रम्ज़ान सनह १०५२†
[३ फा. शि.*]

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

१५

ले. ४८ सु. १०४४ } हि. १०५४ जखर७ } [फा. शि.*] { श. १५६७ श्रावण शुद्ध ८ { इ. १६४५ आगष्ट १

फर्मान[१] हुमायून शर्फ [सुदूर याफ्त बजानिब[२] कानोजी ......] अझ शुहूर सनह अर्बअ अर्बईन अल्फ चूं शाहजी भोंसलह अझ मर्दूदान दर्गाह वाला–जाह गश्तह व दादाजी कोन्ददेव मुतअल्लिक ऊ कह दर तर्फ कोन्दानह[३] अस्त जिहतह[४] दफअ व रफअ कर्दन[५] [व] बकब्ज़ दर आउर्दन आं विलायत इझ्झत व रफअत दस्तगाह शुजाअत व शहामत

† याच्या अर्थासाठीं शिवचरित्रसाहित्य खं. २ ले. २१४ व रामदास रामदासी अंक १२१ श्रीऐतिहासिक कागदपत्रें पृ. १३ पहा.

१ हें फर्मान या पूर्वी सर जदुनाथ सरकार यांनीं छापलें असून (Indian Historical Quarterly Vol. VII No. 2 pp. 362–364) पुन्हां छापण्याचें कारण त्यांनीं जें वाचन दिलें आहे त्यांत फर्मानांत असलेले शब्द सोडले आहेत, नसलेले शब्द घातले आहेत व असलेल्या शब्दांचें विकृत वाचन दिलें आहे. माझें हें त्रिविध विधान स्पष्ट करण्यासाठीं त्यांच्या तिन्ही प्रकारच्या चुक्या पुढें देतों. असें करतांना मी मला केवळ छापण्याच्या अशा ज्या चुका वाटल्या त्या वगळल्या आहेत. अशा चुका ४ आहेत. येथें स म्हणजे सरकार असें समजावें.

२ स बनाम शब्द देतात. मी आदिलशाही कमींत कमी ५०० कागद पाहिले आहेत; पण बनाम शब्द त्यांत आलेला पाहिलेला नाहीं. सर्वत्र बजानिब शब्द येतो.

३ स कुन्दानह

४ स जहत

५ स कर्दा. या शब्दापुढील चौकटी कंसांत काय छापलें आहे तें समजत नाहीं. मुळांत येथें फर्मान थोडें फाटलें आहे. पण अर्थाचे दृष्टीनें येथें कर्दन शब्द पाहिजे व कर्दा हा फारसी भाषेंत अर्थबोधक शब्द होऊं शकत नाहीं.

इन्तिबाह[६] उम्दत-उल-[ ] व अल-अक्रान[७] लायक-उल-मराहिम व अल-इहसान नतीजर्त-उल-अहाली व अल-अअयान झुब्दत-उल-कबायिल व अल-अख्वान खन्दोजी व बाजी घोरपदियानरा[९] बा उझराए अज़ाम तअय्युन फर्मूदह शुदह अस्त बायद् कह ऊ बा जम [इयत[१०]] अहशाम खूद नझ्द मुशारुन-इलैहमा आमदह अझ इस्तस-

६ स इश्तबाह. अल्काबांतून अश्बाह व इन्तिबाह असे दोन्ही शब्द येत असले तरी येथें इन्तिबाह असाच शब्द आहे.

७ स वाला किरान. या फर्मानांत पुढें व इतर फर्मानांतून व अल + ० अशींच पदें ज्यांचीं पाडलीं पाहिजेत असे शेंकडो अल्काब आढळतात. असें असतां व याच फर्मानांत पुढें आलेल्या अल्काबांतून व-अल + ० अशीं पदें सरकारांनींच पाडलीं असतां येथें मात्र वाला किरान अशीं पदें पाडलीं आहेत याचें कारण काय ?

८ स सज्जह. नतीजत व सज्जह यांचे अर्थ भिन्न होतात.

९ स खोपरियान. मूळ फर्मानाचे फाटून तुकडे झाले आहेत ते जर नीट चिकटविले तर तेथें घोरपदियान हा शब्द आहे हें समजण्यास वेळ लागणार नाहीं. खोपड्यांपैकीं खंडोजी व बाजी असा जोड उल्लेख कोठेंच सांपडत नसून घोरपड्यांपैकीं खंडोजी व बाजी यांचे जोड उल्लेख अनेक ठिकाणीं सांपडतात (पहा सनदा पत्रें पृ. १०५; शिवचरित्र साहित्य खं. ३ ले. ५४४ व ५४७; शिवचरित्र साहित्य खंड २ ले. २६८). येवढेंच नव्हे तर नुकतेंच मंडळाकडे घोरपडे आडनांवाच्या एका सद्गृहस्थांनीं कांहीं कागद आणून दिले असून त्यांतील ३ कागदांवरून पुढील माहिती मिळते. पहिल्या पत्राचा काल श. १५४७ हा असून त्यांत ' खंडोजी व बाजी घोरपडे पटेल मौजे मजकूर ' (= कापसी पा। फलेटण) असें म्हटलें आहे. दुसरें पत्रही श. १५४७ चें असून त्यांत ' राजेश्री खडोजी राजे व राजेश्री बाजी राजे घोरपडे मोकदम मौजे कापसी पा। मजकूर (= फलेटण)' असा उल्लेख आहे. तिसरा कागद श. १५५० चा असून ' खंडोजी व बाजी बिन जाउजी घोरपडे मोकदम मौजे कापसी पा। मजकूर (= फलेटण)' असा उल्लेख आहे. या तिन्ही उल्लेखावरून खंडोजी व बाजी घोरपडे हे फलटण परगण्यांतील कापशी गांवाचे पाटील असून त्यांच्या बापाचें नांव जाऊजी होतें हें सिद्ध झालें. हें कापशी गांव सदर्न मराठा रेल्वेच्या अदर्की स्टेशनापासून ईशान्येस सुमारें ६ मैलावर आहे.

१० स मअह. बा जम हीं अक्षरें निश्चित आहेत. पुढें फाटलें आहे. पण तेथें जमइयत या शिवाय दुसरा कोणताही शब्द होऊं शकणार नाहीं. बा शब्द असतांना मअह हा पदरचा शब्द घेण्याचें कारण काय ? बा जम हीं अक्षरें कां गाळलीं ?

बाब मुशारुन-इलैहा[1] दादाजी कोन्ददेव मज्कूर व मुतअल्लिकान आं हरामख्वाररा गोशमाल दादह नीस्त व नाबूद साझद व[2] आं विलायतरा बकब्ज़ व तसर्रुफ दर आवरद कह बाअस सर-अफ्राझी ऊ अस्त[3] तादानद तहरीरन फी-अत-तारीख हफ्तुम शहर जमादी-उस-सानी सनह १०५४[4]

[समासांत *] परवानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून[5] अअला

सारांश

बादशहा→कान्होजी जेधे ?

ज्या अर्थी शहाजी भोंसले दरबारांतून निर्वासित व अपमानित झाला आहे व त्याचा मुतालिक दादाजी कोंडदेव कोंडाण्याच्या बाजूस आहे (त्या अर्थी त्यांस) दफे करण्यासाठीं व ती विलायत ताब्यांत आणण्यासाठीं खंडोजी व बाजी घोरपडे यांस तुमच्यासह नेमिलें आहे. तरी तुम्ही आपल्या हशमासह मशारनिल्हे जवळ जाऊन त्यांच्या संमतीनें दादाजी कोंडदेव व त्या हरामखोराचे संबंधी यांना शिक्षा देऊन नेस्तनाबूद करा व ती विलायत ताब्यांत आणा. तें तुमच्या उत्कर्षाचें कारण आहे. ता. ७ जमादिलाखर हि. १०५४[6]

---

१ स मुशारुन-इलैहुमा. फर्मानांत चुकीनें मुशारुन इलैहहा असें लिहिलें आहे. पण स नीं तसें स्पष्ट दाखविलें नाहीं.

२ स १ गाळला आहे.

३ स ऊस्त

४ सनीं या पुढें 'बइस्म अअला' हे शब्द मूळांत नसतां दिले आहेत. या शब्दांचें भाषांतर करतांना टीप देऊन 'बइस्म अली' या बद्दल हे शब्द चुकीनें लिहिले गेले असतील असें सुचवून अलीचें नांव विजापुरी सुल्तानांच्या शिक्क्यांत खोदलें होतें अशी माहिती दिली आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, विजापूरच्या सर्व सुलतानांचे शिक्केही ठाऊक नाहींत व जे ठाऊक आहेत त्यांपैकीं प्रत्येकांत अली हा शब्द खलीफाचें नांव या अर्थी आला आहे असेंही नाहीं. तेव्हां वरील सामान्य विधान करतां येणार नाहीं.

५ हे दोन्ही शब्द गाळले आहेत.

६ कै. राजवाड्यांच्या १५ व्या खंडांत या फर्मानाच्या कालाच्या सुमाराचीं ३ पत्रें छापलीं आहेत (ले. २६७, २६८, २६९). या पत्रांकडे आजवर कांहीं

१६

ले.४९ सु.१०५१ हि.१०६१ जखर २४	बिस्मिल्लह-अर-रहमन-अर- रहीम अल-मुल्कुलिल्लह	श.१५७३ ज्ये.व.११ इ. १६५१ जून ३

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब अयालत व अमारत पनाह उब्हत व शौकत दस्तगाह हुकूमत व मुआली जाह अअतज़ाद खिलाफत व फर्मा–रवाए अअतमाद् सल्तनत व किश्वर–कुशाई फिस्स खातिम शुजाअत व बख्तियारी आब गौहर शहामत व जां–सिपारी सैफ मस्लूल बाझूए शाहनशाही रम्मह मस्कूल मअरकह दुश्मन–काही मुकद्दमत–उल–जैश मआरक मुल्क–गीरी व जहां–सितानी बेश आहन्ग मसाफ फीरोझी व काम–रानी तराझ असीन उब्हत व अज्लाल गौहर सरीर दौलत व इक्बाल मख्झन अस्रार खलीफह इलाही मज्मूअह होशमन्दी व कार–आगाही मूनिस वहदत–सराई हुज़ूर महरम खास–उल–खास सरीर सुरूर मतरह अन्ज़ार इनायत मौरिद अल्ताफ कद्सी सरायत अनीस मज्लिस वहदत–जलीस महाफिल खिल्वत आली–शान रफीअ–मकान खुलासह उम्राए मन्बह–उश–शान झुब्दह खवानीन झमीन व झमान सआदत-मन्द् अझल व अबद् मुबारिझ-उद्-दीन खान मुहम्मद् वझीर हुकूमत सर हवालदार व मश्हूर–उल–अनाम अन्बाजी नागनात हवालदार व कार कुनान हाल व इस्तिक्बाल किल्अह रोहिरह आंकह अझ शुहूर सनह अहदी खम्सैन व अल्फ दरीं वला कानोजी जाधव देसमूक तपह भोर किल्अह मज्कूर बदर्गाह मुअल्ला अर्ज़ नमूद कह मौज़अ कारी व मौज़अ अन्बूरह व मौज़अ

संशोधकांनीं शंकित दृष्टीनें पाहिलें आहे. पण हें फर्मान व तीं पत्रें (श. १५६७ चैत्र ते ज्येष्ठ) यांचा एकत्र विचार करून सुसूत्र असा अर्थ निघतो कीं काय हें पाहिलें पाहिजे. तसेंच शिवचरित्रप्रदीपांतील जेधे–करीण्यांतील " त्यास चंदसि राचेवार मन्होटे होते त्यांचा व महाराजाचा घरोबा आहे सामान पुरविताती येसी बद-गोह अफजलखान याणी विजापुरास लिहिली त्यावरून महाराजास धरून विज्यापुरास बोलावून नेले बाा कान्होजी नाईक होते पातशाहानी तहकीकात मनात आणिता तुफानी गोष्टी येसे जाले त्यावरी पातशाहानी महाराजाचा सन्मान केला......बेगरूळ प्रांत पांचा लक्षा होनाची जाहागीर देऊन वेगळी मसलती सांगितली बाा कान्होजी नाा हि जमावानासि होते........त्यावरी कसबे खेडेबारे येथेही वाडे बाधले तेथून बापूजी मुद्गल......यांच्या हाते राजकारण करून दग्याने किला कोंढाणा घेतला. (पृ. ४०–४१) " या मजकुराचा–जरी यांत कालविपर्यास दृष्टीस पडतो तरी–या पत्रांशीं संबंध लावतां येतो कीं काय हें पाहिलें पाहिजे.

नाते व मौज़अ चिखलगांव तपह मज्कूर इन्आम व हक लवाझिमह व पती पछोरी व बअज़े कह अझ खूद अस्त कारकुनान किल्अह मज्कूर उज्र व इस्काल नमूदह हर सालह इन्आमात खन्दनी अझ खूद मी गीरन्द व सद्रहू चहार देह मझ्बूर इन्आम खूदरा तश्वीश व आझार मी रसानन्द अझीं वास्तह हाल खूद हेच न मान्दह अस्त व खूद दर मुहिम्मात दीवानी साबित-कदम मी बाशम नज़र इनायत फर्मूदह इहतमाम फर्मायन्द हर्गाह कह चहार देह तपह मज्कूर इन्आम व हक लवाझिमह व पतीपछोरी व बअज़े बदेसमूक मज्कूर रवां बाशद अझ थानह हर सालह इन्आमात खन्दनी गिरफ्तह खलल नमूदन व तश्वीश रसानीदन चह मअना दारद अक्नून मी बायद कह मौज़अ कारी व मौज़अ अन्बूरह व मौज़अ नाती व मौज़अ चिखलगांव मझ्बूर बइन्आम व हक लवाझिमह व पती पछोरी व बअज़े बह कानोजी जाधव देसमूक तपह मझ्बूर चुनांचह सालाबाद रवानस्त बदां मूजब रवां मी दाश्तह बाशन्द व इन्आमात खन्दनी बदेसमूक मज्कूर मुआफ फर्मूदह शुदह अस्त मुआफ दानिस्तह व बदेहाए मझ्बूर व बइल्लत आं व बहेच वज्ह मिन-उल-वजूह जर्रह तश्वीश न रसानन्द दरीं बाब ताकीद कुली दानिस्तह हस्ब-उल-हुक्म अश्रफ बअमल आवरन्द व हर सालह उज्र फर्मान न नमूदह साल बसाल बहर्मीं फर्मान रवां दारन्द व तअलीक नविश्तह गिरफ्तह अस्ल फर्मान बाझ गुजारन्द तादानन्द तहरीरन् फी तारीख बीस्त चहारुम माह जमादी-उस-सानी सनह १०६१ [समासांत *] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला[१]

१७

ले. ५०	हू—अल—कादिर	श. १५७३ आषा.व.१३
हि. १०६१ रजब २६	[समासांत मध्यें शिक्का*]	इ. १६५१ जुलै ५

मश्हूर-उल-अनाम अम्बाजी नागनात हवालदार किल्अह रोहीरह महज़ी नुमायद कह दरीं वला कानोजी जेधा देसमूक तपह भोंवर किल्अह मज्कूर मअलूम नमूद कह दरीं वक्त अझ थानह नौ जिक्र नमूदह बचहार देह इन्आम खूद व हक लवाझिमह व पती पछोरीरा इश्काल नमूदह इन्आम खन्दनी मीगीरन्द ईंचह मअना दारद अक्नून मी बायद कह देहाए इन्आमात व

१ अर्थासाठीं रामदास रामदासी अंक १२१ ऐतिहासिक कागदपत्रें पृ. ३२ पहा. तेथें मिती मात्र एक वर्षानें चुकली आहे.

हक लवाझिमह व पती पछोरी देसमूक तपह मज्कूर चुनांचह सालाबाद मातकद्म भोगोतह रवानस्त बदां मूजब रवां दारन्द व जिक्र नौ न कुनन्द व दर बारह इन्आमात खन्दनी जरह तश्वीश न दहन्द दरीं बाब ताकीद बलीग दानिस्तह बाझ फिर्याद आमदन न गुजारन्द कह देसमूक मज्कूर नफर कदीम व दौलत-ख्वाह अस्त झियादह कलमी न रफ्त तहरीर फी-अत-तारीख बीस्त व शशुम शहर रजब-उल-मुरज्जब सनह १०६१[1]

१८

ले ५१ जु. ३३ रमजान २७	हू-अल-गनी	श. १६११ आषाढ वद्य १४ इ. १६८९ जुलै ५

झुब्दत-उल-अमासिल व अल-अकरान यसवन्तराव बान्दल व पीलाजी बान्दल व शर्झहराव जेधे व खोन्दे देसमुख मश्मूल इनायत रोझ-अफ्झून बूदह बिदानन्द कह दरीं वला बावाजी नायक थोपते आमदह ज़ाहर नमूद कह कस्द आं मज्हर-उल-अअतमादान बमुलाझिमत सआदत अन्दूझान हुज़ूर मौरिद-उन-नूर अस्त बमूजब इज़्हार बावाजी मज्कूर बअर्ज़ मुकद्दस रसानीदह अम्र जलील-उल-कद्र बशर्फ निफाज पैवस्त कह बजम्इयत खातिर बयायन्द ता बमनासिब मअ्कूल सर-अफ्राझी याफ्तह बमस्कन खुदहा मुआवदत नुमायन्द व इन्शाअ अल्लाहु तआला कार शुमा हस्ब-उल-मुद्दआ सूरत पिजीर ख्वाहद शुद खातिर खूदरा अझ हमह बाब जम्अ दाश्तह झूदतर बरसन्द कह मत्लब दिल-ख्वाह सर-अन्जाम ख्वाहद याफ्त झियादह निगारिश न रफ्त बतारीख बीस्त व हफ्तुम रम्ज़ान सनह ३३ कल्मी शुद

सारांश

यशवंतराव बांदल, पिलाजी बांदल, सर्जेराव जेधे व कोंडे देशमूख यांनीं जाणावें कीं, बावाजी नायक थोपटे यांनीं समक्ष येऊन कळविलें कीं, तुमचा आमच्या नोकरींत येण्याचा इरादा आहे. बावाजीच्या म्हणण्याप्रमाणें हुजूरांस कळविलें तेव्हां हुकूम झाला कीं, तुम्ही स्वस्थ मनानें यावें. तुम्हांस योग्य ती मन्सब देऊन परत घरीं पाठवूं व तुमचें काम तुमच्या हेतूप्रमाणें होऊन येईल. तुम्ही लवकर यावें. ता. २७ रमजान जुलूस ३३

---

१ अर्थासाठीं रामदास रामदासी अंक १२१ ऐतिहासिक कागदपत्रें पृ. ३४ पहा.

८ पारनेर येथील दोन शिलालेख.

(श्री. ग. ह. खरे.)

प्रस्तुत शिलालेख मला पारनेर येथें संशोधनार्थ गेलों असतां मिळाले. यांपैकीं पहिला पारनेरच्या पूर्वेकडील वेशीच्या बाहेर पडतांच डाव्या अंगच्या बुरुजावर आहे. याची लांबीरुंदी ३', २" व ८॥" असून १" समास भोंवती सोडला आहे. दुसरा लेख पारनेर गांवांत देशमुखाची म्हणून म्हटली जाणारी जी विहीर आहे तिच्या दक्षिणेकडील भिंतींत आहे. याचा छाप लेख अडचणींत असल्यामुळें घेतां आला नाहीं. याची लांबी रुंदी २'–४" व १'–२॥" असून सभोंवती १" समास सोडला आहे.

१

ले. ५२ हि.१०९३ जु. २६ रमजान १	श. १६०४ भाद्रपद शुद्ध ४ इ. १६८२ आगष्ट २५

(१) [1]बकरम हक सुब्हानहु तआला व रसूल चूं[2] रफअत माब अब्द–उल–करीम खल्फ नाहरखान[3] गोरी फौजदार

(२) पर्गनह पारनेर बुर्ज सूए मश्रिक मुरत्तब साख्त बतारीख गुर्रह रम्ज़ान–उल–मुबारक सनह २६ वाला मुताबिक सनह १०९३[4]

---

१ वाचन प्रत्यक्ष पाहून व ठशावरून केलें आहे.

२ या शब्दाची जरूरी नाहीं.

३ नाहरखानाचे एक दोन उल्लेख इतरत्र सांपडतात. उदाहरणार्थ श. १६१० च्या एका पत्रांत मनाजी शंकर सरनाईक चांबळी यास 'खाने आजम नाहारखान गोरी ईहीं कौल देऊन आणिला तो सिरवलास आला' असा उल्लेख आहे. (शि. च. सा. ४०३). श. १६१३ च्या एका पत्रांत 'मागती न्यहरखान वांईस येऊन राहिला...' असा उल्लेख आहे (खं. २० पृ २०८) श. १६२१ च्या वाईकडील एका पत्रांत 'नाहारखान गोरीं फौजदार पा। मजकूर (वाई)' असा उल्लेख आहे (खं. २० ले. १६४). या तिन्ही उल्लेखावरून असें दिसतें कीं, नाहारखान हा मोगलांच्या बाजूनें वाईचा फौजदार होता. त्याचा मुलगा हाही मोगली तर्फेनं पारनेरवर फौजदार असणें अशक्य नाहीं.

४ या लेखांतील जुलूस सनाचा आकडा व त्याशीं जुळता असा हिजरी सनाचा आकडा हे दोन्ही स्पष्ट नाहींत. पण बहुधा २६ व १०९३ असे ते आकडे असावेत. हा जुलूस औरंगजेबाचा आहे हें उघड आहे.

सारांश

परमेश्वराच्या व पैगंबराच्या कृपेनें नाहरखान घोरी याचा मुलगा व पारनेर परगण्याचा फौजदार अब्दुल करीम यानें पूर्वेच्या बुरुजाचें काम ता. १ रमजान जुलूस २६ व हिजरी १०९३ या दिवशीं पुरें केलें.

२

ले. ५३ हि. ११०७ जु.४१ सव्वाल १७	श. १६१९ वैशाख वद्य ३ इ. १६९७ एप्रिल २९

(१) [1]बइस्म अल्लह–अर–रहमन–अर–रहीम औरन्गझेब आलमगीर

(२) वस्साफ मुनीर[2] अब्द–उल–करीम इब्न अब्द–उस–सलाम देसमूखह

(३) पर्गनह पारनेर हस्त अझ गुलामान शाह तारीख १७ शहर

(४) शव्वाल सनह ४१ अझ जुलूस वाला मुताबिक सनह ११०७ हिज्री[3]

[समासांत नागरी लिपींत *]११०७

सारांश.

पारनेर परगण्याचा देशमुख[4] व प्रकाशमानाचा स्तुतिपाठक अब्दुल करीम बिन अब्दुस्सलाम हा औरंगजेबाच्या चाकरांपैकीं एक आहे. ता. १७ सव्वाल जुलूस ४१ हि. ११०७*

---

१ वाचन प्रत्यक्ष पाहून केलें आहे.

२ या शब्दाविषयीं शंका आहे.

३ येथें तारखेविषयीं घोटाळा झाला आहे. ४१ जुलूसशीं जुळणारीं हिजरी वर्षें ११०८ व ११०९ हीं आहेत. मी जुलूस प्रमाण धरला आहे.

४ येथें हिंदू व मुसलमान अशा दोन्ही धर्माचे देशमूख आहेत.

* २० वें संमेलन.

ऐ. फा. सा. खं. १–८

९ बत्तीस शिराळें येथील एक शिलालेख.*

(श्री. ग. ह. खरे.)

सोबतचा लेख सातारा जिल्ह्यांतील बत्तीस शिराळें या गांवीं मिळाला. या लेखाचा दगड गांवाबाहेर असलेल्या गोरखनाथाच्या स्थानापाशीं एका कट्टयावर पडलेला आढळला. या लेखाशेजारींच एक भला मोठा गद्धेगाळाचें चित्र असलेला दगड पडलेला आहे. त्यावरून बऱ्याच लोकांनीं कल्पना केली होती कीं, गोरखनाथाच्या देवळाला दिलेल्या इनामाविषयीं हा दगड असून इनामाची शर्त मोडील त्यास शाप म्हणून गद्धेगाळ शेजारीं ठेवला आहे. पण खरें पाहिलें तर हा दगड, गद्धेगाळ व गोरखनाथ यांचा कांहीं एक संबंध नाहीं. हा दगड मूळांत एकाद्या मनुष्याच्या कबरीवर असावा. कालांतरानें ती कबर नाहींशीं झाली येवढेंच नव्हे तर कबरीवरील या दगडाचे ३ तुकडे होऊन एक तुकडाहि हरवून गेला. राहिलेल्या तुकड्यावरील लेखाचे छाप आपणापुढें ठेवीत आहे.

या लेखाच्या सबंध दगडाची लांबी रुंदी न देतां ज्या पंचकोनांत खालील लेख कोरला आहे त्याचीं मापें देतों. तीं अशीं:— पाया १′ उंची १′–३″, दोन्ही अंगच्या बाजू १′, शिरोबिंदूपाशील बाजू ७″. या लेखाच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, हा लेख दिसण्यांत जरी मोठा असला तरी त्यांतील बहुतेक भाग कुराणांतील किंवा मुहम्मदी धर्मातील इतर ग्रंथांतील अवतरणांनीं व्यापून टाकला आहे. लिहिलेल्या पांच बाजूंपैकीं फक्त एका बाजूवरच काय तो अवतरणाव्यतिरिक्त मजकूर असून तोच महत्त्वाचा मजकूर होय. या लेखाचें लेखन तुघ्र्याच्या रूपाचें आहे. तो मजकूर असा:—

ले. ५४	श. १४९५ आश्विन वद्य ७
हि. ९८१ जखर २०	इ. १५७३ आक्टोबर १७

(१) तारीख[1] वफात मग्फूर मब्रूर रहमतल्लहु अलैह

(२) मलिक यूसुफ[2] मुहम्मद शाह दर

---

* २२ वा वा. दि.

१ वाचन ठशावरून केलें आहे. २ या शब्दाविषयीं शंका आहे.

(३) रोझ चहार शुन्वह बीस्तुमं माह जमादी–उल–आखिर फी समह ९८१

सारांश

मलिक यूसुफ मुहम्मद शाह याच्या मरणाची तारीख हि.९८१ जमादिलाखर २० बुधवार ही आहे.

---

१० औरंगजेबाचीं ५ राजकारणीं फर्मानें*

(श्री. सर. आबासाो मुजुमदार)

सोबतचीं ५ फर्मानें श्री. हुलेसिंग मोतीराम इनामदार मु. संस्थान वाघाडी, ता. शिरपूर, जिल्हा प. खानदेश यांजकडील आहेत. त्यांचे सुमारें ४०।४५ कागद मीं आणलेले आहेत. पण त्यांपैकीं हे पांच बरेच महत्त्वाचे वाटल्यावरून आपणापुढें मांडीत आहे.

१

ले. ५५ } { श. १५९० आषाढ शुद्ध १०
जु. ११ सफर ९ } { इ. १६६८ जुलै ९

बिस्मिल्लह–अर–रहमन–अर–रहीम

[शिक्का व तुघ्रा *]

बतारीख नुहुम शहर सफर खतम ब–इल–खैर व अज–ज़फर सनह याझ्दह जुलूस मैमनत मानूस सिम्त तहरीर याफ्त[२]

[पाठीवर उजव्या अंगास शिक्का व पुढील शेरा *]

बरिसालह कमतरीन मुरीदान मुर्शद–परस्त जअफरखान

---

१ हि. ९८१ च्या जमादिलाखरची तिसरी तारीख बुधवारीं येत असून विसावी तारीख शनिवारीं येते. तेव्हां 'बीस्तुम' ऐवजीं 'सिय्युम' वाचणें हें जास्त चांगलें आहे. पण 'सिय्युम' वाचन करतां येईल अशाविषयीं खात्री देतां येत नाहीं.

* २० वें संमेलन.

२ या फर्मानावर शिक्का व तुघ्रा यांखालीं मजकूर न लिहितां जागा कोरी सोडली आहे व शेवटीं वरील तारखेचा मजकूर आहे. अशा कागदास डौल म्हणतात.

२

ले. ५६ जु. २१ सफर १	बिस्मिल्लह-अर-रह मन-अर-रहीम	श. १६०० चैत्र शुद्ध ३ इ. १६७८ मार्च १५

[शि. व तु *]

सियादत-पनाह शुजाअत-दस्तगाह फिद्वी लायक-उल-इल्तिफात व अल-इहसान मुख्तारखान बमर्हमत पादशाही उम्मीदवार बूदह बिदानद कह हुक्म जहां-मताअ आलम-मुताअ सादिर मी शवद कह झरी कह ता वसूल ई फर्मान वाला-शान दर खझानह आमिरह दार-उल-फतह उजैन फराहिम आमदह बाशद बइत्तिफाक निज़ाम-उद-दीन अहमद दीवान कह सामान व सर-अन्जाम बार-बर्दार व दीगर लवाझिम ख्वाहद नमूद रवानह हुज़ूर पुर-नूर नमूदह बादिलावरखान फौजदार रनूदह बरसानद व बफौजदारान शाह-राह यलींग मुअल्ला बखुदूर पैवस्तह कह अझ हुदूद खूद बसलामत बगुजरानन्द व अझ शरायत इहतियात व खबरदारी दकीकह अझ दकायक मुहम्मिल व ना मरई न गुजारन्द गुर्रह शहर सफर खतम ब-इल-खैर व अज-ज़फर साल बीस्त व यकुम अझ जुलूस मैमनत मानूस नविश्तह शुद

[पाठीवर शि. व पुढील मज. *]

बरिसालह नव्वाब कदसी-अल्काब आलम-मात्र रफीअ-जनाब गुर्रह नासियह दीन व दौलत कुर्रह बासिरह मुल्क व मिल्लत बहीन दौहह हदीकह उब्हत व इक्बाल करीन सुम्रह शुज्रह अज़्मत व जलाल शाहझादह नामदार कामगार आली-नसब वाला-तबार मन्ज़ूर नज़र हज़्रत आफ्रीदगार दुर्रत-उत-ताज सल्तनत अज़्मा वास्तत-उल-अक्द खिलाफत कुब्रा मुहबत-अन्ज़ार इनायत इलाही मत्लअ अन्वार मर्हमत ज़िल्ल-इलाही जलील-उल-कद्र मनीअ-उश-शान अज़ीम-उल-मन्झिलह समुव्व-उल-मकान फरूग दूदमान मुजद्द व करम पादशाहझादह मुहम्मद मुअज़्ज़म शाह आलम

सारांश.

मुख्तारखान यांनीं जाणावें कीं, फर्मान पोहोचेंपर्यंत उज्जयिनीच्या खजिन्यांत जो पैसा जमला असेल तो, सामान व सरंजाम आणि इतर

लवाजमा घेऊन येत असलेल्या निजामुद्दीन दिवाणाबरोबर हुजूरकडे पाठवून यावा आणि तुम्ही रनोय्याचा फौजदार दिलावरखान याजकडे जावें. राजमार्गावरील फौजदारांना हुकूम होत आहे कीं, त्यांनीं आपल्या हद्दींतून खजिना सुरक्षितपणें पार करावा आणि सदा सर्वकाळ खबरदार असावें ता. १ सफर जुलूस २१

३

ले. ५७ जु. २२ जिल्काद १७	बिस्मिल्लह–अर–रहमन –अर–रहीम	श. १६०० पौष वद्य ४ इ. १६७८ डिसेंबर २२

[शि. व तु. *]

सियादत–पनाह शुजाअत–दस्तगाह फिद्वी लायक–उल–इल्तिफात व अल–इहसान मुख्तारखान बमर्हमत पादशाही उम्मीदवार बूदह बिदानद कह चूं ऊरा मुहाफिज़त किल्अह गागरून[1] इस्तिअफा नमूदह हिफ्ज़ व हिरासत हिस्न मज्कूर बमुनव्वरबेग तफ्वीज़ याफ्त हुक्म जहां–मताअ आलम–मुतीअ शर्फ सुदूर मी पैवन्दद कह बअद वसूल ई फर्मान आली–शान बगुमाश्तह खूद कह दर किल्अह मज्बूर अस्त बताकीद बनवीसद कह किल्अह मस्तूररा बा आंचह अझ जखीरह व गैरह दर आं मव्जूद बाशद बद्र सिपुर्दह कब्ज़ बगीरद दरीं बाब कदगन दानद हफ्दहुम शहर जी–अल–कअदह साल बीस्त व दुव्वुम अझ जुलूस मैमतन मानूस तहरीर याफ्त

[पाठीवर ले. ५६ प्रमाणें मज. व शि. *]

सारांश,

मुख्तारखान यांनीं जाणावें कीं, गागरून किल्ल्याची रखवाली तुम्हांस माफ करून मुनव्वरबेग यास सांगितली आहे. तरी हा फर्मान पोहोंचतांच तुम्ही त्या किल्ल्यावर असलेल्या आपल्या गुमास्त्यास ताकीदीनें लिहावें कीं, त्या किल्ल्यावर असलेल्या सामुग्रीसह तो किल्ला मुनव्वर बेगाच्या ताब्यांत द्यावा व पावती घ्यावी. ता. १७ जिल्काद जुलूस २२

१ हा किल्ला राजपुतान्यांत झालरापटनच्या उत्तरेस आहे.

४

ले. ५८ } बिस्मिल्लह–अर–रहमन { श. १६०२ चैत्र शुद्ध ९
जु. २३ रबल ७ } –अर–रहीम { इ. १६८० मार्च २८

[तु. व शि. *]

सियादत–पनाह शुजाअत–दस्तगाह फिद्वी लायक–उल–इल्तिफात व अल–इहसान मुख्तारखान बइनायत पादशाही उम्मीदवार बूदह बिदानद कह हुक्म जहां–मताअ लाझिम–उल–इन्कियाद वाजिब–उल–इत्तिबाअ बइझ्झ निफाज मी पैवन्दद कह बअद वसूल ई मिसाल मकमत तिम्साल व रसीदन थानहदार मीमह बाखिद्मत फर्झन्द बर्खुर्दार सआदत-मन्द नामदार कुर्रह बासिरह दौलत गुर्रह नासियह सल्तनत ताझह निहाल बूस्तान रफअत नौबावह गुलिस्तान उब्हत नूर हदीकह शौकत व हश्मत सुम्रह दौहह अझमत व जलालत आली-निझाद वाला–गुहर बादशाह-झादह आलम व आलमियान मुहम्मद अक्बर[1] शिताफ्तह दर मुलाझिमत आं नामदार कामगार बाशद दरीं बाब कदगन बलीग दानद बतारीख हफ्तुम शहर रबीअ-उल-अव्वल साल बीस्त व सिय्युम अझ जुलूस मैमनत मानूस तहरीर पिजीरफ्त

[पाठीवर ले. ५६ प्रमाणें मज. व शि. आणि पुढील शेरा। *]

बमअरिफत कमतरीन फिद्वियान असदखान

सारांश

मुख्तारखान यांनीं जाणावें कीं, हा हुकूम पोहोंचतांच व मीमह येथील ठाणेदार येतांच तुम्ही धावून जाऊन चिरंजीव मुहम्मद अक्बर याची चाकरी करीत रहावें. ता. ७ रबिलावल जुलूस २३

५

ले. ५९ } बिस्मिल्लह-अर-रहमन- { श. १६०४ अ. चैत्र शुद्ध १
जु.२५सफर २९ } अर-रहीम { इ. १६८२ फेब्रुवारी २८

सियादत–पनाह शुजाअत–दस्तगाह फिद्वी लायक–उल–इल्तिफात व अल–इहसान मुख्तारखान बइनायत पादशाही उम्मीदवार बूदह

१ मुहम्मद अक्बर हा औरंगजेबाचा मुलगा असून तो बंड करून संभाजीकडे आला होता हें सर्वांस माहीत आहे. हें फर्मान तो संभाजीकडे येण्याच्या पूर्वीचें आहे.

बिद्‌गनद कह चूं दरीं वला अझ रूए वाकअह बअर्ज़ अक्दस अअला रसीद कह बिजयसिन्घ बाजम्ई दर जन्ग काल्वी नाहल बकार आमदह लिहाज़ा हुक्म जहां–मताअ गीती–मत्बअ शर्फ सुदूर मी पैवन्दद कह आं सियादत–पनाह बराए तन्बियह व तादीब आं मक्हूर[१] शकावत–शिआर अझ आं सिम्त अझ आब नर्बद्‌ह गुजिश्तह खुदरा ब आंजा बरसानद व अझीं तर्फ काकरखान[२] कह बजहत तमशिय्यत ई कार अझ हुज़ूर पुर–नूर मुअय्यन शुदह मीरसद बायद कह बइत्तिफाक ऊ दकीकह अझ दकायक इस्तीसाल व इस्ति-हिलाक आं मर्दूद फरू गुजाश्त न नुमायद व पर्बतसिन्घ झमीन्दार अवासरा कह नझ्द आं शहामत-द्स्तगाह आमद्‌ह रवानह बार्गाह अज़्मत व जाह कुनद कह बखिझत व मन्सब सर-अफ्राझी याफ्तह मुरख्खस ख्वाहद शुद दरीं बाब अझ पेशगाह खिलाफत अज़्मा निहायत कदगन शनासद बीस्त व नुहुम सफर साल बीस्त व पन्जुम अझ जुलूस वाला नविश्तह शुद

[पाठीमागें ले. ५६ प्रमाणें मज. व शिक्का.*]

[समासांत निराळ्या वळणांत*] हू-अल-गालिब हस्ब-उल-हुक्म-अल-मताअ अमल नुमायद ताकीद दानद

सारांश,

मुख्तारखान यांनीं जाणावें कीं, सांप्रत बातमी आली कीं, विजय-सिंग आपल्या जमातीसह ‘काल्वी नाहल’च्या लढाईत कामास आला. म्हणून हुकूम होतो कीं, तुम्हीं त्या दुष्टास तंबी व शिक्षा देण्यासाठीं त्या-बाजूहून निघून नर्मदा उतरून त्या ठिकाणीं पोहोंचा. हें काम चालूं ठेव-ण्यासाठीं येथून काकरखान नेमणूक होऊन तेथें येईल. तरी त्याच्यासह क्षणोक्षणीं त्या निर्वासित मनुष्यास मारण्यास चुकूं नये. आपल्या जवळ

---

१ येथील मक्हूर किंवा पुढील मर्दूद कोण ? संभाजी असेल काय ?

२ काकरखानाचा काफीखानानें एके ठिकाणीं उल्लेख केला आहे. ज्या प्रसंगांत काकरखानाचा उल्लेख आला आहे, तो. हि. १०९१ चा म्हणून काफीखान सांगतो (E. D. VII ३०६). पण सरकार हा प्रसंग सांगतांना काफीखान वर्षें सांग-तांना चुका करतो असा शेरा मारून तोच प्रसंग हि. १०९२ मध्यें ओढतात. हें फर्मान त्याहीनंतर एक वर्ष पुढलें म्हणजे हि. १०९३ मधील किंवा जुलूस २५ चें आहे.

आलेला अवास येथील जमीदार पर्वतसिंघ यास दरबाराकडे पाठवून द्यावें म्हणजे त्यास चाकरी व मन्सब मिळून परत जाण्याची परवानगी मिळेल. या बाबतींत खूप ताकीद जाणावी. ता. २९ सफर जुलूस २५

११ खानापूर घोरपडे.*

(श्री. ग. ह. खरे)

कांहीं दिवसांपूर्वी कोल्हापूर संस्थानांतील गारगोटी पेट्यापैकीं खानापूर येथील श्री. पंडितराव दत्ताजीराव घोरपडे यांनीं ५६ फारसी व मराठी कागद मंडळाकडे पाहण्यासाठीं आणले. त्यांपैकीं महत्त्वाचे फारसी कागद येथें देत आहे. मराठी कागदही शिवचरित्र साहित्यांत छापले जातील.

१

ले. ६०	बिस्मिल्लह-अर-रहमन-	श. १५७८ मार्गशीर्ष व. १०
हि. १०६७ सफर २४	अर-रहीम अल्मुल्कुलिल्लह	इ. १६५६ डिसेंबर १

[फा. शि. *]

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त आंकह झुब्दत–उल–अश्बाह व अल–अक्रान रौलोजी घोरपरह ब इनायात बीगायात शाहानह [व*] नवाझिश इल्तिफात खुस्रवानह मुम्ताझ व सर–अफ्राझ बूदह [बिदानद कह] दरीं अय्याम मैमनत अगसार नुस्रत–अन्जाम अर्ज़दाश्ती कह बमुतज़म्मन इरादह उत्बह–बोसी दर्गाह फलक–बारगाह इर्साल दाश्तह बूद बवसीलह ईस्तादगान पायह सरीर खिलाफत मुब्सीर रसीद मअरूज़ नमूदह बूद कह खूद बन्दह कदीमी दर्गाह हश्तम व बेरोझगार ईम व अझ हेच जा मुकासाई व तअल्लुक न दारीम चूं ई मअना साहिब आं झुब्दत–उल–अश्बाह व अल–अक्रान बअर्ज़ रसानीद बगायत मुस्तहसन उफ्ताद व मत्बूअ तबअ अश्रफ गर्दीद मी बायद कह खातिर खूद बहमह अब्वाब जमअ दाश्तह खूदरा बझूदीझूद नझ्द नूर हदीकह दौलत व बख्तियारी नौबावह बा इनान हश्मत व बरखूरदारी सआदत–मन्द

---

* पा. स. ६।१८५४

माइगुडा कुलकरणी कुलकरणी
+ + + जी नाग
.... कुलकरणी गोठखिडी
जे नागठाणे अमरोजी पटेल
खेलो पाटील
+ + + +
+ + + जोगदेउ राम ईसर कुल-
+ + + चौगला करणी अज—
जाहाती तिमाजी
सुरदेउ कुलकरणी

मौजे येड मौजे कुडल
अमरोजी पटेल सोनजी पटेल जानो पर-
तानुगुडा मो- राणोजी वा मानद कु-
+ + + कदम विलाजी लकरणी
+ + जोसी राहुजी चौगला वा पटेल

मौजे खेड मौजे सिरगाऊ
साबाजी पटेल वा लखमोजी
.... पटेल हिरगुडा पटेल चवलेजी
चौगला चौगला
नरसोबा बालोबा मौजे कोनगाउ
कुलकरणी रामजी पटेल गोविंद
चौगला

मौजे थानपडे मौजे देवरठे
+ + मजी पटेल तुको पटेल
नागोजी मै-
नरसो पटेल रोबा कुल-
करणी

मौजे बाहे

अमणो चौगला

+ + जी पटेल

कृष्णोबा कुल-

करणी

समस्त हाजीरानी तपे वालवे मु॥ किले पनाले सु॥ तिसा तिसैन वा तिसा मया कारणे जाहाला माहाजर यैसाजे........गदेउ देसकुलकरणी तपे वालवेचे देसकुलकरण चालवीत होता जोगोवा मागको दोघेजण किले मज- कुरासी येऊन मालूम केले जे देसकुलकरण आपले तानो मेगदेऊ चालविती मुनासिपी करणे म्हणौऊन त्यावरी तानो मेगदेसी तलब करून किले मज- कुरासी आणविले आणि साहेबानी दोही वर्गाचिया तकरीरा मनासी आणिले तानो मेगदेने केली तकरीर जे कारकीर्दी इ[सू] फकोचक कारकीर्दी रहान दिलावरखान कारकीर्दी खाने अजम अजमखान अजी कारकीर्दी शाहा- तकी वा कारकीर्दी खजीना होनो पंडित यैसे चालवीत होतो वा कार- कीर्दी कामीलखानाचेहि चालवीत होतो पुढे कामीलखानाचे कारकीर्दीसी अपुले भाऊ रायोबा चालवीत होता मीरजमाल ठाणदार कामीलखानाचे वेलेसी मलीसेटी बिराजर पोससेटी भेटला पेसकसी देऊन विलातीचे सेटेपण कबूल केले त्याणे जोगोबा येडकरासी घेउन आला आप (णा) बराबरी राहाविला विलायेतीमधे मोबलग गैर माहासूल करू लागला त्याचे भेणे देसाई पटेल वा कुलकरणी बाहीर गेले पुढे रायो विजदेऊ अपुले कामासाठी [वलु ?] कसबे मजकूर तेथे आला होता त्यासी पालती लाऊन दस्त करून गावात घेऊन गेले होन २०० करार करोन (?) माराखाली मारून खारे केले अजी जोगोने होन १०० कबूल करून देसकुलकरणासी दखल जाहाला जोगोवा माणको केला तकरीर यैसे जे आपुले मिरासी नव्हे आपणासी कामीलखानाचे कारकीर्दीसी मीरजमाल ठाणदार त्याणे अपणासी होन १०० पेसकसी घेऊन देसकुलकर(ण) दिले पर मिरासी

अपले नव्हे त्यावरी उभे वर्गाचे तकरीरा मनासी आणिले त्यावरून मिरासी तानो मेगदेचे यैसे मनासी अले तो व जोगो माणको नफराई करून म्हणौन देवराया बराबरी किले मजकुराहून विलाती तपे मजकुरासी गेले जाऊन विलातीमधे देसाई पटेल वा कुलकरणी यासी धरून मारामारी करून बंदखानि राखिले महिने ४ वरी राखोन तफत्रासी केले सेवटी त्यावरी लाजिमाती काढिले त्याबदल किले मजकुरासी हुजर देसाई वा पटेल वा कुलकरणी का मजकूर आणविले वाखनिसी करविता येकजरेचे रवेनंत नाही वा येकजरा लाजिमात नाही नफराई साठाऊ नाही अणी विलाती हडबी, करून विलाती खारे केले वा विलायेतीमधे ताहासील तलब तेही खोबली यैसे साहेबी मनासी अणिले वा मजालसीयाचे मनासी आले जे जोगोवा माणिको मिरासी नव्हे पेसकसी वा नफराई कबूल करून मिरासी ....त्यावरून तानो मेगदेऊ याचे देसकुलकरण यैसे मनासी अले तानो मेगदेऊ देसकुलकरण मिरासी तपे मजकूर सही हा माहाजर सही

---

१७ मुंगसेरच्या कुलकर्णाची विक्री.*

(श्री. शं. ना. जोशी वांई.)

ले. ७१६ मू. द्दा. प.	श्री	श. १९३० मार्ग. शुद्ध १३ इ. १६०८ डिसेंबर ९

नकल

सके १९३० किलकनाम सवछरे मार्गेश्वर शुा १३ त्रयोदसी ते दिवसी तिमाजी गर्गे धर्माधीकारणी मौजे मुंगसेर पाा दिंडोरी यासी गोमाजी पाा व पुज पाा व राघो पाटील म्हईसधुणे मोकदम मौजे मजकूर लिहून दिल्हे ऐसे जे मौ मजकूरचे कुलकर्ण बालो राम वर्पा होता तो कुलकर्णाचे काम चालवीत आसतां यावरी सितापन मुलूक मोकासाई गावास

---

* पा. स. १०|१८५३

आले तेहि गांवचा साळझाडा हिशोब पाहातां होन चाळीस त्याचे आगीं लागले त्याजबा। त्यास तगादा करून गुन्हेगारी होन दाहा येकूण होन पनास त्याचे सिरी ठेविले उगवणीस जागा नाहीं मग तुम्हापासून आपण जमान होऊन कर्ज घेऊन बाळो रामास दिल्हे बा। खत रुजू शके १६२७ पथरासे सतावीस विश्वावसूनाम सवसरे नख्त होन दाहा व [गला] खंडी ७ सात हे बजिनस तुम्हापासी आहे यावरी तो बाळो राम मयेत जाला तुम्ही आपणासी नि। सदरहू कर्जाची लाविली त्यास आपणास द्यावयास जागा नाही बाळो रामाची बाईल गंगाबाई व मूल वर्षा आठाचा आहेत हे दोघे आंतोपंत कुळकर्णी कसबे नासीक याचे घरी आन उदक खाऊन आसेत त्यास आपण पुसिले कर्जाचे काये करितां यावरी तेहि बोलिले जे आपण मफिलीस येका दिवसाचे खावयास नाही तरी गर्ग याचे कर्ज हमइसाई आहे त्यास कुळकर्णाची मिरास करून देणे आंतोपंताचे हुजूर बोलली यावरून आपण व गोमाजी देशकुळकर्णी पा। मजकूर व म्हावजी नाईक व बाळोजी जुंझारराव पिंगले मोकदम मौजे आघ्रोटे पा। मजकूर हे बसोन तुम्हास कुळकर्णाची मिरास करून दिल्ही असे सुखे लेकराचे लेकरी खाणे यास कोण्ही हिला हरकती करील तो दिवाणचा गुन्हेगार व गोताचा आन्याई गाती मोईन नतर होन ३ तीन व गला खंडी २ दोन व मागणे भटाबरोबरी आ ब पेस येक व तूप पित्रास सेर दोन येणे प्रो घेत जाणे यास अनसारिखे जो करील त्यास गदागाळी आसे हे लिहून सही

बी। आनाजी कुळकर्णी मौजे आघ्रोटे

गोमाजी पा। मोकदम नागर	पुंजा पा। मोकदम नागर
भिक पाटील खंडागला प्रम	राघ पा। मोकदम नागर
मौजे मा।र	बाळोजी जुंझारराव मौजे [आघ्रो] टे
नावजी कामेथा (था) मौजे मा।र	रवकोळी मो। मजकूर

तुकू तेली मौजे मार	सिवजी सुतार
वर्तीकार मौजे मजकूर	गावजी लोहार

१ भिम राऊत
१ चाव्हा राऊत
१ रेक राऊत
—
३

नि॥ विला दोर

१८ चंद्रराव, शिवाजी व नामदारखान.*

(श्री. शं. ना. जोशी वांई.)

ले. ७१७ }
मू. दा. प. }

श्री

{ श.
{ इ.

श्रीमंगलमूर्ती

कारकीर्दा राजश्री सिवाजीराजे भासले यानी चद्रराऊ मारून जाउली कबज केली तेथील सुभा राजश्री कृस्णाजी बाबाजी यास सागितला व राजश्री विरो राम यास मजमू दिल्ही ते समई गणसेटी सेटे जाउलीस होते त्यास बोळाऊन आणऊन पुसिले जे हतळोट व पारघाटी कोनकोन हकदार हक काये काये घेतात पुरातन कैसे चालत अले अहे ते हकीकत तपसीलवार सागणे म्हणऊन गणसेटीस पुसले गणसेटीने जाब दिल्हा की येथे डागी पतकी हकदार अहेत याखरजि कोन्ही हकदार नाहित त्यावरी रो सुभेदार यानी पुसिले आपला मानभाग डागी पतकी यावरी सालसमधी पासोडी १ काबत्ळ १ येकून दोन सनगे द्यावी यैसे सालाबाज चालत अले अहे यैसे सागितलियावरी डागी पतकी यास बोलाऊन पुसिले जे घाटी हकदार कोन कोन अहेत हे सागणे त्यास डागी पतकी यानीं हकीकत

---

* पा. स. ५।१८५४

जाहीर केली की सा [ला] बाज हकदार हक घाटी दर बैली श्री वरदाइनी रुका ८१ यक व डागीपतकी रुके ८२ दोन आहेत व हतळोटकर यास हतलाटी रखवालीचा दर बैली रुका ८१ यक व गुधाडी बहुळेकर यास रखवालीचा दर बैली रुका ८१ यक आहे याखेरीज हकदार कोन्ही नाही त्यावरी राजश्री सुभेदार यानी हुकूम केला की सालाबाज चालत आले आहे त्याप्रमाणे चाकरी करून हक घेत जाणे येसे हुकूम केला त्यावरी राजश्री कृस्णाजी बाबाजी सुभेदार यास राजश्री राजेसाहेबी कोकणात नामदारखान मोगळाकडून अला त्यावरी हशम बराबर देऊन रवाणा केले त्यास नामदारखान मोगल यासी युध्या मिरे डोगरी जाले[1] तेथे कृस्णाजी बाबाजी सुभेदार पडिले त्या माघे रो (अपूर्ण)

---

१९ खानापूर–घोरपडे.

(श्री. द. वि. आपटे, व श्री. ग ह. खरे.)

हे कागद कोठून आले तें इतरत्र (ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ पृ. ६४) सांगितलें आहे. पुढील कागद आम्ही दोघांनीं तपासून निवडून काढले आहेत.

ले. ७१८ } श्री { श. १५४७ आषाढ वद्य ४
मू. दा. प. } { इ. १६२५ जुलै १३

[डाव्या अंगास पड्दळी शिक्का व त्यावर " व चिनोजी " हीं अक्षरें *]

श्री सभुदेवाचे अण असे

०॥ द कौलनामा राजेश्री घारराऊ [व] चिनोजी राजे देसमूख पा फलेटण ता राजेश्री खंडोजी राजे व राजेश्री बाजीराजे घोरपडे[2] मोकदम मौजे कापसी पा मजकूर सु॥ सीत इसरैन अलफ कारणे दिल्हा

---

१ पहा शि. च. प्र. जेधे शकावली पृ. २२

२ पहा ऐतिहासिक फारसी साहित्य खं. १ ले. ४८

कौळूनामा येसा जे मौजे मजकुरीचे पटेलगी पेसजी तुमचे वडील चालवीत होते हाली दरम्याने बोबडे हरकत करून पटेलगी चालविताती म्हणौउनू तरी बोबडे गैर मिरासी त्यासी दूर करुनू तुमचे पटेलगी तुम्हासी दिल्हे असे तुम्ही मौजे मजकुरी रयेत लोकासी तकवा दिलदारी देउनू किर्दी मामुरी करुनू सुखे असणे यासी अनसारिखे असे तरी श्री ———

हा कौळू सही

तेरीख १७ माहे सौवाल

ले. ७१९	श. १५४७ आश्विन शु. १
मू. द. प.	इ. १६२५ सप्टेंबर २२

॥ द [आरंभीं बदामी शि.*]

आज रस्तखाने मसुर [ल*] आनाम राजेश्री कोबाजी राजे खडाडे[१] दाम वजारतहू ता॥ हुदेदारानी व मोकदमानी व रयानी मोजे कापसी पा॥ फलेटण बिदानद सु॥ सीत[२] इसरीन आलफ खडोजी वा बाजी घोरपडे[३] पटेल मौजे मजकूर माळूम केले जे आपणासी मौजे मजकुरी इनाम ता॥ पटेलगी चावर नीम आसे आपण दिवाण नफराई सचणी रचणी किर्दमामुरी करावया तकसीर करीत नाही तरी साहेबी सदरहू खेरीज ज्याजती चावर -॥- देखील मला मऱ्हामती केलिया खातीरजमासी साहेबाचे नफराई किर्दी मामुरी करून बराये माळुमाती पटेलानी खातिरेसी आणुनू इनाम[२] जमीन चावर येक १ बी॥

कदीम चावर -॥-	ज्याजती मऱ्हामती चावर -॥-
	मला बिघे वीस जिराती
	८२० -॥०

---

* पा. स. ७११८५४

१ पहा ऐतिहासिक फारसी साहित्य खं. १ ले. ३५

२ हा शब्द रेघेवर. ३ पहा पृष्ठ ७० टीप २.

येणेप्रमाणे जमीन सदरहू देखील मला माहासूल वा नख्तयाती वाजे[1] बाजे उजाहाती कुलबाब कुलकानूसी दिले असे दुमाला करून दस्तीबाद कीजे तालीक लेहून घेउनू आसल परतौनू दीजे या इनामस मुसल .न होउनू इस्कल करील तरी त्यासी सोराचे सोगद वा हिदू होउनू कुसूर करील त्यासी गाईचे अण असे पिढी दर पिढी लेकुराचे लेकुरी चालवीजे मो।

तेरीख १ माहे

मोहरम

ले. ७२० }
मू. दा. प. }

श्री

{ श. १५५० आषाढ शु. ३
{ इ. १६२८ जून २४

[आरंभीं चौ. शि. व समासांत 'रवा सूद' हीं अक्षरें*]

आज रख्तखाने मा। हा। राजश्री मुधोजी वणगोजी नाईक खलद अयाम दौलतहू तां। विठोजी घोरपडा मोकदम व प्रजा मौजे कापसी पा। फलटण बिदानद सु॥ सन तिसा इशरीन आलफ पा। मजकूर हजरत आलम पन्हा साहेबी[2] आम्हास मुकासा मऱ्हामत केला आहे तुम्ही कोणे बाबे ता।ळूक आदेसा न करिता कवीहाल होउनू किर्दी मामुरी करून सुख आसणे पा। मजकुरीचे देसमुखीचा फरमानही आमचा आला आहे तुम्हास लागले ढपेचा कौळू आसे दर निसबत विलाती किर्दी मामुरी करावयासि तकसीर न करणे [नि*] मोर्तब [ब. मो.]

[पाठीवर *] तेरीख २ जिलकादा माहे जिल्काद

ले. ७२१ }
मू. दा. प. }

श्री

{ श. १५५० आश्विन शुद्ध २
{ इ. १६२८ सप्टेंबर २०

महजर बतेरीख छ १ माहे सफर हाजीर मजाळसी कारकून कारकिर्दी खान आजम अंबरखान साहेबू दाम दौलतहू

---

१ जे गाळा. २ पहा राजवाडे खंड १५ ले. ३२७.

शाहूच्या दरबारांतील चर्चा.*

(श्री. द. वि. आपटे)

ले. २३० } छ २४ रजब { श. १६६१ आश्विन व. ११
मू. दा. प. } श्री पै { इ. १७३९ आक्टोबर १७

पुरवणी तीर्थरूप राजश्री राउ तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंति उपरि आजी दरबारास रात्रीं गेलो होतों येशास चर्चेवरून चर्चा राजश्री रामाजी दामोदर यानी काढिली की राजश्री आवजी कवडे औरंगाबादेकडे गेले होते त्यास पूर्वी राजश्री पंत प्रधान यांची दारु गोली येत होती ती मार्गी एका गांवकरियानी अटकाविली होती तो गांव आवजी कवडियानी मारुन दुसरे गावांवर जाऊन बसले होते त्यावर औरंगाबादेहून अजम जमा खुलीस .... छापा घातला जुझ जाले आवजी कवडे निघाले म्हणुन वर्तमान सांगितल तर याचे कसे काय वर्तमान स्वामीकडे आले असेल ते सविस्तर ल्याहावे विदित जाले पाहिजे * सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना

हिंगण्यांचीं दोन पत्रें†

(श्री. द. वि. आपटे)

हीं पत्रें रा. दत्तोपंत पोतदार यांच्या संग्रहांतली आहेत. त्यांचा काल मला निश्चित करता आला नाहीं परंतु त्यांतलें एक थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीतलें असावें व दुसरें सवाई माधवरावाच्या वेळचें आहे असें वाटतें.

ले. २३१ } { श.
मू. दा. प. } श्री. { इ.

राजश्रि बापूजी महादेव व राजश्री दामोदर माहादेव गो.

उपरि तुम्हीं चिठी पाठविली पावली पातशहाची कांहीं जवाहीर द्यावे

* पा. स. ११।१८४४. † पा. स. १६।१८४०;
ऐ. सं. सा. खं. २–६

व शहरात पटी केली आहे याजमुळें हडताल पडली आहे परंतु काम झाले हेच उतम म्हणूण तुम्ही लिहिलेत त्यास गोरगरीब याजवरी पटी घालोन रुपया घेणे हे गोष्टी कार्याची काय मातबर बकसी व खान सामा वगैरे याजवरी पैका पेसजी घातला आहे त्याप्रमाणे त्याजपासोन घ्यावा यैसे असतां शहरांत पट्या तुम्ही करवितां हे अपूर्व आहे अथःपर पटी शहरांत न करणें थोरथोरांवरी पहिला रुपया घातला आहे त्याणी कबूल केला आहे. त्याजप्रमाणे वसूल घेणे गोरगरीबावरी पटी न घालणे जाणिजे छ १४ सवाल याचा अर्थ काये म्हणाल शहर थोर आहे हरताल पडतील पैसा वसूल येणार नाहीं अखेर बदु मात्र व्हाल व शहरापासून रुपये घेतल्यानें उतम दिसत नाही बद नक्षहि आहे ऐसी दोहीकडून तोटा च आहे तुम्ही रगडून कारभार करून यावयापूर्वी गंगोबा याचे व तुमचे विचारे जाहाले आहे त्या डौलावर करणे लबाडी कोणी करील त्याचे तोंडावर हाणावीं सारे शहर बदु करावे हा कोण विचार सारा नवाच कारभार न करणे वजीर मन घालीत नाही याचा भाव कायेत्याणे आपले जातीचे पंचवीस द्यावे ते येकी- कडेच टाकिले आहे व ताकीद हि करति नाहीत हे आपूर्व व तुम्ही शहरा बदु करून पैसा हि नाही ऐसे कराल हे कामाचे नाही लौकर आधी आकरा चिठ्या टिपेस मुदत कबूल करणार नाही व पाचाचे किंवा साताचे जवाहीर कबूल केले आहे ते वसूल करून पाठवणे जवाहीर सा [रफेवार]? घेऊं किंवा आज बाजारात विकले तरी विकून रुपया येई ऐसे करणे सारी लबाडी केलिया फल उत्तम नाही बहुत काय लिहिणें सारांश आम्हास पैक्याचीं गरज मग काही करा नाहीतर शहरच बदु होऊन पैका काही नाही ऐसे जाहाल्यास फजीती मात्र आहे. बहुत काय लिहिणे.

लेखन

सीमा.

पौ छ १४ शवाल.

ले. २३२ } श्री { श.
मू. दा. प. } { इ.

यादी देवराव माहादेव सरकारांतून आम्हांस नेमणूक रुपये ४०००० चालीस हजार पूर्वीपासून आहे त्यास आंतरवेद प्रांती सरंजाम नेमून दीधला तेथे आमल सरकारचा न राहिला सबब राजश्री मल्हारजी होलकर यानी व आपण पत्रे सरकारांत लिहिली की आंतरवेद प्रांती दुंडी होते यास्तव सरंजाम दुसरे जागा नेमून द्यावा त्याजवरून सव सीत सबैनचे सालात सरकारांतून यादी करार जाली की वीस हजार रुपयाचा सरंजाम प्रांत बुंधेलखंड येथे करार करून दीधला आहे व पुढे आंतरवेद सुटल्यावर बाकी वीस हजार रुपयाचा सरंजाम हरयेक माहाली लाऊन दीधला जाईल म्हणून आहे त्यास सांप्रत साहेबानी आंतरवेद सोडविली आहे यास्तव बाकी वीस हजाराचा सरजाम लाऊन देण्याची सनद सरकारची साहेबाचे नांवे घेऊन सोईची जागा वसूली तालुका लाऊन देऊन चालवावा ये विषई आपले आभय आसावे

बाजीराव बल्लाळाचें अंबाजीपंतास पत्र.*

(श्री. द. वि. आपटे, कै. पां. न. पटवर्धन)

ले. २३३ } श्री. { श.
मू. दा. प. } { इ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसांवी यासि

पोष्य बाजीराउ बलाल नमस्कार विनंति उपरि येथील कुषल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणे विशेष तुम्हाकडून येकदोन पत्रे आली व चिरंजीव राजश्री चिमाजी याणी लिहिलें त्यावरून सविस्तर अर्थ कळो आला यैसीयासी मुलकाच्या बंदोबस्ताबद्दल फौज या प्रांते ठेवावी लागते

---

* पा. स. १३।१८४०.

त्यास फौज काही आगेजणी केलीयाखेरीज राहाते असे नांही यास्तव तुमच्या आगमनाचा मार्ग लक्षावा लागला तरी जे क्षणी तुम्हास पत्र पावेल ते क्षणी अविलंब स्वार होऊन आलिया उतम आहे पूर्वी हि पत्रें पाठविली आहेत परंतु यावयास विलंबावर घातलें या उपरीं दिरंग लावावा यैसे न करणे त्वरने आले पाहिजे तुम्ही येथे आलियावरी येथील बंदोबस्त तुमचे स्वाधीन करून राजदर्शनास जावे लागते*उयाणी राहावे त्याणी अंगेज करून बाकी भरावी आणि लोक ठेवणे ते तुमचे विचारे ठेवावे लागतात आम्ही हांडे सरकार इजारा करून घेतले खरगोण ची बोली औरंगाबादेस गेलियावरी करून ध्यावेसी केलीं आहे ते हि होईल साराच प्रसंग इकडील अनकूल केला परंतु तुमचे येणे मुळे तटला आहे तुम्ही आलियाविना कांही होत नाही तरी लौकर लौकर येणे आलियावरी तुम्हास ठेऊन आम्ही हुजूर जाऊन कळले पाहिजे विना तुम्ही आल्याखेरीज येक राऊत राहात नाही कठाजी कडील कारभार तसा च बुडतों सर्व प्रकारें आमचा घात न करणे लोकर येणे की पुढे तरी मामलियाची सावरासावर होईल वारंवार ल्याहावें तर अडलेसे दिसते परंतु न लिहिता तरी उपाय नाही लौकर येणे तुमचे येणे जाल्याखेरीज आमचे येणे होत च नाही लोभ असो दीजे हे विनंति

वसईच्या वेढ्यासंबंधीं पत्रें.*

(श्री. द. वि. आपटे)

ले. २३२ } बधुजी श्री { श.
मू. दा. प. } { इ.

श्रीमंत् राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक, सुभानजी सिंदे मुकाम घोडबंदर कृतानेक रामराम विनंती येथील वर्तमान तर लोकानी आठ महिने स्वामीसेवा केली आण लोक ऊर्जित जाले नाहीं म्हणौन श्रमी आहेत आण गनीमांचे वर्तमान तर हमेशा

---

* पा. स. २५।१८७१

वसईहोन दाहां पांच गलबते बंदरात येत होती त्यास येके दिवसी गनीम बदरांत येऊन कडेस उतरला इतकियात त्रिंबक केशव बोरघाटात होते त्यास याजवल सेदीडसे माणुस होते त्यास याणी गनीमांवर घातले गनीम मोड्न गलबतावर घातला त्याची येक दोन माणसे पडली त्याजपासून गनीन बंदरात येत नाही राजश्री त्रिंबकपंत याणी व तुकोजी निकम याणी दोहो चौंहो जागे स्वामीसेवा बरीच केली परंतु ह्यांचे व ह्यांच्या लोकाचे ऊर्जीत होऊन आले नाही बरे काजाकामाचे माणूस आहे त्याचे स्वामीनी चितात धरून ऊर्जित केलियाने उत्तम आहे बहुत काये लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विज्ञापना.

ले. २३४ } श्री. { श.
मू. दा. प. } { इ.

श्रीमत राजश्री आपा स्वांमिचे सेवेसी विनति यैसीजे लोकास इजाफा करणें व कित्येकांस अल्फागिरे व रुमालं देणे माणुस पाहून दिल्हे पाहिजे कितेक लोकास कमशेरा आहे त्यांस शेरासात प्रमाणे करावा लागतो त्यांचे हातोनं कामे पूर्वी स्वामीही घेतली व पुढे स्वामी घेणार समर्थ आहेत. त्याचे सरजामीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत विशेष स्वामीही तीही.... काठीयासी येकदा भला माणुस येक खावद करूनं त्याचे हवाली सालिनां सरजाम करूनं बंदोबस्त करविली पाहिजे विशेष पूर्वी मराठे लोकासं तैनात कमी आहे आण परदेसीं लोका बारा मुलूकचे आण त्यासं सात आठ प्रा सामी तैनात करितात तें देखोनं मराठे लोकं कटकटीस येतात ते लोका रात दिवस कसालेयाचे माणूस आहेतं त्याचा सरजाम लिहिले प्रा करावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेतं विषेश राजश्री मलोजी थोराथ याजकडीलं स्वार येकसे बावन आले आहेतं त्या प्रौ शंभर धारावीस पाठविले वं राजश्री बालाजीपंत वं स्वार ५२ बावन यैसे ठाणियासी आहे येकूण येक से बावन राउतं येथील राउताचे सिरस्ता रोजमुरा पावतो त्याप्रमाण हे मागतातं राजश्री वासुदेव जोसी याही सरासेरी राउतासं सा आणे सात आणे

रोजीना नेमणूक करून पाठविली असे त्या प्रमाणे आम्ही देतो त्यास ते मान्ये नाही त्याही सेवेसी विनंती लि॥ असे त्यावरून विदित होऊन येईल आज्ञाधारकाच्याने बगर सनदी काही जाजती देवत नाही सेवेसी श्रुत होये त्यास आज्ञा काये ते केली पाहिजे आ ज्ञा ते सिरसा हे*विज्ञापी.

विठ्ठल शिवदेव याची गुजराथेवरील स्वारीची तयारी†

(श्री. द. वि. आपटे)

ले. २३९ } मू. दा. प. } श्री. { श. १६७३ अश्वीन वद्य ३ { इ. १७५१ सप्टेंबर २६

श्रीमत् राजश्री साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक कावजी नाईक जासूद मु॥ विचुर चेरणावरि मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ १६ माहे जिलकाद पावेतो साहेबाचे कृपादृष्टि करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष फैजचे वर्तमान तरी नि॥वार नेमणुक राउताची केली आहे त्याची हजीरी आठशे पावेतो राजश्रि विठलराव याची साडेसातशे पावेतो येकूण पंधराशे सोळाशे पावेतो विचुरापासून वेलवा............ कोशावर आहे तेथे फौज जमा होत आहे साहेबाचे सेवेसी श्रुत होव आणखी रोजचे रोज दाहावीस जमा होत आहेत दिपवाली पावेतो झाडून जमा होईल राजश्री विठलराउ दसऱ्याचे दिवसी मूर्त करून लस्करात गेले होत फिरोन दुसऱ्य दिवसी आले निमित्य की राजश्री जैसिंगराव गायकवाड याजला व्यथचा चढ भारी जाहाला याकरिता परतुन विचुरास आले त्यास व्यथ भारी आहे उतार पडत नाही औशध उपाये करीतच आहेत मूर्त पाहून राजश्री विठलराव येका दो रोजी फौजत जातील राउताचे गणतीस कारकून पाठवितात

---

* 'हे विज्ञापी' ही अक्षरें निराळ्या वळणाची आहेत. † पा. स. ७।१८४०

त्याजबराबर मजलाहि पाठवीत असतात त्यावरून फैजची आटकल साहेबाच सेवेसी लि॥ असे राजश्री विठलराउ येक दोन वेळा बोलत होत की जैसिंगास कोठ ठेवावे म्हणौन हुजूर लि॥ त्याचे उतर येत नाही साहेबाच लि॥ येत म्हणजे जैसिगाची विल्हे करून खानदेशच्या घाटाचे तोंडी जोतो यैस बोलत होते ताजे वर्तमान आले आहे की खंडोजी बाणराव[1] नवापुरावरी आला आहे तो भोडगावास[2] येणार त्याजबरोबर फैज काय आहे त्याची आटकल आली नाहीं त्यास येथून जासूद जोड्या पुढ बातमीस रवाना केले आहेत जैसिंगाबराबर दाहा बारा माणुस जमा होत ते सार दूर करून पाच आ॥ नेहमी ठेवल्या आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

ले. २३६ } श्री. { श. १६७३ अश्वीन वद्य १२
मू. दा. प. } { इ. १७५१ आक्टोबर ५

श्रीमत राजश्री नाना
साहेबाचे

खिजमतीस कावजी जासूद का॥ विंचुर येथील कुशल आस्वीन वद्य १२ येथास्तीत जाणौन स्वकीये कुशल लेखनार्थ आज्ञा केली पाहिजे राजश्री विठलराउ याजबराबर साहित्य भरणा दोन हजार म र्या द म क (?) राजश्री खंडेराऊ बरगे दोनशा राऊतानसी मात्र आलेत पागा इतर सिलेदार कोनी नाहीत व राजश्री बाजी बाबर याजबराबर राउत शेत आहेत लाहन थोर दोन हजार सर्व सेनेत आहे राजश्री जयसिंगराउ याच्या शरीरास पूर्वी प्रा॥ विचार वथेचा आहे तैसा च आहे सोनगडास[3] बातमीस

---

१ बाणरायानें यावर्षी कसबे मुखेड परगणे पाटोदे सरकार संगमनेर हा गांव लुटला व लष्करामुळें पायमाली जाहाली म्हणून सूट दिल्याबलचा कौल बाळाजी बाजीराव पेशव्यांची रोजनिशी भाग १ पृष्ठ २३२ वर दिला आहे. त्याच प्रमाणें कसबे तळेगांव तर्फ पाबळ प्रांत जुन्नर येथें मोंगलांचा मुकाम झाला, गांवचीं घरें दारें जाळून फस्त केली यामुळें चार वर्षांचा वसूल माफ केल्याबद्दल सरकारी अभयपत्र पृ. २४३ वर दिलें आहे.

२ भोडगांव खानदेशांत पाचोरे तालुक्यांत आहे.

३ सोनगड नवापूरच्या पश्चिमेस १५ मैलांवर आहे.

जोडी पा। होती तेथील विचार राजेश्री केदारराउ दो हजार फैजनसी येत व बरकदाज दोन हजार व तीरदाज व आडहत्यारी इतका सरजाम आहे व खडोजी बानराउ पाचा शा। राउतानसी नवेपुरी आला आहे सोन-गडीहून त्याजला आज्ञा येत की भोडगावी जाणे याच्या चितात की सरजाम थोडका यास्तव अनमान करितात साहित्य या प्रांतीहून कोनी जात नाही प्रा। भडोच करताब्रयाजी येथे राजश्रीच्या भेटीस वकील पा। आहे रोज मजकुरी भेट जाली खडकीचे वर्तमान परस्परे ऐकिले या प्राती मुरादखान आमील नासीकचा आहे तो यजमानाजवळ आहे याजला दाहासहस्त्र साहित्य देऊन या प्रांती पाठवावे येसी वार्ता आहे मुख्य ताब्राचा विचार तो स्थिर आहे हे विज्ञप्ती

ले. २३७
मू. दा. प.

श्री

श. १६७३ कार्तिक शु. ११
इ. १७५१ आक्टोबर १९

श्रीमत् राजश्री साहेब स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक कावजी नाईक जासूद मु॥ कोकणगाव प्रा। वण चेरणा-वरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ता। छ १०: माहे जिल्हेज पावेतो साहेबाचे कृपादृष्टीकरून चेरणरजाचे वर्तमान येथस्थित असे विशेष राजश्री विठलराव याजबरोबर फौजचा गोट नजर मोजना (?) साडेतीन हजार पावेतो आहे व हती चार आहेत हैबतराव धापटे व मानाजी पंवार जोत्याजी गायकवाड व वागपवार थोरात बागुल(व)गैरे येणे प्रा। आपले जमावानसी आले असेत राजश्री विठलराव येका दो रोजी फैससुधा सप्तसुरगीच्या रोखे जाणार देवीच दर्शन घेऊन जागा जागा गवत पाणी पाहून राहावे यैसा विचार दिसतो त्याहिमधे साहेबाची आज्ञ येईल त्याप्रा। वर्तणूक करितील स्वामीची आज्ञ राजश्री विठलराव याजला जैसिंगास पाठऊन देणे म्हणौन पत्र आले त्यावरून हशम व खासबरदार व राऊत शह दीडश पावेतो बा। देऊन विकुराहुन काढून कोटेरियास आणिला तेथ आल्यानंतर जैसिंगास

अनुक्रमणिका.

लवकरच प्रसिद्ध होतील.

(१) मठगांवचा शिलालेख आणि कुडाळ प्रांताचा इतिहास
(पुरस्कृत ग्रंथ क्र. २८)

(2) **A history of the late revolution in the Kingdom of Golconda.**

(Swiya grantha)

(३) **पुरंदरे दप्तर भाग ३ रा**
(पुरस्कृत ग्रंथ क्र. २९)

Wanted in exchange

Epigraphia Indica

Vol. XV	Parts I and VI
,, XVI	Part VIII

Can be had in exchange

Epigraphia Indica

Vol. XVI	Parts I, II, VI and VII
,, XVII	Part II
,, XIX	Part VI

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIII] **QUARTERLY** [No. 3

(51)

December, 1932.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १३ वें] **त्रैमासिक** [अंक ३ रा

(५१)

पौष १८५४

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन

या वर्षाचा तिसरा अंक नियमित वेळ न टळतां प्रसिद्ध होत आहे याबद्दल संतोष वाटतो.

मंडळातर्फे लवकरच त्रैमासिक सभा भरविण्याचा विचार चालू आहे. ही सभा सामान्य जनतेस शक्य तितकी जास्त मनोरंजक व उद्बोधक करण्याचा प्रयत्न करणार आहों. तेव्हां निबंधवाचनास अग्रस्थान न देतां व्याख्यान, चर्चा, प्रदर्शन, संशोधनाचें शिक्षण, इत्यादि गोष्टींस या सभेंत प्राधान्य मिळणार आहे. निश्चित कार्यक्रम ठरतांच तो वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होईल.

मंडळाच्या स्वीयमालेंतील ५ पुस्तकें लवकरच प्रसिद्ध होतील. छापण्याचें काम चालू आहे. जाहिरातीकडे लक्ष असावें.

मागील अंकीं जाहीर केल्याप्रमाणें पुरस्कृत मालेंतील क्र. २८ चें पुस्तक प्रसिद्ध झालें. क्र. २९ हीं लवकरच प्रकाशित होईल.

मकरसंक्रांत
श. १८५४

चिटणीस

तालिकोटच्या लढाईचें एक दृश्य


A scene from the battle of Talikot



त्याचें (रामराजाचें) डोकें उडविलें व त्यांत भात्याण भरलें

His (Ramaraja's) head was cut off and stuffed

बाळाजी विश्वनाथाचें हस्ताक्षर.



Hand-writing of Balaji Vishvanath

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १३ वें] त्रैमासिक [अंक १ रा.

१२ शिवकालीन पाटिलकी वतन*

(श्री. शं. ना. जोशी-वांई)

पाटील ह्या संस्थेविषयीं पुढें थोडक्यांत कांहीं विचार मांडले आहेत. हा विचार करतांना सामान्यतः श. १६३० पर्यंतच्या कालांतील पत्रेंच ध्यानांत घेतलीं आहेत. आणि त्यांवरून पाटलाचें महत्त्व, पाटिलकीची उत्पत्ति, पाटलाचें काम, अधिकार, मानपान, उत्पन्न अशा सहा सात मुद्यांचें विवेचन केलें आहे.

पाटलाचें महत्त्व— राज्य म्हणजे जसा जुन्या काळांत राजा, त्याप्रमाणें गांव म्हटलें कीं तेथें पाटील हा असावयाचाच. राजा आणि पाटील किंवा पाटील आणि राजा हीं राज्याचीं आद्यंतें आहेत. राजाचींच व राजाजोगीं असलेलीं विशेषणें भागग्राही, ग्रामप हीं पाटलाला योजिलेलीं आहेत (शुक्रनीतिसार.). पाटील हा छोटेखानी राजाच आहे. खेडेगांवांत अशी म्हण ऐकूं येत असल्याचें सांगितलें आहे कीं, " उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा." ह्या म्हणीनें, हलाखीच्या स्थितींतहि पाटलाचा सामाजिक दर्जा केवढा मोठा मानला जातो तें नेमकें ध्यानीं आणून दिलें आहे.

पाटिलकीचा उगम—' काळीवर पांढर रचली ' त्यापासून कसबे मााच्या जोसपणाची मिरास आपली आहे हें जसें वांईचित्रावांच्या कागदांत (खं.२०, पृ. २४२) वांईच्या लिंग जोशी वलद आनंद जोशानें सांगितलें आहे, तसेंच जेव्हांपासून काळी वहितीला आली तेव्हांपासून पाटिलकीची निर्मिती

* २० वें. संमेलन.

झाली हें अनेक कागदांतून आलें आहे. दुर्गादेवीच्या मोठ्या दुष्काळानंतर जें जें गांव वसाहतीस आणलें गेलें तें तें प्रथम पाटलाकडूनच. काळीवर पांढर रचली असा वर प्रयोग आला आहे व तोच युक्त आहे; पांढरीवर काळी वसली असा प्रयोग आलेला आढळला नाहीं. म्हणजे काळीनंतर व काळीकरतां पांढर आहे, म्हणजे काळी जितकी जुनी तितकी पाटिलकी जुनी आहे. आणि काळी किती जुनी तर जंगल तोडून, वन्य पशू नाहींसे करून, पिकाकरतां जमीन जेव्हां पड पाडिली तधींपासून जमीन ही काळी बनली व तेव्हांपासूनच पाटिलकीचा प्रारंभ झाला आहे. काळी आणि पाटील हा संबंध नित्य आहे. पांढर व पाटील हा तसा नाहीं. खटाव तालुक्यांत आजहि हुसेनपूरचें शिवार आहे पण पांढर म्ह. गांवठाण नाहीं. तात्पर्य, काळी जमीन जेव्हां वहिर्तीला आणली, तेव्हांपासूनचा पाटील आहे.

पाटील संज्ञा—पाटील हें नांव पाटील मोकदम असें जोड; नुसतें मोकदम आणि नुसतें पाटील अशा तीन प्रकारांनीं कागदांत येतें. शि. च. सा. खं.२ ले. ९३ मध्यें 'राव पा। बिन मेग पा। मोकदम मौजे हिंगणे बुा'; 'रंभाजी मोकदम मौजे चऱ्होली' आणि 'म्हाळोजी बिन खंडोजी पाटील जाधव मौजे गिरीम' अशा तिन्ही प्रकारांनीं आलें आहे. पैकीं नुसतें पाटील असें जेथें येतें तेथें त्याचा अर्थ सरळ व उघडच लक्ष्यांत येतो. नुसत्या 'मोकदम' ह्या शब्दाचा अर्थ संदर्भानें पाटील हा घ्यावा लागतो. मोकदम शब्द पाटील ह्या हुद्याप्रमाणें इतरहि बलुतेदार वगैरेंच्या नांवांबरोबर येतो. उदा० मोकदम न्हावी (शि. च. सा. खं. १ ले. १९); मोकदम मुजेरी (शि. च. सा. ले. ९९). अशा ठिकाणीं मोकदम शब्दाचा मूलार्थ जो पुढारी, प्रमुख, तो आहे. मोकदम न्हावी म्हणजे न्हावीमंडळींतील मुख्य; मोकदम मुजेरी म्हणजे खेडूत किंवा शेत कसणाऱ्यांतील पुढाईत. तसेंच पाटील मोकदम म्हणजे पाटीलमंडळींतील श्रेष्ठ. पाटील शब्दाशीं जडून जेव्हां मोकदम शब्द येतो तेव्हां त्याचा आणखी अर्थ असा आहे कीं, पाटील घराण्यांतील पाटिलकीचा धनी, वडील घराण्यांतील व्यक्ति, टिळ्याविड्याचा व निशाणीनांगराचा अधिकारी तो पाटील मोकदम. पाटीलघराण्यांतील सर्वच व्यक्ति पाटील उपपदधारी होत; पण त्यांत जो पाटिलकीचा खावंद तो खरा पाटील म्हणजे पाटील मोकदम. आतां सुटया मोकदम शब्दाचा अर्थ काय तें पाहूं. मोकदम ह्याचा

मूल वस्तुगत अर्थ म्होरप्या, प्रमुख असा आहे हें वर सांगितलेंच आहे. मोकद्दम शब्द साधारणतः मेहतर ह्या शब्दासारखा आहे. मेहतर म्हणजेहि श्रेष्ठ, मुख्य. माळी मेहतर, तेली मेहतर, कुंभार मेहतर, परीट, कोस्टी, सुतार, महाला, चांभार ह्या सर्वांस मेहतर शब्द लाविल्याचें आढळतें (सनदापत्रें पृ. ४९, शि. च. सा. ले. ३६, २८, २६६, २१८). कोठें कोठं म्हणजे श्रेष्ठ व्यक्ती दोन असतील तेथं त्या दोहोंचीं नांवें लिहून 'मेहतरीये सुतार' म्हणजे सुतार मंडळींतील हीं मुख्य दोन माणसें असें नमूद केलें आहे (शि.च.सा.भाग १ पृ. ५०). मोकद्दम म्हणजेहि श्रेष्ठ, प्रमुख आणि मेहतरीये म्हणजेहि श्रेष्ठ, प्रमुख; पण मेहतरी हा शब्द पाटिलास लाविल्याचें कोठेंहि आढळत नाहीं. मोकद्दम हेंच विशेषण लाविलेलें असतें. नुसता मोकद्दम शब्द पाटील ह्या अर्थींच येथें जरूर आहे हें पुढील एकदोन उताऱ्यांवरून पुरतें व स्पष्टपणें सहज लक्ष्यांत येईल. खं १५, ले. ३७८ मध्यें 'पेठ सिंगणापूरचे मोकद्दम पूर्व कदीम विठोजी भोसला आहे. तरी बरहुकूम खुर्दखत पाटेलगी विठोजी मजकूरयाचेच हवाला केले असे, असें म्हटलें आहे. म्हणजे प्रारंभीं मोकद्दमी हा एकटा शब्द घालून पुढें पाटेलगी शब्दाचा उल्लेख करून मोकद्दमी म्हणजे पाटिलकी हें स्पष्टच केलें आहे. हें पत्र श. १५३१ (इ. १६०९) मधील आहे. ह्या खंडांतील ले. २७१ मध्यें 'मोकद्दमीचें आपलें इनाम पासोडी होळीपोळी वगैरेसुधा अनुभवित आलों' असें वाक्य आलें आहे. 'पासोडी' ह्या नांवाची इनाम जमीन पाटिलाशिवाय कोणाला नसते हें पुढें येणारच आहे. तेव्हां ह्या दोन्ही पत्रांतील दोन अवतरणांवरून मोकद्दमी म्हणजे पाटिलकी हें चांगलें सिद्ध होत आहे. शि.च. सा. खंड, ले. ११ मध्यें 'आपाजी देशमुख मोकद्दम मौजे मजकूर' असें आलें आहे. येथें देशमुखांतील मोकद्दम म्हणजे अधिकारी देशमुख असा अर्थ मागील विवेचनावरून करण्याकडे प्रवृत्ति होईल; पण त्याच पुस्तकांतील ले. २१ मध्यें ह्याच आपाजी व्यक्तीचा, देशमुख व मोकद्दम कसबे मजकूर असा खुलासा होणारा निर्देश आला आहे. त्यावरून आपाजी देशमूख मोकद्दम मौ। मार ह्याचा अर्थ देशमुखांपेकीं प्रमुख असा न करतां देशमूख व मोकद्दम असा अर्थ करावयास पाहिजे. मोकद्दम म्हणजे पुढाईत असा अर्थ असतां पाटील असा त्याचा अर्थ होण्यास मुख्य कारण मुसलमान अधिकाऱ्यांकडून

आलेलीं पत्रें होत. 'ताहां मोकदमानी, ताहा मोकदमानि व रयानि देहाये पाा पुणें' असा मायन्यांत लिहिण्याचा शिरस्ता आहे. पाटील व रयत असें लिहिलेलें नाहीं. अपवाद म्हणून खं. १६ ले. ३६ पृ. ४९ वर देाानी, देाानी, व मुाानी व पटेलानी व रयायानी असा पाटील ह्या नांवाचा मायन्यांत उल्लेख आढळला. हें पत्र दंडाराजपुरीकराकडून कानद-खोऱ्यास कौल आहे. (खं. १५ ले. ३४० मोकदम 'पाटेल व रयानि' असें आहे.) तसेंच सनदापत्रें, शाहूरोजानिशी व वतनपत्रें ह्यांमध्यें एखादी सनद दिल्यानंतर त्या सनदेच्या प्रती दोख, दोडे, सुभेदार इत्यादि अधिकाऱ्यांस दिल्याची जी शेवटीं नोंद असते तींत 'मोकदम देहाय मजकूर यांस' असें लिहिलेलें असतें. सनदापत्रांत १२२ ते १३२ पृष्ठांवर कानुजाबता सविस्तर दिला आहे. त्यांत पृ. १२७ वर मोकदम हाच शब्द पाटील ह्या अर्थानें दिला आहे. तात्पर्य, मुद्दा मोकदम शब्द पाटील ह्या अर्थी असतो. पाटील म्हणजे गांवचा राजा, गांवाखालील सर्व शिवार म्हणजे जमीन, पाटिलाच्या अधिकारांतील. त्या जमिनीचे सर्व कर्दे म्हणजे प्रज हे पाटिलाची प्रजा; त्या गांवच्या महसुलास पाटील एकटा जबाबदार, एवढा अधिकार पाटलाचा असतांना पाटील ह्या नांवानें त्याचा उल्लेख सरकारी पत्रांतील मायन्यांत न येतां मुसलमानी म्हणजे फारसी शब्द जो मोकदम त्या नांवाचा प्रयोगच सर्रहा झाल्यामुळें घराण्याच्या दृष्टीनें पाटीलसंज्ञा लिहिलेली आढळते व सरकारी पत्रांत मोकदम असें लिहून काम भागविलें असतें.

पाटील शब्दांतील इतर भेद — स्वत: पाटील ह्या शब्दासंबंधानें, पाटिल ह्याऐवजीं जो शब्द वापरीत त्या संबंधानें वर लिहिलें. आतां पाटील संज्ञेंतील इतर जे पोटभेद त्याबद्दल काय आढळलें तें लिहितों. जात पाटील, सर पाटील, जडे पाटील असे तीन भेद आढळले. राज पाटील हा शब्द त्रै. वर्ष २ पृ. १६५ वर आला आहे. हा लेख श. १२१६ तील असून त्यांत एके ठिकाणीं पृष्ठमात्रा आली आहे. त्यांतील चुकीचा काल-निर्देश, भाषा, इतर माहिता यावरून तो तितका प्रमाण नाहीं. राजपाटील ह्यांतील राज हें व्यक्तीचें नांव आहे. पाटिलाचें विशेषण नव्हे म्हणजे ह्यांतील संज्ञा नाहीं. जात–पाटिलाचे उल्लेख असलेलें पत्र पूर्ण विश्वास्य आहे.

जात पाटील ह्यांतील पाटिलकीचें काम आणि गांवकामगार ह्या नात्यांतील म्हणजे गांवपाटिलकींतील पाटलाचें काम ह्यांत फार अंतर आहे.

गांवपाटलाच्या कामासंबंधानें स्वातंत्र्यानें पुढें सविस्तर आपणांस पाहावयाचें आहे. तूर्त येथें गोळाबेरजेनें गांवपाटलाच्या कामाचें स्वरूप म्हणून एवढें म्हणतां येईल कीं, गांवपाटलाचें काम राजकीय आहे तर जातपाटलाचें काम सामाजिक व धार्मिक आहे. सामान्यापेक्षां विशेषाचें माहात्म्य जेथल्या तेथें ज्यास्त असतें. ह्या नियमाप्रमाणें, जातिपरत्वें असलेले जातिधर्म पाळले जातात कीं कसें हें पाहाण्याची जिम्मेदारी जातीवरच येते. मोठ्यांतला मोठा संस्कार म्हणजे लग्नाचा. पण हा संस्कार आपापल्या जातपंचाकडून करावयाचा अशा जाती हिंदुसमाजांत बऱ्याच आहेत. जातींचे सामाइक बोभाटे जातगंगेनें किंवा दैवानें मिटवावयाचे; त्यांत जातिबाह्य व्यक्तीचें अथवा संस्थेचें बोट शिरकूं द्यावयाचें नाहीं; अशी कडकडीत शिस्त त्या जाती पाळतात. इतकेंच नव्हे तर, ज्या भानगडी जातींविशिष्ट नसून निव्वळ व्यक्तीविषयक आहेत किंवा ज्यांचा संबंध इतर जातींशींहि तितकाच पोचतो त्या देखील जातीनेंच मिटवावयाच्या असा निर्णय हिंदू समाजानें ठरविला. एखाद्यानें कांहीं दुष्कर्म केलें, जमातीच्या आचाराविरुद्ध अगर ठरावाला सोडून विरुद्ध आचरण केलें, जातीसंप्रदायाविरुद्ध लग्न लावलें, प्रेतसंस्काराच्या प्रसंगीं मदत केली नाहीं, जमातीनें मागितलेली वर्गणी दिली नाहीं, एखाद्या मानार्हाचा उपमर्द केला, तर जात त्याला शासन करते किंवा पावनहि करते. सारांश, जात व गांव हे जुन्या राजवटींत सामाजिक व राजकीय सत्तेचे आद्य घटक होते. पैकीं कांहीं जातींपुरते जातपाटील असत. त्यासंबंधींचेंच वर उल्लेखिलेलें पत्र होय. त्रै. व. २ पृ. १३४, १३५ हें पत्र समस्त अष्टागर प्रांतांतील कोळी ज्ञातीबद्दलचें आहे. तेथें म्हटलें आहे "न्यायमनसबी सरकारांत न्यावयाचें प्रयोजन नाहीं. आमचे गोताचा न्याये लायप्रो सर पाटील याही करावा. जेथून हमजात स्वयात असिले तेथपरियेंत वतनदारीची पेस न्याये-मनसुबी हलाली–हरामी व कितेक मार गोत समंधाची पाटलाविना दुसरे कोण्ही न करी. ऐसा सर्वहि श्रीमत्छत्रपतीचे आज्ञात व पत्रांत ठेविले नाहीं. बद अमल कोळी लोकामधे जाला तरी याचा न्याये दिवाणांत न आणावा. अलिकडे दिवाणांत नेतात तें न न्यावे...त्याचे न्याये पाटलानीं करावा, जातांत वर्तवावा" इत्यादि.

जात पाटिलकीनंतरचा दुसरा पाटिलकींतील प्रकार सर पाटलाचा. सर देशपांडे, सरखोत, सर मोकदम, सर देशमुख इत्यादि हे सर्व

केवळ सरकार निर्मित आहेत. ह्या जागा मानाच्या दृष्टीनें मोठ्या पण दिवाण दरबारीं. गोतांत किंवा देसकांत त्यांना मान्यता कमी. कारण त्यांचा गांवकींत किंवा देसकींत अंतर्भाव नसून त्यांची वतनदारी अलिकडील आहे. तसेंच खोत-पाटील हाहि पाटिलकीचा भेद वाटण्याचा संभव आहे. खं. १६ ले. ४ पृ. २२, ले. ५ पृ. २५ वर तर्फ मजकुराचे खोत पाटील व किलाचे लोक, देशपांडे व माहालाचे खोत पाटील; आम्ही समस्त खोत पाटील व देसक मिळोन असे दोन तीनवार उल्लेख आले आहेत. ह्या उल्लेखांत खोत 'व' पाटील असा 'व' अव्यय घालून वेगळेपणा दर्शविलेला नाहीं. पण खं. १७ ले. ७ पृ. १६ वर मानपान ओळीवार म्हणजे क्रमानें द्यावयाचे ते सांगतांना 'देसकास जेथवा पानें लुगडी देतील (तेथवां आधीं देशमुख) ह्यामागून खोतासी व मोकदमासी द्यावी.' असें स्पष्ट म्हटलें आहे. म्हणजे येथें खोत व मोकदम भिन्न होत असें सांगितलें आहे. आतां असें असणें शक्य आहे कीं, ज्याप्रमाणें जो देशमुख आहे तोच पाटीलहि एकाद्या गांवचा असतो. त्याप्रमाणें जो पाटिल आहे तोच खोतहि असण्यास हरकत नाहीं. म्हणजे दोन्ही हुद्दे एकाकडे असूं शकतील. पण ते दोन भिन्न आहेत हें स्पष्ट आहे. पाटिलकी व देशमुखी ही जशी एकाच व्यक्तीकडे असूं शकतात; त्याचप्रमाणें पाटिलकी व चौगुलकीहि एकाकडे असे. खं. १५ ले. ३८१.

पाटलाचें काम--पाटलाचें मुख्य काम लावणी, संचणी व उगवणी ह्या त्रयींत सर्वत्र आढळतें. राज व्यवहार कोशांत ' अकृष्टभूमिर्नाकर्दिः कर्दिस्तु फलभूमिका' असें सांगितलें आहे. म्ह० नापिकी भूमि फलभूमिका करणें; उध्वस्त पांढरीची वसाहत करणें; आणि गांवची सर्व प्रकारें व्यवस्था, बंदोबस्त राखणें हें पाटलाचें काम होय. 'मौजे मालवलीची मोकदमी कर्दीम सेडकर याची. पुढें राजक्रांत जाली सेडकर परागंदा जाले. ठिकाण कोठें नाहीं. राजक्रांत निवारल्या उपरी ता मारची लावणी करावी असें जालें. याजकरतां महादुणेकर यांस गावीची वसाहत जाली पाहिजे लावणीहि जाली पाहिजे याजकरिता कीर्दीची पाटिलकी करून दिली. खं. १७ ले. २१ मध्यें पाटलाचें काम थोडक्यांत सर्व सांगितलें आहे. 'रयतीचा बहुतवजा दिलासा करून कीर्द मामुरी करून, साहेबाच्या किलियासी व कामास मदती करावी लागते.'

हें स्वराज्य झाल्यानंतरचें काम होय. एखाद्या प्रसंगीं गोत सभा करावयाची झाल्यास नायकवडी व जागल्याकडून गोत जमा करणें; गांवाची चकबंदी व टकबंदी करणें; पीक पाहाणी करणें; रयत बलुतेदार यांच्या तक्रारी दूर करणें; दिवाणदस्त पुरा करून देणें; एकादे प्रसंगीं गांवचा महसूल कुळवाराकडून पुरता बरोबर न जमा जाल्यास पाटलानें कर्ज काढून तो पुरा करून दिला पाहिजे. खं. १८ ले. २७ मध्यें ' धनको नाम धर्मोजी कासार आणि रिणकोनाम मोकदम, समस्त दाहीजण मोजे घोली असें लिहून ३५० रु. कर्ज घेतलें आहे. यासी गहाण आपली मोकदमी लावून दिली आहे. ह्याचा अर्थ गांवचें सर्व शिवार जसें कांहीं पाटलाच्या खाजगीतलें व म्हणून त्यावरील दिवाण–आकार देण्यास पाटील जबाबदार. आणि म्हणूनच मालोजीराजे भोसले आपल्या पाटिलकीच्या गावीं सौराज्य उपभोगीत व वाढवीत होते असें शिवभारतांत म्हटलें आहे. (अ. १ श्लो. ४५.) मुतालीक, हेजीब, खासनीस, चोगुले हे वतनदार आहेत. (खं. १७ ले. २१.) पण गुमास्ता हा वतनदार नाहीं हें खं. १५ ले. २७३ मध्यें स्पष्ट म्हटलें आहे. असो. असे गांवचे वतनदार, बलुतेदार, मठ, समाधी, अन्नछत्रें, इत्यादिकडील उत्पन्न ज्याची त्यांस पोंचतीलसें करणें; एकाद्याचा तंटा तुटेपर्यंत हकलाजिमा अमानत करणें, इत्यादि सर्व कामें पाटलाकडे आहेत.

पाटलाच उत्पन्नः– वहाण कांबळे (खंड १५ ले. २७९) हें किंवा हडकीहडवळा ही जशी महारांची पूर्ण मालकीची मिरासी व इनामी जमीन; तशी कामथ–पासोडी, पटी–पासोडी ही संपूर्णपणें केवळ पाटलाची जमीन. खं. १६ ले. ४ मध्यें स्पष्टच म्हटलें आहे 'कामथ म्हणजे पाटलाचें पाटलास देणें.' दुसरे एका कागदांत लिहिलें आहे " दप्तरीं पाहिलें तो दिवाणाचे खंडणींपैकीं २२ टके हक्क पाटिलकीचा निघाला. तो दोडच्यानी वाचून दाखविला. त्यास चापाजी बोलिला जे २२ टके हक्क पाटिलकीचा हक्क तो काय ? शास्ताखानासारखा दिवाण आला तर दोख दोडे येकमुख होऊन पासोडी करून देणे. मग दोडे यानी दस्तीबाद करून ६ रुके पासोडी इनाम करून दिली. मग इनामपट्टी ५ होन बसली. " सारांश, गांवाखालच्या जमिनींतील कामथपासोडी ह्या नांवाची जमीन ही पाटलाच्या खुद्द व संपूर्णतया मालकीची. पुढें जशी प्रत्येक

गांवीं खाशा अधिकाऱ्याची शेरी जमीन म्हणून असे, तशी. एके ठिकाणीं म्हणजे कांढवें येथें पाटिलकी मुसलमानाची; पण त्या घराण्यांत कोणी मर्द नसल्यामुळें पाटिलकीचा कामकारभार येस पाटील करीत असे आणि मोकदमीचें इनाम मुसलमानीण रतनमाबिबी ही खात असे. तेव्हां शिवाजी महाराजांकडे ही तक्रार गेली; तेव्हां 'महाराजांनीं जमीन सजगाणी इनाम दिली (शि. च. सा. ले. १०५). ससगाणी हें क्षेत्रमाप आहे. ससगाणी जमीन म्हणजे ६ रुके जमीन. मुसलमानाकडेहि पाटिलकीबद्दल जी कामथ असेल ती न काढतां तिच्याइतकी ६ रुके जमीन शिवाजीनें दिली आहे, असें दिसतें. याशिवाय 'पाटिलकीचे हक्क बावीस टक्के दिवाणचे नेमून दिले;' असे शि. च. सा. ले. १०४ मध्यें आलें आहे. ले. ९५ मध्यें पाटिलबाब जमा टक्के २० असें म्हटलें आहे (श. १५५५). खेरीज दरसदे रु. ५ हीहि पाटलाच्या उत्पन्नाची बाब सांगितली आहे. नक्त व गला अशा दोन्ही रूपानें हें उत्पन्न भिन्न ठिकाणीं व वेळीं भिन्न सांगितलें आहे. सनदापत्रें ले. ६९ पृ. ९३ वर इनाम जमीन बिघे ३० व जिराईत जमीन चाहूर २ पाटिलकीकडे असल्याचें लिहिलें आहे. हा महजर किती व केवढ्या मोठ्या लोकांच्या हजेरींत झाला आहे हें पहाण्यासारखें आहे. १८ परगणे, ३६० किले, ३२ महाल, २७ घाट ६ सुभे दक्षिण, बारा वजीर, अष्ट प्रधान, २२ उमराव सब नाईक लहान थोर इतक्यांच्या समक्ष हा महजर इणमरगाण नक्षत्र म्ह. मृग नक्षत्रीं रविवारी स. ९५० मध्यें झाला आहे. ले. ७४ पृ. ९९ वर पाटलास १ दोरी जमीन म्हणजे १॥ चावर जमीन इनाम म्हणून दिली आहे. शि. च. सा. खं. ३ पृ. २१० ले. ६२७ मध्यें इनाम जमीन बिघे १२ (मौजे कल्याण व सिवरे डिमले) ता। खेडेबारेपैकीं व दर गांवास नख्त रु. १ व गला बारावा मण १ (बारावा=बारुला) इतके पाटिलकीचें उत्पन्न शिवाजी महाराजांनीं मंजूर केलें आहे. (श. १५६९). पाटिलकी किंवा देशमुखी अथवा कोणचेंही वतन सरकारमान्य व्हावयाचें तर नजर घेण्याची पद्धति मुसलमानकालापासून जारी आहे.

पाटिलकीचीं भांडणें–ह्या भांडणाचा स्वतंत्र परिच्छेद अशासाठीं कीं, त्यामुळेंच पाटलांचे हक, मानपान, समजुती, व्यवस्था, गांवकींतील व दिवाणांतील काम इत्यादि बहुतेक सर्व पाटलाचे स्वरूप-विशेष समजून

येतात. युद्धामुळें जसें भूगोलाकडे लक्ष्य जातें तसें भांडणें होतात म्हणून जगांतलें जगपण कळून येतें. भांडणाच्या कागदांमुळें तर निवाड्याची पद्धत, लोक-रिवाज, अधिकार-मर्यादा इ. ध्यानीं येण्यास आधार आहे. इतिहास सांगणाऱ्या कागदांत भांडणें सांगणारे महजर, पत्रव्यवहार, हेच कागद नुसत्या सनदांपेक्षां अधिक महत्वाचे व उपकारक आहेत. पाटलाचीं हीं भांडणें पुष्कळ प्रकारचीं आहेत. पैकीं मुख्यतः वडीलकी संबंधानें, वंशावळींत नांव दाखल व्हावें किंवा केलें म्हणून, जडे पाटील झाढले जावे याबद्दल हे तीन प्रकार भांडणांत फार. ह्याखेरीज, रानसावजाचें व जत्रेचें फळ घेण्यासाठीं, गांव शिवेसाटीं, भुतें घातलीं म्हणून, इत्यादि कारणांकरितांहि तंटेभांडणें झालीं आहेत. खं. १६ ले. २ हा कागद वंशावळी संबंधाचा आहे. झुंझारराव मरळ देशमुख ह्याशीं जिवाजी मरळ ह्याचा तंटा. शेवटीं निर्णय असा झाला कीं, वडिलाताा टकापैका पडला, आपले खून जाले, ऐसी खराबी या वतनाकरतां जाली. जिवाजी मरळ याचे वडील पूर्वज बाजी नाईक मरळ (हा) कामाकाजास आला म्हणून भाऊ मानिला होता. कानोजी त्यास बाजीकाकाहि म्हणत. बाजी मरळ यास दापोडें येथील प्रथम पाटिलकी व संतोषित व्हावें म्हणून पुन्हां दोखीचा हक्क त्या गांवापुरता दिला. पण तो म्ह. बाजी हा कांहीं आपल्या वंसीचा नव्हे. जातीचा मरल आहे. म्हणजे प्रसंगीं पाटिलकीचें वतन मिळालें व मोकदमीचा वतनदार झाला तरी मूळ पाटील घराण्यांत अंतर्भूत होऊन खानदानीचा होण्यासाठींहि प्रयत्न केला गेला आहे. खं. १५ ले. १२ मध्यें पाटील जगदळे याशीं नाइकवडी कुणबी याचें भांडण झालें आहे. पाटीलकीचें वतन लिहून दिलें पण तें जबरीनें; रजावंदीनें नव्हे, म्हणूनहि पृ. ११४ वर तंटा सांगितला आहे. तेथेंच ' तुरुकाबरोबर आपण पाटिलकी करीत नाहीं' म्हणूनहि म्हादजी पाटिलांनीं निरोप मागितला आहे (पृ.११५). पाटिलकीचा कागद झाला पण बलुतेदारांची संमती नव्हती म्हणूनहि तो कागद तंट्यांत पडल्याचें पृ. ११८ वर आलें आहे. होळीस पोळी, कागदांत नांवनांगर आधीं कोणाचा, शिराळ-शेटीचा मान ह्याबद्दलचे तंटे तर फारच आहेत. मुतालीक किंवा गुमास्ता म्हणून कामाकरतां ठेवावा व त्यानेंच वतनावर पुढें हक्क सांगावा असेहि कज्जे बरेच झाले आहेत. अशा वेळीं 'दिवाण व गोत बरेच झाले; वतनाकरतां खस्ताहि बऱ्याच खाल्या व भांडण

मिळावयास पाहिजे म्हणून निम्मे वतनाचा हिस्सा देऊन कांहीं भांडणें मिटविलीं आहेत. कोणचेंहि वतन वंशपरंपरा चालावयाचें ही समजूत दृढ होती व म्हणून वतनाकरतां बाटणें, खून करणें, सात सात पिढ्यांपर्यंत भांडणें, हजारों रुपये खर्च करणें ह्या गोष्टी सहज केलेल्या दिसून येतात. वतन बापाच्या नंतर मुलाकडे जावयाचें. पण पुत्रसंतती नसेल तर मुलीकडेहि वतन जाई. आणि म्हणून 'अवलाद् अफलाद् चालविजे' असें अनेक सनदांतून म्हटलेलें आहे.*

पाटलाचे कायदे—रानांत स्वतःची इनामी जमीन, इतर जमिनीच्या उत्पन्नावर कांहीं हिस्सा हें पाटलाचें उत्पन्न किंवा ही पाटलाची मिळकत होय पण पांढरींत जें पाटलास मिळावयाचें त्यास कायदे किंवा हक्क म्हटलें आहे. ह्यांत वाडिलकी व धाकुटकी ह्या नात्यानें हक्क कमीअधीक आहेत. वाडिलकी हीं वंशावळ, प्रत्यक्ष भोगवटा, स्थलीचीं पत्रें व वरकडपत्रें ह्या चार पुराव्यांनीं सिद्ध झालीं पाहिजेत. खं २० ले. १८२ मध्यें म्हटलें आहे 'सटवोजी जाधव आपण वडील म्हणऊन कथला करीत होता; परंतु, मूळ पुरुष वंशावली, व भोगवटा, व स्थलीची व वरकड पत्रावरून वडीलपणास लागू होत नाहीं' (पृ. २७२). स्थलीचीं पत्रें म्हणजे निवाड्याबद्दल जें स्थल म्हणजे गांव दिवाणांतून नेमून दिलें असेल तेथील पत्रें. हे जे कायदे किंवा हक्कलाजिम्याच्या बाबी त्या पुढीलप्रमाणें आहेत.

मान	मिळकत	
मोकदमीचे हक्क, मान पान,	दिवाणी, तश्रीफ नांवनांगर	
१ होळीची पोळी	१ शेवधार	१ पटी पछोडी सरकारची
२ टिला	२ खोबऱ्याची वाटी	इनाम जमीन

* अफलाद् म्हणजे उपटसुंभ असा अर्थ 'विविधज्ञानविस्तार' च्या वर्ष ६३ अं. ६ पृ. १८८ वर श्री. नाडकर्णी यांनीं केला आहे. पण तो तसा नाहीं. अफलाद् म्हणजे मुलीचा वंश. 'सनदापत्रें' पृ. ३४ व ५० मध्यें ह्याच अर्थाचा स्पष्ट खुलासा आला आहे. वतनास खावंद अवलाद् कीं अफलाद्. त्यास अफलादाचा वंश आपण आहों' असें मुलीच्या वंशजांनीं म्हटलें व त्यास अर्धे वतनहि दिलें आहे. तसेंच 'अवलाद् बुडली तरी अफलादानें वतन खावें असें सांगून पुढें जावयाचे नांवें सर्व वतनच केलें आहे. तात्पर्य, अफलाद ह्या० उपटसुंभ नव्हे. श्री. नाडकर्णी यांचा मेहत्रा' ह्या शब्दाचाहि अर्थ असाच चुकला आहेसा वाटतो. ह्या शब्दाचा अर्थ ह्या लेखांत मागें दिला आहे.

मान	मिळकत
३ विडा	३ तेलधार नख्त रुखा
४ सिरालसेटी	४ शेवभाजी (शेवसबजी) गल्ला
५ नांव	५ फेरमुडी
६ नांगर	६ बकरें दसऱ्याचें
७ वोवाळणी	७ घुगरी
८ वाजंत्र	८ फसकी
९ पोळियाचे बैल	९ शेतास पालभारा
१० महार	१० हुरडाकबट
११ वारुळाची पूजा	११ जोडा
१२ गणेश	१२ सवासीन गवर
१३ पतडे-जोशाचे	१३ वटवल
१४ दसरा- आपटे पूजन	१४ विड्याचीं पानें
१५ गुढी पाडवा	१५ जुलाई मांगास घर्डी
१६ संक्राती	१६ पायतांदूळ
१७ आढ्याचें पूजन संवत्सरप्रतिपदेस	१७ मांगास नाडा
	१८ तेल-घाणा
१८ नांगराची पूजा	१९ घरठाव
१९ घट, घटवात	२० शेला
२० कुंभारास खण	२१ पाणी कोळ्याचें
२१ शिरपाव	२२ सेलपाटी
२२ भावईचा दिवट	२३ वेठ बिगार माफ
	२४ फांट्याची मोळी
	२५ साळी—सरुद
	२६ धनगर—चवाळें
	२७ पासोडी अटपाळे
	२८ शिंप्याकडून चोळखण दिवाळीस
	२९ बकरकसाई दररोज ८८।·
	३० बकाल बाजारदिवशीं सुपारी

हक्काचा अनुभव घेण्यांतहि, एका गांवीं पाटिलकीच्या कांहीं तकसिमा असल्या म्हणज, प्रश्न पडे. मौजें सुप येथें ३ तर्फा नीळकंठराव, गोदगावडा व काटकर ह्या तिघांच्या आहेत. म्हणून होळीस पोळी देण्याचा मान आधीं कोणाचा हा प्रश्न 'एकवट करून होळीची पोळी खांबास बांधावी' असा ठराव होऊन सुटला आहे. असेंच कागदोपत्रीं नांव आधीं कोणाचें घालावयाचें, हा मानाचा प्रश्नहि असाच सोडविला आहे. म्हणजे अमक्या कागदावर एकाचें आधीं व दुसऱ्या कागदावर दुसऱ्याचे आधीं असें ठरविलें आहे. वडील भावाच्या संतोषानें धाकट्या भावासहि, ते दोघे एकत्र एकोप्यानें व सलोख्यानें वागणारे असतील तर, वडीलकीपैकीं कांहीं मानपान उपभोगावयास मिळे. देशमुखाचा शिक्का जसा कागदावर महजरादि प्रसंगीं उठविलेला दिसतो तसा पाटलाचा नाहीं. पाटलाचा नांवनांगर फक्त असतो. त्रै.व. २ पृ. ५१ येथें 'मूळ पुरुषाचे नांवानें दस्तखत करण्याची वहिवाट सुदामतपासून चालत आहे' असें म्हटलें आहे. पाटिलकीचा शिक्का असा फक्त खं. १५ ले. ५९ पृ. १११ वर तेवढा एकेच ठिकाणीं आढळला. (निळाजी पटेल मौजे किवळ). पद्धत अशी दिसते कीं, देशमुखाचा शिक्का, पाटलाचा नांगर, बलुत्यांच्या निशाण्या कागदावर असावयाच्या व कुलकर्णी-देशपांडे यांच्या सह्या असावयाच्या. खं.१५ ले. २७८ पृ. २८५. देशमुखांचा शिक्का असला तरी त्या शिक्यांत नांगर काढलेला असे. शि. च.सा. ले. ३० पृ. ५२ टीप. खटावकडील फडतरे देशमुखांच्या शिक्यांतहि नांगर आढळला आहे. पाटिलाच्या एका गांवीं अधिकांत अधिक तकसिमा ६ असल्याचें आढळलें (शि. च. सा. ले. ४९ मौजे भवाली). ह्याच कागदांत म्हटलें आहे 'मिरासी होऊन दुसरे ठिकाणीं नाद्तोस हा धर्म नव्हे.' पाटलास पालणूक असे. पाल ह्याचा अर्थ शि. च. सा. ले. ९४ मध्यें असा सांगितला आहे कीं, 'पाल म्हणाल तर हे कांहीं पांढरीच्या कामास आले.' पाटलास घराचा टका म्ह. पाल जसा नाहीं तसा म्हैसटकाहि नाहीं. पण हा नियम एका घरा पुरताच व एका म्हसी पुरताच आहे (खं. १६ ले. ४९, ५० पृ.५७). अनेक घरें व म्हसी असतील तर एक घर व म्हैस वगळून बाकीच्यावर टका घ्यावयाचा

पाटीलकी ही जरी गांवनिर्मित असली तरी तिला दिवाणमान्यता-व देशदेशपांड्यांची संमती पाहिजे. खं. १६ ले. ४ मध्यें लिहिलें आहे,

' परंतु पाटिलकी दिल्हेयाचा कागदपत्र दिवाणाचा अगर दोखाचा आपल्यास ठावका नाहीं ' पृ. २२. दोखांना देशमुखी मिळविण्याच्या कामीं सहाय्य केलेल्यांना पाटिलकी दिली आहे. गांव नवीन किंवा पुनः वसाहतीस व कीर्दीस आणावयाचा असल्यास पाटिलकी नूतन करून दिली आहे

पाटिलकीच्या भांडणप्रसंगीं हरकी किंवा सेरणी २५ होनांपासून १४०० होनांपर्यंत घेतल्याचें आढळतें. खं.१५ पृ. ५०, ११७, १२०. तसेंच दिवाणची गुन्हेगारीहि ५०० होनांपर्यंत पडली आहे. पाटिलकीची विक्री आपत्प्रसंगानें भावाबंदींत, सावकारास, कुलकर्ण्यास, कोणासही केलेली दिसून येते. पाटलानें जमीनीचा महसूल सरकार खंडणी ठरली असेल तर त्या मानानें, नसेल तर माहालाशिरस्त्यानें गोळा करावयाचा असा प्रघात दिसतो. खं. १७ ले. ३९, ४०. गांव वसाहतीस आणणं व लावणीस आणणें ह्यासाठीं पाटील रयतेस ज्या सवलती देतो त्या दिवाणांत मान्य पाहिजेत (शि. च. सा. ले. ३९). पाटलानीं मुहूर्ताची बायको केली असल्याचें खं. १५ ले. ४३, ४४ मध्यें दिसतें. म्हणजे पाटील कुणब्यांतला होता असें म्हणावयाचें कीं काय तें निश्चित होत नाहीं. मराठ्यांत रहाटपाट नाहीं असें म्हणतात. पाटलांनीं दोखाची मुलगी केली हें खं. १५ पृ. २८६ वर स्पष्ट आहे.

येणेंप्रमाणें पाटिलकीसंबंधानें यथामती जें आठवलें तें तूर्त भाग १ म्हणून मांडलें आहे.

१३ हरिबुवा शिंपी वारकरी रामदासी याचा ज्ञानसागर*

(प्रो. **द. वा. पोतदार.**)

श्रीसांप्रदायिक विविधविषय खण्ड १ ला यांत नारायणगांवच्या **हरिबुवा सिंपी रामदासी** या सत्पुरुषांची थोडी माहिती आली आहे. गेल्या आठवड्यांत मी खुद्द नारायणगांवीं (जुन्नर नजीक) जाऊन बाळकराम रामदासी मठाचे महंत श्री. बापूबोवा यांच्या समवेत सदर साधूंचा मठ व समाधि पाहिली. मठांत हरिबोवांच्या **ज्ञानसागर** ग्रंथाची

** २० वें संमेलन.*

एक प्रत आहे ती पाहिली. या टांचणानें या ग्रंथाचा थोडा परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

ज्ञानसागर हा ग्रंथ ओवीबद्ध असून याचे २८ अध्याय आहेत. २८ वे अध्यायाचें नांव " मोक्षसीद्धिवीवरण " असें असून त्याच्या १३१७ ओंवी आहेत. हा अध्याय सर्वांत मोठा आहे. ग्रंथ अर्थात् वेदांतपर आहे. दुसऱ्यांची संमती वगैरे पाहून किंवा कोणाचा आधार घेऊन हा ग्रंथ लिहिला नाहीं अशी हरिबोवांनीं ग्वाही दिली आहे. अद्यापि हि या ग्रंथाचा व समाधिस्थलाचा साक्षात्कार असल्याचें सांगतात.

या अध्यायांत हरिबोवांनीं आपली वंशावळ (मातापिता व गुरु), ग्रंथ, समाधिस्थळ, काळ, वगैरे माहिती दिली आहे. होतां होईतों त्यांचेच शब्दांत ती देऊं.

जातः–"नामा सिंपियाची कुळी । तोचि आपली वंशावळी ॥" अशी आपली जात नामदेव सिंपी म्हणून सांगून आपले

कुळींत पणजापासून ' पंढरीची वारी । दारीं तुळसीवृंदावन ' असा संप्रदाय असल्याची माहिती दिली आहे. खुद्द आपल्या " बापें हि नाहिं सोडिली पंढरी । म्हणवि विठोबांचा वारकरि ॥ " असे अभिमानाचे उद्गार काढिले आहेत.

मातापिताः– " पीता माझा केरेश्वर ॥ माता बचाई पुण्यपवित्र ॥ तयाचेनि योगें संसार । भवसागर वोहोटुन गेला ॥ ५१ ॥ " याप्रमाणें आईबापांचीं नांवें सांगितलीं आहेत.

गुरुपरंपराः– ओंव्यावरून ठरते ती (१) परमात्मा–(२) वसिष्ठ–(३) श्री रामचंद्र– (४) मारुती– (५) रामदास–(६) माधवदास– (७) केशवदास– (८) पुरुषोत्तम (हरिबोवांचे आजेगुरु)– (९) सीवराम–(१०) हरि.

ग्रंथसमाप्तिस्थळः– कळसा आलें निरोपण । ग्रंथ समाप्त पावला येथुन । **पारनेर** नगरि पुण्यापावन । ग्रंथ संपूर्ण तेथें संपला ॥ ५९ ॥

---

१ रामदासांना ' श्रीराम प्रगट होउन । रूप धरिलें तें सगुण । तेरा अक्षरि मंत्र परिपूर्ण । रामदासा लागुन । उपदेशिला ॥ २३ ॥ रामदासा भेटी देउन । निरविलें मारुति लागुन । तुं आचार्य गुरु होउन । आत्मज्ञान सांग रामदासा ॥ २४ ॥...... मारुतिनें कृपा करुन । पूर्ण ज्ञान उपदेशिलें ॥ २५ ॥

या पारनेर गांवचें माहात्म्यवर्णन कवीनें बरेंच विस्तारानें केलें आहे. हें वर्णन प्रत्यक्ष रहिवासी अशा हरिबोवांनीं केलेलें असल्यामुळें शोधकास **१५० वर्षांपूर्वींचें पारनेर** या वर्णनावरून लक्ष्यांत येईल व तुलनेसाठीं याचा उपयोगहि बराच होईल म्हणून अवश्य तेवढे उतारे घेतले आहेत. कोपऱ्यांतील कंसांतील आकडे पोथीवरील पृष्ठांचे आहेत.

[१७१४] हरिबोवांचे पारनेरांतलें स्थळ प्रथम पाहूं

पारनेरनगराचिया भीतरि ॥ मठ आसे पें निर्धारि ॥ गढिपासोनि समीप जरि ॥ पुर्वेसी तरिं सीपेआळी ॥ ७४ ॥ पुर्वेवेसीचीया पासुन ॥ सीपे-आळिसन्निध जाण ॥ मध्यमार्गिं मठ आसन ॥ **आम्हास वास करणे ते ठाइं**॥७५ ॥ **हरि स्त्रीयम्हहित** ॥ गोडि घेउनि करि परमार्थ ॥ उडोनि गेली माईक भ्रांता ॥ भगवंत प्राप्त उभयेतासी ॥ ७६ ॥

[१७१५] आतां इतर स्थळें घेऊं:-

"पूर्व पछमेचिया द्वारी ॥ **विर हनुमंत** माहाक्षेत्री ॥ तेचि रक्षण करिति नगरि ॥ विघ्नें दुरि द्वडति ॥ ८२ ॥ दोहिं वेसीचियावर ॥ **मनोरे** शोभति हारोहर ॥ **सतावीस बुरंज** दुर्गास चौंफेर ॥ गावां भीतर **कोट** असे ॥८३ ॥ पाहाते वसंतरे पासुन नीश्चीत ॥ गावास कोण्हे लाविला नाहिं हात । **आद्यापि वरि रक्षति** दैवते ॥ येथोनि पुढें भगवंत पुढेंहि राक्षिता ॥८४॥ **मनकर्णिका** तें वाराणसी ॥ कासी पुरि वास तयासि ॥ तेहि येथें आली विश्रांतिसी ॥ भागिरथी वोघासि वेउनी ॥ ८५ ॥ गावांचिया उत्तर दीशसीं ॥ मनकर्णीका **जंवा आगळिकांसी** ॥ स्नान करितां दुंधं पातकरासी ॥ नाहिं पुण्यासी पारावार ॥ ८६ ॥"

मग त्रिंबकेश्वर-पुढें कुशावर्त वगैरे तीर्थें पारनेरीं असल्याचें सांगून संगमावर संगमेश्वर आहे आणि तेथें- " अैलपैलतिरि देवाल्यें दोन्ही बरोबरि "- याप्रमाणें सारखीं देवळें असल्याचें लिहिलें आहे. तद्नंतर " **पाराशरापासुन । पारनेर नामाभिधान** " असें सांगून पराशरांनीं याग केला तें सांगून त्यांनीं " **सीद्धेश्वरलींग** स्थापिलें तधी ॥ आपण राहिले **गुफेमधीं** ॥ **विवर आधिं बांधोनियां** ॥ ४ ॥ ते गुंफा चिनोनि घेतलीं । नाहिं कोन्हीहि आद्यापी देखीली ॥ म्हणती आसे पटांगणाखालीं ऐकीली बोली बोलति हो ॥ ५ ॥ **तया वेळिंचें देउळ** ॥ **आद्यापि आहे**

कनकाचा पींपळ ॥ जैसा भगवंत आसोनि जवळ [*।] परि मायामुळें दिसेना ॥ ६ ॥

यानंतरचे उपयुक्त उल्लेख येणेंप्रमाणें:–

[१७१८]

गावांपासोनि **सीद्धेश्वर** ॥ तेरासें धनुश्यं निर्धारें ॥ गावांपासुन **त्रींबकेश्वर** बराबर साट धनुश्यं ॥ त्रींबकराजापासुन सीद्धेश्वर ॥ साडेबारासे धनुश्य दुर ॥ त्रींबकराजापासुन **कासि ईश्वेश्वर** ॥ बराबर साट धनुश्यं ॥ १४ ॥ ... ...

... सीद्धेश्वरापासुनि निश्चीत ॥ दुसरीया दऱ्यात **सोमनाथ** ॥ ..

... बारा सीवीसी **गणपति** ॥ मंगळमूर्ति स्छापीले ॥ २१ ॥......

गावांपासोनि पश्चमेसी । **रेणकाई तुकाई** गणपतिसी ॥ **गणशखींड** म्हणति तयासी ॥ **आद्यापी जैसी तैसीच आसे** ॥२५॥ पश्चमेसी गणेशखींड ॥ गणपति माजी श्रेष्ठ प्रचंड॥पाहा त्या गणपतिच्या सरोबरी॥ पर्वत [आसे **रत्नागिरि** ॥ **बाळाई सोनाई**] **बाराद्वारि** ॥आसति **सफेरि** भोवताल्या ॥२७॥ **बारावाड्या** माजी **पुणेंवाडि** ॥ **पुणोबादेव** तेथें निजनिवाडि ॥ भराड घालिति लागति बगाडि ॥ फार थोडि तेथें जतरा मिळे ॥२८॥ **दसाबाईचा** डोंगर ॥ तेथें **दावलमलीक** योवन पीर ॥ सुवर्णमय सुराड्या निर्धारें ॥ जेसा जगदेश्वर आभासे ॥ २९ ॥ सुवर्णमय आसोनि निखळ ॥ परि तो पाषाण दीसे सकळ ॥ तेसा भगवंत आसोनि जवळ ॥ मायामुळें दीसेना ॥ ३० ॥... .... गावांचिये **उत्तर दीसेसि** ॥ **सोमठाण** ॥ **स्वामि कार्तिक जाण** तेथें आसे ॥ आणिक ते **पद्मावति** ॥ **वरखडामाजी भवानि आदिशक्ति** मनकर्णीके तीरि दुसरि निश्चीति ॥ बहूत आसति गुप्त प्रगट ॥ ३२ ॥ ....**सीपे आळीचि भवानि** ॥ **माहुरगडचि कुळस्वामीणि** ॥ **तुकाई तुळजापुर पाटाणि** ॥ आणीक बहुते जानि आसति ॥ ३३॥ पुर्वदीशे गावापासुन ॥ आसे तो **गेबि परि योवन**॥ **दुरकरितो आलीं विघ्न** ॥ **विभांडन परदळ** ॥ ३४ ॥ पारनेर पारासुराचि नगरि ॥ **नागनाथ** रक्षण करि ॥ योवन गेबि पीर बाहेरि ॥ मोटा क्षेत्री विख्यात ॥ ३५ ॥ **येकसे तेरा गांव कसबा जाणा** ॥ **त्यासी म्हणति पारनेर प्रगाणा** ॥ ”

हरिबोवांचा गाथा

हरिबोध व ज्ञानसागर हे बोवांचे स्वतंत्र ग्रंथ झाले. पण याखेरीज त्यांची **स्फुट कविताहि** बरीच आहे. हजारों अभंग त्यांनीं केल्याची प्रसिद्धी आहे. या स्फुट कवितेच्या **चार मोठाल्या वह्या** मठांत होत्या असें कळलें. सांप्रत एक शिल्लक आहे ती पाहिली. तींत सुमारें ४३० पावेतों पृष्ठें आहेत. पहिलीं–मागलीं पृष्ठें अर्थात् गहाळ झालीं आहेत. सर्व कांहीं एकहाती नाहींत पण अक्षरवटिका पाहतां बरींच जुन्या वळणीचीं म्हणजे **हरिबोवांच्या समकालीन वळणाचीं** दिसतात. कदाचित् तीं हरिबोवांच्या हातचींहि असण्याचा संभव आहे. हरिबोवांचें हस्ताक्षर मठांत अन्यत्र अद्यापि उपलब्ध नाहीं आणि हे ग्रंथ व गाथा ह्यासुद्धा आळंदीचे अलिकडील सत्पुरुष के. अण्णासाहेब पटवर्धनांचे गुरु श्रीनरसिंहसरस्वती स्वामी हे नारायणगांवीं येऊन हरिबोवांच्या साक्षात्कारी समाधिमठीं राहात असतां त्यांनीं अंतर्ध्यानानें गावांतील लोकांकडून, कोणाच्या रांजणांत अमका ग्रंथ आहे, मुसलमानाच्या विहिरींत अमका ग्रंथ (हरिबोध) आहे असे दृष्टांत सांगून काढविले अशी आख्या आपण डोळ्यांनीं पाहिल्याचें श्री. बापूबोवांचे वडील महंत यांनीं मला सांगितली. या चमत्काराची वस्तुस्थिति कशीहि असो, हरिबोवांचें प्रत्यक्ष ग्रंथरूप कार्य आपणांपुढें आज काय दिसतें तेंच आपणांस पहावयाचें आहे.

या गाथ्यांतील **तीन पदें** नमुन्यासाठीं पुढें देत आहे. तीं जरा मुद्दाम मनोरंजक अशीं निवडलीं आहेत. हरिबोवांची वाणी पदांत अत्यंत **प्रासादिक** दिसते.

पुढील पहिलें पद निवडलें आहे तें **ग्रहणाविषयीं** आहे. यांत **राहुकेतूची** कल्पना मिथ्या आहे असें हरिबोवांनीं स्वच्छ सांगितलें आहे. हा उल्लेख मननपूर्वक पाहिला असतां **दीडशें वर्षांपूर्वींच्या श्रद्धायुगांतहि** कांहीं चिकित्सा श्रद्धाळू मंडळीहि यथाशक्ति करीत हें लक्ष्यांत येतें. पद असें:—

ग्रहणावर

ह्मनती ग्रहन आले : चद्रसुर्यासी ॥ गीळीले तयासी : राहुकेते ॥ १ ॥
तयासी तो भेटी : नव्हे कल्पांतीसी ॥ गीळीतां तयासी : जळुन जाता ॥ २ ॥

जैसें अभ्रअल : सुर्या अछादीला ॥ तैसा अड ठाला : राहुंकेत ॥ ३ ॥ तयासी अंतर बहु असे ॥ स्पर्श नाही तरी : हरी ह्मने ॥ १०९७ ॥

निवडलेलें दुसरें पदहि असेंच मनोरंजक व कुतुकोत्पादक आहे. तें असें:-

स्त्रीमाजी कामनीत उत्पन होये । नीवडुनी ठाये : सांगीतले ॥ १ ॥ पोर्नमेचे दीवसी : मदन राहे भांगी ॥ प्रतीपदे लागी ॥ भाली येत ॥२॥ द्वीतीये भोंवइं ॥ त्रीती गाळावरी ॥ चतुर्थी आधरी : राहातसे ॥ ३ ॥ कंठी पंचमीस ॥ शष्टी काखेवरी : सप्तमीसि तरी : कूचस्थानी ॥ ४ ॥ आष्टमीस उरी : नाभी नवमीस : कंठी दसमीस जाना पे : ॥ ५ ॥ योनी येकादसी : जाघे द्वादसी : जानावा त्रयोदसी ॥ पोटरीये ॥ ६ ॥ तळवा चर्तुदसी ॥ आंगुष्टा आवसेसी ॥ मुळच्या ठायासी : स्थीरावला ॥७॥ पंधराही तीथीचे ॥ आसे हे प्रमान : हारी ह्मने जान : कळलीया ॥ ८ ॥ ११०२ ॥

तिसरें निवडलेलें पद **हिंदी** आहे. यास **उर्दू**हि म्हणण्यास हरकत नाहीं. हें वेदांती आहे. समाजेतिहासाभ्यासकाला या हिंदी उर्दू पदाचें महत्त्व विशेष आहे. तें पुढें मागें अन्य स्थळीं दाखवूं. पद असें—

हिंदी

॥ खुदा भरा है भरपुर : सब जेगो नीराकार ॥ १ ॥ ज्युमी असमान येक ॥ जीसके पेटमे तीन्हो लोक ॥ २ ॥ उस रबकी करनी न्यारी ॥ पैदा की इं अफरीन सोरी ॥३॥ खोज्य उसीका कर लेना : उस बीगर नही ठीकाना ॥ ४ ॥ हारी कहे साहेब मेरा ॥ वोही सब दुनयास न्यारा ॥ ५ ॥ ३५४

हरिबोवांचा समाधिकाळः— शके १६९९ वैशाख शु. १ हा मठांत कळला, म्हणजे ज्ञानसागर रचल्यावर चार वर्षांनीं हरिबोवा देवलोक झाले.

हरिबोवांची समाधि व मठः— नारायणगांवास भीमेच्या कांठीं हरिबोवांची समाधि आहे. स्थळ रम्य आहे. हरिबोवांचे समाधि स्थळावर पुढील **शिलालेख** आहे. त्यावरून बोवांच्या देहावसानानंतर सुमारें ३१ वर्षांनीं हें कार्य झालें. विशेष हें कीं, हें कार्य ' समस्त नामदेव सिंपी ' मंडळी यांनीं केलें. म्हणजे नामदेव शिंपी मंडळीची सुसंघटना तेव्हांहि होती. शिलालेखाचा उतारा मी स्वतः घेतला तो येथें देतों:—

॥ श्री ॥ गणाधीपतये नमः श्री पांडुरंग चेरणी हारी बाबा याचा सभामण्डप शालिवाण सके १७३० ॥ विभव नाम संवत्छरे माहे चैत्र श्रु:ध

१ प्रतिपदा ते दिनी काम समाप्ति समस्त सिपि नामदेव मिळोन सद्गुरु कार्ये केले आसे. कसबा नारायणगाव कारेगर घासिरामजी वलद दुलाजी गवडिं वस्ति कसबे मजकुर श्रि पांडुरंगार्पणमस्तु छ ।

अशी ही हरिबोवांची माहिती आहे. यांतील एका गोष्टीकडे विशेष लक्ष्य पुरविण्याची अखेरीस विनंति करतों. हरिबोवा हे पिढीजाद वारकरी असून रामदाससंप्रदायी दीक्षा यांनीं घेतली होती. तेव्हां समंजस मंडळी वारकरी व रामदासी यांत बहिष्कारी विरोध न कल्पितां प्रेमानें नांदणूक करीत असत असें दिसतें.

आजहि आमचे 'आधुनिक महीपती' दासगणू हे संप्रदायानें रामदासी असून पंढरीचे पक्के वारकरी आहेत हें उदाहरण येथें देण्यासारखें आहे.

१५ आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, इत्यादिसंबंधीं शंकराचार्य पीठांचे अधिकार.

(श्री **भा. वा. भट**- धुळें)

आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि बाबींशीं संकेश्वर व करवीर पीठांच्या आचार्यांचा संबंध कशा प्रकारचा होता हें दर्शविणारे बरेच पुरातन कागदपत्र अलिकडे प्रसिद्ध झाले आहेत. कै० राजवाड्यांनीं प्रसिद्ध केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ मध्यें कऱ्हाड येथील धर्माधिकारी गिजरे घराण्याचे कागद छापले आहेत. या खंडांत जितके कागद छापण्यांत आले आहेत तितकेच कागद छापण्याकरितां म्हणून तयार केलेले आमचेपाशीं आहेत. हे सर्व कागद आणि यांशिवाय पारसनीस आणि वाड यांनीं प्रसिद्ध केलेले पेशव्यांचे रोजनिशींतील उतारे व भारत इतिहास संशोधक मंडळाचीं इतिवृत्तें व वार्षिक संमेलनवृत्तें यांत प्रसिद्ध झालेले आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि विषयांसंबंधाचे कागदपत्र यांच्या आधारें प्रस्तुत निबंधांत या प्रश्नाची चर्चा केली आहे. या कागदपत्रांखेरीज या प्रश्नाची चर्चा करतांना स्मृतिग्रंथांतील वचनें व पूर्वपरंपरा इत्यादि विचारांत घेतल्या आहेत.

पुरातन कागदपत्रांच्या आधारें प्रस्तुत निबंधाच्या विषयाची चर्चा करण्यापूर्वी, आचार, व्यवहार, प्रायश्चित्त हीं ज्या स्मृतिप्रतिपादित धर्माचीं अंगें समजलीं जातात त्या धर्माचें प्रतिपादन ज्या मनू, याज्ञवल्क्य इ. स्मृतींत केलें आहे त्यांत आचार, व्यवहार, प्रायश्चित्त यांसंबंधाचे अधिकार कोणत्या व्यक्तीकडे अगर संस्थेकडे असल्याचा उल्लेख आहे याचें आम्ही प्रथम दिग्दर्शन करितों.

मनू आणि याज्ञवल्क्य या दोन स्मृति सर्वमान्य समजण्यांत येतात. या दोन स्मृतींपैकीं याज्ञवल्क्य स्मृतीवरील मिताक्षरा टीका ही महाराष्ट्रांत सर्वमान्य समजण्यांत येते. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या तीन बाबींपैकीं व्यवहारासंबंधाच्या अधिकाराची चर्चा प्रथम करूं. मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायांत व्यवहारासंबंधीं जें विवेचन केलें आहे त्यांत राजा अगर राजानें नेमिलेला न्यायाधीश यांनीं व्यवहार पहावा असं सांगितलें आहे. याशिवाय अन्य कोणी व्यवहार पहावा असें मनुस्मृतींत वचन नाहीं. आचार्यपीठावर अधिष्ठित असणाऱ्या यतिधर्म स्वीकारलेल्या यतीनें व्यवहार पहावा असें वचन कोठेंच आढळत नाहीं.

श्रुतिस्मृत्युक्तधर्मान्वयें चातुर्वर्णीय प्रत्येक व्यक्तीचे विहित असे धर्म व कर्में ठरलीं आहेत. चातुर्वर्णीय समाजापैकीं प्रत्येक व्यक्तीनें त्या व्यक्तीस स्मृतीनें सांगितलेल्या आचारांप्रमाणें वर्तन करणें, त्याचप्रमाणें स्मृतीनें सांगितलेलीं कर्में करणें हा त्याचा धर्म आहे. विहित आचाराप्रमाणें आचरण न केल्यामुळें व विहित कर्मे न केल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या दोषाचे परिमार्जनार्थ स्मृतींत निरनिराळीं प्रायश्चित्तं सांगितलीं आहेत. कोणत्या दोषास कोणतें प्रायश्चित्त विहित आहे त्याप्रमाणें कोणतेंही कर्म धर्मास अनुसरून आहे अगर विरुद्ध आहे याचा निर्णय करण्याचा अधिकार मनुस्मृतींत शिष्ट ब्राह्मणांस दिलेला आहे. मनुस्मृतीच्या १२ अध्यायाच्या १०७ ते ११५ व्या श्लोकांत खालील व्यवस्था सांगितली आहे.

" पुढें सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त असलेले शिष्ट ब्राह्मण जो धर्म सांगतील तोच निश्चित आहे असें समजावें. ब्रह्मचर्यादि पूर्वोक्त धर्माचें अनुष्ठान करून ज्यांनीं षडंगें, मीमांसा, धर्मशास्त्र व पुराणें यांनीं परिपूर्ण होणारा वेद समजून घेतला आहे ते ब्राह्मण श्रुतीच्या यथार्थज्ञानाचे हेतु आहेत. म्हणजे त्यांस यथार्थ श्रुत्यर्थ समजतो व तेच शिष्ट होत असें

समजावें. पुष्कळ न मिळाल्यास कमीत कमी दहा किंवा सदाचार संपन्न असे निदान तीन ब्राह्मण जेथें असतात ती सभा होय, अशी सभा जो धर्म निश्चित करील तो धर्मच होय असें निश्चयानें समजावें. त्याविषयीं विवाद करूं नये. तीन वेदांच्या तीन शाखा म्हणणारे तिघे, श्रुति व स्मृति यांच्या विरुद्ध नसलेल्या न्यायशास्त्रास जाणणारा एक, मीमांसारूप तर्क जाणणारा एक, निरुक्तज्ञ, मानवादि धर्मशास्त्रज्ञ, व ब्रह्मचारी, गृहस्थ आणि वानप्रस्थ अशा दहा पुरुषांची दशावरा परिषद होते. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्या शाखेचें अध्ययन करणारे व त्यांचा अर्थ जाणणारे असे तीन ब्राह्मण जेथें असतील ती धर्मसंदेह निरासार्थ परिषद् जाणावी. एकही वेदवेत्ता द्विजोत्तम ज्या धर्माचा निश्चय करील तोच परम धर्म आहे असें समजावें. वेदास न जाणणाऱ्या दहा सहस्र लोकांनीं सांगितलेला धर्म नव्हे. सावित्र्यादि ब्रह्मचर्य विरहित, वेदाध्ययनशून्य व केवल ब्राह्मण जातीचें नांव धारण करणारे असे अनेक लोक जरी मिळाले तरी त्यांची परिषद होत नाहीं. ज्यांच्या स्वभावांत तमोगुण फार आहे व धर्माच्या प्रमाणभूत वेदांस जे जाणत नाहींत आणि यामुळें अधर्म्य आहेत असे पुरुष प्रायश्चित्तादि धर्म ज्यास सांगतात त्याचें पाप शतपट होऊन त्यांस लागेल." मनुस्मृतींतील वरील वचनांवरून शिष्ट ब्राह्मणांच्या परिषदेस कोणतेंही कर्म धर्मास अनुसरून आहे अगर धर्माचे विरुद्ध आहे हें ठरविण्याचा व प्रायश्चित्ताविषयीं निर्णय करण्याचा अधिकार असल्याचें सिद्ध होत आहे. जगाशीं संबंध सोडून संन्यासाश्रम धारण केलेल्या व्यक्तीस हा अधिकार स्मृतींनीं दिलेला नाहीं.

मनुस्मृतीप्रमाणें याज्ञवल्क्य स्मृतींतही वरील बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार ब्राह्मण परिषदेसच दिलेला आहे. याज्ञवल्क्य स्मृतीच्या आचार अध्यायांत ब्राह्मण परिषदेसंबंधीं खालील उल्लेख आहे.

चत्वारो वेदधर्मज्ञाः पर्षत्त्रैविद्यमेव वा ।
सा ब्रूते यं स धर्मः स्यादेको वाऽध्यात्मवित्तमः ॥ ९ ॥

चत्वारो ब्राह्मणाः वेदशास्त्रधर्मज्ञाः पर्षत् । तिस्रो विद्या अधीयन्त इति त्रैविद्याः तेषां समूहस्त्रैविद्यं धर्मशास्त्रज्ञत्वमत्राप्यनुवर्तते तद्वा पर्षत् । सा पूर्वोक्ता पर्षत् यं ब्रूते स धर्मः । अध्यात्मज्ञानेषु निपुणतमो वेदधर्मशास्त्रज्ञस्य एकोपि वा यं ब्रूते सोऽपि धर्मः ॥ ९ ॥

मनु व याज्ञवल्क्य स्मृतींतील वरील वचनांवरून आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, इत्यादि बाबीसंबंधाचे अधिकार कोणाकडे असत याचें दिग्दर्शन केल्यानंतर हे अधिकार शंकराचार्यांच्या शृंगेरी येथील आद्यपीठास कोणी दिले अगर पीठस्थ आचार्य ते चालवूं लागले या प्रश्नाची चर्चा करणें ओघानेंच प्राप्त होतें. शृंगेरी मठाची स्थापना आद्य शंकराचार्यांचेच काळीं झाली असें मानण्यास सबळ पुरावा आहे असें मत रा. बोडसांनीं आपल्या ग्रंथांत व्यक्त केलें आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां शृंगेरी मठाची स्थापना होऊन आज जवळ जवळ १००० वर्षें होत आलीं. या दीर्घ कालांत आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि बाबतींत शृंगेरी पीठा-वरील आचार्य अधिकार चालवीत असते तर या विषयींचा पुरातन ऐति-हासिक पुरावा थोडा बहुत तरी उपलब्ध झाला असता. अशा प्रकारचा कांहीं पुरावा उपलब्ध झाला आहे कीं काय याची चर्चा करण्यापूर्वी शृंगेरी पीठाच्या बिरुदावलीवरून या बाबतींत काय अनुमान निघतें याचें प्रथम विवेचन करितों.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ पान २३४ वर शृंगेरी मठाधिपतींनीं शके १७२० चैत्र शुद्ध ९ रोजीं कऱ्हाडचे ब्रह्मवृंदास पाठ-विलेलें एक पत्र लेखांक १८२ चें छापलें आहे. या पत्रांत शृंगेरी पीठस्थ आचार्यांची साग्र बिरुदावली दिली आहे. या बिरुदावलींत प्रस्तुत मुद्याच्या चर्चेच्या दृष्टीनें महत्वाचीं अशीं खालील वाक्यें आढळतात. 'गुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिंहासनाधीश्वरसकलवेदार्थप्र-काशकसांख्यत्रयीप्रतिपालकसकलनिगमागमसारहृदयवैदिकमार्गप्रवर्तक' शृंगेरी मठाच्या आचार्यांनींच करवीर व संकेश्वर मठांची स्थापना केली व हीच बिरुदावली करवीर व संकेश्वर पीठांच्या आचार्यांनीं स्वीकारली आहे. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ पान २४० लेखांक १९० मधील संकेश्वर पीठस्थ आचार्यांच्या बिरुदावलीची वरील बिरुदावलीशीं तुलना केली असतां त्यांत म्हणण्यासारखा फरक नाहीं हें दिसून येणार आहे. शृंगेरी व करवीर पीठस्थ आचार्यांच्या बिरुदावलींतील वर नमूद केलेल्या महत्वाच्या वाक्यांचा विचार केला असतां, आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, इत्यादि बाबतींत निर्णय करण्याची सत्ता या पीठांकडे होती असें अनुमान काढणें दुरापास्त आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्यांचा अवतार अद्वैत वेदांत

तत्त्वज्ञानाची स्थापना करण्याकरितां झाला व त्यांच्या पश्चात् हेंच कार्य सतत चालूं ठेवण्याकरितां शृंगेरी पीठाची स्थापना झाली असली पाहिजे. पीठस्थापनेचा हा मुख्य हेतु दर्शविण्याकरितां बिरुदावलींत योग्य अशा वाक्यांची योजना करण्यांत आलेली आहे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, इत्यादि बाबीसंबंधाचे अधिकार शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे ठेवण्याचा हेतु मूळ मठस्थापना करणाराचा असता तर हा हेतु दर्शविण्याकरितां शृंगेरी पीठस्थ आचार्यांची बिरुदावली जेव्हां प्रथम बनविण्यांत आली तेच वेळीं योग्य शब्दांची योजना करण्यांत आली असती. शृंगेरी पीठाची स्थापना करणारे आचार्य श्रुतिस्मृतिप्रणीत धर्म पूर्णपणें जाणणारे होते यांविषयीं कोणी शंका घेईल असें वाटत नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां स्मृतीनें आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, यासंबंधाचे जे अधिकार एका व्यक्तीस दिलेले नाहींत ते अधिकार शृंगेरी पीठाची स्थापना करणारे आचार्य आपलेकडे घेतील असें अनुमान करणें सयुक्तिक होणार नाहीं. आतां दर्शविलेल्या या मुद्यांचा विचार केला असतां शृंगेरी पीठाचें स्थापन करणारे मूळ आचार्य व त्यांच्या परंपरेंतील करवीर व संकेश्वर मठाचे आचार्य यांस आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या बाबतींत कोणत्याच प्रकारचे अधिकार नसावेत असेंच अनुमान करणें युक्त होईल.

आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या बाबतींत शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडून कोणत्याही प्रकारच्या अधिकाराचा अंमल गेल्या १००० वर्षांत केला जात असता तर त्या संबंधाचा थोडा बहुत तरी पुरावा उपलब्ध व्हावयास पाहिजे होता. परंतु अशा प्रकारचा पुरावा बिलकुल उपलब्ध होत नाहीं. उलट जो थोडा बहुत पुरावा उपलब्ध झाला आहे त्यावरून शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, इ० संबंधाचे अधिकार नव्हते असेंच अनुमान काढावें लागेल. सुप्रसिद्ध संत श्रीज्ञानेश्वर यांच्या वडिलांनीं संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर कित्येक दिवसांनीं त्यांनीं गुरूचे आज्ञेवरून गृहस्थाश्रम स्वीकारला व त्यानंतर त्यांस ज्ञानेश्वरादि संतति झाली. ज्ञानेश्वर ८ वर्षांचे झाले तेव्हां त्यांच्या उपनयनाचा प्रश्न उपस्थित झाला. हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथांची रचना करणारे हेमाद्रिपंडित हे ज्या यादव राजघराण्याचे मुख्य प्रधान होते त्याची सत्ता महाराष्ट्रांत नांदत होती. स्मृतिधर्मास अनुसरून ज्ञाने-

श्वरांचा उपनयनविधि करतां येतो किंवा नाहीं या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम त्या काळीं आचार्य पीठावर अधिष्ठित असलेल्या पुरुषांकडे सोंपविण्यांत आल्याचा उल्लेख आढळत नाहीं. त्या काळीं गोदातीरावरील श्री पैठण क्षेत्राची विद्वत्तेबद्दल फार प्रसिद्धी होती. त्या क्षेत्रांतील ब्रह्मवृंदाकडे या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम सोंपविण्यांत आलें व पैठण येथील ब्रह्मवृंदानें श्रीज्ञानेश्वरांस शुद्धिपत्र देऊन उपनयन करण्यास प्रत्यवाय नाहीं असें ठरविलें म्हणून त्या काळची आख्यायिका प्रचलित आहे. शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार आहे अशी त्या काळची सामान्य जनतेची समजूत असती तर या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम पैठणच्या ब्रह्मवृंदाकडे न सोपवितां शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे सोंपविण्यांत आलें असतें. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशा प्रकारची नसल्याकारणानें शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त यांसंबंधाचे अधिकार नव्हते असेंच म्हणणें प्राप्त आहे.

महाराष्ट्रांतील देवगिरीच्या यादवांची सत्ता नष्ट झाल्यानंतर महाराष्ट्रांत मुसलमानांची राजकीय सत्ता स्थापन झाली. या काळांतील व्यवहारविषयक अनेक लेख उपलब्ध झाले आहेत. त्या लेखांचा विचार केला असतां शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे व्यवहारनिर्णयाचें काम सोंपविण्यांत आल्याचें बिलकुल आढळून येत नाहीं. त्याचप्रमाणें आचार व प्रायश्चित्त या बाबींसंबंधीं शृंगेरी पीठस्थ आचार्यांनीं अधिकार चालविल्याचीं या काळांतील उदाहरणेंही आढळून येत नाहींत.

या काळांत आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाचे अधिकार ब्रह्मवृंदाकडेच होते हें दर्शविणारा एक महत्त्वाचा लेख मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ मध्यें छापला आहे. लेखांक २०९ हा तो लेख असून शके १५४२ म्हणजे इ. स. १६२१ सालचा आहे. विजापूरच्या आदिलशाहीचा राजकीय अंमल महाराष्ट्रांत चालू असतां हा लेख झालेला आहे. प्रायश्चित्ताचे बाबतींत कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचे जे अधिकार होते त्यांची बजावणी करण्याचे बाबत कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदामध्यें तक्रार उपस्थित झाली. या तक्रारीचा आपसांत निकाल होऊन हा लेख तयार करण्यांत आला. लेखावर कऱ्हाडच्या प्रमुख ब्राह्मणांच्या संमति दर्श-

विणाऱ्या सह्या आहेत. प्रायश्चित्तासंबंधाच्या अधिकाराची बजावणी करण्याचे कामीं कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदापैकीं कोणत्या इसमांनीं पुढाकार घ्यावा, या संबंधाचा ब्राह्मणांत आपसांत वाद उत्पन्न होऊन त्या वादाचा निकाल तडजोडीनें समस्त ब्रह्मवृंदानें आपसांत केला. या लेखावरून विजापूरच्या आदिलशाहीचे रिसायतींत प्रायश्चित्तासंबंधींचे अधिकार आचार्यपीठाकडे नसून कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाकडे होते ही गोष्ट सिद्ध होते.

छत्रपति शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत मुसलमानी राजकीय सत्ता उलथून पाडून स्वराज्याची स्थापना केल्यानंतर आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाचे अधिकार शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे असल्याचा पुरावा उपलब्ध होतो कीं काय याचें आतां दिग्दर्शन करितों. स्वराज्याची स्थापना करण्यांत महाराष्ट्रधर्माची स्थापना करणें हें छत्रपति शिवाजी महाराजांचें मुख्य ध्येय होतें, हा सिद्धांत आतां सर्वमान्य झाला आहे. छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची स्थापना केल्यानंतर शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार,प्रायश्चित्त या संबंधाचे कांहीं अधिकार असते तर त्यांस त्यांनीं मान्यता दिल्याचा त्या काळचा उल्लेख खात्रीनें उपलब्ध झाला असता. परंतु अशा प्रकारचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं. उलट यासंबंधाचा जो शिवकालीन पुरावा उपलब्ध झाला आहे त्यावरून शृंगेरी पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि संबंधाचे अधिकार नसावेत असेंच अनुमान करणें प्राप्त आहे. स्वराज्याची स्थापना केल्यानंतर छत्रपति शिवाजी महाराजांनीं प्राचीन धर्मशास्त्र व नीति ग्रंथांस अनुसरून अष्टप्रधान संस्था निर्माण केली. शिवाजी महाराजांनीं निर्माण केलेल्या अष्ट प्रधानांत ‘ पंडितराव ’ या नांवाचा एक प्रधान असून या प्रधानाकडे सोंपविण्यांत आलेल्या कामाचा उल्लेख पुढें दिल्याप्रमाणें करण्यांत आला आहे. “ पंडितराव यांनीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून विविक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त पत्र होतील त्याजवर समत चिन्ह करावे. दानप्रसंग, शांती, अनुष्ठान तत्काळ करावे. ” (इतिहास आणि ऐतिहासिक विविध विषय पान २१)

पंडितराव प्रधानांनीं करावयाच्या कामाचें हें वर्णन वाचलें असतां आचार, व्यवहार, प्रायश्चित्त यासंबंधाचे सर्व अधिकार त्यांनीं पंडितराव प्रधानास दिले असल्याचें सिद्ध होत आहे. शृंगेरी अगर करवीर व संके-

श्वर पीठस्थ आचार्यांकडे या बाबतींत कोणत्याही प्रकारचे अधिकार असते तर श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची स्थापना करणाऱ्या छत्रपति शिवाजी महाराजासारख्या राजास आचार्य पीठस्थ स्वामीच्या अधिकारांचा विसर पडणें संभवत नाहीं.

छत्रपति निर्मित स्वराज्य यंत्राच्या योजनेंतील पंडितराव प्रधानाकडे सोंपविण्यांत आलेल्या कार्याच्या स्वरूपावरून चर्चा-विषयक प्रश्नासंबंधीं दिसून येणाऱ्या एका महत्त्वाच्या मुद्याचें दिग्दर्शन केल्यानंतर शिवकालीन लेखांवरून या प्रश्नाविषयीं कोणतीं अनुमानें निष्पन्न होतात यांच्या चर्चेकडे वळतों. भारत-इतिहास संशोधक मंडळाच्या तृतीय संमेलन वृत्तांत या प्रश्नाची चर्चा करण्यास उपयुक्त असे सहा लेख प्रसिद्ध झाले आहेत. रा. पोतदार यांनीं " पतितपावन पद्धति " या मंडळापुढें वाचलेल्या लेखाचे आधारार्थ हे लेख प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. या लेखांपैकीं एक लेख विद्याशंकर भारती यांनीं खंडो सोमनाथ यास प्रायश्चित देऊन शुद्ध करून घेतल्या बद्दलची हकीकत सोमेश्वर भट गिजरे व कऱ्हाडक्षेत्रस्थ ब्रह्मवृंद यांस कळविली आहे. संकेश्वरपीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि बाबींसंबंधीं कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते असें निश्चित अनुमान या पत्रांतील भाषेवरून निघतें. खंडो सोमनाथ यास आचार्यांनीं प्रायश्चित्त देऊन त्यास शुद्धिपत्र दिल्याचें नमूद केल्यावर आचार्य म्हणतात " तरी तुम्ही मठाचे मठाभिमानी आहा आम्ही केले ते तुम्ही केलें दुसरें कोणही असच करतील तर त्यास बुद्धिवाद सांगणें आम्ही त्या प्रांते येणार असो भेटीनंतर सकल वर्तमान कळू येईल. "

आचार्यांनीं वापरलेल्या या प्रकारच्या भाषेवरून प्रायश्चित देऊन शुद्धिपत्र देत आहोंत हें आपले अधिकारांतलें कृत्य नाहीं अशी त्यांची पूर्ण खात्री असल्याचें व त्यांनीं केलेल्या शुद्धिसंबंधीं कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाकडून तक्रार उपस्थित होईल याची पूर्ण जाणीव त्यांचे ठिकाणीं असल्याचें दिसतें. व म्हणूनच या पत्रांत आचार्यांनीं मऊ भाषा वापरलेली दिसते. मठाचे तुम्ही अभिमानी आहांत व आम्ही केलें तें तुम्ही केल्यासारखेंच आहे हे शब्द प्रायश्चित्ताचे बाबतींत आपणांस पूर्ण अधिकार आहेत अशी जाणीव असणाऱ्याकडून निघणें शक्य नाहीं. आचार्यांनीं केलेल्या शुद्धीचे

योगानें कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाच्या अधिकाराची पायमल्ली झाल्यामुळें कऱ्हाडचा ब्रह्मवृंद आचार्यावर नाराज होऊं नये यास्तव वरील प्रकारची भाषा आचार्यांनीं वापरल्याचें दिसतें. हा लेख २१ व्या खंडांतील ज्या १३९ व्या महत्त्वाच्या लेखांकाचा आम्ही पुढें उल्लेख करणार आहोत त्याचे पूर्वीचा असला पाहिजे हें उघड आहे. १३९ व्या लेखान्वयें मोरेश्वर भट गिजरे यांचे स्वाधीन आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाचे अधिकार संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं केले. या नंतर मोरेश्वर भट गिजरे हे आचार्यांचे प्रतिनिधि बनले. आचार्यांचे प्रतिनिधि या नात्यानें त्यांस लिहिलेल्या पत्रांत वरील प्रकारची मऊ भाषा आचार्यांकडून वापरली जाणें संभवत नाहीं. तृतीय संमेलन वृत्तांत जे सहा लेख प्रसिद्ध करण्यांत आले आहेत त्यावरूनही आचार, व्यवहार, प्रायश्चित्त यासंबंधाचे अधिकार आचार्य पीठाकडे नव्हते हेंच अनुमान दृढावलें जातें. व त्या लेखावरून त्या काळच्या महाराष्ट्रांतील सामान्य जनतेची आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाच्या अधिकाराचा खरा मालक कोण याविषयींची यथातथ्य समजूत कशाप्रकारची होती हें दिसून येतें. या लेखांपैकीं एक लेख संभाजी आंग्रे यांनीं प्रायश्चित्त देऊन शुद्धि करण्याचे बाबतींत कऱ्हाडचे ब्रह्मवृंदास लिहिलेलें पत्र आहे. दुसरे दोन लेख त्या काळच्या बऱ्याच कायस्थ प्रभु जातीच्या पुढाऱ्यांनीं कऱ्हाडकर ब्रह्मवृंदास प्रायश्चित्त व शुद्धीचे बाबतींत लिहिलेलीं दोन पत्रें आहेत. चवथा श्रीनिवास परशराम प्रतिनिधी यांनीं कऱ्हाडकर ब्रह्मवृंदास प्रायश्चित्त व शुद्धि यांचे बाबतींत लिहिलेलें पत्र आहे. या शिवाय एक लेख कऱ्हाडकर ब्रह्मवृंदानें मोकदम मौजे नाणेगांव तर्फ पाटस प्रांत पुणें यांस गंगी माळीण इजला दिलेलें शुद्धिपत्र आहे. या सर्व लेखांवरून आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाचे अधिकार कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचेच आहेत अशी त्या काळची समजूत असल्याचें स्पष्ट दिसतें.

येथ पावेतों दर्शविल्याप्रमाणें आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या संबंधाचा अधिकार कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचा असतां या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा आचार्यपीठाकडून कशाप्रकारें प्रयत्न करण्यांत आला याचें आतां आम्ही दिग्दर्शन करितों.

कऱ्हाड क्षेत्रांत गिजरे या नांवाचें नामांकित धर्माधिकारी घराणें फार पुरातन काळापासून होतें व हल्लींही आहे. आचार, व्यवहार, प्राय-

श्चित्त इत्यादि बाबीसंबंधीं क्षेत्रस्थ ब्रह्मवृंद जे अधिकार चालवी ते त्या त्या ठिकाणच्या धर्माधिकारी घराण्याच्या विद्यमानें चालवीत असे. महाराष्ट्रांतील बहुतेक मोठमोठ्या गांवीं धर्माधिकारी घराणीं आहेत. अशा या धर्माधिकारी घराण्यांपैकीं कऱ्हाडचे गिजरे धर्माधिकारी घराणें त्या काळीं प्रसिद्ध होतें. संकेश्वर व करवीर पीठस्थ आचार्यांनीं आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतींतील अधिकारांवर जें अतिक्रमण केलें तें कऱ्हाड येथील गिजरे धर्माधिकारी घराण्याच्या मार्फतीनें केलें असें या संबंधाचा जो पुरावा उपलब्ध झाला आहे त्यावरून दिसून येतें. करवीर आणि संकेश्वर मठांची स्थापना शके १६०० च्या सुमारास झाली हें आम्हीं वर नमूद केलें आहे. त्या पूर्वीं शृंगेरी पीठाचे आचार्य महाराष्ट्रांतील लोकांवर आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतींत अधिकार चालवीत असत असें सिद्ध करणारा पुरावा अद्याप पावेतों उपलब्ध झालेला नाहीं. संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा जो प्रयत्न केला त्याचा उत्तम पुरावा मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ मधील लेखांक १२९ मध्यें उपलब्ध होतो. हा लेख शके १६४० म्हणजे इ. स. १७१८ मधला आहे. कऱ्हाडचे ब्रह्मवृंदास व विशेषतः मोरेश्वर भट गिजरे धर्माधिकारी यांस संकेश्वर मठस्थ विद्याशंकर भारती यांनीं लिहिलेलें हें पत्र आहे. संकेश्वर मठास प्रतिवर्षीं लोकांकडून मिळणारें पूजाद्रव्य व आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि अधिकारांसंबंधाची योग्य तजवीज श्रीकडून पाठविण्यांत येणाऱ्या तेलंग ब्राह्मणाकडून चांगल्या प्रकारें होत नाहीं सबब या संबंधाची योग्य प्रकारें तजवीज करण्याचें काम मोरेश्वर भट गिजरे यांचे स्वाधीन केलें असून त्यांनीं हें काम पूर्व परंपरेस व मठधर्मास अनुसरून करावें असें विद्याशंकर भारती यांनीं या पत्रांत नमूद केलें आहे. आचार्यांच्या या पत्राच्या योगानें आचार्य पीठाकडून आपला मोठा बहुमान करण्यांत आला असें मोरेश्वर भट गिजरे यांस वाटणें स्वाभाविक होतें. या लेखानंतर गिजरे घराण्याचा त्याचप्रमाणें कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचा व संकेश्वर आणि करवीर पीठस्थ आचार्यांचा संबंध दृढ होत गेला, व आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि संबंधाचे अनेक व्यवहार गिजरे धर्माधिकारी घराण्यामार्फत झाले. त्या संबंधाचे सर्व कागदपत्र गिजरे यांनीं आपल्या संग्रहीं नीटपणें जपून ठेवले व तेच मराठ्यांच्या

इतिहासाचीं साधनें खंड २१ म्हणून प्रसिद्ध करण्यांत आले. गांवोगांवीं असणारे धर्माधिकारी हे आचार्यांचे प्रतिनिधी आहेत अशी प्रस्तुत काळीं जी समजूत प्रचलित आहे ती वरील लेखांकानंतर अस्तित्वांत आली असली पाहिजे असें दिसतें. करवीर व संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं वरील लेखांकानंतर ठिकठिकाणच्या धर्माधिकारी घराण्यांचे पुढारी पुरुषांस मोरेश्वर भट गिजरे यांस दिलेल्या लेखाप्रमाणें लेख देऊन त्यांना आपले प्रतिनिधि नेमले असावे असा संभव आहे. कदाचित् ठिकठिकाणचे धर्माधिकारी पुढारी स्वतःस आचार्यांचे प्रतिनिधि म्हणून मानूं लागले असावे असाही संभव आहे. यासंबंधाचा निश्चित असा पुरावा उपलब्ध झालेला नाहीं.

संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं वरील लेखांक १३९ अन्वयें मोरेश्वर भट गिजरे यांस आपले प्रतिनिधि नेमल्यानंतरच्या काळांतले आचार, व्यवहार, प्रायश्चित्त याबाबतचे आचार्य पीठाचे अधिकार मान्य करण्यांत येऊं लागले असें उपलब्ध झालेल्या लेखांवरून निष्पन्न होत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ मध्यें या प्रश्नासंबंधाचे एकंदर २६४ लेख छापून प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. या लेखांचें वर्गीकरण केलें असतां या लेखांपैकीं सुमारें ७२ लेख गिजरे धर्माधिकारी घराणें यास मिळालेल्या इनाम जमिनी त्याचप्रमाणें मौजे सैदापूर परगणे कऱ्हाड येथील समस्त ब्राह्मणांस दिलेल्या इनाम जमिनी यासंबंधाचे निरनिराळ्या अधिकाऱ्यांनीं काढलेले हुकूम आहेत. हे लेख वगळले म्हणजे बाकी राहिलेल्या लेखांचें वर्गीकरण केलें असतां खालीं दर्शविलेल्या निरनिराळ्या बाबींसंबंधाचे हे लेख असल्याचें आढळून येतें. कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदानें निरनिराळ्या व्यवहारांचा निर्णय केल्यासंबंधाचे जवळ जवळ ५३ लेख आहेत. आचार्य पीठाच्या पूजाद्रव्याबद्दलचे व मठाच्या इनामाच्या उत्पन्नाबद्दलचे २५ लेख, आचार्य पीठाकडून कऱ्हाडकर ब्रह्मवृंदास पुण्यतिथी व उत्सव यांस येण्याबद्दलच्या आमंत्रणाचे लेख २२, वृत्तीबद्दलचे लेख ३, दोषारोपाबद्दलचा लेख १, इनाम दिल्याबद्दलचे लेख २, आचार्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्याबद्दलचे लेख ५, श्रीपाद स्वामींचे लेख ३, किरकोळ लेख २४, कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाच्या प्रायश्चित्त देण्याच्या व शुद्धिपत्र देण्याच्या अधिकाराबाबतचे लेख २८, करवीर व संकेश्वर मठ यांचे प्रायश्चित्त व शुद्धि या बाबतचे लेख १३. या प्रमाणें या लेखांचें स्थूल वर्गीकरण होतें. या लेखांपैकीं व्यवहार विष-

यक जे ५३ लेख आहेत त्या लेखांत करवीर व संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं व्यवहाराचा निर्णय केल्याबद्दलचा लेख आढळत नाहीं. प्रायश्चित्त व शुद्धि या बद्दलच्या (२८ + १३ = ४१) लेखांवरून प्रस्तुत निबंधाच्या चर्चाविषयासंबंधीं कोणतीं अनुमानें निघतात याचा विचार करणें जरूर आहे.आचार व प्रायश्चित्त विषयक बाबींसंबंधाच्या लेखांचें निरीक्षण केलें असतां लेखांक २२१, २२५, २२७, २६० या लेखांमध्यें आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतचे अधिकार कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचेच आहेत याविषयीं स्पष्टपणें उल्लेख केलेला आढळतो. लेखांक २३० मध्यें करवीर व संकेश्वर मठांच्या आचार्यांनीं पाल वगैरे गांवीं आचार, व्यवहार व प्रायश्चित्त इत्यादि बाबींचा अधिकार कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचा असून संकेश्वर पीठस्थ आचार्यांचा नाहीं अशी कबुली कऱ्हाडकर ब्रह्मवृंदानें आचार्यांकडे तक्रार केल्यावरून दिल्याचें नमूद आहे. या लेखांतील कबुलीचा विचार केला असतां संकेश्वर पीठस्थ आचार्यांनीं कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाच्या अधिकारावर चालविलेलें अतिक्रमण कऱ्हाडकर ब्रह्मवृंद निमूटपणें सहन करून घेत नसे हें सिद्ध होतें. मराठी राज्य लयास जाऊन इंग्रजी राज्याची स्थापना झाल्यानंतर सुमारें ३०।३५ वर्षांनीं कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाच्या हक्कांचें अतिक्रमण संकेश्वर पीठस्थ आचार्यांकडून करण्याचा फिरून प्रयत्न केल्याचें दिसतें. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २१ लेखांक २०५ हा या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. हा लेख शके १७७८ फाल्गुन वद्य ३ चा म्हणजे इ. स. १८५६ सालामधला आहे. हा लेखांक म्हणजे विद्यानरसिंह भारती यांनीं उंब्रज येथील ब्रह्मवृंदास लिहिलेलें पत्र आहे. या पत्रांत आचार्यांनीं खालील उद्गार काढले आहेत. “ संस्थान देवतेच्या स्वारीचे संचार उद्देशे सातार प्रांतीं आगमन झाले समयीं गावगन्नानीं पहातां हिंदू लोकांत ज्ञातीधर्मास विरुद्ध वहिवाट होत असलेचे दिसून आले. सबब ये विसीचा विचार संस्थानाकडून जाहाला पाहिजे या करितां सदरहूच्या बंदोबस्तास संस्थानाकडील मठाधिकारीपणाचे कामावर वेदशास्त्र संपन्न रा. नाना बिन कृष्ण दिक्षीत व सिताराम बिन बाबा दिक्षीत उंबराणी राहणार पाल या उभयतांस नेमून आज्ञापत्रें दिलीं आणि ज्ञातिधर्मांत विरुद्ध वागतील त्याजविसींचे संस्थानी कळवून आज्ञेप्रमाणें बंदोबस्त

ठेवीत जाणें असी आज्ञा झाली. त्याजप्रमाणें सदर उभयता उंबराणी यांनीं तजवीज ठेविली असून श्री क्षेत्र करहाटकस्थ ब्रह्मवृंद यांनीं मठाधिकारी-पणाचे आज्ञापत्र घेतलें त्याजबद्दल उंबराणी उभयता याजबरोबर द्वेष करून निग्रहपत्र पालीकर ब्रह्मवृंद यासी लिहिलें त्याची नक्कल उभयता उंबराणी यांनीं हजर केली ती अवलोकनांत येऊत हें आज्ञापत्र तुम्हास सादर झाले असे तरी सदर कराडकर यांनीं उभयता उंबराणी यासी द्वेष-बुद्धीनें निग्रहपत्र लिहिलें तें अयोग्य आहे. मठाधिकारी वगैरे यांची वहि-वाट पाहून निग्रह ठेवणें अगर शुद्ध करणें हा अधिकार मठ करवीर संस्था-नाचा कराडकर यांनीं दरम्यान धांदल करून पत्र लिहिलें तें बरोबर नाहीं कराडकर हे परभारें धांदल करितात येविसीचा बंदोबस्त संस्थानांतून होणेप्रकारें होईल. ”

या उद्गारावरून इ. स. १८५६ सालांत आचार,व्यवहार,प्रायश्चित्त याबाबतचा वाद कराडकर ब्रह्मवृंद व आचार्य यांचे दरम्यान कसा उपस्थित झाला हें दिसून येतें. या वादाचा अखेर निकाल वर नमूद केलेल्या लेखांक २३० मध्यें दर्शविल्याप्रमाणें कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाच्या म्हणण्याप्रमाणें होऊन करवीर व संकेश्वर पीठस्थ आचार्यांस या बाबतींत माघार घ्यावी लागली. या वादांत सत्य बाजू कोणाची होती हें दर्शविणारा असा एक लेख उपलब्ध झाला आहे. हा लेख म्हटला म्हणजे कऱ्हाडकर ब्रह्मवृंदास मसूरकर ब्रह्मवृंदानें लिहिलेलें इ. स. १८५७ सालचें पत्र होय (लेखांक २२१). या पत्रांत मसूरकर ब्रह्मवृंदानें खालील प्रमाणें अभिप्राय व्यक्त केला आहे. “ वेदमूर्ती रा. नानाभट बिन कृष्ण दिक्षीत व सितारामभट बिन बाबा दिक्षीत उमराणी पालकर यांनीं या देशांतील सांप्रत मठाधिपत्याचा अधिकार क्षेत्र मजकुराचा असून दुर्बुद्धीनें आपले नांवें संस्थानाकडून आज्ञा-पत्रें करून घेतली. त्यास ते क्षेत्राचे द्रोही इत्यादि ”

या उल्लेखावरून कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचे वाजवी अधिकाराचें अति-क्रमण करवीर पीठस्थ आचार्यांकडून होत होतें असें स्पष्टपणें सिद्ध होतें. लेखांक २६०,२६१ हे फार महत्त्वाचे असून त्यांवरूनही आचार,व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतचे अधिकार कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचेच असल्याचें दिसून येत आहे. वर नमूद केलेले लेखांक २३० शिवाय, लेखांक २०७ शके १७८१ आषाढ वद्य ७ मध्यें कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचा कसबे व माहाल

शिराळ मधील राहणाऱ्या लोकांवरील आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतचे अधिकार कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचे असल्याचें नमूद असून करवीर पीठस्थ आचार्यांनीं त्या कसब्यांतील लोकांस कऱ्हाडकर ब्रह्मवृंदाचा अधिकार मान्य करण्याविषयीं आज्ञा केली आहे.

येथपावेतों दर्शविलेल्या पुराव्यावरून आचार,व्यवहार,प्रायश्चित्त या बाबतचे अधिकार कऱ्हाडच्या ब्रह्मवृंदाचेच पूर्वापार असल्याचें सिद्ध होत आहे. आतां हा निबंध पुरा करण्यापूर्वी उत्तर मराठेशाहींत आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतच्या अधिकारांची बजावणी कोणत्या रीतीनें केली जात असे यासंबंधाच्या कांहीं लेखांचा या ठिकाणीं उल्लेख करून हा लेख पुरा करितों.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या द्वितीय संमेलनवृत्तांत सदाशिवरावभाऊ यांच्या तोतयानें केलेल्या बंडासंबंधाचे कागदपत्र छापले आहेत. तोतया हा सदाशिवरावभाऊ आहे अशा समजुतीनें ठिकठिकाणच्या मोठमोठ्या श्रीमंत ब्राह्मण गृहस्थांनीं त्याजला मेजवान्या दिल्या व त्याच्या पंक्तीस बसून अन्नोदक ग्रहण केलें. तोतयाचें बंड मोडून तो उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी नाना फडणीस यांनीं केली. चौकशींत ज्या लोकांनीं तोतयाच्या पंक्तीस अन्नोदक ग्रहण केलें त्यांचीं नांवें उघडकीस आलीं. तेव्हां या लोकांना प्रायश्चित्त देण्याचा प्रश्न उपस्थित झाला असतां या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम करवीर व संकेश्वर पीठस्थ आचार्यांकडे सोंपविल्याचें प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांवरून दिसून येत नाहीं. तोतयाचे पंक्तीस बसून ज्या गृहस्थांनीं अन्नोदक ग्रहण केलें त्यांना कोणतें प्रायश्चित्त द्यावयाचें याचा निर्णय पेशवाईंतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री यांनीं केल्याचें प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांवरून दिसून येतें. प्रायश्चित्त बाबतचे अधिकार करवीर अगर संकेश्वर पीठस्थ आचार्यांचे आहेत अशी समज त्या काळीं प्रचलित असती तर सदरचे प्रकरणाचा निर्णय करण्याचें काम रामशास्त्री यांचेकडे न सोपवितां करवीर पीठस्थ आचार्यांकडे सोपविण्यांत आलें असतें हें उघड आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्रैमासिकांत प्रायश्चित्त व शुद्धि संबंधाची नाशिक येथील धर्माधिकाऱ्यांचीं पत्रें छापण्यांत आलीं आहेत या पत्रांवरून आचार, व्यवहार, प्रायश्चित्त या बाबतच्या वादग्रस्त प्रश्नांचा

निर्णय क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदाकडून करून घेण्यांत येत असे असें दिसून येतें. महाराष्ट्रांतील ठिकाठिकाणच्या धर्माधिकारी घराण्यांचे कागदपत्र उपलब्ध होऊन ते प्रसिद्ध केले गेले तर स्मृतिशास्त्रांत सांगितल्यान्वयें फार पुरातन काळापासून आचार, व्यवहार, प्रायश्चित्त इत्यादि बाबींसंबंधाचा निर्णय ब्रह्मवृंदाच्या सभा करीत असत व या अधिकारांची बजावणी आचार्य-पीठस्थ स्वामींकडून केली जात नसे असेंच सिद्ध होईल असा अभिप्राय नमूद करून हा लेख आम्ही पुरा करितों.

मंडळवृत्त

पाक्षिक सभा:— गेल्या तिमाहींत एकंदर **७ पाक्षिक सभा** होऊन **२४ निबंध** वाचले गेले. तसेंच तीन वेळा चित्रप्रदर्शनही झालें. निबंध व चित्रप्रदर्शन यांची यादी खालीं दिली आहे.

पा.स.	क्रमांक	निबंध	लेखक
८	२६	वाई—देशपांड्यांचें सूर्याजी पिसाळास पत्र	श्री. शं. ना. जोशी
	२७	कांहीं विश्वसनीय कुंडल्या	श्री. ना. द. आपटे
	२८	सरंजामी उत्पन्नाबाबत नियम	श्री. ग. ह. ओक
	२९	उत्तरेश्वर (कोंकणांतील)	प्रो. द. वा. पोतदार
९	३०	अफजलखानाचे कारकीर्दींतील देशपांड्यांचें वाटप.	श्री. शं. ना. जोशी
	३१	'विश्वनाथ जोशी' कवीचें बाड	श्री. चिं. ग. कर्वे
	३२	मराठींत स्वराघात (accent) आहे काय ?	श्री. कृ.पां.कुलकर्णी
	३३	सांगरें—सावंत भोसले	प्रो. द. वा.पोतदार
	३४	(अ) ओरिसा—दोन कागद	"
		(आ) खोटा ताम्रपट	"
१०	३५	दाभाड्यांचे पोवाड्याचें ऐतिहासिक सत्यत्व	श्री. ग. ह. ओक

पा.स.	क्रमांक	निबंध	लेखक
	३६	वाई येथील थिटे हशमनीस	श्री. स. ग. जोशी
	३७	थोरले माधवराव यांच्या कारकीर्दीतील देवरायदुर्ग, निजगल वगैरेकडील हालचाली	श्री. य. न. केळकर
	३८	इ.स. १८००ची पुण्यांतील धरपकड व नारोपंत चक्रदेव वगैरेंची कैद	,,
११	३९	प्राकृत लीलावती	श्री. ना. द. आपटे
	४०	कदंबकुल (टीका)	श्री. ग. ह. खरे
	४१	घोरपडे घराण्याचे कांहीं कागद	,,
	४२	हिरोजी दळवी दंडा राजपुरीकर यास मोंगलांकडून इनाम	श्री. शं. ना. जोशी श्री. वि. वा. जोशी
	४३	पुण्यांतील पालखीपदस्थांची यादी	श्री. य. न. केळकर
	४४	त्रिंबकराव मामा पेठे यांची हैदरावर स्वारी	,,
१२	४५	आर्यभट्ट व आर्यभट्टी सिद्धांत	श्री. ना. द. आपटे
	४६	शिलिमकर देशमुखांची बोपेगांवची सनद	श्री. स. ग. जोशी
	४७	वाई येथील शकर बिवींचा बाग व सत्यनाथपुरी	श्री. ग. ह. खरे
	४८	बाजी मोरेश्वर प्रकरणीं नाना फडणविसांचें पत्र	श्री. य. न. केळकर
	प्रदर्शन—	शिवाजी महा० चा इंडिया ऑफिसांतील चित्राचा फोटो	श्री. वा. सी. बेंद्रे
१३	४९	वांई—थिटे देशपांडे यांचा करिना	श्री. स. ग. जोशी
	प्रदर्शन—	वांई येथील वाघ यांजकडील दोन जुनीं चित्रें	श्री. शं. ना. जोशी

सभासदः— गेल्या तिमाहींत पुढील नवीन सभासद मंडळास मिळाले.

क्र. नं.	सभासदाचें नांव.	गांवाचें नांव.	वर्ग.
१७१९	श्री. गोपाळ वामन गोडबोले	पुणें	४
१७२०	श्री. माधव सदाशिव केळकर	पुणें	४
१७२१	श्री. रविशंकर डेराश्री	बनेडा	४
१७२२	श्री. राजाराम वामन जानोरकर	पुणें	४
१७२३	श्री. दत्तात्रय केशव गोंधळेकर	पुणें	तहा. ४

ग्रंथालयः– मंडळास गेल्या तिमाहींत देणगीदाखल व अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
ॲबॅट जस्टिन् इ.	रामदास; ट्रान्स्लेशन् ऑफ् महिपतीज् संतविजय	रे. जे. एफ्. एडवर्ड्स,
ओझा रायबहादूर गौरीशंकर हिराचंद	राजपुतानेका इतिहास चतुर्थ खंड	वैद्य चिं. वि.
गव्हर्नमेंट ऑफ बॉंबे	पेशवे दप्तर नं. २५ पेशवे आणि निजाम १७४०–१७६१ पेशवे दप्तर नं. २६ ताराबाई आणि संभाजी १७३८–१७६१	गव्हर्नमेंट ऑफ बॉंबे
गुप्ते य. रा.	थोरल्या शाहू छत्रपतींचें एक महत्त्वाचें अस्सल पत्र	ग. ह. खरे
तारकुंडे सीताराम रघुनाथ	ब्राह्मण मुत्सद्दी व योद्धे भाग १ ला.	तारकुंडे सी. र.
बर्वे एम्. डब्ल्यु आणि बर्वे आर्. जी.	लाइफ् अँड टाइम्स ऑफ् शिवाजी दि सेकंड	बर्वे एम्. डब्ल्यु. आणि बर्वे आर्. जी.
लेले र. का.	धर्मशिक्षणाची दिशा	पोतदार प्रो. द. वा.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
वालावलकर अ. ब.	मठगांवचा शिलालेख आणि कुडाळ प्रांताचा प्राचीन इतिहास हप्ता १ ला	वालावलकर अ. ब.
वैद्य चिं. वि.	मराठी स्वराज्यसंस्थापक श्री शिवाजी महाराज	वैद्य चिं. वि.
सरकार जे. एन्	बिहार अँड ओरिसा ड्यूरिंग दि फॉल् ऑफ् दि मोगल एम्पायर	सरकार जे. एन्.
सीवेल रॉबर्टस्	दि हिस्टॉरिकल् इन्स्क्रप्शन्स् ऑफ सदर्न इंडिया	युनिव्हर्सिटी ऑफ् मद्रास

इतर वृत्त

गेल्या तिमाहींत नेहमींप्रमाणें मंडळ पाहाण्यास आलेल्या लोकांशिवाय ट्रेनिंग कॉलेज पुणें, वाक व लोणी–काळभोर येथील शाळा, महिला विद्यापीठातर्फे चाललेला दुय्यम शिक्षकांचा वर्ग, यांतील विद्यार्थी व शिक्षक हे मंडळ पाहण्यासाठीं आले असतां त्यांस संशोधनाविषयीं माहिती देऊन प्रदर्शन दाखविण्यांत आलें.

या तिमाहींत रँग्लर नारळीकर, बाबू भगवानदास, रामानंद चतर्जी, ए. वीग, जूलियन पी. स्कॉट, अमेरिका, यांनीं संस्था पाहून अतिशय समाधान व्यक्त केलें आहे.

17 Marathi Contents of this Issue

Articles.

(13) *Patilki* in Shivaji's times—by S. N. Joshi gives much information about Patilki in point of its origin, function, etc. (p. 73).

(14) *Haribava* a tailor and his work *Dnanasagar*—by Prof. D. V. Potdar—gives some interesting details about the said author and his works which are mostly unpublished. (p. 85). *

(15) *Shankaracharya* and his powers about *Achara, vyavahara, Shudhhi, Prayashchitta*, etc.—yb B. V. Bhat—is an

attempt to prove that the various *Shankaracharyas* had no powers of any kind in the above matters; but the assemblies of Brahmans from different holy places used to decide in these till recent times. (p. 91).

Sources.

Mediæval:—(1) A note on the Daulatabad copperplates (Hyderabad Archaeological series No. 2 of 1917) (concluded)—by G. H. Khare—he suggests the identification of some places mentioned in the plates (p. 33). (2) Parbhani grant of Cālukya Arikesarin III, Śaka 888—reading by G. H. Khare and S. N. Joshi and notes, translation, discussion etc. by G. H. Khare— is a very important insciption as it sheds new light on the Cālukya family to which the donor Arikesarin III belonged and Somadeva the author of Yaśastilaka (p. 33). (3) Kanarese inscriptions from Pulunja—by G. H. Khare—gives some introductory information about them—to be continued. (p. 56).

Persian—Letters from a Ghorpade family of Khanapur (Kolhapur)—by G. H. Khare—contains letters among which No. 61 shows that war was looked upon as a remedy against unemployment. No. 63 informs that the subahdari of Karanataka passed from Musakhan to Miyan Mushk in A. D. 1673. No. 64 is an order of prohibition against the high-handedness of one Khair-ud-din Muhammad's subordinates towards a member of the Ghorpade family (A.D. 1674). No. 65 gives information about the capture of Allur Palampet by Lateef Shah with the help of Negoji and Mukundji Ghorpade (A. D. 1675).

Pertaining to Shivaji's times—(1) Letters from the same Ghorpade family—by D. V. Apte and G. H. Khare—contains some letters among which No. 726 is a letter of Rajaram, the son of Shivaji, exhorting some one from the Ghorpade family to join the Marathas against the Mughals. Nos 722, 725, 726, 727 give some clue as to how greater Maharashtra was being formed in those times. (2) A letter from the Nimbalkar family of Phaltan—by S. N. Joshi—is of the same type as No. 726

Miscellaneous: A *sanad* given by the fourth Peshwa Madhavrao I to Haripant Phadke granting him his own private *Deshmukhi Vatan* in A. D. 1771—by S. N. Joshi.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

विक्रयालय शाखा

या शाखेचे विद्यमानें खालील व इतर खास ऐतिहासिक मालांचीं पुस्तकें विकत मिळतील.

१ भा. इ. सं. मंडळ—स्वीय ग्रंथमाला

२ भा. इ. सं. मंडळ—पुरस्कृत ग्रंथमाला

३ श्री शिवचरित्र कार्यालयाचे ग्रंथ

४ कै. राजवाडेकृत ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' उपलब्ध खंड, १,४,५,७,१०,११,१२,१३,१४,१५ आणि २०

५ कै. खरेकृत ' ऐतिहासिक लेखसंग्रह ' उपलब्ध खंड ५ ते १४

६ ' पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद ' ह्या चालू झालेल्या नवीन मालेचीं पुस्तकें (भाग १ ते २६)

यांशिवाय या शाखेमार्फत सभासद व इतर मागणीदारांचे सोईसाठीं ऐतिहासिक व वाङ्मय ग्रंथ शोधपूर्वक मिळवून पाठवूं. प्रत्येक मागणीबरोबर निदान निम्मी रक्कम पाठविली पाहिजे.

दान केलेलें व त्याच्या भोंवतालचीं गावें शोधण्याच्या बाबतींत वरील संपादकद्वय म्हणतात कीं, मुच्चुंगुरुंकि हें नाव हीं गावें गुलबुर्ग्याच्या आसपास कोठें तरी शोधिलीं पाहिजेत असें सुचवितें. कारण **गुर्की** अंत्य-पद असलेलीं गावांचीं नांवें सामान्यतः त्या बाजूस आढळतात. मला वाटतें हीं गावें परभणी ताम्रपटांतील गावांच्या आसपास पाहिलीं पाहिजेत. कारण (१) सब्बि हें देशनाम दोन्ही ताम्रपटांत एकच आहे व (२) मिट्टा अंत्यपद असलेलीं गावें वारंगळच्या पश्चिमेस आहेत. उदाहरणार्थ **हैद्राबाद** संस्थानापैकीं करीमनगर जिल्ह्यांतील **राजगोपाळपेठ**च्या आग्नेयीस सुमारें ५ मैलांवर नरमिट्टा (Nurmitta) हें गांव आहे. मी स्वतः वरील विचारसरणीच्या अनुरोधानें शोध करीत असतां मला तीन गावें ताम्रपटांतील नांवांशीं जमणारीं अशीं आढळलीं. पैकीं **कोप्पडा**चें हल्लींचें नाव Koyada व अक्षांशरेखांश ७९,९;१८,११ आणि **गोट्टणमिट्टा**चें हल्लींचें नांव Gotlamitta व अक्षांशरेखांश ७९, १०॥; १८, १३ असे आहेत. हीं दोन्ही गावें राजगोपाळपेठेच्या ईशान्येस आहेत. याशिवाय **कुंट आत्कूर** व **आत्कूर** अशीं दोन गावें आत्कुरु या नांवाशीं जुळणारीं आहेत. पण तीं वरील २ गावांपासून बरींच लांब आहेत. मजपाशीं अतिशय सूक्ष्म नकाशे नाहींत. पण ज्यांपाशीं ते असतील त्यांस आणखीही गावें या गावांच्या आसपास सांपडतील.

या गावांच्या बाबतींत हैद्राबाद येथील एंजिनिअर श्री म. दा. गाडगीळ यांस पृच्छा केली असतां त्यांनीं पत्र पाठवून कळविलें आहे कीं, या ताम्रपटांतील गावें ५६ $\frac{11}{7}$ या नकाशांत सांपडतात तीं अशीं— नकरेगुम्मलु= Nakarkomla, पर्रुवद्या=Pariwada कोप्पडा=Koheda, गोट्टणमिट्टा= Gotlamitta (श्री. गाडगीळ यांचें ता. ४।४।३२ चें पत्र).

---

१७ चालुक्य अरिकेसरिन् याचा परभणी ताम्रपट श. ८८८

(श्री. ग. ह. खरे व श्री. शं. ना. जोशी.)

उपलब्धिः— प्रस्तुत ताम्रपट श्री. शं. ना. जोशी यांनीं परभणी येथून

श्री. नानल वकील यांच्या करवीं आणिला. यांतील वाचन दोघांनीं केलें असून टीपा, भाषांतर व सर्व विवेचन हीं श्री. खरे यांचीं आहेत.

ताम्रपटवर्णनः– या ताम्रपटाचे ३ पत्रे असून त्यांची लांबी, रुंदी व जाडी अनुक्रमें ११½", ५½" आणि ⅛" आहे. ज्या कडींत पत्रे ओवले आहेत तिचा व्यास ४½" असून सळईची जाडी ½" आहे कडीच्या जोडावर २½" व्यासाची मुद्रा असून तीवर ' श्रीमदरिकेसरिणः' हा मजकूर नागरी लिपींत लिहिलेला आहे. या मजकुराखालीं वाममुख व उर्ध्व-पुच्छ डुक्कर असून त्या खालीं डावीकडून उजवीकडे क्रमानें शंख, सूर्य, चंद्र आणि अंकुश यांचीं चित्रें खोदलीं आहेत. पहिल्या व तिसऱ्या पत्र्यांच्या आंतील बाजू व दुसऱ्याच्या दोन्ही बाजू लिहिलेल्या आहे. लिहिलेल्या ४ बाजूंवर अनुक्रमें १४, १४, १३, १० ओळी आहेत. पत्र्यांच्या कडा उंचावलेल्या असल्यामुळें लेखन सुरक्षित रहावयास पाहिजे होतें. पण दुर्दैवानें तसें झालेलें नाहीं.

अक्षरवटिकाः– यातील लिपी कानडी असून ९ व्या शतकांतील इतर प्रामाणिक लेखांशीं जुळणारी आहे. **म** दोन प्रकारचा काढला आहे. पैकीं एक प्रकारचा म मान्दिरं (ओ. २), यशोधाम (ओ. २७), या व इतर शब्दांत असून दुसरा प्रकार कमनीय (ओ. ११), यथार्त्थमुच्चे (ओ. १२), नामधेय (ओ. ३७) या व आणखी कांहीं शब्दांत आढळतो. **व**ही दोन प्रकारचा आढळतो. **य** हें अक्षर स्वतंत्र काढतांना वेगळें काढलें आहे व जोडतांना निराळयाच पद्धतीनें काढलें आहे.

लेखनपद्धतिः– कांहीं ठिकाणीं जिव्हामूलीय आला आहे. उ. तेजᳵकान्ति (ओ. ५), सुतᳵकमनीय (ओ. ११), शिरᳵकुट्टाक (ओ.१४), त्रिनेत्रयोᳵकार्त्तिकेय (ओ. २०), उपनिषदᳵकविता (ओ. २८), क्वचित् ठिकाणीं उपध्मानीय आला आहे. उ० श्रियᳶपात्र (ओ. ५), भीम-ᳶपाण्डव (ओ. ८). कांहीं ठिकाणीं अनुस्वाराबद्दल परसवर्ण केला आहे. उ० पात्रन्तस्या (ओ. ५), निळयन्तं (ओ. ९), धारन्दत्तः (ओ. ४२) सामान्योयन्धर्म्म (ओ. ४४), वसुन्धराम् (ओ. ४९). कित्येक जागीं विसर्गाबद्दल परसवर्ण लिहिला आहे. आदर्शस्समस्त (ओ. २७), चरण-स्सकळ (ओ. २९), राजभिस्सगरा (ओ. ४६), विनयस्स (ओ. २०). रेफापुढील अक्षरास सामान्यतः द्वित्त्व आहे; पण अपवादही आहेत. उ०

बभूवुर्बहवः (ओ. २५), आदर्श (ओ. २७), स्वस्त्यकाळवर्ष (ओ.३१) अनेक ठिकाणीं ल बद्दल ळ वापरला आहे.

भाषाः– संस्कृत. पहिल्या २७ ओळीपर्यंत पद्य, पुढें ४४ ओळीपर्यंत गद्य, पुढें ५० ओळीपर्यंत पद्य व पुढें पुन्हां गद्य असा क्रम आहे.

दानहेतूः– दान देण्याचा हेतू पुढील प्रमाणें सांगितलेला आहे. लें–बुळपाटक नावाचें एक गाव असून तें दान देणारा जो अरिकेसरिन् त्याच्या राजधानीचें शहर होतें. त्यांत शुभधामजिनालय नावाचा एक जैन बस्ति होता. या बास्तिविषयीचीं खंडस्फुटित, नवसुधाकर्म, बाळि आणि नैवेद्य हीं कर्मे चालावीत म्हणून एक गाव दान करण्यांत आलें आहे. दान करणारा अरिकेसरिन् हा आहे. काल श. ८८८.

कालनिश्चयः– ताम्रपटांत कालाचा उल्लेख शक ८८८, क्षय संवत्सर, वैशाख पौर्णिमा, बुधवार असा आहे. पैकीं गत शक ८८८ ला क्षय संवत्सर येत आहे. पण वैशाख पौर्णिमस बुधवार येत नसून रविवार येत आहे. याची इंग्रजी तारीख इ. स. ९६६ एप्रिल ८ ही आहे. अर्थात् वार सांगण्याचा चुकला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

स्थलनिश्चयः– ताम्रपटांत पुढील गावें आलीं आहेत. [**लें**] **बुळपाटक**= ३रा अरिकेसरिन् याच्या राजधानीचें गाव. याच गावांतील जिनालयास **वनिकटुपुलु** हें गाव दान दिलें आहे. **सब्बिदेशसहस्रांत** हें गाव होतें. **रेपाकद्वादश** या पोटभागांत तेंच दान दिलेलें गाव होतें. **दरियूरु हें** दान दिलेल्या गावाच्या पूर्वेचें गाव. **कट्टाकूरु** हें दानभूत गावाच्या उत्तरेचें गाव. **वेळ्ळाळपट्टु** हें दानभूत गावाच्या पश्चिमेचें गाव. **इळिंदिकुंट** हें दानभूत गावाच्या दक्षिणेचें गाव. अशीं एकंदर आठ ग्रामनामें दानाचें वर्णन करतांना आलेलीं आहेत. पैकीं [लें] बुळपाटक, रेपाक व कट्टाकूरु हीं तीन गावें, करीमनगर जिल्ह्यांत (हैद्राबाद संस्थानपैकीं) मला सांपडलीं. पण बाकीचीं सांपडेनात. यामुळें माझी गावांची ओळख चुकली तर नाहींना अशी शंका येई.पण या शंकेचें निरसन लवकरच झालें.वरील गावांविषयीं व ताम्रपटाविषयीं माहिती देणारा एक लेख मी निजामविजयांत प्रसिद्ध केला. (ता. ११। ८।३१). त्यांत मी वरील गावांविषयीं माझा तर्क प्रसिद्ध करून वाचकांस विनंति केली होती कीं, त्यांनीं माझा तर्क खोटा किंवा खरा आहे हें सांगून ताम्रपटांतील गावांचा निश्चय करण्यास मदत करावी. या लेखास उत्तर

म्हणून एक पत्र हैद्राबाद येथील एंजिनियर **श्री. म. दा. गाडगीळ** यांनीं धाडलें (ता. १३।९।३१.). त्यांत त्यांनीं माझा तर्क बरोबर असल्याचें लिहून ताम्रपटांतील गावें दाखविणारा नकाशा पाठविला. त्यावरून तर एकंदर ६ गावें सांपडलीं. फक्त **साब्बि** व **दरियूरु** हीं दोन नावें सांपडलीं नाहींत. बाकी सहा गावांचीं नकाशांतील नावें Wemalwada, Wontudpulla, Reapac, Kutkoor, Vallamputla, Illandakoonta अशीं आहेत.

इतर:— शेवटच्या दोन ओळींत (५० व ५१) हें दान देणारा, सांगणारा व खोदणारा अशा तिघांची माहिती दिली आहे. पैकीं दान देणारा **अरिकेसरिन्** आहे हें एकदां स्पष्ट झालें असूनही पुन्हा ५० व्या ओळींत 'अरिकेसरिणा दत्तं' असें म्हटलें आहे. या शेऱ्याची आवश्यकता होतीच असें वाटत नाहीं. या दानपत्राची रचना करणारा **पेद्दणभट्ट** नावाचा कवि आहे. याच्या विषयीं **कथितं कविपेद्दणेन भट्टेन** असें म्हटलें आहे. पण येथें कथितं याचा अर्थ रचितं असाच असावासें वाटतें. वेमुलवाडा शिलालेखांवरून तन्त्रपाल नागमार्य याचा मुलगा पेद्दण नामधारी होता असें दिसतें. शिलालेखांतील व ताम्रपटांतील पेद्दण एकच असतील काय ? खोदणाराचें नांव रेव असें असून शुभधाम जिनालयाशीं म्हणजे ज्या जिनालयाच्या योगक्षेमाकरितां दान दिलें आहे त्या जिनमंदिराशीं याचा कांहीं तरी जवळचा संबंध असावा असें 'शुभधामजिनाळयस्य' या पदावरून उघड होत आहे.

चर्चा:— हा ताम्रपट अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. हा ज्या कुलाचा आहे त्याची माहिती माझ्या समजुतीप्रमाणें पंपाचें[1] 'विक्र-

१ हा दिगंबरजैनपंथी कवी असून मूळचा वेंगी प्रांतांतील राहणारा होता. यानें आपला आश्रयदाता जो २ रा अरिकेसरिन् त्याच्या सांगण्यावरून भारत किंवा विक्रमार्जुनविजय हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लिहिल्याबद्दल त्यास २ ऱ्या अरिकेसरिन्नें बच्चेसहस्र या देशविभागांतील धर्मऊरु हें गांव बक्षिस दिलें. पंपानें आपल्या ग्रंथांत खालीं दिलेल्या वंशावळींतील २ ऱ्या अरिकेसरिन्पर्यंतच्या पुरुषांची माहिती दिली आहे. पंपानें हा ग्रंथ श. ८६३ मध्यें पुलिगेरे—हल्लींचें लक्ष्मेश्वर—येथील सुंदर कानडींत रचिला. मी पंपभारताच्या राइस संपादित व कर्नाटक साहित्य परिषत्संपादित अशा दोन्ही प्रतींचा उपयोग केला आहे.

मार्जुनविजय ' किंवा ' पंपभारत ', सोमदेवसूरीचें[1] ' यशस्तिलक, ' प्रस्तुत ताम्रपट, वेमुलवाडा शिलालेख[2] व कोलिपारा दानपत्र[2] या पांच ठिकाणीं मुख्यतः आली आहे. चामुंडपुराण व इतर साधनें यांत या कुलाविषयीं कांहीं माहिती आल्याचें कै. डॉ. का. बा. पाठक हे म्हणत असत. पण मला ती माहिती मिळालेली नाहीं. या सर्व साधनांचा अभ्यास करीत असतां मजपुढें जे प्रश्न उभे राहिले त्यांचीं उत्तरें यथामति देत आहे. तत्पूर्वीं वरील ५ आधारांत जी माहिती आली आहे ती कोष्टकरूपानें पुढें देतों. तसेंच तीविषयीं दुसऱ्या कोणी मतभेद प्रकट केला असल्यास तेंही नमूद करतों.

पंपभारत

चालुक्य वंश

(१) युद्धमल्ल– (१) १। लक्ष प्रदेशावर राज्य करतो, (२) ५०० हत्तींना तेलाची आंघोळ घालतो.

|

(२) अरिकेसरि– वेंगीच्या प्रधानांसह निरुपम देवाच्या राज्यावर आक्रमण करतो.

| |

(३) नरसिंग, नरसिंह (४) भद्रदेव

|

(५) दुग्धमल्ल (युद्धमल्ल)

|

(६) बद्देग—भद्रदेव– (१) ४२ लढाया मारतो,
(२) सोळदगंड ही पदवी मिळवतो,
(३) भीमास पाण्यांत शिरून पकडतो

|

(७) दुग्धमल्ल (युद्धमल्ल)

|

(८) नरसिंह, कलि नरसिंह, नरसिंग, नरग– (१) सुभद्र मुनीचें

---

१ हाही एक दिगंबर जैन कवी असून यानें यशस्तिलकचंपू, नीतिवाक्यामृत, युक्तिचिंतामणि, वगैरे संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत. यानें यशस्तिलकचंपूच्या शेवटीं स्वतःविषयीं व ग्रंथरचनेविषयीं कांहीं माहिती दिली आहे. तीवरून यानें वरील चंपूकाव्य, श. ८८१ मध्यें राष्ट्रकूट राजा श्रीकृष्ण हा मेलपाटी येथें राज्य करीत असतांना आणि त्याचा सामंत व अरिकेसरिचा पहिला मुलगा बद्यग हा गंगधारा येथें राज्य करीत असतांना, तयार केलें असें दिसतें.

2 J. Andhra historical research Society Vol. VI pp. 185, 189.

प्रतिबिंब, (२) लाळ शरण येतात, (३) सात माळल (माळव) मुख्यांना लुटतो, घूर्जरराज सैन्याला पळवून लावतो व गंगेच्या पाण्यानें घोड्यांना न्हाऊं घालतो, (५) महीपाल पळून जातो, (६) याचा मित्र संगाचा नाश करतो, (७) याची बायको जाकव्वे.

|

(९) अरिकेसरि किंवा अरिग– गोज्जिग किंवा गुज्जिग यापासून विजयादित्याचें रक्षण करतो.

|

(१०) वद्दिग (१) अरिकेसरिन्चा प्रथम पुत्र (२) राजधानी गंगधारा (यशास्तिलकावरून)

(४) डॉ. फ्लीट यांच्या मतें नरसिंहभद्रदेव हें एकच नाव असून तें पहिल्या अरिकेसरिन्च्या मुलाचें नांव होतें असें त्यांनीं म्हटलें आहे. (डिनॅस्टिज् ऑफ दि कॅनरीज डिस्ट्रिक्टस् पृ. ३८०). पण हें विधान अगदींच चुकीचें आहे हें सहज ध्यानांत येईल. (८,२) ही गोष्ट डॉ. फ्लीट देत नाहींत. (८,६) ही गोष्ट डॉ. फ्लीट देत नाहींत व राइस शंका प्रगट करून देतात (पंपभारत, प्रस्तावना पृ. ४ पादटीप १). (८,७) डॉ. फ्लीट याच्या बायकोचें नाव चंद्रानना असें देतात. राइस जातव्वे असें देतात (पंपभारत, प्रस्ता. पृ. ४). श्री. आर. नरसिंहाचार्य जाकव्वे असें देतात. मूळांत पहिल्या आश्वासाच्या ३९ व्या कवितेंत जाकव्वे किंवा जातव्वे असा कोणताच शब्द नसून जेथें हा शब्द असावयाचा त्या दुसऱ्या ओळींत कांहीं जागा मोकळी असून पुढें चंद्रानना असा शब्द आहे. त्यावरून डॉ. फ्लीट यांनीं नरसिंहाच्या बायकोचें नाव चंद्रानना असें ठरविलें आहे. पण राइस यांच्या म्हणण्याप्रमाणें तें विशेषण असणें शक्य आहे. (९) याच्या बापाचें नाव डॉ. फ्लीट युद्धमल्ल असें देतात. पण ती अगदीं स्पष्ट चूक आहे. कारण पंपभारत, प्रस्तुत ताम्रपट व वेमुलवाडा शिलालेख या तिन्ही ठिकाणीं नरसिंह असें नांव आलें आहे. (१०,१) सोमदेव याला अरिकेसरिन्चा प्रथम पुत्र असें म्हणतो. अर्थात् त्याच्या मताप्रमाणें अरिकेसरिन्ला एकापेक्षां जास्त मुलगे असावेत असें वाटतें. पण या ताम्रपटावरून भद्रदेव नावाचा अरिकेसरिन्ला एकच मुलगा होता असें दिसतें.

परभणी ताम्रपट

चालुक्य वंश (आदित्यभव)

(१) युद्धमल्ल– (१) सव्वा लक्ष प्रदेशावर राज्य करतो, (२) हत्तींना तेलाची आंघोळ घालतो, (३) कलिंग त्रयासह वेंगीचें संरक्षण करतो.

(२) अरिकेसरिन्

(३) नरसिंह– नरसिंघ आणि (४) भद्रदेव.

(५) युद्धमल्ल

(६) बद्दिग– (१) संगमाला विरुद्ध करतो, (२) भीमास पाण्यांतील युद्धांत पकडतो.

(७) युद्धमल्ल

(८) नरसिंघ

(९) अरिकेसरिन्–(१) याची बायको प्रख्यात राष्ट्रकूट कुलांतील लोकांबिका

(१०) भद्रदेव– वद्यग (१) शुभधाम जिनालय बांधतो.

(११) अरिकेसरिन्– (१) राजधानी लेंबुळपाटक
(२) सोमदेवसूरीस दान देतो.

वेमुलवाडा शिलालेख

चालुक्य कुळ

(१) विनयादित्य ऊर्फ युद्धमल्ल (१) सवा लक्ष प्रदेशाचें रक्षण करतो, (२) तेलानें हत्तींना आंघोळ घालतो, (३) चित्रकूटाचें हरण करतो.

(२) अरिकेसरीश– बळेंच वेंगी देश घेतो.

(३) नरसिंहवर्मन्– उर्फ राजादित्य ?

(?) युद्धमल्ल

(८) नरसिंहदेव- (१) गुर्जरराजसेना जिंकतो, (२)७ राजांना जिंकतो.

(९) अरिकेसरिन्- (१) गोविंदाच्या (गोज्जिग) राज्यहरणापासून बिज्जाचें रक्षणे करतो, (२) बायको रेवक्का ?

कोल्लिपारा दानपत्र.

चालुक्यवंश— रणविक्रम सत्याश्रय-- पृथिवीपति— महाराज — विनयादित्य युद्धमल्ल— अरिकेसरिन्

मध्ययुगीन इतिहासांत ४ प्रसिद्ध चालुक्य कुलें झालीं. एक बदामीचें, दुसरें कल्याणीचें, तिसरें वेंगीचें व चौथें प्रसिद्ध कानडी कवि पंप व संस्कृत कवि सोमदेवसूरि वगैरेंनीं उल्लेखिलेलें. यांपैकीं बदामीच्या चालुक्य कुलांतूनच वेंगीचें चालुक्य कुल उत्पन्न झालें[१]. यामुळें वेंगीच्या चालुक्य कुलाविषयीं निराळें लिहिण्याची जरूरी नाहीं. कल्याणीचे चालुक्य स्वतःस बदामी चालुक्यांचे वंशज म्हणवितात. बदामी चालुक्यकाल व कल्याणी चालुक्यकाल या दोहोंमध्यें राष्ट्रकूटांची रियासत होऊन गेली. या मधल्या काळांत या दोन्ही कुलांना जोडणारे जे पुरुष होऊन गेले त्यांविषयीं निश्चयात्मक अशी माहिती मिळत नसली तरी कल्याणी चालुक्यांच्या लेखांतून या दोन्ही कुलांची साखळी जोडून दाखविली आहे.[२] त्या साखळीशीं आपणांस सध्यां कांहीं कर्तव्य नाहीं. आपणांस फक्त चालुक्यकुल सूर्य, चंद्र, नाग वगैरे कोणत्या वंशांतील आहे हें पहावयाचें आहे. बदामीचे चालुक्य स्वतःच्या लेखांतून आपण कोणत्या वंशाचे आहों हें सांगत नाहींत. ते स्वतःस **मानव्यसगोत्राणां** असें म्हणवितात.[३] मानव्यसगोत्राणांया शब्दांतून कांहीं निश्चित अर्थ काढावयाचा झाल्यास तर तो असा निवूं शकेल कीं,

---

१ वेंगी येथील चालुक्य कुलाचा संस्थापक विष्णुवर्धन हा बदामीच्या चालुक्य कुलांतील प्रसिद्ध राजा दुसरा पुलकेशिन याचा धाकटा भाऊ होता.

२ पहा सोनवडे ताम्रपट (भा. इ. सं. मं. त्रै. व. १० अं. २) कवठे, दौलताबाद, मिरज हे ताम्रपट याच ताम्रपटाच्या धर्तीवर आहेत. हे कोठें प्रसिद्ध झाले आहेत ते सोनवडे ताम्रपटाच्या लेखांत दिलें आहे.

३ पहा लोहणेर ताम्रपट (दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ पृ. १). या लेखावरून तत्कालीन इतर ताम्रपट कोठें प्रसिद्ध झाले आहेत हेंही समजेल.

मनूच्या गोत्रांत उत्पन्न झालेले व चालुक्य यांचें गोत्र एकच होतें. पण यावरून हें कुल सूर्यवंशी कीं सोमवंशी हें ठरूं शकत नाहीं; कारण मनूपासून सर्वच मनुष्यें उत्पन्न झालीं आहेत. तेव्हां सूर्य व सोम हे दोन्ही वंश उत्पन्न झाले असल्यास नवल काय ? वेंगीचे चालुक्यही अनेक लेखांतून स्वतःस 'मानव्यसगोत्राणां' असें म्हणत असल्यानें त्यांच्या लेखांवरूनही हें चालुक्य कुल कोणत्या वंशाचें हें ठरूं शकत नाहीं. कल्याणी चालुक्यांच्या कांहीं लेखांतून 'मानव्यसगोत्राणां' असा शब्दप्रयोग येतो.[१] पण कांहीं प्रामाणिक लेख असेही आहेत कीं, ज्यांत ते स्वतःस सोमवंशी म्हणवितात.[२] कल्याणीचे चालुक्य स्वतःस बदामीच्या चालुक्यांचे वंशज म्हणवीत असल्यानें कल्याणीचे चालुक्य ज्या वंशाचे आहेत असें ठरेल त्याच वंशाचे बदामीचे चालुक्यही निदान कल्याणी चालुक्यांच्या मतानें ठरेल. आज जो ताम्रपट हातीं आला आहे त्यांत चालुक्यकुल सूर्यवंशी होतें असें सांगितलें आहे.[३] अर्थात् येथें परस्पर विरुद्ध विधानें आलीं. यामुळें ३ तर्क संभवतात. (१) चालुक्य कुल सूर्यवंशी असावें. (२) चालुक्य कुल सोमवंशी असावें. (३) दोन तऱ्हेचीं चालुक्य कुलें असून कांहीं सूर्यवंशी तर कांहीं सोमवंशी असावींत. या तीन विधानांपैकीं कोणतें विधान खरें हें, मला वाटतें, आणखी पुराव्याशिवाय निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं. पण तिसरें विधान शक्य दिसत नाहीं.

हें चालुक्य कुल कोठें राज्य करीत असे हा यापुढील प्रश्न आहे. पंपानें आपला भारत किंवा विक्रमार्जुनविजय हा ग्रंथ लक्ष्मेश्वरच्या उत्तम कानडींत लिहिला असून त्यांत त्यानें आपल्या आश्रयदात्याच्या कुलाची स्तुति केली आहे. यामुळें सामान्यतः सर्वांची अशी समजूत झाली कीं, हें कुल किंवा त्यांतील कांहीं पुरुष लक्ष्मेश्वर व त्याच्या आसपासचा प्रदेश यांवर राज्य करीत असावेत. उ० राइस म्हणतात कीं, "Meanwhile certain offshoots of the family (=Chalukya) retained a measure of power in various parts, among whom were the

१ ५ वी टीप पहा.

२ पहा Epi. Ind. १३, ३८; १५, १०६; १५, ३४९.

३ अस्त्यादित्यभवो वंशश्चालुक्य इति विश्रुतः (परभणी ताम्रपट)

rulers of the state of which Puligere was the capital.[1]" डॉ. फ्लीट म्हणतात, "Also, as Pampa specifically states that he wrote in the pithy Kanarese of Puligere, the village of Dharmauru may be safely identified with the neighbouring Dambal in the Dharwar District......... and this locates the authority of Arikesarin II."[2] रा. नरसिंहाचार्य, म्हैसूरच्या आर्किऑलॉजी खात्याचे माजी सुपरिंटेंडंट म्हणतात,' ई कवि पुलिगेरेय राजनाद् चलुक्यवंशोत्पन्ननाद् अरिकेसरिय आस्थानपंडित-वागिद्दनु.[3]' डॉ. बार्नेट यांनींही हें कुल व लक्ष्मेश्वर यांचा खात्रीनें संबंध होता असें समजून लक्ष्मेश्वर येथील एक लेख संपादित असतां या कुलावर एक टीप दिली आहे.[4] या टीपेची तेथें आवश्यकता काय हें मला नीट समजत नाहीं. तथापि डॉ. बार्नेट यांच्या मताचा अंदाज करण्यास तें एक साधन आहे. तेही 'About this time Puligere was under the rule of Arikesarin II' असें म्हणत आहेत. वर उद्धृत केलेल्या या वचनांवरून वरील विद्वानांच्या मतें हें चालुक्य कुल किंवा त्यांतील एक पुरुष लक्ष्मेश्वरच्या बाजूस होता असें ठरूं पाहतें. पण या मतावर माझे पुढील आक्षेप आहेत. या कुलाचा एकही लेख अजून कर्नाटकाच्या बाजूस सांपडलेला दिसत नाहीं. श्री. जोशी यांस मिळालेला ताम्रपट परभणीस म्हणजे तेलंगणाजवळ मिळाला. पंपाचा आश्रयदाता जो अरिकेसरिन् त्याचा, त्याच्या युद्ध मंत्र्याचा व राजधानीचा उल्लेख करणारा वेमुलवाडा लेख तेलंगणात मिळाला. कोल्लिपारा दानपत्रही तेलंगणांतच मिळालें. या सर्वांत आलेलीं व दान दिलेलीं गावें आणि उल्लेखिलेल्या गोष्टी तेलंगणांतच घडल्याचें दिसतें. उलट लक्ष्मेश्वरवर या २००।३०० वर्षांच्या काळांत या कुलांतील पुरुषांहून भिन्न व्यक्तींचा अंमल असलेला दिसतो. उदाहरणार्थ श. ७८७

१ 'बिब्लिओथिका कर्नाटिका' मालेमधील राइस संपादित पंप भारत किंवा विक्रमार्जुनविजय,, बंगलोर, इ. १८९८ प्रस्तावना पृ. १

२ बॉम्बे गॅझिटिअर व्हॉ. १ भाग २ पृ. ३८१

३ रा. नरसिंहाचार्य कृत 'कर्नाटक कविचरिते भाग १ पृ ३०–३१

४ Epi. Ind. १३, ३२८,

पार्थिव संवत्सर या वर्षी पुलिगेरेवर कुप्पेय नावाच्या गृहस्थाचा अंमल होता.[१] पहिल्या अमोघवर्षाच्या ६१ व्या वर्षी म्हणजे श. ७९७ या वर्षी पुलिगेरेवर बंकेयरस नावाच्या गृहस्थाचा अधिकार चालत होता.[२] श. ८३८ मध्यें महासामंत लेंडेयरस याचा अंमल लक्ष्मेश्वरावर होता.[३] श. ८५१ च्या एका लेखांत पुलिगेरेचा उल्लेख आहे.पण त्या लेखांत कोणा सामंताचा अंमल असल्याचा निर्देश नसून फक्त रेवदास दिक्षीत व वीशोत्तर दिक्षीत या दोन गृहस्थांचीं नांवें आलीं आहेत; पण ते पुलिगेरेवरचे अधिकारी होते असें सांगितलेलें नाहीं.[४] धारवाड जिल्ह्यांतील हेब्बाळ गावच्या एका लेखांत सत्यवाक्य कोंगुणिवर्म पेर्मनडि भूतुग यानें राष्ट्रकूट अमोघवर्ष वद्दिग याच्या मुलीशीं लग्न केल्यामुळें त्यास पुलिगेरे, बेळवोल, किसुकाड, बागडगे हे देश आंदण मिळाल्याचें सांगितलें आहे.[५] म्हैसूर संस्थानांतील आतकूर येथील श. ८७२ च्या लेखांत भूतुगानें राजादित्य चोल यास मारल्यामुळें राष्ट्रकूट तिसरा कृष्ण यानें त्यास बनवासी, बेळवोल, पुलिगेरे, किसुकाड, बागेनाड हे देश दिल्याचें सांगितलें आहे.[६] हेब्बाळ येथील लेखांत सांगितलेली गोष्ट श. ८३३ ते ८६२ च्या दरम्यान केव्हां तरी झाली असें डॉ. फ्लीट यांचें मत आहे.[५] श. ८९० च्या लक्ष्मेश्वर येथील लेखांत वरील भूतुगाचा मुलगा मारसिंह यानें एका देवालयास दान दिल्याचें सांगितलें आहे.[७] धारवाड जिल्ह्यांतील अद्रगुंची व गुंडूर येथील श. ८९३ व ८९५ च्या लेखांत मारसिंह पुलिगेरे व इतर प्रदेश यांवर राज्य करीत असल्याचें सांगितलें आहे.[८] ज्यास या पुढील कालांतील पुलिगेरेवरील अधिकारी पाहिजे असतील त्यानें Epi. Ind. Vol XX No. III या पुस्तकाचीं ६५ व ६६ हीं पानें पहावीं. मला त्यांशीं सध्यां कर्तव्य नसल्यानें मी ते येथें देत नाहीं. यावरून दिसून येईल कीं, श. ८६३ च्या पुढें मागें उपर्युक्त चालुक्य कुलाचा पुलिगेरेवर अंमल

---

१ Epi. Ind. ७, २०१, २ Epi. Ind. ७, २१३

३ बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४१६

४ टीप १३ पहा.

५ बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ३०४, ३०५, ४१८,

६ सदर पृ. ४१९, ४२१,

७ सदर पृ. ३०६

असल्याचा उल्लेख मला सांपडला नाहीं. एकाद्या प्रकाशित वा अप्रकाशित लेखांत असल्यास तो मला कळविण्याची वाचकांनीं कृपा करावी.

डॉ. फ्लीट यांनीं धर्मऊरु म्हणजे डंबळ असें जें सांगितलें आहे तें बरोबर आहे कीं नाहीं हें निश्चित करणें कठीण आहे; कारण धर्म-ऊरु हें ज्या **बच्चेसहस्र** नावाच्या देशांत होतें म्हणून सांगितलें आहे त्या देशाचें नाव एका लेखांत बेळवलनाडच्या संगतीनें आलें आहे. तरी पण त्याची कर्नाटकांत कोठपासून कोठपर्यंत व्याप्ति होती हें आज निश्चित करण्यास साधन नाहीं.[१] हेंही सांगणें आवश्यक आहे कीं, प्रकाशित झालेल्या कोणत्याही कर्नाटकांतील लेखांत या देशाचा उल्लेख मला सांपडला नाहीं. उलट डंबळ ज्या देशभागांत होतें त्याचें नाव **मासवाडी** असें असून त्यांत फक्त १४० गावांचाच समावेश होत होता असें सांगितलेलें दिसतें.[२]

वेमुलवाडा लेखाच्या संपादकांनीं पंपानें 'जोळद् पाळि' असा जो शब्द वापरला आहे त्यावरून डॉ. फ्लीट व मि. राइस यांप्रमाणेंच

---

१ **निजामच्या** राज्यांतील **रायचूर** जिल्ह्यापैकीं **कोप्पळ** गावापाशीं असलेल्या कुकनूर या गावीं शक १०८६ सुभानु संवत्सर या वर्षीचा एक अप्रकाशित लेख असून त्यांत '**बेळवल**नाड **वत्सेय**नाडधिकारि महाप्रधान दंडनायक अम्मणय्यंगळुं' असा उल्लेख असल्याचें माझे मित्र श्री. **पां. भि. देसाई** हे कळवितात. या उल्लेखांतील 'वत्सेय' या शब्दाचें **बच्चे** असें रूप होऊं शकेल. तसेंच 'बेळ्वलनाड' व 'वत्सेयनाड' यांच्या जोड उल्लेखावरून 'वत्सेयनाड' बेळ्वलनाडच्या जवळ असणें शक्य आहे. बेळ्वल व पुलिगेर यांच्या जोड उल्लेखांच्या विपुलतेमुळें हे तिन्ही प्रांत जवळ जवळ संभवतात. पण पुलिगेरे व बेळ्वल हे प्रत्येकीं तीनशेचे देश होते. व बच्चे १००० चा देश होता. तसेंच **प्रो. गोकाक** (फर्ग्यूसन कॉलेज, पुणें) यांचे मताप्रमाणें पुलिगेरे जवळचें धर्मपूर हेंच पंपास बक्षीस मिळा-ललें धर्मऊरु गाव होय असें धरलें तर पुलिगेरे तीनशेच्या इतक्या जवळ बच्चे सहस्र सुरू होत असे असें समजावें लागेल. हें धर्मपूर गाव हल्लीं ओसाड आहे, पण ६०।७० वर्षांपूर्वी त्यांत वस्ती होती असें प्रो. गोकाक सांगतात.

२ बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४६५ पृ. ४३५. ज्या लेखांवरून मी वरील विधान केलें आहे ते लेख श. ८०० ते ९०० च्या दरम्यानचे नसून नंतरचे आहेत हें खरें. पण मला डंबळ व मासवाडी यांचे उल्लेख असलेले तत्कालीन लेख मिळाले नाहींत म्हणून मागाहूनचे घेतले आहेत.

हें कुल जोळ प्रांतावर राज्य करीत होतें हें खरें धरून जोळ प्रांत हल्लीच्या पानगलच्या बाजूचा प्रदेश आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण या शब्दाचा खरा अर्थ ऋण स्मरणारा, खाल्ले अन्नास जागणारा असा होतो हें श्री. नरसिंहाचार्य यांनीं याच शब्दाचे रन्न, कर्णपार्य, व कुमार-व्यास या कवींनीं जे प्रयोग केले आहेत त्यांवरून दाखवून दिलें आहे. (कर्नाटक कविचरितें भाग १ पृ. ३१ टीप) तेव्हां जोळद पाळि हे शब्द या कुळाचा अधिकारप्रदेश ठरविण्यास निरुपयोगी आहेत. मला वाटतें वेमुलवाडा या राजधानीच्या आसमंतात बराच मोठा भाग या कुळाच्या अधि-काराखालीं असावा. तसेंच धर्मऊरु खरोखरच लक्ष्मेश्वर जवळ आहे असें समजलें तरी लक्ष्मेश्वरकडे कांहीं थोड्या वतनी मुलखाशिवाय जास्त प्रदेश या कुलाच्या ताब्यांत नसावा. एरवीं या कुलाचा एखादा तरी लेख लक्ष्मेश्वरकडे सांपडता.

येणेंप्रमाणें पूर्वींच्या मताला कोणताच आधार नाहीं हें दाखविलें. आतां मला या ताम्रपटाच्या साहाय्यानें असें म्हणावयाचें आहे कीं हें चालु-क्यकुल कर्नाटकांत रहात नसून तेलंगणांत रहात असावें. याचीं कारणें:— (१) या व इतर लेखांत जीं गांवें आलीं आहेत तीं व दान दिलेलीं गावें हीं तेलंगणांत आहेत. तेलंगणांत या कुलांतील पुरुषांचा (विशेषतः २ रा अरि-केसरिन् याचा) अधिकार असल्याशिवाय ते त्यांतील गाव दान करूं शकणार नाहींत. (२) याच ताम्रपटांत २ऱ्या अरिकेसरिन्‌ची राजधानी [लें] बुळपाटक या नावानें उल्लेखिलेली असून हें गावही दान दिलेल्या गावां-जवळच आहे. म्हणजे २ऱ्या अरिकेसरिन्‌ची राजधानीही तेलंगणांतच होती. (३) या कुलाचा मूळ पुरुष युद्धमल्ल हा तिन्ही कलिंगांसह वेंगीचें रक्षण करीत असे.[१] हें कुल जर लक्ष्मेश्वरकडे होतें असें मानलें तर तेथून वेंगी व तीन कलिंग यांचें रक्षण होणें शक्य दिसत नाहीं. कारण वेंगी व तीन कलिंग आणि लक्ष्मेश्वर यांमध्यें फार मोठें अंतर आहे. सुधारलेल्या दळणवळणाच्या साधनांच्या अभावीं एकाद्या सामंतास कायमचे लक्ष्मेश्वराहून वरील प्रांतांचें रक्षण करणें अशक्य आहे. अर्थात् या कुलाचा अधिकारप्रदेश तेलंगणांतच असावा. मधल्या पुरुषांच्याविषयीं जरी विशेष माहिती मिळत नसली तरी मधले पुरुष तेलंगणांतच झाले असावेत.

---

१ यास आधार ताम्रपटांतील पुढील वाक्य ‘सकलिंगत्रयां वेंगिं यो पाति स्म पराक्रमात्

पहिला आणि शेवटचे दोन हे तर खात्रीनें होतेच. निदान मधले पुरुष लक्ष्मेश्वरकडे होते असें म्हणण्यास मुळींच आधार नाहीं.

या माझ्या विधानांवर दोन आक्षेप येण्यासारखे असून त्यांचें निराकरण मी करूं शकेन असें वाटतें. त्यांपैकीं पहिला आक्षेप असा कीं, सोमदेवसूरीनें आपल्या पुस्तकांत ३ रा अरिकेसरिन् याचा बाप बद्यग याची राजधानी गंगधारा अशी सांगितली आहे त्याची वाट काय? माझें यावर म्हणणें असें: हल्लीं निर्णयसागरी यशस्तिलकचंपूची जी प्रत आहे तींत अनेक चुकीचे पाठ आहेत. तसेंच मी चंपूचीं जीं हस्तलिखितें पाहिलीं त्यांत अनेक पाठभेद असून कित्येक अगदींच अक्षम्य आहेत. उदाहरणार्थ, सोमदेवसूरीनें उल्लेखिलेल्या बद्यग, गंगाधारा व मेल्पाटी या नावांपैकीं बद्यग किंवा बाद्दिग याबद्दल वद्यगराज, वागराज, आणि वाद्यराज्य असे पाठ सांपडतात. गंगाधारा या शद्बांचे गंगाधरा, गंगधारा, मेल्पाटीबद्दल मल्पाटी, मल्याटी व मेल्याटी असे पाठ सांपडतात.[1] थोडक्यांत सांगावयाचें

१ गंगधारा हें गाव कोठें सांपडत नाहीं. मेल्पाटी हें गाव मात्र हल्लीं मेल्पाडि या स्वरूपांत उपलब्ध आहे. शिवाय मेल्पाडि या गावाचा मेल्पाटी या स्वरूपांत कऱ्हाड ताम्रपटांत उल्लेख आला आहे (Ep. Ind. IV, 281.) हा ताम्रपट श.८८० फाल्गुन वद्य १३ चा असून त्यावेळीं दान देणारा राजा राष्ट्रकूट ३ रा कृष्णराज याचा मुक्काम मेल्पाटी येथें होता. सोमदेवसूरि हाच कृष्णराज श. ८८१ चैत्र शुद्ध १३ ला मेल्पाटी येथें होता असें सांगतो. अर्थात् दोन्ही उल्लेख एकमेकांशीं जुळते आहेत. पंडित नाथूरामजी प्रेमी यांनीं सोमदेवसूरीचा नीतिवाक्यामृत ग्रंथ प्रसिद्ध करीत असतां त्याच्या प्रस्तावनेंत याची माहिती देत असतांना कदाचित् मालखेड व मेल्पाटी हीं दोन्ही गावें एक असावींत असें जें म्हटलें आहे तें अर्थात् बरोबर नाहीं (पहा जैन-साहित्य संशोधक खंड २ अंक १ पृ. ४६) कऱ्हाड ताम्रपटाचे संपादन करीत असतां श्री. कै. डॉ. भांडारकर यांनीं लिहिलें आहे कीं, मेल्पाटी म्हणजे उत्तर अर्काट जिल्ह्यांतील चित्तूर तालुक्यांतील असलें मेल्पाडि हें गाव असलें पाहिजे (Epi.Ind.IV 281). डॉ. ह्युल्श म्हणतात कीं, मेल्पाडि हें गाव उत्तर अर्काट जिल्ह्यांतील गुडियातम तालुक्यांत आहे (Epi. .Ind.IV 140). आणि 'इन्स्क्रिपशन्स ऑफ दि मद्रास प्रेसिडेन्सी' या ग्रंथांत हा गाव उत्तर अर्काट जिल्ह्यांतील वांदिवाश तालुक्यांत घातला असून त्या गावाची माहिती देताना कऱ्हाड ताम्रपटांतील मेल्पाटी व मेल्पाडि हीं दोन्ही नावें एकच असें सांगितलें आहे (पृ. ११५). या तीन उल्लेखांपैकीं शेवटचा उल्लेख जास्त प्रमाणभूत मानला पाहिजे.

म्हणजे या तिन्ही विशेषनामांबद्दल छापील व हस्तलिखित पुस्तकांतून अतिशयच घोटाळा आहे. यामुळें गंगधारा हें नांव तरी बरोबर आहे कीं नाहीं हें समजत नाहीं. शिवाय यशस्तिलकांतील उल्लेखावरून वरील गंगधारा, हें गाव कर्नाटकांत होतें असें कोणी दाखवूं शकत नाहीं. उलट राष्ट्रकूट ३ रा कृष्ण मेल्पाडीच्या बाजूस कशासाठीं गेला होता याचा जर विचार केला तर असें वाटतें कीं, वरील गांव मेल्पाडीच्या आसपास ५।२५ कोसांत असावें व तेथें बद्यगाचा कांहीं काल वास झाला असावा.[1] दुसरा आक्षेप असा कीं, हें कुल जर तेलंगणांत होतें व पंप मूळचा वेंगीकडील होता तर त्यानें आपला ग्रंथ कानडींत कां रचावा ? याला असें उत्तर देतां येईल कीं, या वेळीं कानडीस मोठें महत्त्व आलेलें असल्यामुळें मोठे ग्रंथकार कानडींत रचना करीत. श. ९१२ च्या सुमारास झालेला नागवर्म नावाचा कवी वेंगीकडून आलेला असून त्यानेंही कानडीमध्यें ग्रंथरचना केल्याचें प्रसिद्ध आहे. उलट संस्कृत ही मान्य भाषा असल्यानें याच चालुक्य कुलाचा आश्रित अशा सोमदेवसूरीनें आपली रचना संस्कृतमध्यें केली आहे हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच या चालुक्य कुलाची मातृभाषाही कानडी असेल व यामुळें आश्रितानें कानडींत रचना केली आहे.

या ताम्रपटांत सोमदेवसूरीविषयीं जी माहिती आली आहे तीही अशीच वाद उत्पन्न करणारी आहे. यशस्तिलकाच्या शेवटीं सोमदेवानें आपली गुरुपरंपरा पुढील प्रमाणें दिली आहे. देवसंघ → यशोदेव → नेमिदेव → सोमदेव. या परंपरेवरून व प्रत्येक आचार्याच्या नावाच्या शेवटीं देव हें पद असल्यानें हे सर्व आचार्य देवसंघांत मोडत होते हें उघड आहे.[2]

१ Epi. Ind. IV 281 ' दक्षिणदिग्[द्रुम]ण्डलानि भृत्ये[भ्यो] जीवनं कर्तुं मंड(मण्ड)लेश्वरसर्व्वस्वानि प्रतिगृहीतुं कालप्रियगण्डमार्तण्डकृष्णेश्वराद्यायतनानि निष्पादयितुं मेल्पाटीसमावासित श्रीमद्विजयकटकेन मया'

२ पी. पीटर्सन यांनीं मुंबई सर्कलमधील संस्कृत पुस्तकांच्या शोधाविषयीच्या ४ थ्या अहवालांत यशोदेवाचा गुरू देवसंघतिलक नावाचा होता असें सांगितलें आहे तें बरोबर दिसत नाहीं. यशस्तिलकाच्या शेवटीं कवीनें स्वतःविषयीं माहिती देताना प्रथमच ' श्रीमानस्ति स देवसंघतिलको देवो यशःपूर्वकः ' असें म्हटलें आहे. येथें देवसंघतिलक हा सामासिक शब्द देव शब्दाचें विशेषण आहे हें उघड आहे.

पण प्रस्तुत ताम्रपटांत वरील गुरुपरंपरा असून संघाचें नाव मात्र गौड असें दिलें आहे. तेव्हां या दोन्ही नावांचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न उत्पन्न झाला आहे. सोमदेवाची माहिती देत असतां ताम्रपटांत 'अपि च यो भगवानादर्श स्समस्तविद्यानां विरचयिता यशोधरचरितस्य कर्त्ता स्याद्वादोपनिषदः कवि (व) [*यि] ता चान्येषामपि सुभाषितानां' असे शब्द घातलेले आहेत. यापैकीं यशोधरचरित म्हणजेच यशस्तिलक असल्यामुळें या माहितीविषयीं वाद नाहीं. स्याद्वादोपनिषद् नावाचा ग्रंथ मात्र सोमदेवानें केला आहे कीं नाहीं हें निश्चित समजत नाहीं. विक्रमसंवत् १९६५ च्या श्वेतांबर जैन परिषदेनें **जैन ग्रंथावली** नावाची एक जैन ग्रंथांची सूची प्रसिद्ध केली आहे. तींत सोमदेवाच्या नावावर ६ ग्रंथ दिले आहेत. त्या ग्रंथांत वरील उपनिषदाचें नाव नाहीं. श्रीयुत नाथूरामजी प्रेमी सोमदेवानें ५ ग्रंथ केले असें म्हणतात.[1] त्यांतही हें उपनिषद् नाहीं. तेव्हां आज या सोमदेवानें केलेलें स्याद्वादोपनिषद् लुप्त झालें आहे असें म्हणावयाचें काय? स्याद्वादोपनिषदाप्रमाणें सोमदेवानें केलेलीं सुभाषितेंही आज उपलब्ध नाहींत. युक्तिचिंतामणि किंवा नीतिवाक्यामृत या त्यानें केलेल्या ग्रंथांच्या नावावरून कोणास वाटेल कीं यांपैकीं एखादा ग्रंथ सुभाषितांचा असावा. पण पहिला ग्रंथ तर्कपर[2] तर दुसरा राजनीतिशास्त्रपर आहे.[3] हीं सुभाषितेंही लुप्त झाली असें समजावयाचें काय? जैन ग्रंथावलींत सोमेश्वरदेवाच्या नावावर सुभाषितावली नावाचा एक ग्रंथ दिला आहे. पण सोमदेव व सोमेश्वरदेव हे एक कसें समजावयाचें. ?

ताम्रपटाचें वाचन*

१ ला पत्रा १ ली बाजू.

(१) ओं[1] जयति जगति जैनं शासनं धर्मचक्रैकचविदलितैनश्चक्रवाळं[2] नमस्यम्[।।*][3]

---

१ जैन साहित्यसंशोधक खंड २ अंक १ पृ. ८३ २ किंवा

३ नीतिवाक्यामृताच्या समाप्तिसंकल्पांत ' इति......श्रीमत्सोमदेवसूरिणा विरचितं नीतिवाक्यामृतं नाम राजनीतिशास्त्रं समाप्तं ' असे शब्द आहेत.

* मूळ ताम्रपटावरून.

१ ओं चिन्हानें दाखविला आहे. २ मालिनी. ३ हें जैनधर्माची खूण आहे.

(२) त्रिजगदधिपवंद्यं मन्दिरं मंगळानां दधदधिकमनोज्ञं पंचकल्याण लक्ष्मीम्[२] [॥१॥*]

(३) अस्त्यादित्यभवो वंशश्चाळुक्य इति विश्रुतः । तत्राभूद्युद्धमल्लाख्यो नृपतिर्व्विक्रमाण्णवः ॥ [२॥*] सपो

(४) दलक्षभूभर्त्ता तेळवाप्यां सपोदनै । अवगाहोत्सवं चक्रे शक्रश्रीर्म्मद दन्तिनाम् ॥ [३॥*] सकलिंगत्रयां वेंगि

(५) योवति स्म पराक्रमात् [।*] पुत्रो जयश्रिय× पात्रन्तस्यासीदरि केसरी ॥ [४॥*] नरसिंहो भद्रदेवस्तजःकान्ति

(६) निधी स्वयं । तस्याभूतां सुनो(तो) साक्षात्सूर्य्याचन्द्रमसाविव॥[५॥*] तत्राभून्नरसिंहस्य

(७) युद्धमल्लस्तनूभवः । वन्दिचिन्तामणिस्तस्य बद्दिगोजनि नन्दनः॥ [६॥*] नानादुर्द्धरयु

(८) द्धलब्धविजयश्रीसंगमाकर्ण्णनाद्भीम× पाण्डव एष इत्यसुहृदो य

(९) स्मात्पर बिभ्यति ।[।*] भीमं भीमपराक्रमैकनिळयन्त हेळयैवाग्रहीदुग्रं

(१०) ग्राहमिवान्तरंबुसमरे दोर्व्विक्रमाद्बद्दिगः ॥ [७॥*] औदार्य्यनिर्जित सुरद्रुमकामधेनो

(११) र्द्दोर्व्विक्रमक्रमतिरस्कृतकार्त्तवीर्य्यात् । [।*] तस्मादजायत सुतः कमनीयकीर्त्तिः श्रीयुद्ध

(मागील टीपेवरून चालू)

जेव्हां एकादा तीर्थंकर धर्मप्रचारास निघतो तेव्हां हें त्याच्या पुढें चालत असतें अशी समजून आहे. तसेंच हें चक्र जैन धर्म श्रेष्ठ आहे असें दाखवितें. हे पवित्र हेतू दाखविण्यासाठीं जैन लेख व शिल्पें यांवर काढतात. १ पांच कल्याणें पुढीलप्रमाणें— गर्भकल्याण, जन्मकल्याण, तपःकल्याण, ज्ञानकल्याण, निर्वाणकल्याण. २ अनुष्टुभ्. ३ शार्दूलविक्रीडित. ४ वसंततिलक.

(१२) मल्लनृपतिः प्रथितप्रतापः ॥ [८॥*] कुर्व्वन्निवात्र निजनाम यथार्त्थमुच्चैराविर्भवद्भुजपरा

(१३) क्रमडंबरेण । [।*] शातासितीव्रनखराग्रविदारितारिवक्षस्थळो जनि ततो नरसिंहराजः । [। ९॥*]

(१४) मोद्यद्दुर्द्धरवैरिवारणशिरःकुट्टाकदोःशालिनः सिंहस्येव स केसरीह नरसिंह

२ रा पत्रा १ ली बाजू

(१५) स्य स्फुरद्विक्रमः । [।*] तस्यासीदरिकेसरीति तनयो (यः) शून्यं कृतं शैशवं येनोद्यत्क्षितिभृत्प्रभा

(१६) नकटकाक्रान्तिक्रमाक्रीडया ॥ [१०॥*] आऽर्य्यच्छत्रयुगं हिमांशुविशदं हैमारविन्दांकितं मायूरा

(१७) तपवारणं च ककुदं यद्यौवराज्यश्रियः । [।*] अग्रे धावति यस्य सम्प्रति स किं वर्ण्येत वीराग्र

(१८) णीर्द्दूर्व्वारोरुपराक्रमो गुणमणिः सामन्तचूडामणिः । [। ११॥*] राष्ट्रकूटकुळे ख्याते जाता लोकां

(१९) बिका सती । वीरश्रीरिव वीरस्य तस्यासीत्सुदती प्रिया ॥ [१२॥*] भद्रदेव इति नन्दनस्तयोः शक्तिमान्स

(२०) विनयस्सदक्षिणः [॥*] शैळराजतनयात्रिनेत्रयोः कार्त्तिकेय इव कीर्त्तिमानभूत् ॥ [१३ ॥*] तस्माद

(२१) जनि तेजस्वी राजा नाम्नारिकेसरी । आनन्द चन्द्रवच्चक्रे कान्त्य कुवळयस्य यः ॥ [१४॥*]

---

१ वसंततिलक. २ शार्दूलविक्रीडित. ३ येथें यतिभंग दोष दिसतो. ४ या पुढील अक्षरांविषयीं शंका आहे. ५ अनुष्टुभ्. ६ रथोद्धता.

(२२) श्री गौडसंघे मुनिमान्यकीर्त्तिर्नाम्ना यशोदेव इति प्रजज्ञे । [।*] बभूव यस्योग्र

(२३) तपःप्रभावात्समागमः शासनदेवताभिः । [। १५।।*] शिष्योभवत्तस्य महर्द्धिभाजः स्याद्वा

(२४) दरत्नाकरपारदृश्वा । [।*] श्रीनेमिदेवः परवादिदर्प्पद्रुमावळीच्छेदकुठारनेमिः ।। [१६।।*] तस्मात्तपःश्रि

(२५) यो भर्त्ता(र्त्तुः)र्ल्लो(र्लो)कानां हृदयंगमाः । बभूवुर्बहवः शिष्या रत्नानीव तदाकरात् ।। [१७।।*] तेषां शतस्यावरजः

(२६) शतस्य तथाभवत्पूर्व्वज एव धीमान् । [।*] श्रीसोमदेवस्तपसः श्रुतस्य स्थानं यशोधा

(२७) म गुणोर्ज्जितश्रीः ।। [१८।।*] अपि च यो भगवानादर्शस्समस्तविद्यानां विरचयिता यशोधरच

(२८) रितस्य कर्त्ता स्याद्वादोपनिषदःकवि(व)[यि*] ता चान्येषामपि सुभाषितानामखिळमहासाम

१ रा पत्रा १ री बाजू

(२९) [न्तसी]मन्तप्रान्तपर्य्यस्तोत्तंसस्रक्सुरभिचरणस्सकळविद्वज्जनकर्णावतंसीभवद्यशःपु

(३०) ण्डरीकः सूर्य्य इव सकळावनिभृतां शिरःश्रेणिषु शिखण्डमण्डनायमानपादपद्मोभू

(३१) त् ।। स्वस्त्यकाळवर्षदेवश्रीपृथिवीवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वरपरमभट्टारकश्रीम

(३२) दमोघवर्षदेवपादानुध्यातप्रवर्द्धमानविजयराज्यश्रीकृष्णराजदेवपादपद्मो

१ इंद्रवज्रा. २ हा शब्द **गोद** असाही वाचतां येईल. ३ प्रत्येक जैन तीर्थंकरास शासन देवता सांगितल्या असून त्या जरूरीच्या वेळीं त्यास मदत करतात अशी समजूत आहे. ४ अनुष्टुभ्.

(३३) पर्गोविना।। स्वस्ति समधिगतपंच महाशब्द महासामन्ताधिपतिसमस्तभुव
(३४) नसंस्तूयमानचाळुक्यवंशोद्भवपांम्बरांकुशाम्मनगन्धवारणगन्धेभविद्याध
(३५) रप्रियगल्लत्रिभुवनमल्लोदात्तनारायणप्रत्यक्षवाहुळिविक्रमार्ज्जुन
(३६) गुणनिधिगुणार्ण्णवसामन्तचूडामणिप्रमुखानेकप्रशस्तिविजयांकमा
(३७) ळिकाळंकृतेन [ळें] बुळपाटकनामधेयनिजराजधान्यां निजपितुः श्री
मल्लुग्गस्य शुभधाम
(३८) जिनाळयास्यखस[तेः] खण्डस्फुटितनवसुधाकर्म्मबलिनिवेद्यार्त्थं शकाब्देः
प्वष्टाशीत्य
(३९) धिकप्त्वष्टशतेषु गतेषु [प्रव]र्त्तमानक्षयसंवत्सरवैशाखपा(पौ) र्ण्णमास्या
(स्यां) बुधवारे तेन
(४०) श्रीमदरिकेसरिणा अनन्तरोक्ताय तस्मै श्रीमत्सोमदेवसूरये
सन्निवेशासहस्रान्त
(४१) र्गतरेपाकद्वादशग्रामीमध्ये कुत्तुंवृत्ति वनिकटुपुलुनामा ग्रामः त्रिभो
गाभ्यन्तर

२ रा पत्रा १ ली बाजू

(४२) सिद्धिसर्व्वनमस्यस्सोदकधारन्दत्तः ।। तस्य पूर्व्वतः दरियूरु । दक्षिणतः
इळिन्दिकुंट ।
(४३) पश्चिमतः वेङ्गाळपट्टु । उत्तरतः कट्टाकूरु । एवं चतुराघाटघटित
भूमिरवातसू
(४४) र्य्योत्तरीयः ।। सामान्योयन्धर्म्मसेतुर्न्नृपाणां काळे काळे पाळनीयो
भवद्भिः । सर्व्वा
(४५) नेतान्भावि[नः] पार्त्थिवेन्द्रान्भूयो भूयो याचते रामचन्द्रः ।। [१९।।*]
बहुभिर्व्वसुधा

१ अर्थाच्या दृष्टीनें हा शब्द नीट लागत नाहीं. २ पूर्वोत्तराय पाहिजे. ३ या शब्दाचा अर्थ कळत नाहीं. पहा Epi. Ind. १६, ८१. ४ शालिनी ५ अनुष्टुभ्.

(४६) दत्ता राजभिस्सगरा[दिभिः] । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फळम् ॥ [२०॥*] मंद्रं

(४७) राजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो [भु]वि भाविभूपाः[॥*]

(४८) ये पाळयन्ति मम धर्म्ममिमं समस्तं तेषां मया विरचितोंजाळि

(४९) रेष मूर्ध्नि ॥[२१॥*] स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुन्धराम् । षष्टिर्व्वर्ष

(५०) सहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ [२२॥*] अरिकेसरिणा दत्तं कथितं कविपेद्दणेन

(५१) भट्टेन । शासनमिदमुत्कीर्ण्णं शुभधामजिनाळयस्य रेवेण ॥

भाषांतर.

ओं, जगांत आपल्या करवतीनें ज्यानें पापाचा नाश केला आहे असें, वर्तुलाकार, नमस्य, त्रिजगांतील राजांना वंद्य, मंगलांचें घर, अधिक सौंदर्य व पंचकल्याणरूपी लक्ष्मी धारण करणाऱ्या धर्मचक्र या जैनशासनाचा जय आहे (१). चालुक्य नावाचा एक प्रख्यात सूर्यवंश आहे. त्यांत शौर्याचा समुद्र असा युद्धमल्ल नावाचा राजा झाला (२). सव्वा लक्ष प्रदेशावर राज्य करणाऱ्या व इंद्राचें ऐश्वर्य असलेल्या त्यानें मत्त हत्तींना तेलाच्या विहिरींत स्नान घालण्याचा उत्सव केला (३). ज्यानें पराक्रमानें कळिंगत्रयासह वेंगीचें रक्षण केलें अशा त्याचा जय व ऐश्वर्य यांचें स्थान असलेला अरिकेसरिन् हा मुलगा होता (४). त्याला नरसिंह व भद्रदेव नावाचे साक्षात् चंद्रसूर्याप्रमाणें तेज व कांती यांचे साठे असे दोन मुलगे होते (५). पैकीं नरसिंहाला युद्धमल्ल मुलगा झाला.भाटांना चिंतामणि अशा त्याला बद्दिग मुलगा झाला (६).निरनिराळ्या दुर्धर युद्धांत विजय व ऐश्वर्य मिळविलेल्या संगमाचा वेध करण्यामुळें हा पांडव भीम आहे असें समजून ज्याला शत्रू अतिशय भितात अशा, प्रचंड पराक्रमाचें एकच घर असलेल्या भीमास बद्दिगानें बाहुबलावर, क्रूर मकराप्रमाणें, पाण्यांतील युद्धांत ताबडतोब पकडलें (७). ज्यानें औदार्यानें कल्पतरु व कामधेनू यांना जिंकिलें व बाहूंच्या पराक्रमांच्या पंक्तीनें कार्तवीर्यास तिरस्कृत

१ वसंततिलक. २ अनुष्टुभ्.

केलें अशा त्याला ज्याची कीर्ती आकर्षक व प्रताप प्रख्यात आहे असा युद्धमल्ल नावाचा राजा मुलगा झाला (८). त्यापासून येथें जोरानें प्रकट होणाऱ्या बाहूंच्या पराक्रमांच्या समूहानें जणूं आपलें नांव सार्थ करणारा व धार लावलेल्या तरवारीप्रमाणें तीव्र अशा नखाग्रांनीं ज्यानें शत्रूंचीं वक्षस्थळें फाडलीं आहेत असा नरसिंहराज झाला (९). माजणाऱ्या व दुर्धर अशा शत्रुरूपी हत्तींची डोकीं फोडणारे हात असलेल्या नरसिंहाचा पराक्रम सिंहाप्रमाणें प्रकट असून तो येथें जणूं सिंह आहे. त्याला अरिकेसरिन् म्हणून मुलगा होता. यानें सज्ज असणाऱ्या राजांच्या मुख्य सैन्यांवर हल्ले करण्याच्या क्रमाचा खेळ सुरूं करून बालपण शून्यवत् केलें (१०). श्वेत कमलांनीं अंकित व चंद्राप्रमाणें शुभ्र असें श्रेष्ठ छत्रद्वय, तसेंच यौवराज्याच्या ऐश्वर्याचें राजाचिन्ह अशी जी मोराची अब्दागिरी हीं ज्याच्या पुढें धावतात त्या वीराग्रणी, बहुपराक्रमी, गुणमणि व सामंतमुख्याचें काय वर्णन करतां येईल ? [नाहीं हा भाव] (११). प्रसिद्ध राष्ट्रकूट कुळांत उत्पन्न झालेली, चांगल्या दातांची, सती, लोकांबिका वीराच्या वीरश्रीप्रमाणें त्याची बायको होती (१२). भद्रदेव नावाचा त्यांचा मुलगा, शक्तिमान, विनयी, शाहाणा आणि शंकरपार्वतीच्या कार्तिकेयाप्रमाणें कीर्तिमान होता (१३). त्यापासून अरिकेसरिन् नावाचा तेजस्वी राजा झाला. यानें (आपल्या) तेजानें चंद्राप्रमाणें कुवलयां(कमलां)ना आनंद दिला (१४). श्रीगौड संघामध्यें ऋषींना ज्याची कीर्ति मान्य आहे असा यशोदेव झाला. याच्या उग्रतपाच्या सामर्थ्यामुळें याची शासनदेवतांशीं भेट झाली होती (१५). त्या महानुभावाचा शिष्य नेमिदेव स्याद्वादरूपी समुद्राचा पैलतीर पाहणारा व प्रतिस्पर्ध्यांच्या गर्वरूपी वृक्षपंक्तींना छेदण्यांत कुऱ्हाड होता (१६). तपरूपी लक्ष्मीचा पति अशा त्यापासून लोकांना आनंद देणारे असे शिष्य खाणींतील रत्नाप्रमाणें पुष्कळ झाले (१७). त्यांच्या पैकीं शेकडोंहून मोठा व शेकडोंहून लहान असा सोमदेव, बुद्धिमान, तप, विद्या व यश यांचें घर, गुणानें ज्यानें ऐश्वर्याला उजळा दिला आहे असा होता (१८). तसेंच हा भगवान सर्व विद्यांचा आरसा, यशोधरचरिताची रचना करणारा, स्याद्वादोपनिषदाचा कर्ता आणि इतरही सुभाषितांची जुळणी करणारा, सर्व महासामंतांच्या भांगांची हद्द ज्यांनीं वेढली

आहे अशा माळांमुळें ज्याचे पाय सुगंधित झाले आहेत, ज्याचें यशःकमल सर्व विद्वज्जनांच्या कानाचा दागिना होत आहे, सर्व राजांच्या डोक्यांच्या पक्तींच्या शेंड्यांना भूषविण्यासाठीं ज्याचीं पदकमलें प्रमाण झालीं असा होता. स्वस्ति. श्रीपृथ्वीवल्लभ महाराजाधिराज परेमश्वर परमभट्टारक श्रीमत् अमोघवर्षदेवाच्या पायांचें अनुध्यान असलेल्या व ज्याचा विजय व राज्य वाढत आहे अशा अकालवर्ष श्रीकृष्णराजदेवाच्या पदकमलांवर उपजीविका करणारा, स्वस्ति, ज्यास पंचमहाशब्द मिळालेले आहेत, महासामंतांचा अधिपति, सर्व जगाकडून स्तुती होत असलेल्या चालुक्यकुळांत जन्मलेला, मत्त हत्ती, विद्याधर, प्रियगल्ल, त्रिभुवनमल्ल, उदात्त, नारायण, प्रत्यक्ष वाद्वाळे, विक्रमार्जुन, गुणनिधि, गुणार्णव, सामंतचूडामाणि प्रभृति अनेक प्रशस्ति (स्तुत्यर्थक विशेषणें) व विजयचिन्हें यांच्या माळांनीं शोभलेला, अशा त्या अरिकेसरिन्नें वेमुलवाडा नावाच्या आपल्या राजधानीमधील आपला बाप श्रीमत् वद्यग यानच्या शुभधामजिनालय नावाच्या वस्तीची किरकोळ मोडतोड, नवीन गिलावा (किंवा चुना देणें), बळि, नैवेद्य यासाठीं ८०० अधिक ८८ शकवर्षे झालीं असतां क्षय संवत्सर सुरू असतां वैशाखाच्या पौर्णिमेस बुधवारीं आतांच वर्णिलेल्या त्या सोमदेवसूरीला सब्बिदशसहस्रामधील रेपाकद्वादशांतील वनिकटुपुलु नावाचा गाव त्रिभोगाभ्यंतरसिद्धि व सर्वनमस्य यांसह उदकधारेनें (उदक सोडून) दिला. त्याच्या पूर्वेस दरियूरु, दक्षिणेस इळिन्दिकुंट, पश्चिमेस वेळ्ळाळपट्टु, उत्तरेस कट्टाकुरु. अशा प्रकारें चार सीमांनीं युक्त असलेल्या जमीनीनें युक्त व वारा आणि सूर्य यांचें पांघरूण नसलेला हा गाव. सामान्यो. बहुभिर्व. मद्वंश. स्वदत्त० अरिकेसरिन्नें दिलें. कवि पेद्दणानें सांगितलें. हें शासन शुभधामजिनालयांतील रेव यानें खोदलें.*

---

* हा ताम्रपट व वर उल्लेखिलेले इतर ताम्रपटशिलालेख यांमध्यें आलेल्या ऐतिहासिक माहितीला इतरत्र आधार मिळतात की नाहीं हें पाहण्याची माझी खटपट चालूं आहे.

१८ पुळुज येथील कानडी शिलालेख

(श्री. ग. ह. खरे.)

उपलब्धि:—पुळुंज हें गाव सोलापूर जिल्ह्यापैकीं पंढरपूर तालुक्यांत पंढरपूरच्या पूर्वेस ६ कोसांवर आहे. या गावांत एक शिवालय असून त्यांत जे लेख मिळाले ते क्रमानें पुढें देत आहे.

१

हा लेख मुख्य शिवालयाच्या दक्षिणेस एक लहानसें उत्तराभिमुख देऊळ असून त्या देवळाच्या बाहेरच्या सोप्यांत उभा करून ठेवलेला आढळला. ज्या शिळेवर हा लेख कोरला आहे त्या शिलेची लांबी, रुंदी व जाडी ६½′ २½′ व ५″ अशा असून वरचा सुमारें एक फूट उंचीचा भाग तिकोनी केला आहे. या तिकोनी भागांत डावीकडून उजवीकडे क्रमानें चंद्र, शिवलिंग, सूर्य, दुग्धप्राशी वत्सासह धेनू व तलवार यांच्या आकृति खोदल्या आहेत व त्याखालीं लेखाचा मजकूर खोदण्यास सुरवात केली आहे. या मजकुराच्या पहिल्या ७ ओळी लेखांत उल्लेखिलेल्या देवास त्याच्या भक्तानें मूळ लेख कोरल्यानंतर दिलेल्या दानासंबंधीं व मागाहून कोरलेल्या आहेत हें त्या ओळीखालीं 'नमस्तुंग°' हा श्लोक सुरू होत आहे व अक्षरांचें वळणही निराळें आहे यावरून उघड होत आहे. तेव्हां या लेखाचें वाचन देतांना त्या ओळी मी मागाहून दिल्या आहेत. लेखाच्या ओळी एकंदर ७३ आहेत. अक्षर आरंभीं सुमारें १ इंच उंचीचें असून जों जों खालीं जावें तों तों लहान होत गेलें असून लेखाच्या शेवटीं सुमारें ¾ इंच उंचीचें झालें आहे. लेखशिलेचा पृष्ठभाग घोटींव असल्यामुळें लेखन—फक्त एका ठिकाणाशिवाय—उत्तम स्थितींत आहे.

अक्षरवटिका— या लेखांतील अक्षरांचें सामान्य स्वरूप १२ व्या शतकांतील इतर लेखांप्रमाणेंच आहे. **म** दोन प्रकारांनीं काढला आहे. पैकीं एक प्रकार माहेश्वर (८), मूड (५०), १ मं (६३), इत्यादि शब्दांत व दुसरा प्रकार चिंतामणि (१४), महाजनं (२१), मने (२४), माडि (३५), इत्यादि शब्दांत आढळतो. **ळ** दोन प्रकारचा आहे. एक ळ गळल्गि (२४), सकळ (१०), मकळु (३७),

इक्बाल–हमराह दौलत–ख्वाह दादह दर्गाह जहां–पनाह लायक–उर–रायत व अल–इहसान अर्जमन्द बुलन्द–मकान मुहम्मद इख्लासखान फर्झन्द रशीद[१] फर्झन्दी खान मुहम्मद वझीर हुकूमत सूबह–दार कर्नातक रसानीदह मशरीक मस्लिहत बादशाही गर्दद कह बअद अझ रसीदन आंजा फराखूर जमीअत बइनायात मुअ्ताद व मर्हमत जागीर सर–अफ्राझ व सर–बुलन्द ख्वाहद शुद तादानद बर हुक्म फर्मान अश्रफ अक्दस हुमायून अर्फअ रवद तहरीरन फी–अत–तारीख बीस्त [व] चहारुम शहर सफर–उल–मुज़फ्फर सनह १०६७

[समासांत*] पर्वानगी हुजूर खुर्शीद जुहूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश

अली बादशहा → रौलोजी घोरपडे

रौलोजी घोरपडे यांनीं जाणावें कीं, या वेळीं दरबाराच्या भेटीस येण्याच्या हेतूविषयींचा त्याचा अर्ज सिंहासनाच्या पायापाशीं उभे राहणाऱ्यां-कडून येऊन पोहोंचला. त्यांत लिहिलें आहे कीं, ' स्वतः दरबारचा जुना सेवक आहे व बेरोझगार आहे. तसेंच कोणत्याही ठिकाणचा मोकासा किंवा तालुका नाहीं. ' हा अर्थ आम्हांस सजमला तेव्हां तो फार पसंत पडला. आतां तुम्ही सर्व बाजूंनीं संतुष्ट राहून तावडतोब कर्नाटकचा सुभेदार खान मुहम्मद याचा मुलगा मुहम्मद इख्लासखान[२] याजपाशीं जाऊन बादशाही मसलतींत शरीक(सामील) व्हावें. तेथें पोहोंचल्यावर जमेतीच्या अनुरूप अशा जागीरीच्या कृपेनें उत्कर्ष होईल. ता. २४ सफर सन १०६७

२

ले. ६१ } [फा. शि. *] { श. १५९२ मार्गशीर्ष शुद्ध १२
हि. १०८१ रजब १० } { इ. १६७० डिसेंबर १४

फर्मान जहां-मताअ आफ्ताब-इर्तिफाअ व हुक्म कज़ा-जरियान वाजिब-उल-इत्तिबाअ अझ दीवान हुमायून खिलाफत–मश्हून अदालत–

१ येथून पुढें आलेलीं विशेषणें ले. ४९ प्रमाणें असल्यामुळें गाळलीं आहेत.

२ मी येथें मुहम्मद इख्लासखान हा खान मुहम्मदाचा मुलगा असा अर्थ केला आहे; पण त्याविषयीं मला थोडी शंका आहे.

मकरून चुनान झीनत सुदूर याफ्त कह शुजाअत-दस्तगाह विथोजी वलद तुकोजी घोरपरह बिदानद कह मौज़अ चरपवेली सिम्त मुहम्मदानगर दाखिल पेशकश देस[मुखी] व यक [हझार]व.... खानह बचहार सद व पिन्जाह व पन्ज होन तन्‍ख्वाह सवारान ऊ रवां बूद हस्ब-उल-अम्र आली मुतआली अमानत फर्मूदह शुदह अवज़ आं मिन्जुम्लह बमूजब फर्मान मुअल्ला सी(सह) सद शस्त व शश होन सह दुगल [बाबत] तक्सीम खास-खेल व तलब दीवान व बाबहाए मौज़अ वेलेर पर्गनह कतहकुन्दह रवां शुदह हमह हश्ताद व हश्त होन सह रुब्अ दुगल व झर तक्सीम नमक व पान व तम्बाकूए देहात ऊ यक सद व पान्झदह होन व नीम व ——— अस्त मिन्जुम्लह मुब्लिग मज्कूर हश्ताद व हश्त होन सह रुब्अ दुगल मझ्बूर अझ इब्तिदाए सनह अहदी सबईन अल्फ दफ्तरी रवां फर्मूदह शुदह अम्र वाला कदर कदर तवामान आली बारिकह सुदूर याफ्तह कह बमूजब मस्तूर मुकर्रर साल बसाल रवां दानिस्तह अमल नुमायद व दरीं बाब बर हुक्म फर्मान...... [फी]-अत-तारीख १० शहर रजब-उल-मुरज्जब सनह हझार व हश्ताद [व *] यक हिजरी

[समासात *] पर्वानगी सियादत व नजाबत व नकाबत-पनाह विझारत व अमारत दस्तगाह [सय्यद मुज़फ्फर सर खैल शाही]

सारांश

विठोजी तुकोजी घोरपडे यानें जाणावें कीं, मुहम्मदानगर समतेपैकीं चरपवेली हा गाव-देशमुखीच्या पेशकशीसह......-तुमच्या स्वारांचा तनखा म्हणून ४५५ होनास तुम्हांकडे चालू होता तो अमानत करून त्या ऐवजीं कतेकुंदा परगण्यापैकीं वेलेर हा गाव दिला आहे. या गावाच्या उत्पन्नापैकीं खासखैलीची तक्सीम,दिवाणची तलब व बाबी याबद्दलची एकंदर रकम ३६६ होन ३ दुगल इतकी तुम्हाकडून दरसाल यावयाची बाकी ८८ होन व पाऊण दुगल येवढी राहिली. तसेंच तुमच्या, गावांतून मीठ, पान व तंबाकू या हक्कांबद्दल तुमच्याकडून यावयाची रकम ११५ होन व......इतकी आहे. पैकीं दरसाल ८८ होन ¾ दुगल याप्रमाणें हि. १०७१ पासून जमलेली रकम दफ्तरीं चालू केली आहे (दाखल केली आहे ?). तरी लिहिल्याप्रमाणें अमल करावा. ता. १० रजब हि. १०८१.

हें फर्मान सय्यद मुजफ्फर शाही सरखेल याच्या पर्वानगीनें निघालें.

---

१ हा शब्द गाळावा.

३

हुव अल्लह सुब्हानहु
तआला

ले. ६२
हि. १०८१ रजब १० } [फा. शि.*] { श. १५९२ मार्गशीर्ष शुद्ध १२
इ. १६७० डिसेंबर १४

फर्मान जहां–मताअ आफ्ताब–इर्तिफाअ व हुक्म कज़ा–जरियान वाजिब–उल–इत्तिबाअ अझ दीवान हुमायून खिलाफत-मश्हून अदालत-मक्रून चुनान झीनत सुदूर याफ्त कह मुकद्दमान व रिआयान व कुल-कर्नियान मौज़अ वन्मेर मिन अअमाल पर्गनह कतहकुन्दह बिदानन्द कह बाझर मौज़अ मज्कूर यक हझार व सी(सह) सद शस्त शश होन व सह दुगल मिन्जुम्लह तन्ख्वाह सुखनी विथोजी वलद तुकोजी घोरपरह रवानस्त यक हझार होन ततम्मह सी(सह) सद शस्त शश होन व सह दुगल तन्ख्वाह खास–खैल यक सद व नूझ्दह होन व सह नीम दुगल तलब दीवान नोद सह होन व नीम मर्दुम वरन्गल तन्ख्वाह सुखनी रफअत व विझारत-पनाह खैर–उद्–दीन मुहम्मद ब— आंहा मीगीरन्द यक सद व पिन्जाह व सह होन व मौज़अ चरपवेली सिम्त मुहम्मदानगर बह चहार सद व पिन्जाह व पन्ज होन बसुरवनी विथोजी मज्कूर रवां बूद हस्ब-उल-अम्र आली मुतआली मौज़अ चरपवेली मझ्बूर अमानत फर्मूदह अवज़ आं बराए सुरवनी नफर मज्बूर(झ्बूर) चहार सद व पिन्जाह व पन्ज होन मिन्जुम्लह सी(सह) सद शस्त व शश होन व सह दुगल तक्सीम खास-खैल व तलब दीवान [अस्त] बिनाबर मौज़अ मज्कूर बमूजब मस्तूर फौक अझ इब्तिदाए सनह अहदी सब्ईन अल्फ दफ्तरी रवां फर्मूदह शुदह अस्त बायद कह साल बसाल दुन्बालह दानिस्तह बर हुक्म फर्मान कद्र तवामान मुअल्ला रवन्द तहरीरन् फी-अत-तारीख १० शहर रजब-उल-मुरज्जब सनह १०८१ हिजरी

[समासांत *] पर्वानगी सियादत व नजाबत व नकाबत–पनाह विझारत व अमारत-दस्तगाह सय्यद मुज़फ्फर सर खैल शाही

सारांश

कतेकुंदा परगण्यापैकीं मौजे वेलेर येथील पुढारी, रयत व कुलकर्णी यांनीं जाणावें कीं, १३६६ होन ३ दुगल उत्पन्नाचा हा गाव विठोजी तुकोजी घोरपडे याजकडे पगाराबद्दल चालू आहे. पैकीं १००० होन पगार. बाकी

राहिले ३६६ होन ३ दुगल. पैकीं ११९ होन ३॥ दुगल हा खासखैलचि। वाटा. ९३॥ होन दिवाण तलब. बाकी १५२ होन खैरुद्दीन मुहम्मद घेतो. ४५५ होनांच्या अटीवर विठोजीस कामाबद्दल दिलेला गाव चरपवेली—संमत मुहम्मदानगर—अमानत करून त्याऐवजीं वेळेर हा गाव हि. १०७१ पासून दफ्तरीं त्याजकडे चालूं केला आहे. तरी गाव त्याचे ताब्यांत आहे असें जाणून फर्मानाप्रमाणें वागावें. ता. १० रजब हि. १०८१

४

ले. ६३ } [फा. शि.*] { श. १५९५ आषाढ वद्य १०
हि. १०८४ रबल २३ } { इ. १६७३ जून २९

फर्मान जहां-मताअ आफ्ताब-शिआअ व हुक्म लाझिम-उल—इताअह खुर्शीद-इर्तिफाअ अझ दीवान हुमायून खिलाफत—मश्हून चुनान शर्फ ज़ुहूर व लामअह सुदूर याफ्त कह विझारत व इक्बाल-पनाह मुकुन्दजी घोरपरह बजलायल इनायात खुस्रवानह उम्मीदवार बूदह व[१] बिदानद कह दरीं वला सूबह व सरलश्करी कर्नातकरा अझ मूसाखान तगीर नमूदह ब शौकत व इक्बाल-पनाह हश्मत व अज्लाल-दस्तगाह अयालत व अज़्मत-इन्तिबाह अमारत व उब्हत-इक्तिनाह आब गोहर दर्याए शहामत व फर्झानगी फिरूस खातिम शुजाअत व मर्दानगी झुब्दह मुअतमिदान इख्लास-कीश उस्वह मुअताकिदान खैर-अन्दीश मौरिद अल्ताफ बादशाही मत्लअ अअताफ ज़िल्ल इलाही मुहीत इनायात बीकरान शायस्तह मराहिम बीपायान मूतमिन-उद-दौलत-उल-अलिय्यह मुअतमिद-उल-खिलाफत-उल-बहिय्यह मुकर्रब-उल-खाकानी मियां मुश्क मुफव्वज़ दाश्तह ईम बायद कह दर जमीअ उमूर अझ इताअत व फर्मान-बर्दारी मुअज्जम-इलैह दर न गुज़िश्तह दर खिझ्मत मर्जूअह व दौलत-ख्वाही दीवानी साई बाशद व हमवारह बर हुक्म फर्मान मुअल्ला अमल नुमायद तहरीरन २३ शहर रबीअ-उल-अव्वल सनह १०८४[२]

सारांश

मुकुंदजी घोरपडे यानें जाणावें कीं, यावेळीं कर्नाटकचा सुभा व

---

१ व गाळावा २ थोड्या शब्दभेदानें याच मजकुराचें व तारखेचें एक फर्मान नेगोजी घोरपडे यास धाडलेलें आहे.

सरलश्करी मूसाखान[1] याजकडून दूर करून मिया मुश्क यास दिली आहे. तरी त्याच्या हुकुमांच्या बाहेर न जातां पाठविलेल्या त्याची चाकरी व दिवाणची सदिच्छा यासाठीं प्रयत्न करावा व फर्मानाप्रमाणें अमल करावा. ता. २३ रबिलावल सन १०८४

५

ले. ६४ } { श. १५९६ आश्विन वद्य १
हि. १०८५ रजब १४ } [फा. शि. *] { इ. १६७४ आक्टोबर ५

फर्मान जहां-मताअ आफ्ताब-इर्तिफाअ वाजिब-उल-इत्तिबाअ अझ दीवान हुमायून खिलाफत-मश्हून मैमनत-मकरून शर्फ सुदूर व इझ्झ जुहूर याफ्त कह विझारत व इक्बाल-पनाह खैर-उद्-दीन मुहम्मद बइनायात शाहानह उम्मीद्वार बूदह बिदानद कह विझारत-दस्तगाह विथोजी वलद तुकोजी घोरपरह बविसातत बारयाफ्तगान पायह सरीर खिलाफत मुब्सीर बअर्ज़ अक्दस रसानद कह किब्ल अझीं मौज़अ वेलेर मिन अअमाल पर्गनह कतकुन्दह तन्ख्वाह सुखनी खूद यक हझार होन व तक्सीम खास-खैल यक सद व नूझ्दह होन नीम सह दुगल व तलब दीवान नौद व सह होन नीम व बाबहा वरन्गल यक सद व पिन्जाह व सह होन जुम्लह यक हझार व सी(सह)सद व शस्त व शश होन व सह दुगलरा व मौज़अ चरोपली सिम्त मुहम्मदानगर मुब्लिग चहार सद व पिन्जाह व पन्ज होनरा बसुखनी बन्दह रवां बूद सानी-अल-हाल देह चरोपली मज्कूर अझ सुखनी बन्दह अमानत शुदह अवज़ आं अझ जुम्लह चहार सद व पिन्जाह व पन्ज होन बा झर देह मज्कूर सी(सह)सद व शस्त व शश होन सह दुगल बाबत तक्सीम खास-खैल व तलब दीवान व बाबहाए मौज़अ वेलेरा अझ इब्तिदाए

१ तारीख-इ-अली (अप्रकाशित) मध्यें सलाबतखान उर्फ सिद्दी जोहर यानें बंड केल्यामुळें अली आदिलशहानें त्यावर केलेल्या स्वारीचें वर्णन आहे. त्यांत बादशहा सिद्दी जोहरच्या मित्राच्या ताब्यांत असलेला रायचूर किल्ला हस्तगत करून तुंगभद्रेच्या तीरावर असलेल्या पचाल गांवीं मुक्कामास आला असतां तेथून त्यानें मूसाखान अफगाण, झुझारराव, नायकजी, व इतर उमराव यांस तुंगभद्रेच्या पलीकडे असलेल्या बंडखोरांस शासन करण्याबद्दल हुकूम केला आहे. हे लोक व जोहरतर्फे ३००० लोकांसह मसऊदखान यांची लढाई झाली व तींत मूसाखानानें मोठा पराक्रम केला. या प्रसंगांतील मूसाखान व फर्मानांतलि मूसाखान एक असल्यास या त्याच्या पराक्रमामुळें त्यास कर्नाटकची सरलश्करी व सुभेदारी मिळाली असल्याचा संभव आहे.

साल सनह अहदी सब्ईन व अल्फ साल बसाल बसुखनी बन्दह दुन्बालह शुदह फर्मान मुअल्ला सादिर शुदह बूद बावजूद ई मुतआल्लिकान आं विझारत-पनाह बेनिसबत अझ रूए सिरझोरी दर साल गुजिश्तह रिआयाए देह वेलेर मज्कूरा गिरफ्तह बुर्दह बझोर व तअदी यक सद व पिन्जाह व पन्ज होन गिरफ्तह अन्द व दर साल हाल नीझ कजालिक लिहाजा अम्र आली मुतआली सादिर अस्त कह......दाखिल तलब दीवान व कुल्ल अब्वाब बमूजब फर्मान मुअल्ला तन्ख्वाह सुखनी विथोजी मज्कूर रवां शुदह बाशद अन्दाझह मुतअल्लिकान ऊ चीस्त कह चुनीन बेअअतदाली नुमायन्द बायद कह बलुजर्द बमूल फर्मान कजा-जरियान मुतअल्लिकान खूदरा ताकीद नमूदह आं चह दर साल गुजिश्तह व साल हाल अझ देह वेलेर मज्कूर गिरफ्तह अन्द बमवाजह व मुकाबलह मर्दुम आं देह तमाम व कमाल वापस दहानीदह रिआयानरा कह दर कैद दाश्तह अन्द सर दहानद व नूई ताकीद नुमायद कह मिन बअद मा(ब) आं देह मज्कूर बहेच बाब दखली व तस्ती न दाश्तह बहाल खूद बाशन्द दरीं बाब ताकीद दानिस्तह बर हुक्म फर्मान आली रवद तहरीरन फी–अत–तारीख १४ शहर रजब–उल–मुरज्जब सनह १०८५ हिजरी

[समासांत*] पर्वानगी मुकर्रब उल-हझ्रत-उल-खाकानी मूतमिन-उद-दौलत-उस-सुल्तानी मज्मअ अत्वार हवा-ख्वाही महरम अस्रार झिल्ल इलाही मादो भान्जी मज्मूअदार—

सारांश

खैरुद्दीन मुहम्मद यानें जाणावें कीं, विठोजी तुकोजी घोरपडे यानें गादीचा भार वाहणाऱ्याकडून अर्ज केला कीं, पूर्वीपासून परगणे कतकुंद्यापैकीं वेलेर हा गाव स्वतःच्या कामाचा पगार १००० होन, खासखैलीचा वाटा ११९ होन ३॥ दुगल,दिवाणची तलब ९३॥ होन व वरंगळच्या बाबी १५३ होन, एकूण १३६६ होन ३ दुगल इतक्या पैशांबद्दल चालूं होता व पूर्वी मुहम्मदानगर समतेपैकीं चरोपली हा गाव ४५५ होनांबद्दल चालूं होता. सध्यां चरोपली गाव अमानत केला आहे. वेलेर हा गाव हि. १०७१ पासून त्याच्या कामाबद्दल त्याजकडे चालूं असल्याचें फर्मान सादर झालें होतें. असें असतां खैरुद्दीन मुहम्मदाच्या मुतालिकांनीं संबंध नसतां

गेल्यासालीं शिरजोरीनें वेलेरच्या रयतेस पकडून नेऊन जबरदस्तीनें १५३ होन घेतले आहेत व यंदाही तोच क्रम चालू आहे. म्हणून हुकूम होत आहे कीं, वरील गांव दिवाण तलब व सर्व बाबी यांसह विठोजीकडे कामाचा पगार म्हणून चालूं झालेला आहे. तुमच्या मुतालिकांनीं असा उर्मटपणा करावा हें केवढें धाष्टर्य. आतां हें फर्मान पोहोंचतांच स्वतःच्या मुतालिकांना ताकीद करून मागील सालीं व यंदा वेलेर गावापासून जें कांहीं घेतलें असेल तें त्या लोकांस समक्ष परत द्यावें व कैदेंतील लोकांना सोडून देऊन अशी ताकीद करावी कीं, पुढें त्या गावास कोणत्याही गोष्टीची तसदी न लागतां तो गाव सुखांत राहील. या बाबतींत ताकीद जाणून फर्मानाप्रमाणें चालावें. ता. १४ रजब हि. १०८५.

हें फर्मान मादो भानजी मुजुमदार याच्या परवानगीनें निघालें.

६

ले. ६५ हि. १०८६ साबान २५	[फा. शि.*]	श. १५९७ कार्तिक वद्य १२ इ. १६७५ नोव्हेंबर ४

फर्मान जहां-मताअ आफताब इर्तिफाअ वाजिब-उल-इत्तिबाअ अझ दीवान हुमायून खिलाफत-मश्हून मैमनत-मकरून शर्फ सुदूर व बारिकह जुहूर याफ्त कह विझारत व इझ्झत–दस्तगाहान दौलत-ख्वाह दर्गाह नेगोजी व मुकुन्दजी घोरपरह बा इनायात शाहानह सर-अफराझ बूदह बिदानन्द कह ब मसामअ जाह व जलाल रसीद कह आंहा बा जम्ई सवार खुद हम्राह सियादत व विझारत व इक्बाल-पनाह शौकत व हश्मत व अज्लाल-दस्तगाह लतीफ शाह [१] रफ्तह बर सर हिसार अल्लूर पालमपेत गनीम रीख्तह आं हरामखोरान मख्झूलरा गोशमाल वाजिबी दादह व गनीम मज्कूर शिकस्त खुर्दह गुरीख्तह रफ्तह व जाए आं मुखालिफानरा काबिज व मुतसर्रिफ शुदह व दीगर यक हिसार खाकी कह दर दो गाव राही लश्कर मन्सूरह वाकअस्त (ईस्त) हरामखोरान मज्कूर सकूनत गिरफ्तह अन्द कस्द

१ बुसातीन उस्सलातीन (हिंदी आवृत्ति पृ. ६८८) मध्यें एक लतीफ शाह आला आहे. पण तेथील संदर्भावरून तो मोंगलाकडील दिसतो. तो उल्लेख या फर्मानाच्या पूर्वीचा सुमारें ९ वर्षांचा आहे.

दारद् कह बर सर आं हिसार खाकी रफ्तह काबिज़ नुमायद् लिहाजा अम्र आली मुतआली सादिर अस्त बायद् कह ब इत्तिफाक सियादत व विझारत व इक्बाल-पनाह मुशारुन-इलैह बर सर आं हिसार खाकी रफ्तह ब सई व तलाश हिसार मज्कूरा बदस्त आउर्दह गनीमरा नीस्त व नाबूद् साख्तह मुज्राए दौलत-ख्वाही व नेकू-खिझ्मती दर बन्दगी वाला बज़ुहूर रसानद् कह आंहारा सर-अफ्राझ फर्मूदह ख्वाहद शुद् तादानिस्तह बर हुक्म फर्मान आली रवन्द् तहरीरन फी- अत-तारीख २५ शहर शअबान-उल-मुअज़्ज़म सनह १०८६ हिजरी

[समासांत ले. ६४ प्रमाणें मजकूर *]

सारांश.

नेगोजी व मुकुंदजी घोरपडे यांनीं जाणावें कीं, आमच्या कानांवर आलें कीं, तुम्ही आपल्या स्वारांच्या जमेतीसह लतीफ शाह याच्या बरोबर जाऊन शत्रूच्या अल्लर पालमपेठ या गढीवर घसरून तेथील हराम-खोरांना योग्य शिक्षा केली. गनीम मोड होऊन पळून गेला व शत्रूची ती जागा काबिज झाली. विजयी लष्करापासून २ गाव अंतरावर असलेल्या एका गढींत हरामखोरांनीं तळ दिला आहे. ती गढी (ती वर जाऊन) तुम्ही घेऊं इच्छितां. तरी लतीफ शाहशी संगनमत करून त्या गढीवर जावें, प्रयत्न करून ती ताब्यांत आणावी आणि शत्रूला नेस्तनाबूद करून सदिच्छा व्यक्त करावी म्हणजे उत्कर्ष केला जाईल. ता. २५ साबान हि. १०८६

हें फर्मान मादो भानजी मुजुमदार याच्या परवानगीनें निघालें.

७

ले. ६६
हि. १०९७ रमजान ११ } [फा. शि. *] { श. १६०८ श्रावण शुद्ध १३
इ. १६८६ जुलै २३

फर्मान जहां—मताअ आफ्ताब इर्तिफाअ व हुक्म लाझिम—उल इन्कियाद् वाजिब—उल—इत्तिबाअ अझ दीवान हुमायून खिलाफत-मश्हून मैमनत-मक्रून चुनान शर्फ सुदूर व इझ्झ ज़ुहूर याफ्त कह विझारत व रफअत—पनाहान शुजाअत व इझ्झत-दस्तगाहान नेगोजी व मुकुन्द्जी व विथोजी व रौलोजी व तूकोजी *यसवंतराव गोरपरहा बइनायात शाहा-*

बा कौलु शाहासाहेबु

सिदो मुकुंद ठाणेदार (बदामी शिक्का)
नरसो गोमाजी सबनिवीस

ळाहामाजी गोविंद मजमूदार

देसक

मुघोजी वणगोजी नाईक देसमुख (चौकोनी शिक्का)

गोमाजि पदमनिभी व आतो माहादेऊ देसकुळकरणी

दर्यानि बेल्दर गौड मोकदम मौजे सागवी

आकूसराऊ मोकदम मौजे तरडगाव

बाबाजि पटेल मोकदम कसबे (नांगराचें चिन्ह)

बळगोजी मोकदम मौजे हिंगणगाव

माळजि व विठोजी मोकदम मौजे गिरवी

तान्हाजी निंबाळकर मोकदम मौजे वाटार

जाऊजी खताळ मोकदम मौजे कापडगाव

नाऊजी मोकदम मौजे कोरेगाव

+ कमळोजी झंझाण मोकदम मौजे सासवड (नांगराचें चित्र)

हे मुख्य करून पा। फलेटण सु॥ तिसा इसैन आलफ कारणें जाहाळा महजर यैसा जें बो॥ खंडोजी व बाजी बिन जाऊजी घोरपडे मोकदम मौजे कापसी पा॥ मजकूर हुजूर येउंनू मालूम केलें कीं मौजे मजकुरीचें पटेलगी आमच्या वडीळ वाडिळांची मिरासी पिढी दर पिढी चालिलें आहे

+ निराळी शाई व वळण

शि. च. सा. खं. ४-१०

दरम्यानें बोबडे गैरमिरासी थोडेक दिवस दखल जाहाळे होते मग आपण दर माल सन सीत आशैन आलफ पा मजकूर अमानत करून हजरत दिवाणींचे माहाळदार कमाविसेभ आळा होता ते वख्ती अपण जाउनू माहाळदार मा व देसाई यांपासि आहवाल मालूम केळेंवरी त्याणीं हमशाई मोकदम व सेटिये माहाजन कसबे मजकूर व देमक बोलाउनू दरीं बाबा तफवासि घेतळें देसकाने गोही दिधले कीं यांची पटेलगी हे सही बोबडे गैरमिरासी त्यांसी निसबत नाहीं यावरून मौजे मजकुरीची पटेलगी आपळे दुमाळे केलें त्यावरून आपण दिवाण नफराई करून आहों हालीं जाबती सनतल मजकुरासी पा मजकूर साहबांसी मुकासा आर्जानी जाहाळा ठाणांहूंन महजर मन्हामत केळा पाहिजे म्हणउनू तरी सदरहू माळुमाती खातिरेसी आणौनू ये बाबेची नफवासी होतां यांचे मिरासी पटेलगी होये येैसें तहकीक जाहालें बोबडे गैरमिरासी त्यासि पटेलगीस निसबत नाहीं मग तुम्हासी मिरासी पटेलगी देउन महजर करून दिल्हा आसे लेंकरांचे लेंकरीं पटेलगी खाउनू सुखे आसणे हा महजर सही [प०शि०*]

ले. ७२२ } [समासांत फा.चौ.शि.*] { श.१५७६ माघ वद्य १२
मू. दा. प. } { इ.१६५५ फेब्रुवारी २२

द सहश्रायु चिरजीव सदासुखीभव राजमान्य राजश्री खलोजी राजे ता तुकोजी राजे घोरपडे यासि राजश्री अंबाजी राजे घोरपडे आसीर्वाद येथील क्षेम ता छ ११ माहे रबिलाखर जाणौनू तुम्ही अपले क्षेम लिहाव्या लेखिकास निरोप देणे उपरि बहु दिवस जाले परत कागदीपत्री परामृष घेतले नाही याकरिता आंतःकरण समाधान होत नाहीं आतां येणार मनुस्यासमवेत आपले कुशल पाठउनू अम्हेही परामृष घेणे यानतर मागे भाडलेचे पाटिलगी तरफ नागोजी पाटील ते अमचे वडीलवडीलाचे मिरासी बहुत दिवस सायास करिता गतवरुषी ते तरफ अमचे दुबाला करून घेतले ठाणेचे कौल माहजर करून घेतले ठाणेचे माहजरास होन २०० पडिले

ते तेच वस्ती कर्जवाम करून व्याज कलतरे काढून पैके दिल्हे कौल माहजर घेतले त्यावरी नागोजी पाटिलाचा फर्जंद माहालोजी खाने अजम फतेखानाचेथे मरदानकी करितो त्याने खाने अजमास फिर्यादी करून त्या पाटिलगीनिमित्य तर्फे वालवेचे देसमुखी आमानत केले साल गुा पासून साल मा ता सलक माह जिल्हेज आमानत होते सेवट सामदंडभेद करून कासी तमाजी पंडित हेजिब खाने अजम याचे विद्‌माने खान साहेबाचे समजावीस बहुताप्रकारे करून मला केला त्यास होन ६०० पडले तेही मुघवा नाईक घुगकी पासी चौरोनराप्रमाणे कालतरें काढून पैकें दिल्हे त्यापैकीयाचे तकसीम तरी रा बाजीराजे नेदीत हे भाडलेचे पाटिलगी निमित्य पडले म्हणौनु राजे गोसावी म्हणताती [खे]ळोजी राजे व विठोजी राजे व येमाजी (?) राजे यैसे तिघे [व]गैरी द्यावे यैसियासी पहिले तुम्हास लिहिले होते की द्रव्य तिसरे तकसीम जे हिसेब होत असेल ते पाठवणे त्यावरी तुम्ही जाब लिहिले की मातुश्री गगाई ---- -- पाठवितो ती बराबरी पैकेही पाठवितो म्हणौनू लिहिले होते आजीवरी वाट पाहिले परंत पाठविले नाही जरी तुम्हास मिरासीचे वास्ता आसेल तरी यैन भाडलेचे पाटिलगीस पडले होन २०० व भाडलेचे पाटिलगीनिमित्य वालवेचे देसमुखी आमानत केले होते त्याबदल पडले होन ६०० येकून होन ८०० याचे तिसरे तकसीम तुमचे वाटेस जे येईल ते हिसेबी पैके पाठउनू देणे याबदल मुजरद बाबान माहालदार पाठविले आसे त्या बराबरी दोघ विस्वासू देउनू पैके पदरी बाधोन अम्हापासीपाठवणे ज्याचे रीण घेतले आहे ते पैकियाबदल आकांत करीत आहेती पैके तूर्त पाठविणे व गगाई पाटिलणीसही तूर्त भाडलेस पाठवणे तेथे जितरबास काण्ही दिक्क नाही तुम्ही उभयेता बंधू परमुलकास जाउनू तेथे समाधाने असत नाही यावरून काये लिहावे उभयेता बधूमधे फूट दाखविलिया दुसरा माणूस फितवा करावया पैस करितो तुम्ही जवळी आसतेस तरी उभयेतासी सागोन विवेके राहाटी करवितो आम्ही—दस्त आहो तुम्ही उभयेता

बंधू बहूत समाधाने सौजन्ये आसिलिया लोकोतर कीर्ती वाढेल भूषणही होईल आतां कागद पावलियावरी मिरासी पाहिजे ऐसे आसेल तरीच पैके ×× हिसेबी द्रव्य पाठविजे जर तुम्हासी मिरासीचे जरूर नसेल तरी तैसेच लेहून पाठविजे जो पैका नेदी त्याचे तकसीमेचे मिरासी राजश्री बाजीराजे यास तकसीम देउनू पैके घेउनू ———— वाटा मागताती याचे उतर बहूत सीघ्र पाठविजे येविसी बहु लिहिणे नलगे हे आसीर्वा [ष. मो *]

छ २९ रबिलाखर सुा खमस खमसेन

ले. ७२३ } { श.
मू. दा. ५. } { इ.

द सुनायेता व इनता अमारी वजारत दस्तगहा राऊ आजं रविल्लोजी राजे घोरपडे राईज अन्हा ऊ.मी पहिले तुम्हासी कौल मरहामत करुनू पाठविले होते त्यावरी तुम्ही उमाजी पंतासांघाते सागुनू पाठविले कीं अगिखी फिरंगी व तुरा देणे व फरजंदानीमधे जमा करुनू सांभाळगे व अपण आडोर रहगे येकी–खल देरे व अमचे भाऊ तुकोजी राजेसी येक सेहे घोडेसी मोकररु करुनू त्यांसी मोकासा व बहुमान घोडे व तश्रीफ व सिरनावसीची तिनी सेहे होनू देणे म्हणौनू तरी तैसेची कौल मरहामत केले असे तुम्ही सगितले प्रकारीने चालउनू कोण बाबे अंदेशा न करणे सिताबीने यणे तुमचे भाऊसी समाधान करुनू सांघाते घेउनू येइजे [मजकुराच्या डाव्या अंगास समासांत वाटोळा फारसी शिक्का*]

ले. ७२४ } श्री { श.
मू. दा. ५. } { इ.

[समासांत मध्येंच चौ. फा. शि. *]

ई चिरंजीव गगांसमान बिंबाई ताा निराईस प्रती अबाजी राजे घोरपडे आसीर्वाद येथील क्षेम ताा छ १७ माहे रजब जाणौनू तुम्ही

अपले क्षेम लिहिले पाहिजे उपरि बहुत दिवस जाले पर कागदीपत्री समाचार पाठविले नाही या करिता समाधान वाटत नाही आतां तरी येणार समवेत मिनवान समाचार लेहून पाठविजे अम्ही कुणाबिणीबदल आगा मियाजी बराबरी होन पचेवीस पाठविले आसे त्याचे कुणबिणी बऱ्या नीटस गोरिया जातिवंत पाहून चौघी पाच जणी घेऊन पाठवणे तुमचे मुकासे पावेतो दोघ स्वार देउनू पाठवणे तेथोन अमचे मुकामासे पावेतो पावितील येविसी बहुत लिहिणे नलगे हे आसीर्वाद तुमच्या सुना आसतील त्यास व्हाहानाथोरास आमच्या आसीर्वाद सागणे बहुत शाहाणपणे आसणे

दा चिरजीव निराई बाईस आसीर्वाद तुमचे माता अपले तकसीमेचे पटेलगी नेरलियाची तुम्हास दिल्हे आहे तुम्हास येक दोनी वेला बोलाविले परंत तुम्ही आला नाही तिचे भेटी तुम्हास नव्हेती तुमची मातेस देवज्ञा होउनू पाच सा महिने जाहाले तुम्हास समाचार कलला आसेल की नसेल ते न कले तुम्हास कलवे म्हणौनू लिहिले आहे मरन काली माहातारी आवाघियासी बोलली की अपली तकसीम आपले लेकीचे लेकास दिल्ही आहे यास कोण्ही खलल आगर कुसूर करावया निसबत नाही आगर अपली फर्जद व मुरसाल त्यासही निसबत नाही येसे बोलोन सीव जाली तरी तुम्ही धाकटा मूल सागाते घेउनू येणे अमची भेटी होईल व पाटिलगीचेही विल्हे होईल ये विसी बहुत लिहिणे नलगे हे आसीर्वाद [ष. मो.*]

...

ले. ७२९ } श्री { श.
मू. दा. प. } { इ.

[समासांत मध्येंच चौ. फा. शि. *]

॥ द सहस्त्रायु चिरंजीव विजईभव राजमान्य राजेश्री नेगोजी व मुकुंदजी व विठोजी व खलोजी घोरपडे गोसावी यासी प्रीतीपूर्वक संताजी राजे घोरपडे अनेक आसीर्वाद येथिल क्षेम जाणौऊन तुम्ही अपले क्षेम समाचार लिहिले पाहिजे याउपरि तुम्ही कागद पाठविले होते ते उतम

समई पाऊन बहुत संतोष पावलो लिहिला अभिप्राऊ कलो आला बहुत काही स्नेह उतरे लिहिले त्यावरून अमृतपान केले सारिखे जाहले लिहिले की पटेलगीचे तकसीम होत असे ते वेलेस अपले स्मरण असो देणे म्हणौ-ऊन तरी तुम्हा विरहीत काही होणार नाही जे वेलेस तकसीम होईल ते वेले तुमचेही तकसीमेचे विले होईल त्याप्रा लिहून पाठऊन व मातुश्री फुंइजी आवास ठाणेचे तसवसि होत असे म्हणौऊन खबर आइकतो त्या बाबे कारकुनास खाने अजमाचे ताकीद कारविली पाहिजे म्हणौऊन तरी अंम्ही येथे असता काही घडणार नाही हाली खाने अजमाचे पेसजी सारिखे येक मुखे चालत नाही हर येक गोस्टी........अमचे वर्तमा........ पन्हा बा वेगळूर तरफेस गेलो होतो तेथून फजीत पन्हा शाहरास आलेवरी अंम्ही चिरजीव खंडोजी व ब्रह्माजीचे क-ाड मारून हाली शाह-रास येऊन येक महिना जाहला कलले पाहिजे विशेष लिहिणे नलगे घडी घडी अपले सविस्तर वर्तमान लिहून पाठवीत गेले पाहिजे हे आसीवाद [ष. मो. *]

—सौभाग्यवती निराबाईस व बिबाबाईस अनेक आसीवाद

ले. ७२१ } { श.
मू. दा. प. } { इ.

[पाठीवर राजारामाचा गोल शिक्का*]

अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ------------

प्रती राजश्री राजाराम छत्रपती—उपरि तुम्हीं या देवांब्राह्मणाच्या - राज्याची आभिवृधी करावी आपला नामोश करून घ्यावा या गोष्टीची उमेद धरिली आहे म्हणवून कितेक वर्तमान रा शामजी चिंतामणी यानी विदित केले त्यावरून बहुत संतोश वाटला याहून उतम काये आहे हे राज्य तुम्हां लोकांचे आहे भागानगर प्रांतीचा राज्याधिप-

त्याचा कार्यभाग राजश्री प्रल्हाद पंडित प्रतिनिधी याचे स्वाधीन करून त्या प्रांतास रा। आनंद गंभीरराऊ सरसुबेदार यांस नामजाद पाठविलें आहे यैसियास तुम्ही कोणे गोष्टीविसी शंका न धरिता यांस सामील होऊन कार्येसिधी करणे आगर [जमावसहित] येथें आलिया तुमचे आतिशयसीं ऊर्जित होईल यामधे तुम्हांस आनकूल ते गोष्टी करणें तुम्हीं आमच्या राज्यामधे आलियानंतर तुम्हांस हत्फहजारी दौलत द्यावयाचा निर्वाहा केला आहे तुमचे गोमटे करून चालवायाविसेंसी सहसा आतराये होणार नाही येविसीं अपलें समाधान आसो दीजे कितेक वर्तमान रा। शामजी चितामणी सांगतील त्याजा भरोसा आसो देणें [नि*] बहुत लिहिणे तरी सुदन असा [शिक्का*]

मर्या
देयं विरा
[जते]

श्री धर्मप्र
द्योतिताशेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते

ले. ७२७ } { श.
मू. दा. प. } { इ.

श्री

श्री तीर्थस्वरूप राजमान्ये राजश्री बीबजीबवा दादासाहेबचे सेवेसी सेवक राजे बाजीराऊ घोरपडे दडवत विनती उपर येथील क्षेम ता। छ ७ जिलकाद मु॥ नजीक काळूर संगम भीमातीर सुखरूप असो विशेश आम्हास नवाबसाहेबी फार मेहेरबानगी करून जागिरा प्रागने तीन दिधले प्रगने

राजनी व प्रगने कंवसडी व प्रगने वाळूर ययैसया सनदा दिधल्या ते घेऊन राजश्री वासुदेवपंत येत अहेत अन अम्हीही अनरवी जागिराचे परवाने घेऊन सत्वरच येतो अपले असिर्वादे अनखी प्रगने चागलेच घेतो सेवेसी कळावे बहुत काये लेहेन हे विनति [एक शिका *]

---

२० फलटण–निंबाळकर*

(श्री. शं. ना. जोशी)

ले. ७१८
मू. दा. प.

श. १६१६ श्रावण वद्य ७
इ. १६९४ आगष्ट २

श्री

राजश्री मुधोजी नाईक निंबालकर
गोसावी यांसि

॥ दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती राजश्री राजाराम छत्रपती उपरी तुम्ही पत्र पाठविले ते छ २० जिल्हेजी प्रविस्ट जाले आपण ताम्राकडे असता मनसबा करीत होतो ते टाकून या राज्यात आलो काये निमित्य कीं हें माहारास्ट राज्य वृधीस पाववावे आपले वतन आपले सांभाली व्हावे म्हणोन सर्वश्वास तन्हा दिल्ही आणि इकडे आल्यानंतर लेहून पाठविले परतु सरजामाचा निर्वाह करून पाठविला नाही तरी याउपरि फलटणमाहाल साणक करून सनद पाठविली पाहिजे म्हणोन कितेक तपसिले लिहिले तें सविस्तर विदित जाले ऐसियास येविषी पूर्वी तुह्मी लिहिले होते व तुमचा हेजीबहि हुजूर आला होता तेव्हा तुम्हाकडील जो नाव करावयाचा तो करून यावा म्हणोन लिहिले तरी तूर्त हा प्रसंग करता येत नाही या प्रांत गनिमाने बहुतच बल धरिले आहे यास मारून काढायाबदल लस्करची सारी फौज आणविली आहे राजश्री संताजी

---

* १९ वे संमेलन.

दुखणेचा चढ भारी जाहाला याजकरिता माघारा फिरुऊन का सुकणे येथ आणून दाभाड्याच्या वाड्यात ठेविला असे त्याजवल हशम लोक व खास बरदार रामाजी बापुजी असतात तेथून एका दो रोजी रामाजी बापोजी लशकरात येत असतात मुक्कामापासून दोन कोशावरी सुकेणे आहे स्वामीस कलावे विठलराव शाहाराहून येका दो रोजी बातमी आणवीत असतात ताब्राची खबर तरी दाटीची येत असते त्यावरून हेहि आपले फैजमधे खबरदार राहात असतात सेविस्तर सेवेसी कलावे राजश्री शंकराजीपंत वसईकर याजकडील कारकून बातमीवर येऊन राजश्री विठलराव याजवल राहिला असे बणराव नवापुरीच आहे फैज पूर्ववतप्रा आहे मोगलाचे कागदपत्र हि गायकवाडाकड जात येत असतात याहि फैजची बातमी मोगल राखीत आहे सेवेसी सविस्तर कलावे याकरिता सेवेसी लि॥ असे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना[1]

---

६९ पिलाजी जाधव व नानासाहेब.*

(श्री. द. वि. आपटे)

ले. २३८ मू. दा. प.	श्री	शा. इ.

राजश्री पिलाजी जाधवराव

गोसावी यांसि

ई अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो॥ बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद [उपरी येथील कुशल जाणून] स्वकीये लिहिणे विशेष छ२९मोहरम शुक्रवार संध्या[का]लचे पत्र पाठविले ते प्रविष्ट रविवारी [प्रहर.... दि]वसास प्रविष्ट होऊन लिहिला अर्थ अवगत जाहाला पत्राची उतरे सत्वर पाठवावी नवाबाचे कुच रविवारी डोंगराचे सुमारे आहे सत्वर पत्राचे उतर येणे

---

१ हीं तीनहि पत्रें सातारचे रा. वासुदेवराव जोशी यांच्या संग्रहांतील आहेत

* २२ पा. स. ११८४१

ऐ.. सं. सा. खं. २–७

उत्तम आहे म्हणून लिहिले ते अवगत जाहले ऐशियास वरचेवर तुमचे पत्राची उतरे रवाना करीत आहोच सैद लष्कर खानासही विस्तारे उतर लिहिले आहे पत्रे प्रविष्ट जाहालीच असतील सारांश नवाबाचा आमचा श्नेह आहे असे असता नवाब कुच करून डोगराजवल आले तर त्याचा वसवास काय आहे व आम्ही जवळ आलो तर त्याचाही वसवास काय आहे परस्परे श्नेह असलिया काहीच दोष नाही सुखरूप खातरेस येईल तिकडे कुच करावे श्नेहाचा अर्थ तर सर्व नवाबाचे कृपेवर आहे ते जसी जे समई कृपा करतील त्याप्रा। श्नेह ही आहे येतद्विषई पत्री विस्तार काय लिहिणे छ २७ मोहरम बहुत काय लिहिणे

७० हरिपंत फडके यांच्या देशमुखीविषयीं अधिक माहिती.*

(श्री. शं. ना. जोशी)

श्रीमंत पेशवे यांनीं सेनापती व मुत्सद्दी हरिपंत फडके यांस आपलें देशमुखीचें वतन इनाम दिलें ही गोष्ट नवीन नाहीं. आतांपर्यंत ३, ४ साधन ग्रंथांत (पेशवे बखर, कैफियती व यादी, काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी, मंडळ इतिवृत्तें) आणि त्यांवरून रियासत, ज्ञानकोश इत्यादि सिद्ध ग्रंथांत ती सुप्रसिद्धहि होऊन बसली आहे. पण आज ह्या निबंधानें मी त्याच ज्ञात गोष्टीबद्दल नवीन असें जें सांगणार तें हें कीं, त्या गोष्टीचा मूळ आधार, अस्सल व स्वयंप्रमाण असा आधार आणि अर्थात् त्याबरोबर त्या गोष्टीचा इतर तपशील, एकाद्या ऐतिहासिक नोंदीच्या बाबतींत स्वयंसिद्ध आधार व तपशील ह्या जोडीचें महत्त्व, लक्ष्यवेध करतांना धनुष्य आणि बाण ह्यांचें जितकें तितकें आहे. हरिपंत फडके यांना पेशवे यांनीं आपलीच व कोंकणची देशमुखचि कां दिली ? सर्व सत्ताधारी असे श्रीमंत पेशवे असतां त्यांस, ह्या हरिपंतांची मोठ्या शिपाई-

* २२ वा वार्षिक दिवस

गिरीची व थोर मुत्सद्दीगिरीची निःस्वार्थपणें केलेली कामगिरी पाहून, देशावरील एकादा गांवमहाल देतां आला असता. पण, त्यांतल्या त्यांत अधिक शाश्वत आणि आपल्याच वडिलार्जित वतनी मिळकतीपैकीं कांहीं दिल्याशिवाय, हरिपंतांचा गौरव केल्याचें व हरिपंतांना आत्मीय लेखल्याचें समाधान वाटेना म्हणून ही कोकणची देशमुखीची वतनी देणगी थोरल्या माधवराव पेशव्यांनीं अखेरीअखेरीस दिली.

आतां नवीन माहिती येणेंप्रमाणें-- ही देशमुखी शक १६९३ (खर संवत्सरी मार्ग. वद्य ५ गुरुवारीं) मध्यें दिली. माधवराव बलाळ, नारायणराव बलाळ व रघुनाथ बाजीराव ह्या तिघांनीं दिली आणि मोरो बापूजी, गंगाधर आबाजी, हरि बलाळ व धोंडो बलाळ ह्या चौघा फडके मंडळींच्या नांवें दिली. ४ थी गोष्ट ही देशमुखी थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांनीं संपादन केलेली होती. ह्या माहितीनें जुन्या माहितींत म्हणजे फडके यांच्या वंशावळींत भर किंवा दुरुस्ती करावी लागत आहे. हरिपंत फडके यांस आणखी चौघे बंधू होते. बापूजी, महादाजी, आबाजी व धोंडोपंत हे ते चौघे बंधू. पण प्रस्तुत अस्सल व केवळ विश्वसनीय सनदेंत गंगाधर आबाजी असें एक नांव आलें आहे आणि वंशावळींत धोंडोपंत यास गंगाधर हा मुलगा असल्याचें दिलें आहे. म्हणजे आबाजी हें धोंडोपंताचें टोपण नांव असावें असें वाटण्याकडे कल जाईल. पण तसा कल, सनदेंतील नांवापुरता संबंध उल्लेख पाहिला असतां, जाऊं देतां येत नाहीं आणि शिवाय असेंहि अनुमान काढणें इष्ट होईल कीं, आबाजीचा मुलगा गंगाधर हा वारल्यानंतर धोंडोपंत यास मुलगा झाला व त्याचें नांव गंगाधर ठेवलें असावें आणि बापूजी व आबाजी हे सनदेच्या वेळीं जिवंत नसावे. ह्या ठिकाणीं सनदेंतील उल्लेख जरा विचार करण्यासारखा आहे.

ही देशमुखी दाभोल सुभ्यापैकीं केलसीतर्फेची दिली हेंहि अप्रसिद्ध नाहीं पण पुढील गोष्टी नवीन आहेत. ह्या केलसी तर्फेत २२ गांवें होतीं. पेशवे यांनीं ह्या केलसी तर्फेच्या देशमुखीबरोबर *जंजिरे सुवर्णदुर्गाखालील* पेठ हरणई येथील हकलवाजिमे व मानपान हरिपंतादिकांस दिले आहेत. येथें ह्या निबंधास त्या मानपानाच्या हकिकतीवरून हरिपंत फडके यांच्या देशमुखीबरोबर तत्कालीन आर्थिक व सामाजिक परिस्थितीच्या भागासंबंधींचा मजकूर मानतां येईल. देशमुखीचा हक्क म्हणून नक्त जमाबंदीवर

दर रुपयास (८॥·) अर्धा आण्याप्रमाणें आकार मिळे. तसेंच वजनी जमाबंदीवर दर मणी सुपारी, हळद व गूळ प्रत्येकीं ८-॥, आलें ८॥, ताग ८- व मिरे चार आणे असे ६ जिनसांवर ८१० द्यावयाचे असत. मापी जमाबंदीवर दर खंडीस अर्धा मण व मोजणी जमाबंदीवर म्हणजे १०० नारळांवर (८|·) पावआणा घेण्याचा शिरस्ता असे. वजनी जमाबंदी-वरहि वरील ६ जिनसा वगळून दर मणी एक शेर द्यावयाचा असे. ह्या ठिकाणचे सनदेंतील चवाठा, गौली व दालदी यांचे नेमके अर्थ कळले नाहींत.

आगरांत ब्राह्मणाचे चाकरीं जे मराठे लोक असतील त्यांजपासून घरास एक वेठ, तसेंच आगरांत पातवडे लोक आहेत त्यांजपासून केळीचीं पानें घेत जावीं असें म्हटलें आहे. बंदरीचे सावकारी गलबत येईल त्यांतील वजनी व कैली दर गलबतास गलबत पाहून १ मण व अदमण घ्यावा. कोळी व दालदी दर्यांतून मासळीं मारून माहागिऱ्या व होड्या आणितात त्यापासून मासा १ लहान मोठा घेत जावा. इतरहि मानपान बरेच आहेत. ते एकंदर ३५ आहेत.

शेवटीं हें वतन छत्रपतींच्या मंजुरीनें कायम झालें आहे. ह्याचा अर्थ ह्या मंजुरीशिवाय कामगाराचें वतन कायम होत नसे असा होतो. व तो अन्य पुराव्यानेंहि सिद्ध आहे म्हणजे खटाव तालुक्यांतील पाटिलकीचें वतन अशी संमति नसल्यामुळें शाहू छत्रपतीनें फिरविलें आहे. असो. सनदेची समाप्ति व बार करण्याची रीति मिळून १७ प्रकारचीं हस्ताक्षरें आहेत. छत्रपतींचा शिक्का नाहीं. ही सनद अस्सलची नकल आहे. सनद येणेंप्रमाणें—

ले. २३९ मू. दा. प.	श. १६९६ ज्येष्ठ वद्य २ इ. १७७४ जून २६

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०० विजयनाम संवत्सरे ज्येष्ट वद्य द्वितीया भानुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजाराम छत्रपति स्वामी याणी मोकदमानी देहाये ता। केलसी सुभा दाभोल यांसी आज्ञा केली ऐशी जे मोरो बापूजी व गंगाधर आबाजी बालाजी ईंबिन हरि व हरि बलाल व धोंडो बलाल उपनाम फडके गोत्र अत्री सूत्र अश्वलायन देशमुख ता।

मजकूर याणी शाहू नगर नजीक किल्ले सातारा येथील मुकामीं स्वामी संनिध येऊन विनंति केली कीं ता। मजकूर येथील देशमुखीचें वतन माधव राव बलाल व नारायणराव बलाल व रघुनाथ बाजीराव उपनाम भट देशमूख मामले दंडाराजपुरी यांचें होतें ते त्याणी आपले आत्मसंतोषें आम्हास सन इसनेस बेनात देऊन ग्वाही साक्षींनसी आपले पत्र करून दिल्हे त्यांतील मजमून.

श्री शके १६९३ खर नाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य पंचमी गुरुवासर ते दिवसीं राजश्री मोरो बापुजी व गंगाधर आबाजी ईत्रिन बालाजी हरि व हरी बलाल व धोंडो बलाल उपनाम फडके गोत्र अत्री सूत्र अश्वलायन ग्वाहागरकर यांसी माधवराव बलाल व नारायणराव बलाल व रघुनाथ बाजीराव उपनाम भट देशमुख मामले दंडाराज-पुरी प्रांत मजकूर व ता। केलसी सुभा दाभोल नमस्कार सु॥ ईसने सबेन मया व अलफ तुम्हास वतन पत्र दिल्हें ऐसें जे तुम्हीं आम्हापासीं बहुत दिवस श्रम साहास करून येकनिष्ठपणे सेवा केली कुटुंब वत्छल आहां तुमचे चालवणे आवश्यक यास्तव तुम्हास आम्ही आपले वतन पैकीं ता। केलसी सुभा दाभोल येथील देशमुखीचें वतन पूर्वीं कैलासवासी तीर्थरूप बाजीराव याणी संपादिलें त्याचा उपभोग घेत आहों तें वतन तुम्हास मीरास करून दील्हें असे ता। मजकूरचे देह बीतपसील

किता	देह	किता	देह
१	कसबा केलसी	१	मौजे मादिवली
१	मौजे उटबर	१	मौजे रावतोली
१	मौजे आबवली बु॥	१	मौजे लावडोली
१	मौजे अतगांव	१	मौजे वाजलोली
१	मौजे रोवलें	१	मौजे डवली
१	मौजे उबरसेत	१	मौजे अजरलें
१	मौजे मानवी	१	मौजे वलवी

किता	देह	किता	देह
१	मौजे अडें	१	मौजे रेवळी
१	मौजे पाडलें	१	मौजे राजापूर
१	मौजे ईळणें	१	मौजे साकुरडें
१	मौजे वाघीवणें	१	मौजे तीवरें दरवार
१	मौजे सुकोंडी	१	मौजे कागेलें
१	मौजे मुरडी	१	मौजे कलबट
१	मौजे हरणई	१	मौजे अडखल
१	मौजे लोणवडी	१	मौजे आंबवली खुर्द
१	मौजे सारमुले	१	मौजे वाघवे
१	कीस्तं व्याघ्रेश्वर		
१७		१६	

देह ३३

येकून देह तेहतीस व पेंट हरणई जंजीरे सुवर्णदुर्ग येकून चवतीस येथील वतन समंधी हक लवाजिमे व मानपान व कानुकायदे व इनाम गांव व जिरायत भात जमीन अगर इनाम व मिरासीची सेतें

मान

किता	किता
१ तुमार वासलात याजवर दस्कत करावें	१ नजर दिवाणांत ठेवावी
१ वतनी कागदार सीका करावा.	१ सीका तुम्ही आपलें मांवें करून ता॥ मजकुरीं रोखापत्र करीत जावा
१ सीरपाव दिवाणचा घेत जावा	देव समधं १ मान असेल तो
१ गंध वीडा सभेंत	
४	२

७

कलम १

दिवाण दस्तावर हक रयत निसबत
कुल जमाबंदीवर घ्यावयाचा सिरस्ता

येन नख्त जमाबंदी मोहतर्फा व झाड दस्त व भंडार माड सुधा आकार होईल त्याजवर दर रुपयास ८।।· अर्धा आणा प्रमाणें घ्यावा. कलम १

वजनी जमाबंदीवर वजन कच्चें दरमणी नख्त घ्यावयाचा सिरस्ता रु।।

८-।। सुपारी
८- ताग
८-।। हलद
८-।। गुल
८।।. आले
·।· मिरे

।।=

साहा जिनस दाहा आणें नख्त घ्यावें कलम १

गला केली जमाबंदिवर दर खंडीस येन जिनस हर जिनसी गला केली ८।। अदमण घ्यावा कलम १

नारल आकार येन जमाबंदी होईल त्यास दर सदे नख्त रु।। ८।· पाव आणा घ्यावा. कलम १

वजनी जमाबंदी आकार होईल त्याजवर हक जस्ताचे सिरस्तेयानें साहा जिनसाचे आलाहिदा कलम लिहिलें आहे सिवाये हर जिनसास देखील चवाटा गौली व दालदी यांजवरील दर मणी वजन कच्चें ८८१ येक सेर प्रमाणें घ्यावें कलम १

कलम १

ईनामत वतनास आहे ते त्रीतपसील

आगर पावगेवाडी आगोडे पाखाडीस कसबे मजकुरीं आहे ते मोजणी

जमीन	लांबी	रुंदी
	३१	१७

जमीन बिघे ८१।१।।-

मौजे रावतोली ता। मक्कूर हा गांव दुरोबस्त कुल बाब कुल कानू खेरीज हक्कदार व इनामदार करून जल तरू तृण काष्ठ पाषाण निधी निक्षेपसहित वतनास इनाम कलम १

येकून जमीन सवा बिघा दीड पांड याची चतु:सीमा पूर्वेस देवसेत

जमीन मौजे उंबरसेत १	पश्चिमेस रस्ता बीदगली १
दक्षिणेस ठीकाण माहादाजी रघुनाथ बीवलकर १	उत्तरेस ठीकाण जोसी १

कलम १

देवसेत पावगेवाडीचे मूलवसास जमीन मौजे उंबरसेत ता। मजकूर पैकी भात सेत जमीन बिघे ८८४।।।-

किता	लांबी	रुंदी
	१३	७

८८।। किता

लांबी	रुंदी
३	२

८।३।। कीता

लांबी	रुंदी
१३	१३

८।।३।।।-

पैकी व जाती पांडी जमीन बिघे ८८१।।। बाकी जमीन बिघे ८।।=

यासी चतु:सीमा

पूर्वेस डोंगर मौजे उंबरसेत १	पश्चिमेस पावगे वाडी खासगत
उत्तरेस जोसी याची वाडी व चांभारसेत मौजे उंबरसेत पैकी १	ठीकाण लगत १ दक्षिणेस रस्ता मार्ग १

कलम १

३

कांहीं मतें

I only wish I knew more about this wonderful and of the splendid work you are doing. I was afraid to handle many of the old valuable, priceless, articles and I feel that you should give them all the protection possible.

6-4-32 With sincere appreciation.

JULIAN P. SCOTT, U. S. A.

It has been a pleasure to visit this important historical institution. I wish I had more time to see all its collections and work in detail.

20-6-1932. RAMANANDA CHATTARJEE.

I had the great pleasure, to-day, of visiting this institution. Its wealth of documents is simply marvellous and there is ample scope for further research. I hope that the University will soon realize what mistake has been made in not recognizing the work of this institution. The financial condition is unfortunately not as it should be. It is to be hoped that the public would soon realize the importance of the work which is being carried on here, in spite of the heavy odds; the institution ought to be on a firm foundation like sister institutions in the more advanced countries and I hope, therefore, that every success would come its way in the near future.

WRANGLER

17-7-1932. V. V. NARALIKAR.

I have had the pleasure of visiting this institution today. Messers Apte and Kale were kind enough to show me the valuable collection of manuscripts, copper-plates, coins, and inscriptions as well as other antique articles of historic importance. The whole collection is neatly arranged and exhibited and every precaution is being taken to save them from the disastrous effects of time. The institution has al-

ready a splendid building and it was indeed a pleasure to see a number of scholars pursuing their research work there. It has already established itself as one of the most important research institutions in the country. I have no doubt that the diligent and scholastic labours of the Indians in this temple of learning will throw new light on the history of Maharashtra in particular and India in general in all its different aspects. The institution deserves encouragement and patronage from the Indian public on a much larger scale than what it has been hitherto able to get. I have no doubt that the institution will redound to the glory of Maharashtrian scholarship and research aptitude and will win a place for it in the republic of letters of the civilized world.

30-9-32 M. S. ANEY.

I wish I had the needed training, knowledge and leisure to make use of and profit by this splendid collection of historical material.

BHAGAVANDAS

25-12-1932. of BENARES.

Aryabhushan Press Poona 4.

अनुक्रमणिका.

प्रसिद्ध झालें !

पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक २८

मठगांवचा शिलालेख आणि कुडाळ प्रांताचा प्राचीन इतिहास

किं. १ रु. २ आ. मंडळाचे सभासदांस १२ आ.

लवकरच प्रसिद्ध होतील.

स्वीयग्रंथमाला

A History of the late revolution in the Kingdom of Golconda.

आदिलशाही इतिहासाचे तीन साधन ग्रंथ

किंवा

१ हफ्त कुर्सी, २ तारीख–इ–अली, ३ अली–नामा.

(मराठी सारांश व टिप्पणी)

मंडळांतील नाणीं

मंडळांतील फारसी हस्तलिखित पुस्तकें

मंडळांतील हस्तलेख

पुरस्कृत ग्रंथमाला क्र. २९

पुरंदरे दप्तर भाग ३ रा

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIII] **QUARTERLY** [No. 4

(52)

March, 1933.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १३ वें] **त्रैमासिक** [अंक ४ था

(५२)

चैत्र १८५५

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन

या वर्षाचा हा शेवटचा अंक. पुढच्या वर्षी कांहीं नवीन सुधारणा करण्याचा विचार आहे. दर अंकांत कांहीं चित्रें देण्यास प्रारंभ केला आहे व शक्यतोंवर चित्रांची व प्रतिमांची संख्या वाढवावी असा मनोदय आहे.

एकविसावें संमेलन

मि. ज्येष्ठ शु. ९।१०।११ श. १८५५ शुक्रवार, शनिवार, रविवार=जून २।३।४।३३ रोजीं भरविण्याचा विचार आहे. त्यावेळीं १८५४ चा अहवाल, हिशेब, १८५५ चें अंदाजपत्र, निबंधवाचन, प्रदर्शन, चर्चा, व्याख्यानें वगैरे कार्यक्रम होईल. सर्व सभासदांनीं अवश्य यावें. जुने कागद, पत्रें, पोथ्या, नाणीं, चित्रें, वस्त्रें, शस्त्रें, पात्रें पाठवावीं. सर्व प्रकारें संमेलन यशस्वी करावें.

आषाढ शु. १ श. १८५५ म्हणजे ता. २४।६।३३ शनिवार रोजीं आपल्या मंडळाचा २३ वा वाढदिवस साजरा होईल. शिवाय त्यावेळीं साधारण सभा भरेल व संशोधनात्मक, प्रश्नात्मक, चर्चात्मक असा त्रिविध कार्यक्रम पार पडेल. सभासदांस तर अगत्याचें निमंत्रण करतों. नवीन प्रतिष्ठित पाहुणे घेऊन सभासदांनीं आल्यास मोठाच कार्यभाग उरकेल.


पत्ते—ज्यांचे बदलले असतील त्यानीं ते अगत्यवादें कळवावे.


वर्गणी—नवीन वर्ष सुरू झालें. तरी नव्या व जुन्या सभासदांनीं आपली सर्व वर्गणी सत्वर पाठविण्याचें करावें.

चैत्र शुा ९।५५

चालुक्य अरिकेसरिन


Parbhani plates of





३ B. I. S. M. Collecti


३ B






३

२ B. I. S. M. Collecti



B. I. S. M. Collection of copper-plates No. 9. Scale 1/4.



B. I. S. M. Collection of copper-plates No. 9. Scale 1/4

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १३ वें] त्रैमासिक [अंक ४ था.

१८ भावनगरके गुहिल और मेवाडके गुहिल.*

(श्री. चिं. वि. वैद्य)

महामहोपाध्याय रायबहादुर पंडित गौरीशंकर ओझाजीने रजपुतानेका इतिहास खण्ड ४ हालमें प्रसिद्ध किया है. उसमें मेवाडका इतिहास पूर्ण किया है. बहुतही महत्वकी बातें मेवाडके प्रसिद्ध घरानों-समेत दियीं हे और धर्म, समाज, वाङ्मय, वगैरह विषयोंमें बिनमोल विवेचन किया है. मेवाडके बाहर गुहिलवंशी रजपूत कुल कोनसे हैं उसका भी साद्यन्त इतिहास दिया है. भावनगरके गुहिल मेवाडके गुहिल वंशियोंमेंसे नही यह मेरा मत " मध्ययुगीन भारत " में उल्लिखित है. पंडितजीका विरुद्ध मत (यह दोनों एक है) इस ग्रंथमें उन्होंने विस्तारसे दिया है. वह मैंन पढा तथापि मैं उनसे सहमत नहीं हो सकता. इस विषयमें मेरा क्या कहना है यह पंडितजीने पूछा है यह उनकी कृपा है. अब मेरा मत क्यों नहीं बदलता यह मैं इस लेखमें विशद करता हूं.

भावनगर घरानेका पूर्वज गुहिल और उदेपूर घरानेका पूर्वज गुहिल यह भिन्न पुरुष हे इसके तरफ पंडितजीका ध्यान नही गया. एक नामके पुरुष भिन्न कुलोंमें होते हैं. भावनगरके पुराने दो शिलालेखोंसे उसके राजा गुहिलवंशी हे यह स्पष्ट होता है. यह पंडितजीका विधान ठीक है. (पृ. १३५१) परंतु यह गुहिल वंश और उदेपूरका गुहिल वंश भिन्न है. इसका स्पष्ट प्रमाण आगे दिया जाएगा. परंतु यहां यह कहना उचित

* त्रैमासिक सभा १८५४.

होगा की यह भावनगर शिलालेखोल्लिखित गुहिल उदेपूरका पूर्वज है इसका कोई निगमन दो लेखोंमें नही मिलता. एक नामसे पंडितजीकी दृष्टी उदेपूर तरफ गयी ऐसा दिखता है.

"भाटोंने भावनगरके गुहिलका शालिवाहन नामका कोई पूर्वज सुना होगा और उन्होंने दख्खणके पैठनके शातवाहनसे उसको मिला दिया. यह उनकी भूल है और भाट आपने प्राचीन कुलपरम्परा मिलाते समय कही मनमानी घडंत बातें बनाते है" यह पंडितजीका कहना मान्य है. (पृ. १३५३). दख्खणका शातवाहन शूद्र था यह निश्चय है. अर्थात् यह भावनगरके गुहिलका पूर्वज नहीं हो सकता. परंतु जो गलती भाटोंने कियी वही पंडितजीके तरफसे होती है; और वे भावनगरके गुहिल-को उदेपूरका गुहिल समजते हैं. उदेपूरका शालिवाहन गुहिलका २१ वा वंशज है (पृ. १४४९), तथा उसका पुत्र भाट नरवाहन बतलाते हैं. उदेपुरके गुहिलके वंशजोंमें नरवाहन शालिवाहनका पिता है. अर्थात् भाटोंने जो शालिवाहन लिया वह उदेपूरका गुहिलवंशी शालिवाहन विक्रम-संवत् १०३० का होनेसे अत्यंत भिन्न है. उसका सातवाहन विक्रमसे सम-कालीन है. तात्पर्य भाटोंने जो शालिवाहन सुना था वह उदेपूरका गुहिल-वंशी होना शक्य नहीं. चाहे वह कल्पित हो या सुना हुवा हो.

एक नामके दो पुरुष भिन्न है इसका निश्चय दो प्रकारसे ब्राह्मण क्षत्रियोंमें होता है. गोत्रप्रवरके तरफ पंडितजीकी दृष्टी नहीं गयी. ब्राह्मण क्षत्रियोंने अपने गोत्रप्रवरकी स्मृति कायम रखी है. श्रौतसूत्र आपस्तंबादि इ. स. पू. १५०० के करीब हुवे तबसे आज ३५०० वर्ष यह प्रथा चली है. किसी जगह नया प्रवर होनेका संशय लिया जाता है; परंतु किमान हजार वर्षमें कोई नया गोत्र नही लिया गया यह निश्चय है. राजपूत कुलोंके चौहान चालुक्यादियोंके जो शिलालेख इ. स. १००० पूर्वके मिले हैं उनमें उनके जो गोत्र दिये हैं वेही अबतक उन कुलों में पाये जाते हे. भाटोंने कई कथाएं मनघडंत बनाई हो परंतु वंशगोत्र कल्पित बनाया यह नही माना जा सकता. जो गोत्र प्राचीन कालसे चले आये हैं वेही उन्होंने लिखे हैं. भावनगरके गुहिलोंका गोत्र गौतम है और उदेपूरके गुहिलोंका बैजवाप हे अर्थात यह दो एकवंशी नहीं हैं.

वैश्योंने अपने गोत्रोंकी स्मृति सूत्रकालमें ही गमायी है और हालमें उनके गोत्रके विषयमें संशय आ सकता है. परंतु क्षत्रिय विशेषतः राजपूत

अपने गोत्रकी स्मृति प्राचीनकालसे रखते आये हैं. आपस्तंब सूत्रमें स्पष्ट लिखा है की सबका मनु एक गोत्र माना जाय. यह "तदेतत् ब्राह्मण क्षत्रियाणामन्येषामुक्तं भवति" अन्य विषय है. इसका ब्राह्मण क्षत्रियोंसे संबंध नही है. क्षत्रियोंने अपने गोत्रकी स्मृति दो हजार वर्ष तक कायम रखी है इसका सबूत शिलालेखोंमें भी मिलता है यह ऊपर कहा भी है; तात्पर्य सूत्रग्रंथ एवं शिलालेखोंमें क्षत्रियोंके गोत्र प्राचीन कालसे चले आते हैं. अर्थात् भाटोंने भावनगरके गुहिलोंको गलतीसे अन्यगोत्री मनघडंत किया ऐसा नहीं माना जा सकता. इसी सबबसे यह दो वंश भिन्न है और उनमें विवाहसंबध भी इसी कारण पूर्वकालमें हुवे हैं और आगे होनेमें कोई प्रत्यवाय नहीं जान पडता.

मेवाडके गुहिल सूर्यवंशी प्रसिद्ध है. भावनगरके गुहिल हालमें चंद्रवंशी समजे जाते हैं; तथापि वे प्राचीन समयमें सूर्यवंशी समजे जाते थे इसका सबूत पंडितजीने दिया है. "वि. सं. १५ वी शताब्दीमें गंगाधर कवि विरचित मंडलीक काव्यमें भावनगर गुहिलोंको सूर्यवंशी बतलाया है" इस काव्यमें वर्णित गुहिल भावनगरके है यह स्पष्ट नहीं है तो भी मान लिया जाय की वे सूर्यवंशी समजे जाते थे. परंतु इस वंश के सबूत से वह मेवाडके गुहिल नहीं हो सकते. सूर्यवंशियोंमें भी कई शाखाएं हैं जो आपसमें विवाह भी करती हैं. जैसे की जोधपूर और उदेपूर दोनों सूर्यवंशी भिन्न कुल है. अर्थात् यह वंश मूल सूर्यका माननेपर भी मेवाडवंशी नहीं हो सकते. और एक बात पर ख्याल करना चाहिए की सूर्यचंद्रवंश पुराणोक्त है और गोत्र प्रवर श्रौतसूत्रोक्त होनेसे अधिक निश्चयका आधार है. सिवाय सूर्यचंद्रवंशोंकी स्मृति क्षत्रियोंमें नष्ट हुई थी उसकी फेर व्यवस्था कनोजके प्रथम राजा चंद्र गाहडवालने १२ वे शताब्दीमें लगायी ऐसा स्पष्ट उल्लेख उसके लेखमें है (देखिए मध्ययुगीन भारत भाग २). अर्थात् सूर्य-चंद्रवंशकी गलती होना शक्य है. कुलका निश्चय करनेमें उसका प्रमाण विशेष बलवान नहीं है.

भिन्न कुल निश्चित करनेमें गोत्र बडा प्रमाण है. परंतु वह भी पूरा नही, प्रवरभी देखना पडता है, यह बात प्राचीन कालमें भी ज्ञात व परिचित थी. जैसे पूर्वजोंका नाम भिन्न कुलोंमें कभी कभी एक आता है वैसेही गोत्र अर्थात् ऋषिगोत्र का नाम भी कभी कभी एक दिखाई देता है. परंतु ऋषि

भिन्न प्रवरोंके है या नहीं यह देखना पड़ता है. इस तरह का व्यामोह पहले भी होता था. तब शास्त्रकारोंने यह सिद्धांत किया है की, गोत्रनाम एक हो तो भी प्रवर भिन्न होनेसे वे दो भिन्न ऋषी समझे जाए; और उनके सन्तानमें परस्पर ब्याह होनेमें कोई प्रत्यवाय नहीं. किंबहुना पाणिनीय सूत्रसे विदित होता हैं की ऐसे एकनामी परंतु भिन्न प्रवरी ऋषियोंके संतानवाची तद्धित भिन्न होते हैं. अर्थात उस वक्त इस भिन्न तद्धित रूपसेही लोग भिन्न कुल पहचानते और बतलाते थे. इससे एक सूक्ष्म बात कहने योग्य निकलती है. भिन्न वंशोंके मूलपुरुषका नाम एक होनेका प्रसंग प्राचीन कालमें भी आता था और उनका भेद उनके वंशजोंका नामतद्धितसे बताया जाता था; इसका उदाहरण अष्टाध्यायीके चतुर्थ अध्यायमें मिलता है. कपिबोधादांगिरसे (४–१–१०७) सूत्रमें यह बतलाया है की, जब कपि और बोध इन दो पूर्वजगोत्रके नामसे तद्धित होता है तब वे अगर आंगिरस प्रवरके हो तो काप्य और बोध्य होगा; परंतु अन्य प्रवरके हो तो कापेय और बौधेय होगा. इसके पूर्वसूत्रमें ब्राह्मणक्षत्रियभेदका भी एक उदाहरण दिया है " मधुबभ्रुवोर्ब्राह्मणकौशिकयोः (४-१-१०६)" 'माधव्यः ब्राह्मणः' और 'माधवः अन्यः' मधु नामका पूर्वज ब्राह्मणमें हो तो उसके वंशज माधव्य कहे जाएंगे और क्षत्रियादि अन्योंमें मधु नामके पूर्वजसे उत्पन्न हुवे वंशज माधव कहे जाएंगे. इसी तरह " बाभ्रव्यः " यह तद्धित कौशिक गोत्रियोंका होगा. अन्य गोत्रोंमे बभ्रु नामकाही मूरिस आया हो तो उसके वंशज बाभ्र कहे जाते हैं. इस प्रकारसे यहां राजपूतोंमें भी भेद किया हुवा नजर आता है. उदेपूरके गुहिलके वंशज गुहिलोत कहे जाते हैं; परंतु भावनगरके गुहिलके वंशज ' गुहिल ' नामसे ही प्रसिद्ध हैं.

तात्पर्य मेरी समझमें भावनगरका मूल पुरुष गुहिल, उदेपूरके गुहिलसे भिन्न है. गोत्र प्रवर भेदसे और वंशजोंके नाम भेदसे दोनों कुल भिन्न है. उनमें विवाहभी हुवे हैं और आगे भी हो सकते हैं.

१९ पाटगांव येथील मौनीबावांच्या मठांतील कागद.*

(श्री. गो. स. सरदेसाई)

पुढें द्यावयाचे एकवीस कागद पाटगांव येथील मौनीबावांच्या मठाचे विद्यमान संचालक व करवीर पीठाचे क्षात्रजगद्गुरु श्री. स. ल. बेनाडीकर यांनीं इतिहासप्रेमास्तव माझे हातीं दिले. ते अभ्यासकांपुढें मांडण्यास मला संतोष वाटतो. पाटगांव हें ठिकाण कोल्हापूरचे नैऋत्येस पंचावन मैलांवर सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर गांगणा ऊर्फ प्रसिद्धगड किल्ल्यापासून चार मैलांचे आंत आहे. तेथून खालीं कोंकणांत उतरण्यास रामघाट लागतो. या घाटानें पूर्वी घोडेस्वारांचें सैन्य सावंतवाडीस उतरे. पाटगांव येथें श्री. मौनीबावा नांवाचे साधू राहात असत. शिवाजीमहाराजांची त्याजवर फार भक्ति होती. महाराजांनीं व त्यांच्या पुत्रपौत्रांनीं बावांच्या मठास वेळोवेळीं उत्पन्नें करून दिलीं, त्या संबंधाने हे सर्व कागद असून अनुषंगानें त्यांत कांहीं ऐतिहासिक माहिती नमूद झाली आहे. सिंधुदुर्ग किल्ल्यांतील मंदिरांत शिवाजीमहाराजांची मूर्ति असून गाभाऱ्याचे बाहेर मौनीबावांची मूर्ति बसविलेली आहे. किल्ल्याबाहेर मालवण गांवांत बावांचें एक देवालय असून त्यांचा मुख्य मठ पाटगांवास आहे. तेथील शिष्यवर्गांतून मठाधिपतीची निवड कोल्हापूर दरबाराकडून होत असते. सन १९२० सालीं कै. शाहूमहाराजांनीं या पीठावर श्री. बेनाडीकर यांची नेमणूक करून त्यांस क्षात्र-जगद्गुरु हें नांव दिलें. इतरांप्रमाणें हे जगद्गुरु पाद्यपूजा किंवा दक्षिणा स्वीकारीत नाहींत. प्रवचनद्वारां होईल ती सेवा करितात. पाटगांव येथें मौनी बावांची भव्य समाधि असून, तेथें दरसाल रथसप्तमीपासून सहा दिवस बावांच्या पुण्यतिथीचा समारंभ होत असतो. त्यांत एकादशीस जागराचा दिवस पाळला जातो. तेव्हां तो बावांचा निधनदिवस असावा. श्रावण शुद्ध अष्टमीस बावा समाधीस बसत. तोहि दिवस उत्सवाचा म्हणून पाळला जातो. उत्सवप्रसंगीं भंडारा होत असतो; त्यास ब्राह्मणसुद्धां सर्व जातीचे लोक येत असतात. तथापि पंक्तिनिर्बंध पाळण्यांत येतो. बावांच्या शिष्यांचीं नांवें 'गिरी' संज्ञक आहेत

* २० वें संमेलन.

त्यावरून खुद्द त्यांचाही संप्रदाय 'गिरी' चाच होता असें दिसतें. सर्व शिष्य मूळचे मराठे जातींत जन्मलेले पण पुढें सन्यास ग्रहण करून गोसावी बनले. मठांतील महंतांची दीक्षा यथायोग्य पाळली जात नाहीं असें आढळून आल्यावरून करवीर दरबारनें अविवाहित राहण्याचा त्यांजवरील निर्बंध अलीकडे काढून टाकला आहे. हल्लींचे मठाधिपति वैवाहिक रितीनें राहतात. तथापि पीठावरील नेमणूक पुढें शिष्यपरंपरेनेंच चालावयाची आहे.

रामदास स्वामींनीं सह्याद्रीच्या निर्जन व निबिड गिरिगव्हरांत जसें हेळवाक हें स्थळ पसंत केलें तसेंच मोनीबाबांनीं पाटगांवचें स्थळ स्वीकारिलें. दोहोंची निसर्गरचना हुबेहूब सारखी आहे. हेळवाक ज्यांनीं पाहिलें असेल त्यांस पाटगांवची कल्पना बरोबर येईल. हेळवाक नजीक जसा भैरवगड उर्फ सारंगगड हा किल्ला आहे तसा पाटगांव जवळ प्रसिद्धगड होय. बावांच्या मठास खुद्द पाटगांवांत फारसें इनामी उत्पन्न नाहीं. कांहीं थोडी जमीन व दुकान मठास लावून दिलें आहे. परंतु जवळच दोन मैलांवरील मठगांव, सात मैलांवर वासनोळी व कोंडोसी, कापशीनजीक बाळेघोळ व रायबाग तालुक्यांतील सौंदत्ती असे पांच गांव करवीर संस्थानांतून मठास इनाम आहेत. या शिवाय निपाणी नजीकचा पांगेरें हा गांव ब्रिटिश सरकारांतून इनाम चालतो. सावंतवाडी संस्थानांतून पूर्वी पणदूर हा गांव इनाम होता त्याचें बदल्यांत हल्लीं तेथून सालीना ५० रुपये नक्त मिळतात. मिळून मठाचें सालाचें उत्पन्न १०,००० रुपये आहे.

मौनीबावा मूळचे कोण, कोठचे, याचा पत्ता लागत नाहीं. त्यांचे पीठावर पुढें मराठा जातीचे सन्याशांची निवड होऊं लागली यावरून ते मराठा जातीचे असावे असा तर्क होतो. साधूसंतांचे आशीर्वाद महत्कार्यास मिळवावे अशी शिवाजीची भावना उत्तरायुष्यांत राज्याभिषेकानंतर होऊं लागली असा अंदाज बखरींच्या उल्लेखांवरून होतो. 'छत्रपति महाराज सिंहासनाधीश्वर' अशा संज्ञेनें हिंदुपदपादशाहीचा उपक्रम त्यानें राज्याभिषेक प्रसंगानें जाहीर केला, पण त्यावेळींसुद्धां त्याचें राज्य सह्याद्रीच्या पूर्व पश्चिम भागीं शें दोनशें मैलांहून जास्त नव्हतें. खुद्द त्याच्या राजधानीजवळ जंजिऱ्याचा सिद्दी त्याजवर शस्त्र रोखून उभा होता. कर्नाटकचें पोकळ राज्य किंवा चंदीचा खवासखान ह्यांससुद्धां तुम्ही बुडवूं शकला नाहीं, मग तुमचें राज्य तें काय, असा टोमणा त्यास त्याचे कामगार देऊं लागले, तेव्हां त्यानें दक्षिणदिग्विजय करण्याचें

मनांत आणून त्याची सिद्धता चालविली असतां अनेकांनीं अनेक उपाय सुचविले. त्यांत प्रथम सिद्ध पुरुषांचा आशीर्वाद मिळवावा, त्यांचा प्रसाद न मिळेल तर अवघड काम हातीं घेऊं नये, अशी वाटाघाट स. १६७६ च्या दसऱ्यास चालू होऊन अशा अलौकिक सत्पुरुषांचा तपास त्यानें चालविला. त्यांत केळशीचे बाबा याकूत व पाटगांवचे मौनीबावा यांचीं नांवें त्यास कळलीं. 'केळशीस बावांचें दर्शनास जाऊन संकल्प करून कांहीं उत्तर आशीर्वादाचें बोलावें तों बावा याकूत उठोन चालिले. त्यांजमागें आपण हिंडों लागले. महाराज पायांशीं लागले. तेव्हां पिकला केस दाढीचा व मिशीचा बावांनीं महाराजांचे हातीं दिला. त्याचा ताईत करून घालावा, तों केस हरपला त्यावरून जंजिऱ्यास प्रयत्न लागेल असें बोलले. तदुत्तर रामदास स्वामी व परमानंद स्वामी यांचें दर्शन घेऊन विजापूरचें राजकारण राखून पाटगांवीं मौनीबावांचे दर्शनास गेले. मोरोपंतांचे हातीं चाफ्यांचे फुलांचा हार व तुरा दिला. पंचपात्री दिली. हुजऱ्यांचे हातीं नारळ व कित्येक फुलांचे जिन्नस दिले. मनांत महाराज कल्पना करून राहिले कीं, आपण चंदीचे राज्यावर जातों तर बावांनीं प्रसाद द्यावा. मनांत हा संकल्प धरून महाराज सहा तास पावेतों उभे होते. उपरांतिक पूजा केली. आपले हातीं साखरेचा प्याला घेऊन बावांचे तोंडांत साखर घातली. बावांनीं तोंडांतील उच्छिष्ट महाराजांचे हातावर दिलें आणि मोरोपंतांकडे पाहिलें. त्यांणीं फुलांचा तुरा पुढें केला, तो घेऊन बावांनीं महाराजांचे डोईवर ठेविला. हा लाभ मानून महाराज नमस्कार करून निघाले.' + हा प्रसंग स. १६७६ च्या कार्तिकांतला असावा. पुढें दक्षिण दिग्विजय संपादून आल्यावर एक महिन्यानें बावांचा शिष्य तुरतगिरी येऊन शिवाजीस भेटला. तेव्हां त्यानें ता. २-५-१६७८ रोजीं मठांतील अतीत अभ्यागतांचे भोजनासाठीं हजार माणसांचा शिधा नेमून दिला. याच स्वारींत श्रीशैल-मल्लिकार्जुनाचें दर्शन शिवाजीनें घेतलें असतां त्यास उपरति झाल्याचा प्रसंग वर्णिलेला आहे. यावरून तर्क होतो कीं, मौनीबावांच्या अलौकिक सामर्थ्याची वार्ता शिवाजीचे कानीं गेल्यावर मगच तो त्यांचे दर्शनास गेला. समर्थ रामदास स्वामींच्या भेटीसाठीं शिवाजीला अनेक रानें धुंडा-

+ म. सा. छो. ब.

ळावीं लागलीं, त्यांतलाच हा प्रकार दिसतो. बावा नेहमीं मौन धरून असत म्हणून त्यांचें नांव मौनीबावा पडलें. कार्यसिद्धि झाल्यावरही शिवाजीनें अतीत अभ्यागतांच्या भोजनापलीकडे ज्यास्त परामर्ष घेतला नाहीं, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. एकंदरींत मौनीबावा हे लोकोत्तर कोटींतले सिद्ध होत याविषयीं संशय वाटण्याचें कारण नाहीं.

मौनीबावांचे शिष्य तुरुतगिरी प्रथमपासूनच त्यांबरोबर असत. स. १६८६ त संभाजीनें त्यांची महंताचे पदावर स्थापना केली. तुरुतगिरीनींही मठाचा लौकिक संपादून त्याची वृद्धि केली व इनामें मिळविलीं. ता. ३०-५-१७२७ च्या कागदांत तुरुतगिरी हयात आहेत. त्यापुढच्या स. १७२८च्या कागदांत सबळगिरीचें नांव येतें, त्यावरून तुरुतगिरीचें पश्चात् पीठावर सबळगिरीची योजना झाली असें दिसतें. परंतु पेशवे दप्तरांत 'मठाधिपतींची परंपरा' देणारा कागद ता. २४-३-१८५२ चा गंगागिरीच्या वेळचा मिळाला, त्यांत सबळगिरीचें नांव नसून त्याऐवजीं घनश्यामगिरीचें नांव आहे. एकंदर परंपरा येणेंप्रमाणें:—

१ मौनीबावा (मृ. १६८९)—२ तुरुतगिरी (मृ. १७२८)—३ सबळगिरी—४ सोमेश्वरगिरी (१७५० ?)—५ लक्ष्मणगिरी (१७८५ त हयात)—६ बहिरवगिरी—७ गंगागिरी (१८५२)—८ भागीरथीगिरी—९ रामगिरी (मृ. १९२०)—१० क्षात्रजगद्गुरु (प्रस्तुत).

मठांतील तेवीस अस्सल कागदांच्या नकला सोबत देण्यांत येत आहेत. त्यावरून त्यांचा मतलब कळून येईलच. परंतु या कागदांचें ऐतिहासिक महत्त्व असें आहे कीं, त्यांत दोन सनदा थोरल्या शिवाजीच्या, दोन संभाजीच्या, एक राजारामाची व दोन धाकट्या शिवाजीच्या असून त्या सर्वांचे शेवटीं लेखनालंकार हीं अक्षरें वेगळ्या वळणाचीं आहेत. सनदा वगैरेंवर प्रधानांचे शिक्के यथास्थित असून त्या सर्वथैव खऱ्या आहेत. प्रत्येक पुरुषाचे लेखनालंकार एका वळणाचे दिसतात.* त्यावरून तीं अक्षरें त्या त्या पुरुषांचीं

* या बाबतींत निबंधाची चर्चा आम्ही करतांना श्री. गर्दे साई यांनी पाठविलेले व मंडळसंग्रहांतील कागद यांच्या आधारानें असें प्रत्यक्ष दाखविण्यांत आलें कीं, दोन राजपुरुषांच्या कारकिर्दींतील कागदांत एकच वळणाचा लेखनालंकार आढळतो. यावरून तीं अक्षरें राजांचीं नसून इतर कोणाचीं असावीत असें ठरतें. तो लेखनालंकार कोणाच्या हातचा हेंहि संभाजीच्या एका दानपत्रावरून निश्चित सांगतां येतें.

स्वत:चीं आहेत असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. अलीकडे सन १९२५ त श्री. राजाराम महाराजांनीं सौंदत्ती गांव श्री. क्षात्रजगद्गुरूंस इनाम दिल्याची सनद दिली आहे. तिचें स्वरूप पूर्वपरंपरेस धरून असून शेवटचीं अक्षरें खुद्द महाराजांच्या हातचीं आहेत. अर्थात् शिवाजीचें व त्याच्या पुत्रपौत्रांचीं स्वत:चीं अक्षरें या सनदांत स्पष्ट दिसून येतात. अतीत अभ्यागतांचा संतोष संभाळण्यासाठीं शिवाजीनें दरसालांत एक हजार माणसांस पुरेल इतका शिधा, तांदूळ, कणीक, डाळ व मीठ या जिनसांचा बांधून दिला (ले. १). त्याची किंमत सालाची अंदाजीं ४०० रुपये होईल. त्यानंतर २६-३-१६७९ रोजीं हरिदास, पुराणिक व मृदंगी यांचे खर्चास सालीना १८ होनांची नेमणूक बांधून दिली (ले. ३). पाटगांव येथें बावांचें वास्तव्य झाल्यापासून लावणी संचणी होऊन पेठेची भरभराट झाली. तेव्हां मठाचे खर्चास एक दुकान लावून दिल्याचा कागद आहे. त्यांत " पेठ मजकुरी सात पाच वरसे गलबलियाकरिता वसात नव्हती. हल्लीं बावा येऊन राहिल्यामुळें पेठ मामूर झाली सबब दुकान तुरुतगिरीचे हवाली करावे " असा मजकूर आहे. हा कागद पूर्वीच राजवाड्यांनीं खंड २०, लेखांक २८० म्हणून छापिला असल्यामुळें त्याची नक्कल पुढील कागदांत घेतली नाहीं. त्या कागदाची तारीख २४ मार्च १६८० असून पुढील ४ एप्रिल रोजीं शिवाजी दिवंगत झाला. साधू पुरुषांच्या वास्तव्यानें निरुपयोगी डोंगराळ प्रदेशाचें महत्त्व त्या काळीं कसें वाढे हें यावरून दिसून येतें.

शिवाजी महाराज वारल्यावर लगेच संभाजीनें पालखीचे भोई व मठांतील वाजंत्री यांचे खर्चासाठीं दरसाल सवाशे होनांची रक्कम नेमून दिली (ले. ४). ही सनद राजवाडे यांनीं खंड २०, लेखांक २८१ म्हणून छापलेली आहे. त्यापुढील लेखांक ६ चा कागद ता. ११-१०-१६८६ चा असून, त्यांत मौनीबावांच्या मृत्यूचा उल्लेख आहे. माघ शुद्ध एकादशीस मृत्यु झाला असेल तर त्याची तारीख २५-१-१६८६ समजण्यास हरकत नाहीं. तदुत्तर तुरुतगिरी गोसावी यांची नेमणूक मठाधिपतींचे जागीं संभाजीनें करून खर्चासाठीं ७०० होनांची रक्कम ठरवून दिली. या कागदावर मोरेश्वर सुत नीलकंठ असा शिक्का आहे.

ले. ५ चा कागद अनेक दृष्टींनीं बोधप्रद आहे. शिवाजीचे पश्चात् ता. ३।८।१६८२ रोजीं छत्रपति संभाजीनें मठाचे खर्चास पांचशे होनांची

नेमणूक बांधून दिली. तिचा विनियोग कसा करावयाचा याचा संपूर्ण तपशील या विस्तृत लेखांत दिलेला असून मराठशाहींत एखाद्या नमुनेदार धार्मिक संस्थेचें अंतरंग कसें असे व तिचा कारभार कसा चाले तें येथें चांगलें दिसून येतें. श्रावण शुद्ध अष्टमीस बावांची समाधितीथ होती, म्हणजे त्या दिवशीं बावा बहुधा एक महिनाभर समाधि लावून बसत, असें दिसतें. ब्रह्मेंद्रस्वामींचाही प्रघात असाच होता. श्रावण शुद्ध अष्टमी ही बावांची निधनतिथि नव्हे हें ले. ६ वरून स्पष्ट होतें.

दुसरी एक महत्वाची ऐतिहासिक बाब या कागदांत व्यक्त होते. ले. १८ व १९ हे कागद लक्षपूर्वक वाचावे. पहिल्यावर मिति नाहीं. दुसऱ्याची तारीख २०-९-१७२८ आहे. पहिल्यांत रामचंद्र नीलकंठ तुरुतगिरीस लिहितो कीं 'सबळगिरीसमागमे पत्र पाठविले' तें पोचलें. याच सबळगिरीस दुसरा कागद दौलतराव हिंदुराव घोरपड्यानें लिहिलेला आहे. रामचंद्र नीलकंठाचें हस्ताक्षर पहिल्याचे शेवटीं तीन ओळींचें येथें उपलब्ध होतें. मुद्दाम त्या कागदाचें छायाचित्र मी दाखल करीत आहे. रामचंद्र नीलकंठ आपल्या नांवापुढें ' अमात्य ' लिहीत नाहीं. नांवाच्या पुढें नारायण शब्द आहे तो महंतास वंदन करण्याकरितां आहे. मातुश्री आईसाहेब म्हणजे राजसबाई असावी, रामचंद्र नीलकंठ स. १७२८ त हयात होता, असें शंकित अंतःकरणानें म्हणतां येईल काय ? रामचंद्र नीलकंठाची मृत्युतिथि अद्यापि निश्चित झालेली नाहीं.

संभाजी महाराजांचे वधानंतर महाराष्ट्रांत धामधूम झाल्यामुळें नेमणूक पोंचत नाहीं अशी तक्रार तुरुतगिरीनें राजाराम महाराजांकडे केली. तेव्हां रोकड रक्कम नियमानें पोंचविणें अवघड वाटून, राजारामानें मठास सातशे होन उत्पन्न येणारे दोन गांव इनाम करून दिले (ले. ७). गावांची लावणी संचणी करून ही रक्कम उत्पन्न करून घ्यावी अशी राजारामाची त्यास ताकीद आहे. म्हणजे आरंभीच्या रोकड खर्चाचें रूपांतर जमिनीच्या वतनांत कसें झालें याचें येथें उत्कृष्ट प्रत्यंतर येतें. फौज बाळगण्याप्रमाणेंच मठांचा परामर्ष घेणें राजांचें कर्तव्य; परंतु खर्चास हातीं रोख पैसा नाहीं; शत्रूच्या धामधुमीमुळें मुलूख उजाड झाला, अशा स्थितींत फौजी सरदारांस तसेंच मठांस जमीन इनाम दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. इनामदार लोक जमिनीची मशागत करून तिचें उत्पन्न काढतील तेवढेंच त्यांच्या पदरांत

पडणारें होतें. राजारामानें नेमून दिलेले गांव बंद झाले, म्हणून त्याचा पुत्र शिवाजी यानें दुसरे गांव मठास नेमून दिले असें दिसतें. तसेंच कापशी-कर घोरपडे व प्रतिनिधि यांनींही आपापले जहागिरींतून इनामें करून दिलीं, त्यांचे कागद आहेत. याच भू--प्रदेशांत शाहू व ताराबाई यांचा झगडा केक दिवस चालून त्यांचा मुक्काम पाटगांवास झाला, तो प्रसंग इतिहासज्ञांस अवगत असलच. अशाप्रकारें हे सर्व कागद अभ्यसनीय असून ते मोठ्या आस्थेनें श्रींनीं प्रसिद्ध करण्यासाठीं माझे हातीं दिल्या-बद्दल, त्यांचे मनःपूर्वक जाहीर रीतीनें आभार मानून ते आतां वाचकांस सादर करितों.

---

२० पेशव्यांचे इस्लामी आप्त.*

(श्री. वि. गो. दिघे एम. ए.)

पहिले बाजीराव पेशवे यांना संगीत, नृत्य याचा बहुत शोक. यांच्या कारकिर्दीचे जमाखर्च पाहिले म्हणजे दोनचार दिवसा आड कलावंत गवई या सदराखालीं १० पासून २०० रुपयेपर्यंत रकमा खर्ची पडल्या आहेत. या नादाचें पर्यवसान मस्तानीला जवळ करण्यांत झालें. मस्तानी-पासून बाजीरावास १७३४ त जो पुत्र झाला त्याचें नांव समशेर बहादर. मस्तानीनें पेशव्यास इतकें वेड लावलें कीं, तिच्यामुळें पेशवा बेहोष राहूं लागला. त्यामुळें पेशव्याच्या खाजगी व्यवहारांत मोठा कलह माजला. दासी, कुणबिणी, नाटकशाळा, खासगी चाकरीच्या बायका जवळ बाळगणें तत्कालीन समाजाला अनैतिक वाटत नव्हतें. पण परधर्मीय स्त्री पेशव्यानें जवळ केल्यामुळें हाहाकार उडाला. शाहू महाराजांनीं मध्यस्थी करून बाजीरावास तिच्या वेडापासून निवृत्त करावें अशी चिमाजीनें विनंति केली. ही मस्तानी बाजीरावाच्या मृत्यूनंतर लगेच वारली. तिचें थडें पाबळ येथें आहे.

समशेर बहादराच्या आईसंबंधानें पेशवे कुटुंबांत जरी मोठी खळ-बळ उत्पन्न झाली तरी समशेरबहादरास सर्वांनीं आपुलकीच्या भावनेनेंच

* पा. स. ५।१८५४.

वागविलें. नानासाहेब पेशव्यानें त्यास इतर भावांप्रमाणें कोकण राजपुताना इत्यादि अनेक महत्वाच्या कामगिरींवर नेमून समशेरबहादराच्या शौर्याचा चांगलाच उपयोग करून घेतला. पानिपतच्या प्रसंगांत समशेर बहादर जखमा लागून कांहीं दिवसांनीं मरण पावला हें सुप्रसिद्ध आहे.

समशेर बहादरामुळें पेशव्याच्या घरांत एक मोठा पेच उत्पन्न झाला. कुटुंबांत वाढलेल्या या ब्राह्मण बीजाच्या स्वकीय आप्तास शक्य तोंवर आपल्या हिंदू समाजांत ठेवावा अशी बाजीरावाची इच्छा होती. पण तत्कालीन हिंदुसमाजाच्या कर्मठपणामुळें पेशव्याची इच्छा सफल झाली नाहीं. जुलमानें बाटविलेल्या मराठ्यांना स्वधर्मांत परत घेण्यासंबंधीं शाहू रोजनिशी व बाळाजी बाजीराव रोजनिशी यांमध्यें छापलेलीं पेशव्यांचीं अनेक आज्ञापत्रें आहेत. पण बाटविलेल्या ब्राह्मणास परत ब्राह्मण्य प्राप्त झाल्याचें उदाहरण नाहीं. समशेर बहादराच्या बाबतींत उपनयनादि संस्कार तर दूरच पण त्याच्या लग्नास सुद्धां प्रयास पडले असावे. याचें पहिलें लग्न १७४९ च्या वैशाखांत दलपतराव लक्षधीर संस्थान पेठ याच्या मुलीशीं झालें. पेशवे शकावलींत खालीं दिल्याप्रमाणें नोंद आहे. “ छ ५ सफर (१४।१।१७४९) समशेर बहादर बद्दल मागणी घातली लक्षधीर दलपतराव संस्थान पेठ व पुढं जाावल महिन्यांत लग्न झालें. ” लक्षधीर दलपतराव हें हिंदू नांव वाचून कुतूहलानें पेशवे रोजकीर्द चाळून पाहिली तेव्हां शकावलींतील नोंदीला चांगला पाठिंबा मिळाला. पुढें इनाम कमिशनरला सादर केलेल्या रुमालांत पेठ संस्थानचे कागद हातीं आले; त्यांत एक वंशवेली दृष्टीस पडली. या वंशवेलींतील कांहीं नांवें मुसलमानी व कांहीं हिंदू हें पाहून मी जास्तच बुचकळ्यांत पडलों. शेवटीं पेठ संबंधीं गोल्डस्मिडचा १८३९ चा रिपोर्ट, Bombay Govt. Selection Series 154 व नाशिक गॅझेटिअर यांवरून माहिती एकत्र केली तेव्हां या प्रश्नाचा खुलासा झाला. पेठची ही हकीकत मनोवेधक व प्रचलित सामाजिक प्रश्नाला उपयोगी पडेल म्हणून ऐथें सादर करीत आहे.*

नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागीं डोंगराळ मुलखांत पेठ तालुका आहे. तो पूर्वीं बागलाणच्या राज्यांत मोडत असे. १६ व्या शतकांत जाव (जावजी) पवार नांवाच्या मराठा इसमाची पेठच्या कमाविशीवर नेमणूक झाली

* एथें वंशवृक्ष वाचणें.

असतां या इसमानें आपलें पवार उपनांव सोडून दळवी ही संज्ञा स्वीकारली. दळवी म्हणजे दलपति, सेनापति, सेनानायक, म्हणजे फौजबंद कमाविसदार. जावजी दळवी याचा नातू कृष्णाजी दळवी यानें बागलाणच्या राजाचें वर्चस्व झुगारून तो स्वतंत्र राजा बनला. या कृष्ण दळवीस दोन औरस पुत्र व तीन रक्षापुत्र होते. पैकीं राम दळवी या रक्षापुत्राकडे हरसूल परगणा वगळून इतर सर्व संस्थानाचा कारभार कृष्ण दळव्यानें सोंपविला. भिक दळवी या दुसऱ्या मुलाकडे हरसूल परगणा व पेठजवळील दोन गांवें देण्यात आलीं. कुटुंबांतील सर्वांत वडील मुलगा लक्षधीर हा पंचवीस घोडेस्वारांचें पथक घेऊन बागलाणच्या राजाच्या पदरीं मुल्हेर एथें राहिला. बाप वारल्यावर लक्षधीर पेठला परत आला तेव्हां तिघेहि भाऊ संस्थानचा कारभार पाहूं लागले. भिक दळवी लवकरच निपुत्रिक वारला. १६०० पासून मोंगलाच्या स्वाऱ्या दक्षिणेंत होऊं लागल्या आणि १६३६ त औरंगजेबानें (हा त्या वेळीं दक्षिणचा सुभा होता) समस्त बागलाण मोगल छत्राखालीं आणलें. बागलाणचा भाग डोंगराळ. तेथें वारंवार कोळी बंडें उभारीत. अशा एका बंडांत लक्षधीर सामील झाला आणि मोगलांच्या हातीं लागला. औरंगजेबानें लक्षधीर, त्याची बायको व मुलगा कुकाजी व भाऊ राम दळवी या सर्वांची रवानगी दिल्लीस केली. सतत तीन वर्षें मोगल सैन्यास त्रास दिल्यामुळें बादशहानें या बंडखोरास मृत्यूची शिक्षा सुनावली. दैवानें यावेळीं या कैद्यांना हात दिला. बादशहाची लडकी दम्यानें अत्यवस्थ असतां राम दळव्यानें तिला खडखडीत बरी केली. यामुळें सर्वांची शिक्षा कमी होऊन लवकरच सर्वांनीं जेव्हां मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली तेव्हां त्यांची मुक्तता करून पेठ संस्थान साहनक म्हणून या भावास बहाल करण्यात आलें व त्यांची दक्षिणेंत रवानगी झाली. राम दळव्याचें नांव अब्दुल रहीम असें ठेवण्यांत येऊन लक्षधीर दलपतराव यास अब्दुल मोमीन हा नवीन अवतार प्राप्त झाला.

राम दळवी मुसलमान झाला तरी त्याची बायको व दोन लहान-मुलें रतन व लखम दक्षिणेंत राहिल्यामुळें त्यांच्यावरील धर्मांतराचें गंडांतर टळलें. दक्षिणेंत आल्यावर लक्षधीरला राखेपासून चिमणाजी व नानूमिया असे दोन मुलगे झाले. आपल्या मृत्यूनंतर संस्थानचे दोन विभाग करून

निम्मा मुसलमानी संततीस मिळावा व निम्मा हिंदू संततीस मिळावा अशी दोघा भावांनीं व्यवस्था केली; पुढें कोळ्यांशीं झालेल्या झटापटींत लक्षधीर व राम दळवी हे मोहाडी एथें मारले गेले व दोघांनीं एका थडग्यांत विश्रांति घेतली. भावाभावांचा कलह मिटवावा म्हणून कुकाजीनें आपला चुलत भाऊ रतन याचा मुलगा हरिसिंग यास इस्लामी धर्माची दीक्षा देऊन दत्तक घेतलें. कुकाजी नंतर त्याचा धाकटा भाऊ चिमणाजी हाच सर्व संस्थान बळाकाऊन बसला व मुसलमान झालेला हरिसिंग बापाकडे परत आला. रतन आपल्या बायकामुलांस घेऊन त्याचे नातेवाईक ठोके यांच्याकडे आभोणें एथें जाऊन राहिला. चिमणाजीचा मुलगा लक्षधीर बापाच्या मृत्यूनंतर गादीवर आला व रतनसिंगाचा दुसरा मुलगा मोहन यास अर्धा भाग देण्याचें कबूल करून आपले जवळ बोलाविलें.

या लक्षधीर चिमणाजीची मुलगी नानासाहेब पेशव्यानें समशेर बहादरास केली. मूळचे मराठे पवार असून बाटविले गेले तरी त्यांचीं नांवें, राहणी वगैरे हिंदू पद्धतीची होती असें दिसतें. हिंदूधर्मांत राहिलेल्या दळवी वंशाचे संबंध आभोण्याचे ठोके—मानाजी फाकडे इत्यादि इतिहासप्रसिद्ध कुटुंबांशीं आल्यामुळें या कुटुंबाच्या मूळ जातीविषयीं संशयच राहात नाहीं. अगदींच मुसलमान घराण्याशीं संबंध करण्यापेक्षां हा संबंध पेशव्यास ज्यास्त श्रेयस्कर वाटला असावा.

इ. १७२४ पासून पेठचा वसूल पिलाजी जाधवाच्या मार्फत जमा झाला आहे यावरून पेठच्या बाजूचा कारभार पिलाजीकडे सोपविला असून त्याच्याच मध्यस्थीनें हें लग्न जुळलें असें अनुमान काढलें तर तें अगदीं चुकीचें ठरणार नाहीं. समशेरबहादराच्या या पत्नीचें पुढें काय झालें याबद्दल इतिहास अद्याप मुग्धच आहे. बहुधा ती लवकर वारली आहे. कारण १७५४ मध्यें समशेरबहादराचें दुसरें लग्न एका मुसलमानी कुटुंबांतील मुलीशीं करण्यांत आलें. हिला अली बहादर नांवाचा पराक्रमी पुत्र झाला. त्यानें बांद्याकडे पराक्रम गाजविला याबद्दल तो मुलूख व बांद्याचा नबाब हा किताब देऊन नाना फडणीसानें त्याचा मोठा गौरव केला.

दळवी कुटुंबाचें थोडेसें पुढील वृत्त देऊन ही हकीकत संपवितों. लक्षधीर चिमणाजीनें बोलाविलेला रतन, कोळ्यांशीं झगडतांना मारला

गेला. त्याचा मुलगा पर्वतसिंग अडीच वर्षांचें लहान अजाण मूल असलेमुळें लक्षधीर चिमणाजीनें मुलाच्या नांवानें अर्धा हरसूल परगणा व त्याच्या आईस तीन गांव लिहून दिले. वयांत येईपर्यंत हिंदु पर्वतसिंग आपल्या मुसलमान चुलत्याकडे होता. मध्यंतरीं लक्षधीर मरण पावला व पर्वतसिंग अठरा वर्षांचा झाल्यावर त्यानें आपल्या वाटणीची मागणी करतांच चिमणाजी लक्षधीरानें त्यास धुडकवून लावलें. पर्वतसिंगानें आपली तक्रार माधवराव पेशव्याकडे नेली. दोन्ही पक्षांस पुण्यास बोलावून चौकशी करून पर्वतसिंगास अनुकूल असा न्याय पेशव्यानें दिला. यासंबंधीं पारसनीसांनीं प्रसिद्ध केलेल्या "पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती" मध्यें आज्ञापत्रें आहेत. पर्वतसिंगास पेठ एथील मुसलमान पक्षानें चैन पडूं दिलें नाहीं. त्याची दोन तीन वर्षांत उचलबांगडी करण्यांत आली. इ. स. १७७९ मध्यें लक्षधीर चिमणाजीनें कर्जाऊ घेतलेली रकम परत देण्याचें नाकारल्यावरून नाशिकचा सुभा धोंडो महादेव यानें चिमणाजीस कैद करून पुण्यास पाठवून पेठ जप्तींत आणलें. ११ वर्षांनीं चिमणाजीची सुटका झाली. चिमणाजीचा मुलगा लक्षधीर दुर्वर्तनी निघाला; तरी पण त्यानें इ. १८१६–१७ त त्रिंबकजी डेंगळयाविरुद्ध इंग्रजांस मदत केल्यावरून त्याचें संस्थान कायम ठेवण्यांत आलें. हा लक्षधीर निपुत्रिक वारला तव्हां गोल्हस्मिडनें चौकशी करून संस्थान जप्त करावें असा अभिप्राय दिल्यावरून इ. १८३५ च्या सुमारास पेठ नाशिक जिल्ह्यांत समाविष्ट झालें. लक्षधीरची मुलगी नूरजहान व भावजय सूरजकुवर यांनीं आपणांस कांहीं भाग मिळावा म्हणून कमिशनरकडे बरीच खटपट केली. तसेंच पर्वतसिंगाचा मुलगा नीलकंठराव याची सुद्धा पेठ आपणास मिळावें म्हणून प्रयत्न चालू होते; पण या पैकीं कोणत्याहि पक्षास यावें तसें यश आलें नाहीं. कमिशनरनें थोडेंसें पेन्शन या लोकांस मंजूर केलें. त्यावरून असंतुष्ट होऊन कीं काय नीलकंठरावचा मुलगा भगवंतराव उर्फ भाऊ राजा यानें १८५७ त बंडाच्या वेळीं कोळयांस उठविलें. यामुळें बंडखोरीच्या आरोपावरून त्यास फाशीं देण्यांत आलें.

- कृष्ण भिक दळवी
  - राम उर्फ (रक्षापुत्र) अबदुल रहीम
    - रतन (हिंदु)
      - मोहनसिंग
        - पर्वतसिंग
          - नीळकंठराव
            - भगवंतराव उर्फ भाऊराजा बंडांत भाग घेतो.
          - हिंमतराव (मानाजी फाकड्याचा मेव्हणा)
      - हरिसिंग
    - लखम (हिंदु)
  - भिक
    - ०
  - लक्षधीर दलपतराव उर्फ अबदुल मोमीन
    - कुकाजी (मु.)
      - हरिसिंग (दत्तक)
    - नानू मिया (मु.)
    - चिमणाजी (मु.)
      - दुसरा लक्षधीर
        - चिमणाजी दलपतराव
          - तिसरा लक्षधीर
            - नूरजहान
          - दौलतराव
            - स्त्री सूरजकुवर

२१ गुणी ब्राह्मण हरकाऱ्यांच्या शंभर जोड्या*

(प्रो. द. वा. पोतदार.)

पुढील कागद मोठा मनोरंजक व बोधप्रद आहे. त्यावरून सरकारी हरकारगिरीच्या कामावर ठेवावयाच्या माणसाचे अंगीं कोणते गुण लागत आणि त्यांची प्रतवारी कशी लावावी त्याचें दिग्दर्शन होतें. उत्तम—मध्यम-कनिष्ठ अशी प्रतवारी सांगितली आहे. भाषाज्ञानामध्यें कोठेंहि फारसी, ऊर्दू, किंवा इंग्रजी, फ्रेंच यांचा उल्लेख नाहीं. मंडळी द्राविड, दक्षिण देशीच्या कार्याची या अभिप्रायानें बंगाली गुजराथी वगैरे भाषाहि गुण-समुच्चयांत दाखल नाहींत. परंतु औत्तर्य कार्यासाठीं प्रसंगानुरोधाप्रमाणें त्या त्या भाषांचें ज्ञान अपेक्षित समजावयास पाहिजे. रजपुती, रांगडी वगैरे बहुत भाषांचा संबंध त्यावेळीं येत असला पाहिजे. कागदांत अविधी म्हणजे भाषेंत आली आहे ती अयोध्या प्रांतांतली किंवा अविधी—मुसल-मानी असे अर्थ संभवतात.

श्री.

यादी ब्राह्मण हरकारे ज्या कार्यास पाठवावयाचे ते कार्य युक्तीने करून येणार त्याचे गुण

१ उतम गुणाचे
  ४ किंचित विद्या
    १ वैदिक
    १ वित्पती
    १ जोतिशी
    १ गायन

    ४
  ५ भाशा
    १ द्रावीड
    १ तेलंग
    १ कर्णाटकी

१ वेश नानाप्रकारचे धरून कार्य करून येणार
१ शरीरे करून द्रुढ
१ युध्य समई बातमी आणणार

धीरवंत
१ मध्यम गुणाचे
१ किचित वैदिक
५ भाशा
१ आक्षरे दोन तीन लिहिणार.
१ शरीरे करून द्रुढ
१ चतुर

---

* २२ वा. वाढदिवस

१ आविधी
१ मराष्ट्र

५

६ आक्षरे लिहिणार
२ द्रावीड
१ मोड
१ बालबद्

२

१ तेलग
१ कानडे
२ मराष्ट्र
१ मोड
१ बालबद्

२

६

१ वेश नानाप्रकारचे धरून कार्य करून येणार
१ युध्य समई धीर धरून बातमी आणिनार
१ कनिष्ठ गुणाचे
१ भाशा तीन च्यार
१ आक्षर येक लिहिणार
१ चतर
१ वेश नानाप्रकारचे धरून कार्य करून येणार

३

येणेप्रमाणे उत्तम मध्यम कनिष्ठ ब्राह्मण हरकारे यांचीं शंभर जोडी ठेवावयाची आज्ञा केल्यास पूर्वी चंद्रावरच्या राज्यांत हरकारगिरीचें कार्य केलेले ब्राह्मण विश्वासू चतुर सर्व गुणसंपन्न या देशी दाहा वर्ष आहेत देशास ही येत जात असतात त्यास त्याचे मंडलीचे ब्राह्मण ही आहेत ते शंभर जोड्या ठेउन सर्दारगिरी वागउन सरकारचे कार्य करावया योग्य शत्रूच्या राज्यांत ब्राह्मण जागांजागा ठेउन वरच्यावर बातम्या आणविल्या पाहिजेत अशास खर्च ही फार लागेल तो ही श्वीकार्ल्यास सरकार चाकरी करून दाखवावयास मंडली सुधा सिध आहेत.

---

२२ दाभाडे यांचा पोवाडा व त्याचें सत्यत्व.*

(श्री. ग. ह. ओक.)

महाराष्ट्रांतील मराठ्यांचा इतिहास जरी तत्कालीन राजलेखकांकडून सुसंगत असा लिहिला गेला नसला तरी तो अनेक रूपांनीं वास्तव्य करीत

* पा. स. १०।१८५४

आहे. त्यामध्येंच पोवाड्यांची गणना करितां येईल. डभईच्या लढाई-संबंधानें सत्य व विस्तृत अशी माहिती आजपर्यंत तरी उपलब्ध नाहीं. पेशवे–दप्तरांतील आजतागायत जो पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे त्यांत दाभाड्यांसंबंधाची हकीगत बाराव्या भागांत पत्रव्यवहाररूपानें जरी बरीच प्रसिद्ध झाली आहे तरी तीपासून सुसंगत असा इतिहास बनवितां येत नाहीं. अद्याप त्यासंबंधीं बरींच साधनें उपलब्ध झालीं पाहिजेत. दाभाड्यांच्या घराण्यास आज जें महत्व प्राप्त झालें आहे त्यास त्यांचे पराक्रम अथवा त्यांनीं कांहीं महत्वाचीं राजकारणें केलीं हें कारण नसून एकाच राज्यांतील दोन महत्वाच्या सरदारांचे कलह हें होय. कलहाच्या कारणांची मीमांसा करण्याचें हें स्थळ नसून ह्या कलहानें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा शेवट त्यांच्यांतील लढाईमुळें झाला त्या लढाईची माहिती देणारा पोवाडा विश्वसनीय आहे हें येथें दाखवावयाचें आहे. मल्हारदास नांवाच्या शाहिरानें डभईच्या लढाईवर केलेला पोवाडा रा. य. न. केळकर यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्या पोवाड्यांत डभईच्या लढाईचें तपशीलवार वर्णन दिलें आहे. त्यांत कांहीं ठिकाणीं कालाचा उल्लेख, त्रिंबकराव डभईस ज्या मार्गानें गेला तो मार्ग, जातांना त्यानें केलेलीं कृत्यें, त्यानें सामील करून घेतलेल्या सरदारांचीं व बाजीरावसाहेब पंतप्रधान ह्याच्या सरदारांचीं नांवें व डभई ह्यांसंबंधीं विस्तृत वर्णन केलें आहे. ह्याची उपलब्ध माहितीशीं तुलना करून तो पोवाडा ऐतिहासिक सत्यतेच्या कसोटीस कितपत उतरतो हें पहावयाचें आहे.

पोवाड्यांतील तपशील.

त्रिंबकराव गुरुवारीं तळेगांवाहून निघाला. इंदुरीवर तीन दिवस मुक्काम केला. नंतर वडिलांचें श्राद्ध केलें. तेथून तो डहुराळ गेला. शाहूनें उमाबाईकडे बनवंतराव याम पाठवून कळवून कणप बद्दल तळेगांवास न सोडण्याबद्दल हुकुम केला. नंतर सेनापती नारदगांवीं (नारायणगांव असावें) गेला. तेथून तो वसईजवळील घारावर गेला. तेथून तो संगमनेरास आला व तेथें त्यास तुरुकताजखान भेटला. नंतर तो कोंकण खेड्याची बारी उतरला. तेथें त्यास गईबखान पठाण आडवा आला. तेथून तो गीरनदीवर आला.*

---

*औरंगाबादजवळ बोर व गिरजा अशा दोन नद्या आहेत. संगमनेर व औरंगाबाद ह्यांच्या दरम्यान बोरनदी आहे व वेरूळ औरंगाबाद ह्याच्यापलीकडे गिरजानदी आहे. तेव्हां उल्लेखिलेली नदी बोर असावी.

ह्या गीर नदीवर त्यास निजामाकडील जासुदांनीं निजामाचें पत्र दिलें तेव्हां तो त्यास भेटावयास गेला. निजामानें त्यास हत्ती, घोडे, जवाहीर व पोषाख नजर केला. निजामाजवळ त्यानें सैन्याची मदत मागितली तेव्हां त्यानें कुंवरबहादर ह्याजबरोवर पठाणी फौज दिली. ह्याच ठिकाणीं त्यास मानसिंग हाके व चिमणाजी दामोदर हे येऊन मिळाले. तेथून तो ताहराबादेवर गेला व असे मुक्कामावर मुक्काम करीत करीत तो घाट उतरला. येथें त्यास उदाजी पवार, आनंदराव पवार, मलजी पवार हे येऊन मिळाले. पिलाजी गायकवाडहि येथेंच येऊन भेटला. नंतर तो मांडवीस गेला व तीस वेढा दिला. दुर्जनसिंगानें मांडवीचा किल्ला मंगळवारीं खालीं केला व तो किल्ला दाभाड्यानें देवजी ताकपीर यास दिला. नंतर त्यानें मांडवीच्या खाडीवर असलेल्या फुलवाडी गांवीं मुक्काम केला. तेथें शिमगा साजरा केला. नंतर नर्मदा उतरून त्यानें कर्णालवर मुक्काम केला. ह्या ठिकाणीं त्याच्या डेऱ्यावर अमावास्येच्या दिवशीं रात्रीं तारा पडला. पाडव्यास तेथून मुक्काम हलवून तो डभईस आला तेथें बाजीरावाचे जासूद पत्र घेऊन आले. त्यानें पत्र वाचलें व लढाईची तयारी केली. दोन दिवस लढाई झाली. नंतर डेऱ्यास परतून आला. पुन्हां लढाईस गेला. तुंबळ व घनघोर रणसंग्राम झाला व गुरुवारीं त्रिंबकराव लढाईत पडला.

सेनापतीच्या बाजूस असलेले सरदार:— (१) सुशिंग भोसले, (२) जावजी दाभाडे, (३) यशवंतराव दाभाडे, (४) सवाई बाबूराव दाभाडे, (५) अमृतराव निंबाळकर, (६) कुंवरबहादर, (७) मानसिंग हाके, (८) चिमणाजी दामोदर, (९) उदाजी पवार, (१०) आनंदराव पवार, (११) मलजी पवार, (१२) पिलाजी गायकवाड, (१३) बलोजी हरपाळ व (१४) देवजी ताकपीर. ४० हजार स्वार

पेशव्याकडील सरदार:— (१) चिमाजी आप्पा, (२) पिलाजी जाधव, (३) भिकाजीराव शिंदे, (४) राणोजी शिंदे, (५) भावसिंग ठोके, (६) नारायणजी ढमढेरे.

त्रिंबकराव दाभाडे, होनाजी साठे, मलजी पवार, त्रिंबकराव जगताप, जावजी दाभाडे, संताजी मोहिते, उमाजी वेलदार, लुमाजी महाडिक, सयाजी गायकवाड, गोरेखान पठाण, बडेखान पठाण, ब्राह्मण बापू पंडित, चिमणाजी दामोदर, उदाजी व आनंदराव पवार पडले.

येणेंप्रमाणें पोवाड्यांतील डभईच्या लढाईचा तपशील आहे. या पोवाड्यांत (१) गुरुवारीं तळेगावांवाहून निघाला. (२) इंदुरीवर तीन दिवस डेरे दिले. (३) वडिलांचें श्राद्ध केलें. (४) दुर्जनसिंगानें मंगळवारीं किल्ला खालीं केला. (५) फुलवाडीवर शिमगा साजरा केला. (६) कर्णालवर मुक्काम असतांना डेऱ्यावर अमावास्येच्या दिवशीं रात्रीं तारा पडला. (७) डभईस जाण्यासाठीं पाडव्यास डेरे हालविले. (८) पहिल्या प्रथम डभईस दोन दिवस लढाई. (९) तिसऱ्या दिवशीं लढाई झाली नाहीं, डेऱ्यासच राहिले. (१०) गुरुवारीं लढाई होऊन दाभाडे पडले इतके कालाचे उल्लेख आहेत. प्रथम हे दिलेले काल कोणते आहेत हें निश्चित ठरवूं.

(१) तळेगांवाहून गुरुवारीं निघाला व (२) इंदुरीस तीन दिवस डेरे दिले. ह्या उल्लेखांवरून कालाचा निर्णय होत नाहीं. तिसरा उल्लेख वडिलांचें श्राद्ध केलें असा आहे. ह्याचा निर्णय झाल्यास पहिल्या दोन उल्लेखांचा निर्णय होईल. वडिलांचें श्राद्ध म्हणजे खंडेराव दाभाडे यांचें श्राद्ध. खंडेराव दाभाडे यांची मृत्युतिथि निश्चित नाहीं. शके १६५१ म्हणजे सन १७२९ सालीं तो मरण पावला असें बहुतेक इतिहासलेखकांचें मत आहे. रियासतींत ता. १५-५-१७२९ नंतर खंडेराव मृत्यु पावला असें म्हटलें आहे. तारीख १५ मे १७२९ हीच मृत्युतिथि मी धरिली आहे. १५ ५ १७२९ ही तारीख शके १६५१ वैशाख वद्य १४ गुरुवारीं येते. म्हणजे त्याचें वर्षश्राद्ध शके १६५२ वैशाख वद्य १४ सोमवार ता. ४-५-१७३० रोजीं येतें. त्याच्या आधीं तीन दिवस म्हणजे ता. १, २ व ३ मे सन १७३० शुक्रवार, शनिवार व रविवार असे तीन दिवस तो इंदूरीवर होता. तो गुरुवारीं तळेगांवाहून निघाला असा उल्लेख पोवाड्यामध्यें केला आहे तो वरील विवरणावरून बरोबर आहे असें सिद्ध होतें व स्वारीचा आरंभ शके १६५२ त झाला हें निस्संशय आहे. खंडेरावाची मृत्युतीथ जरी बदलली तरी पुढील कालाच्या निर्णयांत तफावत पडणार नाहीं. चवथा उल्लेख दुर्जनसिंगानें मंगळवारीं मांडवीचा किल्ला खालीं करून दिला हा आहे. ह्यावरून काल निश्चित होत नाहीं. ह्यासाठीं पांचव्या उल्लेखाचा म्हणजे फुलवाडीवर शिमगा साजरा केला ह्याचा निर्णय केला पाहिजे. शिमगा साजरा करण्यास फाल्गुन शु ॥ १५ पासून आरंभ होतो. म्हणजे फुलवाडीवर तो शके १६५२ फाल्गुन शु॥ १५ शुक्रवार ता. १२-३

१७३१ ला होता. त्याच्या आधीचा व नजीकचा मंगळवार शके १६५२ फाल्गुन शु॥ १० ता. ९-३-१७३१ ला पडतो. म्हणजे मंगळवार रोजीं मांडवी घेतली हा वाराचा पोवाड्यांतील उल्लेख बरोबर ठरतो. अशा तऱ्हेनें चवथ्या व पांचव्या उल्लेखांचा काल आपण कायम केला. सहावा उल्लेख अमावस्येस रात्रीं डेऱ्यावर तारा पडला व सातवा डभईस जाण्यासाठीं पाडव्यास तळ हलविला असे आहेत. ह्यांच्या मित्या व तारखा अनुक्रमें शके १६५२ फाल्गुन अमावस्या शुक्रवार ता. २६-३-१७३१ व शके १६५३ चैत्र शु॥१शनिवार ता.२७।३।१७३१ अशा होतात. आतां ८, ९, व १० या म्हणजे खुद्द डभईच्या लढाईच्या उल्लेखांसंबंधीं विचार करूं. सातव्या उल्लेखांत डभईस जाण्यासाठीं पाडव्यास म्हणजे शके १६५३ चैत्र शु॥ १ शनिवार ता. २७-३-१७३१ ला मुक्काम हलविला असें आहे. गुरुवारीं डभईची शेवटची लढाई होऊन तींत दाभाडे पडला. त्याच्यापूर्वीं दोन दिवस लढाई दिली.तिसऱ्या दिवशीं डेऱ्यास परत आला. चवथ्या दिवशीं गुरुवारीं तो लढाईंत पडला. म्हणजे तो ता. २८-३-१७३१ रविवारीं डभईस पोहोंचला. ता. २९ व ३० मार्च १७३१ सोमवारीं व मंगळवारीं लढाई झाली.बुधवारीं ता.३१-३-१७३१ ला डेऱ्यास परत आला व गुरुवारीं तारीख १-४-१७३१ ला पुनः लढाई होऊन तींत तो पडला. डभईच्या लढाईची मिती व तपशीलवार हकीगत पे. द. भा. १२ प. ४६ ह्यांत आली आहे. पत्राची ता. २-४-१७३१ आहे व लढाईची ता. १-४-१७३१ गुरुवार अशी आहे. "राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे सेनापती, बांडे, गाइकवाड, उदाजी पवार व निजामन मुलुखाची फौज येसी डबईस आली. आम्हीही डबईनजिक आपले फौजेनसीं दो कोसावरी दोन रोज मुक्काम केला. नित्य सेनापती कोसावरी येऊन युद्धास उभे रहात. तेथें युद्धास न बने यास्तव छ ४ सवाली कूच करून थाई प्रा डबई येथें आलों. सेनापती कुल फौज जमा करून युद्धास आले." हें पत्रांतील लढाईचें वर्णन कालानुक्रमें पोवाड्यांतील वर्णनाशीं जुळतें आहे. तेव्हां पोवाड्यांतील कालाचे उल्लेख ऐतिहासिक दृष्ट्या खरे असले पाहिजेत असें धरून चालण्यास हरकत नाहीं.

आतां पोवाड्यांतील निर्दिष्ट काल व स्थलें ह्यांची प्रस्तुत विषयासंबंधीं उपलब्ध असलेल्या कालांशीं व स्थळांशीं तुलना करूं. प्रथम हें

सांगितलें पाहिजे कीं, उपलब्ध माहिती अत्यंत अपूर्ण व त्रुटित आहे. पोवाड्यावरून दाभाडे यांनीं ता. ३०-४-१७३० ला तळेगांव सोडलें ते इंदुरी, नारदगांव (नारायणगांव) ह्यांवरून धारावीस आले असें दिसतें. याच सुमारास पेशव्यांचा कल्याणचा कमावीसदार वासुदेव जोशी चिमाजी आप्पास लिहितो "दाभाडियाचा उपद्रव मावळ्यास बहुत लागला आहे. सांप्रत वर्तमान ऐकितों कीं, दाभाडे फौज कल्याण भिवंडी प्रांतांतून कोलवण फिरंगण प्रांते पाठविणार आहेत.' ह्या पत्रास ३०-१-१७३० ही तारीख देऊन तिच्यापुढें प्रश्नचिन्ह केलें आहे. (पे. द. १२-३६) ह्यांतील जुन्नर मावळास झालेला उपद्रव व कोंकणप्रांतीं जाण्यासंबंधीं भविष्य हे उल्लेख पोवाड्यांतील वस्तुस्थितीशीं जुळते आहेत. परंतु कालासंबंधीं तफावत आहे. कदाचित् दाभाड्याच्या लोकांनीं जुन्नर मावळ्यास ता. ३०-१-१७३० च्या आधीपासून ही उपद्रव देण्यास सुरवात केली असेल व त्याचवेळीं कोंकणांत जाण्यासंबंधाचा दाभाड्यांचा बेत वासुदेव जोशी यास अगाऊ कळला असल्याचा संभव आहे. म्हणून तो त्यानें चिमाजी आप्पास ता. ३०-१-१७३० रोजीं कळविला. ह्यांत विसंगतता दिसत नाहीं. अशाच प्रकारची भीति वासुदेव जोश्यानें पे. द. भा. १७ प. ११२ ह्यांत प्रदर्शित केली आहे. ह्या पत्रावर तारीख मुळींच नाहीं. परंतु हें पत्र ता. ३०-४-१७३० च्या पूर्वीचें व ता. ३०-१-१७३० च्या नंतरचें असलें पाहिजे. या पत्रांत " राजश्री कृष्णराव व दुर्जनासिंग यास प्रांत मांडवीच्या बंदोबस्तास पाठविलें ऐसें येकिलें त्यास ते कल्याण भिवंडी प्रांते उतरले तरी दाभाडियाची फौज कदाचित् त्याचे पाठीवर उतरली तरी या प्रांतास उपसर्ग लागेल तरी उभयतांस नासिकाकडून त्या मार्गें रवाना करावें " असें वासुदेव जोशी लिहितो. दुर्जनासिंग कदाचित् वासुदेव जोशाचें पत्र येण्याचे अगोदरच कोंकणांत उतरला असावा व दाभाडेहि त्याच्या मागोमाग धारावीपर्यंत पोवाड्यांतील उल्लेखाप्रमाणें गेला असावा. ह्यावरून पोवाड्यांतील उल्लेख खरा नसावा असें मानण्याची जरूरी नाहीं हें उघड आहे.

यानंतर दाभाडे संगमनेरास गेला. संगमनेरास कोणत्या मार्गानें गेला ह्याचा खुलासा पोवाड्यांतहि नाहीं व पेशवे दप्तरांतील पत्रांतही नाहीं. पण मला असें वाटतें कीं, तो त्रिंगलवाडी, त्रिंबक, नासिक ह्या मार्गें संगमनेरास गेला. तसेंच वाटेंत बहुतेक ठिकाणच्या मुसलमान व मराठे

सरदारांनीं त्याचा पराभव केला अशा प्रकारचे उल्लेख पेशवे दप्तरांत आहेतही. परंतु त्यांच्या मित्यांसंबंधीं संशय असल्यामुळें हा मुद्दा सोडून देत आहे. असो. तो संगमनेराहून बारी ओलांडून गीर नदीवर निजामास भेटला. पण तत्पूर्वी बारी ओलांडल्यावर त्यास गईबखान पठाण आडवा आला. या वृत्तासंबंधीं पेशवेदप्तर मुग्ध आहे. निजामास भेटण्या संबंधानें मात्र पे. द. भा. १० प. ६० ते ७५ यांत बरीचशी हकीगत आली आहे. पे. द. भा. १२ प. २९ ह्यांत चिमाजी आप्पानें केलेला उल्लेख चिंतनीय आहे. त्यावरून त्रिंबकराव दाभाडे व निजाम ह्यांची भेट झाली असली पाहिजे व त्रिंबकरावाचें सेनापतीपदही शाहूनें कदाचित् काढून घेतलें असावें असें वाटतें. ह्या पत्राची तारीख १२–११–१७३० आहे. ह्यांत चिमाजी लिहितो, " जर ते (दाभाडे) निजामास जाऊन भेटले तर परिच्छिन्न त्यांचा हुद्दा दूर करावा येवढी गोष्ट मात्र राजश्रींशीं खरी करून ठेवून सनदा देतील त्या मान्य कराव्या." ह्यावरून त्रिंबकराव दाभाडे निजामास भेटणार होता ह्याचा सुगावा चिमाजी आप्पास लागला असावा. पे.द.भा.१०प.७२ ता. १–११–१७३० पुरवणी ह्यांत पेशव्यांचा निजामाकडे असलेला वकील गणेश बल्लाळ बाजीरावास लिहितो कीं, " बांडे व दाभाडियाचीं पत्रें गयासखानजीच्या विद्यमानें (निजामास) आलीं होतीं. " ह्यावरून पोवाड्यांतील दाभाडेनिजामाच्या भेटीचा उल्लेख खरा आहेसें वाटतें. आतां या भेटीच्या कालासंबंधीं विचार करूं, चिमाजी आप्पाचें वरील पत्र ता.१२–११–१७३० चें आहे. ता. १८–११–१७३० रोजीं, " अमित्र उभयतां खोपलीकडे गेले " (पे.द.भा. १२प.४०) असें होळकर लिहितो.* ह्यावरून दाभाडेनिजाम भेट वरील दोन तारखांच्या दरम्यान झाली असली पाहिजे. ह्या ठिकाणीं चिमणाजी दामोदर दाभाड्यास सामील झाला असा पोवाड्यांत उल्लेख आहे- " राजश्री चिमणाजी दामोदर येथें आले आहेत " असा निर्देश पे. द. १०–३६ मध्यें गणेश बल्लाळ करतो. या पत्रावर मिती नाहीं. परंतु पत्रांतील मजकुरा-वरून तें ह्याच सुमाराचें असावेसें वाटतें. ह्या भेटींत निजामानें आपलें सैन्य दाभाड्याबरोबर दिलें असा उल्लेख पोवाड्यांत आहे. निजामाचें सैन्य दाभाड्याच्या सैन्यांत सामील होण्यापूर्वींच बाजीरावानें दाभाड्याच्या सैन्यावर हल्ला करून त्याचा मोड केला असें बहुतेक इतिहासलेखक

* खोपली खेडें नवापुराजवळ आहे.

वर्णन करितात. परंतु बाजीरावानें पे. द. १२प.४६ त दाभाड्याचें व निजामाचें सैन्य एकत्र असल्याचा उल्लेख केला आहे. ह्यावरून पोवाड्यांतील निजामानें दाभाड्याच्या मदतीस त्याचें स्वतःचें सैन्य दिलें हा उल्लेख विश्वसनीय ठरतो. चिमणाजी दामोदर पाडाव झाले हा उल्लेख बाजीरावानें वरील पत्रांत केला आहे. अर्थात् तो व पोवाड्यांतील उल्लेख जुळते आहेत. ह्यानंतर दाभाडे ताहराबादेस गेला. ताहराबाद बागलाण तालुक्यांत मुल्हेरजवळ आहे आणि पूर्वीं गुजराथेंत व खानदेशांत याच मार्गानें जात असत. ताहराबादेचा उल्लेख पोवाड्याशिवाय इतरत्र नाहीं. ताहराबादेवरून पुढें जाऊन घाट उतरून तो मांडवीस गेला असा पोवाड्यांत उल्लेख आहे. परतु पे. द. १२ पत्रें ४० व ४५ हीं दाभाडे खोपली, नवापूर, रनाळा ह्या बाजूनें गुजराथेंत मांडवीकडे गेला असें सांगतात. रनाळ्यास मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व आनंदराव पवार ह्या त्रिवर्गांनीं दाभाडे बांडे ह्यांचा पराभव केला. ह्या पत्राची ता. १३-१-१७३१ आहे. रनाळ्याहून मांडवीकडे जातांना घाट उतरून जावें लागतें. घाटाखालीं गेल्यावर त्यास आनंदराव पवार, मलजी पवार सामील झाले व पिलाजी गायकवाडही येऊन भेटला असा उल्लेख पोवाड्यांत आहे. पेशवे व पवार ह्यांच्या वैमनस्यास प्रारंभ ता. ३-८-१७२९ च्या पूर्वींच झाला होता. (शा. रो.१०९). परंतु पे. द. भा. १२ प. ३७ ह्यावरून त्याची समजूत पडलीसें दिसतें. पे. द. १३-१५ मध्यें चिमाजी आप्पा लिहितो "दाभाडियासी कजिया करणें नाहीं तेव्हां प्रयोजन पवाराचें आहेसें नाहीं हें खरेंच परंतु मल्हारजी होळकरजीच्या विचारें फार आग्रह आहे कीं दोघा भावासही पदरीं घ्यावें. दोघांचें न बने तर आनंदरावास तरी पदरीं घ्यावें." हें पत्रहि ता. ३-८-१७२९ च्या पूर्वींचें असलें पाहिजे. त्यानंतर त्यांची समजूत होऊन ते ता. १३-१-१७३१ पर्यंत पेशव्यांच्या बाजूस राहिले. ह्यापुढें पवार बंधू दाभाड्यास केव्हां मिळाले हें निश्चित समजत नाहीं. पवार दाभाड्यास मिळाला हा पोवाड्यांतील उल्लेख बाजीरावानें आपल्या पत्रांत पवार पाडाव झाले असें लिहिलें आहे त्यावरून खरा ठरतो. पोवाड्यांतील मांडवीच्या उल्लेखास समर्थनपर असा इतरत्र उल्लेख नाहीं. डभईच्या लढाईचें व पाडाव झाल्यासंबंधाचें पे. द. १२-४६ मधील वर्णन व पोवाड्यामधील उल्लेख हे दोन्ही मिळते आहेत. त्यावरून पोवाडा अस्सल व तत्कालीन आहे असें मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. शाहिराचा इतिहास उपलब्ध आहे किंवा नाहीं ह्याची मला माहिती नाहीं.

---

२३ चर्चा.

ह्या अंकांत इतरत्र रियासतकार सरदेसाई ह्यांचा मौनीबावा पाटगांवकर यांच्याबद्दलचा लेख छापला आहे. श्रीमंत क्षात्र जगद्गुरु यांजकडे पाटगांव मठाची व्यवस्था सांप्रत आहे. त्यांनीं कृपाळूपणें कांहीं निवडक जुन्या पत्रांचे फोटो वगैरे देण्याचेंहि कबूल केलें आहे. त्याचप्रमाणें आणखी कागदपत्रांचा शोध करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे हें कळविण्यास फार संतोष वाटतो. रा. सा. सरदेसाई यांनीं पाटगांवच्या सदर कागदांत छ० शिवाजी महाराज यांचें हस्ताक्षर असल्याबद्दल जें मत प्रकट केलें आहे तें त्या वेळीं झालेल्या चर्चेंत कोणाहि विद्वानास मान्य झालें नाहीं. 'लेखनालंकार' हा अमात्य करीत असत हा उघड पुरावा आहे. सूज्ञ असा, बहुत काय लिहिणें हे विनंती अशांसारख्या पत्रांच्या शेवटीं येणाऱ्या खाशांच्या स्वहस्ताक्षराच्या मजकुरापैकीं नेमकीं कोणतीं अक्षरें स्वतः छत्रपती काढीत हें अद्याप ठरावयाचें आहे. 'सूज्ञ असा' हीं अक्षरें शाहू महाराजांचीं आपल्याजवळ आहेत. त्यावरून तो शेरा स्वतः छत्रपती करीत असावे असा बळकट ग्रह होतो. तथापि, निखालस मत ठरविण्यापूर्वीं मूळ अनेक शिवकालीन पत्रें घेऊन त्यांतील खाशांचे शेरे भिन्न भिन्न कसोट्या लावून तपासले पाहिजेत. एवढें मात्र निश्चित् कीं, 'लेखनालंकार' हीं अक्षरें छत्रपतींचीं नव्हत. जुना संप्रदाय अविच्छिन्नपणें छत्रपतींच्या घराण्यांत अद्यापावेतों देखील चालत आहे हेंहि आज प्रमाण मानतां येत नाहीं. पुराव्यानें त्याची छाननी व्हावयास पाहिजे. एरवीं जुना संप्रदाय काय होता ह्याचें एवढें अवघड कां पडतें ? कदाचित् श्रीकार किंवा श्रीकाराजवळील दैवताचें नांव हेंहि खासे स्वहस्तानें काढीत. त्यांत छत्रपती केव्हां काय काढीत किंवा न काढीत हेंहि ठरावयास पाहिजे. तात्पर्य, छत्रपती स्वहस्तें लिहीत व लिहिण्यास समर्थ होते हें जरी निश्चित तरी अमुक एक अक्षर हेंच शिवछत्रपतींचें असें छातीठोक म्हणण्यास आज आपणांजवळ पुरावा नाहीं. मंडळाचे बैठकींत रा. सा. सरदेसाई यांचा लेख वाचल्यानंतर श्रीमंत तात्यासो मेहेंदळे, प्रो. पोतदार, श्री. शं. ना. जोशी, श्री. स. ग. जोशी, श्री. बाबासो देशपांडे, श्री. खरे, श्री. कुळकर्णी, श्री. दि. वि काळे, श्री. द. वि. आपटे वगैरे अनेक मंडळींनीं ह्यावर कसून व मं० च्या संग्रहीं असलेलीं

छत्रपतींचीं पत्रें घेऊन व पाटगांवच्या कागदांचे फोटो समोर ठेवून तुलनात्मक व विवेचनात्मक खुलासेवार चर्चा केली आणि असा निष्कर्ष ठरविला कीं, शिवछत्रपतींचें हस्ताक्षर अमुकच असें आज सांगतां येत नाहीं. श्री. सरदेसाई यांनीं आणलेल्या पाटगांवच्या कागदांत छत्रपतींचें अक्षर निश्चितपणें बिलकूल नाहीं. ह्या चर्चेस श्री. ध. रा. गाडगीळ, श्री. जांभेकर इ. मंडळी होती.

२४ मंडळवृत्त.

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड
सेना खासखेल, संस्थान बडोदें यांची
भारत-इतिहास-संशोधक-मंडळास भेट.



[महाराज मंडळांत येत असतां घेतलेला फोटो.]

श. १८५४ फा॥ वद्य १० मंगळवार म्हणजे ता. २१ मार्च १९३३ हा दिवस मंडळाच्या इतिहासांत संस्मरणीय म्हटला जाईल. कारण ह्या

दिवशीं सकाळीं ९ ते १० असें एक तासपर्यंत, श्री. महाराज सरकार संस्थान बडोदें ह्यांनीं येऊन मंडळाचें कार्य पाहिलें व त्यास धन्यवाद दिले. सकाळीं बरोबर ९ वाजतां सरकारस्वारी आपल्या लवाजम्यानिशीं मंडळांत दाखल झाली. त्या वेळीं मंडळाच्या कारभारी मंडळाचे सभासद श्री. चिं. वि. वैद्य (अध्यक्ष), श्री. सर. तात्यासो मेहेंदळे, श्री. न. चिं. केळकर, श्री. सर. गो. ब. पटवर्धन शास्त्री, श्री. द. वि. आपटे, श्री. सर. गं. ना. मुजुमदार, रा. सा. ना. गो. चापकर, श्री. पां. के शिराळकर (कऱ्हाड), रा. सा. गं. के. देशपांडे, प्रो. द. वा. पोतदार, श्री. अ. वि. पटवर्धन हे श्रीमंतांच्या स्वागतार्थ आले होते. ह्याशिवाय श्री. द. कृ. देवधर (कोल्हापूर), श्री. ग. ह. ओक, श्री. वा. सि. बेंद्रे, श्री. दि. वि. काळे, श्री. ग. ह. खरे, डॉ. पळसुले, श्री. नरे, श्री. वि. वि. देशपांडे, श्री. अ. वा. फडणीस, श्री. ग. वि. देवधर, श्री. वि. गो. दिघे, श्री. स. ग. जोशी, श्री. य. गो. कानिटकर,श्री. भाऊसो दातार, श्री. ग. ह. दाते,श्री. शं.ना.जोशी, श्री. वि. म. कोल्हटकर इ. इ. मंडळाचे सभासद व पाहुणे हजर होते. श्रीमंतांची स्वारी, महाराणी श्री. सौ. चिमणाबाईसो, श्री. युवराज प्रतापसिंह सो, श्री. उदयसिंहसो राजपौत्र ह्यांचेसह आली होती. शिवाय श्री. माने पाटील इ. थोर थोर अधिकारी मंडळीहि महाराजांच्या बरोबर होती. मंडळाच्या मुख्य दरवाज्यांतून सभागृहाशीं येतांना मं.च्या कारभारी मं.तील कांहीं सदस्यांची श्री. चिंतामणराव वैद्य व प्रो. पोतदार यांनीं ओळख करून दिली. पूर्वपरिचितांस श्री. सरकारांनीं ओळख दिली. सभागृहाशीं येतांच मं. च्या वरील मंडळीसह महाराजांचा छोटासा फोटो रा. भिडे यांनीं काढला. मंडळाची साधी व छोटी इमारत लतापल्लवांनीं सुशोभित केली होती. मंडळास भेट म्हणजे मंडळानें संग्रहीत केलेल्या ऐ. प्रेक्षणीय व अभ्यसनीय वस्तू पाहणें व त्यांची माहिती करून घेणें होय. तेव्हां खरें म्हटलें म्हणजे ह्या वस्तूंनींच मंडळाचें सभागृह अलंकृत केलें होतें. मंडळाच्या संग्रहीं असलेल्या वस्तूंपैकीं शक्य व अवश्य तेवढ्या तसबिरी, नाणीं, चित्रें वगैरे व्यवस्थित लावलीं होतीं. लवचिक कांचेच्या (जिलेटिन) कागदी पिशव्यांतून व कार्डबोर्डावरून सदर काचेरी कागद लावून छ० राजे, अष्टप्रधान, राजघराण्यांतील खाशी मंडळी, परराष्ट्रीय दरबारांतील वकील, अधिकारी, संत साधू इत्यादींचीं पत्रें, हस्ताक्षरें, त्यांवर खुला-

शाच्या चिठ्या लावून ठेवलेल्या होत्या. तसेंच इष्टिकालेख, ताम्रपत्रें, ताडपत्रावरील पोथ्या, लढाऊ व दरबारी अंगरखे, टोप्या, कांहीं हत्यारें, औरंग०चें डौलाचें फर्मान, दिल्लीकर व इतर आदिलशाही वगैरे बादशहांचीं फर्मानें, होळकरांचे दिवाण गंगोबा तात्या चंद्रचूड यांस बनारसकडील गांव दिल्याचें फर्मान, शहानामा, फारसी लिपींत व भाषेंत लिहिलेलें नाभाजीचें काव्य,महाभारताचें फारसी भाषांतर वगैरे वगैरे हस्तलिखित फारसी ग्रंथ,तसेंच भूर्जपत्रावरील सप्तशती, प्रतापसिंह छत्रपतींनीं महाराष्ट्रज्ञातीकरतां वागणुकीचे कांहीं नियम केले त्यांची मराठे मंडळींच्या संमती निदर्शक सह्या असलेली यादी, इ. इ. कागद व वस्तू सर्व सभागृहभर व्यवस्थित वर्णनपर चिठ्या लावून मांडल्या होत्या. हें सर्व सरकारस्वारी पहात असतांना श्री. सर. आबासाहेब मुजुमदार, प्रो. पोतदार, श्री. खरे, श्री. शं. ना. जोशी इ. मंडळी महाराजमंडळींना वस्तूंची माहिती देत होती. महाराजांच्या कांहीं कांहीं निवडक प्रश्नांवरून, ते प्रश्न माहितगारींचे वाटत असल्यामुळें, द्विगुणित उत्साह वाटत होता. महाराजांनीं छ. शिवाजीमहाराज ते प्रतापसिंह छत्रपतींपर्यंत, बहिरो मोरेश्वरापासूनचे सर्व पेशवे, परशराम त्र्यंबक प्रतिनिधी, सचीवमंडळी, दत्ताजी व महादजी शिंदे, हिंगणे, रामशास्त्री प्रभुणे, दमाजी गायकवाड ते गोविंदराव गायकवाड, खेम सावंत भोसले, मुधोळकर घोरपडे, राजमाता जिजाबाई, ताराबाई, सकवारबाई इ. भोसले घराण्यांतील स्त्रियांचीं पत्रें व हस्ताक्षरें पाहिलीं. याप्रकारें कागदपत्रें वगैरेंचीं पाहणी चालू असतां ५०० वर्षांपूर्वींची कविश्रेष्ठ कालिदासकृत सं. कुमारसंभव काव्याची हस्तलिखित प्रत-संग्राहक द. कृ. देवधर-पाहिली व तेव्हां श्री. देवधरांचें व महाराजांचें लिपिसुधारणेबद्दल बोलणें झालें. नंतर श्री. वा सि. बेंद्रे यांनीं श्री. छ. संभाजीचरित्रकार्यालयाची माहिती सांगितली. संगृहीत केलेलें साहित्यहि दाखविलें. वखारीवाले इंग्रज गव्हर्नर, पोर्तुगीज अधिकारी ह्यांचीं पत्रें पाहिलीं. संभाजीचें स्वतःचें हस्ताक्षर असलेलें दानपत्र, साधु एकनाथकवींच्या नातवानें लिहिलेली पोथी (प्रो. पोतदार संग्रह) पाहिली. येणें प्रमाणें सभागृहांतील वस्तू अवलोकन केल्यानंतर महाराज वृद्धावस्थेमुळें माडीवरील गॅलरींत न जातां छत्रपतींची २६ हात लांब असलेली वंशावळ पाहून आसनस्थ झाले. इतरहि सर्व खाशी मंडळी बसल्यावर मंडळाचे चिटणीस प्रो. पोतदार यांचें भाषण झालें.

प्रो. पोतदार म्हणाले ' महाराजांनीं आज मंडळांत येऊन, बहुतेक सर्व अवलोकन केलें ही फार फार आनंदाची गोष्ट झाली. वस्तुतः मंडळाच्या ह्या इमारतीचा पायाभरणीचा समारंभच महाराजांच्या हस्तें व्हावा असा आमचा फार हेतू होता. पण तेव्हां श्री. महाराज सरकारांस परदेशींच प्रकृतिस्वास्थ्यासाठीं राहणें भाग पडल्यानें तो योग जुळून आणवितां आला नाहीं. तेव्हां तो समारंभ श्री. संपतराव महाराज यांच्या हस्तें झाला. तेव्हांपासूनची अतृप्त इच्छा आज पुरी झाली ह्यांत मंडळाला फार आनंद वाटत आहे.' पोतदारांनीं ह्यानंतर मंडळाच्या २२ वर्षांच्या कामगिरीचा वृत्तांत फारच थोडक्यांत सांगून स्वीय व पुरस्कृत ग्रंथ दाखवून मंडळाच्या धोरणाविषयीं असें सांगितलें कीं, मंडळाचें झालेलें व चालू कार्य पाहतां स्वदेशाचा इतिहास गौरवात्मक असो अथवा निंदास्पद असो, असेल तो व तसा साधनप्रधान दृष्टीनें सत्यशोधनार्थ प्रसिद्ध करावयाचा, तसेंच कोणतीहि जात, पंथ इत्यादि भेददृष्टीला येथें अवकाश नाहीं अशा प्रकारें येथें कार्यपद्धति आहे हें आपल्या निदर्शनाला येईल. नंतर मरहूम ॲबट यांच्या अपूर्व देणगीचाहि उल्लेख पोतदारांनीं केला.

ह्यानंतर श्री.सयाजीरावमहाराज यांनीं छोटेसें भाषण केलें. ' ते म्हणाले इतर सर्व राष्ट्रांमध्यें अशा भूषणभूत संस्था असतात. त्यांसारखीच ही संस्था पाहून मला आनंद वाटत आहे. ह्या संस्थेच्या कार्याचा पुढील पिढीस फार मोठा उपयोग होणार आहे. मंडळाचें कार्य पाहून मला फार समाधान वाटलें. माझा जो गौरव आपण केला त्याबद्दल मी फार आभारी आहे. '

ह्यानंतर मं०चे अध्यक्ष श्री. चिं. वि. वैद्य ह्यांनीं महाराजांचे आभार मानले. तेव्हां ते म्हणाले ' श्रीहर्षापासून राजे लोकांनीं विद्याधिपतित्वाची आपली परंपरा चालविल्याचें प्राचीन इतिहासांत दिसून येतें. राजा विद्वान त्याप्रमाणें कार्यकर्ता असणें हें फार दुर्मिळ. श्री. सयाजीराव महाराजांचे ठिकाणीं ह्या दोन्ही गोष्टी दिसून येत आहेत. महाराजांनीं मंडळास भेट दिली ह्याबद्दल महाराजांचे मी फार फार आभार मानतों. '

शेवटीं श्रीमंत महाराज, महाराणीसो, युवराज व राजपौत्र ह्या सर्वांना पुष्पहार घालून व जमलेल्या मंडळीसहि पुष्पगुच्छ दिल्यानंतर हा गोड समारंभ समाप्त झाला.

महाराजांनीं पुढील अभिप्राय प्रगट केला आहे.

I was pleased to go round the institution and see its work The attempt made is very good though the institution is quite in its infancy. I wish it every success.

त्रैमासिक सभा–पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें माघ शुद्ध २।३।४ शके १८५४ (ता. २७।२८।२९ जानेवारी १९३३) शुक्रवार, शनिवार, रविवार या तीन दिवशीं सायंकाळीं ५ ते ७ मंडळाची त्रैमासिक सभा भरून तींत पुढील विषयांसंबंधीं व्याख्यानें व चर्चा झाली. त्यांचें सार पुढें दिलें आहे.

(१) श्री. रा. ह. गाडगीळ यांच्या नाणकप्रतिमा-पुस्तकांची देणगी व स्वीकार

(२) मराठेशाहींतील मुत्सद्दी व वीर यांच्या अक्षरांचें प्रदर्शन (व श्री. शं. ना. जोशी यांचें टिपण)

प्रो. द. वा. पोतदार (३) पेशवे दप्तराबाबत सरकारचें धोरण व उत्तर

श्री. वा. सि. बेंद्रे (४) संभाजीचें चरित्र

प्रो. द. वा. पोतदार (५) पुणें नगर संशोधक मंडळ शाखेची स्थापना

श्री. चिं. वि. वैद्य (६) भावनगरके गुहिल और मेवाडके गुहिल

प्रो. द. वा. पोतदार (७) सुरत्राण जहांगिर याच्या वेळचा एक संस्कृत गुर्जर विक्रयपत्र (श. १५३९) व त्याचें प्रदर्शन

श्री. ग. ह. खरे (८) पंढरपूरचा विठोबा, त्याचें प्राचीनत्व व आक्षेप

श्री. द. कृ. देवधर (९) प्रदर्शन

(१) यांत श्री. गाडगीळ यांनीं स्वतः, गेलीं ४० वर्षे नाणीं जमविण्यासाठीं काय खटपट केली व किती स्वार्थत्याग करावा लागला हें सांगून त्याचें फळ म्हणून त्यांजपाशीं असलेल्या नाण्यांची किंमत किती मोठी आहे हें त्यांपैकीं कित्येक नाणीं जगांतील कोणत्याहि म्यूझियममध्यें नाहींत असें दाखवून श्रोत्यांस पटवून दिलें व हीं नाणीं परदेशांत विकण्याची आपली इच्छा नाहीं, केलेले श्रम व स्वार्थत्याग यांचा जरूरी इतका मोबदला मिळाल्यास तीं येथेंच कोणाहि हिंदी, विशेषतः महाराष्ट्रीय,

गृहस्थास किंवा संस्थेस देण्यास तयार असल्याचें सांगून त्यांनीं मंडळास त्या नाण्यांचीं प्रतिमापुस्तकें नजर केलीं व मंडळानेंहि त्यांचा स्वीकार केला. तीं पुस्तकें सभ्यां लोकांस पाहावयास मिळतील.

(२) यांत श्री. जोशी यांनीं अनेक हस्ताक्षरें दाखवून पेशवाईतील पुरुषांचीं हस्ताक्षरें शोधून काढणें सोपें असून शिवकालीन पुरुषांचीं हस्ताक्षरें ओळखणें कसें अवघड आहे हें पत्राच्या आरंभींचा श्रीकार, त्याजवळचें देवतानाम, तसेंच पत्रसमाप्तीच्या स्थानाचे निराळ्या वळणांतील शब्द यांचीं उदाहरणें घेऊन विशद करून सांगितलें. त्यांनीं काढलेल्या हस्ताक्षरांत पेशव्यांपैकीं बहुतेक खासे व निकटची पुरंदरे, सखाराम बापू, नाना फडणीस, वगैरे मंडळी, छत्रपतींपैकीं खास स्त्री-पुरुष व त्यांच्या निकटचे प्रतिनिधि, अमात्य, पिंगळे वगैरेंचीं सुमारें ५० हस्ताक्षरें होतीं.

(३) यांत प्रो. पोतदार यांनीं पुढील विचार प्रकट केले. पेशवे दप्तरबाबत गेल्या वर्षी जे ठराव मंडळानें सरकारकडे पाठविले होते ते सरकारानें उत्तराकरतां पोलिटिकल खात्याकडे पाठवून दिले. आणि पोलिटिकल खात्याकडून ३१।१०।१९३२ रोजीं नं. ६७६४ सी. चें उत्तर आलें आहे. त्यांत प्रारंभींच मं०च्या ठरावास अनुसरून दप्तरप्रकरणीं कांहीं विशेष व्यवस्था करण्याची जरूर नसल्याचें म्हटलें आहे. म्हणजे ह्या प्रकरणीं आम्हांस जें एक भय प्रथमपासून वाटत होतें तें आतां ह्या सरकारच्या उत्तरांत प्रतिबिंबित झालेलें आहे. पेशवेदप्तरांतील निवडक उताऱ्यांचे जे भाग हल्लीं प्रसिद्ध होत आहेत ते तसे प्रसिद्ध झाल्यामुळें वस्तुतः मूळ दप्तरासंबंधानें अभ्यासू लोकांची जिज्ञासा व गरजहि वाढली पाहिजे. तथापि, आतां निवडक कागद छापले आहेत तेव्हां मूळ दप्तर पाहण्याची गरज कमीच झाली आहे असें उलटें प्रतिपादन सरकारनें वरील उत्तरांत केलें आहे. हें अर्थात् भ्रामक आहे.

निवड करणाऱ्यानें निवड कितीहि कसोशीनें केली तरी एकाची निवड दुसऱ्याच्या पसंतीस उतरतेच असें नाहीं. तसेंच अभ्यासकांची दृष्टीहि निरनिराळी असते. आणि प्रस्तुत झालेली निवड ही विशेषेंकरून राजकीय घडामोडींच्या दृष्टीनें झालेली आहे. कांहींशी सामाजिक दृष्टीचीहि निवड कांहीं भागांत आहे. परंतु आर्थिक, लष्करी, न्यायमनसुबी वगैरे अनेक दृष्टींनीं निवड व्हावयास पाहिजे. आणि ह्याचा एकच मार्ग म्हटला

म्हणजे निरनिराळया विषयांच्या अभ्यासकांना दप्तर खुलें करणें हाच होय.

सांप्रत मे. कमिशनर मध्यभाग हें दप्तर पाहण्यास मर्जीनुरूप परवानगी देतात ही आनंदाची गोष्ट आहे. एकाच वेळीं दोन माणसांपेक्षां अधिकांस तपासणीस बसण्याची सोय जागेच्या अभावीं सांप्रत करतां येत नाहीं असें सरकारनें कळविलें आहे व भाषांतर करून देण्याची सवडीची अट मर्जीप्रमाणें रद्द करण्याचा अधिकारहि मे. कमिशनरसो यांच्याकडे दिल्याचें सरकारनें कळविलें आहे. त्याप्रमाणें अंमल होत गेल्यास सरकारनें थोडी तरी दाद घेतली असें आम्ही आनंदानें म्हणूं.

दप्तराचें एक सूचीपुस्तक करावयास घेतलें आहे असें उत्तर सरकारनें दिलें आहे. आजच्या काळांतील मराठी इतिहासाच्या अभ्यासकांस ज्या प्रकारचें मार्गदर्शक सूचीपुस्तक पाहिजे आहे तशा प्रकारचें सूचीपुस्तक जर सरकार करील तर संशोधकांवर मोठेच उपकार होतील. परंतु त्या ऐवजीं एकादें चालचलाऊ सूचीपुस्तक तोंडावर टाकण्याचा उद्योग चालूं असेल तर तक्रार कायम राहील.

दप्तरांतील कागदांची न्यायमनसुबी, राजकीय, अर्थशास्त्रीय वगैरे प्रकारची वाटणी विभागणी केली नाहीं असें कळवून सरकार उत्तरांत म्हणतें कीं, जे ४४ भाग छापण्याचा उद्योग चालूं आहे त्यांत ऐ. दृष्टीनें उपयुक्त असें सर्व साहित्य प्रकट झाल्यासारखेंच आहे. सरकारास आम्ही नम्रपणें असें कळविण्याची परवानगी घेतों कीं, सरकारचा वरील उत्तरांत दाखल केल्याप्रमाणें समज खरोखरी असेल तर तो अत्यंत चुकीचा आहे. एकादें मूळ दप्तर अनेक दृष्टींनीं तपासावें लागत असल्यामुळें त्या त्या दृष्टीच्या अभ्यासकास सदर दप्तर योग्य खबरदारी घेऊन, पाहावयास मिळालेंच पाहिजे. निवडक कागदांचे असले कितीहि भाग काढले तरी ही गरज कमी होत नाहीं. यास्तव भ्रामक कोटीक्रमास वश न होतां सरकार ह्या कामास दिरंगाई करणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे. दप्तराचें शास्त्रीयदृष्ट्या संशोधन करण्यास दप्तरशास्त्रज्ञ तज्ज्ञ अधिकारीच पाहिजेत. सर०नें असे तज्ज्ञ कोठें कोठें नेमलेहि आहेत. असें असतां एवढ्या ४।५ कोटी कागदांच्या प्रचंड दप्तरखान्यावर

सरकारनें आजवर दप्तरशास्त्रज्ञ व इतिहासज्ञ अशा लायक अधिकाऱ्याची नेमणूक केली नाहीं हीच घोडचूक केली आणि आतां आर्थिक हलाखीच्या परिस्थितीमुळें अशा अधिकाऱ्याची नेमणूक करतां येत नाहीं असें रडगाणें सरकार गातें आहे. सरकारची इच्छाच असेल तर सांप्रत होत असलेल्या खर्चांतच आम्ही म्हणतों तशी व्यवस्था करतां येईल.

अभ्यासू लोकांच्या हिताच्या दृष्टीनें मं. नें ज्या सूचना सरकारास केल्या त्यांपैकीं फारच थोड्या स.नें स्वीकारल्या असून निवडक कागदपत्रांचे भाग पुढें करून त्यांवरच संतुष्ट राहून मूळ दप्तर खुलें न करणें म्हणजे नदीच्या काठच्या भुडकीवरच काम भागवून घेऊन नदीच्या डोहांत प्रवेश करण्यास मनाई करण्यासारखें निरक्षरपणाचें व मागासलेपणाचें आहे. सरकार जितक्या लवकर असल्या भ्रमांतून मुक्त होईल तितकें सर्वांचें हित होईल.

(४)–यांत प्रारंभीं बखरीमुळें संभाजीविषयीं अभ्यासवर्गी लोकांचे कसे गैरसमज झाले आहेत हें शिवाजीच्या मृत्यूच्या वेळीं संभाजी कैदेंत होता, सोयराबाईस भिंतींत चिणून मारलें, शिर्क्यांचें शिरकाण, संभाजी बेहोष असतां पकडला गेला, त्यानें कलुशाच्या नादानें राज्य घालविलें वगैरे गोष्टींची हकीकत सांगून दाखविलें व आपण जो अस्सल साधनांचा संग्रह जमविला आहे त्यावरून वरील गोष्टी कशा खोट्या आहेत हेंहि समजावून दिलें. शेवटीं हा साधनसंग्रह प्रसिद्ध करण्यासाठीं 'संभाजी–चरित्र–कार्यालय' काढणें आवश्यक कसें झालें हें सांगून आणि मंडळ व कार्यालय हीं बाह्यत: भिन्न असलीं तरी तत्त्वत: एक आहेत याचें विवेचन करून भाषण संपविलें.

(५)–यांत पुण्यामध्यें व आसपास राष्ट्रकूटांपासून तों आतांपर्यंतच्या बाराशें वर्षांच्या काळांतील अवशेष कसे विखुरले गेले आहेत हें सांगून त्यांपैकीं कित्येक काळ, शहरसुधारणा वगैरे गोष्टींमुळें कसे नाहींसे होत चालले हें बाळोबा, कुंभारवेस, शिलालेख वगैरेंच्या उदाहरणांनीं स्पष्ट केलें व यामुळेंच पुण्याचें संशोधन करण्यासाठीं अशा प्रकारची मंडळाची एक शाखा काढणें आवश्यक कसें झालें आहे हें सांगून आपली योजना समजावून दिली.

(७)– यांत श. १५३९ मधील एका घराच्या विक्रीच्या प्रसंगानें अमदाबादचे अधिकारी व इतर साक्षीनीं आली आहे. हा नागरी लिपींत, संस्कृतगुजराथी मिश्र भाषेनें कायद्यानुसार लिहिलेला आहे.

(८)– यांत विठोबा व पंढरपूर यांचे शिलालेख व ताम्रपट यांतून आढळणारे उल्लेख, विठ्ठल व पंढरी या नांवांची व्युत्पत्ति व विठोबाच्या स्थापनेचा संभवनीय काळ, विठोबाची सध्यांची मूर्ति व त्याचें संतांनीं वर्णन केलेलें स्वरूप, विजयनगरच्या कृष्णराय व त्यानें पंढरपूरच्या मूर्ति उचलून नेणें, विठोबाच्या दुसऱ्या ठिकाणच्या मूर्ति जैन किंवा बौद्ध आहे काय वगैरे गोष्टींविषयीं विवेचन केलें.

(९)– यांत या ३ दिवसांच्या कार्यक्रमाचे वेळीं स्वतः जमविलेल्या ताडपत्रें व कागद यांवरील जुनाट चित्रयुक्त व हस्तलिखित पोथ्या, तंत्रग्रंथांतील देवतांचीं चित्रें, ब्राह्मीपासून नागरी व कानडी अक्षरें कशीं बनत गेलीं याचे तक्ते, हिंदुस्थानांतील निरनिराळ्या काळच्या साम्राज्यांच्या व्याप्तीचे नकाशे वगैरे अनेक पाहण्यालायक वस्तू मांडून ठेवल्या होत्या.

पाक्षिक सभा:– गेल्या तिमाहींत ४ पाक्षिक सभा होऊन त्यांत १० निबंध वाचले गेले. त्यांची यादी पुढीलप्रमाणें:–

पा.स	नि.क्रमांक	निबंध	लेखक
१४	५०	निजो सोनकुल यांचें प. श. १५८९	श्री. स. ग. जोशी
१५	५१	श्रीगोंदें येथील मुंगी यांची पाटिलकी शिंदे खरेदी घेतात.	श्री. शं. ना. जोशी
	५२	जेधे यांजकडील ४ पत्रें	श्री. स. ग. जोशी
	५३	लोहारे भिलारे व वाई येथील शकर बिबीचा बाग २ फर्मानें	श्री. ग. ह. खरे

पा. स.	नि.क्रमांक	निबंध	लेखक
	५४	पौन मावळ, पेशवे व सचीव	श्री. शं. ना. जोशी
१६	५५	जुन्नर येथील चार फारसी शिलालेख	श्री. ग. ह. खरे
	५६	मोरो त्रिमलचीं पत्रें व जेधे यांची भाऊबंदकी	श्री. स. ग. जोशी
	५७	निंबाळकरांची वडीलकी	श्री. शं. ना. जोशी
१७	५८	कण्हेरी-हाडभाऊपणाबद्दल पाटिलकीचा वाद	,, ,,
	५९	कांहीं मुसलमानी नाणीं	श्री. ग. ह. खरे

ह्या वर्षीं पाक्षिक सभेच्या बैठकी एकूण १७ झाल्या. दोन गणपूर्ती न झाल्यामुळें कार्यक्रमविरहितच राहिल्या आणि दोन सुटी असल्यामुळें झाल्या नाहींत. एक श्री. शि. का. ओक (धार) व श्री. मु. वा. बरवे (इंदूर) ह्या मंडळाच्या आस्थेवाईक व इतिहासाभ्यासी सभासदांच्या मृत्यूमुळें दुखवट्याचे ठराव होऊन निबंधवाचनादि इतर कार्यक्रम न होतांच बरखास्त झाली. ह्या १७ सभांची सभासद व पाहुणे यांच्या हजेरीची सरासरी अनुक्रमें ११ व ४ अशी पडते. ह्या सभांपैकीं ४ सभांना श्री. चिं. वि. वैद्य हे अध्यक्ष होते व ९ सभांना श्री. सर. खं. चिं. मेहेंदळे हे अध्यक्ष असून प्रो. वा. गो. काळे, प्रो. जोशी, श्री. द. वि. आपटे व श्री. कृ. वा. पुरंदरे हे एकेका सभेस अध्यक्षस्थानीं होते. पा. स. त वाचलेल्या निबंधांची नोंद लेखकाच्या नांवासह मं. च्या त्रै. अंकांत दिलीच आहे. एकंदर १४ लेखकांकडून ५८ निबंध वाचले गेले व त्यांची लेखवार संख्या पुढें दिली आहे. निबंधवाचनाखेरीज ऐ. चित्रप्रदर्शन किंवा नूतन सभासद व साभारस्वीकार केलेल्या ग्रंथांची यादी हींहि अन्यत्र दिलीच आहे.

लेखक	लेखसंख्या
(१) श्री. चिं. वि. वैद्य	१
(२) प्रो. द. वा. पोतदार	८
(३) श्री. स. ग. जोशी	७

लेखक	लेखसंख्या
(४) श्री. द. वि. आपटे	१
(५) श्री. दि. वि. काळे	१
(६) श्री. य. न. केळकर	५
(७) श्री. ना. द. आपटे	४
(८) श्री. कृ. पां. कुलकर्णी	१
(९) श्री. चिं. ग. कर्वे	१
(१०) श्री. वि. गो. दिघे	१
(११) श्री. ग. ह. ओक	२
(१२) श्री. पिंगळे (ग्वालेर)	१
(१३) श्री. ग. ह. खरे	१३
(१४) श्री. शं. ना. जोशी	१[illegible]

सभासदः— गेल्या तिमाहींत पुढील नवीन सभासद मंडळास मिळाले.

क्र. नं.	सभासदाचें नांव.	गांवाचें नांव.	वर्ग.
१७२४	Mysore Hatti Rama Sharma	बंगलोर	४
१७२५	श्री. श्रीधर शामराव हणमंते	मोहोळ	४
१७२६	मीर मुनशी मुहम्मद इस्माईल भालदार	पुणें	४
१७२७	श्री. अनंत वासुदेव देसाई, एम्. ए.	कोल्हापूर	४
१७२८	राव बहादूर दत्तात्रय लक्ष्मण सहस्रबुद्धे	पुणें ४	तहा. २
१७२९	श्री. रामराव गणपतराव विजयकर	मुंबई २	तहा. २

ग्रंथालय-वृत्त—गेल्या तिमाहींत भारत इतिहास संशोधक मंडळास देणगीदाखल मिळालेलीं पुस्तकें.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
केळकर वाढदिवस मंडळ	केळकर (आवृत्ति ३ री)	केळकर वाढदिवस मंडळ

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
ग्रँट डफ	मराठ्यांचा इतिहास (मराठी)	बऱ्हाणपूरकर, द. वि. ग्वाल्हेर.
पवार करुणाशंकर बा.	कुर्मी–जाति–निर्णय	क्षत्रिय रिसर्च सोसायटी, दिल्ली.
महाराष्ट्र सांवत्सरिक मंडळ, पुणें	महाराष्ट्र सांवत्सरिक १९३३	महाराष्ट्र सांवत्सरिक मंडळ, पुणें.
वळसंगकर श्रीधर शामराव	भारतवर्ष (हिंदुस्तानचें संक्षिप्त गॅझेटीयर)	वळसंगकर श्री. शा.
भिडे ना. म.	प्रवासी	जोशी शं. ना.
मुळे र. भि.	मानव	मुळे र. भि.
साठ्ये वि. गो.	वीरश्री शृंगार अर्थात् सरदार बाजीप्रभु देशपांडे.	भट द्वा. मो.
Government of India	Imperial Census of India 1881 vol. I Census of Bengal	Government of Central Provinces.
Government of India	Imperial Census of 1881 Bombay Presidency including Sind (Operations and Results)	Government of Central Provinces
Government of India	Imperial Census of India 1881 Census of Madras (Operations ond Results)	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1881 Report on the census of Punjab	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1901 Vol. II Ajmir-Merwara	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1901 Vol. IV Assam Part I Report	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1901 Vols. V & V-A Baluchistan Report and Imperial Tables	Government of Central Provinces

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
Government of India	Census of India Vol. VI 1901 Bengal Part I Report	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. VIII Berar Part I Report	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. IX Bombay Part I Report	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XVI N.W. Provinces and Oudh.	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XVII Punjab Part I Report	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XVIII Baroda	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XIX Central India	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XXIII Kashmir Part I Report	Government of Central Provinces.
Government of India	Census of India 1901 Vol. XXIV Mysore Part I Report	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1901 Vol. XXV Rajputana Part I Report	Government of Central Provinces
Government of India	Census of India 1921 Central Provinces and Berar	Government of Central Provinces
Grierson	Linguistic Survey of India Vol. I—Parts I & II Vol. VIII—part I Vol. X Vol XI	Rout Vasantrao of Bombay
Pissurlencar P.	A Sindabur de Ibn Batuta	Pissurlencar P.
Pissurlencar P.	Ainda a Sindabur de Ibn Batuta	Pissurlencar P.
Pissurlencar P.	As Primitivas Capitais de Goa	Pissurlencar P.

दुखवटा.

कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, गेल्या तिमाहींत मंडळाचे दोन इतिहासाभ्यासू सभासद कालवश झाले. मंडळानें तन्निमित्त १८ व्या पाक्षिक सभेंत पुढील ठराव करून पाक्षिक सभेचें त्या दिवसाचें काम बंद ठेविलें. ठराव असा—

इंदूरचे राव बहादुर मुकुंद वामन बर्वे मुन्तजिम बहादुर हे इतिहासाभ्यासी व परिश्रमी असे मंडळाचे सभासद कालवश झाल्याचें कळल्यावरून या सभेस अत्यंत दुःख होत आहे. रावबहादुर बर्वे यांचे अनेक इतिहासग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध आहेत ते त्यांच्या इतिहासप्रेमाचे निदर्शक आहेत. मंडळावर त्यांचें बहुत प्रेम असे. अशा आस्थेवाईक सभासदाला मंडळ अंतरलें याबद्दल मंडळास शोक होत आहे.

धारचे श्री. शिवराम काशिनाथ ओक हे इतिहासाभ्यासी व परिश्रमी असे मंडळाचे सभासद कालवश झाल्याचें कळल्यावरून या सभेस अत्यंत दुःख होत आहे. ओक हे धारेस संस्थानच्या इतिहासखात्यांत रा. लेले यांस उत्तम प्रकारचें साहाय्य देत असत.

इतर—वृत्त.

गेल्या शिवजयंत्युत्सवाच्या निमित्तानें प्रो. वा.गो.काळे, प्रो. द. वा. पोतदार, श्री. दि. वि. काळे, श्री.शं.ना. जोशी यांचीं पुणें, औंध, शिवाजी मराठा हायस्कूल पुणें, जुन्नर या ठिकाणीं शिवचरित्रावर भाषणें झालीं.

---

25 Marathi contents of this issue.

Articles

(1) **The Guhils of Bhawanagar and Mewar**—by C. V. Vaidya—is an attempt to refute the conclusion arrived at by M.M. G.H.Oza that the abovementioned families belong to the one and the same stock, on the ground of different *gotras*, *pravaras*, different names of the ancestors of both the families and the custom of intermarriages among the two families.

(2) **Some account of a saint Mounibava from Patgaon (Kolhapur)**—by R. S. G. S. Sardesai—gives interesting details about the life of the above saint and his acquaintance with Shivaji the great together with some original papers pertaining to his *matha* at Patgaon.

(3) **Muhammadan relatives of the Peshwas**—by V. G. Dighe—is an elaborate tracing of the history of a family connected to the Peshwas through Shamsher Bahadur, the son of Bajirao I and his favourite keep Mastani.

(4) **100 pairs of Brahman News-bearers**—by Prof. D. V. Potdar—is a letter of Raghunathrao Peshwa giving several types of news-beareres and their necessary qualifications.

(5) **The ballad about Dabhade and its authenticity**—by G. H. Oke—is a discussion on the various facts mentioned in the ballad and the writer concludes with the help of original papers that the ballad is quite authentic.

Sources

Persian[1] (11) Letters from a Ghorpade family of Khanapur (Kolhapur), (concluded)- contains some original papers among which No. 66 is an appeal to the members of the Ghorpade family to do their best for the Adil-shahi Kingdom. (12) An order from Sayyad Makhdum Sarza-khan. (13) An Adilshahi farman confirming an order of Afjalkhan. (14) An Adilshahi farman of ordinary type. (15) 4 Persian inscriptions from Junnar (to be continued).

Pertaining to Shivaji's times—(1)Letters from the Nimbalkar family of Phaltan—by S. N. Joshi—see the last issue p. 109. (2) A new type of Shuhur Era—by G. H. Khare-is an attempt to prove the existence of a different Shuhur Era which is elder than the known one by two years. (3) Udajiram and the Pargana of Yedlabad—by G. H. Khare-is a letter giving out that Udajiram once held the pargana as jagir. (4) A letter from a Jedhe family at Vadtumbi—by G. H. Khare and S. G. Joshi-tells that Shivaji had been out at the beginning of May 1667 on some expedition. (5) Letters about Mounibava from Patgaon (Kolhapur)—by R. S. G. S. Sardesai—are the original papers on which his article in this issue is based.

Miscellaneous :—(1) See the last issue p. 109. (2) Two letters from the Nagarkar family of Kanhur—(Ahmednagar)—by Y. N. Kelkar—give some account about the battle of Motitalao fought between the Peshwas and Haidar in 1771 A. D, and a list of persons having the honour of keeping a palanquin about A. D. 1815.

[1] by G. H. Khare.

अभिप्राय

It was with great interest that we saw the exhibits collected by the Itihas Sanshodhak Mandal. Sardar Mujumdar was good enough to show us round. The Mandal has done very valuable work in collecting the materials for research and in encouraging and facilitating research. But much remains to be done and I hope the Mandal will succeed in enlisting increasing support among the public and among those connected with the educational institutions in this city.

The collection and the work of the society deserve to be better-known.

18-2-33.

D. D. Nanavati, I. C. S.,
(District Judge Poona),
Hamidali, I. C. S.,
Shareefah Hamidali.

When I visited the Historical Research Institute or the Bharat Itihasa Sanshodhak Mandal, I was reminded of the famous Historical Museum in New York city which I saw two years ago. India needs useful institutions like the one that has been started in Poona. Much of the prosperity of a nation's people depends upon the keen interest men and women take in the authentic history of that nation's past. I am pleased to say that the work of this Mandal or Society is highly useful in stimulating love of the mother country and her glorious traditions. I wish it great prosperity and useful service.

9-3-1933. Shri-Vishvanath Keskar.

We were much pleased and surprised at the wealth of historical records in this Museum and in recognition of its value both to India and also to the world; will endeavour to give it publicity in America so that it may grow in resourses and use-fulness as rapidly as possible.

of New York,
U. S. America
9-3-33.

James. J.
Lippincott,
Ammi C. Lippinoott.

नह सर-अफ्राज़ बूद्ह बिदानद कह अर्ज़हदाश्ती कह बहुज़ूर फायज़-उन-नूर इर्साल दाश्तह बूद्ह ईद् रसीद्ह तमामी मज़ामीन आं दर बन्दगी तमाम फर्खन्दगी ज़ाहिर व हुवेदा गश्त हकीकत सिपाहगिरी व जां-फिशानी शुमाहा कमायन-बगी बिनाबर अखबारात वाकअह-नवीसान खूब ज़ाहिर गश्तह मुज्राए शुमा कुली शाह खुमूस दरीं-वला मश्हूर-उद्-दौलत लायक-उल इनायत काबिल-उत-तर्बियत व अल-मर्हमत फिद्वी दियानत-दिसार मुअतमिद अमानत-असार दौलत-ख्वाह बिला-इश्तिबाह ज़ुब्दत-उल-अम्साल व अल-अश्बाह वेंकटी हग्रस सर शुरूअ हाकिम कुल कर्नातक हकीकत शुमारा बहुज़ूर तअरीज़ दाश्तह खूब मअलूम शुद्ह अल-हाल शुमाहा उम्मीद्वार नतीजह नक बूद्ह दर चह वेंकटी मुशारुन-इलैह बशुमाहा दिलासा मीकुनद दिलासाए हुज़ूर दानिस्तह बमूजब गुफ्तह ईशां दर कार व खिद्मत पादशाही जां-फिशानी नुमायन्द कह सर-अफ्राज़ ख्वाहन्द शुद तादानिस्तह बर हुक्म फर्मान आली रवन्द तहरीरन याज़्दहुम माह रम्ज़ान-उल-मुबारक सनह १०९७

[समासांत *] पर्वानगी हुज़ूर अन्वर अश्रफ अक्दस अर्फअ हुमायून अअला

सारांश

नेगोजी, मुकुंदजी, बिठोजी, मालोजी व तुकोजी यशवंतराव घोरपडे यांनीं जाणावें कीं, तुम्ही पाठविलेला अर्ज पोहोंचला व त्यांतील मजकूर स्पष्ट झाला. तुमच्या शिपाईगिरीची व प्राणार्पणाची हकीकत वाकेनवीसांच्या अखबारांवरून सुव्यक्त झाली. या वेळीं व्यंकटी हगरस (जगरस) सर्व कर्नाटकच्या हाकिमांचा सरशुरूअ याने तुमची जी हकीगत हुजूर लिहिली ती सुस्पष्ट झाली. आतां तुम्ही उत्तम परिणामाची आशा करीत आहा. तरी उपर्युक्त व्यंकटी तुम्हांस जो कांहीं दिलासा देईल तो हुजूरचा दिलासा जाणून त्याच्या म्हणण्याप्रमाणें पादशाही चाकरी व काम यांत प्राणार्पण करावें म्हणजे उत्कर्ष होईल. ता. ११ माहे रमजान सन १०९७

---

१२ वाई येथील थिटे व मालोजी घोरपडे.*

(श्री. ग. ह. खरे)

प्रस्तुत कागद श्री. स. ग. जोशी यांनीं वाई येथील थिटे घराण्यांतून आणला आहे.

ले. ६७ सु. १०६१ जिल्काद १५	[अलिफ*] [बा. शि*]	श. १५८२ आषाढ वद्य २ इ. १६६० जुलै १४

अझ रफ़्तखान(नह) गुदाश्तन्द सय्यद मख्दूम शर्झा(झह)खान खलद अय्याम दौलतहू बजानिब कारकुनान हाल व इस्तिकबाल व देसमुखान पर्गनह वाई बिदानन्द कह दर सन(नह) अहद सित्तैन अल्फ दरीं ला(वला) व हुमा रायाजी नरसीनक थिटे कस्बह वाई दर बार ई मालोजी राजह घोरपडे ईशान मअलूम कर्दन्द कह ई कदीम वतनदार हस्तन्द ईशानरा दर थानह मज्कूर —— हशमनवीसी फर्मायन्द कह खर्ज मअशिय्यत खूद सास्तह बूदं अर्ज़ मिहरबान शुदह दर खातिर आवर्दह दर थानह मज्कूर पेश अझ ई हशमनवीस हस्त ऊरा तगीर नमूदह रायाजी नरसीनक थिटे मज्कूररा बर नौकरी हशमनवीसी मुकर्रर नुमायन्द नायकवाडी भोगवटा हाल व इत्लाक हशम कह बाशद ईशान अझ पर्गनह मज्कूर हस्तनाद नफर दह व यक मशालची (मश्अलची)ता तालअन (तअय्युन) ऊ नमूदह साल दर साल कारकिर्द दर कारकिर्द दादह व तअय्युनात कह पेश हशमनवीस ईशानरा दहन्द अझ इस्तिकबाल पैवस्ती नौकरी गिरफ्तह राजमरह अदा कर्दह बाशन्द व हशम तअय्युनात नमूदह नामअ मुहताजी हशम नमूदह व अव्लाद व अहफाद नौकरी ठाणह मज्कूर बर्मायन्द तअलीक गिरफ्तह असल बाझ दहन्द बतारीख पान्झदहीम शहर जीकअद(दह) सनह ११[1]

---

* पा. स. ४१८५४.

१ या कागदांतील अक्षरविन्यास, भाषा, शिक्का आणि काल व व्यक्ति यांचे संबंध या गोष्टी इतक्या चुकीच्या आहेत कीं, हा कागद बनावट असावा असें वाटतें.

सारांश.

सय्यद मख्दूम शर्झाखान→ कारकून व देशमुख पर्गणे वाई

वांई येथील गयाजी नरसिंह थिटे याच्या बाबतींत मालोजी राजे घोरपडे यांनीं माहीत केलें कीं, हा जुना वतनदार असल्यामुळें यास या ठाण्याची हशमनवीसी द्यावी म्हणजे तो स्वतःचा निर्वाह करील. तरी या ठाण्याच्या पूर्वीच्या हशमनवीसास दूर करून गयाजी नरसिंह थिटे यास मुकरर करावें. हल्लींचे मिरासी नायकवाडी व हशमांची कचेरी यांसह १० माणसें आणि एक मशालजी नेमून देऊन पूर्वीच्या हशमनवीसाची तैनात यास द्यावी. यापुढें नेहमीं नोकरी करून वेऊन रोजमुरा देत जावा. तसेच तैनातीचे हशम नेमणें व त्यांच्या गरजा भागविणें हें करवून वंशपरंपरेनें या ठाण्याची नौकरी घेत जावी. ता. १५ जिल्काद सन ११.

---

१३ अफजलखान व वाईचे काजी.*

(श्री. ग. ह. खरे.)

प्रस्तुत फर्मान वाई येथील रास्त्यांचे कारभारी श्री. मुजुमदार यांनीं दिलें. हें फर्मान त्यांचें येथें येण्याचें कारण त्यांनीं फर्मानांतील जमीन खरेदी केली असावी. म्हणून खरेदी केलेल्याच्या खरेदीपत्राप्रमाणे हेंही फर्मान रास्त्यांनीं त्याजकडून घेतलें असावें.

ले. ६८ सु.१०६३रखर२५	बिस्मिल्लह–अर्रहमान– अर्रहीम[शि. *]	श.१८५४ माघ व. १२ इ.१६६३ जाने. २५

[फर्मान......] हाल व इस्तिक्बाल... व ... आंकह अझ शुहूर सनह सलास सितैन व अल्फ दर्रा विला शरीअत व फज़ीलत पनाह सियादत व नकाबत दस्तगाह काज़ी [शाह अबू तुराब] इब्न शाह अबू–अल–हसन हाकिम-उश-शरअ पर्गनह मज्कूर व पर्गनह कुन्दाल[1] बदर्गाह

---

* पा. स. १५।१८५४

१ कुडाळ परगण्यावर वाईच्या काजींचाच अमल चालत होता असें दिसतें. फर्मानांत कुडाळ बद्दल कुन्दाल लिहिलें आहे तें चूक नसावें असें वाटतें. अनेक

(पुढें चालू)

वाला-जाह इल्तिमास नमूद कह...अफ्ज़लखान मर्हूम बकस्बह पर्गनह... मज्कूर तज्वीझ कर्दह कह हवेली व इमारत खानहाए शरीअत-पनाह नझ्दीक हिसार कस्बह मज्कूर वाकअ अस्त अझीं वास्तह हवेली व इमारत खानहाए खूद अझां जा दूर नमूदह बराए हवेली व खानहा व इमारत बस्तन कतअह झमीन अझ शहर खारिज...पान्झ्दह बीगह बाग दाखिल दरख्तान अन्बह व अनार व गैरह कह नझ्दीक शक्करबीबी[1] वाकअ अस्त... हद व महदूद कर्दह दादह अन्द व खान मुमा-इलैह मर्हूम खूद बर झमीन मज्कूर आमदह इमारत...... साख्तह .... दादह बहुज़ूर खूद चुनां वस्फ ... कह बाकियाम कियामत बहेच वज्ह मिन-अल-वजूह झमीन मज्कूररा कसी खलल व कुसूर न नुमायन्द सद्दहु झमीन मज्कूर मअ दरख्तान अन्बह व अनार व आब नौबत व गैरह दुन्बालह शुदह अस्त दर आंजा काज़ी मुअझ्झ-इलैह......हवेली व इमारत खानह बस्तह खूश-हाल बाशन्द बमूजब खूर्दखत मर्हूमी हासिल अस्त नज़र इनायत फर्मूदह फर्मान......अझ राह मराहिम पादशाहानह [व फर्त अवातिफ खुस्रवानह पान्झदह बीगह झमीन बाग मअ दरख्तान अन्बह व अनार बआब नौबत...दरवज्ह इन्आम अब्दी व इकराम सर्मदी काज़ी शाह अबू तुराब मुअझ्झ-इलैहरा बमूजब खूर्दखत अफ्ज़लखान मर्हूम...मर्हमत फर्मूदह दहानीदह शुदह अस्त मीं बायद कह बमूजब खूर्दखत मर्हूमी-इलैह दुन्बालह नुमायन्द... मुजद्दद न नमूदह साल बसाल...रवां दारन्द

(मागील पानावरून पुढें चालू)

गांवांच्या नांवांतील अनुस्वार उच्चारसौकर्यार्थ गेल्या २।३ शें वर्षांत काढले गेले आहेत असें दिसतें. उ. अंकुळकोटचा हल्लींचा उच्चार अक्कलकोट, अंकुळगोबीचा हल्लीचा उच्चार अक्कलखांप. तसेंच कुन्दाळचें सोपें रूप कुद्दाळ व त्याचेंही सोपें रूप कुडाळ असावें. कदाचित् गुणद्हाळ—गुणदाळ प्रमाणें कुळद्हाळ, कुणद्हाळ, कुन्दाळ असें मूलतः कानडी शब्दाचें कुडाळ हें अर्वाचीन रूप असावें. येथें लचा ण होऊन न झाला व मग तो गळला असें मानावें लागेल. कुळद्हाळ याचा अर्थ शेत-गांव असा होईल.

१ शक्करबिबी ही कोणी साधू स्त्री असण्याचा संभव आहे. तिचें थडगें हल्ली कोठें आहे कोणास ठाऊक. पण वाईंतील आजची धर्मपुरी व गणपती आळी या दोन पेठा शक्करबिबीच्या बागेवरच वसल्या आहेत असें समजतें.

तअलीक नविश्तह गिरफ्तह असल बाझ दहन्द तादानन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तहरीरन फी बीस्त व पन्जुम माह जमादी-उस-सानी सनह... [३ शिक्के *]

[समासांत]...हुजूर खुर्शीद जूहर अश्रफ अक्दस हुमायून अअला

सारांश.

या वेळीं काजी शाह अबू तुराब बिन शाह अबुल हसन, वाई व कुडाळ या परगण्यांचा धर्माधिकारी यानें दरबारास विनंति केली कीं, ' अफजलखान मर्हूम.........यांनीं तजवीझ केली कीं, शहराच्या कोटा जवळ धर्माधिकाऱ्याचीं घरें आहेत तीं तेथून उठवून दूर करावीं.[1] घरें बांधण्यासाठीं शहरांतील जमीनीचा एक तुकडा व शिवाय शक्करबिबी जवळ असलेली १५ बिघे बागायत जमीन, आंबा, डाळिंब व इतर झाडें यांसह हदमहदूद करून दिली होती. उपर्युक्त खानांनीं स्वतः त्या जमीनीवर ...बांधिली आणि कोणीही कधींही अडथळा करणार नाहीं असें केलें. उपर्युक्त जमीन काजीच्या हवाला केली आहे. उपर्युक्त काजीनें घरें बांधून खुशाल रहावें अशी व्यवस्था केली. तशा प्रकारचें खुर्दखत आहे. तेव्हां फर्मान मिळावें ' तरी मरहूम अफजलखान याच्या खुर्दखताप्रमाणें काजी शाह अबू तुराब यास वरील जमीन आंबा, डाळिंब व इतर झाडें आणि पाळीचें पाणी यांसह दिली आहे. ताब्यांत घावी. ता. २५ जफर सुहूर सन १०६३

१४ लोहारें-भिलारे*

(श्री. ग. ह. खरे)

हें फर्मान जुन्या कागदपत्रांच्या शोधार्थ वाई जवळच्या लोहारें गांवीं गेलों असतां तेथें मारुति उमाजी भिलारे या वृद्ध मराठा गृहस्थाकडे

१ घरें उठविण्याचें कारण फर्मान जागजागीं फाटल्यामुळें स्पष्ट होत नाहीं. पण या फर्मानाच्या तत्कालीन भाषांतराचा एक कागद आहे त्यावरून ज्या ठिकाणचीं घरें उठविलीं त्या ठिकाणीं मशीद बांधावी अशी अफजलखानाची इच्छा असल्याचें दिसतें. तो कागद पाल्हाळीक असल्यानें येथें प्रसिद्ध केला नाहीं.

* पा. स. १५।१८५४.

मिळालें. हें फर्मान त्याजकडे कसें आलें हें समजत नाहीं. कारण या फर्मानांतील विषयाचा व त्याचा कांहीं संबंध असल्याचें दिसत नाहीं.

ले. ६९ सु. १०४५ } हुव अल-खलील अल्मुल्कु- {श.१५६७ ज्येष्ठ व.२.
हि.१०५५ रखर १६ } लिल्लह [१ शि.*] {इ. १६४५ जून १.

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब मश्हूर-उद्-दौलत किश्नाजी अपाजी पन्दित हवालहदार व लतीफखान थानहदार व कारकुनान हाल व इस्तिक्बाल किल्अह मन्दन[१] आंकह अझ शुहूर सनह खम्स व अर्बईन व अल्फ दरीं विला नारायन भत बिन विश्नूभत झुन्नारदार साकिन --[२]बदर्गाह मुअल्ला इल्तिमास नमूद कह खुदरा इन्आम झमीन रुब्अ चावर मिन्जुम्लह खालिसात दर सवाद मौजअ पन्जवार[३] किल्अह मज्कूर बमूजब खूर्दखत मुकासाई रवानस्त नजूर इनायत फर्मूदह फर्मान अश्रफ आतिफत शवद कह हुज्जत कवी गर्दद बिनाबरां इल्तिमास झुन्नारदार मज्कूर बखातिर मुबारक अअला आवर्दह अझ राह मराहिम पादशाहानह व फर्त अवातिफ खुस्रवानह रुब्अ चावर झमीन मिन्जुम्लह खालिसात दर सवाद मौजअ मज्कूर दाखिल महसूल व नक्दियात व जमीअ लवाझिमात व बेत बेगार व फर्मायश व झर बेलेकती व पापोसी मेझबानी व सेव (?) सलवेल व जन्गपती (?) व पश्कशी व झरी पती (?) सिक्कह हुमायून

१ या फर्मानांत मन्दन असें जें किल्याचें नांव आलें आहे तें वन्दन किल्याला उद्देशून असलें पाहिजे. म आणि व यांची अदलाबदल होते. येथें केवळ अदलाबदलीनें म आला नसून किल्याचें मूळचें नांवच कदाचित् मण्डन असें असणें शक्य आहे.

२ गांवाचें नांव दिलें नाहीं.

३ पन्जवार हें नांव पांचवड याबद्दल आलें आहे हें उघड आहे. या नांवावरून पांचवड शब्दाच्या व्युत्पत्तिबद्दल कांहीं सांगतां येण्यासारखें आहे. कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, पांचवड, चिंचवड वगैरे शब्दांत वड या शब्दानें वडाचें झाड लक्षित असावें. पण तिवाडी, आठवाडी, पंचवाप वगैरे शब्दांचा विचार केल्यास हा वड शब्द संस्कृत पाटक, वाटक, पाट, वाट, वाटिका, वाटिका, वगैरेंत अभिप्रेत असणारा अर्थ दाखविणारा आहे. तेव्हां पांचवड या शब्दाचा अर्थ पांच वाडे ज्यांत आहेत असा गांव हा होईल. येणेंप्रमाणेंच तिवाडी, आठवाडी वगैरे शब्दांचा अर्थ समजावा. म्हसवड या शब्दाचें महिसवाड असें मूळ रूप म्हसवड येथील श.१०६१ च्या लेखांत आढळून येतें हें पाहण्यासारखें आहे.

व कार इमारत व बअज़ बेत मुबारकह मुतबर्रिकह मअ्दन–उल–अम्न व मन्बह–उस–सुरूर व लवाझिमह देसाई व देसकुलकर्नी व नारगोन्दह व सादिलवार व भेत हवालहदार व थानहदार व तहसील व लवाझिमह दुवाझ्दह बलुतीयान व बअज़ कुल बाब व कुल वजूहात व सायर कानूनात इस्मी व रस्मी कलमी व कदमी नक्दी व जिन्सी आंजा कह दर दफातिर अअला सबत अस्त व पेश्तर अहदास शवद दर वज्ह इन्आम नारायन भत बिन विश्नूभत झुन्नारदार मज्कूर मर्हमत फर्मूदह दहानीदह शुदह अस्त मी बायद कह झमीन मज्कूर हस्ब–उल–मस्तूर बुन्बालह नुमायन्द व बअद ऊ बअव्लाद व अहफाद ऊ जारी साझन्द व हर कह दरीं इन्आम खैर मानअ आयद मन्नाअ–लिल–खैर मुकय्यद अहम गर्दद व हर सालह उज्र फर्मान मुजद्दद न नमूदह साल बसाल बर हमीं फर्मान रवां दारन्द तअ्लीक नविश्तह गिरफतह असल बाझ दहन्द तादानन्द बर हुक्म फर्मान अश्रफ रवन्द तहरीरन–फी–अत–तारीख १६ शहर रबीअ–उस–सानी सनह १०५५

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर अश्रफ अक्दस हुमायून अअला

[खालीं २ शिक्के *]

सारांश.

बादशहा→ कृष्णाजी अप्पाजी (आबाजी) पंडित हवालदार व लतीफखान ठाणेदार किल्ले बंदन.

नारायणभट बिन विष्णुभट राहणार यानें विनंति केली कीं, मजकडे पांचवड गांवांत खालआपैकीं पाव चावर जमीन मोकाशाच्या खुर्दखताप्रमाणें चालू आहे. आतां फर्मान मिळावें. तरी त्यास ती जमीन वंशपरंपरा इनाम म्हणून दिली आहे. चालवावी. ता. १६ रखर हि. १०५५

---

१५ जुन्नर येथील ४ फारसी शिलालेख.*

(श्री. ग. ह. खरे.)

जुन्नर येथें फारसी कागदपत्रांच्या शोधार्थ गेलों असतां मला पुढील

---

* पा. स १६।१८५४.

चार लेख मिळाले. माझ्या माहितीप्रो हे लेख अजून कोठेंही प्रसिद्ध झालेले नाहींत. लेख इतर अनेक फारसी लेखाप्रो मामुली स्वरूपाचे आहेत.

१

हा लेख जुन्नरच्या दक्षिणेकडील भागांत घोडेपीर या नांवाशी संलग्न अशी जी एक अर्वाचीन मशीद आहे ती मधील पाण्याच्या हौदाजवळ उत्तरेच्या अंगास पटांगणाच्या चबुतऱ्यास बसविलेला आहे. हा लेख मूळचा तेथील नसून गांवाच्या दक्षिणेस लाल वेस म्हणून जी एक वेस होती ती जवळ होता असें सांगतात. त्याच वेशीजवळ आणखीही एक शिलालेख होता असें तेथील लोक सांगतात. पण हल्लीं तो लेख तेथें कोठेंही सांपडत नाहीं. असो. हा लेख तेथील एका खान बहादूर सुभेदारानें घोडेपीराची मशीद बांधतेवेळीं लालवेशीपासून उचलून आणून या हौदावर बसविला असें त्या सुभेदाराच्या मुलानेंच मला सांगितलें. या लेखाची लांबीरुंदी २′, ७″ व १′,१″ असून सभोंवार सुमारें दोन इंच जागा सोडून मधील भागांत उठावदार-रीतीनें हा लेख खोदला आहे. या लेखाच्या ओळी चार आहेत. लेखनाच्या दृष्टीनें हा सदोष आहे. कारण यांत खुणांचा उपयोग केलेला नाहीं येवढेंच नव्हे तर टिंबेंही कोठें पाहिजेत तितकींच, तर कोठें जरूरीहून कमी, तर कोठें जरूरीहून जास्त दिलीं आहेत. यामुळें लेखाचें वाचन करणें थोडें कठीण होऊन बसलें आहे. याची भाषा फारसी असून कविताबद्ध आहे. यांत कालाचा निर्देश दोन तऱ्हांनीं केला आहे. आकड्यांनीं केलेला निर्देश ९८६ असा मी वाचतों. अब्जद पद्धतीनें केलेला निर्देश 'ऐन खुर्रमीहा' या दोन शब्दांत व्यक्त झालेला आहे. या दोन शब्दांची किंमत अब्जद पद्धतीनें ९८६(=७०+१०+५०+६००+२००+४०+१०+५+१) इतकी येतें. अर्थात माझ्या आकड्यांच्या वाचनांत व अब्जद पद्धतीनें दिलेल्या सनांत फरक पडत नाहीं हें उघड आहे. पण ९, ८, ६, या तीन आकड्यांपैकीं ६ चा आकडा ठशामध्यें व मूळांत दोन्ही ठिकाणीं अस्पष्ट असल्यामुळें तो आकडा ९ सारखा दिसत आहे व या मशीदीच्या जवळच रोशन नांवाची जी मशीद आहे तिच्या मुख्य मिहराबेच्या वर जो एक अरबी लिखाणाचा दगड बसविला आहे त्यांत ९८९ हा सन दिला आहे; तसेंच पुढें वाचणाऱ्या लेखांतही ९८९ हें साल दिलें आहे.

घोरपडे सेनापती व राजश्री धनाजी जाधवराऊ सरलस्कर सेनासंभार घेऊन येतील त्या समागमे तुम्ही आपल्या जमावानसी हुजूर येणे येथील गनिमास कोटगा घालणे मग तुम्हाकडील सरंजाम करणे तो केला जाईल तुम्हा लोकाचे चालवणे हे स्वामीस अगत्य आहे तुम्ही आपले समाधान आसो देऊन सत्वर फौजेनसी येणे राजश्री अंमृततराऊ महाल आपणासी दिल्हा म्हणोन कटकट करिताती येविषई लिहिले तरी त्यासहि सेनासमुदायानसी बोलाविले आहे तेहि येतील तेव्हा जो निर्वाह कर्तव्य तो केला जाईल तुम्ही राजश्री धनाजी जाधवराऊ सरलस्कर याचे तावीन आहा तैसे आसोन त्यासमागमे त्वरीस येणे [नि*] बहुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा[२]

पौष छ १२ सफर मुा आदखी बुवा पूर्णमा शणवार

ले. ७२९ } { श. १६१६
मू. दा. प. } { इ. १६९४

श्री

राजश्री मुधोजी नाईक निंबालकर

गोसावी यासि

॥ दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राज्यमान्ये——————

प्रती राजश्री राजाराम छत्रपती उपरी कर्नाटक प्रांते गनिमाने सख्ती बहुत धरून भोवताली स्थले घेतली सांप्रत घेटवालहि पालेगाराचे भेदेकडून गनिमाने हस्तगत केले स्वामिचे लोक झाडीत होते ते गनीम येकायेकी पैसला देखोन निघोन आले याउपरी आजी आगर उदिया इतकियांत चंदीचे तटाजवळी येउनू कोटास बिलगोन येलगारच करणार हावभरी बहुत जाला असे ऐशास येथे राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकत मदार समशेर-बहादूर हे आदिकरून स्वामिसंनिध आहेति याणी निदान जाणोनू साक करायाची नियेत धरून राहिले आहेती हे गनिमास नतिजा पावावयाचा

१ निंबालकरच. २ शके क. ७२६ प्रा.

तैसा पाविनील गुमान धरीत नाही परंतु गनिमास मारून चालवावे फौज बुडवावी या गोष्टीस देशीची फौज आली पाहिजे ह्यास फौज घेउनू येणे म्हणून राजश्री संताजी घोरपडे सेनापती व राजश्री धनाजी जाधवराउ सरलस्कर यास व तुम्हास पत्रे उदंड पाठविली परंतु आद्याप फौज घेउनू येता दिसानासे जाले आहे येथे तो निदान प्रसंग प्राप्त आहे जरी येका महिनियांत फौजेनसी येता तरी राज्य राहाते स्वामि समाधान पावताती तुम्हा लोकास येश येते जरी फौजेस यावया विलंब लागतो तरी महिनिया-उपरी उबार नाही राज्य बुडते मग तुम्हा(म्ही) स्वामीचे सेवक असोनू कोणा प्रयोजनाचे स्वामी आपले राज्य संरक्षण करायाचे तैसे करितील परंतू तुम्हा लोकाचे बरे होणार नाही हा निर्वाह जाणोन जरी स्वामिस समाधान पावावे आपले बरे करुन घ्यावे येसे आसेल तरी आपल्या जमावानसी राजश्री धनाजी जाधवराऊ सरलस्कर उमदेतुलमुलुक यांजबराबरी स्वार होउनू येणे विलंब न करणे [नि*] जाणिजे बहुत काय लिहिणे मर्या देयविरो जते

[राजारामाची] सुरुसुद समंत बार[1]

२१ एक नवीन सुहूर सन*

(श्री. ग. ह. खरे)

ज्या पत्रांवरून या सुहूर सनाची माहिती दिली आहे तीं पत्रें रात्रेरकर राजे देशमूख यांच्या संग्रहांतील आहेत.

[१२ ओळी फारसी मजकूर व ३ शिक्के*]

ले. ७३०) मु. चा. सं.)	शहाजादीये सुलतान खुरुम	{ श.१८९३ पौष शु.३ इ.१६६१ डिसेंबर १४

मिर्जा इ मिर्जा अलहियार बेग अमीन साहेब खोजगी साहेब फौजदार   राजश्री राघोजीपत सेकदार व भया उधोदासजी कारकून

१ दोन्ही पत्रें श्रीमंत फलटणकर साहेब यांचे संग्रहांतील आहेत.

* मा. स. १४।१८५३

महजरनामा बीहुजूर ———————————— व हजीर मजा-
लस चौत्रा पा। येदलाबाद सुा। अर्बा सन हजार १०७१ कारन महजर-
- -

१ या पत्रांत कालाचे दोन उल्लेख आहेत. पैकीं शेवटच्या उल्लेखांत वर्षाचा निर्देश सन १०७१ असा आहे. हा उल्लेख फसली सनाचा आहे असें नेहमीच्या अशा प्रकारच्या उल्लेखांच्या परिपाठावरून धरण्यास हरकत नाहीं. आरंभीचा कालनिर्देश 'सुा। अर्बा सन हजार १०७१' असा आहे. पुणें सातारा किंवा कोकण या बाजूस मिळालेल्या कागदांत असा उल्लेख आला म्हणजे अर्बा हा शब्द सुहूर सनाचा शेवटचा आकडा दाखवितो व 'सन हजार १०७१' हा निर्देश फसली सन देतो असें आपण मानतों. म्हणजे या ठिकाणीं सुहूर १०६४ व फसली १०७१ आहे असें आपण समजतों. पण त्या समजुती प्रमाणें या निर्देशाचा विचार करूं लागलों तर एक अडचण येते. महाराष्ट्रांत चालू असलेल्या सुहूर व फसली या दोन सनांत ९ वर्षांचें अंतर असतें. येथें तर ७ वर्षांचें अंतर आहे. तेव्हां सुहूर सनाचा उल्लेख बरोबर आहे असें धरलें तर फसली १०७३ असा लिहावयास पाहिजे होता. पण पत्रांत दोन्ही ठिकाणीं १०७१ असाच फसली सनाचा उल्लेख आहे. तेव्हां सुहूरचा 'इसने' असा उल्लेख करावयास पाहिजे होता असें म्हणावें लागेल. एवंच मामुली पद्धतीप्रमाणें विचार केला तर दोन उल्लेखांपैकीं कोणत्या तरी सनाचा उल्लेख चुकला असें म्हणावें लागेल. उत्तरेंतील फसली दक्षिणेंतील फसलीपेक्षां दोन वर्षांनीं लहान आहे हें प्रसिद्ध आहे. या पत्रांतील फसली सनाचा उल्लेख उत्तरी पद्धतीचा आहे असें मानलें तर दोन्ही उल्लेख एकमेकांशीं जुळते आहेत असें ठरेल. कारण उत्तरेंतील फसली व दक्षिणेंतील सुहूर यांच्या मध्यें ७ वर्षांचें अंतर पडतें व तितकेंच अंतर या पत्रांतील सुहूर सन व फसली सन यांत आहे.

या युक्तीनें या पत्राचा निकाल लागून कालनिर्देशांत विरुद्धता नाहीं असें ठरेल. पण दुसऱ्या एका पत्रांतील कालनिर्देशांचा विचार केला तर वरील युक्ती चूक आहे असें दिसून येईल. तें पत्र मीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे (ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १, ले. ३.). यांत कालाचे दोन निर्देश आहेत. पैकीं आरंभीं 'शुहूर सनह अल्फुल्-महसूलियह' असा उल्लेख असून शेवटीं 'सनह सित्त व अल्फुल-हिजारिय्यतुल्-मुस्तफविय्यह सनह १००६' असा अक्षरीं व आकड्यांत दुहेरी उल्लेख आहे. पहिला उल्लेख सुहूर सनाचा व दुसरा हिजरीचा आहे हें उघड आहे. हिजरी सन कोठेंही एकच प्रकारचा आहे हें सांगावयास नको. हि. १००६ ला जुळता असा सुहूर सन आपल्या पद्धतीप्रमाणें ९९८ हा येतो. पण प्रकाशित पत्रांत १००० असा अक्षरीं उल्लेख आहे. हि. १००६ ला जुळता फसली सन दक्षिणी १००७

[पुढें चालू]

नामा यैसा साहेबी कसबे मजकूरचे मोकदम कालीकर व पाढरकर हुजूर बोलाऊन फर्माविले जे माहादेव नायेक देसमूख पाा मो। मयेत जाला त्याचे

[पृष्ठ ८३ वरून पुढें चालू]

व उत्तरी १००५ येतो. दक्षिणी फसली व येथील सुहूर सन यांत ७ वर्षांचें अंतर येतें. आपल्या पत्रांतही सुहूर व फसली यांमध्यें ७ वर्षांचेंच अंतर येतें. तेव्हां आजच्या पत्रांतील सुहूर व प्रकाशित पत्रांतील सुहूर हे एकाच प्रकारचे असावेत. या दोन पत्रांतील सुहूर महाराष्ट्रांतील सुहूरपेक्षां २ वर्षांनीं मोठा दिसतो. या पत्रांतील फसली मात्र दक्षिणेंतील फसलीच धरला पाहिजे. एरवीं दोन्ही पत्रांतील सुहूर सनांच्या उल्लेखांचा मेळ बसवितां येत नाहीं. प्रकाशित पत्रांत ' महसुलाचा ' असें एक विशेषण सुहूर सनाला लावलेलें आहे. या विशेषणाचा अर्थ येवढाच दिसतो कीं हा सुहूर महसुलाच्या सोयीसाठीं सुरू केलेला असावा. हा सुहूर खानदेशांतील फारूकी सुलतानांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांत चालत असावा असें प्रकाशित पत्रावरून निश्चयानें म्हणतां येते. आजच्या पत्रावरून निश्चयानें म्हणतां यणार नाहीं. कारण प्रकाशित पत्र खास फारूकींच्या राजवटींतील आहे. आजचें पत्र फारूकींचें राज्य बुडाल्या नंतर सु. ६० वर्षांनीं लिहिलेलें आहे. सारांश फारूकी अमदानींत एक निराळा व नवीन सुहूर सन चालू होता असा तर्क करतां येतो. या तर्काला पुष्टी देणारें असें आणखी एक पत्र श्री. रावेरकर राजे देशमुख यांच्या संग्रहांत आहे. संबंध पत्र महत्वाचें नसल्यानें जरूर तेवढा भागच पुढें दिला आहे. ' राजीनामा बेस्मी मोकदमानी व रयान देहाये प्राा रावेरी सुबे खानदेस सुर सन मलास सन १०७० कारने लेहान दिधला येसा जे' (रावेर–राजे देशमुख संग्रह क्र. ९५)

या तीन पत्रांतील सुहूर सन फारूकी सुलतानांनीं आपल्या राज्यांत सुरू केला असल्यास तो केव्हां सुरू केला हा प्रश्न आहे. दक्षिणेंतील सुहूर सन हि. ७४५ मोहरम १ किंवा इ. १३४४ मे १५ या दिवशीं म्हणजे मुहम्मद तुघलकानें देवगिरी राजधानी करण्याच्या सुमारास सुरू झालेला असावा असा तर्क आहे (पहा ओझा– प्राचीन लिपीमाला दीक्षित– भारतीय ज्योतिषशास्त्र). सुहूर सनाचें ७४५ हेंच वर्ष आरंभवर्ष म्हणून धरलें होतें. हि. ८१२ हें साल असें आहे कीं, याचा आरंभ इ. १४०९ मे १६ ला म्हणजे बरोबर ६५ सौर वर्षांनीं किंवा ६७ चांद्र वर्षांनीं होत आहे. या सालीं या पत्रांत आलेला फारूकी सुहूर सन चालू झाला असें मानलें व त्याचें साल ८१२ हेंच धरलें गेलें असें समजलें तर–दक्षिणेंतील सुहूरचें साल यावेळीं ८१० हें येत असल्यानें– फारूकी सुहूर दक्षिणी सुहूरपेक्षां २ वर्षांनीं मोठा ठरेल.

या वर्षी खानदेशांत नवीन सुहूर गणना सुरू करण्यास कांहीं कारण घडलें आहे कीं काय हें पाहिले पाहिजे. हि. ८१२ (इ. १४०९) च्या सुमारास दक्षिणेंतील १२

[पुढें चालू]

घर देसमुखीमधे अथवा देसमुखी आधी येसी पुरसीस केली[1] यावर मोकदम कालीकर व पाढरकर येही सांगितले जे येही घर बाधले तें नवाब असफखान उमराव येदिलस्या फारोखी[2] येही कसबे मजकुरी कोट बाधला तें दताजी माहादेव नायेक घर व दुकान बाधले त्याचे वारीस त्रिंबकजी नायेक व गोपाळजी नायेक त्याचे वारीस माहादेव नायेक व दताजी नायेक देसमुखी घेतली अमल ———————— जागीर माहाराजा उदाजीराम तें घेतली कदीम अल ग्राम हवेली व दुकान आहे यासि कुरशा च्यार जाल्या आहेत हे लिहिले सही

तेरीख १ माहे जमादिलावल सन १०७१

बी कलम नारोजी दादो निसदा कसबे मजकूर

[पृष्ठ ८४ वरून पुढें चालू]

वर्षांचा दुर्गादेवीचा दुष्काळ नुकताच संपला होता. दुष्काळ संपल्यानंतरचें हें पहिलेंच साल होतें असें म्हणतां येतें. या सालीं नव्यानेंच वसूली करावयास सुरवात झाली असणें शक्य आहे. गंवरच्या राजे देशमुखांच्या कागदांत एक कागद आहे. त्यांत पडिक जमीन लागवडीस आणतांना सारा कसा घ्यावा हें सांगितलें आहे. त्यांत कोणत्याही जमिनीचा जो धारा पूर्वीपासून ठरला असेल त्याचा ¼ हिस्सा १ ल्या वर्षीं, ½ हिस्सा २ ऱ्या वर्षीं, ¾ हिस्सा ३ ऱ्या वर्षीं आणि सर्व धारा ४ थ्या वर्षीं घ्यावा असें सांगितलें आहे. या ठिकाणींही पहिल्या वर्षीं कांहीं सारा वसूल केला असेल व महसुलाचें वर्षही नव्यानें सुरू केलें असेल. तेव्हां हि. ८१२ मध्यें फारूकी सुलतानांनीं एक नवीन सुहूर सन सुरू केला असें सध्यां गृहीत धरण्यास हरकत दिसत नाहीं.

१ हा शब्द ओळीवर आहे.

२ 'येदिलस्या फारोखी' म्हणजे फारूकी वंशांतील आदिलखान किंवा राजा अलीखान हा होय. याची कारकीर्द इ. १५७६ ते १५९६ अशी आहे. याच्या पदरचा उम्राव असफखान यानें आदिलाबाद शहरास कोट बांधला असें सांगितलें आहे. या असफखानाचा इतरत्र उल्लेख सांपडत नाहीं. पण यावरून आदिलाबाद शहराचा कोट इ. १५७६ ते १५९६ यांच्या दरम्यान बांधला गेला हें मात्र स्पष्ट होतें. यांतच खुर्रम म्हणजे शाहजहान हा शाहजादा असतांना बऱ्हाणपूरच्या बाजूस अमल चालवीत होता व याच्याच अमलांत महाराजा उदाजीराम यांजकडे या भागाकडील जागीर होती असें सांगितलें आहे.

[समासांत*] गौही येसा पा। व घोडे सेटी व काळीकर व पाडरीकर व समस्त परजा का। मा।

---

२२ उदाजीराम व येदलाबाद परगणा*

(श्री. ग. ह. खरे.)

[आरंभीं वर व डाव्या अंगास असे दोन शिक्के*]

ले. ७३१ } { श. १५४६ मार्गशीर्ष शुक्ल ७
मू. पा. सं. } { इ. १६२४ नोव्हेंबर ७

अज रख्तखाने माहाराजा उदाजिराम साहेब दामदौलतहू बजानेबू कारकुनानी पा। येदलबाद बिदानं [द*] सु॥ सन सबा असरेन अलफ कसबे मजकुरी तले करावयाची जागा आहे ते जागा त्रिंबकजी नायेक आपण जे पैके लागतील ते वेचुनू तले करुनू पाहातातीं तरी याचे मुतालीक तलेयास कांमं लावितील पैके ते वेचितील तुम्हाकरिता जे मदती होवेल ते करण व तले मुस्तैद करितील त्याखालेया व नवाह बजर जागा नाकिकिर्दी चावर १८ यकुनू नितन[२] १३८३ तेरा नितने तीन बिघे इनाम अजरामऱ्हामती मोईन करुनू दीजे गुरास पानियाची आबादानी होईल

---

* २० वें संमेलन. १ ही की गाळावी.

२ नितनें हा शब्द कोशांत सांपडत नाहीं. येथें १ चावरांत १३ नितनें व ३ बिघे इतकी जमीन बसते असें सांगितलें आहे. म्हणजे एका नितनाबरोबर ९ बिघे जमीन येते. नितन हा निवर्तन या शब्दाचा अपभ्रंश असेल काय? इतरत्र १० हस्त म्हणजे एक वंश व २० चौरस वंश म्हणजे एक निवर्तन असें सांगितलें आहे. येथें ९ बिघ्यांचा एक नितन होत आहे. तेव्हां हे दोन्ही शब्द एक असूं शकणें कठीण आहे किंवा मानांत तरी मोठा बदल झाला असें मानलें पाहिजे. पेशवे दप्तरांतील खानदेश कडील भागाचे कागद तपाशीत असतां त्यांत प्रतन, नितन इत्यादि क्षेत्रपरिमाण दाखविणारे शब्द आपणास आढळले असे प्रो. वा. गो. काळे म्हणतात. तसें असल्यास नितन शब्द निराळ्या रीतीनें व्युत्पादिला पाहिजे.

व जमी बहूत पान्याखालया भिजेल उदीम बहूत होईल [नि*] मोर्तब् हे विनती[1]

रुजु सुरुनिवीस
[पाठीवर*]
तेरीख ९ माहे सफर
सफर

बार दफ्तर
सुरु निवीस

२३ वडतुंबी--जेधे*

(श्री. ग. ह. खरे व श्री. स. ग. जोशी)

ले. ७३२ } श. १५८९ वैशाख वद्य ४
मू. दा. प. } इ. १६६७ मे १

दि[2]मसुरळ अनाम राजेश्री सिवाजी जेधे देसमुख ता। रोहिडखोरे यासि निलो सोनदेऊ व अनाजी दतो केमो त्रिमळ सु॥ सबा मितैन अलफ

१ या पत्रावरून व वर दिलेल्या पत्रावरून उदाजीराम यांस आदिलाबाद परगणा जागीर होता असें दिसतें. मागील एका पत्रांत आदिलाबाद परगणा उदाजीरामास जागीर होता ऐवढेंच सांगितलें आहे. या पत्रावरून तो परगणा सु. १०२८ च्या सुमारास जागीर होता असें दिसतें. येथील सुहूर सन फारूकी सुलतानांनीं वापरलेला कीं दाक्षिणी सुहूर हें निश्चित नसलें तरी बहुधा फारुकी सुलतानांनीं वापरलेलाच असावा. अर्थात याचें शकांत रूपांतर श. १५४६ असें होईल. मागें श्री. या. मा. काळे यांनीं उदारामा विषयीं एक लेख मंडळाच्या त्रैमासिकांत लिहिला आहे. त्यांत त्यांनीं उदाजीरामास आदिलाबाद परगणा जागीर असल्याचा उल्लेख कोठें केलेला नाहीं. तसेंच त्यांस महाराजा हा किताब असल्याचेंही सांगितलेलें नाहीं. शिवाय त्यांच्या म्हणण्याचा रोख असा दिसतो कीं, उदाजीराम हें नांव शहाजहानच्या वेळीं पडलेलें असावें. पण हें पत्र जहांगीरच्या कारकीर्दीतील असून त्यांत उदाजीराम असा स्पष्ट शब्द आहे. * पा. स. १५।१८५४.

२ प्रस्तुत पत्र आम्हांस वडतुंबी (तर्फ आंबोर्डे संस्थान भोर) येथील श्री.

[पुढें चालू]

ता। मजकुरी तुमची घरे व सेते मिरासीची आहेती ती सालाबाद चालत आहेती येसियास दर्म्याने सर्जाराऊ इही इस्कील करुनू तुम्हास घरे व सेते देत नाहीत म्हणौनू तुम्ही हुजूर येउनू सांगितले त्यावरून हाली त्यांस लिहिले आहे तेणेप्रमाणे तुमची सेते व घरे आहेती ती सालाबादप्रमाणे तुमची तुम्हास देतीळ तुम्ही राजेश्री—— साहेब येती[२] तोवरी आपले वतनी आसणे साहेब आलियावरी[१] सर्जारायाचा व तुमचा निवाडा होईल तोवरी तुम्ही गावीच आसणे व त्याचे लोक धिंगाई करीत आहेत तेही बाबे सर्जारायास लिहिले आहे ते आपल्या लोकास हालखुद ठेविती छ १७ जिलकाद[नि*] पा। हुजूर[नि*] रुजू [वा*] लेखन सीमा समु लसती

सुरु सुद

२४ पाटगांव–मौनीबावा*

(ग. सा. गो. स सरदेसाई.)

ले. ७३२) श्री (श. १५९९ वैशाख व. ७
मू. दा.प.) (इ. १६७८ मे ३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४ कालयुक्त संवत्सरे वैशाख बहुल सप्तमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती याणी राजश्री गणो राम

[मागील पृष्ठावरून पुढें चालूं]

जेधे यांजकडे फारसी फर्मानांच्या शोधार्थ गेलों असतां मिळालें. यांत शिवाजी व सर्जाराऊ जेधे यांच्या खाजगी भांडणाविषयीं जी माहिती आली आहे ती समजण्यासाठीं शि. च. सा. खं. २ ले. २२० व २२१ हे पहावे.

१ या वेळीं साहेब म्हणजे शिवाजी महाराज कोठें गेले होते हें या पत्रांत नाहीं. पण जेधे शकावली 'वैशाख मासी बहलोलखान व राजश्री येकोजी राजे रगाणियास वेढा घातला राजश्रींनी वेढा मारून काढिला' असें सांगते. तेव्हां जेधे शकावलींतील नोंदीच्या खरेपणास हें पत्र पुरावा होऊं पहातें. पहा शि.च.सा.खं.ले.११५६

* २० वें संमेलन.

[ब*] श्री
शिवचर
णीतत्पर त्र्य
बकसुत मो
रेश्वर

देशाधिकारी ता कुडाल यासी आज्ञा केली यैसी जे मौनीबावा पाटगांवी आसतात त्याचे दर्शनास अतीत आभ्यागत आगातुक बहुत येत आसताती त्याला येकदा आंन पावावे म्हणजे सतुष्ट होउनू जात जातील म्हणून तुरु[त] गिरी बावाचा सिष्य याणे सांगितले त्यावरून आतीतआभ्यागताबदल प्रतिवर्षी येक हजार माणसाची सामग्री देविली आहे दर माणसास

तादूल वजन सडीक	कणीक वजन	दाळी वजन	तूप वजन	मीठ वजन
८८१॥०	८८१॥	८८॥	८८।.	८८८९

येकून पाउणे च्यारी सेर नवटाक रास याप्रमाणे हाजारा माणसाची बेरीज होईल ते आवल साल सन तिसा सबैनापासन देणे खर्च लिहिणे मुजरा होईल तुम्ही हे सामग्री त्याचेथे तुरू [त] गिरिपासी वर्षामधे येकदा येकथोक देत जाणे तो आल्या गेल्यास ++ करील तैसे देत जाईल तुम्ही काही त्याचे खर्चात मन न घालणे [नि*] लेखनालंकार

[प*]मर्या
देयं विरा
जते

ले. ७३४ } श्री गुरवे नमा { श. १६०० माघ शुद्ध १५
मु. दा.प. } श्रीमत्परमहंउस श्रीस्वामी { इ. १६७९ जानेवारी १६

स्वस्ति श्री नृप शालिवान शके १६०० सोळासे कालयुगत नाम सवंछरे माघ सुध पुर्णीमा गुरुवासरे

पूजेसी पुष्पासी मौजे मानी कर्याती पाटगाऊ येथे स्थळ घोडेचे वाहोळ पासून उतरभाग हद उंबराचे झाड पूर्वेसी डोगराचा मस्तक पावेतो दोनी डोगराचा मध्यभाग येसे स्थळ नेमून दिल्हे असे हे सत्य

[शिक्का *][1]

नीभाजी कृष्ण

भिवजी देसाई बिन पीलजी देसाई का। मार दतपत्र लिहून दिल्हे असे हे सत्य हे उतरोतर चालवावे

निशान नागर

अतो बहिरदेव देसकुळकर्णी का। मार दतपत्र लिहून दिल्हे असे हे सत्य उतरोतर चालवावे

ले. ७३९ } मू. दा. प. } श्री { श. १६०१ चैत्र वद्य ९ { इ. १६७९. मार्च २६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ५ सिधार्थीनाम सवत्सर चैत्र बहुल नवमी बुधवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी राजश्री गणो

[लं.व*] श्रीशिवराजे राम देशाधिकारी व देशलेखक प्रात कुडाल यासि

द्रहर्षनिदान ॥ कृष्ण

बकसुत मोरेश्वर

मुख्य प्रधान

आज्ञा केली ऐसी जे गतवर्षी स्वामी स्वारी करून कोकणात जाता पाटगाी मुकाम जाला ते समई मौनीबाचे दर्शन घेतले तेव्हा मौनी गोसावियापासी सेवेस पुराणिक १ व हरदास १ व म्रुदगी १ आहेत तेही स्वामीस विनती केली की आपण गोसावियाचे सेवेस राहतो आपल्यास वरशास काही पाविले पाहिजे ते समई स्वामीनि मान्य केले परतु सनद दिली नाही त्याकरिता यास काही पावले नाही हाली स्वामीने त्यास [मे]ईन करून सनद देविली पाहिजे म्हणउ [नू]तुम्ही विनंती केली त्यावरून मौनी गोसावियाचे सेवेस आहेत त्यास वर्षास मोईन केली असे निशाणी होन

हरदास ६

पुराणिक होन नि [शाणी] ६

म्रुदगी निशाणी ६

[1] श्रीरामचरणपंकज सेवन नीबाजी कृष्ण परम पावन

येकूण अठरा हो [न] निश्याणी इा साल मजकुरापासून केले आहेत येणेप्रमाणे मौनी गोसांवी पाटगावी अगर अनखी कोठे जवल प्राती असतील तेथे समाचार घेऊन सदरहुप्रा देत जाणे धमार्थ म्हणून खर्च लिहिणे मजुरा होईल [नि*] लेखनाऽंकार [प*] मर्यादेयं विरा जते

छ २२ मास चैत्र

चैत्र ऊर्फ सफर. सुरू सुद बार

३ रबिलावल

ले. ७३६ }
मू. दा. प. }

श्री

{ श. १६०२ आश्विन शु. १
{ इ. १६८० सप्टेंबर १३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७ रौद्रनाम संवत्सरे आश्विन शुद्ध प्रतिपदा इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति याणी राजश्री गणो राम देशाधिकारी व देशलेखक प्रात कुडाळ यासि* आज्ञा केली यैसी जे तुम्ही हुजूर येऊन स्वामीस विनति केली कीं राजश्री मौनी गोसावी पाटगावी राहतात बहुत थोर ईश्वर पुरुश आहे त्यास पालखी आहे परतु नेहमी भोई नाहीत तरी नेहमी भोई व वाजत्रीचे + + करून देविले पाहिजे + + + यैशास भोयास व वाजत्रीयास मोईन होन निशाणी १२९ सवासे करून दिले आहेती यात भोई व वाजत्री ठेवून देणे ते सेवा करतील तुम्ही मदरहू पैके तुरुतगिरी सिश्य गोसावियांचा आहे त्याजवळ पावीत जाणे ते भोयास व वाजंत्रियास हक्क पावितील सदरहू मोईन इा साल मजकुरापासून केली असे यासी वाजत्री तुम्ही ठेविले आहा भोई ठेवून देणे आहे यैशियास वाजत्री ज्या दिवसापासून साल मा ठेविले

---

* येथं वाजूवर खालील प्रल्हाद निराजीचा लंबगोल शिक्का आहे.

लक्ष्मीनृसिंहभक्तश्रीनीररायाब्धिजन्मणः। प्रल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजृंभते॥

असाल ते दिवसापासून वाजत्रीयास वरशास पचवीस होनप्रा पाववणे. उरले शंभर होन यासि भोई ज्या दिवसापासून ठेवाल ते दिवसापासून साल-मारचे हक पाववणे पुढे सदरहू शंभर होन भोयास व पचवीस वाजत्रियास याप्रा साल दरसाल पावीत जाणे आणि धर्मार्थ म्हणून गोसावी याचे नावे खर्च लिहीत जाणे ताजा सनदेचा उजूर करीत न जाणे गोसावी कुशल असतील तो चालवीत जाणे असल गोसावियाच्या सिशापासी देऊन तालिक सुभा विले लावणे सदरहू सवासे होन निवळ देविले आहेती यासि वजा वाटा व माफ असे[नि*] लेखनालंकार

[वा*]मर्यादेयं सुरू सुरूनिवीस पो छ १६ माहे रमजान

विजयते

छ २९ माहे शाबान

शाबान

पौ छ २९ रमजानु

ले. ७३७ } श्री मोहनीबावा { श. १६०५ श्रावण शुद्ध ११
मू. दा. प. } { इ. १६८३ जुलै २४

जाबिते मोईन श्री स्वामी मुकाम पेठ पाटगाऊ सुबा पो कुडाल सुहूर सन सलास समानीन आलफ आज माईन बा सनद राजश्री छत्रपति स्वामी शक ९ दुदुभी नाम संवछरे भाद्रपद बहुल त्रयोदसी भोम वासरे' साळिना मोईन पादशाही ४०० दर १। येकून निशाणी होन ५००८

पूजा	निा होनु
९२॥।=	नित्य पूजा
६४॥	नैमित्य पूजा
११॥	वार्षिक वस्त्रे
१२८॥।=	

---

१ ता. ११।९।१६८२

नित्य पूजा

नवेद रोज ३६५ यकूण दर रोज निशाणी होनु

३८० कणिक दर रोज ८८२ येकूण वजन -|||३| यकूण कैली -|१ यकून

३ तादूळ -|||३| यकून -|||= दाली ८४||२|| ये कैली ८१|| यकूण

३|= तूप दर रोज८८|९ यकूण ८३|६|||९

१| साकर दरोज८८| ये ८२|१| यकून ८= माठि ८१८५||९ ये

११||=

सुपारी ८|||६ यकून -||-

कात ८=

कापूर आजमास सालींना २||-

निा होनु ५२|||=

गध दराज ८८८१ ये ८८५ यकूण १|-

तेल दरोज ८८२|| ये वजन १८४ यकून होनु १२

बुका दराज ८८८९ यकून ८१८५ यकून टके ४५ होनु ४||-

पुले बागकरी ठवि॥ त्याणे पुरवावी त्यास वतन होन १२ पान सालीना ३६००० यकुन १||=

चुना ८=

दक्षेणा दराज सिवराई ८६ यकून टके ४५ यकूण आजंभट यांणी पूजा करावी त्यांस द्यावे निा होनु ४||-

मसुदा नैमित्य पूजा निा होनु मसुदार यकूण वार पूजा ४४ सामवार ४९ वजा यकादसीचे दिवस ५

बाकी

२४ यकादसी

१ सिवरात्री

१ रामनवमी

१ जन्मास्टमी

२ श्रावण सुध आस्टमी समाधितीथ पूजा

यकून ꠱ होनु

१५८ ब्राह्मण यकादसिनी पूजस त्यास ब्राह्मणास भोजन दक्षणा लारी १ व देवास लारी १ व दही ब्राह्मणास यकून लारी २ ये १४६ येकूण होनु

३॥। गगेसभट आग्नहोत्री

३॥। भास्करभट

३॥। आतंभट

३॥। विस्वनाथभट

१६८०

१३॥≈गात्री पूजेस दक्षणा होन ८≈ ये समस्त ब्राह्मणास द्यावे

६ गध दर पूजेस ८८१ येकून वजन ८१॥।३ यकूण होनु

४॥– क्षारापति दर पूजेस ८÷ ये

९८= तदु दर पूजेस ८।. ये –॥।३। येकून

२॥ बका यकादसी २४ येकून दर ८८१ ये ८॥४ टविले २४ य होनु

२॥।≈पान दर पूजेस १००० येकून ७३००० येकण होनु

१ सुपारी ८१॥।३ येकूण

·।= कात

·।= चुना

९ पंचामृत

याची गुरे व काही वस्तभाव ६ दघ व घई गाई व म्हैसी कराव्या सालीना द्यावे त्यास गुराखी १ येकन

१ साखर ०॥ ६॥ येकून
१ मद ०। ८। येकून
१ तूप ०॥ ६॥ येकून

९

६४॥

मसुदा वारसिक नि॥ होनु ११॥

मखला सालीना ३¾ येमी ४ ये वस्त्रे

१ दुपेट
१ मखछर प्रसिद्ध
१ अस्टमी समाधितीथ

३

नि॥ होनु ७॥

सहस्र भोजन सालीना मोईन

१००० आतीतास व अनार्थी

९०० समाधितीथ व कार्तिकी

४०० समाधितीथ

१०० कार्तिकी येकादसी

५००

१९००

येकून नि॥ होनु ४४०=

तादूळ दर वजन ०० १॥ कर्णाक बा॥ तादूळ कैली ०॥३

येकून वजन २॥१। येकून होनु ९०.

कैली दरसेरी ०॥३ येकूण दाली दर रोज वजन ००॥

येकून ०॥३॥ येकून ०॥=
कैली ०।१ ये ३॥
तूप दर ००। ये ०।४।५ गूळ ०।४।५ येकून ४॥=
येकून होनु ९।=
मीठ ०४॥७॥ येकून ०।= दक्षणा दर ०= ये टके ६२॥
होनु ६।०
आवसोल ०५॥७॥ येकून १०=। मिरे ००७॥ येकून ०=
हिंग ००१॥ येकून ०= जिरे ००३॥ येकूण ०-।०
सेवक निा होनु २००००
हरिदास होन २४ मृदंगी होन १८
वाजत्री ६ दर माहे कर्णेकरी होन १८००
१ प्रति १ येकून
२। प्रति ३ येकून
१ प्रति २ येकूण
४।०
सालीना होनु ५१
भोई ८ येकून होनु ८।०
सेवक २ ये होन २
भोई ६ ये
याणी सेवापाने बाधवावी १। नाईक १ ये ५ पाईक ५ दर १ येकून ६।
याणी नित्य सेवा गध व पान पत्रावळी

बागास ब्राह्मण १२ नित्यपूजेस रोज असे०
लिहणार ब्राह्मण १ येकून वेतन सालीना निा होनु २४०
नेजदार यांणे पादुका स्वारीस जातील तेव्हा नेजदारी करावी नित्य मठ झाडावा सारवावा बिछाणा घालावा त्यास वेतन निा होनु १५
दिवटच्या नित्य दिवे लावावे दिवटी धरावी तेल ६
मुा १२ येकूण १८
कोठवळा हरि नारवकर सहस्त्र भोजनाची सामग्री व नित्य पूजेची करावी त्यास वेतन होन १५

—————कलम १

मीरासीचें सेत कोठार मौजे हरणई

ता। मजकूर येथें आहे तें भातसेत जमान———बिघे

किता				किता			
८१८४-	किता			८८४।-	किता	१४	६
	लांबी	रुंदी		८॥.१॥	किता	२	१०
	२१	२३		८॥१।	किता	२९	९
८।॥४॥-	किता	२३	१७	८८॥.	किता	३	२
८१।-।-	किता	२४	२१	८॥.॥.	किता	३९	९
८॥१।	किता	२४	११	८२८३।.			
८१।=॥	किता	३७	१९				
८९॥-।-							

८७॥८३॥

पैकीं वजा तांपांडी रयात
मुसिलुक रस्ते प्रमाणें ८१८२॥.
येक बिघा अडीच पांड बाकी दस्ता
स जमीन बीघे ८६॥१

यासी चतुःसीमा

पूर्वेस लांब सेत १
उत्तरेस चिरेबंदी पा
खाडी त्याचे उत्तरेस
सेत आलाटी. १

पश्चिमेस भाटाचा बाग
घरें ब्राह्मण आळी १
दक्षिणेस सेत उंबराची पाटी १

येकून चतुःसीमा पूर्वक जमीन
मिरासी सेत साडेसाहा बिघे येक
पांड याचा सरकार दस्ताचा आ-

कार होईल तो सरकारांत देऊन
सेताचे कास सुधा मीरास अन-
भवावी ——— ——— कलम १

काता कानुकाईदे यांचा कलमें.

किता

१ ता॥ मजकुरी कार्य प्रयोजनी सभत गव वांडा व नारलजोडी व मानपान वरकड वतनदारां अगोदर देशमुखांस द्यावा.

१ माहालची जमाबंदी व खंच गुन्हगारीचा ठराव सरकारांतून होईल तो देशमुखांचे विद्यमाने होत जावा.

१ आगरांत मराठ लोक ब्राह्मणाचे चाकरी शिवाय असतील त्यांज पासून वर्षांत दर वरास येक वेट घेत जावी.

१ बुरुडापासून दर दुकानास सालीना

१ वरोली
१ सूप
२ पांट्या
—
४

सुमारी च्यार. या खेरीज फड-फर्मास घेत जावी.

१ सुतार लोहार यांजपासून घरचें कामकाज पडेल तें घेत जावें.

किता

१ दत पुत्रविधान ता॥ मजकुरीं होईल त्यास देशमुखाचे विद्यमानें व्हावें त्याणीं मानाचा सेला देशमुखांस द्यावा

१ ठिाणें वेगरा जिनमाचें सावकारी गलबत ता॥ मजकुरीचें बंदरी येईल त्यास लवाजिमा गलबत पाहून वजनी व कैची दर गलबतास येक मण व अदमण घेत जावा.

१ वतन खरीदी व फुरोख्त व दत नतन आलें तरी देशमुखाचें विद्यमानें व्हावें

१ ता॥ मजकुरीं कुणबी वगेरा खूम यांजकडे लग्ने होतील त्यास लग्नाचा सेला व नारळ विडा घेत जावा.

१ न्याय मनसुबी जाली तरी देशमुखांचे विद्यमानें व्हावी.

१ कोली व दालदी दर्यांतून मासळी मारून माहागिऱ्या व [होड्या आणितात त्यास दर महागिरीस व]

१ आगरांत पातवडे लोक आहेत त्याज पासून आठां चौहो रोजीं केळीची पानें घेत जावी

१ सोनारांची दुकानें असतील त्यांजपासून घरचें काम काज पडेल तें घेत जावें

ता। मजकुरीं गावगना वेठीचे कुळांनी साळीना दर घरास येक वेटचा द्यावा.

१ साळी कोष्टी यांजपासून दर मासाम साळीना येक रुमाल घेत जावा.

१ तेली याजपासून घरचें बेगमीचें तेल गाळून घेत जावें.

१ दर गांवास साळीना कोंबडें येक व इरलें येक घेत जावें.

१ दर गांवास काकडी येक व भोंपळा येक साळीना घेत जावा

१ कुंभाराजवळील दर घरास साळीना मडक्यांचा सिकारा घेत जावा.

१ ता। मजकुरीं चांभाराच्या दर दुकानास साळीना जुतें येक घेत जावें.

होडी पाहोन मासा येक लहान मोठा घेत जावा.

१ जकात ता। मजकुरची जलमार्ग व खुसकीची आकारेल त्यास दर रुपयास रु॥ ०॥· अर्धा आणा प्रमाणें घेत जावा.

१ परीट गांवगना असतील त्यांजपासून धुणावळीची चाकरी घेत जावी.

१ गांवगना वेसी सावज रानांत बाघ मारील व देवाचे पारधीचें सावज पडेल त्याची सात येक उजवे कडील घेत जावी.

१ ता। मजकुरीं गांवगना माहारापासून गांव पाहून आठ च्यार रोज राबणूक घेत जावी.

१ ता। मजकुरी महागिऱ्या व होडच्या आहेत त्याजपासून साळीना येक वेठ घेत जावी.

१ ता। मजकुरी वाणी यांची दुकानें आहेत त्याजपासून दर दुकानास दर रोज विडा येक घेत जावा.

१ ता। मजकुरी सावकारी गलबतें मिठाची वगैरें येतील त्यांजपासून जकात सरकारांत येन जीनस

१ ता। मजकुरीं प्रायश्चित व गोतपत कर्तव्य जालें तरी देशमुखांचे विद्यमानें सरकारची आज्ञा घेऊन करावें.

१ ता। मजकुरी गांवगना यात्रेचे वगेरा बाजार भरेल तेथलि दर दुकानास दर रोज शेव सिरस्तेप्रमाणें घेत जावी.

१ कसबाति खूम यांजपासून लवाजीमा घ्यावयाचा तो निरनिराळीं कलमें लिहिलीं आहेत त्या सिवाय येक सबाति खूम ता। मजकुरीं असतील त्यांजपासून त्यांचे कसबाचे रीतीनें लवाजिमा घेत जावा।

१ तांबट व कासार यांजपासून कल्हईचें काम व जुनें भांडे होईल तें नीट करून घेत जावें.

१ सिंपी याणी घरचें सीनार याचें काम पडेल तें करावें

१९

घ्यावयाचा सिरस्ता आहे त्याजवरी दर खंडीस रु॥ ।। च्यार आणे प्रमाणें हक घेत जावा.

१ भंडारी गांवगना ता। मजकुरीं आहेत त्यांजपासून शाकारणीचें काम घ्यावें व सेतकी वगैरे कामास पोस्त सरामाडी लागेल ते भंडारी याजपासून घ्यावी त्याची कीमत सरकार निरखाप्रमाणें भंडारी यांसी द्यावी.

१ नाहावी याजपासून चाकरी घेत जावी.

१ चैत्रावळीचा टोणगा ता। मजकुरीं पडेल त्याचा लवाजिमा घेत जावा.

१६

३५

कलम १

तेरीज कलमें.

१ मानाचे पोटचीं कलमें ७ सात येकून कलम
१ दिवाण दस्तावरील हकांची कलमें ५ येकून कलम.
१ इनामतीचीं कलमें ३ येकून कलम.
१ मिरासीचें सेताचें कलम १ येक कलम.
१ किता कानु कायदे यांची कलमें ३५ पस्तीस येकून कलम.

५ ५१

येकून कलमें पांच व पोटचीं कलमें येकावन सदरहूप्रमाणें हक लवा जिमे व मान पान व कानू कायदे व इनाम गांव व जिरायत भातजमीन व आगर इनाम व मिरासींची सेतें सुभा देशमुखीचें वतन दरोबस्त तुम्हास मिरास करून देऊन हें पत्र भोगवटियासी करून दिल्हें असे तरी ता। मजकुरचें देशमुखीचें वतन सदरहू लिहिल्याप्रमाणें तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप राहाणें सदरहू वतन समंधी कागद पत्र पातशाही फर्मान व राजपत्रें व खान दंडाराजपुरी यांचीं पत्रें व आंगरे सरखेल यांची पत्रें होती ती तुम्हास यावीं त्यास तीं पत्रें सन सलास सीतैनात धामधुमीमुळें कोलें सीहगड येथील सदास ठेविलीं होतीं ते नवाब निजामअलीखान बहादर यांचे दंग्यांत गेलीं कदाचीत त्या पत्रांचें ठिकाण लागलें तरी तीं पत्रें तुम्हास देऊं जर करितां तीं पत्रें कोण्हाचे हातीं लागलीं असलीं तरी त्यास तुम्हासीं बोलावयास समंध नाहीं हें पत्र लिहोन दिल्हें सही छ १९ रजमान.

सही माधवराव बलाल
सही नारायणराव बलाल
सही रघुनाथ बाजीराव
बीकलम कृष्णाजी बलाल कारले
देश कुलकर्णी व गांव कुलकर्णी
सुभा दाभोल
साक्षी नावनिसीवार असल पत्रावर असेत.

येणेंप्रमाणें देशमुखांनीं वतन देऊन ग्वाही साक्षीनंसी आपलें पत्र करून दिल्हें व कैलासवासी माधवराव पंडीत यांसी निवेदन केलें त्याजवरून त्याणी देशमुखांचे पत्र मनास आणून आपले माथां वतन समंधें नजर रुपये ५००१ पांच हजार येक रुपया करार करून वसूल घेऊन शालिवाहन शके १६९४ नंदन नाम संवत्सरी पत्रें करून दिल्हीं त्याजप्रमाणें वतन आपले दुमालां करून घेऊन अनुभवित आहों येसीयासी माहाराजानी

कृपाळु होऊन ममाइटायासी पत्रे करून देऊन वंशपरंपरेन चालविलें पाहिजे म्हणून विदीत करून सदरहू वतनाची पत्रे आणून दाखविली त्याजवरून मनास आणून स्वामी यांसी कृपाळु होऊन ता। मजकूरचे देह तेहतीस व पेट हरणाई येकून चालीस देहीचे देशमुखीचें वतन माधवराव बलाल व नारायणराव कान्होजी खुनाजी मार्तंड व माहादजी मामले दंडाराजपुरी यांचें होतें तें त्याणी खरेदी आत्मसंतोषे यांसी देऊन ग्वाही साक्षीनसी पत्र करून दिल्हे व पेशवे सरकारनिलें यांणी पत्रे करून दिल्ही त्याजप्रमाणें हुजुरून ता। मजकूरी देशमुखीचें वतन व वतन संबंधें मानपान व कानुकायदे व सीका दफ्तर व सिरपाव व हक उत्पन्न व इनाम गांव व जमीन जुमला व झाडझाडोरा व आदि ठिकाणें करार देशमुखीचे पत्राप्रमाणें वतन करार करून दिले असे तरी ता। मजकूरचें देशमुखीचें वतन व सदरहू प्रमाणें यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें नवीन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लिहून घेऊन हें असल पत्र भोगवटीयाबदल यांजवळ परतोन देणें *जाणिजे *लेखनालंकार

[अ*]मयादेय

राजत

(मागील बाजूस) रुजू सुरु सुद बार सुरु समंत

सि॥ सुमंत मंत्री सरकार

तेरीख १४ माहे रबिलौवल

सुहूर सन सबैन मया व अलफ

बार सुद सुद सुद बार बार बार बार

* ही दोन्ही अक्षरें लाल असून १ ते १७ ह्या निशाण्या वेगळ्या वेगळ्या अधिकाऱ्यांच्या हातच्या आहेत. कागदास आठ जोड असून प्रत्येक जोडावर ' लेखन सीमा ' ह्या वर्तुलाकारी मोर्तबाचे दोन दोन ठसे उठविलेले आहेत.

७१ कान्हूर-नगरकरांकडील दोन पत्रें.*

(श्री. य. न. केळकर)

पुढील दोन पत्रें कान्हूर पठार अथवा सुप्रसिद्ध नगरकर घराण्यांतून मिळालीं आहेत. पैकीं एक [illegible] म्हणजे सन १८१५-१६ तील पुण्यांतील [illegible] वृत्ति यादी आहे व दुसरें बापूजी शिंदे नांवाच्या [illegible] शिवाजीपंत नांवाच्या मनुष्यास लिहिलें आहे. तें पत्र ता. [illegible] मार्च १७७१ चें आहे. त्यांत त्रिंबकराव [illegible] हैदरखान यांच्या संबंधीं बातमी आहे. मोतीतलावाची सुप्रसिद्ध लढाई झाली तिच्या-संबंधींच हें पत्र आहे. [illegible] २१७ वर खरे लिहितात, मैदानांत [illegible] लागणार नाहीं, पण तें [illegible] डोंगराकडे पसरलें म्हणजे त्यास त्या [illegible] करावें असा त्यानें बेत केला. मग तो २५ हजार [illegible] हजार स्वार, पंचेचाळीस तोफा, शिवाय जजाल व [illegible] घेऊन श्रीरंगपट्टणांतून बाहेर पडला, [illegible] येथें येऊन राहिला. हैदर बाहेर पडल्याची [illegible] त्रिंबकरावानें सर्व फौज एकत्र गोळा केली. मग [illegible] सर्वानुमतें मसलत ठरली कीं, आपण येथून [illegible] उलटून हैदर मेलकोट्यास आहे तों [illegible] जाऊन गांठावें. तेव्हां तोफखान्यास जलदीजलदीनें मागून यावयास सांगून त्रिंबकरावमामा बाकीचें सैन्य घेऊन अरुणोदयीं निघाला तो संध्याकाळचे वेळीं येऊन पोंचला. हैदर रात्रीं श्रीरंगपट्टणास पळून जाईल म्हणून त्या [illegible] म्हणजे दक्षिणेस पटवर्धन व पायगुडे जाऊन राहिले. उत्तरेस व पूर्वेस अनुक्रमें आप्पा बळवंत व त्रिंबकराव यांनीं जागा धरिली. याप्रमाणें तीन बाजूंनीं हैदर अलीस मराठ्यांनीं जखडून धरिलें. पश्चिमेस दाट झाडी असल्यानें तेवढी बाजू मात्र त्याला मोकळी राहिली. मोतीतलावाची लढाई ८-३-१७७१ रोजीं झाली.

* पा. स. ११।१८५४

ले. २४० } श्री { श. १६९२ फाल्गुन वद्य ११
मू. दा. प. } { इ. १७७१ मार्च १२

राजश्री सिवाजी पंत गोसावी यांस

अखंडीत लक्षुमी अलंकृत राजमान्य राजश्री बापूजी सिंदे राम-राम उपरी येथील कुशल ता। छ २४ माहे जिल्काद जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष बहुता दिवसी कृपा करून पत्र पाठविले ते पावले संतोष जाहला ऐसेच निरंतर पत्रद्वारा संतोषवीत असावे या नंतर राजश्री नारोपंत सरसुभेदार याचे पत्र आपण जासूद जोडी समागमे पाठविले ते पावले सविस्तर कलोन पत्राचे उतर लिहोन पाठविले आहे सुभेदाराकडे रवाना करून प्रा। होये ते कलवावे श्रीमंत राजश्री रावमामा व अपा बळवंत यांचा फौजेसह वर्तमान मुकाम कोणे ठिकाणी आहे पुढे कोणीकडे जावयाची मसलत आहे ते ल्याहावे म्हणोन लिहिले ते कलले ऐशास श्रीमंत राजश्री मामा व अपा बलवंत हे फौजेसुद्धा पाटणापासून अलीकडे सा कोशावर मेलकोटा आहे तेथे मुकाम करून आहेत हैदरखानहि नजीकच मेलकोट्याचे झाडीचा आश्रय धरून आहे त्याचे पारपत्य करावे हेच मसलत प्रस्तुत श्रीमंत राजश्री मामांची आहे पुढे कोणीकडे जातील पाहावे सदैव पत्र पाठऊन संतोषवीत जावे बहुत काय लिहिणे हे विनंती

ले. २४१ } श्री { श. १७३७–३८
मू. दा. प. } { इ. १८१५–१६

यादी सरंजामी पालख्या लोकाकडे आहेत त्या सुरु सीत अशर मयातैन व अलफ

आसामी

१ सदाशिव माणकेश्वर

१ विठल नरसिंह विंचूरकर

१ राघो मल्हार

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

त्रैमासिक

वर्ष १३ वें

आषाढ शक १८५४ ते चैत्र शक १८५५

संपादक व प्रकाशक

प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. ए.

श्री. सर. गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम्. एल्. ए.

चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें पेठ भांबुर्डा, ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत

अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें.

वार्षिक वर्गणी ३ रु. (ट. हं. वगैरे निराळें) **फुटकळ अंक १ रुपया**

अनुक्रमणिका

वर्ष १२ वें. श. १८५४

अनुक्रमणिका.

BHARATA ITIHASA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIV] **QUARTERLY** [No. 1

(53)

June, 1933.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १४ वें] **त्रैमासिक** [अंक १ ला

(५३)

आषाढ १८५५

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन.

या अंकांत गेल्या सालचा अहवाल, संमेलन व वाढदिवस या दिवशींचे कार्यक्रम, झालेलीं भाषणें व चर्चा वगैरे दिलेली आहे तीवरून मंडळाची सांपत्तिक स्थिति कशी आहे आणि **मंडळास आर्थिक साहाय्याची किती निकडीची गरज** आहे तें स्पष्ट कळून येईल. मंडळास 'अॅबट यांची देणगी मिळाली आहे आतां कांहीं साहाय्याची गरज नाहीं' असा गैरसमज कांहीं ठिकाणीं आढळून आला म्हणून सर्वांस असा खुलासा करणें अवश्य आहे कीं, खि. वा. अॅबट या उदारात्म्याच्या कुबेरी देणगीमुळें **मंडळाची मंदिरसंबंधीं चिंता** मात्र तूर्त संपली आहे ! हे त्या पुण्य पुरुषाचे थोर उपकार आहेत ! परंतु **चालू खर्चाची चिंता शिल्लकच आहे.** तो **सालिना ४।५ हजारांचा** आहे आणि उत्पन्न तर घटत आहे असें वाटतें. म्हणजे ३।३॥ हजार पावेतों उतरलें आहे. अर्थात् **१।१ हजारांची तूट** सालिना भरून काढावयास पाहिजे. या साठीं स्वतंत्रनिधि जमविण्याची योजना लवकरच प्रसिद्ध होईल. जनतेच्या साहाय्याची गरज यत्किंचितहि कमी झालेली नाहीं एवढेंच येथें सुचवावयाचें आहे.

पेशवे दप्तर विषयींचें इंग्रजी हँडबुक सरकारनें इतक्या उशीरा आरडाओरडीनंतर प्रसिद्ध केलें आहे. त्याबद्दल सरकारचे आभार मानून असेंच एक **वर्णन पुस्तक मराठींत** करण्याची सूचना ठरल्याप्रमाणें आम्हीं सरकारास केली आहे. ती मान्य होईल अशी आम्हांस उमेद आहे.

या अंकांत वर्णिलेलीं दोन अमूल्य चित्रें श्री. बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधि सरकार औंध यांनीं खरेदी करून त्यांचें रक्षण केलें हें अभिनंदनीय होय. मंडळाचें **नाण्यांचें नवीन पुस्तक** (सचित्र) छापून झालें आहे. तें व हकीकते आलम हे दोन्ही ग्रंथ लवकरच बाहेर पडतील.

कारभारी मंडळाची जी निवडणूक म्हणून वृत्तांतांत आली आहे ती साधारण सभासदांपैकीं जे तीन निवडावयाचे त्यांची होय. या बाबत चिठ्या वगैरे टाकून नियमाप्रमाणें काम झालें. मग प्रो. जोशी व सरदार मेहेंदळे यांच्या ठरावावरून पूर्वींचीच मंडळी कायम करावी असें ठरलें. नवीं नांवें कोणीं सुचविलीं नाहींत.

नारळी पौर्णिमा }
श. १८५५ }

चिटणीस

टीपः—त्रैमासिकाची निवळ वर्गणी ३ रु. असून पोस्टखर्चासाठीं ४ आणे निराळे द्यावे लागतात व व्ही. पी. खर्च ८ आणे निराळा पडतो. या गोष्टीकडे सभासदांचें लक्ष असावें.



मल्हारराव होळकर व थोरले बाजीराव पेशवे



थोरले माधवराव पेशवे

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १४ वें] त्रैमासिक [अंक १ ला.

१ बंगालच्या विजयसेनादि राजांचा काल*

(श्री. चिं. वि. वैद्य)

आम्ही मध्ययुगीन भारत, भाग ३, यांत दाखविल्याप्रमाणें इ. स. १०८०, ११०० आणि १११९ याप्रमाणें तीन वर्षीं सेनांचे प्रारंभींचे तीन राजे सामंत, हेमंत व विजय बंगालमध्यें राज्य करीत होते. डी. आर. बानर्जी यांचें मत असें आहे कीं, " लक्ष्मणसेन यानें जो नवीन शक सुरू केला, तो आपल्या राज्यारंभापासून केला. बल्लाळसेन वारला त्या वेळेस त्याची राणी गर्भवती असून, गर्भांतील लक्ष्मणसेनावर जन्मापूर्वीच मुकुट ठेविला गेला. ही तबकातनें एक गप्प मारली असली तरी, लक्ष्मण-सेनाचा जन्म आपल्या बापाच्या मरणानंतर इ. स. १११९ त होऊन त्या वर्षापासून त्यानें आपला शक सुरू केला. पण यावर एक शंका अशी उपस्थित होते कीं, लक्ष्मणसेनाच्या एका लेखांत राज्यवर्ष ७ दिलें आहे. तेव्हां तो जन्मतःच गादीवर आला, असें मानतां येणार नाहीं. पाल राजांप्रमाणेंच ह्या सेनराजांच्या दानलेखांत दान देणाऱ्या राजांचें राज्यवर्षच दिलेलें असतें. शकवर्ष दिलेलें नसतें. यामुळें यांचा राज्यवर्षारंभ निश्चित करतां येत नाहीं. लक्ष्मणसेन याचा अंत इ. स. ११९९ त झाला, हें मात्र मुसलमानी इतिहासावरून निश्चित होतें. " ह्या मितयांचा घोटाळा बाजूस ठेवूं. सेनराजांचा थोडक्यांत इतिहास असा आहे.

विजयसेन हा पूर्व बंगालवर स्वतंत्र राजा होता. त्याचा पुत्र बल्लाळसेन त्याहून सामर्थ्यवान् झाला आणि त्यानें मिथिल देश जिंकून पालांची सत्ता कमी केली. तो विद्वान् असून त्यानें दानसागर नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याचा पुत्र लक्ष्मणसेन. तोही विद्वान् होता. लक्ष्मणसेनानें लक्ष्मणावती म्हणजे लखनौती हें शहर स्थापन केलें. हा विक्रमादित्याप्रमाणें पराक्रमी असून त्यानें एक शकही सुरू केला. ह्या शकाचें

* २१ वें संमेलन.

आरंभवर्ष किलहॉर्ननें इ. स. १११९ ठरविलें आहे तें बरोबर आहे. हा शक अजून मिथिल देशामध्यें (तिरुत) चालतो. पण हें वर्ष याच्या राज्यारंभाचें किंवा कसें याविषयीं घोटाळा आहे (मध्ययुगीन भारत, भाग ३, पान ३५५).

या प्रश्नाचा निकाल लागण्यासारखा एक आधार मला नवीन मिळाला आहे. तो प्रो. भातखंडे, गायनाचार्य, यांनीं मला एक प्रश्न केला, त्यावरून सांपडला आहे. मिथिल देशचा एक संगीत ग्रंथकार लोचन यानें आपल्या रागतरंगिणीच्या शेवटीं आपल्या ग्रंथाची मिति पुढील आर्येत दिली आहे.

भुजवसुदशमितशाके श्रीमद्बल्लाळसेनराज्यादौ ।
वर्षैकषष्टिभोगात् मुनयस्त्वासन् विशाखायाम् ॥

पहिल्या दोन चरणांवरून लोचनाच्या ग्रंथाचा काल भुजवसुदश म्हणजे १०८२ (इ. सन ११६०) शक असा ठरतो, आणि हें वर्ष बल्लाळसेनाच्या राज्याचें आदिवर्ष असेंही म्हटलें आहे. म्हणजे बल्लाळसेनाचें राज्य इ. सन ११६० पासून सुरू झालें. निदान हें वर्ष त्याच्या कारकीर्दीतलें आहे, ही गोष्ट निश्चित होते. अर्थात् पूर्वी जें सांगितलें कीं, लक्ष्मणसेनाचे जन्माबरोबर लक्ष्मणसेनाचा शक १११९ त सुरू झाला तें चूक ठरतें. सन १११९ हें वर्ष विजयसेनाच्या राज्यारंभाचें असावें, आणि स्मिथनें १०८०, ११०० आणि १११९ अशीं जीं सामंत, हेमंत व विजयसेन यांच्या राज्याचीं आरंभवर्षें मानलीं आहेत तें बरोबर दिसतें. गौरीशंकर ओझा असें म्हणतात कीं, " हा शक विजयसेनाचा पुत्र बल्लाळसेन यानें मिथिल देश जिंकण्याच्या वेळीं आपणांस लक्ष्मणसेन पुत्र झाला ही खबर ऐकून सुरू केला." पण हें बरोबर दिसत नाहीं. कारण ११६० हें वर्ष बल्लाळसेनाच्या राज्यारंभाचें म्हणून वरील आर्येत दिलें आहे.

या आर्येत 'वर्षैकषष्टिभोगात् मुनयस्त्वासन् विशाखायाम्' असें जें शेवटीं म्हटलें आहे त्याची संगति लावतांना पंचाईत पडते. मुनयः म्हणजे सप्तर्षी हें उघड आहे. आणि प्राचीन काळीं सप्तर्षिगणनाही सुरू होती. सप्तर्षी एकएका नक्षत्रांत एक एक शतक राहतात, अशी कल्पना केली गेली असून आम्ही आपल्या ऐतिहासिक लेखांत दाखविल्याप्रमाणें (वैद्यांचे ऐतिहासिक निबंध पान ११४) वराहमिहिरानें सप्तर्षी युधिष्ठिराच्या राज्यवर्षी मघांत होते, असें म्हटलें आहे. ती आर्या अशीः—

आसन्मघासु मुनयः शासति पृथिवीं युधिष्ठिरे नृपतौ ।
षड्द्विकपंचद्वियुतः शककालस्तस्य राज्ञश्च ॥

युधिष्ठिराच्या राज्यारंभीं मुनी मघांत होते, आणि त्याचा राज्यारंभ शकपूर्व २५२६ हा आहे. या हिशेबानें पाहतां २५२६ त १०८२ मिळविले तर ३६०८ येतात, आणि एक सबंध २७०० वर्षांचें चक्र वजा केलें तर बाकी ९०८ राहतात; म्हणजे

मघाच्या पुढें १२ नक्षत्रें सप्तर्षी गेले होते. अर्थात् सप्तर्षी उत्तराषाढा नक्षत्रांत असले पाहिजेत. ते विशाखांत सांगितले आहेत. आतां भट्टोत्पलानें कलियुगारंभींच सप्तर्षी मघांत होते असें म्हटलें आहे. तेव्हां ३१७९ हें कलियुगारंभवर्ष मानून त्यांत १०८२ मिळविले तर ४२६१ येतात. अर्थात् २७०० वजा करून बाकी १५६१ राहिले. या हिशेबांत बाकी ६१ वर्षें येतात, पण नक्षत्र तर विशाखाच्या बरेंच लांबचें येतें. सप्तर्षि-काल, अर्थात् लौकिक काल राजतरंगिणिकारानें वापरला आहे व तो अजूनही हिमालयाच्या कित्येक प्रांतांत चालतो. कल्हणानें राजतरंगिणी ग्रंथ १०७० या शकवर्षी लिहिला, त्या वेळीं लौकिक काल २४ वें वर्ष होतें असें लिहिलें आहे. या हिशेबानें १०८२ या वर्षी ३६ वें लौकिक वर्ष असावें. तें वरील आर्येंत ६१ सांगि-तलें आहे. दुर्दैवानें कल्हणानें ग्रंथलेखनसमयीं सप्तर्षी कोणच्या नक्षत्रांत होते हें दिलें नाहीं. यामुळें त्याची लौकिकगणना कशी होती हें सांगतां येत नाहीं. असो. वरील लोचनाच्या आर्येंत शकवर्ष स्पष्ट दिलें असल्यानें त्या वर्षाबद्दल संशय घेण्यास जागा नाहीं. मिथिल प्रांतांत सप्तर्षिकाल कोणच्या पद्धतीचा मानीत होते हें समजत नाहीं. वराहमिहिर आणि भट्टोत्पल यांच्या याविषयींच्या कल्पना भिन्न होत्या हें वर सांगितलेंच आहे.

प्रो. भातखंडे यांनीं राजा सुरेंद्र मोहन टागोर यांच्या "Universal History of Indian Music" ह्या ग्रंथाधारें विद्यापती कवी शिवसिंहाच्या राज्याच्या पदरीं १५ व्या शतकांत होता, असें दार्शविलें आहे. तेव्हां लोचनाच्या ग्रंथांत विद्यापति कवीचे मासले कसे दिले आहेत अशी शंका त्यांनीं उपस्थित केली आहे. या शंकेचें समाधान असें करतां येईल कीं, विद्यापति दोन झाले असावेत किंवा शके १०८२ मध्यें झालेल्या लोचनाच्या ग्रंथांत विद्यापतीनें केलेलीं पदें कोणी तरी मागाहून घुसडून दिलीं असावीं.

२ दोन अमोलिक चित्रें*

(प्रो. द. वा. पोतदार)

जोधपूर येथील एक व्यापारी मिया मुहम्मद रमजान यांच्याजवळ अनेक चित्रें विक्रीसाठीं जमविलेलीं आहेत त्यांत रजपूत राजे, तसेंच रागरागिण्या, प्राणी वगैरे यांचीं चित्रें आहेत.

* २१ वें संमेलन.

या सर्व संग्रहांत दोन चित्रें आम्हांस फार **अमोलिक** वाटलीं. पैकीं पहिलें (१) औरंगजेबाचें आहे आणि दुसरें (२) रूपमती व बाजबहादुर यांचें आहे. दोन्ही चित्रांतील **कलमसफाई** विशेष अभ्यसनीय आहे. फार हलक्या हातानें चित्रकार कलम चालवीत आहे.

पहिल्या चित्रांत औरंगजेब बादशहा दोन हातांनीं तरवार उगारून जोरानें एका सिंहावर वार करीत आहे असें दाखविलें आहे. सिंहानें एका शिकाऱ्यावर पंजे मारले असून त्याचें डोकें जबड्यांत धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. औरंगजेबाचे मागें एक परिचारक खांद्यावर एक तोड्याची बंदूक टाकून उभा असून हातांत तोडा शिलगाविलेला आहे; दुसरा एक इसम म्यानांतून तरवार उपशीत आहे; तिसरा जखम धरून मागें फिरून पळत आहे; चौथा खालीं पडला आहे. त्याची तरवार मुडपून गेली असून त्यानें ढाल पुढें केली आहे; आणि पांचवा सिंहाच्या पिछाडीकडून तरवार उगारून हल्ला चढविण्यासाठीं सरसावत आहे. औरंगजेबाची दाढी पांढरी काळी असल्यानें त्याची उमर सुमारें ५० चे बेतांत या वेळीं असावी. मागें पहाडांत बादशहाची चतुरंगसेना डंकानिशाणसुद्धां उभी आहे. सैन्यांतील एकेक तुकडी एकजात एकरंगी पोषाखाची आहे. एका पहाडाचे मागें एक सेवक घोडा धरून उभा आहे. चित्र फार उमदें आहे. मागील अंगास असा शेरा आहे:—

"पातसाह औरंगजेब बहादर गाजी की ५००) इनायत पंज सद रुपीये" याच्यावर दुसऱ्या ठिकाणीं "श्री रुपराम पातसाह औरंगदे" असा मजकूर आहे. या मजकुराच्या डाव्या कोपऱ्यांत अर्धी उठविलेली मुद्रा दिसत आहे. यावरून हें चित्र रूपरामानें काढलें असून त्यास पाचशें रुपये बक्षिस मिळालें असावें असें वाटतें.

औरंगजेबाचें या पविऱ्यांतील दुसरें चित्र उपलब्ध नाहीं. हें अपूर्व आहे.

दुसरें चित्र रूपमती बाजबहादूर यांचें आहे. त्यांतील उभय प्रणयींचे चेहेरे उमदे रंगविले आहेत. रूपमती व बाजबहादूर यांवर हल्ला झाला असून तो देखावा आंवतींभोंवतीं दाखविला आहे. त्यांत इकडे तिकडे घायाळ लोक पडले आहेत. तो देखावाहि चित्रकारानें आपल्या कसबाप्रमाणें बरा वठविला आहे.

मागें असा शेरा लिहिलेला आहे.

'रूपराम रूपवती बाजबहादूर हा + + + +'

दुसरी ओळ निराळ्या हातची 'रुपमती बाजबहादूरकी ठ गडी ती र त रहमानी जंग मैलन अंकी इनायती + + +'

रूपमती बाजबहादुराशीं झालेलें जंग यांत दाखविलें आहे. हेंही रूपरामानेंच काढलेलें आहे. याची ' इनायत ' किंवा वासिमी आंकडा वर चिठी चिकटल्यामुळें नीट दिसत नाहीं सबब कळत नाहीं.

अशीं हीं दोन चित्रें महत्त्वाचीं आहेत व सर्वस्वी संग्राह्य आहेत.

---

३ रहिमतपूरचे कानेटकर यांचेकडील हत्यारें†

(प्रो. द. वा. पोतदार)

रहिमतपूर येथील कानेटकर घराणें सातारा राज्याचे अखेरीस बरेंच महत्त्वाचें म्हणून प्रसिद्ध होतें. ओंध—ग्वालेर इकडील घडामोडींशीं त्यांचा बराच निकटचा संबंध होता असें कळतें.

या घराण्यांतील रा. **विष्णु गोपाळ कानेटकर** यांनीं रहिमतपूर येथील आपल्या जुन्या, पडक्या, परंतु भव्य वाड्यांत सांपडलेलीं कांहीं हत्यारें कानेटकर घराण्याचे नांवें मंडळास कायम नजर करण्यास मान्यता दिली आहे. तीं हत्यारें अशीं:—

(१) छोटी वाकडी तरवार म्यानासह (२) एक सोन्याच्या नक्षीदार मुलाम्याची व वर मखमाली म्यान असलेली पाणदार कट्यार (३) एक रुप्याचा मुलामा व नक्षी असलेली कट्यार (४) एक भाल्याचें फळ. येणेंप्रमाणें हत्यारें आज **कानेटकर संग्रह** म्हणून मंडळास त्यांचेतर्फे मी मोठ्या प्रेमानें नजर करीत आहें.

---

४ चाफळ येथील मूर्ती रामाची कीं सूर्याची ?*

(श्री. ग. ह. खरे)

इ. स. १९२९ च्या एप्रिल महिन्यांत कांहीं कामानिमित्त चाफळ येथें गेलों असतां समर्थ रामदास स्वामींनीं स्थापिलेली म्हणून समजली जाणारी श्री रामाची मूर्ति अतिशय सूक्ष्म रीतीनें पाहिली. त्यावेळींच ती मूर्ति रामाची नसून सूर्याची असावी असा माझा ग्रह झाला. हा होण्याचीं कारणें सध्यां मला स्मरतात तीं अशीं—(१) रामाच्या उभ्या मूर्तीच्या पायांखालीं घोड्याचीं सात तोंडें आहेत. (२) लक्ष्मण व सीता यांच्या उंचीचें प्रमाण रामाच्या उंचीशीं अगदीं विसंगत आहे. (३)

† २१ वें संमेलन.   * पा. स. १।१८५५

रामाच्या हातांत धनुष्य बाण नाहींत. पण मूर्ती पहात असतां कदाचित् आपली कल्पना चुकत असेल या विचारानें म्हणा अथवा येथील पुजारी व भक्त मंडळींना प्रश्न विचारून निरुत्तर करणें किंवा आपला ग्रह त्यांजवर लादून त्यांची बुद्धि चंचल करणें युक्त नव्हे असें वाटून म्हणा माझा ग्रह मी आपल्यापाशींच ठेवला व पुजारी जें सांगतील तें ऐकून घेऊन तो प्रश्न तेथेंच सोडून दिला.

त्यानंतर गेल्या फेब्रुवारी महिन्यांत माझ्या कांहीं मित्रांपाशीं समर्थांच्याविषयीं बोलत असतां मी सहज बोलून गेलों कीं, समर्थांनीं स्थापिलेली म्हणून समजली जाणारी चाफळची मूर्ति श्रीरामाची नसून सूर्याची आहे. हें ऐकतांच माझे मित्र आश्चर्यचकित होऊन माझ्या सांगण्यावर विश्वासही ठेवण्यास तयार होईनात; पण मी त्यांस माझें म्हणणें समजावून सांगितल्यावर माझ्या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटून जास्त शोध घेण्यास त्यांनीं उत्तेजन दिलें. तेव्हां मी निरनिराळ्या अजबखान्यांचे कॅटलॉग चाळून पाहूं लागलों व चाफळ येथील एक सद्गृहस्थ श्री. विष्णुपंत देशपांडे यांना त्रास देऊन त्यांजकडून श्रीरामाच्या मूर्तीचें वर्णन लिहून आणविलें. नंतर सत्कार्योत्तेजक सभेच्या मनाच्या श्लोकांच्या पुस्तकांत आरंभीं दिलेला श्रीरामाचा फोटो व श्री. विष्णुपंत देशपांडे यांनी धाडलेलें वर्णन हीं, सूर्यमूर्तीचीं वर्णनें व मिळाले ते सूर्यमूर्तींचे फोटो यांशीं ताडून पाहिलें. तेव्हां माझा तर्क जास्त जास्तच खरा आहे असें वाटूं लागून चाफळची समर्थस्थापित व रामाची म्हणून समजली जाणारी मूर्ति सूर्याची आहे असें माझें ठाम मत झालें.

हें मत लोकांना सांगितल्यास कित्येक जण मजवर रागावून मला शिव्या देतील, कित्येकांचा बुद्धिभेद होऊन त्यांचें मन फाटून जाईल, तर कित्येक जण मला शाबासकी देतील. मी मात्र या तिन्ही गोष्टींविषयीं उदासीन राहून मला जें समजलें तें माझ्या प्रियबंधूंनाही समजावें या उद्देशानें त्यांच्या हवालीं करतों.

चाफळची मूर्ति रामाची नसून सूर्याची आहे हें दाखविण्यापूर्वी चाफळचा सध्यांचा राम कसा आहे हें सांगतों. हें वर्णन व फोटो यांवरून या मूर्तीची नीट कल्पना आली म्हणजे सूर्यमूर्तीशीं असलेलें या मूर्तीचें सादृश्य चटकन ध्यानांत येईल. येथें चाफळच्या मूर्तीस तात्पुरतें राम हें नांव देतों. या रामाविषयीं प्रथमच लक्षांत येणारी गोष्ट म्हणजे इतर ठिकाणांप्रमाणें येथें रामाजवळ लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती नाहींत. रामाच्या दोन्ही बाजूंस ज्या मूर्ती आहेत त्या लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती होऊं शकत नाहींत. रामाची उंची दोन फूट आहे तर या मूर्तींची उंची आठ इंच आहे. बाजूच्या मूर्तींपैकीं रामाच्या उजव्या अंगची मूर्ति पुरुषाची असून डाव्या बाजूची मूर्ति स्त्रीची आहे. या दोन्ही मूर्तींचे रामाच्या बाजूकडील हात अनुक्रमें त्यांच्या डाव्या व उजव्या मांड्यांना चिकटविलेले आहेत. उरलेल्या हातांत म्हणजे उजव्या बाजूच्या मूर्तीच्या उजव्या हातांत व डाव्या

बाजूच्या मूर्तीच्या डाव्या हातांत मालेसारखी कांहीं वस्तू असून ती प्रत्येक मूर्तीच्या डोक्यावरून दुसऱ्या बाजूस आलेली आहे. या दोन्ही मूर्ती उभ्या आहेत. स्त्रीमूर्तीचें तोंड फुटलें आहे. पण बाकीचा भाग धड आहे. राम ज्या आसनावर उभा आहे त्याच्या पुढील व दोन्ही बाजूंस घोड्याचीं सात तोंडें आहेत. रामाच्या दोन्ही पावलांमध्यें मारुती आहे असें सांगतात. रामाच्या हातांत धनुष्य बाण नाहीं. त्याचे दोन्ही हात अभय मुद्रेचे (?) असून प्रत्येक हातांत कमळाचा दांडा आहे. हे दांडे पंजांच्या पाठीमागून खांद्यांपर्यंत गेले असून तेथें त्या दांड्यांना अर्धोत्फुल्ल कमलकलिका आहेत असें दाखविलें आहे. रामाच्या मस्तकाच्या पाठीमागें प्रभावळी-सारखें कांहीं दिसत असून त्यावर आकृति काढलेल्या आहेत. गळ्यांत जानवें असून शिवाय एक लांब हार आहे. कमरेस जाड मेखला आहे. गुह्य भाग झांकण्यासाठीं चड्डी किंवा मांडचोळणा घातला आहे.

आतां ही मूर्ति रामाची नाहीं असें मला कां वाटतें हें सांगतों. मूर्तिशिल्पांत असा एक नियम आहे कीं, मुख्य देवाच्या स्त्रीची उंची कमींत कमी त्याच्या छाती इतकी तरी असली पाहिजे. मूर्तिशिल्पांतल इतर नियम शिल्पी पाळोत किंवा न पाळोत, हा नियम त्यांनीं सहसा मोडलेला आढळत नाहीं हें कोठल्याही शंकरपार्वती, विष्णुलक्ष्मी, रामसीता यांच्या मूर्ति पाहिल्या असतां दिसून येईल. पण येथें सीतेची मूर्ति रामाच्या उंचीच्या ½ पट म्हणजे कमरेपर्यंतही न पोहोंचणारी अशी आहे. तेव्हां ही मूर्ति सीतेची होणें कठीण आहे. याच न्यायानें उजव्या बाजूची मूर्तीही लक्ष्मणाची होऊं शकणार नाहीं. उलट या दोन्ही मूर्ति मुख्य मूर्तीचे सेवक आहेत असें म्हणाव-यास हरकत नाहीं. कारण गणांच्या मूर्ति सहसा मुख्य मूर्तीच्या कमरेपेक्षां जास्त उंचीच्या नसतात. तसेंच निरनिराळ्या सूर्य मूर्तीच्या बाजूंस असलेल्या स्त्रीपुरुषगणांची संख्या अनियमित असून कांहीं मूर्तीच्या बाजूंस एकच पुरुषगण व एकच स्त्रीगण असतो. रामाची मूर्ति ज्या आसनावर उभी आहे त्याला घोड्याचीं सात तोंडें कोर-लेलीं आहेत. सूर्याच्या रथाला सात घोडे असतात असें वर्णन आहे. पण सबंध रथ व घोडे कोरणें कठीण असल्यामुळें बऱ्याच ठिकाणीं आसनास घोड्यांचीं सात तोंडेंच दाखविलेलीं असतात. शिवाय मला वाटतें रामाची अशी एकही मूर्ति सांपडणार नाहीं कीं, जी सात घोड्यांच्या रथांत उभी राहिलेली असेल. रामाच्या दोन्ही पायां-मध्यें मारुती आहे असें सामान्य लोक म्हणतात. पण तो सूर्याचा चरणरहित सारथी अरुण आहे असें मला वाटतें. सूर्याच्या गळ्यांत जानवें, शिवाय एक लांब हार व कमरेस मेखला असल्याचीं उदाहरणेंही दाखवितां येतील. सूर्याच्या कित्येक मूर्तीच्या हातांत पूर्णोत्फुल्ल, अर्धविकसित किंवा मुग्ध अशा स्वरूपांत कमळें असतात. तेव्हां चाफळच्या रामाची म्हणून समजल्या जाणाऱ्या मूर्तीचें सूर्यमूर्तीशीं असलेलें विलक्षण साम्य पाहातां ती सूर्याची आहे असें ठासून सांगण्याचें मी धाडस करतों. ज्यास ही मूर्ति सूर्याची नाहीं असें म्हणावयाचें असेल त्यानें तसें सिद्ध करावें.

येणेंप्रमाणें चाफळची रामाची म्हणून समजली जाणारी मूर्ति सूर्याची आहे हें खरें असलें तरी ग्रंथिक व प्रत्यक्ष सूर्यमूर्तींच्या वर्णनाचे पुरावे दिले असतां ही गोष्ट जास्तच स्पष्ट होणारी असल्यानें आतां ते पुरावे देण्याचें काम करतों.

मूर्तिशिल्पाविषयीं माहिती मांगणारा ग्रंथ जो बृहत्संहिता त्यांत सूर्याच्या मूर्तीविषयीं महत्त्वाची माहिती आली आहे. ती अशी–

नासाललाटजङ्घोरुगण्डवक्षांसि चोन्नतानि रवेः ।
कुर्यादुदीच्यवेषं गूढं पादादुरो यावत् ॥ ४६ ॥
बिभ्राणः स्वकररुहे पाणिभ्यां पङ्कजे मुकुटधारी ।
कुंडलभूषितवदनः प्रलम्बहारो वियद्वृतः ॥ ४७ ॥
कमलोदरद्युतिमुखः कञ्चुकगुप्तः स्मितप्रसन्नमुखः ।
रत्नोज्ज्वलप्रभामण्डलश्च कर्तुः शुभकरोऽर्कः ॥ ४८ ॥ अध्याय ५८

चाफळची मूर्ती अगदीं या वर्णनाप्रमाणें नाहीं हें खरें. पण हें वर्णन सूर्याच्या उत्तरदेशीय मूर्तीविषयीं आहे हें 'कुर्यादुदीच्यवेषं' या ओळीवरून उघड होत आहे. तेव्हां उदीच्यवेषामुळें या वर्णनांत जरी थोडी भिन्नता येत असली तरी 'नासाललाटजङ्घोरुगण्डवक्षांसि उन्नतानि, बिभ्राणः स्वकररुहे पाणिभ्यां पङ्कजे, मुकुटधारी, कुंडलभूषितवदनः, प्रलम्बहारः, कमलोदरद्युतिमुखः, स्मितप्रसन्नमुखः, कञ्चुकगुप्तः, वियद्वृतः, हीं विशेषणें या मूर्तीसही यथार्थ लागू पडतात हें स्पष्ट आहे. भविष्योत्तर पुराणांत एक आदित्यहृदय नांवाचें प्रकरण असून त्यांत 'पद्मासनः पद्मकरः पद्मगर्भसमद्युतिः । सप्ताश्वरथसंयुक्तो द्विभुजः स्यात्सदा रविः॥' असें सांगितलें आहे. हें वर्णनही बहुतांशानें या मूर्तीस लागू पडत आहे.

सूर्याच्या मूर्तीच्या बाजूस एक स्त्रीगण व एक पुरुषगण असूं शकतो याविषयीं एका मूर्तीचें वर्णन जशाचें तसें पुढें देतों. हें वर्णन राजशाहीच्या वरेन्द्र रीसर्च सोसायटीच्या अजबखान्याच्या कॅटलॉगमधील आहे. $\frac{\text{F (a) 7}}{102}$ Surya—standing, nose only broken, otherwise complete. Instead of two standing figures on each side, this image has one, Pingala on the right and a female attendant (the head broken) on the left.' यावरून चाफळच्या मूर्तीच्या बाजूस एक स्त्रीगण व एक पुरुषगण आहे असें मानण्यास हरकत नाहीं. याच कॅटलॉगमधील $\frac{\text{F 24 (a)}}{21}$ या सूर्यमूर्तीच्या वर्णनांत 'Only one attendant figure on each side of the main image' असें विधान आहे हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

सूर्याच्या दोन पावलांच्या मध्यें अरुणाची मूर्ती कोरतात अशाविषयीं मथुरा म्यूझियमच्या कॅटलॉगमधील एका सूर्यमूर्तीच्या वर्णनांतील पुढील वाक्य ध्यानांत घेण्यासारखें आहे. ' Between his feet the figure of Aruṇa, the charioteer, is still traceable and at the sides two other figures two much worn to be identified. ' (D 45 p. 104) तसेंच वरेन्द्र रीसर्च सोसायटीच्या कॅटलॉगांत सूर्याचें जें चित्र दिलें आहे त्यांतही अरुण दोन पायांमध्येंच दाखविला आहे असें वाटतें.

सूर्याच्या हातांत कमळें असावींत असें बृहत्संहितेप्रमाणें मत्स्यपुराण व इतर पद्धतिग्रंथ यांत आहेच. पण वर उल्लेखिलेल्या दोन्ही ठिकाणच्या अजबखान्यांच्या कॅटलॉगमधील बहुतेक सूर्यमूर्तींच्या वर्णनांत हातांत उत्फुल्ल कमळांचा दांडा असून कमळें खांद्यांपाशीं असल्याचें नमूद आहे. चाफळच्या मूर्तीच्या हातांच्या बोटांत कमळांचे दांडे असून कमळें खांद्यांपर्यंत गेलेलीं आहेत. फरक येवढाच आहे कीं, इतरत्र पूर्णोत्फुल्ल कमलें असल्याचें वर्णन आहे; चाफळच्या मूर्तीच्या हातांतील कमळें अर्धोत्फुल्ल आहेत. पण हें दक्षिणेंतील सूर्यमूर्तींच्या लक्षणांपैकीं एक लक्षणच आहे असें पुढील उताऱ्यांवरून ध्यानांत येईल. The South Indian figures of Sūrya have, as a rule, their hands lifted as high as the shoulders, and are made to hold lotus flowers which are only half blossomed. (Elements of Hindu Iconography vol. I p. 311). यावरून ही मूर्ती सूर्याचीच आहे हें स्पष्ट होत आहे.

सूर्याच्या रथाला सात घोडे असतात ही गोष्ट प्रसिद्ध आहे. आतां सूर्याची मूर्ती तयार करतांना रथ व सात घोडे यांच्या निरनिराळ्या आकृति काढणें कठिण असल्यामुळें बहुधा सूर्य ज्या आसनावर उभा असतो त्यालाच घोड्याचीं सात तोंडें कोरलेलीं असतात. त्याप्रमाणें येथेंही केलें आहे.

सूर्यमूर्तींच्या गळ्यांत हार व कमरेस मेखला असते अशाविषयींचें एक उदाहरण मथुरा म्यूझियमच्या कॅटलॉगमधून देतों. ' He is clad in a cuirass over which appears a very elaborate necklace ...... A double-cord girdle is tied round the loins and fastened infront' या वर्णनांतील पहिल्या भागाविषयीं थोडी शंका येत असली तरी दुसऱ्या भागाचें चाफळच्या मूर्तीशीं फार साम्य आहे. चाफळच्या मूर्तीची मेखला अशीच पुढच्या बाजूस मधोमध गांठवलेली आहे.

एवंच चाफळची मूर्ती रामाची नसून सूर्याची आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

जंजिऱ्याची मोहीम, प्रतिनिधी आणि पेशवे*

(श्री. वा. प. मेहेंदळे-औंध)

पेशवे-दप्तरांतून निवडलेले कागद म्हणून जे २७,२८ भाग प्रसिद्ध झाले आहेत त्यांतील तिसरा भाग जंजिऱ्यावरील मोहिमेसंबंधीचा आहे. त्यांत अथवा अन्यत्र कोठें ह्या मोहिमेपैकीं अमक्या भागावर किंवा अमूक बाजूनें श्रीपतराव प्रतिनिधी अथवा थोरले बाजीराव पेशवे यांनीं स्वारी करावी अशी स्पष्टता करणारें छ० शाहूचें पत्र प्रसिद्ध नाहीं. तथापि ह्या तिसऱ्या भागांत नं. ४ चें जें पत्र आहे तें ह्या मोहिमेंतील हालचाली सांगणारें पहिलें पत्र आहे व त्या पत्रांत बाजीराव आणि फत्तेसिंग भोंसले हे रायगडास आपल्या फौजेचा वेढा घालून बसले असल्याचा आणि वेढ्याचा परिणाम म्हणून त्यांजकडे (रायगडासंबंधानें, शत्रूकडील) बोलीचाली चालू असल्याचा मजकूर आहे. आणि त्यापुढेंच महाडास असलेल्या श्रीपतराव प्रतिनिधींनीं 'त्यावर रा. स्वामी (शाहू) स पत्र पाठविलें कीं, रायगडचे अनुसंधान आम्हांकडे आलें आहे, त्यास काय आज्ञा ?' म्हणून विचारिल्याचाहि मजकूर आहे. ह्या प्रतिनिधींच्या विचारण्यास शाहूमहाराजांनीं 'किले रायगडचे राजकारण करून हस्तगत करणे' असें उत्तर दिलें. ह्या उत्तरानुसार प्रतिनिधींनीं ता. ८-६-३२ रोजीं तो किल्ला हस्तगत करून मराठ्यांचें निशाण किल्ल्यावर फडकाविलें. हें पाहून म्हणजे रायगड किल्ला परत मराठ्यांचे सत्तेंत आणण्याचें यश प्रतिनिधींना अशा प्रकारें मिळाल्याचें पाहून बाजीरावाच्या मनांत प्रतिनिधींविषयीं तेढ उत्पन्न झाली.

पुढें बाजीरावानें शाहूमहाराजांस लिहून प्रतिनिधींच्या गळ्यांत अंजनवेल हस्तगत करण्याची कामगिरी अडकविली (पु. द. भा. १-१०२.). शाहूच्या आज्ञेप्रमाणें त्या कामगिरीवर श्रीपतराव गेले व आंग्र्यांचेकडून आरमारी मदत घेऊन अंजनवेल सर करण्याच्या बेतांतहि आणिली. पण इतक्यांत बाजीरावानें बकाजी व रघुनाथ हरी यांस पत्रें पाठवून प्रतिनिधीस मदत मिळूं न देण्याची खटपट केली. बाजीरावाचा कानमंत्र ऐकून ते दोघे निघून तर गेलेच (पे.द.३-१०,१२,१९); पण प्रतिनिधीनें संभाजी आंग्र्यास मदतीस बोलाविलें. (कित्ता ३७) असतां त्याचीहि मदत बाजीरावानें सेखोजीमार्फत प्रयत्न करून प्रतिनिधीस मिळूं दिली नाहीं (कित्ता ४५). श्रीपतरावांनीं विशाळगडाहून फौजेची मदत आणविली होती. पण ती मदत आरमारी नसल्यामुळें तिचा उपयोग झाला नाहीं. आणि अशा स्थितींत सिद्दी सातकडून प्रतिनिधीचा सहजच पराभव झाला. ह्याबाबतच्या एकंदर

---

* २१ वें संमेलन.

वर्णनावरून पाहतां असें म्हणावेंसें वाटतें कीं, बाजीराव हा सिद्दी सातबरोबर लढण्यास आला होता कीं प्रतिनिधीबरोबर ?

सारांश, बाजीरावाच्या ह्या प्रसंगींच्या अदूरदृष्टीमुळें व क्षुद्र स्वार्थी धोरणामुळें ह्या मोहिमेपुरतें तरी पाहतां त्याचें वर्तन त्यास कमीपणा आणणारें झालें हें म्हणणें भाग आहे. आणि हा दोष बाजीरावास दिला गेल्याचें तत्कालीन पत्रांतूनहि आढळून येत असल्यामुळें तो योग्यच ठरतो. रघुनाथ हरि बाजीरावास लिहितो 'स्वामीची आज्ञा प्रमाण. परंतु उत्तम गोष्ट न जाली. एक गनीम राहिला, दुसरे त्याचा (प्रतिनिधीचा) दावा पदरीं पडला (कित्ता ३७). असेंच पण जरा निराळ्या प्रकारानें बकाजी लिहितो. 'या मोहिमेचा विचार पुन: करावा न केल्यास त्याचा परिणाम चांगला नाहीं' (कित्ता २५).

येथेंच हेंहि लिहिणें आवश्यक आहे कीं, बाजीराव पेशवे व श्रीपतराव प्रतिनिधी ह्यांच्यामध्यें ह्या प्रसंगीं जरी वर दर्शित केल्याप्रमाणें तेढ उत्पन्न झाली होती तरी त्यांत कोकणस्थ-देशस्थ हा वाद मुळींच नव्हता. प्रतिनिधींनीं कित्येक इनामें इतरांबरोबर कोकणस्थांसहि दिलीं आहेत. इतकेंच नव्हे तर नवीन वसाहत करविलेल्या गांवींहि असला भेदभाव लक्षांत न आणतां सर्वांचा संग्रह सारख्याच थोर मनानें केला आहे. असें असतां प्रतिनिधींचे ठिकाणीं हा वाद होता असें अद्यापहि सांगितलें जातें ही केवढी अक्षम्य चूक होय! विशेषत: ऐ. उत्सवप्रसंगीं ह्याचा उल्लेख अजून होतो हें पाहून एक प्रकारें आश्चर्य व खेद वाटतो आणि खऱ्या इतिहासज्ञानाचा प्रसार किती कमती आहे हें निदर्शनास येतें (पंजाबराव देशमुख भाषण. बाजीराव उत्सव, रावेर). कोकणस्थ-देशस्थ वाद हा पुढें माधवरावांचे कारकीर्दींत दिसतो व तोहि दोन घराण्यांपुरताच होता. तात्पर्य, या वादाचा उल्लेख होणें अनैतिहासिक व चूक होय.

मंडळ-वृत्त

एकविसावें संमेलन आणि तेविसावा वाढदिवस या समारंभांचा त्रोटक वृत्तान्त.

(१) संमेलन

हा प्रतिवार्षिक समारंभ यंदा (१८५५) ज्येष्ठ शुद्ध ९।१०।११ शुक्र, शनि, रवि ह्या तीन दिवशीं (ता. २।३।४ जून १९३३) सकाळ-सायंकाळ अशा सहा सभांच्या बैठका होऊन उत्कृष्ट व यशस्वीपणानें पार पडला. संमेलनास परस्थ व स्थानिक मंडळी पुढीलप्रमाणें उपस्थित होती.

श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी–औंध, श्री. सर. ख. चिं. मेहेंदळे, श्री. सर. गो. व. पटवर्धनशास्त्री, श्री. वामनराव रामचंद्र नाईक–हैद्राबाद, श्री.वि. अ. कानोले–नांदेड, श्री. पां. के. शिराळकर–कऱ्हाड, बॅ. श्री. व्यं. पुणतांबेकर–बनारस, श्री. सर. गं. ना. मुजुमदार, प्रो. द. वा. पोतदार, श्री. द. वि. आपटे, प्रो. वा. गो. काळे, श्री. अ. वि. पटवर्धन, प्रो. शं. पु. आघारकर–कलकत्ता, रा. सा. नारायणस्वामी पिळे, रा. सा. ना. गो. चापेकर–बदलापूर, रा. सा. गं. के. देशपांडे, श्री. श्री. म. माटे, श्री. वा. सि. बेंद्रे, श्री. न. चिं. केळकर, प्रि. ध. रा. गाडगीळ, श्री. मा. ह. घोरपडे, डॉ. न. गो. सरदेसाई, श्री. अ. कृ. नूलकर, श्री. चिं. वि. वैद्य, श्री. ल. रा. पांगारकर–नाशीक, श्री. दादासो रानडे, श्री. वा. प. मेहेंदळे–औंध, श्री. श्री. कृ. कोल्हटकर, श्री. रा. ह. गाडगीळ, नाणी संग्रहकार–मुंबई, श्री.मा. वि. गुजर–सोलापूर, श्री. का. वि. खानविलकर–मुंबई, प्रो. शं. दा. पेंडसे–नागपूर, प्रो. प्रतापगिरी राम-मूर्ती–मुंबई, डॉ. कोकटनूर, प्रो. बी. डी. वर्मा, श्री. बाळुकाका भागवत–अमळनेर, श्री. म. दा. साठे–अकोट, श्री. अ. ना. गद्रे–चाळीसगांव, श्री. गो. कृ. मोडक, श्री. रा. वा. मोडक, श्री. गो. अ. मोडक, श्री. रा. ज. गोखले, श्री. दा. वि. गोखले, श्री. मा. स. भाट्ये, श्री. सि. ल. चित्रावशास्त्री, प्रो. चिं. ब. जोशी, श्री. कृ. ग. परांजपे, श्री. दि. वि. काळे, श्री. वि.गो.दिघे, श्री.चिं.मा. माटे, श्री. अं. वा. फडणीस, श्री. ग. वि देवधर, श्री. ग. ह. ओक, श्री.ग. ह. खरे, रा. ब. पी. सी. पाटील, श्री. कृ. पां. कुळकर्णी, श्री. रा. दा. देसाई, श्री. एम्. आर्. तारकुंडे, श्री. न. ग. गाडबोले, श्री. प्र. व्यं. गुळ्वी, श्री. य. न. केळकर, श्री. वि. मो. भट, श्री. य. ग. फफें. श्री. रा. त्र्यं. कुलकर्णी, श्री. सर. मा. ग. बावडेकर, श्री. रा. गो. कानडे, श्री. शं.ल. वैद्य, श्री. आर. डी. घोलप, श्री. स. ग. जोशी, श्री. वि. गं. जोशी, श्री. वि. गं. लेले, श्री. ना. वि. दातार, श्री. वि. म. कोल्हटकर, श्री. ग. स. मराठे, श्री. गं. गो जांभेकर, प्रो. वाडेकर, प्रो. स. कृ. पिंपळखरे, श्री. रा.वि. पटवर्धन, श्री. श्री.स. पंडित–जबलपूर, श्री. शं. द. देवधर, श्री. द. कृ. देवधर,–कोल्हापूर, श्री. का. ना. भिडे–अकोला, श्री. ना. गो. भिडे–भोर, श्री. प. वि. महाजन, श्री. शं. ना. जोशी, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. वि. वि. देशपांडे, श्री. मा. गो. भिडे, डॉ. गो. स. पळसुले, डॉ. बाळकृष्ण– कोल्हापूर, श्री. कृ. ग. लिमये, रा. सा. गो. स. सरदेसाई–रियासतकार, *कु. मैनाबाई शहाणे, श्री. टी. रघुनाथ ठकार, श्री. ह. ना. नेने, प्रो. न. बनहट्टी, श्री. एम्. व्ही. आठवले, श्री. चिं. वि. देशपांडे, श्री. कायरकरशास्त्री–नागपूर, हरगोविंददास पारेख–सुरत,* श्री. लक्ष्मीबाई प्रधान, श्री. गंगाबाई पर्चुरे.*

प्रथम मंडळाचे अध्यक्ष श्री. चिं. वि. वैद्य यांनीं सर्व अभ्यागतांचें अभिनंदन पूर्वक स्वागत केलें. त्या वेळीं झालेल्या त्यांच्या भाषणाचा सारांश असा—

*या यादींत वार्धादिवससमारंभाकरितां आलेल्या मंडळीची नोंदही आहे.

इतिहाससंशोधनांत मुख्यतः समकालीन लेख शोधून काढून त्यांवर इतिहास तयार करावयाचा असतो, उल्लेखाभाव हें प्रमाण केव्हां असतें, बखर ग्रंथांची योग्यता, अनुमान व तर्क ह्यांचें इतिहासरचनेस साहाय्य कोठें व कसें घ्यावयाचें त्यासंबंधींचें विवेचन मीं अशाच प्रसंगानें यापूर्वी दोन तीन प्रास्ताविक भाषणांत केलें होतें. आज पुराणग्रंथ व व्युत्पत्ति ह्यांविषयीं कांहीं विचार मांडतों. पुराणग्रंथांत पुष्कळशा कविकल्पना व रूपकें असतात. त्यांवरून इतिहासांत अंतर्भूत करतां येईल असा भाग त्यांत पुष्कळ असल्याचें मानणें हें चूक आहे. तसेंच व्युत्पत्तींच्या आधारें एकादें विधान करणें हेंहि बरोबर नाहीं. म्हणजे ह्या दोन्ही गोष्टींना मर्यादा व परीक्षा आहे. श्री. घाणेकरकृत प्राचीन द्राविड ह्या ग्रंथांत कांहीं बऱ्या व कांहीं चूक अशा कल्पना आल्या आहेत. पैकीं चुकीच्याच गोष्टी अधिक दिसून येतात. पुराणांतील रूपकें ह्या कविकल्पना मानून त्या अग्राह्य समजल्या पाहिजेत. उ० अगस्तींच्या दक्षिण आगमन प्रसंगीं विंध्य पर्वतानें नमस्कार घातला, परशुरामानें सर्व पृथ्वीदान केल्यानंतर स्वतःस राहण्यासाठीं समुद्र हटवून जागा केली तें कोंकण व रामानें सेतुबंधाचे वेळीं काढलेला बाण मारल्यामुळें मरु देश झाला अशा गोष्टी कविकल्पना आहेत. ह्यापेक्षां ग्रंथांचे रचनाकाल लक्ष्यांत घेऊन व कथांतील वास्तवभाग ध्यानीं आणून जर त्यावरून कांहीं विचार ग्रथित केले तर तें इष्ट होय. ऋग्वेदापासून पाणिनीकालापर्यंतचे सर्व ग्रंथ दक्षिण देशाचा व लोकांचा मुळींच उल्लेख करीत नाहींत हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे ऋग्वेदकालीन अगस्ती ऋषी दक्षिणेंत आलाच नाहीं असें मानणें भाग आहे. येथेंच हेंहि लक्ष्यांत येतें कीं, आर्यांची दक्षिणेकडे गति पाणिनीनंतर (इ. स. पूर्व ८००) व बुद्धपूर्व (इ. स. पूर्व ५००) कालांत झाली असावी. परशुरामाच्या जुन्या उल्लेखावरून पाहतां परशुरामाचें पहिलें स्थान महेंद्रपर्वत व नंतर शूर्पारकाजवळ. त्यानंतर आर्यांची वसती अपरान्तातून गेली.हा काल हरिवंशाच्या वेळचा येईल. त्यानंतर म्हणजे इ. स. ५०० च्या सुमारास चिपळूण व परशुराम ह्यांचा संबंध आला.कोकणस्थांचा व परशुरामाचा कांडीइतकाहि संबंध नाहीं. श्री. घाणेकर म्हणतात पोळनाड ह्या शब्दाला चिक्क (लहान) हा शब्द लागून त्यापासून चिपळूण शब्द बनला. पण हें अशास्त्रीय आहे. सारांश, नामसादृश्यावरून अनुमानानें सिद्धांत सांगणें धोक्याचें आहे. ज्या एकाद्या ग्रंथांतील कथेचा आधार आपण घेऊं पाहतो त्या ग्रंथाचा काल आपण प्रथम लक्ष्यांत घेतला पाहिजे व नंतर त्यांतील उल्लेख ही कविकल्पना नाहींना हें पाहिलें पाहिजे. असो. या प्रकारें संशोधनशास्त्रांतील कांहीं नियमांचा सोदाहरण उलगडा मला वाटला तो केला आहे. आतां ह्यानंतर आपल्या कामांस प्रारंभ करावयाचा आहे. त्यापूर्वी पुनः एकदां आपणा सर्वांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों.

ह्यानंतर निबंधवाचनास प्रारंभ झाला. वाचलेल्या निबंधांची नोंद पुढें दिलीच आहे, संमेलन प्रसंगीं इतर झालेल्या चर्चेचा व भाषणांचा थोडक्यांत सारांश असा—

रविवारीं (४।६।३३) म्हणजे संमेलनाचे तिसरे दिवशीं श्रीमंत पंडित **बाळासाहेब पंतप्रतिनिधी** यांचें सकाळच्या निबंधवाचनाचे अखेरीस भाषण झालें. त्यांत त्यांनीं पुढील दोन गोष्टींविषयीं शोध व विचार व्हावा असें सुचविलें. (१) छ. शिवाजी महाराजांनीं जीं ७८ लग्नें केलीं तीं कोणत्या राजकीय हेतूनें केलीं असावीं ! व (२) महाराजांच्या हालचालीं ज्या ज्या प्रमुख स्थलीं झाल्या त्यांपैकीं निदान किल्ल्यांपुरती बरीच माहिती एकत्रित केली जावी आणि त्याविषयीं ह्या मंडळामार्फत किंवा मंडळांतील मंडळीकडून प्रयत्न व्हावा. लग्नसंबंधींच्या मुद्याबद्दल बोलतांना श्रीमंत म्हणाले, " आम्हाला खास वाटतें कीं हीं लग्नें उच्च अशा राजकीय दृष्टीनें व ऐक्याच्या हेतूनेंच झालीं असावीं. महाभारतांतहि पांडव वगैरेंचा अशा प्रकारच्या लग्नसंबंधींचा स्पष्ट आधार मिळतो. तेव्हां ज्या ज्या घराण्याशीं हा सोयरसंबंध झाला त्या त्या घराण्याविषयीं माहिती मिळवून तसा एकादा निबंध मंडळांत वाचला जावा. किल्ल्यांच्या संबंधानेंही श्रीमंतांचें म्हणणें कीं, अशी माहिती प्रसिद्ध होणें जरूर आहे. कारण त्यामुळें महाराजांच्या राजकीय व युद्धविषयक हालचालींची अधिक स्पष्टता होणार आहे. उ० महाराज पन्हाळ्याहून रांगणा कीं खेळणा ऊर्फ विशाळगड ह्या किल्ल्यावर गेले असा प्रश्न आहे. दोन्ही ठिकाणें पाहतां व त्या काळची परिस्थिति लक्ष्यांत घेतां आम्हांस रांगणाच इष्ट व शक्य वाटतो. परंतु त्यासंबंधीं निर्णायक बोलण्यापूर्वी असा माहितीपूर्ण फेरविचार व्हावयास पाहिजे. त्याप्रमाणेंच इतरहि किल्ल्यासंबंधींची गोष्ट आहे. सारांश, किल्ल्यांसंबंधानेंहि मंडळानें स्वातंत्र्यानें माहिती मिळवावी. किल्ल्यांचे निरनिराळ्या प्रकारचे फोटो घेणें व समक्ष अवलोकन करून भौगोलिक स्थिति ध्यानांत आणणें ह्यासाठीं प्रवासास निघण्याचा आमचा विचार आहे व त्यावेळींहि मंडळाचें साहाय्य व्हावें.

रविवारीं दुपारीं जबलपूरचे श्री. श्री. स. पंडित यांनीं आपली देवनागरी लिपी सुधारणेसंबंधींची कल्पना, वर्णांच्या आकृती काढून दाखवून त्यासंबंधींच्या विवेचनानें स्पष्ट करून सांगितली. नंतर श्री. रु. पां. कुलकर्णी यांनीं पेशवाईच्या इतिहासप्रसिद्धीची योजना सभेपुढें मांडिली. ते म्हणाले पेशवे दप्तर प्रसिद्ध झाल्यामुळें व इतरहि कागदपत्र बरेच प्रकाशित झाल्याकारणानें पेशवाईचा इतिहास विस्तृत व सूक्ष्मपणें लिहिला जाणें शक्य झालें आहे. तसेंच हा इतिहास कारकीर्दवार न लिहितां विषयपरत्वें लिहिणें इष्ट असून हें काम एकट्याच्या हातून होणारें नाहीं. एवढें सांगून ह्या इतिहासग्रंथाच्या प्रसिद्धीची व विषयलेखकांचीहि योजना त्यांनीं दर्शित केली. ह्या योजनेवर श्री. पोतदार, प्रो. वा. गो. काळे, श्री. द. वि. आपटे यांचीं भाषणें झालीं. नंतर श्री. शं. ल. वैद्य यांची मंडळाच्या दप्तरखान्यासंबंधींची योजना श्री. कुलकर्णी यांनीं वाचून दाखविली. त्यावरहि श्री. न. चिं. केळकर व प्रो. पोतदार यांचीं अनुकूल भाषणें झालीं. येथेंच ॲबट यांच्या देणगीमुळें मंडळाच्या सांपत्तिक स्थितीविषयीं

जो गैरसमज उत्पन्न झाला आहे त्याविषयीं माहिती व खुलासा प्रो. पोतदार यांनीं केला तो असा. ॲबट यांच्या कुबेरी देणगीनें मंडळाचें कर्ज निवारण झालें हा तर महदुपकारच झाला. तथापि चालू खर्च सालीना ४।५ हजारांचा आहे तो चाललाच पाहिजे आणि त्यासाठीं मदतीची जरूरी आहे. यास्तव आतां मदत कशास पाहिजे असा भलताच गैरसमज कोठें कोठें आढळून येतो तो अनाठायीं आहे. रा. पोतदार व केळकर यांचीं यानंतर आणखी भाषणें या देणगीचे विनियोगाबाबत झालीं. अखेर पक्की योजना कारभारी मंडळानें मांडावी असें ठरलें.

त्यानंतर मंडळसंग्रहांतील ऐ. चित्रांसंबंधानें श्रीमंत पंतप्रतिनिधींचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं चित्रांच्या संरक्षणासंबंधीं कांहीं सूचना केल्या व त्या कामीं लागणाऱ्या खर्चाची अंशतः व्यवस्था करूं असें सांगितलें.

नंतर मंडळाचा शके १८५४ सालचा वार्षिक वृत्तांत चिटणीस प्रो. पोतदार यांनीं वाचून दाखविला. (हा वृत्तांत पुढें स्वतंत्रच जोडला आहे.) त्यास श्री. गो. अ. मोडक व प्रो. पुणतांबेकर यांनीं अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमतें मान्य झाल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें.

ह्यानंतर मंडळाच्या कारभारी मंडळाची वार्षिक निवडणूक झाली. प्रो. जोशी व श्री. सर. मेहेंदळे यांच्या मताप्रमाणे पहिलेच सभासद कायम समजावे असें सभेनें मत दर्शविल्यावरून प्रो. काळे, रा. सा. देशपांडे व श्री. घोरपडे ह्यांची निवड कायम झाल्याचें अध्यक्षांनीं सांगितलें. नंतर पुन्हां थोडें निबंधवाचन होऊन हा समारंभ संपला.

संमेलनप्रसंगीं श्री. या. शं. वावीकर यांनीं आपल्या पत्नी कै. सौ. यमुनाबाई यांच्या स्मरणार्थ मंडळास एक जाजम दिल्याचें चिटणीसांनीं आभारपूर्वक जाहीर केलें.

(२) वाढदिवस

मंडळाचा २३ वा वाढदिवस संमेलनानंतर २० दिवसांनीं आषाढ शु॥ १ (ता. २४।६।३३) शनिवार रोजीं साजरा झाला. वाढदिवसाच्या समारंभप्रसंगीं प्रतिवर्षाप्रमाणें निबंधवाचन झालें त्याची यादी पुढें जोडली आहे. ह्या समारंभाचे प्रसंगीं प्रारंभीं मंडळाचे अध्यक्ष श्री. चिं. वि. वैद्य यांचें स्वागतपर भाषण होऊन त्यांत त्यांनीं इतिहास संशोधनाच्या आवश्यकतेसंबंधानें थोडेंसें प्रतिपादन केलें. मनुष्यानें ज्ञानी असावयास पाहिजे हें जितकें खरें तितकेंच त्या ज्ञानांत इतिहासाचा अंतर्भाव सहज व प्रामुख्यानें होतो हेंहि खरें आहे. आणि ह्यावरून इतिहास व त्याच्या संशोधनाची आवश्यकता किती आहे हें ओघानेंच आपल्या निदर्शनास येईल. आज वैभवसंपन्न, सुधारलेलीं, ज्ञानसंपन्न राष्ट्रें इतर देशांचे, धर्मांचे व लोकांचे इतिहास, ज्ञानाचा भाग म्हणून शोधित आहेत. मग आपण आपलाच इतिहास समजून घ्यावयास पाहिजे हें निराळें सांगण्याचें कारणच नाहीं. आजचा भाकरीचा प्रश्न सोडविण्यास

प्रत्यक्षतः ह्या इतिहासाची आवशकना नाहीं हें उघड आहे. पण केवळ एवढ्याच ढोबळ दृष्टीनें पहाणारास ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः हें वचन लावावें लागेल आणि मग भाकरीचे म्हणून आज जे थोर प्रयत्न होत आहेत तेहि करण्याचें वर्ज्य मानावें लागेल सारांश, जगणें ह्यालाहि कांहीं विशिष्ट व उदात्त अर्थ आहे; जनावरी जगणें हें माणसाला केव्हांहि अमान्यच होणारें आहे; अर्थात् इतर चालू असणाऱ्या व कराव्या लागणाऱ्या कार्यांबरोबर इतिहासाचेंहि कार्य अत्यावश्य कर्तव्य ठरतें. तें कार्य हें आपलें मंडळ आज २२ वर्षें करीत आहे. अखिल महाराष्ट्रांत काय पण अखिल हिंदुस्थानांत अशी एकाद दुसरीच संस्था आहे. तेव्हां ह्या संस्थेकडे आपण सर्वांनीं सहानुभूतीनेंच पहावें व पहात आहांहि हें सांगणें जरूर आहे. कांहीं लोकांचीं ह्या इतिहासकार्याविषयीं विचित्र मतें आहेत असें केव्हां केव्हां आढळून येतें. हा वर्ग अल्प असला तरी शहाण्यांचा आहे. यामुळें त्यांच्या मतांचें सखेदाश्चर्यहि वाटतें. पण त्याचा केला ह्यापेक्षां अधिक विचार करण्याचें कारण नाहीं. आपल्या मंडळाला वर म्हटल्याप्रमाणें आज २३ वें वर्ष लागत आहे. व्यक्तिदृष्ट्या पाहिलें तर पौगंड अवस्थेंत हें मंडळ पदार्पण करीत आहे असें म्हटलें पाहिजे. पण संस्थांचं आयुमान व्यक्तिपेक्षां अधिक धरावयास पाहिजे. शतायुर्वै पुरुषः ह्याऐवजीं द्विशतायुर्वै पुरुषः असा बदल करून संस्था किंवा राष्ट्रें ह्यांचें आयुष्य दोनशें वर्षें असतें हें लक्ष्यांत घेतलें असतां मंडळाच्या स्थैर्याविषयीं आपणांस विचार करावयास पाहिजे. आजपर्यंतचें २२ वर्षांचें भरदार व उत्कृष्ट कार्य आपल्यापुढें आहे. इतिहासाकडे जात, पंथ इत्यादि संकुचित व क्षुद्र दृष्टीनें न पाहतां त्याचा अभ्यास व संशोधन हें मंडळ करीत आहे हें सांगण्यास मला अभिमान व आनंद वाटतो. ही मंडळाची दृष्टि आपण मुख्यतः ध्यानांत घ्यावी. असो. आपण मंडळाच्या ह्या समारंभास आत्मीय भावनेनें आलां तशीच उत्तरोत्तर वाढती भावना आपली असावी येवढें सांगून मी आपलें अंतःकरणापासून स्वागत करतों.

येणेंप्रमाणें अध्यक्षांचें भाषण झाल्यानंतर प्रो. पोतदार म्हणालेः ह्या वाढदिवसप्रसंगीं मंडळाच्या कार्यकर्त्यांत बऱ्याच नवीन अभ्यासी मंडळींची भर पडली आहे हें नमूद करणें अतीव आनंदाचें वाटत आहे. नांदेडचे श्री. कानोले, नागपूरचे श्री. ह. ना. नेने, सांगलीचे श्री. टी. आर. ठकार, पुण्याचे श्री. परांजपे, लेले, ओक, कानेटकर, कर्वे ही ती मंडळी होत. मंडळाच्या कार्यास जाणीवपूर्वक व कर्तव्यबुद्धीनें ज्या वृत्तपत्रकारांचें साहाय्य नेहमीं होतें त्यांचा उल्लेख वार्षिक वृत्तान्तप्रसंगीं झालाच आहे. तथापि केसरी, ज्ञानप्रकाश, सकाळ, नवा काळ, महाराष्ट्र इत्यादिकांचा आभारपूर्वक उल्लेखहि ह्या प्रसंगीं अवश्य म्हणून करावासा वाटतो.

मंडळाच्या ह्या वाढदिवस प्रसंगीं वांई येथील श्री. आनंदीबाई भ्र. विश्वनाथ आठवले यांनीं आपले वडील कै. नारायण बाळकृष्ण गोडबोले यांचे स्मरणार्थ

नक्षीदार पेटी, श्री. दत्तात्रेय व महिषासुरमर्दिनीच्या मूर्ती व पंखा, आणि कलमदान ह्या चंदनाच्या अर्वाचीन वस्तू भेट म्हणून नजर केल्या. तसेंच श्रीमती **गंगाबाई परचुरे** पुणें यांनीं मंडळास १०० रुपयांची देणगी संशोधनार्थ दिली. श्री. रु. ग. लिमये सं. ज्ञानप्रकाश व रा. ब. पी. सी. पाटील हे वर्ग २ चे आणि प्रो. श्री. ना. बनहट्टी, व श्री. ह. ना. नेने एम. ए.–नामपूर हे वर्ग ४ चे वार्षिक सभासद झाले. त्या सर्वांचे मंडळ फार आभारी आहे.

वाढदिवसाच्या दुपारच्या बैठकींत पेशवे दप्तराबाबत सरकारकडून इंग्रजींत एक हँडबुक प्रसिद्ध झालें. तें आटोपशीर, थोडक्यांत व नकाशा जोडलेलें असें उत्तम झाल्यामुळें सरकारचें अभिनंदन करणारा ठराव करण्यांत आला. त्यानंतर श्री. रु. पां. कुळकर्णी यांचेंहि थोडेंसें भाषण, श्री. रा. सा. गो. स. सरदेसाई यांच्या अनुज्ञेनें झालें. नंतर सरकारनें आजच्या हँडबुकाचें मराठी भाषांतर करावें, त्याचा फार उपयोग होईल असा दुसरा एक ठराव करण्यांत येऊन तो सरकारकडे पाठविण्याचें ठरलें.

ह्यानंतर विख्यात सेनापति व वीरवर बापू गोखले ह्या ऐतिहासिक पुरुषाच्या चित्राचें अनावरण मंडळाचे अध्यक्ष श्री. चिं. वि. वैद्य यांचे हस्तें झालें. चित्राचें मूळ प्रसिद्ध संशोधक कै. पां. न. पटवर्धन यांनीं सातारा–चितळे संग्रहांतून संपादिलें होतें. त्या चित्रावरून चित्रकार श्री. वि. धों. पटवर्धन यांनीं प्रस्तुतचें चित्र मोठें केलें आहे. हें चित्र श्री. पटवर्धन यांनीं मोठ्या श्रमानें काढलें व मंडळास प्रेमानें अर्पण केलें याबद्दल त्यांचें जाहीर अभिनंदन करण्यांत आलें. तसेंच श्री. वा. रु. ओक ह्यांनीं मोडींत लिहिलेलें सोहनीकृत पेशव्यांची बखर हें पुस्तक प्रो. पोतदार यांनीं मंडळास सादर केलें. नंतर हाही समारंभ पूर्ण झाला.

---

२१ वें संमेलन व २३ वा वाढदिवस यांत झालेला कार्यक्रम

(१) २१ वें संमेलन

ता. २-६-३३ शुक्रवार–पहिला दिवस– मि. ज्येष्ठ शु. ९ श. १८५५

सकाळ

प्रारंभीं मंडळाचे अध्यक्ष श्री. चिं. वि. वैद्य यांनीं सभासदांचें व अभ्यागतांचें स्वागत केलें. नंतर चिटणीसांचें प्रास्ताविक निवेदन, शुभसंदेशकथन इ. नंतर

निबंधवाचन, चर्चा व प्रदर्शन

श्री. चिं. वि. वैद्यः-(१) बंगालच्या विजयसेनादि राजांचा काळ

श्री. वा. सी. बेंद्रेः-(२) An old account of Akkanna & Madanna

श्री. ग. ह. ओकः-(३) मराठी सैनिकांची मनोभूमिका

श्री. कृ. ग. परांजपे, एम्. ए. बी. टीः-(४) नजीब उद्दौल्याचें स्वभावचित्र

प्रदर्शनः-रा. **देवधरः**-एक जुनी गुडगुडी; **मि. मुहम्मद रमजान** (जोधपूर), यांचे संग्रहांतील **दोन अमोलिक चित्रें** (टांचणः-प्रो. पोतदार)

१ औरंगजेब सिंहावर वार करीत आहे. २ रूपमती व बाज बहादुर

सायंकाळ

श्री. ग. ह. खरेः-(५) वाईचे नायकवाडी व शिवाजीमहाराज (६) चार फारसी फर्मानें

श्री. वि. अ. कानोले(नांदेड):-(७)वामन पंडिताबद्दल अस्सल सनदा-पत्रांचे आधारें **नवीन महत्त्वाची माहिती**

श्री. शं. ना. जोशीः-(८) मराठा ज्ञातीविषयीं श्री. प्रतापसिंह महाराज छत्रपति यांनीं केलेले कांहीं वागणुकीचे नियम-(सोबत छत्रपती प्रभृतींच्या सह्या असलेल्या मूळाचें प्रदर्शन) (९) श्री. छत्रपत्री प्रतापसिंह यांनीं काशीवासाचे प्रसंगीं केलेलें वार्षिक खर्चाचें टिपण

प्रदर्शनः- श्री स. ग. जोशीः-जिरेटोप व मि. **मु. रमजान** (जोधपूर):-रजपूत राजांचीं चित्रें

—:०:—

ता. ३-६-३३ शनिवार - दुसरा दिवस - मि. ज्येष्ठ शु. १० श. १८५५

सकाळ

श्री. य. गो. कानिटकर एम्. ए.(१०) सखाराम बापूंचें दुटप्पी वर्तन ?

श्री. वा. सी. बेंद्रेः-(११) विजयपुरमाहात्म्यम् (संस्कृत)

श्री. मा. वि. गुजर बी. ए.:-(१२) मराठ्यांच्या आरमारी सत्तेचा लय

श्री. स. ग. जोशीः-(१३) वाईचे सुभेदार हैबतखान-नवी माहिती

श्री. ग. ह. ओकः--(१४) मल्हारराव होळकराचा फितुरी स्वभाव

सायंकाळ

श्री. स. ग. जोशीः-(१५) परगणे वाईची औरंगजेबकालीन **कोसकसी**

श्री. कृ. पां. कुलकर्णी एम्. ए. बी. टी.:-(१६) पानिपतप्रसंगाबाबत कांहीं नवीन माहिती

श्री. दि. वि. काळे, एम्. ए.:-(१७) आळंदीच्या यात्रेची पेशवाईतील व्यवस्था

श्री. वि. गं. लेले:--(१८) शेवटचे छत्रपति व पेशवे यांचे संबंध

श्री. वा. प. मेहेंदळे:- (औंध) (१९) जंजिरामोहीम व प्रतिनिधी आणि पेशवे.

ता. ४।६।३३ रविवार-तिसरा दिवस- मि. ज्येष्ठ शु. ११ श. १८५५

सकाळ

श्री. शं. ना. जोशी:-(२०) मरळ देशमुख

श्री. य. न. केळकर:-(२१) वसईच्या मोहिमेंतील तारापूरचा वेढा

श्री. दे. वि. आपटे बी. ए.:-(२२) मराठ्यांची राजनिष्ठा व धर्मनिष्ठा

प्रो. भ. द. वर्मा:-(२३) Some pages from the Diary of Maratha Sardars (1817 A.D.)

सायंकाळ

मोकळी चर्चा:- (१) श्री. कृ. पां. कुळकर्णी-पेशवाईच्या विषयवार इतिहासाच्या लेखनप्रकाशनाची योजना.

(२) सामान्यतः सर्व-मंडळ दफ्तरखाना व चित्रसंग्रह यांची व्यवस्था

चिटणीस:-(कारभारी कामें)

(१) भा. इ. सं. मंडळाच्या कारभाराचा वृत्तांत (खर्डा) शके १८५४

(२) आयव्ययपत्रक १८५४ व अंदाजपत्रक १८५५

(३) हिशेबनिसांची निवडणूक

(४) कारभारी मंडळावरील वार्षिक निवडणूक इ. इ.

श्री. गं. ना. मुजुमदार:-(२४) अंतापूर येथील एक मूर्ति

श्री. ग. ह. खरे:-(२५) करवीरच्या महालक्ष्मीचें प्राचीनत्व व तिजविषयींचे आक्षेपांचा विचार

श्री. वि. अ. कानोले (नांदेड):-(२६) रघुनाथ शेषकृत कृष्णकौतुकलीला

प्रदर्शन:- **मि. मुहम्मद रमजान:**- जुनीं चित्रें.

प्रो. द. वा. पोतदार:-रहिमतपूरचे कानेटकर यांजकडील जुनीं हत्यारें

पुस्तक प्रसिद्धीकरण-पुरस्कृत ग्रंथमालेंतील.

(१) **श्री. गुब्बी:**- श्री. मध्वमुनीश्वरांची कविता (पु. क्र. ३०)

(२) **श्री. वि. गो. दिघे** एम्. ए.:-मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा. (पु.क्र. ३१)

---

(२) तेविसावा वाढदिवस

आषाढ शु. १ १८५५–शनिवार–ता. २४-६-१९३३.

सकाळ

मंगलवादन–चौघडा ७॥ ते ८

अध्यक्ष–श्री. **चिं. वि. वैद्य**–प्रास्ताविक व स्वागतपर भाषण

निबंधवाचन—

श्री. चिं. वि. वैद्य–कोंकण–व्युत्पत्ति व व्याप्ति

प्रो. द. वा. पोतदार–विप्रनारायणकृत अश्वमेध

श्री. वा. सि. बेंद्रे–शहाजी, संभाजी व एकोजी यांच्या कर्नाटकांतील कांहीं सनदा

पारसी प्रकाश आणि सन, माह, तेरीख पद्धती

श्री. चिं. ग. कर्वे–पानपतची नवी बखर (धारवाड प्रत)

श्री. य. न. केळकर–वसईच्या मोहिमेंतील माहिमचा संग्राम

प्रदर्शन—भारतीय विणकाम वगैरेचें अपूर्व खास प्रदर्शन

सुरत येथील श्री. हरगोविंददास ई. पारेख यांच्या संग्रहांतील प्राचीन काळच्या विणकामाचे, भरत कामाचे, छापकामाचे, रंग कामाचे वगैरे **वस्त्रांचे अपूर्व नमुने** (सुमारें एकहजार) यांचें **खास प्रदर्शन** उघडलें आहे.

यांत डाक्याची मलमल, आणि मदुरा, बऱ्हाणपूर, वरंगळ, औरंगाबाद, मछली-पटण, वगैरे अनेक प्रसिद्ध ठिकाणचे किनखाप, हिमरूं, मशरूं, निमजरी वगैरे विविधप्रकारचे नमुने एकत्र पहावयास ठेविले होते. हें प्रदर्शन १४ दिवस उघडें ठेविलें होतें.

सायंकाळ

मोकळी चर्चा ५ ते ५।—पेशवे दफ्तराचे कामाचें अभिनंदन

अनावरण– ५।—५॥ प्रसिद्ध वीरवर **बापू गोखले** यांची तसबीर

निबंधवाचन—

श्री. मा. ह. घोरपडे–संताजी घोरपडे यांचें हस्ताक्षर

श्री शं. ना. जोशी–वैद्य प्रभु देशपांडे–कानद्खोरें

श्री. ह. ना. नेने–महानुभावी ग्रंथांतील एक सामाजिक प्रसंग.

श्री. टी. आर. ठकार (सांगली)– एका बाडावरील टिपण.

श्री. स. ग. जोशी–कुसगांव (खेडेबारें) येथील शिवकालीन मुसलमान पाटील घराणें

श्री. दि. वि. काळे–पेशवाईतील हिशेब.

श्री. प. ह. थत्ते–(नाशीक) मत्स्ययंत्र (होकायंत्र)

प्रदर्शन–श्री. थत्ते–

(१) विश्वासराव लक्ष्मण यांची मुद्रा (२) रामनामांकित अंगठी

श्री. आठवले–चंदनाची नक्षीदार पेटी, दत्तमूर्ती, महिषासुरमर्दिनी, पंखा कलमदान (आनंदीबाई विश्वनाथ आठवले, वांई)

देणगी–मि. मुहम्मद रमजान यांजकडून-राजे अभयसिंग यांची तसबीर

पाक्षिक सभा—गेल्या तिमाहींत ४ पा. स. होऊन त्यांत पुढील लेखकांनीं त्यांचे नांवावर असलेले ११ निबंध वाचले.

	अ.	लेखक	निबंध
पा. स. १	१	श्री. द. वि. आपटे	जमखंडीविषयीं जुनी माहिती.
	२	श्री. नानासाहेब चापेकर	आटपाडी येथील पाठकांचे कागद (अमृतराव निंबाळकर इत्यादि)
	३	श्री. वि. वा. जोशी	मराठी यंत्र
	४	श्री. ग. ह. ओक	पेशवे दप्तर भाग १२ मधील कांहीं तारखांविषयीं विचार
	५	श्री. ग. ह. खरे	चाफळची मूर्ति रामाची कीं सूर्याची?
पा. स. २	६	"	"
पां. स. ३	७	श्री. द. वि. आपटे	जुन्या मापांविषयीं विचार
	८	श्री. शं. ना. जोशी	सूर्याजी पिसाळ याचें पिलाजी मोरे (चंद्रराव) यास पत्र
	९	श्री. ग. ह. ओक	पेशवे दप्तर भाग १२ ह्यांतील कांहीं तारखांविषयीं विचार
	१०	श्री. शं. ना. जोशी	मारणे देशमुख
	११	श्री. ग. ह. खरे	माझ्या प्रवासांतील मूर्तीविषयीं माहिती

सभासद--गेल्या तिमाहींत झालेल्या नूतन सभासदांची यादी पुढें दिली आहे.

१७३० श्रीयुत माधव सखाराम भाट्ये[1] (पुणें), १७३१ गोविंद कृष्ण मोडक[1] (पुणें), १७३२ सावळाराम वामन गुपचुप[1] (पुणें), १७३३ भिकाजी लक्ष्मण पटवर्धन[1] (पुणें), १७३४ कृष्णाजी गणेश परांजपे[1] (पुणें), १७३५ प्रो. प्रतापगिरी राममूर्ति[1] (मुंबई), १७३६ श्री. यशवंत दिनकर पेंढारकर[1] (पुणें), १७३७ श्री. विश्वेश्वर अंबादास कानोले[1] (नांदेड), १७३८ रामचंद्र गोविंद कानडे[1] (पुणें), १७३९ श्रीधर विनायक आगाशे[2] (पुणें).

ग्रंथालय-गेल्या तिमाहींत पुढील पुस्तकें ग्रंथालयांत सामील केलीं लेखक किंवा संपादकच देणगी देणारा असल्यास त्याचा स्वतंत्र उल्लेख केला नाहीं. इतरांचा टीपांत उल्लेख केला आहे.

(उपाध्ये ज. के.) रुबाया, (ओतूरकर रा. वि.) हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास, (कानोले वि. अं.) श्री. गुरुगोविंदसिंह यांचें चरित्र, (किंजवडेकर रा. द.) कणिकनीति, (घाणेकर ल. गो.) प्राचीन द्राविड (अभिप्रायार्थ), (डॉरचेन ऑगस्ट) दि ट्वेल्व्ह बेस्ट शॉर्ट स्टोरीज इन् दि फ्रेंच लँग्वेजू[2], (तांबोळकर भि. स.) मिरज संस्थानचें संक्षिप्त वर्णन[3], (देशपांडे य. खु.) शारदाश्रम वार्षिक १८५५, (पटवर्धन वि. ग.) पटवर्धन वंशाचे मूळ पुरूष हरिभटबाबा पटवर्धन यांचें चारित्र[4], (पेशवे दप्तर) बाळाजीराव पेशवा उत्तर हिंद[5] (पुरवणी) १७४२ ते १७६१, (भावे वि. ल.) प्रकाशप्रदीप[6] (महाराष्ट्र कवि), (मोडक बा. प्र.) पुरवणीजंत्री १८९० ते १८९३ व पुरवणी जंत्री १९२९-१९४०, (यीटस्-ब्राउन) बेंगाल लॅन्सर[2], (वालावलकर अ. ब.) मठगांवचा शिलालेख आणि कुडाळप्रांताचा प्राचीन इतिहास भा. १ ला, (शॉ बर्नार्ड) दि ॲपल् कार्ट[2], (सातवळेकर श्री. दा.) पुरुषार्थ क्रमांक १०५=पुरुषार्थ शिवाजी अंक[7]. (चिटणीस वसंत व्याख्यानमाला श. १८५५) वसंतव्याख्यान-माला वृत्तं श. १८५५

इतरवृत्त.

मंडळाचे एक कार्यकर्ते श्री. शं. ना. जोशी व श्री. ह. ई. पारेख (सुरत) हे येथील ऐतिहासिक दुर्मिळ वस्तु आणि विणकामाचे प्राचीन अर्वाचीन सुमारें १००० नमुने घेऊन सोलापूर येथें गेले होते व तेथें या वस्तूंचें प्रदर्शन म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष रा. बाबूराव नरसप्पा जक्कल यांचे हस्तें बुधवार ता. १२ जुलै रोजीं उघडण्यांत आलें. श्री. स. ग. जोशी हेही दोघांस मदत करण्यास गेले होते.

---

१ वार्षिक वर्ग ४, २ तहाहयात वर्ग ४

१ कोल्हटकर वि. म. २ तळेगांवकर न. शि. ३ भट दा. मो. ४ पटवर्धन धुं. चिं. ५ गव्हर्नमेंट ऑफ् बॉम्बे. ६ बऱ्हाणपूरकर. ७ काळे दि. वि. खरे, ग. ह., ८ देसाई पां. ग.

Marathi contents of this issue.

Articles.

(1) **The time of Vijayasena and others of Bengal**—by C. V. Vaidya—gives a verse from **Ragatarangini** of Lochana which mentions the coronation year of Ballalasena and helps, in his opinion, to decide the year of the commencement of the Sena era.

(2) **Two paintings**—by Prof. D. V. Potdar—is a description of the said paintings by Ruparam. In one is shown Aurangzeb hunting a lion and the other is a scene of attack on Rupamati and Baj Bahadur.

(3) **Weapons from Mr. Kanetkar of Rahimatpur (Satara)**—by Prof. D. V. Potdar—gives the list of weapons presented by Mr. Vishnu Gopal Kanetkar of Rahimatpur.

(4) **The image of Rama at Chaphal (Satara)**—by G. H. Khare—the writer contends on various grounds that the said image whether installed by Ramadasa or not is of the God Surya and not of Rama as is being supposed generally.

(5) **The expedition against Janjira, Pratinidhi and Peshwa**—by V. P. Mehendale—blames Bajirao I for having acted selfishly in this expedition.

Sources.

Pertaining to Shivajis Times: (1) Letters about Mounibava from Patgaon (Kolhapur)—by R. S. G. S. Sardesai—contains the remaining letters on which his article about Mounibava is based. (2) Letters from the Nāyakwādi family of Wai (Satara)—by G. H. Khare—are five in number. Nos. 3 and 4 describe the precarious condition of the fort Kelanja near Wai about A. D. 1666 and 1667 to which it was reduced owing to the attacks of Shivaji's men and the need of its repairs; while No.5 gives some account as to how the same fort was taken by Shivaji's men in A.D.1674, supporting the statement of the Jedhe Chronology about this incident. (3) Letters from the Maral family from the Bhor State—by S. N. Joshi, to be continued—contains 7 letters. Nos. 1,2, 4, 6, 7 are Nizamshahi orders sent to the members of the Maral family asking

them to help Vithoji Shitole, Nayakwadis of the fort Rohida, Ajalkhan, and Shahaji Bhoslah in expeditions under them, sent against Adilshahi men swarming about Shirval and other places in A. D. 1618, 1621, 1622 and 1628 respectively.

अभिप्राय.

It was my great good fortune to be able to pay a visit to Bharat Itihas Sanshodhak Mandal. It is a most useful institution and all who have the pride of their country in their views ought to be proud of it. During my hurried visit to Poona I was not able to give much time to it. I must, however, offer my sincere congratulations to those who are conducting it, for the admirable work they are doing in the cause of a true History of India.

Poona, 29th April 1933. HARBILAS SARDA.

We are very much pleased to pay a visit to the institution and see the interesting collection of historical exhibits which the Mandal has taken so much pains to collect and to preserve. We are very grateful to Mr. Potdar for giving us this opportunity.

R. N. PANDIT,
Retired Dy. Collector.

8-5-33.

D. B. DESHPANDE,
Dy. Collector,
Alibag.

येकून सालीना निा हा न ९९

स्वामी जवळ सेवेस उदक गध धूप
दीप सनिध सेवा जोगा हान
१२८०

गाई म्हैसी कराव्या नेवद्यास दधदहा
व अभिसेकास त्यास सेवक १
येकूण होनु ६८०

ब्राह्मण निा होनु २७८०

आजंभट नित्यपूजा	पुराणिक
नेवद कर्तो ६	रामभट ६
६	
१२८०	विठलभट ६
जोसी सालीना होन	१२८०
३८०	

येकूण तेरीज मोईन निा होनू
१२८।।।≈ पूजा
४४८= सहस्त्रभोजन
३०० सेवक
२७८ ब्राम्हण
९००८०

यो होन पाचसे येणे पाा सालीना पाा करीत जाणे श्रीयासी छत्र-
पति स्वामसि कल्याण इछगे छ ९ साबान

[पाठीवर शिक्का *]

ले. ७३८ } श्री { श. १६०८ कार्तिक शुद्ध ४
मृ. दा. प. } { इ. १६८६ आक्टोबर ११

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके [१] ३ क्षयनाम संवत्सरे कार्तिक शुध चतुर्थी इंदुवासरे क्षत्रियकुलावंतस सिव्हासनाधीश्वर श्रीराजा शंभु-
[लं. व.*] छत्रपति स्वामी याणी राजश्री नीलकंठ नारायेण
श्री ॥ शंभुनर देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाल यासि आज्ञा
पति हर्षनिदान मोरे केली यैसी जे पाटगावी परमहंस मौनी गोसावी होते
श्वरसुत नीळकंठ यावेरी ते मृत्यु पावले गोसावी वर्तमान असतां व
मुख्य प्रधान राजश्री कैलासवासी स्वामी असतां त्याचे राहाते स्थळीं मठ बांधोन दिल्हा व मोहत्सवास थोडें बहुत प्रति वर्षी चालवीत होते यावरी गोसावीं मृत्यु पावले यानंतर मा। गणोराम देशाधिकारी यानी हुजूर येऊन विनंती केली कीं स्वामीच्या राज्यांत यैसे सत्पुरुष होते आणि मृत्यु पावले त्यांचे स्थ[ळीं] महोत्सव चाले यैसे केले पाहि[जे] म्हणोन विनंती केली या [वरून] स्वामीने धर्मादायास व मोह[त्सवा]स सालिना होन निशाणीं ५०० पांचशें द्यावयाचा निर्वाह केला होता तेणेप्रा। हा कालवरी चालत आले यावरी गोसावियासंनिध पहिलेपासून तुरुतागिरी सिश्रूषा [क]रून होते तेच मठीं साप्रत आहेत पुढे अधिकोतर मोहोत्सव चालावा हा हेतु धरून हुजूर आले ऐसियास मौनी गोसावीं बहुत थोर होते त्यांचे स्थळीं मोहत्सव धर्म चालवणें हें स्वामीसहि आगत्य आहे यास्तव पहिलें प्रतिवर्षी बेरीज होन निशाणी पाचशें पावत होते त्याखेरीज या वर्षापासून ज्याजती प्रतिवर्षी होन निशाणी २०० दोनिशे होन द्यावयाचा निर्वाह केला आहे यांत साल मा। मुदती माफिक होणे पेस्तर सालापासून पहिले द्यावयाची मोईन आहे ते व हालीं दोनिशें होन साल दर साल गोसावियांच्या मठास प्रविष्ट करूनं मोहत्सव व धर्म चाले यैसें करणें ताजा सनदेचा उजूर न करणें [नि*] लखनालंकार [प. मो*.] रुजू

ले. ७३९ } मौनीबावा { श. १६१५ पौष शुद्ध १५
मू. दा. प. } { इ. १६९४ जानेवारी १

स्वस्ति श्री राज्याभिषेक २० श्रीमुखनाम संवत्सरे पौश्य शुध पूर्णिमा इंदुवासरे क्षेत्रिय कुळावंतस श्री राजाराम छत्रपति याणी राजश्री नरसो सुरो सभासद नामजाद कारकून वर्तमान व भावी सुबा प्रात तारळे यांसि अज्ञा केली येसी जे राजश्री— याचा मठ कसबा पाटगावी आहे त्यास त्याचे पूजेस व मठीं अतीत अभ्यागत येताती त्याच्या भंडारियास पहिले कुडाळीस सुभाहून होन ७०० सातसे निशाणी पावत होते साप्रत धामधुमेच्या प्रसंगात पावत नाहीं म्हणून याचे सिश्य तुरतगिरी हुजूर आले त्याणी विदित केले .... नी कार चालान........ अभ्यागत येतात भाडारा जाला पाहिजे म्हणून सदरहू पैकी सुभा कुडाळ येथें पणदूर ता। हवेली हा कुलबाब कुलकानू होन नि।। ४०० चारीसे होनाचे यैवजी दिल्हा त्याची सनद आलाहिदा सादर असे तेणेप्रमाणे चालविणे बाकी होन नि।। ३०० तीनसे याच्या यैवजास मौजे वासनुळी तर्फ खानापुर सु।। प्रात मजकूर हा गाव बावा स्वामीसि इनाम कुलबाब कुलकानू हाली पटी व पस्तरपटी देखील देवविला असे तरी तुरतगिरि गोसावी याचे स्वाधीन करणे तेथील लावणी संचणी करून उत्पन्न होईल ते बावा स्वामीच्या मठास व्यय करितील या पत्राची तालीक लेहोनु घेऊन असल पत्र परतून भोगवटियासी तुरतगिरि यांपासिं देणें सालदरसाल ताजा सनदेचा उजूर करीत नव जाणे जाणीजे [नि*] लेखनालंकार

[लं. व.*]
मर्यादेयं
विराजते

[पाठीवर*] प्रा। छ १४ जमादिलावल पौश शुध पुर्णिमा इदुवासर
[जोडावर *] लेखनावधि मुद्रा

ले. ७४० } श्री { श. १६५०
मू. दा. प. } { इ. १७२८

गुरुभक्ति परायेण राजश्री तुरुद्गिरि गोसावी यांसि श्नेहांकित रामचंद्र नीलकंठ नारायेण उपरि येथील क्षेम जाणऊन स्वकीय लिहिणे विशेष तुम्ही सबळगिरि समागमे पत्र पाठविले ते पावून अभिप्राय विदित जाला सरजामाचा निश्चये तुम्हासी केला होता त्याप्रमाणे राजपत्रे मातुश्री आईसाहेबास विनती करून सबळगिरि समागमे पाठविली आहेत मातुश्री आईसाहेबी समाधीस व तुम्हास वस्त्र पाठविले आहे ते घेणे तुम्हा कारणे देखील साज पाठविली आहे ते घेणे आपले वर्तमान वरचेवरी सविस्तर लिहून पाठवीत जाणे [नि*] सर्वाविसी तुमच्या भरोसियाने आहो लोभास आंतर न करणे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती हू हू हूं

[पाठीवर*] मौजे कोडोसी ता। खानापुर

ले. ७४१ } श्री { श. १६५० भाद्रपद वद्य १३
मू. दा. प. } मौनीबाबा { इ. १७२८ सप्टेंबर २०

[शि.*]

स्वस्ति श्री नृप शालिवहान शके १६५० सोलासे पनास कीलक नाम संवछर [येथें शिक्का*] भाद्रपद वदि त्रियोदसी भृगवासरे गुरुभक्तपरायेण रा।। सबलगीर महंत यांस हिंदुराव घोरपडे ममलकत मदार दौलतराव हिंदुराव घोरपडे गजेंद्रगडकर सु।। तिसा अशरीन मया आलफ तुम्ही हुजूर येऊन विदित केले की पूर्वी राजश्री राऊ कैलासवासी यानी मौजे बालेघोल इसाफतीचा गाव को। कापसी पो। हुकेरी हा गाव राजश्री बावा महंत यासी इनाम देऊन दानपत्रे करून दिल्ही होती त्याचा भोगवटा हा कालवरी चालत आहे आल्या अतीत अभ्यागतास आन उदक देत आहेत त्यास

---

१ ही एक अमात्याच्या लेखांत खूण असते.

पूर्वील दानपत्रे गमाविली तरी नूतन पत्रे करून दिल्ही पाहिजेत जेणेंकडून सिस्यपरंपरे अविछिन्न इनाम चालवून आपणा पुण्य जोडे ते गोष्ट केली पाहिजे म्हणून विदित केले त्यास राजश्री बावा महंत बहुत थोर पाटगांवी समाधिस्त जाले तगें आश्या अतीत अभ्यागतास आन्न उदक चालत येसे स्थलीं उपजीविका करून दिल्हीया राजश्री स्वामीचे व स्वामींच्या राज्याचे कल्याणें आहे येसे जाणून हली मौजे मजकूर इनाम करून देऊन नूतन इनामपत्र करून दिल्हे आसे तरी तुम्ही आपल्या सिस्यपरंपरेनें आविछिन्न इनाम आनुभऊन सुखरूप राहणें यासी जो कोणी विक्षप करील त्यास आपल्या स्वधर्माची शफत आसे येसे स्मरोन कोणी विक्षप करावया गरज नाही जाणिजे

छ २६ सफर [नि*] पा। हुजूर लेखन मर्यादा

२५ वाई—नायकवाडी*

(श्री. ग. ह. खरे)

प्रस्ततचे एकंदर एकोणीस कागद मी वाई येथें संशोधनासाठीं गेलों असतां सदाशिवराव विठोजी व शंकरराव विठोजी घाटगे यांचेकडे मिळाले. कागदाविषयीं विचारतांच त्यांनीं हे मोठ्या आस्थेनें दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. महत्वाचे ५ कागद पुढें देत आहे. सर्व कागद शिवकालीन आहेत.

ले. ७४२ }
मू. चा. सं. } [फा. म. व ३ फा. शि.*] { श. १५११ श्रावण वद्य १
{ इ. १५८९ जुलै १८

कौलनामे[1] अज दिवाण पा। वांई ता। दादजी [मुजुम]ली

* २१ वें संमेलन.

१ हा कागद बालबोध व मोडी यांमधील दुवा आहे. यांत इ, उ ख, ठ, ण, हीं अक्षरें नियमानें मोडी, आ, ग, ध, प, फ, भ, म, श, ळ हीं नियमानें बालबोध व बाकीचीं विकल्पानें मोडी—बालबोध काढिलीं आहेत.

नाइकवाडी ठाणे पा मजकुरू सुाा स [न] तिसैन वा तिसा मेया दीधलें कौलूनामा यैसा]जें तुझे वीसी संभुजी देसाई वा सेटिये महा[जन] पाा मजकुरू हुजुरू येउनू इलतमेस केले [हज] रत खान आलिशान— हुजुरून रजा फर्मा[वि]ले जें भुळाजी सरदार रखतखाने मोकरम कारखैर जाहालें पाहीजे तो आपुले फरज[दाचे]जागा आसे दादजी मजकुराचे बेटि त्या [सी] देवउनू कारखैर करुनू देवणें त्यावरून.......... जी मजकुर बेदील होउनू गेला जें भुळा[जी] पेशर्मी पुंडाचे सोहबतीस होता आपण [नाय]कवाडी मीरासी पे + + र येसा + बोलला जें पुंडाचे सोहबतीचे [लो]कासी + स बे बे [टी] दिधळी म्हणउनू शक करितो तरी तेया शक दुरी करुनू कौळू मऱ्हामत करणें म्हणउनू भुळाजीस पेशर्जीचा तमाम गुन्हो माफ करु[नह] जरत साहेबानी त्यासी आपुलें फरजंद म्ह[ण]वीलें आसे आतां तुवां कोणे वीसीं कांही [ये]क अंदेशा न करीता येउनू आपुली बेटी भु[ळा]जीस देउनू कारखैर करुनू सुखें आसीजे पेस्तर कोण्ही कांही बोलैल तरी ते वीसी तुवां कांही शक न कीजे हजरत साहेबांचा बोळू मोडू नये तुझी बेटी आमचे हातीं दीजे आम्ही कारखैर करुनू देउनू जाणिजे तुवा [को]णे वीखी सक न कीजे कौळू आसे [नि*] मोर्तब

ले. ७४३ मू. चा. सं.	[फा. वा. शि. व फा. मज.*]	श. १५६६–६७ इ. १६४४–४५

[1]अज रख्तखाने खुदायेवंद खान अलीशान खाने अजम रस्तुम जमा खुली दयाम दौलतहू बजानेब कारकुनानी पाा वांई बिदानद सुाा खमस अरबैन अलफ सटउजी बिन चौडोजी मुजमुली नाइकवाडी चाा ठाणे हुजूर येउनू माळूम केले आपले जथाचे प्यादे साहेबाचे मसलतीस जाताती बाा

---

१ याच मजकुराचीं पण अफजलखान व सीदी जोहार यांनीं श. १५७१ व १५८२ या सालीं सोडलेलीं अशीं आणखी दोन पत्रें आहेत.

कामगारी रसद व नाजुक काम यासि मसाले देताती त्याचा यैवज भता मसाला मौजे कविठेपैकी ठाणा घेउनू जाताती तरी सदरहू टके तीनसें पावेतो मसाला ध्यावे त्याहून ज्याजती मसाला जाला तरी ठाणाहून खर्च घालुनू ध्यावा कम मसाला जाला तरी जे काही बेरीजपैकी राहील ते ना‍ा मा‍ा चे दुमाला करावे यैसे सालाबाद चालत आले आहे येबाबे पेसजी हजरती बडे खानसाहेबाचे खु‍ा सादर आहे त्याच बरनिसबती चालवणे दरीबाब सरजाम होये माळूम जाले तरी नाइकवाडी मा‍ा र वेश रसद व नाजुक कामास आपलिया जथाचा प्यादा जाईल त्यास सदरहू टके तीनसे मोईन आहे त्यापैकी आदा होतो तो यैवज तनखा मौजे कविठे पैकी टके [तीन] से ध्यावे फाजील मसाला जालिया ठाणाहून खर्च घालुनू द्यावे कम जालिया सदरहू बेरीज ना‍ा मा‍ा दुमाला करणे ठाणा ध्यावयासि निसबती नाही म्हणौनू गहदम चालत आले आहे तेणे प्रमाणे व हजरती बडे खानसाहेबाचे खु‍ा सादर आहे तेणे प्रमाणे चालवणे दर हरसाल खु‍ा उजूर न करणे तालिक घेउनू असेली फिराउनू देणे [नि*] मोर्तब सूद [फा. मो.*]

[पत्राचे पाठीवर*] [नि*] रुजू दफतर खास

[नि*] रुजू शुरुनिवीस

ले. ७४४ } [२फा. वा. शि.*] { श. १५८८ कार्तिक वद्य १
मू. चा. सं. } { इ. १६६६ नोव्हेंबर २

[अज] रख्तखाने खुदायेवंद खान अलीशान खाने अजम सर्जाखान खलद्याम दौलतहू बजानेबू कारकुनानी [पा‍ा] वाई बिदानद सु‍ा सबा सितैन अलफ दरीविला सरगुन्हो व नाइकवाडियान किले केळुजा पा‍ा मा‍ा हुजूर माळूम केले जे आपणास तनखा गावगना व ठिकाणे अहेती व देह दिधले अहेती यैसियास गनिमाचे तहवेळी

करिता तमाम ठिकणे व देह पडले अहेती अपले हकास जागा नाही राती दिवस किल्यावरी असावे पोटास न पावता लोक कैसे राहातील किले मजकूर सरहदेचा हमशा लडाइया पडताती[१] यैसियास साहेब मेहरबान होउनू देह व ठिकणे येथे जे दस्त होईल ते अपले दुमाले करून पुरवणी पाहिजेल ते ठाणाहून देविले पाहिजे म्हणौउनू माळूम केले बराये माळुमाती खातिरेस अणौउनु याचे देह व ठिकण फितरती करिता पडले अहेती यैसियास देहाये माचे व ठिकणे तनखा व बाजे याचे जे दस्त होईल ते वजा करून पुरवणी पाहिजेल ते ठाणाहून देउनू याचा हक झाडा करून यापासुनू खिजमती घेणे दरबाब फरामोस नहोणे तालीक लेहोनू घेउनू असल फिराउनू देणे [नि.*] मो। सूद [फा० मो० *]

रुजू शुरुनिवीस

[पाठीवर*] तेरीख १४ जमादिलोवल

जमादिलोवल

माहे जमादि [लोवल]

ले. ७४९ } [फा. शि.*] { श. १५८९ पौष शुद्ध ६
मू. पा. सं. } { इ. १६६७ डिसेंबर १०

·ार्दे इजतमाब सरगुऱ्हो नाइकवाडी किले केलजा पा। वाई दाम इजतहू अजी सैद मखदुम शर्जाखान यैजाम ऊकी तुम्ही आरिजा पाठविला रसीदगी होउनू येक बयेक मकसूद माळूम जाला किले [म]जकराचा अहवाल लिहिला की घलिईचा दरवाजा पडला होतां तो बदीस्त होतां नीमकला राहिला आहे सरदेचा किला मर्तब होउनू जकीरा व [वा ?] बाब उस्त-

---

१ या वेळीं शिवाजी आग्र्याहून निसटून महाराष्ट्रांत येत होता. शिवाजीच्या गैरहजेरींत त्यानें विजापूरकराविरुद्ध सुरू केलेल्या हालचाली बंद पडल्या नव्हत्या असें या पत्रावरून व प. सा. सं. ले. ११३५, ११४५ वरून दिसतें. हातीं लागणारी लूट स्वतःकडे ठेवण्याबद्दल या पत्रांत परवानगी मागितली आहे हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे.

वारी असली पाहिजे यैसियास साहेब दरवाजा बदिस्तीस हुजून यैवज करून पाठविलियां मुस्तैद होईल हसम किले मजकूर [या]चा सरजाम पुरा नाहीं याबदल हैरान आहे [तरी खबरदार] होउनू हमेशा अलग नौबत करून राहात [यैसा] हुकूम फर्माविळा पाहिजे म्हणौउनू लिहिले तरी तुमच्या लिहिलिया वरून घलिईचा दरवाजियाचें बदिस्तीबदल [ठाणा]च्या [कारकुनास हुकू]म सादर करून रोजिना येक देव [विले असत] गत रास व वड गाडे व बाजे येकून......... कोट सारवण लोक व बेगारी याहाती काम घेउनू बदिस्त खूब मजबूद माथोन दरवाजा लाउनूं वरती भाडी माडून घलिईचा दरवाजा राखाव्या हाशम यास मौजे अभेपुरी दिली आहे ते लोक हमेशा ठेउनू बहूत उस्तवारीने राखणे व किले मार इस्ताद बदल जकीरा गला रवडी १०८० दाहा कारकुनाकरून देविला असे तो घेउनू येणें बहुत मजबून राहोन सरफराजीवरी नजर देउनू दौलत ख्वाही जाहीर करणें सर्फराजी अहाडेल छ ४ रजब सन समान सितैन अलफ [फा. मो.*]

रुजू सुरु
निवीस

ले. ७४६ } [वा.फा.शि.*] { श.१५९६ वैशाख वद्य १४
मु. चा. सं. } { इ.१६७४ मे २४

अज रख्तखाने खुदायेवंद सैद मखदुम शर्जाखान खल्द अयाम दौलतहू बजानीब कारकुनानी हाल व इस्तकबाळ व देसमुखानी पा। वांई बिदानद सु॥ खमस सबैन अलफ दरी विला सिदोजी बिन गंगाजी विश्वासराऊ नाइकवाडी कीरदत चा॥ ठाणे पा॥ मजकूर हुजर येउन माळूम केले जे आपले बाप गगाजी नाईक यासी किले केलजा पा॥ मजकूरचे हसमपैकीं

१ यापुढें **भाडी** शब्द लिहून खोडला आहे.
शि. च. सा. खं. ४-१४

इस्तावा नफर १० दाहा नाइकी मिरासी गहदम सालाबाद कारकिर्दी दर कारकिर्दी ता सालगुदस्ता चालत असतां साल गुा किले मजकूर गनिमाने घेतले ते वख्ती गंगाजी नाईक आपलेबाप याणे येख्तियारी करून गाठी पडले ठाई सिवाजी राजे यांचे लोक कितेक जण सुलतानढवा केले तेथे ते बहुत जण हे येकले गाठी पडली ते वख्ती दोघे चौघे जण ठार पाडिले यावरी आपणही साहेबाचे मसलतेवरी चीज जाले आपण नन्हवाद आहे किले माा राजे अजमे घेतले साहेब मायेबाप आहेती आपण कदीम नफर साहेबाचे हिंदू गुलाम आहो नजर येनायेत फर्माऊन ठाणाचे हसमामधे जमा करून सदरहू नाइकी इस्तावा नफर १० देउनू सरफराज करून पोटभर रोटी दिधले पाहिजे म्हणौनू माळूम केले तरी नफर माारा‍चा बाप साहेबकामावरी येख्तयारी करून चीज जाले आहे अजी सबब मे[हर]बान होउनू फर्जंदास अजराम्हामती करून ठाणाचे हसमामधे जमा करून इस्तावा नफर १० देखील अस्प नाइकी दिधली असे यासि तैनाती सालिना होनू २१९ बिताा

खासा देाा अस्प दरमाहे होनू ५	मुरसंदाज नफर ९ दर नफरे
येकून ६० होनू	दरमाहे होन १। येकून दरमाहे
छेत्री व दिवटी साा होन २४	होन ११। येकन साा होनू १३५
छेत्रिया १२ दिवटिया देाा तेल १२	

वजा दुमाही खेरीज दिवटी होनू ३४॥ बाकी कबज बेरीज [होनू] १८४॥ येकसे साडे चौऱ्यासी होनू यासि तनखा मौजे चांदक साा हवेली पैकी देविले असे माहाली गणती होउन इा पैा पासून सदरहू इस्तावा रुजू करून ठाणा चाकरी घेऊन आदा करीत जाणे नफर मजकुरास मिरासी मेहरवान होउनू करून दिधले असे यास हसमाचे महताजी जमा करून औलाद व अफवाद चाकरी घेणे तालीक लेहोन घेऊन असली फिराऊन दीजे पाा हुजूर [नि*] मोर्तब सुद [फा. मो*]

रुजू सुरु तेरीख २७ माहे सफर

[फा.*] शुरूअ शुद निवीस सफर अवल साल¹

सुरू सुद

पौ छ ७ माहे जमादिलौवल सन सीत

---

१ या पत्रांत शिवाजीच्या लोकांनीं केळंजा किल्ला घेतल्याची जी माहिती आहे तीमुळें जेधे शकावलींतील विधानास अस्सल पत्राचा पुरावा मिळत आहे. जेधे शकावलींतील नोंद अशी— 'शके १५९६ आनंद संवछरे चैत्र वद्य १४ राजश्री स्वामींनीं केळंजा घेतला वद्य पक्षी फते जाली' (शि. च. प्र. पृ. २७.) या नोंदीचा अर्थ शके १५९६ च्या चैत्र वद्य १४ स शिवाजीनें केळंजा घेतला असा होत आहे. या पत्राची तारीख सु. १०७५ अवल साल सफर २७ ही आहे. या तारखेस श. १५९६ वैशाख वद्य १४ ही मिती येत असून याच दिवशीं सु. १०७५ हें साल सुरू होत आहे. जेधे शकावलींतील केळंजा किल्ला घेतल्याची मिति व तो किल्ला लढविला जात असतां मेलेल्या मनुष्याच्या मुलानें बापाची तैनात स्वतःकडे चालविण्याबद्दल सुभेदारास विनंति करून त्या विनंतीप्रमाणें अनुमतिपत्र मिळण्याची मिति यांत सारें एक महिन्याचें अंतर आहे. इतक्या थोड्या कालावधींत पूर्वीच्या दिरंगाईच्या काळांत वरच्या प्रकारचें अनुमतिपत्र मिळणें शक्य आहे कीं काय हा प्रश्न आहे. हें पत्र घेतांना पत्र देणारा मनुष्य किंवा त्याच्या तर्फेचा अधिकृत मनुष्य वाईस होता असें गृहीत धरलें तर एक महिन्याच्या अवधींत असें पत्र मिळणें शक्य होईल पण मग वाईहून सुटलेलें पत्र वाईच्या मनुष्यास पोहोंचण्यास १४ महिने लागावेत कीं काय हा प्रश्न उत्पन्न होतो. कारण या पत्राची पैवस्तीची तारीख ७ जवल सु. १५७६ म्हणजे श. १५९७ श्रावण वद्य १० ही आहे. तेव्हां मला वाटतें या पत्राच्या सुटण्याच्या तारखेंत अवल साल असे जे शब्द आहेत त्याऐवजीं अखेर साल असे शब्द असावयास पाहिजे होते. या शोधानुसार या पत्राची मिति श. १५९७ वैशाख वद्य १४ ही होते. म्हणजे केळंजा किल्ला घेतल्याची जेधे शकावलींतील मिति व पत्र सुटल्याची मिति यांमध्यें १३ महिन्यांचें आणि पत्र सुटणें व पोहोंचणें यांमध्यें २१ महिन्यांचें अंतर पडतें. पूर्वीच्या व्यवहार उलगडण्याच्या पद्धतीचा व एका ठिकाणचा सुभेदार दुसरीकडे लांब कोठें तरी प्रत्यक्ष काम करीत असे या वस्तुस्थितीचा विचार करतां वरीलप्रमाणें अवलच्या ऐवजीं अखेर असा शोध घालून पत्राची संगति लावणें योग्य वाटतें.

२६ कानदखोरें–मरळ देशमूख†

(श्री. शं. ना. जोशी.)

ले. ७४७ मू. चा. सं. [१२ बुरुजी फारसी शिक्का*] शा. १५४० मार्ग. शुद्ध १० इ. १६१८ नोव्हेंबर १७

जुझारराऊ मरळ आदिकारी तपे कानदखोरे बिदानद हजरती आ[दिल]शाही लोक सरहद रुस्तुम वाई व फलटाण तेथे येउनू सिरवल व बाजे [विला]येतीस तसवीस देताती याबद्दल हुजुरून विठोजी सितोले देसमू[ख प्राा]पणे यास ते मसलहतीचे काम फर्माविले आहे तुम्ही आपले जमि[येतन]सी विठोजी मजकुरानजीक जाउनू मसलती सरंजाम करणे तुम्ही [लो]क जामियेती जे संचणी होईल त्याची गणती विठोजी माा हुजूर अ[र्दास] लिहितील तेणे बरहुकूम हुजुरून सरंजाम अहडोनू तुमची सर[फ]राजी होईळ [फारसी मोर्तब*] [नि*] तेरीख ९ माहे जिल्हेजू सबा[1] इशरैन अलफ [नि*] पाा हुजूर

ले. ७४८ मू. चा. सं. [शि.ले.७४७ प्रो*] शा. १५४३ आश्विन वद्य ८ इ. १६२१ जुलै १

[माा कानो]जी ताा कानदखोरे बिदानद किले रोहिडाचे नाइकवाडियास सिरवलीची मसलहती फर्माविली आहे तुम्ही त्यानजीक जाउनू [मसलह]तींचे काम सरंजाम करणें हे काम फते जालियावरी तुमची [सरफरा]जी होईल [फा. मो.*] [नि*] तेरीख २२ माहे साबान सलासीन व अलफ [पाा हु] जूर

---

† २१ वें संमेलन. ह्याच मरळ देशमुखांचे सुमारें ८७ कागद कै. राजवाड्यांच्या १६ व्या खडांत ह्यापूर्वीच प्रकाशित झाले आहेत. तेथें न आलेले व शिवकालीन तेवढे येथें सध्यां घेतले आहेत. हे कागद श्रीमंत बळवंतराव ऊर्फ बाळासाहेब शिकेकरी देशमूख (मु. धानेब सं. भोर) यांचे संग्रहांतील आहेत.

१ हिजरीसन आहे

ले. ७४९ }
मू. चा. सं. }

दिवाणसाहेबा { श. १५४३ कार्तिक शुद्ध १३
{ इ. १६२१ आक्टोबर १८

ई कौलनामे आज रख्तखाने खुदायेवंद मलिक अजम मलिक जम-रुतब हवाल[दा]र किलेहाय सरसिले किले राईर बिजेनेबु बाबाजी जुझारराऊ आ[दि]कारी तपे कानदखोरे बिदानद सु॥ सन इसने आलफ आसरी[न] नुमायेद हाजरती आलमपन्हाईचा फर्मान तुम्हास मऱ्हामती जाहाला आहे अजमतीसी सिरी धरुनू बा॥ इनामती मौजे दोनी २ मौंजे पाबे टके ८२५ मौजे धानेब टके ६१९ यो॥ टके १४४४ हे खाउनू दिवाण नफराई करुनू पिढी दरपिढी इसाबतीचे गाव दिधले आसती यास आनसारिखे करू तरी मुसाफेची आण व हजरती ——— च्या कैसाची आन आसे व मराठियास आम्रुतस्वराची व हजरती साहेबाच्या कैसाची आण आसे हे हुजुरु[न] नाइकवाडी दिधले आसे हे मिसली आसे [नि*] मोर्तबु [फा. मो.*]

[पाठीवर*] तेरीख १२ माहे
जिल्हेजू
कौलू

———

ले. ७५० }
मू. चा.सं. }

[शि.क्र. ७४७प्रो*] { श. १५४४ ज्येष्ठ वद्य ३
{ इ. १६२२ मे १७

द ई कौलनामा अनायेतशमामा हुमायून आला शरफ सुदूर याफ्त बजानीब जुझारराऊ [दि]समुख ता॥ कान[१] खोरे सरफराज बूदः बिदानद दर बाब आंकी तुम्ही हाजरतीचे + + + द्यावयाची उमीयेदी धरून कौलाची वास्त केली आहे म्हणौनू हुजूर खबर + + नजर अनायेत फर्माउनू तुम्हास मुकासा मऱ्हामती करून मिसली व कौलनामा

१ अक्षर वेगळें.

अना[येत] सादर केला आहे तो अजमतेसी घेऊन आपला खातिरजमा राखोनू आपले जमियेत + तमाम खा। आजालखान ते तरफेस नामजाद केले आहेती त्यानजीक येउनू मसलह[ती]चे कामास साबीत असत जाणें दौलतखाहीस तकसीर न करणें नेकखाही केली सरफराजी अहाडेल [फा.मो.*] [नि*] छ १६ रजबु इहिदे सलासीन व अलफ पा। हुजूर

ले. ७९१ }
मू. चा. सं. }

[फा.शि*.]

{ श. १५५० श्रावण वद्य
{ इ.१६२८ आगष्ट १९

ई कौलुनामा अज रखतखाने खुदाएवद खाने अजम खुदावदखान रवा सुद[1] खुलीदयाम दौलतहू ता। बाबाजी जुझाराऊ देसमूख तपे कानदखोरे बिदानद सु॥ तिसा इशरैन अलफ दादे कौलू नामा यैसा जे ता। मा। तुज सन सबापासुनू इस्तावा बांधोन इजारती दिधली यैसियास सन सबा मधे उगवणी जाली साळ गुदस्ता इस्तावेप्रमाणे तुवा बेरीज उगवणी केली नाही मबळग बाकी राहिली व साळ मजकुराकारणे लावगण बहुत कमतर जाळे तपा घसरळा याबदल तुज बहुत वजासी ताकीद लिहिली कीं साल गुदस्ताची बाकी झाडा कीजे व साळे हालीची बेरीज इस्तावेप्रमाणे देणे त्यावरून शकजादा होउनू बाहेर गेळास त्या उपेरी तुझी इसाबती व इनामती व हकलाजिमा व विस्वा अनामत केळा मग तुवा माहालीच्या कारकुनास मुदा सांगोन पाठविला कीं साळ मजकुरा कारणे तपा अमानत कमावीस कीजे आपण बाकीची उगवणी करून आपळा हकलाजिमा व इसाबती व इनामती व विस्वा मोकळा कीजे त्यावरून तिही अर्ज लिहिळा कीं सदरहुप्रमाणे कौलू पाठविजे देसमुखाचा दिळासा करून माहाळावरी आणून मग सदरहू प्रमाणे कौलू व माहाळास खुर्दखत पाठविले त्यास हाली लिहिले कीं सदरहू कौलू देसमुखास देउनू बाकीची सिस्ती ये रीती केली की इजारतीपैकी जे काही

---

[1] अक्षर वंगळ आहे.

रयेती निसबती बाकी असेली ते रयेतीपासुनू निसबतीवार घेणे या खेरीज सिर्स्ती राहिली आहे ते खुद निसबती टके ३००० ...... हे इनामती व इसाबती व विस्वा व हकलाजीमा या मधून उसुलू करणे यैसा तह केळा यावरी देसमुखे अर्ज केळा की आपळा रोजगार चाळो[१]लिळा पाहिजे तरी साळ मा। कारणे आपणास वा इनामपटी टके ६०० सासे माफ करणे येणेप्रमाणे तह करून ठाणाहन देसमुखास कौलू दिधळा त्याची तालीक पाठविली असे त्यावरून रोशन होईळ सदरहूप्रमाणे देसमूख मजकूर हुजरातीच्या कौळाची ... करितो तरी साहेबी मा। फर्माउनू सदरहू ठाणाचे कौलू बरहुकूम हुजुरून कौलू मऱ्हामती केळा पाहिजे म्हणौनू लिहिळे तरी साळ मजकुरी इजारती दुरी केली असे ये बाबे पेसजीच तुज कौलू सादर असे तुवा आपली इसाबती व इनामती व हकलाजिमा व विस्वा जैसा काही साळाबाद चालिळा असेल तेणेप्रमाणे घणे माहाळ किर्दी मामूर कीजे तुजवरी इजारतीपैकी साळ गुदस्ताची बाकी राहिली आहे ते निसबती रयेती जे असेल ते त्या पासनू घेणे तुझे निसबतीन सिस्त बेरीज खुद बाबा टके ३००० तीन हजार आहे ते तुवा आपणापासुनू इसाबती व इनामती व हकलाजिमा व विस्वा यैसी जागा माहाळीच्या कारकुनास दिधळा आहे तेणेप्रमाणे उसुलू कीजे ये बाबे माहालीच्या कारकुनास लिहिले असे वा इनामपटी साळ मजकुरी टके ६०० सासे तुज माफ केली असे कविहाळ होउनू दिवाण कामात साबीत असणे कोण्हे बाबे तालूक अंदेसा न करणे [फा. वा. मो.*]

[पाठीवर*] तेरीख २८ माहे जिल्हेजु

जिल्हेजू

---

१ हें अक्षर जास्त आहे.

ले. ७९२ } [शि.क्र.७४६प्रो*] { श. १५५० भाद्रपद शुद्ध ११
मू. चा. सं. } { इ. १६२८ आगस्ट ३०

दे इजतमाब जुझारराऊ दो। तप कानद[१] खोरे बिदानंद ते तरफेस गनीम जोरावर होउनू आले आहेत त्यांचे रोखे वजारतमाब राऊ अजम शाहाजी भोसले सर करून पाठविले असेती तुम्ही अपले जमियेतीनसी येउनू माइले नजदीक राहोन हजरतीची मसलहती करणें जे काही मशाकत कराल ते चीज होईल [फा. मो. *] [नि*] तेरीख १० माहे मोहरम पा। हुजूर

ले.७९३ } [शि. क्र.७४७प्रो*] { श. १५५० कार्तीक वद्य. १४
मू.चा. सं. } { इ. १६२८ नोव्हेंबर १४

दे इजतमाब जुंझारराऊ मेराल सरफराज बूद: बिदानद तुम्हास पेश अजी मसलहतीचे बाबे हुकूम सादर होता व बिलफेल मसलहतीचा वख्त हैबत रोशन असोन तुम्ही तगाफुल करणे काये मुनासिब आहे व तरकशबदीचा कायेदा नव्हे अलहाल फर्मान अंहडताच अपले जमयेतीनसी वजारतमाब राऊ अजम शाहाजी भोसले यानजदीक मुशरफ होणे गनिमास गोशमाल देउनू अपळी तरकशबदी जाहीर करून फतेची खबर पाठवणे दौलतखोहीस तकसीर न करणे [फा. मो.*] [नि*] तेरीख २७ माहे रबिलौवल [नि*] पा। हुजूर

ले. ७९४ } श्री सिका { श. १५७२ श्रावण वद्य ५
मू. चा. सं. } शके १५७२ नकल असल { इ. १६५० आगस्ट ६
बमोजीब

आजे रख्तखाने राजश्री सिवाजीराजे दामदौलतहू बजाने कारकुनानी हाल व इस्तकपाळ ता। कानदखोरे बिदानंद सु॥ इहिदे खमसैन

---

१ अक्षर भिन्न. २कानद शब्द गुजन शब्द खाडून त्या जागीं लिहिला आहे.
१ अक्षर वगळें.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

शक १८५४ मधील कारभाराचा वृत्तांत.

दत्तो वामन पोतदार, बी. ए.
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम्. एल्. ए.
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें पेठ भांबुर्डा, घ. नं. ९३६।३ येथें आर्यभूषण छापखान्यांत
रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए. यांनीं छापिलें.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

शके १८५४ च्या कारभाराचा वृत्तांत*

प्रास्ताविकः- मि. चैत्र शु. १। १८५४ (ता. ७।४।३२) ते मि. फाल्गुन व. ३०।५४ (ता. २६।३।३३) अखेरच्या मुदतींत मंडळाकडून झालेल्या कार्याचा व मंडळाच्या एकंदर परिस्थितीचा हा वृत्तांत कारभारी मंडळातर्फे आपणांस या एकविसाव्या वार्षिक संमेलनप्रसंगीं सादर करीत आहोंत आणि त्यास संमति देण्याविषयीं आपणांस सानंद विनंति करीत आहोंत.

शके १८५४ चे त्रैमासिकाचे चारी अंक प्रसिद्ध झाले आहेत आणि त्यांचे द्वारें आपणांस मंडळाविषयीं सर्व महत्त्वाचें वृत्त वेळोवेळीं कळलेलेंच आहे. येथें सबंध वार्षिक वृत्ताचें अगदीं थोडक्यांत संकलन केलें आहे.

दुखवटाः- नामदार केशवराव कोरटकर (हैद्राबाद), मुकुंदराव बर्वे (इंदूर), शिवरामपंत ओक (धार) आणि डॉ. जस्टिन ई ॲबट (न्यू जर्सी अमेरिका) हे ५४ सालीं दिवंगत झालेले आपले सभासद नुसते मंडळाचेच नव्हते तर कमी अधिक मानानें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संशोधनाचे खटपटींत असणारे असे होते. याशिवाय डॉ. लेले (पुणें), रा. च. महाजनी (अकोला) व रा. बा. रा. वझले (नागपूर), हेही आपले सभासद ५४ त मृत्यू पावले. या मृत्यूंमुळें आपलें मोठें नुकसान झालें यांत कांहीं शंका नाहीं. पैकी सद्गुरुस डॉ. ॲबट यांनीं आपल्या मृत्युपत्रांत पुढीलप्रमाणें कृतज्ञतापूर्वक मंडळास द्रव्याबद्दल लिहून ठेविलें आहे.

" I bequeath thirty thousand dollars to the Bharat Itihas Sanshodhak Mandal a literary society of Sadashiv Peth Poona City India, for a building or an addition to a building to properly house Marathi manuscripts and other historic documents. "

टीपः—राव सा. विनायकराव आगाशे, मंडळाचे शिल्पाचार्य आणि रा. अनंतराव दातार, माजी सरसुभे बडोदें, हे या १८५५ सालांत कालवश झाल्याचें दुःखदायक वृत्त सर्वांस श्रुत झालेंच असेल. राव सा. आगाशे यांच्या मृत्यूनिमित्त सन्मानार्थ त्या दिवशीं संध्याकाळीं मंडळ बंद ठेविलें होतें.

* २१ व्या संमेलनांत रीतसर मंजूर झाला.

ही देणगी देणारा पुरुष तर अत्यंत थोर यांत शंकाच नाहीं. परंतु मंडळाचेंहि भाग्य थोर हेंहि तितकेंच खरें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या देणगीनें डॉ. जस्टिन् ॲबट् यांचें नांव मंडळाच्या व महाराष्ट्राच्या इतिहासांत निःसंशय अजरामर होऊन राहील. आम्ही तर ही देणगी म्हणजे केवळ ' सत्य संकल्पाच्या दात्याचा ' गोड प्रसादच समजतों आणि त्याच संशोधनेश्वराला अनन्यभावानें शरण जातों !!

सभासदः— १८५४ सालीं **नवीन सभासद ५७** झाले. सालगुदस्त ही संख्या ५३ होती. भोंवतालची परिस्थिति किती बिकट आहे इकडे लक्ष्य दिलें तर आपणांस निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं. असेच प्रयत्न करीत राहिल्यास केव्हां तरी १००० सभासद व्हावे ही इच्छा परिपूर्ण होईल. तपशिलासाठीं शेवटचें खुलासेवार परिशिष्ट पहावें.

प्रकाशनः—त्रैमासिक अंक चार १८५४ (पृ. ३१२ व ९ चित्रें) इतका मजकूर प्रसिद्ध झाला. खेरीज स्वीयमालेंतल्या, रा. चंद्रे संपादन करीत असलेल्या Hadiqu-at ul-Alam या इंग्रजी ग्रंथाचीं १९६ पृ. छापून झालीं आहेत. आणखी कांहीं पृष्ठें छापून व्हावयाचीं आहेत. वाढदिवसाला हा ग्रंथ परिपूर्ण होऊन प्रसिद्ध होईल. शिवाय मंडळ—नाणीं—संग्रहाची वर्णनात्मक यादी सांप्रत छापत आहे. या संमेलनाच्या मिती पावेतों तिचीं सुमारें ४८ पानें छापून तयार आहेत. ठसे अद्यापि तयार नाहीत. या यादीचे प्रसिद्धीमुळें अगदीं नवीन ग्रंथाची भर मराठी वाङ्मयांत पडेल. **नाण्यांची ही पहिलीच वर्णनपर यादी मराठींत** प्रसिद्ध झाल्यामुळें नाण्यांच्या अभ्यासास मोठी चालना मिळेल. मुंबईचे परिश्रमी मुद्रासंग्राहक व अभ्यासक **रा. गाडगीळ** यांनीं आपल्या जवळील अपूर्व संग्रहाचीं सप्रतिम दोन हस्तलिखित वर्णनपुस्तकें मंडळास अर्पण केलीं आहेत. ही त्यांची देणगी महत्त्वाची आहे. अभ्यासकास रा. गाडगीळ यांची यादी फार उपयोगी पडेल. रा. प. ह. खरे यांनींच प्राचीन ताम्रपटादिकांप्रमाणेंच नाण्यांचा अभ्यास चालविल्या-कारणानेंच ही बहुत दिवसांची अतृप्त राहिलेली इच्छा तृप्तीचे मार्गास लागली आहे.

पुरस्कृतग्रंथमालेंत 'मराठ्यांच्या शिलालेख आणि कुडाळप्रांताचा प्राचीन इतिहास' हा रा. बाळावलकरकृत ग्रंथ पुर. ग्रं. मा. क्र. २८ वा म्हणून प्रसिद्ध केला. संकलित विषय अत्यंत व सुरस आहे आणि रा. बाळावलकर यांची पद्धतिहि सर्वस्वी संशोधकी नाहीं. तथापि विषयाच्या सर्व बाजू अभ्यासकास उपलब्ध व्हाव्या हाच हेतु प्रधान ठेवून याचा समावेश मंडळमालेंत केला. यांविषयीं जो खुलासा पुरस्कारांत आहे तिकडे दुर्लक्ष्य न करण्याची विनंति आहे.

श्रीमन्मधुमुनीश्वरांची कविता (संपादक श्री. गुरुजी) हा ग्रंथ तयार झाला आहे. तसेंच श्री. वि. गो. दिघे एम्. ए. यांनीं लिहिलेला **'मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा'** हा नवीन विवेचनात्मक प्रबंध हि याच संमेलनप्रसंगीं प्रसिद्ध होत आहे.

पुरंदरेदप्तर खंड ३, हा नवीन खंड, रा. रु. वा. पुरंदरे यांनीं तयार केलेला, छापण्यास घेतला आहे.

१८५५ वें वर्षी स्वीयमालेंत मंडळांतील **फारसी हस्तलिखितांची वर्णनपर यादी** आणि **अदिलशहाचे तीन साधनग्रंथ** (हफ्त कुर्सी, तारीख–इ–अली व अलीनामा)–मराठी टिप्पणी व सारांश–हा महत्त्वाचा ग्रंथ असे दोन ग्रंथ प्रसिद्ध होतील. **शेखमहमदाची अप्रसिद्ध कविता** हा ग्रंथहि ह्यानीं घेण्याचा विचार आहे.

पृच्छकांस व अभ्यासकांस साहाय्यः– पत्रद्वारें माहिती व साहाय्य मागणारे, ग्रंथालयाचा उपयोग करणारे व शंकासमाधान इच्छिणारे असे साहाय्येच्छूंचे तीन वर्ग करतां येतील. **मंडळ सर्वांस साहाय्य करण्यासाठींच आहे.** त्याप्रमाणें रा. ग. ह. ओक, डॉ. मा. स. केळकर (रामदास व शिवाजीचे चरित्रलेखक), ठाण्याचे रा. आठवले, प्रि. ज. र. घारपुरे, रावसाहेब चापेकर, रा. वामनराव मुकादम, अनंतदास रामदासी, श्री. शं. सा. परशा, श्री. बाळकृष्णशास्त्री महानुभाव, रा. वालावलकर वगैरे सुमारें २५।३० गृहस्थांस साहाय्य केलें. नेहमीप्रमाणें मंडळांतच काम करणाऱ्या मंडळीस एकमेकांचें साहाय्य मिळतच असतें.

ग्रंथालयः– नवीन खरेदी केलेले ९६, देणगी आलेले २२१ मिळून ३१७ लहानमोठ्या ग्रंथांची भर पडली. ग्रंथालयांतच बसून वाचण्यासाठीं सुमारें १००० वर ग्रंथ दिले. विशेष परवानगीनें २२२ ग्रंथ बाहेरहि दिले. ग्रंथालया-विषयीं माहितीचे तक्ते त्रैमासिकांत अलाहिदा प्रसिद्ध होतच असतात. कोणाजवळ जुनीं ग्याझिटीअर्स, काव्येतिहाससंग्रह, विविधज्ञानविस्तार, रॉयल एशियाटिक सोसायटी जर्नल, एपिग्राफिया इंडिका वगैरेचे अंक असतील तर ते मंडळास देणगी दाखल दिल्यास फार आभारी होऊं अशी विनंति केली होती त्यास अनुस-रून प्रो. पां. वा. काणे यांनीं कांहीं उपयुक्त मासिकांचे अंक दिले आहेत त्या-बद्दल मंडळ त्यांचें आभारी आहे. रा. काणे यांचें अनुकरण इतरांनीं करावें अशी विनंति आहे.

पाक्षिकसभा, वाढदिवस, संमेलन, त्रैमासिकसभा, व इतर समारंभः– यांचीही माहिती त्रैमासिकांत सर्व प्रसिद्ध केली आहे. सर्व सभांचीं कामें यशस्वी रीत्या पार पडलीं. पाक्षिकसभा एकूण १७, सरासरी हजिरी ११ (शिवाय पाहुणे ४) एकूण वाचलेलीं टांचणें व निबंध यांची संख्या ५८ असा हिशेब निघतो. कै. शंकरराव दीक्षित ज्योतिर्विद्, यांच्या तैलचित्राचें अनावरणही समारंभानें झालें. यंदाही कांहीं समारंभ योजले आहेत.

आवकजावकः– आवक ७४७ व जावक १८७४, रेजिस्ट्री व्ही. पी. १८३; हाही व्यवहार समाधानकारक झाला.

प्रेक्षक-पाहुणे:– मंडळ पाहण्यासाठीं येऊन नांव नोंदून गेलेले सुमारें ४०० प्रेक्षक व इतर सुमारें १०।१५ सन्मान्य पाहुणे यांनीं मंडळास भेट दिली. कित्येकांचे मंडळाचे कार्याविषयीं मिळालेले शेरे त्रैमासिकांत प्रसिद्ध केलेच आहेत. सर्वांत बडोदानरेश श्री. सयाजीराव महाराज गायकवाड, महाराणी सौ. चिमणाबाईसाहेब व युवराज श्री. प्रतापसिंह राजे वगैरेंची भेट विशेष संस्मरणीय होय.

यंदा लोणीकाळभर येथील ट्रेनिंगस्कूलमधील ३० विद्यार्थी, मु. वाक ता. हवेली जि. पुणें येथील शाळेंतील १७ विद्यार्थी, शिवाजी मराठा प्रायमरी स्कूलमधील ६० विद्यार्थी आणि रिफ्रेशर कोर्स ट्रे. कॉ. पुणेंमधील ८५ शिक्षक असे आले होते. मात्र मोठमोठीं कॉलेजें, हायस्कुलें वगैरेंतील फारच थोडे विद्यार्थी येतात ही गोष्ट पुष्कळच बोधप्रद आहे!

कचेरी:—कचेरीस रा. दि. वि. काळे यांची जोड श्रीशिवचरित्रकार्यालयाचे कृपेमुळें लाभली होती, परंतु शके १८५४ सालीं साधारणपणें श्रावणानंतर रा. काळे यांचें साहाय्य बंद झालें. कारण श्री. शि. च. कार्यालयाकडील पगारी नेमणुका बंद करण्याचें ठरलें आणि रा. काळे यांस अन्यत्र काम पतकरावें लागलें, यामुळें इकडील काम सुटलें. रा. काळे यांनीं मंडळाच्या कचेरीचें काम फार सुव्यवस्थित-पणें व आस्थेनें केलें आणि त्यांचें सहाय्य बंद पडल्यापासून पुनः 'येरे माझ्या मागल्या' सुरू झालें! केव्हां तरी ही दुरवस्था संपावयास हवी आणि तें होणें तर कोणी निरलस, नेमस्त, निर्भीड व नवीन कार्यकर्ता लाभला पाहिजे. एक देणें देऊन कर्जचिंता ज्यानें निवारली तो हेंहि निभावील असाच भरंवसा आहे!

पेशवे-दप्तर व मंडळ:– मंडळानें जे ठराव सरकारकडे पाठविले (त्रै. ७१ पहा) त्याचीं उत्तरें पोलिटिकल खात्याकडून देण्यांत यावीं असें ठरून जीं उत्तरें आलीं आहेत त्यांचा परामर्षही त्रैमासिक सभेंत झाला. तदनुरोधानें सरकारांत प्रत्युत्तरें जाव-याचें ठरलें आहे. सरकार हें दप्तर अभ्यासूंस पूर्णपणें खुलें करीपर्यंत आपणांस सरकारचा पिच्छा पुरवीत राहिलें पाहिजे.

दप्तरखाना व वस्तुभांडार:–रा. शं. ना. जोशी व रा. ग. ह. खरे हे दोघे अनुक्रमें हीं खातीं पहातात. रा. दत्तोपंत आपटे यांची दप्तरखात्यावर देखरेख आहे. उभयतांहि आपल्या व्यासंगांत प्रगति करीत आहेत. रा. खरे यांनीं **मूर्तींचा अभ्यास** चालविला आहे. ही शाखा मंडळांत नवीन आहे व फार उपयोगी आहे. रा. खरे यांनीं एकूण २५०० फार्सी, मराठी किंवा फार्सी मराठी कागद; २५ संस्कृत, फारसी-मराठी, व कानडी शिलालेख; १० मूर्तींची माहिती अशी सामग्री आणली व सुमारें २३ गांवीं संशोधन केलें. शिवाय १०० नाणीं तपासलीं. खेरीज त्रैमासिकाचें सर्व कामही बहुतेक रा. खरे यांजकडेच होतें. रा. जोशी यांनीं ऐतिहासिक घराण्यांच्या

वंशावळी, पेशवे डायरींतील सात भागांतील ब्राह्मण आडनांवांची सूचि, वतनपत्रें व निवाडे ग्रंथाची सूचि, वगैरे सामग्री तयार केली. तसेंच भुइंजकर जाधव, राजोपाध्ये (सातारा), सासवडचे बुधकर, शिंगणापुरचे मांडवलकर इत्यादिकांकडे शोध करून कागदपत्र आणले. दफ्तरलावणीचें वगैरे दफ्तरी काम अद्यापि शिलकींतच आहे. संशोधनी कामांतच अधिक वेळ जातो. दफ्तराची शास्त्रीय मांडणी, शास्त्रीय संरक्षण, वगैरे सर्व सशास्त्र होणें त्रिवार अगत्याचें आहे. होईल तेव्हां खरें !

आयव्ययपत्रक (१८५४):–आपली मुख्य उत्पन्नाची बाब म्हणजे वर्गणी; ती गेले दोन तीन साल कमीकमीच होत आहे, म्हणजे वसूल होत नाहीं. चांगले चांगले अभिमानी सभासद हलक्या वर्गांत बदली करून मागत आहेत असा परिस्थितीचा चटका तीव्र बसला आहे. आणि खर्च मात्र कांहीं कमी न होतां उलट वाढलाच आहे. मंडळाची अधिक सुव्यवस्था लावण्यासाठीं आधीं अधिक खर्च अवश्य आहे असा एक पक्ष आहे. तदनुसार थोडा प्रयोग गेलीं एक दोन वर्षे पाहिला. शि. च. कार्यालयानें रा. काळे यांची जोड बिनमुबदला दिली; रा. काळे यांनीं मेहेनतहि म्हणावी तशी केली. परंतु परिस्थितीच्या ओढाळपणाला कोण काय करणार ? दुसरी उत्पन्नाची बाब देणगी. तिचाहि स्वभाव अनिश्चित. तेथेंही हुकूमी इलाज चालूं शकत नाहीं. तिसरी उत्पन्नाची बाब ग्रंथविक्री. तिचा आय वाढवावा म्हणून स्वतंत्र विक्रयालय शाखाहि काढून प्रयत्न केला. परंतु तेथेंहि यत्न लुलेच पडले ! यामुळें अंदाजाशीं मेळ राहिला नाहीं.

जमेच्या मेळानेंच खर्च करावयास हवा. परंतु कळ सोसून तसेंच रेटावे, धीर सोडूं नये, परिस्थिति निवळेल, अशा आशेवर खर्च कमी तर केला नाहीं, उलट वाढविलाहि. कर्जखातींहि वाढच झाली. व्याजखातींहि वाढच झाली. दफ्तरखानाखातीं रा. शंकरराव जोशी हे बरेच महिने बिनपगारी रजेवर असल्यानें तो खर्च कमी झाला व कामहि शिल्लक पडलें ! ग्रंथ–प्रकाशनखातीं हदीकत–उल् अलम् बहुतेक छापून झालें. त्याच्या पोटीं अजमास रु. २५० एवढेच खर्च पडले आहेत. आर्यभूषणचें देणें, १००० रुपये सुमारें, सर्व देणें आहे. 'हदीकत ऊल्‌आलम्‌ हा देणगी (रा. शेजवलकर मार्फत) तून छापत आहे आणि त्रैमासिक देणें सर्व शिल्लक आहे. अशी स्थिति आहे.

कर्ज-डिबेंचरखातीं मुख्य गोष्ट म्हणजे रा. तात्यासाहेब केळकर यांनीं सालगुदस्तां मंडळास जे पांच हजार रुपये सहा टक्क्यानें कर्जाऊ दिले होते ती रक्कम त्यांत रुपये तीन हजारांची भर घालून ही आठ हजारांची रक्कम सर्व भा. इ. सं. मंडळाच्या पांच टक्क्यांच्या डिबेंचरांत गुंतवून, हा सर्व निधि, भावी महाराष्ट्र–विद्यापीठाकडे लावून दिला आहे ! रा. तात्यासाहेब यांचें मंडळावरील निस्सीम प्रेम तर सर्वांच्या अनुभवाचें आहे आणि त्यांनीं आपल्या नवीन योजनेनें मंडळास एका नवीन सत्कार्याचें

संबंधी केलें आहे. रा. जोगळेकर यांजकडून मोठी रक्कम खात्रीपूर्वक लांब मुदतीनें मिळाली तेव्हां ती घेऊन प्रॉ. नोटीवर असलेली इतर सावकारांचीं देणीं देण्याची सोय व्हावी म्हणून घेऊन ठेविली होती. पुढें मुदेवानें अॅबटदेणगी जाहीर झाली तथापि प्रत्यक्ष रक्कम आतां १८५५ सालीं हातीं येत आहे म्हणून कर्जरकमा १८५४ अखेर चालूच ठेवल्या. थोडें व्याजाचें दृष्टीनें नुकसान झालें. फाजील सावधगिरी दिसते खरी. परंतु परिस्थिती हेंच याचें उत्तर! मंडळाजवळ आतां पांच हजाराचा इं. ट्र. चा चार टक्क्याचा बांड परत आला आहे, हें लक्ष्यांत ठेवावें. तो पुनरपि राखीव निधीचा प्रारंभ करण्याची सूचना आपणांस देत आहे. याप्रमाणें आयव्ययपत्राचा अवश्य तो खुलासा आहे.

शके १८५५ चें अंदाजपत्रकः–एकंदर सालिना वार्षिक वर्गणीच्या उत्पन्नाचें मान घटणें अलीकडे परिस्थितीमुळें अपरिहार्य असल्यामुळें तिकडे लक्ष्य देऊनच अंदाज कमी धरला आहे. जमाखात्याला एक वर्गणी, दुसरी ग्रंथविक्री आणि तिसरी देणगी एवढींच प्रमुख खातीं होत, आणि खर्चखात्याला कचेरी, संशोधन, दफ्तरखाना, ग्रंथालय, प्रकाशन हीं प्रमुख खातीं होत. **कर्जव्याजाचें लिगाड श्रीकृपेनें आतां संपलें! आणि याचें श्रेय खिस्तिभूषण अॅबट् यांस एकट्यांसच आहे!!** अहवालाचा आणि आज सतत सतरा वर्षे आपणां सर्वांच्या चिंतेचा मुख्य विषय होऊन राहिलेला तो विषय यापुढें येणार नाहीं म्हणून एकप्रकारचें चुकल्या-चुकल्यासारखें वाटणार!

जशी आदा तसाच खर्च आकारून अंदाज मांडले आहेत. डिबेंचरसुद्धां **सर्व कर्जव्याजफेड** करून १८५५ सालअखेरीस **मंडळ निष्कर्ज** करणें हें मुख्य काम! मंडळमंदिराची व्यवस्था अॅबटसाहेबांच्या औदार्याचे योगानें लागली. परंतु येथें चारदोन संशोधक सतत खपावे अशी जर अपेक्षा आपण ठेवली तर त्यांच्या **योगक्षेमाचीहि कायमची तरतूद** करणें क्रमप्राप्तच आहे. ही तरतूद दोन प्रकारची करावयास पाहिजे; एक बौद्धिक योगक्षेम आणि यासाठीं आपलें ग्रंथालय पुष्कळच समर्थ केलें पाहिजे. दुसरा शारीरिक योगक्षेम. तेव्हां आतां यापुढें हा नवा विचार आपणांस करावयास हवा.

कार्यप्रचारः– रा. शं. ना. जोशी, रा. बाबासाहेब देशपांडे, प्रो. द. वा. पोतदार प्रभृतींनीं व्याख्यानें वगैरे दिलीं, सभासद मिळविले, प्रचार आर्थिक व बौद्धिक दुहेरी झाला. रा. ग. ह. ओक यांनीं प्रचारकार्याबरोबरच संशोधनाचेंही कार्य चालविलें आहे. अजून परिणामकारक प्रचार करणें पुढेंच आहे! प्रो. पोतदार यांचीं **पोस्ट ग्रॅज्युएट् व्याख्यानें** येथेंच झालीं.

कारभारी मंडळः–एकंदर चार सभा झाल्या. हजेरी सरासरी आठ पडली. कर्ज घेणें, फेडणें, डिबेंचरें घेणें, पुरस्कृत ग्रंथांस अंतर्भूत करणें, नेमणुका, रजा,

सभांचे कार्यक्रम, पेशवे दप्तर समारंभ वगैरे बाबत सर्व कामें वेळोवेळीं या मंडळानें निकालांत काढलीं.

आभार व अखेरः– झालेली सेवा व परिस्थिति निवेदन केली. पुढेंही उमेद सोडली नाहीं. कार्यातील उणीवा प्रत्यहीं मनाला टोंचीत आहेत ! परंतु उणीवांकडे उदारपणें डोळेझांक करून सेवा गोड करून घेणाऱ्या आपणां सर्व सज्जनांचे आणि अनेक पत्रकर्ते व साहाय्यकर्ते यांचे आभार कितीही मानले तरी पुरे पडावयाचे नाहींत. ग. गणपतरावजी मराठे यांनीं तत्परतेनें सर्व हिशेब सालाबादप्रमाणें तपासून सूचना केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार प्रकट करणें अवश्य आहे. **कर्ज जरी आतां संपलें असलें तरी कार्य कांहीं संपलें नाहीं.** त्याचा आरंभच आहे असें समजून वर्धमान उत्साहानें आपण सारे झटूं या, एवढीच प्रार्थना.

ज्येष्ठ शु. १०।५५
पुणें.

दत्तो वामन पोतदार,
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार.
चिटणीस.

शक १८५४–जमा

श. १८५४ अंदाज पत्रक	शक १८५४ ऐन जमा	रु.	आ.	पै	शक १८५५ अंदाज पत्रक
	५३९–६–८ श्री शिलक				६२५५-१३-३
	६–३–३ निकिर्टे शिलक	५४५	९	११	
५१००	वर्गणी दरोबस्त	३१९४	०	०	३२००
	५–८–० शके १८४८				
	३–०–० ,, १८४९				
	२१–०–० ,, १८५२				
	१०५–०–० ,, १८५३				
	२१३०–८–० ,, १८५४				
	१५–०–० ,, १८५५ आगाऊ				
	२२८०–०–०				
	९१४–०–० तहाहयात				
	३१९४–०–०				
५	चित्रें	२	०	०	५-०-०
८०	टपाल	७४	४	६	७५-०-०
५००	ग्रंथविक्री	२५४	९	६	२५०-०-०
	कर्ज	९६००			...

श. १८५४ अंदाज पत्रक	शक १८५४ ऐन जमा	रु.	आ.	पै	शक १८५५ अंदाज पत्रक
	१६०० श्री. एम्. एस्. फाटक				
	८००० श्री. वा. ह. जोगळेकर				
	९६००				
२२५	व्याज	१६६	२	०	१५०-०-०
	ट्रस्ट बाँडवरील				
	कचेरी	११	४	०	१५-०-०
११००	देणगी	७१	७	०	४००००-०-०
	३-४-० श्री. बाबासाहेब देशपांडे				
	३-०-० श्री. वि. म. कोल्हटकर				
	२५-०-० श्री. ज. र. बापुरे				
	२५-० ० रानडे चॅरिटीफंड				
	१०-०-० श्री. बी. एम. बाचल मुंबई				
	५-३-० किरकोळ				
	७१-७-०				
	डिबेंचर	८०००	०	०	
	श्री. न. चिं. केळकर				
	व सौ. दुर्गाबाई केळकर				
	ता. १-११-३१				
५१	त्रै. वर्गणी	४८	०	०	५०-०-०
	३-०-० शके १८५३				
	४५-०-० ,, १८५४				
	४८				
	दप्तरखानाः-ग्वाल्हेर दरबारकडून	२५			
	१५-५-९ इमारत दुरस्ती. इलेक्ट्रीकडून	२९	१४	९	
	परत आले.				
	३-०-० श्री. वा. सि. बेंद्रे (देणें)				
	१-७-० संमेलन				
	५-८-० संशोधन				
	४-१०-० शिलकी सामान				
	२९-१४-९				
	सरसालीं एकूण जमा.	२२०२२	३	८	
३४००-६-८					५००००-१३-३

शक १८५४ खर्च

१८५४ अंदाज	शक १८५४ ऐनखर्च.	रु.	आ.	पै.	१८५५ अंदाज
३५०	टपाल	३१०	१३	०	३००-०-०
	कर्जफेड	१०१००	०	०	२८०००
	५००० श्री. न. चिं. केळकर प्रॉ. नोट				
	१६०० श्री. मालतीबाई				
	१७०० श्री. ग. वि. देवधर				
	२०० श्री. द्वारकाबाई अभ्यंकर				
	१६०० श्री. म. म. फाटक				
	१०१००				
१२००	व्याज	१३११	५	७	
	डिबेंचर				
	२-८-० प्रो. ग. पु. पटवर्धन				
	६-७-३ श्री. का. कृ. लेले				
	१-०-० श्री. या. गं. नवांगुळ				
	१०-०-० श्री. एन्. जी. विंझे				
	५०-०-० श्री. ट्रस्टी केसरी मराठा-संस्था				
	०-८-० प्रो. ग. प. मचनीस				
	१-०-० श्री. रामकृष्ण एस्. नाईक जांभेकर				
	५-०-० प्रो. द. वा. पोतदार				
	५-०-० श्री. गो. स. सरदेसाई				
	५-०-० श्री. पां. के. शिराळकर				
	५-०-० श्री. ह. ग. दिवेकर				
	५-०-० श्री. सि. वि. केळकर				
	१५-०-० श्री. द. रा. घारपुरे				
	५-०-० श्री. य. रा. दाते				
	११६-७-३				
	व्याज प्रॉ. नोट				
	१०६-०-० श्री. म. म. फाटक				

१८५४ अंदाज	शके १८५४ एनखर्च.	रु.	आ.	पै	१८५५ अंदाज
	२४०-०-० श्री. अन्नपूर्णाबाई जोशी.				
	२१-१२-० श्री. द्वारकाबाई अभ्यंकर				
	५२-०-० श्री. मालतीबाई				
	२५७-१०-६ श्री. ग. वि. देवधर				
	२४४-२-६ श्री. न. चिं. केळकर				
	२१३-५-४ श्री. वा. ह. जोगळेकर				
	६०-०-० श्री. वि. स. माने.				
	११९४-१४-४				
४००	ग्रंथखरेदी	१८३	१३	६	
	९१-८-९				
	९१-८-०				
	०-१२-९				
	१८३-१३-६				
	ग्रंथालय	२२९	८	०	१५०
	१४४-०-० श्री. वि. म. कोल्हटकर पगार				
	८५-८-० पुस्तक बांधणी				
	२२९-८-०				
८००	कचेरी	७२१	९	१०	६००
	०- २-६ किरकोळ				
	२९३- ५-४ श्री. कुलकर्णी				
	९६- ०-० श्री. साठे पगार				
	६०- ०-० श्री. देसाई सफाईबद्दल				
	५०-१५-० इलेक्ट्रीक कंपनीचें बिल				
	२२१- ३-० स्टेशनरी, बाग वगैरे खर्च				
	७२१- ९-१०				
१००	संमेलन समारंभ	९८	१४	०	१००
२५	शिलकी सामान	२०७	१५	६	५०
	२-१५-६ रामपात्र				
	१८९- ०-० खुर्च्या				
	१६- ०-० जाजम				
	२०७-१५-६				

१८५४ अंदाज	शक १८५४ एनखर्च.	रु.	आ.	पै	१८५५ अंदाज
६५०	दप्तरखाना	३९६	७	३	६५०
	३७९-१४-६ श्री. शं. ना. जोशी				
	५- ०-० संशोधकांच्या पाट्या				
	११- ८-९ सादिलवार				
	३९६- ७-३				
	भाडेपट्टी	२६	३	०	२६-३-०
	प्रदर्शन	८०	११	६	१००
	१२- ०-० भाऊसाहेब फोटो मोठा करून आणणें बद्दल				
	२०- ०-० न्यू. म. वि. स मॅजिकलँटर्नचा दिवा दिला त्याजबद्दल				
	२३- ०-० सावळे बिल फायल्यांबद्दल				
	१७-०-० भाऊसाहेब पेशवे चित्र				
	८-११-६ किरकोळ				
	८०-११-६				
८५०	संशोधन	९२६	१५	०	८००
	६००- ०-० श्री. ग. ह. खरे				
	१८०- ०-० मे. अ. अ. मुनशी पगार				
	४८- ८-० समर्थ भारत छापखाना				
	७३- ५-० श्री. स. ग. जोशी व ग. ह. खरे यांचा संशोधनार्थ खर्च				
	१३- ०-० गव्हर्मेंट फोटोझिंको बिल				
	१२- २-० ब्रशबअर कंपनीचें बील				
	९२६-१५-०				
२०००	ग्रंथप्रकाशन	२८६	१४	०	१०००
	२५८- ८-० राजाराम चरितम् व हदीकत-उल्-आलम् छपाई				
	२८- ६-० कागद				
	२८६-१४-०				

१८५४ अंदाज	शक १८५४ ऐनखर्च	रु.	आ.	पै	१८५५ अंदाज
	इमारत दुरुस्ती	२२८	१	६	१००
	आर्यभूषण	५३७	०	०	
	कमिशन चेक व मनीऑर्डरबद्दल बँकेस द्यावें लागलें	२	९	९	
	भट आणि मंडळी पुस्तकचाबत देणें	३	०	०	
	तसलमान व किरकोळ	११४	९	०	
	२५ इ. कंपनी				
	३५ श्री. कुळकर्णी				
	१०९ किरकोळ				
	५० मोदवृत्त वाई पुस्तकप्रकाशनाबद्दल				
	३ श्री. शं. ना. जोशी वर्गणीबाबत				
	सरसाली एकूण खर्च	१५७६६	६	५	३१८७६-३-०
	शिल्लक १८५५ सालाकारणें	६२५५	१३	३	१८१२४-३-८ +
	७८-१२-९ कचेरीकडे				
	६१- ३-१ श्री. सरदार मुजूमदार				
	६१०१-१०-६ प्रो. पोतदार (सेंट्र. को. बँ.)				
	१४- २-११ खजीनदार				
	६२५५-१३- ३				

+ ही रक्कम ॲबाल देणगीची प्रत्यक्ष जमा पुरी होईल त्यामानानें इमारत व थळ खरेदी या कामासाठीं लावण्यांत येईल.

हिशेब तपासून पाहिले, बरोबर आहेत.

ग. स. मराठे

ता. १।६।३२ हिशेबतपासनीस.

सभासद तक्ता शक– १८५४

तपशील	आ.	हि.	वर्ग १	वर्ग २	वर्ग ३	वर्ग ४	एकूण
(१) शाक १८५३ अखेर सभासद-तक्ता.							
वार्षिक	१	२	१९	१३४	६६	३४२	५६४
हस्तेबंदी	०	१+२	२+५	१+३	१	९+६	१४+१६
पूर्ण	२	४	२२	६७	२०	७८	१९३
एकूण	३	९	४८	२०५	८७	४३५	७८७
(२) शाक १८५४ मधील बदल							
मयत	०	०	–१ वा.	– ३	०	– ३	८
राजीनामे	०	०	–१ त.	– १	– ५	– १९	२५
वर्गबदली	०	०	+४ वा. + १ त.	– ७ वा. – २ त.	+१वा. +१ त.	+ ४ वा. – ४ वा. + २ तहा.	०
एकूण	०	०	+ ३	– १३	– ३	– २०	–३३
(३) शाक १८५४ मधील बदल (कमी) होऊन सभासद-संख्या.							
वार्षिक	१	२	२२	१२२	६२	३२०	५२९
जुने हस्त०	०	१+२	२+४	१+३	०	११+३	१५+१२
जुने पूर्ण तहा०	२	४	२३	६५	२२	८१	१९७
एकूण	३	९	५१	१९१	८४	४१५	७५४
(४) शाक १८५४ मधील नवीन सभासद.							
वार्षिक	०	०	१	१२	७	२८	४८
हस्तेबंदी	०	०	०	०	०	०	०
पूर्ण तहाहयात	०	०	०	१	०	८	९
एकूण	०	०	१	१३	७	३६	५७
(५) शाक १८५५ प्रारंभींचे सभासद							
वार्षिक	१	२	२३	१३५	६९	३४८	५७८
हस्तबंदी	०	१+२	२+४	१+३	०	११+३	१५+१२
पूर्ण तहा०	२	४	२३	६६	२२	८९	२०६
एकूण	३	९	५२	२०५	९१	४५१	८११

अनुक्रमणिका.

प्रसिद्ध झाले !

मध्वमुनीश्वरांची कविता (पुर. क्र. ३०)

किं. ३ रु. सभासदांस २॥ रु.

मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (पुर. क्र. ३१)

किं. १ रु. सभासदांस १२ आणे.

मंडळांतील नाणीं (स्वीय क्र. ३७)

किं. १ रु.

विक्रयालय शाखा

मंडळाच्या या शाखेचे विद्यमानें खालील व इतर खास ऐतिहासिक मालांचीं पुस्तकें विकत मिळतील.

१ भा. इ. सं. मंडळ–स्वीय ग्रंथमाला.

२ भा. इ. सं. मंडळ–पुरस्कृत ग्रंथमाला.

३ श्रीशिवचरित्रकार्यालयाचे ग्रंथ.

४ कै. राजवाडे–मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (उपलब्ध खंड)

५ कै. खरे– ऐतिहासिक लेखसंग्रह.

६ 'पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद' ह्या हल्लीं चालू झालेल्या नवीन मालेचीं पुस्तकें.

याशिवाय या शाखेमार्फत सभासद व इतर मागणीदारांचे सोयीसाठीं ऐतिहासिक व वाङ्मयिक ग्रंथ मिळवून पाठविण्यांत येतील. प्रत्येक ऑर्डरीबरोबर निम्मी रक्कम पाठविली पाहिजे.

BHARATA ITIHASA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIV] **QUARTERLY** [No. 2

(54)

September, 1933.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १४ वें] **त्रैमासिक** [अंक २ रा.

(५४)


आश्विन १८५५


Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

अनुक्रमणिका.







१९ वें शतक बहुरंगी छापकाम

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १४ वें] त्रैमासिक [अंक १ रा.

१ कोंकण-व्युत्पत्ति व व्याप्ति.*

(श्री. चिं. वि. वैद्य.)

कोंकण हा शब्द कसा निघाला व कोंकण प्रांताची व्याप्ति कोठपर्यंत आहे, या संबंधानें आतांपर्यंत अनेक विद्वानांचीं भिन्नभिन्न मतें प्रसिद्ध झालीं आहेत. यामुळें या प्रश्नाला विशेष महत्त्व नसलें तरी बरेंच मनोरंजकत्व आलें आहे. माझे मित्र रा. लक्ष्मण गोविंद घाणेकर माजी सुभे बडोदे राज्य, यांनीं यंदाच प्राचीन द्राविड या नांवाचें पुस्तक मराठींत प्रसिद्ध केलें असून त्याला परिशिष्ट म्हणून एक कोंकण आणि चित्पावन या मथळ्याचा इंग्रजी निबंध जोडला आहे. त्यांत ते कोंकण या शब्दाची जुनी व्युत्पत्ति अशी देतात कीं, परशुरामानें सर्व पृथ्वीचें दान केल्यावर त्यास आपल्या राहण्यासाठीं समुद्रास हटवावें लागलें. परशुरामाच्या आईचें नांव रेणुका अथवा कोंकणादेवी असें होतें; व याच नांवावरून कोंकण हें नांव पडलें. ही व्युत्पत्ती देऊन ते आपली नवी व्युत्पत्ति अशी देतात. द्रविड देशांत कोंग नांवाची एक जात आहे; त्यांच्या प्रांताला कोंगनाड असा शब्द लागतो. कोंगु शब्द शिलालेखांतही इ. स. प्रारंभीं आलेला आहे. कोंगुनाड प्रांत म्हैसूरच्या दक्षिणेस सेलम आणि कोइमतुर जिल्ह्यांत आहे. हे द्रविडी जातीचे लोक कमी संस्कृतीचे होते. कदंबांनीं यांस जिंकले तेव्हांपासून कदंब आपल्यास कोंगणिवर्म असें नांव लावूं लागले. कदंबांनीं हा देश जिंकल्यावर उत्तरे कडे कोंगु लोक पसरले. त्यांचे कांहीं लोक बडोदा व सुरत यांच्या डांगेंत आहेत. कारवार जिल्ह्यांतही कोंग असून आपण कोठून आलों हें ते लोक अद्याप आठवतात (कारवार गॅझेटियर पहा). मी रेव्हिन्यू अधिकारी असतां बडोद्याच्या डांगेंत कुंकण हा शब्द प्रथम ऐकला. त्याची अधिक चौकशी करितां हे लोक कोंकणांतून आले असें समजलें. या लोकांस कोंगुनाडाची कांहीं आठवण नाहीं. हे लोक

* २३ वा वाढदिवस

कोंकणा देवीची पूजा करितात ; आणि कोंकणा देवी म्हणजे परशुरामाची माता असें समजतात. माझ्या मतें कोंकण हा शब्द मूळचा कानडी आहे. शेवटलें अक्षर ड हें कानडींतच नष्ट होऊन कोंकण एवढेंच कानडींत राहिलें आहे. उदा० कोंगणि-वर्मा, कोंगाळ्व वगैरे शब्द शिलालेखांत सांपडतात. चित्पावन किंवा कोंकणस्थ ब्राह्मण हे आपली व्युत्पत्ति परशुरामापासून मानितात. तात्पर्य कदंबांनीं कोंगुनाड जिंकल्यानंतर कोंगुलोक उत्तरेकडे गेले. व त्यांनीं आपलें नांव उत्तरेकडच्या देशास लाविलें.

माझ्या मतें ही कोंकण शब्दाची व्युत्पत्ति अगदींच चुकीची आहे. रा. घाणेकर कोंगुनाड शब्दांतला ड प्रथम आपल्या इच्छेप्रमाणें काढून टाकितात आणि कोंगू लोकांना कोंकणांत कसें तरी आणतात. हल्लीं चिपळूण कोंकणांत कोणतेच कोंगू लोक शिल्लक नाहींत. कोंकणचे शूद्र लोक कोणत्या वंशाचे आहेत हें जरी निश्चित नसलें तरी ते उत्तरेकडचे अनार्य आहेत यांत संशय नाहीं. कारण त्यांच्या भाषेंत " ण " कार नाहीं आणि " ळ " कारही नाहीं. कोंकणचे शूद्र कोंकन कोकन म्हणतील. आणि केलं (केळें), डाल (डाळ) वगैरे शब्दांत " ल " कार उच्चारतील. अर्थात् बडोद्याच्या डांगेंत सांपडणारे कोंगू हे कोंकण मार्गे न राहतां, उत्तरेकडे गेले असावेत. याशिवाय कोंकण हें नांव कदंबांच्याही पूर्वीचें आहे हें आम्ही पुढें दाखवीतच आहों. तेव्हां रा. घाणेकर यांनीं दाखविलेली व्युत्पत्ति कालदृष्ट्याही निराधार आहे.

रा. घाणेकर यांस मराठी शब्दांची व्युत्पत्ति कानडी शब्दांपासून काढण्याचा विशेष मोह दिसतो. भोंसले शब्दाची व्युत्पत्ति त्यांनीं होयसळ या कानडी शब्दावरून सुचविली आहे. ती अशीच त्याज्य आहे. ह चा प कानडींत होतो असें सांगून होयसळ याचें पोयसळ असें प्रथम रूप केलें, आणि पोयसळचें भोयसळ व भोयसळचे भोंसले अशी व्युत्पत्ति त्यांनीं दिली आहे. परंतु केवळ शब्दसादृश्यावरून व्युत्पत्ती साधणें हें वेडेपणाचें आहे. त्यास इतिहास व परंपरा यांचा आधार पाहिजे. होयसळ हे यादव होते. भोसले यांनीं आपण यादव आहोंत असें कधींच मानिलें नाहीं. किंबहुना यादवांचा व भोसल्यांचा शरीरसंबंध प्रारंभापासून होत आला आहे. भोसले शब्दाची जी व्युत्पत्ति मी दिली आहे तिच्याविषयीं टीका करून घाणेकर लिहितात कीं, भोस गांवचे या अर्थानें भोसेकर असा शब्द व्हावयास पाहिजे; आणि भोसेकर हा शब्द उपयोगांतही आहे. परंतु ले प्रत्ययही याच अर्थानें मराठी भाषेंत रूढ आहे हें ते विसरतात. तुम्ही कोठले, असा शब्द आपण नेहमीं वापरतों, आणि गोखले वगैरे नांवेंही प्रचारांत आहेत. असो. हा एक आनुषंगिक विषय आम्ही एवढ्याचसाठीं येथें सांगितला कीं, घाणेकर यांच्या व्युत्पत्त्या द्राविड देशाकडे ज्यास्त धावतात व त्यामुळें ते इतिहासाकडे व भाषेकडे दुर्लक्ष करतात.

यानंतर आपण विद्वान् प्रोफेसर पांडुरंग वामन काणे यांनीं कोंकण शब्दाची जी व्युत्पत्ति दिली आहे तिकडे वळूं. प्रथम राजारामशास्त्री भागवत यांनीं कोंकण शब्द गोकर्ण ह्या शब्दावरून व्युत्पादिला तें चूक आहे. कारण नामसादृश्यापलीकडे या मताला कांहींच आधार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. प्राचीन ग्रंथांत कोंकण असें नांव न येतां कुंकण किंवा कुंकुण असें नांव येतें. कामसूत्राच्या टीकाकारानें ॥ कुंकर्णाविषयात्पूर्वेण वनवासविषयः ॥ असें लिहिलें आहे. मंखाच्या श्रीकण्ठ चरित्रांत अपरादित्यास " कुंकणेश्वर " असें म्हटलें आहे. शके १०१६ च्या खारेपाटण येथील ताम्रशासनांत कोंकण आणि कुंकण अशीं दोन्हीं रूपें आहेत. मुसलमान प्रवासी कॅकॅम, कोंकम, कोंकन अशीं रूपें वापरतात. अल्बीरुणीनें ठाणा ही कुंकणची राजधानी आहे, असें म्हटलें आहे. इब्न बतूता (इ. स. १३४०) यानें कोंकण-ठाणा असा शब्द वापरला आहे. कोंकण हा देश मूळ कानडी होता, असें अनुमान केलें, म्हणजे त्या नांवाचें मूळ द्राविडीच असलें पाहिजे असा आग्रह धरतां येईल. कोंकु या शब्दाचा अर्थ उंचसखल जमीन असा होतो. अन् किंवा अण् असा तेलंगण शब्दाप्रमाणें कोंकण शब्द झाला असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे. म्हैसुरांतील बळगांवे येथील एका प्राचीन लेखांत कण (Aortical) या शब्दावरून कोंकण हें नांव साधण्याचा प्रयत्न केला आहे. कोंकण हें देशाचें नांव इ. स. ५ व्या ६ व्या शतकापासून प्रसिद्ध आहे. चालुक्यांच्या अमदानींत उत्पन्न झालें असें नाहीं. वनवासी येथील कदंबांनीं कोंकणाला हें नांव दिलें असेंही संभवत नाहीं. महाभारतांत उद्योगपर्वांत कुंकण हें नांव एका नागाचें दिलें आहे. त्यावरून हें नांव पडलें असा कांहींचा समज आहे. वास्तविक या उलट स्थिती असावी. प्रत्येक देशाला एक नाग संरक्षक असतो अशी प्राचीन काळीं कल्पना असल्यानें देशाचे नांवावरून नागाचें नांव पडलें असावें. कुकुराप्रांत असें देशाचें नांव नाशिक येथील कोरीव लेखांत आहे. परंतु उद्योगपर्वांत कुकुर आणि कुकुण असे दोन पृथक् देश सांगितले आहेत. कुकुर हा प्रदेश काठेवाड व उत्तर गुजराथ इकडे असला पाहिजे. कुंकण हें नांव संस्कृतोत्पन्न असेल तर तें क्षत्रपांच्या कारकीर्दींत पडलें असावें. त्या पूर्वी यास अपरान्त म्हणत. इ. स. ५०० पासून कोंकण हा शब्द ज्यास्त प्रचारांत आला. इ. स. १५० पासून ५०० पर्यंत केव्हांतरी हें नांव पडलें आणि तें पर्शियन भाषेंतील कोह (डोंगर) या शब्दावरून निघालें असावें असें मला वाटतें. हीच या शब्दाची व्युत्पत्ति असली पाहिजे असा माझा आग्रह नाहीं.

वरील प्रमाणें रा. काणे यांनीं इतरांचे व्युत्पत्तिविषयक अनेक तर्क देऊन आपलाही एक तर्क शेवटीं दिला आहे. पण तो अगदींच निराधार आहे. इ. स. ५ व्या शतकापर्यंत पर्शियन भाषेचा इकडे कांहींच संपर्क नव्हता. हा शब्द संस्कृतो-

त्पन्न किंवा कानडीतामिळभाषोत्पन्न असणें संभवनीय आहे. पण व्युत्पत्तीची थट्टा करण्याकरितां कीं काय कोण जाणें, मुरारेस्तृतीयः पंथाः या म्हणीप्रमाणें रा. काणे यांनीं ही तिसरीच व्युत्पत्ति सुचविली असावी. असो. रा. काण्यांच्या लक्षांत भीष्मपर्व अध्याय ९ यांत दिलेल्या देशांच्या यादींत हा शब्द आला आहे हें कसें आलें नाहीं ! या अध्यायांतील श्लोक पुढील प्रमाणें आहेत.

अथापरे जनपदाः दक्षिणा भरतर्षभ ।
द्रविडाः केरलाः प्राच्याः मूषिकाः वनवासिकाः ॥ १ ॥
कर्नाटका माहिषका विकल्पा मूषकास्तथा ।
कौकुट्टकास्तथा चोलाः कोंकणा मालवास्तथा ॥ २ ॥

महाभारताचा काल इ. स. पूर्व २५० किंवा ३०० असा धरला तर कोंकण हें नांव इतकें जुनें आहे, यांत शंका नाहीं. महाभारताच्या यादींत हें नांव देतांना अथापरे जनपदाः दक्षिणाः असें प्रारंभीं म्हटलें आहे आणि पुढचीं नांवें देतांना द्राविडाः असें प्रथमच सांगितलें आहे. यावरून हें स्पष्ट आहे कीं, या यादी देणारानें हिंदुस्थानचे दोन भाग पाडिले. एक आर्य भाग व दुसरा द्राविड भाग. उत्तरेकडच्या यादींत मल्लराष्ट्र, गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र, वगैरे महाराष्ट्राचे मुख्य भाग सांगून अपरान्त आणि परान्त असे देश आर्य देशांच्या यादींत सांगितले आहेत. अर्थात् महाभारत कालीं अपरान्त म्हणजे कोंकण नव्हतें. अपरान्त म्हणजे शूर्पारक देश अथवा हल्लींचा ठाणा जिल्हा, परान्त म्हणजे काय हें निश्चित होत नाहीं. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत समुद्रापासून सह्याद्रीपर्यंत १०-१५ कोस रुंदीची सपाट शेतकीची जमीन असून, त्याच्या दक्षिणेस मात्र समुद्रापर्यंत डोंगर भरलेले आहेत व शेतकीस थोडाच वाव आहे. असो. अपरान्तासह महाराष्ट्रास टॉलमीच्या भूगोलांत आर्याके असें म्हटलें आहे आणि दक्षिणच्या भागास डामरिके अथवा द्राविड देश म्हटलें आहे त्याचाही मेळ महाभारतांतील दक्षिणोत्तर विभागांशीं जमतो. आतां दक्षिण देशांचीं नांवें पाहिलीं तर कांहीं संस्कृतोत्पन्न व कांहीं तामिलभाषोत्पन्न अशीं दिसतात. द्रविड, केरल, कर्नाटक, कौकुट्टक, चोल हीं द्राविड भाषेंतलींच असलीं पाहिजेत आणि महिषक, मूषक, वनवासी, मालव, हीं वरील श्लोकांतील नांवें संस्कृतोत्पन्न दिसतात. माझ्या मतें कोंकण हें नांव कोंकु (डोंगराळ प्रदेश) या शब्दावरून अण् प्रत्यय लागून निघालेलें असावें अशी जी व्युत्पत्ति वर एकानें सुचविलेली आहे, ती मान्य करण्यासारखी आहे.

शेवटीं डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांनीं तामिलवाङ्मयांतील कुंकण देशाविषयीं माहिती सांगून असा तर्क केला आहे कीं, हा शब्द कोळ् आणि कानम् असा असावा. आणि कोळ् या शब्दाचा अर्थ लूट अथवा जबरदस्तीनें घेणें अर्थात् त्यावेळीं म्हणजे संगम कवितांतून या देशाची कल्पना पाहिजेल त्यांना लुटावयाचा देश

अशी असावी. पण ही व्युत्पत्ति मान्य करण्यासारखी वाटत नाहीं. कारण कोंकणांत लुटण्यासारखें कांहींच नव्हतें, आणि ळकार कां नष्ट व्हावा आणि कोळकानम् याचें कोंकण असें कां व्हावें, हें सांगतां येणार नाहीं. शिवाय संगम काव्यकारांची कोंकण शब्दावर ही कोटी असावी. तसेंच मला असेंही वाटतें कीं, विद्वान लोक व्युत्पत्तीची उगीच खटपट करितात. हजारों शब्द व विशिष्ट नांवें (वंग, द्राविड, चोळ,) वगैरे स्वतः सिद्ध असतात. कोणी एखादा मूळ शब्द जरी त्यांत दाखविला तरी कोळ, कंकु, गो, इत्यादि शब्द तरी कसे निघाले हा प्रश्न राहाणारच ! तेव्हां याविषयीं व्यर्थ ओढून ताणून व्युत्पत्ति लावीत बसणें योग्य नाहीं. "which produces gold" असें संगमकाव्यांत वर्णन आहे. कोंकणांत कधींच सोनें निघालें नाहीं व निघत नाहीं. याची व्याप्तिहि अलतीच म्हणजे तुळुदेश अर्थात मंगळोरप्रांत व दोन कर्नाटक अशी देतात. या प्रांतास कोंकण कधींच म्हटलेलें नाहीं.

याप्रमाणें व्युत्पत्तीचा विचार झाल्यावर आपण कोंकण देशाच्या व्याप्तीकडे वळूं. संगम काव्यांतून डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांनी दाखविल्याप्रमाणें या देशाची व्याप्ति समुद्र आणि डोंगर यांच्या दरम्यान असून दक्षिणची हद्द बहुतकरून चेर राजांचा देश ही होती, व उत्तरकडे अपरान्त गाठितां येईल. म्हणजे हल्लींच्या महाड खाडीपासून दक्षिणेस गोवाखाडीपर्यंतचा देश, कोंकण या संज्ञेनें ओळखला जात होता. याच्या पूर्वेस घाटावर कुंतल आणि वनवासी देश होते. या कोंकण देशांत प्रथम वसाहत आर्यांनीं केली असें दिसतें. भृगुवंशांत यदूच्या चार नागकुलोत्पन्न पुत्रांनीं वनवासीपर्यंत वसाहत केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. हल्लींच्या कोंकणांतील शूद्रांची भाषा केवळ संस्कृतोत्पन्न आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पण ती महाराष्ट्रीशीं विशेष लागून नाहीं. असो, हा विषय या लेखाच्या बाहेरचा आहे; पण माझी अशी सूचना आहे कीं, कोणातरी जिज्ञासूनें कोंकणांतील निरनिराळ्या पोटजातींचा अभ्यास करून ठाणें जिल्ह्यांतील शूद्रांच्या भाषेशीं काय संबंध आहे व त्यावरून तेथील लोक तेथें कधीं व कोठून वसाहतीस आले, हें ठरवावें. संगमकाव्यांच्या वेळेस हा प्रांत अगदीं उजाड होता, हें स्पष्ट आहे.

असो. आपला मुख्य विषय कोंकण देशाची व्याप्ती हा असून माझ्या मतें ती वर उल्लेखिलेल्या हद्दीपर्यंतच होती. पण मग सप्तकोंकणाः असें जें म्हटलें जातें व त्यांत त्रावणकोरपर्यंतचा भाग येतो, त्याचें कारण काय ? रा. काणे यांनीं दाखविल्याप्रमाणें शके ९४६ च्या मिरज ताम्रपटांत सात कोंकणांचा स्पष्ट उल्लेख आहे. सह्याद्रीखंडांत केरल, तुळुग, कोंकण, करहाट वगैरे सात देश दिले आहेत. पण हा भ्रम पुष्कळ लोकांचा असून तो निवारण करण्यासारखा आहे. सात कोंकणांच्या यादींत कुंकण हें निराळें आहेच; तेव्हां कोंकण देशाची व्याप्ती केरळापर्यंत नाहीं असेंच मानावें लागेल. सप्तकोंकण याचा अर्थ कोंकणादि सप्त असा केला पाहिजे.

पंच गौड अथवा पंच द्राविड याचा अर्थ गौडादि पंच किंवा द्रविडादि पंच असाच होतो. अर्थात् द्रविड देशाची व्याप्ती जशी गुजराथेपर्यंत जात नाहीं त्याचप्रमाणें सप्तकोंकण म्हणजे कोंकणादि सप्त, कोंकण हें सर्वांत उत्तरेकडचें, तेथपासून केरलापर्यंत सात देश (यांत कुंतल, कर्नाट वगैरे घाटावरचेही आहेत) गणिले आहेत. तेव्हां कोंकण देशाची व्याप्ती दक्षिणेकडे वाढलेली नाहीं.

पण ती उत्तरेकडे अपरान्तापर्यंत वाढली असें अरबी प्रवाशांच्या पूर्वोल्लिखित लेखावरून कबूल करावें लागेल. ही व्याप्ती शिलाहारांचे वेळेस वाढली आणि अर्जुनपर्यंतही तशीच समजली जाते. अपरान्त हें नांव हल्लीं लोकांच्या स्मरणांतही नाहीं. उत्तर कोंकण १४०० गांव व दक्षिण कोंकण ९०० गांव असा उल्लेख कोरीव लेखांत असल्याचें रा. काणे यांनीं दाखविलेंच आहे. परंतु दक्षिण कोंकण हेंच खरें कोंकण असून तेथील लोकांची भाषा, उत्पत्ती वगैरे अगदीं भिन्न आहे.

---

२ मत्स्ययंत्र किंवा होकायंत्र*

(श्री. प. ह. थत्ते, नाशिक)

प्रस्तावः—नागेशंकर राजे बहाद्दूर यांचा नाशिक येथें एक वाडा होता. तो कांहीं कारणानें अर्धवट जळला असतां म्युनिसिपल स्कूलबोर्डानें पाडून त्याचें आपले शाळांतील मुलांस खेळण्यास क्रीडांगण केलें आहे. हा जळका वाडा पाडीत असतां आमचे मान्यवर शेजारी व म्युनिसिपल ओव्हरसीयर श्रीयुत गोपाळसिंग रामसिंग परदेशी यांस अवर्णनीय तळघरें व कांहीं चमत्कारिक जिन्नस आढळले. ह्या चमत्कारिक जिनसांपैकीं तीन लहानसे रुप्याचे जिन्नस त्यांनीं आम्हांस मेहेरबानीनें दिले. (१) **रामनामाची आंगठी.** (२) **श्री. विश्वासराव लक्ष्मण यांच्या मोर्तबाची आंगठी** आणि (३) **होक्याची आंगठी.** तिसरी प्रत्यक्ष प्रेक्षकांचें इतिहाससंबंधाचें कुतूहल जागृत करण्यासारखी असल्यामुळें आम्ही ती आमचे "भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें" यांस सादर करून तीविषयीं माहिती देण्याचें योजिलें आहे.

होक्याची आंगठीः—(इ. सन १८१८) ही आंगठी रुप्याची आहे. तिचे दोन भाग आहेत. एक जाडा व दुसरा बारीक. जाडा भाग हा वाटीसारखा अष्टपैलू आहे. त्या वाटीवर अष्टपैलू कांच, कोंदण करून बसविलेली आहे. त्या भिंगांतून पाहिल्यास वाटीच्या मध्यभागीं एक उभी सोन्यासारखी पिनलेहून पिवळी मोठ्या मोहरी एवढ्या होक्याची टांचणी आहे. तिच्या पिवळ्याजर्द रंगावरून

---

* २३ वा वाढदिवस.

कदाचित् ती सोन्याचीही असण्याचा संभव दिसतो. त्या टांचणीच्या बोंडाखालीं दोन आडवे लोखंडी तुकडे गरगरा फिरणारे आहेत. ते परस्परांशीं काटकोन करितात. ते त्या टांचणीच्या दांडींत ओंविलेले आहेत. त्यांजकडे वरून नजर फेकल्यास त्यांची सर्व आकृती जमिनीशीं समान्तर हवेंत उडणाऱ्या काळ्या पाणकोंबडीसारखी किंवा कावळ्यासारखी अगर कोकिळेसारखी दिसते. त्या आकृतीचा मधला बाणाकार भाग त्या पक्ष्याच्या पोटाखालीं पाय जुळलेल्या चिंचोळ्या पक्ष्यासारखा व त्याचा आडवा भाग त्या पक्ष्याच्या उडण्याकरितां पसरलेल्या दोन कंसाकार पंखासारखा आहे. किंबहुना, ह्या उभया आडव्या भागांचा सगळा आकार आपल्या धनुर्धारी रामादिकांच्या तीरकमठ्यासारखा बहुतेक आहे. या महाराष्ट्रीय मत्स्ययंत्राचा विशिष्टपणा जो आहे तो हा कीं, हा यज्ञांतील कुण्डमंडप व गृहांतील बांधकाम यांस अत्यंत आवश्यक असणाऱ्या पूर्व व पश्चिम दिशा आपल्या पुढच्या चोंचीनें व शेपटाच्या पिसाऱ्यानें बिनचूक दाखवितो. ज्या टोंकावर नांबड्या रंगाचा ठिपका आहे तें अगदीं समुद्राकडील पश्चिम दिशा दाखविते. आतां ह्या यंत्रांतील एक महत्त्वाची गोष्ट आम्हांस समूळ समजल्या वांचून राहिली आहे. ती ही कीं, ह्या आंगठीच्या पेटींत आमच्या प्राचीन मत्स्ययंत्राप्रमाणें तेल आहे कीं काय ? पण हें शोधून काढणें अत्यंत दुर्घट आहे. कारण त्यास ती पेटी फोडावयास पाहिजे व ती फोडिली कीं, त्या यंत्राचें पूर्व व पश्चिम दाखविण्याचें जें वैशिष्ट्य आहे, तें समूळ नष्ट होईल ! ही पेटी निर्वात असेल तर त्या फोडतोडीपासून वरील वैशिष्ट्याचा कमालीचा विघात होण्याचा संभव आहे. कारण तेलाची पेटी पुन्हां तेल भरून दुरुस्त करणारे पिढिजाद गांवठी कारागीर येथें मिळतील. पण ती पेटी अशी निर्वात करणारे कारागीर येथें पूर्वीं असले तरी ते हल्लीं कोठें ऐकूनही ठाऊक नाहींत. हा होका युरोपियनांच्या मॅरिनर्स कँपस प्रमाणें उत्तर दक्षिण दिशा दाखवीत नाहीं. तर तो आमच्या सूर्योपासक देशाच्या स्थानिक यज्ञांतील कुण्डमण्डप व गृहांतील बांधणी यांस लागणाऱ्या फक्त **पूर्व पश्चिम दिशाच** प्रामुख्येंकरून दाखवितो ही ह्यांतील विशेष अदृष्टपूर्व खुबी आहे. तेव्हां मयसंहितोक्त आमच्या मूळच्या मत्स्ययंत्राप्रमाणें हीही सुधारणा आमच्या कोणा अर्वाचीन कोंदणकर्त्या सोनारांची असली पाहिजे व हें वातविशिष्ट असलें पाहिजे असें आमचें प्रामाणिक मत आहे; दुसरा भाग किल्लीप्रमाणें जानव्यांत अडकवण्याचा आहे.

आमचे वडील दाजी काका ऊर्फ हरी यांनीं आपलें चिपळूण बंदर येथील घर आमच्या अगदीं लहानपणीं बांधण्यास काढिलें तेव्हां आम्हांस आठवतें कीं, आमचे आजे बाळंभट अण्णा यांनीं एक चारपांच इंची लांकडी कांतीव करंडा त्या घराच्या दिशा ठरविण्यास आणिला होता, त्यावर न्हाव्यांच्या जुन्या लाल लाखेरी

चौकटीच्या आरशासारखें एक बिन पाऱ्याचें कांचेचें झांकण होतें. त्या कांचेच्या पलीकडे आम्ही एक पेला व त्यांत एक फिरता मासा पाहिला आहे. त्या पेल्यांत आम्हांस पुढें कळल्याप्रमाणें तेल भरून त्यांत सदरहू मासा एका उभ्या काडीवर तरंगत ठेविलेला असूं शकेल. तें यंत्र दिशा ठरविण्यास वापरण्यांत आलें हें आम्हांस त्याजवरून खुंट्या मारून त्याबरहुकूम जातें घालण्यांत आलें, तेव्हां पूसतपास करितां सहज कळलें.

गॅझिटियरचें मत्स्ययंत्र- बॉंबे गॅझिटियरच्या १३ व्या व्हाल्यूमच्या २ऱ्या भागांत मत्स्ययंत्राविषयीं पुढील माहिती आली आहे. ती वरून पूर्वी, आतां वर्णन केल्याप्रमाणें मत्स्ययंत्रें होतीं असें दिसतें.

" The early Hindu astrologers are said to have used the magnet as they still use the modern compass, in fixing the north and east, in laying the foundations, and other religious cerimonies. The Hindu compass was an Iron Fish that floated in a vessel of oil and pointed to the north. The fact of this older Hindu compass seems placed beyond doubt by the Sanskrit word Maccha-yantra or fish machine, which Molesworth gives as a name for the mariner's compass:— Appendix. A

त्याप्रमाणें या होकायाचा उपयोग काठेवाडांतील बोरावळ बंदरीं झांझिबारास जाणाऱ्या गलबतांवर विलायती यंत्रें येथें येऊं लागण्यापूर्वीं, सरास चालू होता असें आम्ही अन्य ग्रंथांत वाचलें व ऐकलें आहे.

जावा येथील हिंदू वसाहत करणारांचें मत्स्ययंत्र:—जावा येथील बखरींत याचें वर्णन असें दिलें आहे:—इ. सन ६०३ च्या सुमारास गुजराथेंतील एका राजास शक (सिथियन) वगैरे परकी स्वाऱ्या करणाऱ्या लोकांचा उपद्रव झाल्यामुळें त्यानें आपल्या मुलास ५००० लोक बरोबर देऊन जावा (यव द्वीप) येथील बेटांत सहा मोठ्या व १०० लहान गलबतांत बसवून पाठविलें. त्यांत शेतकरी, कारागीर, योद्धे व लेखक होते. त्यांनीं तेथें वसाहत केली. त्यांनीं बोरोबुदूरचें लेणें कोरलें. त्यावर अनेक चित्रें कोरलीं आहेत. त्यांत अनेक गलबतांचीं चित्रें आहेत. त्यांतील नंबर १ च्या एका नकलेमध्यें सिंधू नदीच्या मुखापासून येथें वसाहत करण्यास येणाऱ्या साहसी लोकांस आणणाऱ्या गलबतांचें रूपरेखन आहे. या गलबतांपैकीं एका गलबताचें वर्णन मि० हॅवेलचें 'स्कल्पचर व पेंटिंग' या पुस्तकाच्या १२४ पानावर आहे तें पहा. या गलबताच्या मागल्या भागावर एक

आकृति आहे. ती तज्ज्ञाच्या मताप्रमाणें मत्स्ययंत्राची आहे. (मि. राधा मुकुद मुकरजीचें शिपबिल्डिंग पा. ४७). आम्ही कोंकणांत चिपळूण येथें जातां येतांना प्रस्तुत प्रचलित आगबोटींतील लहान मोठे होके (कॉंपसिस) सुकाणूच्या खुंट्याच्या गरगरा फिरवितां येणाऱ्या उभ्या चाकाजवळ जात्याप्रमाणें सपाट ठेवलेले व दिशा दाखविणारे पाहिले आहेत.

उपसंहार. एवंच वर केलेल्या विवेचनावरून आमचेकडे फार प्राचीन कालांपासून दिशा दाखविणारें होकायंत्र होतें हें स्पष्ट आहे.

---

३ महानुभावीय वाङ्मयांतील कांहीं सामाजिक प्रसंग.*

(श्री. ह. ना. नेने, M. A. L. T., पटवर्धन हायस्कूल, नागपूर.)

चक्रधरांच्या प्रयाणानंतर म्हाइंभट आदिकरून प्रमुख शिष्यांनीं सर्वज्ञ चक्रधरांच्या सर्व लीळा मोठ्या मेहनतीनें संकलित केल्या. नागदेवांच्या देखरेखीखालीं या लीळांचें सर्व संशोधन होऊन 'लीळाचरित्र' हा ग्रंथ तयार झाला. इंग्रजी भाषेंतील **बॉस्वेलनें** केलेल्या 'डॉक्टर जॉन्सन' यांच्या चरित्राची लोक इतकी स्तुति करितात; पण धर्मभावनेनें प्रेरित झालेल्या अनेक भक्तांनीं आपल्याला आदरणीय अशा व्यक्तीचा हा गोळा केलेला इतिहास पाहिला म्हणजे या ग्रंथाची अपूर्वता ध्यानांत येते. नागदेवाचार्यांना चक्रधरांचा सहवास निकट झालेला; त्यांच्या डोळ्यांसमोर यांपैकीं कित्येक गोष्टी घडलेल्या; गुरुजींच्या बरोबर त्या त्या ठिकाणीं नागदेवाचार्य स्वतः गेलेले; निरनिराळ्या शिष्यांनीं आपला स्वतःचा अनुभव सांगितलेला; व चक्रधरांच्या प्रयाणानंतर थोडक्याच काळांत हा सर्व खटाटोप झालेला; तेव्हां या चरित्रग्रंथाला महानुभावांनीं अत्यंत मान्यता दिल्यास काय आश्चर्य. याच ग्रंथाच्या आधारावर पुढील वाङ्मयाची इमारत उभी केली गेली. हें लीळाचरित्र वाचीत असतां त्यांतील अनेक प्रकारचे सामाजिक उल्लेख वाचून, त्यावेळची समाजस्थिति कशी असावी याचें चित्र अंधुकपणें तरी दिसूं लागतें. एकादशी, अनंत चतुर्दशी, सोमवती अमावस्या, यासारखीं व्रतें, दिवाळी, शिमगा, यासारखे सण, महाशिवरात्रीसारख्या यात्रा, जात्यंध, घोडाघोडा, हुतुतु, इत्यादि खेळ, गांवावर हल्ला केल्याची हूल, भांडणें सोडविण्याची पद्धति, दिव्य करून अपराध केला अगर न केला हें ठरविणें, शिंपी, चांभार, विणकरी, बुरूड, गुळ-

* २३ वा वाढदिवस.

हारी, इत्यादि धंदेवाले लोक, पाडस, घरें, वस्त्रें, दुष्काळ, सुकाळ, निरनिराळ्या तऱ्हेचे खाद्य व पेय पदार्थ, निरनिराळे दागिने, अशारीतीनें समाजाच्या निरनिराळ्या अंगांचें दर्शन या लीळाचरित्रांत होण्यासारखें आहे. त्यांपैकीं नमुन्यासाठीं कांहीं दृश्यें दाखविण्याचा येथें विचार केलेला आहे.

प्रस्तुत उतारे ज्या **लीळाचरित्रांतील** आहेत ती पोथी अत्यंत जुनी असून तिच्या शेवटीं कालदर्शक उल्लेख आहे. ' सके १४७६ आनंदनाम संवत्सरेः श्रावणमासू : वदि नवमी : मंगळवारू '

तसेंच केशो बासांनीं लीळाचरित्राचें संस्कृतांत 'रत्नमालास्तोत्र' तयार केलें. त्या ग्रंथाचा काल इ. स. १२८५ आहे. पण ज्या पोथीवरून संस्कृत उतारा पुढें देण्यांत आलेला आहे त्या पोथींत शेवटीं कालनिर्देशक उल्लेख नाहीं. तथापि अक्षर वटिका, पोथीची बांधणी व आंतील कागदाचा जुनेपणा यावरून ही पोथी फार जुनाट आहे यांत शंका नाहीं.

तसेंच शेवटचे दोन उतारे हे नागदेवाचार्य स्मृतीपैकीं आहेत. पोथी जरा अशुद्ध आहे व तितकी जुनी नाहीं. तरीही मजकुराच्या दृष्टीनें तिचें महत्त्व लक्षांत येईल.[१]

पहिलें दृश्य.

शेतांत उत्तम हरभरा (चणा) पिकलेला असून, चक्रधरस्वामींचे तिघे शिष्य नागदेवाचार्य भट, नाथोबा व मार्कंड हे हुळा भाजण्यासाठीं हरभऱ्याच्या पेंड्यांचे भारे आणीत आहेत. हुळा भाजून झाल्यावर खात असतांना चाललेल्या हास्यविनोदांचें वर्णन यांत आलेलें आहे. स्वामींजींची विनोदीवृत्ति यांत फारच उत्कृष्टपणें दिसून येते. उत्तम प्रसंगनिष्ठ विनोदाचा हा उतारा मासला आहे. शिवाय 'रत्नमालास्तोत्रांतील' संस्कृत उतारा येथें दिल्यानें मजकुराच्या दृष्टीनें दोन्ही पोथ्यांत कशी एकवाक्यता आहे हें कळण्यासारखें आहे.

(अनुचर चोरीकृत उळा आरोगण)

भटो आणि **नाथोः बास** वाडेगांवा भीक्षेसि जात होतेः तवं मार्गीं सेतीं सेतीं चणयाचीं कडपें देखिलीं । वल्हे घातली असे । नाथोबायें भणितलें: नागदेयाः केसा बरवा उळेयाजोगा चणा । भटीं भणितलें: गोसावियातें पुसोंः **मा:** आणों । भीक्षा करूनि आलेः मग गोसावीयासि दृष्टपूता झोळिया केलियाः मग गोसावियातें विनविलें: जीः जी: कैसा बरवा उळेयाजोगा चणा असे जीः इतुका ऐसा आणों । गोसावी उगेंचि । मागुतें गोसावियातें विनविलें : जी जीः कैसा बरवा उळेयाजोगा चणा :

---

१ वरील तिन्ही पोथ्या प्रेक्षकांना पाहण्यासाठीं निबंधवाचनाच्या वेळीं मंडळांत आणलेल्या होत्या.

इतुका ऐसा आणों : मग सर्वज्ञें भणीतलें : एतुका ऐसा आणा : वरील नेघावा : तळील नेघावा । हो कां जी : भणोनि : तीर्घे निगाले : वरिलें **कडपें** ठेविलीं : तळिला कडपाचे भारे बांधिले : भटीं आणि नाथोबायें मार्कंडासि **वाइला:** भटोयें मार्कंडासि वाइला : भटोयें आपणेया आपण वाउनि घेतला : आणुनि गुंफेचां अंगणीं **दुडकरि** भारे घातले : भट नेयानि भारेया **आउंगले** : आणि गोसावी बाहीरि **बीजें केलें** : मग सर्वज्ञें भणीतलें : हें काइ गा इतुका **चणाचि** : तुमचेनि मागें मागें ते एति : चोर भणोनि बांधिजा : तेव्हळि काइ : सर्वज्ञें भणीतलें : हो आतां काइ : **एथौनिचि** भणीतलें : पैन्हा जा : मरगजोसि भाजा : मागु मोडा । मागुने भारे वाइले। भटीं भणीतलें : आउ : नावेक **वीसद्वेवो** घेउनि या कां : ना रे नागाणा : मी नै ए : भटीं भणीतलें : **आतां उळेया वारिया धुळी खाये** : भटीं वीसदेओ घेतला : उळा भाजिला : मागु मोडिला : मग उळेयां **कोंहोंकें** भरिलीं : मग गोसाविया विळिवाचा पुजावस्वर जाला : मग आउसी बरवा उळा नीवडला : गोसावियासी प्रसादु केला : मग भटाकरवि दोनी दोनी आंजुळी आवघेयासि देव-विला : भट देवों लागले : आउसा नेदीति : आउसि भणीतलें : नागदेया मज उळा दे । हळुंचि भटीं भणीतले : उळेयां वारिया धुळी खाए : मघा तरि वीसदेवो नाणी-सीचि : आउसी भणीतलें : जी : जी : देखिला हा नागदेओ : उज उळा नेदी : आऊ धुळी खाए भणताए : तोकडीची ऐसी : तरी काइ: स्वामी : जगन्नाथा : आपण काए बहुती **खावविजाताए** : **ओपागा** वानरेया नायेकासि आवघेया सरिसा उळा : भटीं आवघेया सरिसा उळा दीधला : गोसावी उळा **आरोगण** केला : गुळळा जाला : वीडा जाला : मग गोसावी **पहुड** स्वीकरिला : पस्यात पाहारीं गोसावी **परिश्रया बीजें केलें** : परिश्रयो सारुनि उदका विनियोगु केला : मग गोसावी आसनीं उपविष्ट जाले : मग सर्वज्ञें भणीतलें : **जातीं घालिजोति ना** : जी : जी : भटीं आवघा उळा दीधला : आवघे खाओं लागले : भटो दोहीं हातीं कुसकारिती : रगडिति : **आणि पसाभरि तोंडीं घालिति** : नाथोबा **एकु एकु दो दो खाति** : सर्वज्ञें भणीतलें : **वानरेयाचें जातें पसें प्रमाण मंडळिकाचें जातें गीरगुटीयें**: ऐसा उळा खादला: मग गोसावियासि उपहारु जाला: बाहीरिले पटिसाळेवरी आसन: गोसावियाचेया दरिसना एल्हंभट आले असति: भट बैसले असति : आणि मातीकाम करीतु असति: आणि पाणी पीति: एल्हंभटें भटातें भणीतलें: माहात्मे उदेयांचि पाणी पीताति: थोरलालीं पोटें: हें काइ पां: जी: जी: भुखें अन्नें खाताति: व्यापारु करितां भागताति: तेणें ताहान लागताए: सर्वज्ञें भणीतलें: कांहीं विरुति: चेष्टा: ना विरुति चेष्टा: करावेया कारण काइ: गोसावी भक्तजनाची **वास पाहाति**: आणि हास्य करीति ।

(लीळाचरित्र उत्तरार्ध लीळा ११)

वरील उताऱ्यांतील ' कडपें, वाइला, दृडकरि, ओठंगले, वीसदेओ (विस्तव) खावविजताए, ओपागा, आरोगण, पहुड, इत्यादि शब्द; ' उळेया वारिया धुळी खाए ' ' परिश्रया बीजें केलें ' ' वास पाहाति ' इत्यादि वाक्प्रचार; ' एथौनि ' म्हणजे ' श्रीचक्रधराकडून ' अशा प्रकारें प्रथमपुरुषी अर्थ दाखविणारा शब्द; ' गोसावियातें पुसों मा (मग) आणों ' ' जी जी केसा बरवा उळेयाजोगा चणा ' ' इतुका ऐसा आणा ' ' जातीं घालिजेति ना ' इत्यादि वाक्यरचना; आणि ' जातीं घालिजेति ना ' (जातीं घालाना–तोंडें उघडून हुळा खाण्याचें सुरू कराना), ' वानरेयाचें जातें पसेंप्रमाणः मंडळिकाचें जातें गीरगुटीयें (भटांच्या जात्यांत पसापसाभर घास जाण्याइतकें तें मोठें आहे, पण नाथोबाचे मंडळिकाचें जातें अगदीं लहान तोंडाचें गीरगुटीप्रमाणें आहे) इत्यादि ठिकाणचा विनोद रम्य आहे.

वरील ' लीळेचा ' रत्नमालास्तोत्रांतील उतारा.

(प्रस्तुत उताऱ्यांत संस्कृत ' ल ' च्या जागीं ' ळ ' लिहिलेला आहे.)

उन्मूळितं ते चणकं निरीक्ष्य कदापि विज्ञाप्य पतिं निशायाम् ।
उपानयन् भारमितं तदीशो विलोक्य किंचित् प्रहसन् बभाषे ॥ १ ॥

आलोकयन्तः पदवीमुपेयुर्भवेत् तदा तस्करबंधनं च ।
उपाहृतोऽयं बहुळो भवद्भिरस्याचिरं चिन्तत भर्जनाय ॥ २ ॥

कृशानुमानीय विदाह्य सर्वं सारं समुद्धृत्य तुषं निरस्य ।
प्रक्षाळयन्तः स्थळमीशदासा यथाकृतोल्लेखमतिर्न पुंसाम् ॥ ३ ॥

समर्प्य नाथाय कृतप्रसादाः सुभर्जितास्ते चणका गुफायां ।
निधाय नित्यं बभुजुर्मुहूर्ते सारस्वतेनाथ दृशा कृतार्थाः ॥ ४ ॥

पृथूदरांस्तान् सलिलं पिबन्तो व्यापारसंजाततृषानवेक्ष्य ।
आनंदयंश्चारुकृपाकटाक्षैर्हसंस्तदीयामकरोत् कथां ताम् ॥ ५ ॥

दुसरें दृश्य.

पुढील उतारा जमीन नांगरण्याबद्दलचा असल्यानें अनायासानें एके ठिकाणीं जमिनीच्या संबंधींचे अनेक शब्द आलेले आहेत. नागपूर–वऱ्हाड भागांत हे शब्द अजूनदेखील खेडेगांवांत शेतकरी वापरतात.

(भटः सारंगपंडित भूमिविवरणी क्रीडा)

' गोसावी पोटफोडेयाचेनि मार्गें बीजें करिताति । तव मार्गीं सेत : कुणबीयें नांगरु उभा केला असे : आणि आपण जेवीत असे : गोसावी तयाचे सेताकडे बीजे केलें : उभे राहिले : पांडेया हे तुम्ही जाणा गा : जी जी : काइ ब्रह्म-

विद्या : मा नेणीजे : यासीचि काइ जाणावें असे : सर्वज्ञें भणीतलें : पां : **एथ** दाखवा : हो कां जी : मग **तुता** घेतला : **रुंभणें** धरिलें : दोरु धरिला : तापटीलें : तव एकु बैलु **आनौता** गेला : सर्वज्ञें भणीतलें : वानरेया हे तुम्ही जाणा गा : जी जी : यासि काइ जाणावें असे : पां एथ दाखवा : मग भटीं नांगरु धरिला : नेला : आणिला : सर्वज्ञें भणीतलें : वानरेया : एथ एक चुकलेति गा । काइ जी : **वरंबा** फुटेचिना । मग गोसावी कटिप्रदेशीं **फुटा** वेढिला । आंगीचीया बाहीया वरौतीया सारिलीया : श्रीकरीं तुता घेतला : रुंभणेयापासी दोरु धरिला : मग बैल तापटीले : मग **चास** उजूचि गेले : मागुतं आणिलें : मग तेणें कुणबीयें भणीतलें : आवघेया **वाहवळाचा बापु जालासि** । गोसावी वाहवळे नव्हेति । हे आवघेया वाहवळाचा बापू । **जन्म गेलें आमुचें** : **एणें खोडंसि झांबतां** : परि ऐसें **आउत वाहों** कव्हणीचि नेणे : मग गोसावी बीजें केलें :

(उत्तरार्ध, लीळा १३५)

या उताऱ्यांत ' विखरण, कुणबी, तुता, रुंभणें, वरंबा, चास, वाहवळ, आउत ' इत्यादि शेतकीचे शब्द मननीय आहेत.

बीजें करणें, आउत वाहणें, हे वाक्प्रचार, ' आवघेया वाहवळाचा बापू जालासि ', जन्म गेलें आमुचें......झोंबतां, इत्यादि वाक्यें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

भटो म्हणजे नागदेवाचार्य भट व पांडये म्हणजे सारंगपंडित हे चक्रधरांच्या बरोबर पोटफोड्याच्या वाटेनें जात असतां मध्येंच त्यांना शेत लागलें. तेथें शेतकरी नांगर सोडून बसला होता. अशावेळीं पांडये व भट यांना गोसाव्यांनीं प्रश्न केला कीं, तुम्हाला जमीन वखरतां येते काय ? ' ही काय ब्रह्मविद्या आहे म्हणून कठीण जाईल ' असें त्यांनीं गुरुजींना उत्तर दिलें. ' तर मग, वखरून दाखवा ' असें गुरुजी म्हणाले. पांडये नांगरूं लागले तों एक बैल एकीकडे गेला; त्यानंतर भट नांगरूं लागले तो फाळ जमिनीच्या आंत गेलाच नाहीं. नंतर सर्वज्ञांनीं स्वतः उत्तम प्रकारें जमीन वखरून दाखविली कीं, जवळच्या शेतकऱ्यानें जन्मांत देखील कधीं पाहिली नाहीं. अशा प्रकारें, वरील उताऱ्यांत खेडेगांवीं दिसणारा नेहमींचा देखावा आहे.

तिसरें दृश्य.

पुढील उताऱ्यात शिंपी, शिवणावळ, इत्यादिकांचा उल्लेख आहे. नागदेवाचार्यांना आंगांत घालण्यास कांहीं तयार करावयाचें होतें; म्हणून गुरुजींच्या आंगची ' आंगी ' प्रमाणासाठीं घेऊन नागदेवाचार्य गेले. बरोबर नाएका म्हणजे आउ ही गेली होती.

सींपु भोजन अपराधें आउ दवडणें.

एकु दिसीं गोसाविया उपाहार जालाः मग सर्वज्ञें भणीतलेंः वानरेयाः **तुम्हां आंगी सिवावी असे**ः जी जीः तरि नाएकातें नेयाः यातें तेथ बैसवाः **मा**ः तुम्हीं याः हो कां जीः मग भटीं गोसावीयाची **प्रमाणालागी आंगी घेतली**ः आऊ चालाः माः तूं तेथ बैसः माः मी माघौता येईनः मग भट आणि आउसे गेलीः भटीं **एकु दामु सींवणावळी दीधला**ः आउसे तेथ बैसविलीः भट माघौतें आलेः सींपेनि भणीतलेः आईः जेया गोसावीयाची आंगी ऐसी परिमळबहळः तरि ते गोसावी कैसे असतिः हां रेः तुआं स्वामी जगन्नाथ नाहीं देखलाः **नाः आईः माझा स्वामी जगन्नाथ बरवा असे रे**ः हे आंगी सीवीः मग तुज स्वामी जगन्नाथाचें **दरिसन करूं**ः मग तेणें आंगी सीवीलीः मग आला ।

(उत्तरार्ध लीळा १२२)

वरील उताऱ्यांतील ' एक दामु सीवणावळी दीधला ' हा उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ' कवडा, रुका; दामु, आसु ' असे नाण्याबद्दलचे उल्लेख येतात.

चवथें दृश्य.

पुढील उतारा नागदेवाचार्यचरित्रांतील आहे. भागवतावरील ' रसवृत्ति ' व्याख्यानाचें वर्णन यांत आलें आहे. कवि भास्करपंडित यांच्या रसाळवाणीनें लोक कसे तल्लीन होत असत याचें सरस वर्णन या अवतरणांत आहे. तसेंच हरिभट वांकुले हे विद्वान असूनही त्यांचें व्याख्यान रूक्ष असल्यानें लोकांना कसा कंटाळा येई त्याचेंही वर्णन आहे.

' रसवृत्ति व्याख्यान '

' एकु दीस गंगेकडे समीपचि कवीश्वर बास बैसले होतेः कांहीं वाचीत होतेः कवणाप्रति ते नेणिजेः परि संस्कृत व्याख्यान करीत होतेः तवं तेथ **येकयेकु लोकु वेधला : थोर रस अवतरविला : आवघें नगर आकर्षिलें** : तवं कोणी एकी एउनि भटोबासा पुढां सांघीतलें : भटीं भणीतलें : हें काइ जाले या भानुभटांसी : जा गा बोलावा : भणौनि बोलाऊं पाठविलें : मग तेही तें आकर्षिले : आले : भटीं भणीतलें भटो (भानुभट—भास्कर कवीश्वराचार्य) तुज जरि ऐसें वेसन तरि श्रीभागवतगीता भण : कविश्वरें मानीलें : मग **तैलागौनि** कवीश्वर बासीं भटो बासापुढां श्रीभागवत **रसवृत्ती वाखाणु आदरीलें** : तेणें भटो बासाचें अंतष्करण वेधलें : आणि **आवघें चन्द्रमए होए ।**

कवीश्वर बासीं (भास्करकवि) **श्रीभागवत वाखाणुं** (व्याख्यातुम्) **आदरीलें** : मग भटो बासातें भणीतलें : भटो आतां गीताव्याख्यान भणो : तव भटीं

भणीतलें : भानुभटो **तुं नको भणो : तुं भणतासि : तरि माझें अंतष्करण** आवघें चंद्रमए होए : तव कवीश्वर बासीं भणीतलें : तरि या **हरिकरविं** भणवुं : भटीं मानिलें : मग कवीश्वर बासीं वाकुलेया हरिभटातें भणितलें : हरी तुं आतां गीता **वाखाणीं :** मग वाकले हरी बासी गीता वाखाणिली : मग तेहि **विद्वांसविशेष** होते : परि **तयाचा शब्द रसवृत्ती तोकडी :** आईकावेया तैसें गुरुकुल न बैसे :

वरील उतार्‍यांत व्याख्यान चांगलें झालें म्हणजे त्याचें वर्णन करण्यास कोणते शब्द योजीत असत व तसेंच व्याख्यान चांगलें नसेल तर कसें वर्णीत याचें स्वरूप पाहावयास सांपडेल.

पांचवें दृश्य.

पुढील अवतरण नागदेवाचार्यचरितापैकींच आहे. एकदां मोठा दुष्काळ पडला असतां, भिक्षा मिळणें कठीण झालें. त्यावेळीं नागदेवाचार्यांनीं आपल्या जवळचा 'म्हातारदाम' खर्च करून एकवेळची भिक्षा आपल्या पैशांनीं चालविली.

" एक वेळ देशीं दुर्भिक्ष पडिलें : भिक्षुकांसि भीक्षा नाहीं : भिक्षुकें भिक्षे जाती : झोळीए दोन चार **कोरके** (कोरडे तुकडे) एति : भटो बास भीक्षा थोडी देखतिल म्हणौनि भिक्षुकें **झोळीए तळीं चींधीया घालीति : वरि भीक्षा ठेविती :** मग भटो बास झोळीया दृष्टिपूता करिती : आणि गंगे भोजन करावेया जाति : ऐसा एक दीसः भटीं एकाचीए झोळीए तळीं हात घालौनि भीक्षा उचलिली : तवं हळुं (लघु) लागली : काइ पां : हळु (जड नाहीं : लघु) झोळी कां : भणौनि भीतरि अन्न **ऐसें केलें** (खालीवर केलें) : तवं तळीं चिंधिया देखिलिया : मग उगेचि ऐसें राहिले : दुर्भिक्ष पडिलें असे ऐसें कळलें : मग : विळचा निद्रास्थानीं आवघे बैसले होते : आन भटो बास आपुला स्थानाहुनि उठिले : उभेया ठाकौनि हात जोडुनि प्रार्थिलें : तुम्ही **आवघीं चक्रधराचिया धुरा असा** (तुमच्यावर या पंथाची जबाबदारी आहे) तरि मी मागैन तें देयावें : ऐसें भणीतलें : आवघेया दंडवत घातलें : तवं आवघे गजबजौनि उभे ठाकले : आवघां भणीतलें : मज **म्हातारदाम** आला असे : तो वीनयोगावा : **आजिलागौनि** मासि एकी भीक्षा घेयावी : मग अवघां मानिलें : मग भटो बास **रांधन करविति** : भिक्षुकें **भिक्षानेमु सारिति** : मग भटाची एक भीक्षा घेति : **एक पोळी : वरण : कढीभातु :** कांहीं **पत्रशाक** : ऐसी आपुलाली भीक्षा घेउनि गंगे जेवावया जाति : यापरि भटो बासाचें द्रव्य उपयोगा गेलें : तंव सुकाळु आला : मग नेघति ॥

या उतार्‍यांतील 'म्हातारदाम'- म्हातारपणासाठीं जमविलेला पैसा-हा शब्द पुनश्च वापरण्यांत आणण्यासारखा आहे.

सारांश, आतांपर्यंत वर्णिलेलीं पांच दृश्यें पाहिलीं व त्यांचें वर्णन ज्या शब्दांनीं केलेलें आहे ते शब्द पाहिले, म्हणजे मराठी भाषेच्या दृष्टीनें एवढेंच नव्हे तर त्यावेळचा समाज कसा होता हें समजण्यास सुद्धां या वाङ्मयाचा उपयोग आहे.

ज्ञानेश्वरींतील उपमांवरून कांहीं सामाजिक गोष्टींचा बोध होतो खरा, पण त्याहूनही जास्त विस्तारानें समाजाची परिस्थिति कळण्यास या ग्रंथाचें वाचन होणें जरूर आहे.

---

४ मंडळांतील चंद्रप्रभ जिनमूर्ति*

(श्री. ग. ह. खरे)

प्रास्ताविक—मंडळामध्यें ह्या मूर्तीचा दगड अनेक वर्षे आहे. पण त्याकडे येथील कोणा संशोधकाचें किंवा माझेंही लक्ष गेलें नव्हतें. मी एकदां या मूर्ती-खालीं असलेला लेख ठसा घेऊन वाचण्याचा प्रयत्न केला. पण यश न आल्यामुळें मी त्याकडे लक्ष दिलें नाहीं. त्यानंतर कांहीं महिन्यापूर्वी मि. व्ही. ए. स्मिथ यांचें जैन स्तूप अँड अदर अँटिक्विटीज अॅट मथुरा हें पुस्तक चाळीत असतां त्यांत ज्यांच्या बाजूंना मासे खोदले आहेत अशा कांहीं मूर्ती चित्रित केलेल्या आढळल्या. त्या मूर्ती कोणत्या तीर्थंकराच्या हें त्यांना सांगतां आलें नाहीं व मलाही उमगत नाहीं. पण त्या चित्रांवरून माझें या दगडावरील मूर्तीकडे पुन्हां एकदां लक्ष गेलें व बऱ्याच निरीक्षणानंतर ती मूर्ती चंद्रप्रभ या जैन तीर्थंकराची आहे असें ठरवितां आलें. कसें तें प्रथम मूर्तीचें वर्णन करून नंतर दाखवितों.

वर्णन–ज्या दगडावर ही मूर्ती खोदली आहे त्याची लांबी, रुंदी, जाडी अनुक्रमें ४॥′, १′–३॥″, १०॥″ असून त्याच्या वरच्या भागांत पुढील बाजूस ही मूर्ती खोदली आहे ही ज्या चौकोनांत खोदली आहे त्याची लांबी, रुंदी १३″, ९॥″ आहे. ही मूर्ती बैठी व ध्यानमुद्रेची असून तिच्या आसनावर तिचें लांछन खोदलें आहे. या मूर्तीच्या डोक्यावर छत्र कोरलें असून दोन बाजूंस एक एक मासा दाखविला आहे. या मूर्तीच्या खालच्या अंगास दुसऱ्या दालनांत समोरा समोर तोंडें करून बसलेले दोन भक्त असून त्यांमध्यें निरांजनासारखी एक वस्तू आहे. त्यावर हे दोघे भक्त पूजाद्रव्यें ठेवीत आहेत असा देखावा आहे. दुसऱ्या दालना-खालीं लेख सुरू होतो. पण त्याच्या आरंभीं उजवीकडे तोंड करून बसलेल्या दोन स्त्रिया असून त्या कोणास तरी (अर्थात् या जिनमूर्तीस) नमन करीत असल्याचें दाखविलें आहे. या मूर्तीच्या पुढें लेख खोदला असून त्याच्या ओळी एकंदर १६ आहेत. लेख नागरी लीपींत असल्याचें जरी स्पष्ट आहे तरी घाण झाल्यामुळें वाचण्याच्या स्थितींत नाहीं. दगडाच्या उजव्या अंगच्या बाजूसही आरंभीं एका १०॥″, ६॥″ लांबीरुंदीच्या चौकोनांत मोठ्या पोटाची

---

* पा. स. ९।१८५५

बैठी मूर्ति आहे. या मूर्तीनें आसनमांडी तरी घातली असावी किंवा उजव्या पायाची मांडी घालून डावा पाय खालीं सोडलेला म्हणजे 'ललितासन' घातलें असावें. या मूर्तीच्या हातांत कांहीं वस्तू आहेत; पण त्या ओळखूं येत नाहींत. या मूर्तीच्या खालीं कानडी लेख कोरल्याच्या स्पष्ट खुणा आहेत. पण लेख नागरी लेखापेक्षांही जास्त अस्पष्ट आहे. ही मूर्ति पुरुषाची आहे हें मोठें पोट व साधी छाती यावरून स्पष्ट होत आहे. उजव्या अंगच्या बाजूप्रमाणें डाव्या अंगच्या बाजूवरही आरंभीं १०", ७" लांबीरुंदीच्या चौकोनांत एक डाव्या पायाची मांडी घातलेली व उजवा पाय खालीं सोडलेली मूर्ती असून तिच्या उजव्या हातांत कांहीं अनोळखी वस्तू आहे. या मूर्तीच्या मांडीखालीं तिचें वाहन असून उजव्या पायापाशीं नमन करीत व मूर्तीच्या तोंडाकडे पहात असलेला भक्त खोदला आहे. या मूर्तीच्या डोक्याच्या दोन्ही अंगास उडत्या व डोक्यावर नागफणा असलेल्या अप्सरा आहेत. मूर्तीच्या खालीं कानडी लेख असावा पण तो सर्वांत अस्पष्ट आहे. ही मूर्ती स्त्रीची आहे असे उन्नत उरोभाग व कृश पोट यांवरून म्हणतां येतें.

निश्चय—आतां ह्या दगडावर खोदलेली मुख्य मूर्ति चंद्रप्रभ जिनाची कशी आहे हें दाखवितों. या दगडावरचीं सर्व चित्रें पाहिलीं असतां प्रथम एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, ही मूर्ति बौद्ध नसून जैन आहे. कारण बाजूस मासे, मुख्य मूर्तीस लांछन, दोन्ही अंगास दोन देवता, त्या देवतांना पुन्हां वाहनें, तसेंच निरांजनसदृश वस्तू इतक्या सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून बौद्ध मूर्तीच्या बाबतीत माझ्या माहितीप्रमाणे आढळणार नाहींत. उलट जैनांमध्यें स्वस्तिक, दर्पण, कलश, भद्रासन, मत्स्यद्वय, पुष्पमाला, पुस्तक, या वस्तू शुभचिन्हें[1] समजत असल्याकारणानें जिनमूर्तीबरोबर यांपैकीं एक किंवा अधिक वस्तू काढतात. उदाहरणार्थ, वर उल्लेखिलेल्या पुस्तकापैकीं ७ व्या प्रतिमापत्रांत वरच्या अंगास मत्स्यद्वय आहे. ९ व्या प्रतिमापत्रांत जिनमूर्तीच्या वरच्या अंगास स्वस्तिक व खालच्या अंगास मत्स्यद्वय आहे. ११ व्या प्रतिमापत्रांत खालच्या अंगास एका बाजूस स्वस्तिक व दुसऱ्या बाजूस भद्रासन आहे. १३ व्या प्रतिमापत्रांत खालीं मासा आहे. मुख्य जिनमूर्ति मात्र नाहींशी झाली आहे. शिवाय ७, ९, ११ या पत्रांत जिनमूर्तीच्या कानांपाशीं मत्स्य आहेत. प्रस्तुत वर्ण्यमूर्तीच्या डोक्याच्या दोन्ही अंगास मत्स्य दाखविले असून

१ ही शुभ चिन्हांची यादी मी जैन स्तूप अँड अदर अँटिक्विटीज़ ऑफ मथुरा पृ. १६ च्या टीपेवरून घेतली आहे. श्री. जैनी यांनीं हीं चिन्हें छत्र, चामर, ध्वज, स्वस्तिक, दर्पण, कलश, वर्धमानक, भद्रासन अशीं दिलीं आहेत (Outlines of Jainism by Jaini p. 130).

खालच्या दुसऱ्या दालनांत दोन भक्तांमध्यें निरांजनासारखी वस्तू आहे. हिलाच 'भद्रासन' हें नांव आहे असें त्याच्या वर्णनावरून म्हणतां येतें.[१]

जैनांमध्यें चोवीस तीर्थकरांना फार महत्त्व आहे. त्यांपैकीं प्रत्येकाला दोन शासनदेवता म्हणजे रक्षण करणाऱ्या देवता असतात. पैकीं एक पुरुष व एक स्त्री असून त्यांना अनुक्रमें यक्ष व यक्षी असें म्हणतात. येथें मुख्य मूर्तीच्या दोन्ही अंगास ज्या दोन पुरुष व स्त्रीमूर्ती आहेत त्या मधल्या जिनमूर्तीच्या यक्ष व यक्षी असाव्यात. प्राचीन जिनमूर्तीच्या दोन्ही अंगास जरी अशा यक्षयक्षी काढलेल्या दिसत नाहींत तरी मध्ययुगांत सामान्यतः जिन-मूर्तीबरोबर त्याच्या शासनदेवता किंवा यक्षयक्षी काढीत असें वाटतें. एवंच ही मूर्ति जैन आहे असें मानण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

असें असलें तरी ही कोणत्या तीर्थकराची प्रतिमा हें सांगणें मात्र सोपें नाहीं. कारण तिन्ही मूर्ति अस्पष्ट व छिन्नभिन्न झालेल्या आहेत. तरीही यक्षीचें वाहन व जिनमूर्तीचें लांछन यांवरून वरील प्रश्नाचा निर्णय करतां येतो तो असा—

यक्षींना व यक्षांना निरनिराळीं वाहनें सांगितलेलीं असतात.पैकीं यक्षींचीं वाहनें अशीं—घोडा, नर, लोह, गाय, गरुड, कमल, सिंह, घोरपड, मांजर, बकरा, कोंबडा, म्हैस, मोर, वराह, हंस, हत्ती, बैल. यांपैकीं कोणत्या प्राण्याचें यक्षीच्या वाहनाशीं साम्य आहे याचा विचार केला तर वाहनाचें डोकें, शेपटीं व पाय यांचें रूप ध्यानांत घेतां घोरपड किंवा सिंह यांच्यापेक्षांही मांजराशीं त्याचें फार जवळचें साम्य आहे असें म्हणावें लागतें. मांजर हें वाहन ज्वाला या नांवाच्या यक्षीचें असून[२] ती दिगंबरमतें चंद्रप्रभ नांवाच्या ८ व्या तीर्थकराची शासनदेवता सांगितली आहे. चंद्रप्रभाचें लांछन चंद्र हें असून तेंच प्रस्तुत जिनमूर्तीच्या खालीं दिसत आहे. विशेषतः बैल, हत्ती, घोडा, वानर. हंस, पारवा, कमल, स्वस्तिक, नागफणा, चंद्र, सुसर, खेकडा, श्रीवत्स, धर्मचक्र, गेंडा किंवा पाणघोडा, रेडा, डुक्कर, ससाणा, अस्वल, वज्र, हरीण, बकरा, कासव, कुंभ, शंख, सर्प, सिंह, यांपैकीं कोणत्या लांछनाची आकृति प्रस्तुत मूर्तीच्या लांछनाशीं जुळते असें विचारल्यास चंद्र असेंच उत्तर द्यावें लागेल. तात्पर्य, यक्षीचें वाहन व जिनमूर्तीचें लांछन या दोहीं-वरून ही मूर्ति चंद्रप्रभाची आहे हें स्पष्ट होत आहे. श्वेतांबरपंथी चंद्रप्रभाच्या यक्षीचें नांव भृकुटी असें देतात व तिचें वर्णनही निराळें आहे. तेव्हां ही मूर्ती

१ भद्रासन = Caneseat shaped like an hour glass. (Jain stupa and other antiquities of Mathura p. 16)

२ मार्जारवाहना नित्यं ज्वालोद्भासिकरद्वया ।
शशांकधवला ज्वाला देवी भद्रं ददातु नः ॥ आचार दिनकर—

दिगंबरपंथीयांची आहे हें उघड आहे.[1] प्रस्तुतच्या मूर्तीबरोबर असलेला यक्ष फारच छिन्नभिन्न झाल्यामुळें त्याविषयीं जास्त विचार करण्यास जागा नाहीं.

काल— ही मूर्ति जैन आहे असें ठरल्यावर तिचा काल कोणता हा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो. यक्ष व यक्षी, तसेंच लांछन यांवरून ही मूर्ति मध्ययुगीन आहे असें म्हणतां येतें. आणि नागरी शिलालेखांतील जीं चार दोन अक्षरें स्पष्ट दिसतात त्यांवरून ही मूर्ति श. ९०० ते १००० च्या दरम्यानची असावी असें वाटतें.

प्रदेश—या मूर्तीचा दगड कऱ्हाडजवळच्या एका खेड्यांतून कै. राजवाडे व श्री. पां. कें शिराळकर यांनीं आणला आहे. कांहीं दिवसांपूर्वी मी स्वतः कऱ्हाड येथें गेलों असतां माझ्या पाहण्यांत जैन तीर्थंकराची मूर्ती खोदलेला दगड आला आहे. यावरून असें वाटतें कीं, कऱ्हाड येथें ज्याप्रमाणें बौद्ध व वैदिक अवशेष सांपडतात त्याप्रमाणें जैन अवशेषही सांपडावे. मात्र बारकाईनें शोध घेतला पाहिजे.

---

५ विप्रनारायणकृत ओवीबद्ध अश्वमेध

(प्रो. द. वा. पोतदार)

वरील नांवाचा एक हस्तलिखित ग्रंथ कुडाळ प्रांतांतील आपले एक शोधक सभासद रा. अ. ब. वालावलकर यांनीं मजकडे दिला. तो त्यांचे संमतीनें मी आज मंडळसंग्रहांत ठेवीत आहे.

विप्रनारायणाचा अश्वमेध हा अद्यापि प्रसिद्ध झालेला अर्थात् नाहीं. परंतु उपलब्ध झालेला आहे. कै. चांदोरकर–कविकाव्यसूचींत एकंदर आठ अश्वमेध सांपडतात त्यांत नारायणकृत अश्वमेध आढळतो. नारायण व विप्रनारायण हे एकच.

चां. सू. त एका नारायणाचे गुरु विश्वनाथ देऊन ‘अश्वमेधाख्यान’ त्यांचे नांवावर टाकलें आहे. हे विश्वनाथ विश्वनाथ विप्र असावे (चां. सू. पृ. १३०), दुसरे एक नारायण (तपस्वी नारायण विप्र) चां. सू. त पृ. १३२ वर नोंदले आहेत त्यांचे गुरु निरंजन. अश्वमेधाख्यान कर्ते नारायणमुनी ते हेच नारायण होत असें

१ रूपावतार या नांवाच्या एका हस्तलिखित व अशुद्ध ग्रंथांत भृकुटी या यक्षीचें व विजय या उभयसामान्य यक्षाचें वर्णन दिलें आहे तें असें–

भृकुटी पीतवर्णा स्यात्सिंहारूढा चतुर्भुजा । खड्गस्तथा मुद्गरं परशुःखेटकं क्रमात् ॥ चंद्रप्रभस्य **विजयस्त्रिनेत्रो** हंसवाहनः । द्विभुजो नीलवर्णः स्याच्चक्रं च मुद्गरं क्रमात् ॥

के. चांदोरकर म्हणतात. या सर्व उल्लेखांवरून एकाच विप्राख्यक नारायणावरून हा सर्व घोटाळा झालेला दिसतो. तसेंच राजवाडे यांनीं सरस्वती मंदिरांत एका नारायणाचा उल्लेख केला आहे. तो तापीतीरीं ताळेग्रामीं राहात असे अशी माहिती नोंदली आहे.

आतां आज जें अश्वमेधपर्व आपल्यापुढें येत आहे त्याचा कर्ता आपलें नांव दर अध्यायाचे शेवटीं घालतो. त्यांतील **शेवटचा** उल्लेख सर्वांत मोठा व उपयोगी असल्यामुळें तोच प्रथम देतों:—

हा जयमुनिचा वाग्विलास । जन्मेजया वैसंपायन संवाद सुरस । पातकें घरा पावती होति त्रास । तरुनिर्मुक्त जालि वसुंधरा ॥ ९० ॥

या उल्लेखावरून खानदेशांत, तापीदक्षिणतीरीं **हाताळें** क्षेत्रांत हत्याहरण सरोवरीं हा ग्रंथ पूर्ण झाला. या क्षेत्रीं फार दिवसांपूर्वीपासून आपले पूर्वज राहात होते असें कवि म्हणतो. आपले पणते **दादाजि नागनाथ**–हे प्रसिद्ध पुण्यश्लोक गृहस्थ होते–रहात. त्यांचे पुत्र गोपजी दामोदर आणि त्यांचे हे नारायण. हे यजुर्वेदी, माध्यंदिन, गोत्र वसिष्ठ. ग्रंथसमाप्तीचा काल ' शार्वरीनाम संवत्सर । दक्षणायन वर्षऋतु पवित्र । भाद्रपद शुद्ध शष्टी गुरुवार । रोहिणीसी ग्रंथ संपला ॥४॥ ......ग्रंथसंख्या ६४१२ '

असो. यावरून शक नक्की करावयाचा. तो १५८२; १६४२; १७०२; १७६२, येतो.

कवीची रचना प्रासादिक व सरळ आहे. आणि जरी त्याची गणना प्रथम वर्गांत करतां येत नाहीं तरी दुसऱ्या वर्गांत तो सहज पडेल.

'**मंहप**' शब्दाचा उल्लेख शेंकडों स्थळीं आला आहे त्यावरून कवी गोमांतकाकडला असावा असें वाटलें तरी त्यानें आपलें गांव वर दिलें आहे तेंच कायम समजावें.

आपण जयमुनिच्या मूळ संस्कृत ग्रंथाचा महाराष्ट्रीय अनुवाद करण्याचें ठरविल्यामुळें मुळाला कोठें धक्का लाविला नाहीं असें विप्रनारायण वारंवार म्हणतो. थोड्या उपमा स्वतःच्या घातल्या किंवा क्वचित मुळांत 'भोजन केलें' असें लिहिलें असलें तर आपण थोडें चटण्याकोशिंबिरीचें वर्णन पदरचें केलें एवढेंच तिखटमीठ आपण लाविलें तर क्षमा करावी असें तो श्रोत्यांस विनवितो. अध्याय ५४ च्या अखेरीस भोजनविधि वर्णिला आहे (९९ ते १०८).

नाना अमृत फळांच्या सिखरिणी ।
नाना अमृतफळें ठेविली भोजनीं ॥
प्रथुक प्रथुक सांगावें जरी वचनीं ।
(पृथक् पृथक्) जयमुनि वदला नाहीं ॥ ५ ॥

ग्रंथा असे भोजन मात्र । तोची आधार धरुनि आधारा । ग्रंथ बोलति कवेश्वर। युक्तीचातुर्य वैभवें ॥ ६ ॥ ज्या पंक्तीस श्री मुकुंद् । तेथें वोळला सकळहि श्वाद् ॥ मी काए् वर्णीतों मतीमंद् ॥ गुळासी गोड म्हणतो ॥ ७ ॥

यावरून ज्या कवेश्वरांनीं आपापल्या अश्वमेधांतून भोजनाचीं चमचमीत वर्णनें केलीं आहेत त्यांनीं मुळांत आधार नसतांना लिहिलें आहे अशीहि थोडी तक्रार. आपण तसें कां केलें नाहीं, आधार नाहीं म्हणून; सामर्थ्य नाहीं म्हणून नव्हे,' अशा दोन्ही सूचना नाजूकपणें दिल्या आहेत.

अध्याय ५१ चे अखेरीस ग्रंथाची सुरसता वर्णिली आहे.

आपली कविता प्राकृत म्हणून तिचा अव्हेर करूं नये, तसे केल्यास आपणांस धक्का लागेल असा कवीनें आपला अभिप्राय कळवळ्यानें कवीनें प्रगट केला आहे.

अध्याय ४९ चे अखेरीचे त्याचे उद्गार पहाः—

ग्रंथांत कांहीं ठिकाणीं अध्याय अगदीं लहान आहेत. उदाहरणार्थ अध्याय १४ यांत केवळ ११ च ओव्या आहेत. अध्याय ४७ त ६३ आणि ३१ त ३७ एवढ्याच ओव्या आहेत !

युद्धाचीं वर्णनें जागजागीं आहेत. क्वचित् भोजनाचीं, प्रसादाचीं वगैरे आहेत. सूर्यानें युवनाश्वाच्या प्रसादाची ' पोळी ' तोडली ही कथा सांगतांना जे शब्द वापरले आहेत किंवा हाटवटें चौबारा शहरांत असल्याचीं जीं वर्णनें आढळतात त्यावरून कवी साधारणपणें शिवकालीन किंवा जरा पूर्वकालीन देखील असावा असें वाटतें. ग्रंथाचे अखेरीस जो कालनिर्देश आहे त्यावरून काल ठरवितां येईल.

इतर प्राकृत अश्वमेध, मूळ जयमुनीचा ग्रंथ वगैरे पाहून आणखी एकदां तुलनात्मक दृष्टीनें या ग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे.

विप्रनारायणानें एकदोन स्थळीं लिहिलेल्या कथेचे आधार देतांना मत्स्यपुराण, लिंगपुराण वगैरेंचा उल्लेख केला आहे. तो लक्ष्यांत घेण्यासारखा आहे.

सोलापूर येथील मंडळाच्या कार्याचा प्रचार

आपल्या ह्या भा. इ. सं. मंडळास गेल्या आषाढांत २३ वें वर्ष संपून २४ वें वर्ष लागलें. आषाढ शु॥ १ हा मंडळाचा वाढदिवस. ह्या दिवशीं प्रतिवर्षाप्रमाणें मंडळाच्या सभागृहांत मंडळवाढदिवससमारंभ साजरा झाला व त्याचवेळीं सुरत येथील **शेट हरगोविंददास पारेख** ह्यांनीं जमविलेल्या जुन्यानव्या कापडांच्या नमुन्यांचें प्रदर्शन भरविलें होतें. ह्या कापडाच्या प्रदर्शनांत तूलनार्थ म्हणून नव्या पण केवळ हातकामाच्या कापडाचे बरेच नमुने मांडले होते. सदर प्रदर्शनाची

हकीकत स्वतंत्रपणें पुढें दिलीच आहे. हें प्रदर्शन आटोपल्यावर असेंच एक प्रदर्शन, मंडळांतील चित्रें, पत्रें, वस्त्रें, हत्यारें, पोथ्या इत्यादि प्रेक्षणीय व उद्बोधक वस्तूंची जोड देऊन, अन्य एकाद्या शहरीं भरविल्यास तें फायद्याचें होईल अशी शेटजींची कल्पना. ही कल्पना मागें म्हणजे श.१८४८ मध्यें **अहमदनगर** येथें श्री. **शंकरराव जोशी** यांनीं मूर्तस्वरूपांत–त्या वेळीं हरगोविंददास यांच्या कापडसंग्रहाची जोड नव्हती–आणिली होती व तेव्हां बरी प्राप्ती (सुमारें दोनशें रुपये) होऊन मंडळाच्या कार्याची प्रत्यक्ष माहिती तेथील जनतेस होणें, हा जो मुख्य फायदा तोहि प्रदर्शन पाहतांना व प्रदर्शनाच्या अनुषंगानें स्वातंत्र्यानें जीं दहाबारा व्याख्यानें श्री. जोशी यांनीं दिलीं त्यायोगें झाला. ह्या अहमदनगर येथील प्रदर्शनसमारंभाची हकीकत इतरत्र म्हणजे केसरी, ज्ञानप्रकाश इत्यादि नियतकालिकांत तेव्हांच प्रसिद्ध झाली आहे. सारांश, नगरप्रमाणें दोन्ही दृष्टींनीं असें प्रदर्शन भरविणें उपयोगाचें होईल हें जाणून अर्थातच शेटजींच्या कल्पनेप्रमाणें सोलापूर येथें प्रदर्शन भरविण्याचें योजिलें व त्यासाठीं श्री. शंकरराव जोशी त्यांनीं तेथें जाऊन शेटजींच्या साहाय्यानें प्रदर्शन भरविलें आणि त्या प्रसंगानें मंडळाच्या कार्याचा प्रसार केला. त्याची स्वतंत्रपणें नोंद करणें इष्ट म्हणून तें वृत्त थोडक्यांत येथें दिलें आहे.

सोलापूर हें महाराष्ट्रांतील एक मोठें शहर म्हणून, ऐतिहासिक व वर्तमान-कालांतहि चांगलें प्रसिद्ध आहे. सध्यां तर तेथें कापडाच्या पांचसहा गिरण्या असून हातमागावर काम करणारा विणकरवर्गही बराच मोठा आहे. त्यामुळें श्री. हर-गोविंददास यांनीं जे केवळ दोन हजार कापडाचे प्रकार संग्रहीत केलेले आहेत, त्यांसह हें प्रदर्शन सोलापूर येथें भरविण्याचें केलें. सोलापुरांत मिळण्याजोगी, मोफत, ८।१० दिवसांच्या मुदतीची, स्वतंत्र, मध्यवर्ति, पुरेशी, सोयीची आणि बंदोब-स्ताची अशी जागा चौपाडांतील म्यु. मुलींची शाळा नं. १ ही पसंत केली आणि ती जागा हें प्रदर्शन म्हणजे शिक्षणाचाच एक उपयुक्त भाग म्हणून म्यु. स्कूल कमेटीचे चेअरमन मे. अबदुल करीमसाहेब ऊर्फ बाबालाल वकील यांनीं देण्याचें कबूल केलें. प्रदर्शन सोलापूर म्यु. पा. चे अध्यक्ष श्री. **बाबूराव नरसप्पा जक्कल** ह्यांचे हस्तें खुलें केलें गेलें. प्रदर्शनाची म्ह० शाळेची जागा चार दालनांची होती. त्यांतील तीन दालनांत डाका, मच्छलीपट्टण वगैरे ठिकठिकाणचे निरनिराळे कापडाचे नमुने मांडले होते, व कडेच्या एका दालनांत मंडळाच्या संग्रहांतील तसबिरी, हस्ताक्षरें, सनदा, फर्मानें, ताम्रपट, लढाऊ पोषाख, पोथ्या इ. इ. ऐतिहासिक वस्तू मांडल्या होत्या. ह्या वस्तू मांडण्यास बाकें, टेबलें, फळे, शोकेसेस इत्यादि साधन-सामग्री म्यु. शाळाधिकारी श्री. भाऊराव गोपाळ खराडकर, ह. भा. दे. हायस्कूलचे सुपरिंटेंडन्ट श्री. गो. प. पटवर्धन, नार्थकोट हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. बी. बी. कामतसाहेब ह्यांजकडून त्यांच्या सौजन्यामुळें मिळाली. तसेंच श्री. गो. रं. अया-

चीत् वॉचमेकर, फिरते वाचनालयाचे व्यवस्थापक श्री. टिकेकर ह्यांनींहि मंडळाचें कार्य जाणून थोडीशी अडचण सोसूनहि आपल्या जवळील लहान मोठीं कांचेचीं टेबलें दिलीं. अशा प्रकारें प्रदर्शनाची आटोपशीर व व्यवस्थित मांडणी झाली.

प्रदर्शन सुरू करण्याचा समारंभ ता. १२।६ रोजीं छोटाच पण चांगला झाला. प्रदर्शनाच्या जागीं पडवीला लागून मोठें पटांगण होतें. तेथें व पडवींत खुर्च्या, बाकें ठेविलीं होतीं. समारंभास कलेक्टर आय. एच. टांटन, जुन्या गिरणीचे मॅनेजर श्री. वैकुंठलाल, पेन्शनर जज्ज श्री. केमभावी, श्री. लळीत वकील, सेवासदन सुपरिं. श्रीमती ढगे, ह. भा. द. हायस्कूलचे सुपरिं. प्रो. पटवर्धन, श्री. पुंडे वकील, श्री. कुलकर्णी, डॉ. आपटे, श्री. नवरे मास्तर–नार्थ. हाय.; श्री. कौलगीकर वकील, श्री. लिगाडे, श्री. शिवबाळअप्पा देशमुख, श्री. सोमण, श्रीमती जोशी–अध्यापक सेवासदन, श्री. द. प्र. भावे मास्तर, श्री. केळकर व देशपांडे अध्यापक–ह. हाय, मिशन स्कूल सुपरिं. मि. फौलर, मि. हेझन, श्री. म्हसकर इ. इ. नागरिक मंडळी उपस्थित होती. प्रथम मंडळाचे तहाहयात सभासद प्रो. **गो. प. पटवर्धन** यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. ते म्हणाले— आजचा समारंभ तीन दृष्टींनीं अपूर्व आहे. सोलापुरसारख्या इतिहासप्रसिद्ध शहरांत आजवर कधींच न भरलेलें ऐतिहासिक प्रदर्शन येथें भरत आहे. विशेषतः गेलीं तेवीस वर्षें ज्या **भारत इतिहास संशोधक मंडळानें** हें इतिहासकार्य केलें आहे त्या मंडळातर्फे सदर प्रदर्शन भरत आहे, एवढें म्हटलें म्हणजे प्रदर्शनाचें महत्त्व वेगळें सांगण्याचें कारण नाहीं. ह्या मंडळांत केवळ शास्त्रशुद्ध दृष्टि स्वीकारून हें संशोधनकार्य केलें जातें. महाराष्ट्रांत किंबहुना हिंदुस्थानांत हें काम करणारी व लोकाश्रयानें चालणारी हीच एक प्रमुख संस्था आहे. संस्थेतील कार्यकर्ते अत्यंत कष्ट करणारे असून स्वार्थत्यागी आहेत. मंडळानें आजवर अनेक ऐ० घराणीं उजेडांत आणून त्यांचे कागदपत्र प्रसिद्ध केले आहेत. इतिहासाचा अनेक अंगांनीं ह्यांत विचार केला जातो हें प्रत्यक्ष प्रदर्शन पाहिल्यानें आपल्या सहज ध्यानांत येणार आहे. ह्या अशा लोकोपयोगी व महत्त्वाच्या कार्यास मि. ॲबट ह्यांनीं जी मोठी देणगी दिली तिचाही उल्लेख येथें केला पाहिजे. ह्या देणगीमुळें मंडळाची आर्थिक स्थिति सुधारली म्हणजे मं.च्या कर्जाचें निवारण झालें! ह्या देणगीचा अर्थ एवढाच कीं, मंडळाच्या कार्याचें महत्त्व परराष्ट्रांतील मंडळींनेंहि जाणिलें आहे. पण खेदाची गोष्ट कीं, आपणच आपल्या ह्या कार्याकडे जरा दुर्लक्ष केलें आहे. तथापि आतां हें दुर्दिन संपतील अशी मी आशा करतों आणि ह्या मंडळास आपण सर्वजण सहानुभूतीनें साहाय्य कराल अशी खात्री बाळगतों. याप्रमाणें प्रो. पटवर्धन यांनीं भाषण केल्यावर त्यांनीं श्री. बाबूराव जक्कल यांना समारंभाचे अध्यक्ष होण्याबद्दल सूचना केली. त्या सूचनेस डॉ. आपटे यानीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. नंतर श्री. **शंकरराव जोशी** यांचें भाषण झालें. ते म्हणाले—

प्रथम मला आजचे अध्यक्ष, मे. अबदुल करीमसाहेब, श्री. खरडाकर, भावे मास्तर व इतर सर्व विद्याप्रेमी सज्जनांची जी मदत झाली व होणार आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें अगत्याचें आहे. ह्यांचें साहाय्य न मिळतें तर आजचा समारंभच न होता. हें प्रदर्शन व प्रदर्शनाचे मालक जें पुण्याचें मंडळ त्याची साग्र माहिती सांगणें प्रस्तुत अशक्य आहे. मंडळ गेलीं २२।२३ वर्षें हें आपल्या सर्वांच्या पितृपूजेचें पवित्र कार्य करीत आहे. मंडळाविषयीं मुख्यतः सांगणें हें कीं त्यांत श्रेष्ठकनिष्ठ असा, अथवा कोणचाहि धर्मपंथ, किंवा जातीभेद इत्यादि कसल्याहि विकाराला थारा नाहीं. येसनाक महारापासून तों छत्रपती शिवाजी किंवा पंडित गागाभट्टांपर्यंत; तसेंच बाजीराव व निजाम, गिफर्ड, अथवा सामान्य मुसलमान चपराशापासून, दिल्लीच्या बादशाहापर्यंत सर्व एकाच भावनेनें हातांत हात घालून आपल्याशीं बोलण्यास व आपले गुणदोष सांगण्यास सिद्ध आहेत. असें हें निर्मळ म्ह० केवळ इतिहास–ज्ञान–साधन–संवर्धनाचें काम चालूं आहे हें मी मुद्दाम सांगतों. प्रदर्शन भरविण्याचा हेतु एवढाच, कीं असल्या ऐतिहासिक संपत्तीची हेळसांड आपल्या हातून फार झाली यापुढें तरी ती होऊं नये; व पूर्वजांची कीर्ति वाढवितां न आली तरी निदान कायम व जागृत तरी ठेवावी; असल्या ऐतिहासिक वस्तु ज्यांच्यापाशीं आहेत त्यांनीं त्या जपून ठेवाव्या, मंडळांत याव्या व कागपत्र प्रसिद्ध होऊन त्यावरून इतिहासांत, त्यांचा अंतर्भाव व्हावा इत्यादि गोष्टीस चालना मिळावी. ऐतिहासिक पराक्रमी व थोर पूर्वजांच्या वस्तु, पत्रें, चित्रें, वस्त्रें, हत्यारें, दागिने, पोथ्या इ. परदेशांत आपल्या अज्ञानामुळें आणि अनास्थेमुळें किती तरी गेल्या व जात आहेत. हाहि धंदाच झाला आहे! अशी मोठी विपरीत स्थिति झाली आहे. तीस कांहीं आळा पडावा; राष्ट्रस्मृतीचा अखंड तंतू ज्या वस्तूमुळें टिकून आहे त्या ऐ. वस्तु आपल्या अजागळपणानें नाहींशा न व्हाव्या हें आपल्या ध्यानीं आणावें हें ह्या प्रदर्शनांतील एक कार्य आहे. हें संशोधनकार्य पुण्याचें मंडळ एकटें दुकटें किती करणार ! माझी विनंति कीं, गांवोगांवीं निदान प्रमुख शहरीं तरी अशा वस्तूंचें संग्रहालय पाहिजे. स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत ह्या गोष्टीचा अंतर्भाव होण्याजोगा आहे. कांहीं शहरांतून अशीं म्यूझियमस् आहेतहि. तसें एकादें संग्रहालय ह्या सोलापुरांतहि असावें. तेथें राळेरासकर कवि, सोलापूरकर रामजोशी कवि, देशमुख, देशपांडे इ. इ. अनेक ऐ. घराणयांतील वस्तु, पत्रें इत्यादींचा संग्रह व्हावा. पोथ्या, वस्त्रें, नक्षीदार जिन्नस, हत्यारें, शिलालेख वगैरे इतिहासालंकाराच्या वस्तु येथें सुरक्षितपणें ठेवून याव्यात. सोलापूर शहरचा खरा खरा अलंकार हें वस्तुसंग्रहालय व्हावें. आणि आजचे अध्यक्ष म्हणजे सोलापूर म्यु.चे तरुण व लोकप्रिय आणि सरकारमान्य अध्यक्ष यांचे हातून हें कार्य घडून यावें अशी अपेक्षा आहे. नव्या, तरुण पिढींतील अध्यक्षांनींच हें नवीन कार्य सुरूं करावें व यायोगें आपली कारकीर्द त्यांनीं स्मरणीय ठेवावी. मंडळास केवळ ज्ञानानंदामुळें आत्मीय लेखून

अमेरिकेचे मि. ॲबट यांनीं मोठी देणगी दिली. आणि ह्यामुळें मंडळाचें कर्ज निवारण झालें हें खरें; पण मंडळाचा चालू खर्च चालण्याची मारामारच आहे. तात्पर्य, त्याहि दृष्टीनें मंडळास आपलें साहाय्य पाहिजेच आहे. असो. प्रदर्शनांतील वस्तूंचें दर्शन म्हणजे ही राष्ट्रपितृभेट आहे. भेटींतील हकिकत आतां कशी सांगतां येइल ! प्रदर्शन पाहण्यास याल तेव्हां खुलाशानें व स्वातंत्र्यानें आपणांस ती समजून येईल.

यानंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. **जक्कल** यांचें भाषण झालें. " प्रदर्शनाचे मुख्य व्यवस्थापक श्री. शंकरराव जोशी व सभ्य स्त्री पुरुष नागरिक बंधूंनो, मी हें जें काम पत्करिलें तें व्यक्तिविषक नात्यानें नसून म्यु. पा. चा अध्यक्ष म्हणून मला श्री. जोशी यांनीं आग्रह केला व त्यास मीं रुकार दिला. वस्तुतः ह्या अधिकारास सोलापूर शहरीं माझ्यापेक्षां वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध अशी मंडळी बरीच आहेत आणि त्यांपैकीं कांहीं आजच्या सभेस हजरहि आहेत. श्री. जोशी आणि इतर मित्र व थोर मंडळी यांनीं मला हा जो मान दिला त्याबद्दल मी आभारी आहे. श्री. जोशी यांच्या भाषणांत त्यांनीं प्रदर्शनाबाबत आपल्या स्थानिक स्वराज्य–संस्थांस ज्या सूचना केल्या त्यावरून माझ्या हस्तेंच हें प्रदर्शन कां उघडिलें हें अधिक चांगलें लक्षांत येतें. म्यु. पा. च्या म्हणजे स्थानिक स्वराज्याच्या एका कर्तव्याची जाणीव देण्याचा श्री. जोशी यांचा उद्देश होता व आहे हें स्पष्ट दिसतें. इतिहास–संशोधनशास्त्रांत श्री. शंकरराव जोशी यांची तज्ज्ञता जशी आहे तशी त्यांस स्थानिक स्वराज्यशास्त्राची नसणें साहजिक आहे. स्था. स्व. चा कारभार हाहि एक क्लिष्ट व घोटाळ्याचा विषय आहे. एकादी चांगली व सर्वोपयुक्त गोष्ट हटकून म्यु. पा. त घडवून आणतां येईलच अशी खात्री देतां येत नाहीं. पण आज सुदैवानें म्यु. कौन्सिलर्सहि बरेच आले आहेत व त्यांची ह्या कार्याकडे सहानुभूतीची व जाणीवपूर्ण दृष्टी आहे आणि यामुळें मला श्री. जोशी यांस त्यांच्या कल्पनेला कांहीं मूर्तरूप देतां येईल असें आश्वासन देण्यास धीर वाटत आहे. तसेंच सरकारकडूनहि या कार्याच्या योजनेस पाठिंबा व सहकार्य मिळेल असें जिल्हाधिकाऱ्यांच्या सौजन्यामुळें व कर्तव्यदक्षतेमुळें वाटत आहे. ह्या कामीं प्रथमदर्शनीच एक सांगणें अगत्याचें वाटतें तें हें कीं, ऐ. वस्तु, कागद वगैरे जागोजागीं आहेत हें श्री. जोशी म्हणतात तें खरें आहे. पण त्यांतील माहितगारीच्या दृष्टीनें इतिहासमंडळासारख्या संस्थेनेंच आम्हांस मदत केली पाहिजे. आतां प्रदर्शनासंबंधानें विचार करतां आपणांस तें पाहून आनंद वाटेल हें खरें आहे. पण त्या वस्तु गोळा करणें किती कष्टाचें व दगदगीचें काम आहे हेंहि आपण ध्यानीं घेतलें पाहिजे. ज्या संस्थेमार्फत प्रस्तुतचें प्रदर्शन भरत आहे त्या संस्थेसंबंधानें आतां आपणांस प्रो. पटवर्धन व श्री. शंकरराव जोशी यांनीं माहिती दिलीच आहे. हें मंडळ पक्षातीत आहे व शास्त्रशुद्ध कार्य करीत आहे, हा ह्या मंड-

ळाचा विशेष आहे. त्याप्रमाणेंच केवळ राजकीय इतिहासाचेंच संशोधन ह्या मंडळांत चालतें असें नाहीं. तर सामाजिक, आर्थिक वाङ्मयासंबंधानेंहि म्हणजे इतिहासाच्या ज्या निरनिराळ्या शाखा त्यांचेंहि संशोधन ह्या मंडळाचे द्वारें आज वीसबावीस वर्षें चालू आहे. हा ह्या मंडळाचा दुसरा मुख्य विशेष आहे. असें आहे तथापि मंडळाचे कार्यास व्हावी तितकी मदत होत नाहीं असेंहि दिसून येतें आणि ती आपली उदासीनता घालविण्यासाठीं मंडळानें अशा फिरत्या प्रदर्शनाचा उपक्रम केला ही एक चांगली गोष्ट आहे. ऐतिहासिक भावना जागृत होण्यास ह्या असल्या प्रदर्शनांचा उपयोग निबंधलेखन किंवा व्याख्यानश्रवण यापेक्षां अधिक होईल हें उघड आहे. ऐ. वस्तू मुंबईच्या चोरबाजारांत मांडल्या जातात किंवा अन्य प्रकारें परदेशांत रवाना होतात ही तर अत्यंत दुःखाची व आपल्या नामुष्कीची गोष्ट आहे. असो. अशा अनेक प्रकारानें आपणांस ह्या प्रदर्शनाच्या निमित्तानें सावधता आणून दिली आहे. हें प्रदर्शन आपण सोलापूरकर उत्कृष्टपणें यशस्वी करून दाखवूं तरच पुण्याहून ह्या इतक्या महत्त्वाच्या ऐ. वस्तू येथें पाठविल्या गेल्याबद्दल मंडळास समाधान वाटेल. तरी सर्वांनीं हें प्रदर्शन पाहावें व इतर सर्व प्रकारें सहाय्य करावें एवढें सांगून व म्यु. पा. चे सभासद व इतर नागारिक आणि प्रदर्शनाचे चालक श्री. जोशी यांचे आभार मानून मी आपलें भाषण संपवितों."

त्यानंतर श्री. बाबूराव जक्कल यांस पुष्पहार घालण्यांत आला व त्यावेळीं श्री. जोशी यांनीं त्यांचे गुजराथी सहकारी सुरतचे श्री. हरगोविंददास यांचा उल्लेख केला आणि त्यांनीं गोळा केलेल्या एक हजार जुन्या नव्या कापडांची माहिती दिली. सदर कापडांचे नमुनेहि प्रदर्शनांत असल्याचें सांगितलें व शेवटीं श्री. ळलीत वकील यानीं अध्यक्ष, कलेक्टर, इतर सर्व स्त्रीपुरुष नागरिक यांचे समयोचित शब्दांत प्रदर्शनाचा गौरवपूर्वक उल्लेख करून आभार मानले व श्री. सोमण यांनीं राष्ट्रगीत म्हटल्यानंतर सर्वजण प्रदर्शन पाहण्यास गेले.

प्रदर्शन १० दिवस म्हणजे ता. २२।६।३३ पर्यंत सुरू होतें. त्यांत स्त्रियांकरितां, *विद्यार्थ्यांकरितां, व्यापारी व विणकर मंडळींसाठीं स्वतंत्र दिवस ठेविले होते.* तरीपण विणकरवर्ग ज्या मानानें सोलापुरास आहे त्यामानानें ती मंडळी फारच कमी आली. मुख्यतः बहुतेक सर्व विद्यार्थी व इतर पांढरपेशी वर्गांतील स्त्रीपुरुषांनीं हें प्रदर्शन पाहिलें. विणकरीमंडळीसाठीं त्यांना जवळ अशा जागीं किंवा व्यापारीपेठांपैकींच एकाद्या जागीं अथवा गिरणींतील मजूरदारमंडळींच्याकरितां त्यांस सोयीच्या अशा जागीं प्रदर्शन भरविण्याचाहि मानस होता. पण तशा सोयीच्या जागेचें जमलें नाहीं.

प्रदर्शनाबरोबर मंडळाच्या कार्याचा प्रचार श्री. **शंकरराव जोशी** यांच्या व्याख्यानांमुळें उल्लेखनीय असा झाला. मराठी शिक्षकमंडळी, म्यु. मुलांची शाळा

नं. १, नार्थकोट हायस्कूल, ह. भा. देवकरण हायस्कूल, मुलींची शाळा नं. १, सेवासदन, सरस्वतीमंदिर, जैन बोर्डिंग, मुलांची शाळा नं. २, मिशनरी स्कूल, चाटी अनाथविद्यार्थीगृह, केवळस्त्रियांकरितां-सरस्वतीमंदिर, जनरल लायब्ररी, रिपन हॉल इत्यादि ठिकाणीं मिळून जोशी यांचीं १८ व्याख्यानें झालीं. ह्यांपैकीं ६ व्याख्यानें प्रमुख अशीं म्हणतां येतील. व्याख्यानांचे विषय ग्रंट डफपासून आतांपर्यंत इतिहासांत झालेली कांहीं ठिकाणची दुरुस्ती व भर; शिवजन्मतिथि, मराठी भाषा, शिवाजी व चंद्रराव मोरे, शिवाजी व पन्हाळा प्रसंग, बाजीराव व निजाम, इतिहास–संशोधन, ऐतिहासिक शोध व बोध, महाराष्ट्राची संस्कृति, असे भिन्नभिन्न होते. व्याख्यानानंतर श्री. शंकरराव जोशी यांनीं सोलापूरकर मंडळींच्या भेटी घेतल्या व त्यांत मंडळाचे ३२ सद्गृहस्थ सभासद झाले. ग्रंथविक्रीहि बरी झाली. एकूण हजार बाराशें रु. चें रोख काम झालें. सभासद्यादी अन्यत्र दिली आहे.

येणेंप्रमाणें मंडळकार्याचा प्रचार सोलापूर येथें झाला. प्रदर्शनाच्या कामीं मंडळाचे सभासद श्री. स. ग. जोशी यांचें व इतर सर्व बाबतींत श्री. भावे मास्तर यांचें सहाय्य फारच झालें. त्याचप्रमाणें रा. सा. वि. ब. नाईक; श्री. रा. शं.राजवाडे, श्री. महाजन, जैन बोर्डिंगचे सुपरिं. श्री. दादा रानडे व श्री. गाडगीळ मंडळी, ‘ सोलापूर समाचार ’ व ‘ कल्पतरु ’ ह्या पत्रांचे संपादक, रा. सा. मडूरकर इ. इ. मंडळींच्या मदतीचा उल्लेख अवश्यमेव केला पाहिजे. ह्या मंडळींचें व सर्व सोलापूर नागरिकांचें अभिनंदन करणें कर्तव्य होय.

सोलापूर म्यु. पा. व डि. लो. बोर्ड ह्यांमार्फत ऐ. वस्तुसंग्रहालयासंबंधानें व ऐ. माहिती संपादन करण्याबद्दलहि श्री. शंकरराव यांनीं खटपट केली पण त्यासंबंधानें ह्यापेक्षां अधिक उल्लेख प्रस्तुत नको.

महाड येथेंहि श्री. **शंकरराव जोशी** श्रीगणेशोत्सवप्रसंगानें गेले होते. तेथें सार्वजनिक गणपती, कों. ए. सो. चे हायस्कूल व मराठी शाळा नं. १ येथें इतिहासविषयावर चार व्याख्यानें झालीं. ग्रंथविक्री व वर्गणी मिळून येथें रु. दोनशेंपर्यंत साहाय्य झालें. येथें झालेल्या सभासदांची नोंद पुढें केली आहे. ह्या कामीं डॉ. चितळे, वैद्य मास्तर, श्री. बुटाला, जोशी यांची मदत झाली. ह्या सर्वांचे आभारी आहों.

(२) जुन्या कापडाच्या नमुन्यांचें प्रदर्शन.

मुक्काम सुरत येथें गोपीपुऱ्यांत राहणारे श्री. हरगोवनदास पारेख यांची ओळख यापूर्वीं एकदोन प्रसंगीं आपणांस झालेलीच आहे. रा. पारेख यांनीं आपल्या

संग्रहांतील प्राचीन चित्रांचा संच मंडळाच्या एका संमेलनप्रसंगीं प्रदर्शनांत ठेविला होता. आणि दुसऱ्या एका प्रसंगीं लाकडाचीं अखंड सांधीव कायमरंगीं चित्रें नवीन बनवून त्यांनीं आपल्या कल्पकतेनें एका नवीन उद्योगाची दिशा आणि तिचा ऐतिहासिक व्यक्ति व स्थळें यांचें चित्रन करण्याच्या कामीं होणारा उपयोग हाही आपणांस पटवून दिला होता. कै. मावजीशेट यांस रा. पारेख यांनीं पुष्कळ मदत केलेली होती; आणि महाराष्ट्र इतिहास व भारतीय प्राचीन कला यांचे निःसिम अभिमानी असे गुर्जरभूषण कै. पुरुषोत्तमशेट हे आणखी कांहीं वर्षें जगते तर त्यांनीं वीस लक्षांची योजलेली राष्ट्रीय अजवखान्याची कल्पना निःसंशय सिद्धिस नेली असती. रा. पारेख यांचें लक्ष ऐतिहासिक वस्तू जमवून त्या योग्य सुस्थळीं विकण्याचा आहे. त्याबरोबरच जुन्या इतिहासकालाचा अभ्यास करून आणि तो आदर्श दृष्टीपुढें ठेवून प्रस्तुतच्या कामीं आपणांस लहान लहान घरगुती कलाकौशल्याचे उद्योगधंदे कसे चालवितां येतील, याविषयींही त्यांचे प्रयत्न चालू असतात. त्यांचे जवळ थोडा वेळही बोललें असतांना त्यांनीं या कामीं केलेल्या परिश्रमाची ओळख आपणांस झाल्याशिवाय राहात नाहीं. सुरतेसारख्या शहरांत असूनही त्यांच्या अनुभवाचा लाभ तत्रस्थ मंडळींनीं घ्यावा तितका घेतल्याचा दिसत नाहीं. कै. पुरुषोत्तम शेट यांच्याप्रमाणें रा. पारेख हे महाराष्ट्रभक्त असल्याकारणानें ते सुरतेच्या महाराष्ट्रीय मंडळाचेहि सभासद झालेले आहेत. आजवर शेंकडों ऐतिहासिक चित्रें त्यांनीं जमा करून ठिकठिकाणीं विकलेलीं आहेत. अलीकडे त्यांनीं तो उद्योग बराच आवरीत आणिला आहे; आणि जुन्या कापडांच्या नमुन्यांचाच आपला संग्रह ते वाढवीत आहेत. तथापि अद्यापिहि त्यांचेजवळ कांहीं दुर्मिळ चित्रें आहेतच.

रा. पारेख यांचे जवळील जुन्या कापडांच्या नमुन्यांचा अपूर्व संग्रह इकडील जनतेस पाहण्यास मिळावा अशी आमची फार दिवसांची इच्छा होती आणि म्हणून रा. पारेख यांस एकवार मंडळामध्यें या नमुन्यांचें प्रदर्शन मांडण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें यंदा रा. पारेख यांनीं इकडे येऊन बरेच दिवस इकडे राहून पुणें आणि नंतर सोलापूर येथें मंडळातर्फे प्रदर्शनें भरविलीं. या ऐतिहासिक प्रदर्शनांत त्यांनीं हे आपणांजवळील अदृष्टपूर्व नमुने जनतेसमोर मांडले होते. रा. पारेख यांनीं हिंदुस्थानांत गेल्या २०।२५ वर्षांत ठिकठिकाणीं हिंडून वणाटीविषयीं प्रसिद्ध असलेल्या निरनिराळ्या स्थळीं जाऊन प्राचीन घराण्यांतून हिंडून जुन्या काळचे सहस्रावधि नमुने जमा केले आहेत.

या नमुन्यांत खादी, रेशमी, जरी, नरमीना, कौषेय, हिमरू वगैरे विविध जातींचीं कापडें आहेत. विशेषेंकरून या सर्व प्रकारच्या कापडांची वणाट आणि त्यांवर केलेलें साधें, रेशमी, रंगीबेरंगी व जरीचें नक्षीकाम यांची प्रतवारी लावून **नमुन्यांचे पडदे** रा. पारेख यांनीं बनविलेले आहेत. तुलनेसाठीं प्रत्येक जातीच्या

पडद्यावर जुन्याबरोबर तसल्याच कापडांचे अलीकडील नमुनेहि तुकड्यांच्या रूपानें रा० पारेख यांनीं बसविलेले आहेत आणि त्यामुळें कांहीं शतकांपूर्वीच्या भारतीय कामाची श्रेष्ठता आणि सांप्रत विणकामाच्या कलेची झालेली दुर्दशा ही कोणाच्याही मनांत सहज भरते.

वस्त्रनिर्मितीचा उद्योग हा भारतवर्षांतील एक अत्यंत प्रसिद्ध असा उद्योग आहे. ऋग्वेदाच्या कालापासून विणण्याची कला या देशांत ऊर्जितावस्थेस आलेली आहे. आणि भारतीय वस्त्रांचे नमुने जगाच्या बाजारपेठेंत अत्यंत श्रेष्ठता पावलेले आढळून येतात. किंबहुना ज्या परदेशी वस्त्रांच्या आकर्षक, शेंकडो नमुन्यांनीं हिंदुस्थानची बाजारपेठ सांप्रत मारून टाकली आहे त्याच देशांच्या बाजारपेठा हिंदुस्थानच्या कलाकुसरीच्या अनेक प्रकारच्या नमुन्यांनीं सुमारें ४०० वर्षांपूर्वी अगदीं फुलून गेलेल्या असत ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. पाश्चिमात्य देशांतील श्रीमान् युवक भारतीय कापडेंच पडेल तें मूल्य देऊन खरेदी करून वापरीत असत असेंहि म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. याप्रमाणें एके काळीं सर्व जगाच्या बाजारपेठेवर ज्या कलेनें स्वामित्व गाजविलें तीच भारतीय कला आणि तो भारतीयांचा प्रसिद्ध उद्योग सांप्रत धुळीला मिळालेला पाहून कोणाचेंहि हृदय आश्चर्य व दुःख या भावनांनीं व्याप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या दुर्दमनीय जिज्ञासेनें प्रेरित होऊन ज्यावेळीं मोठ्या उत्साहानें युरोपांतील धाडसी लोक समुद्रावरून आपलीं जहाजें हाकारून वाऱ्याबरोबर निर्भयपणानें लढतलढत सर्व जगभर फिरून आक्रमणशील बनूं लागले त्याच वेळीं विचार आणि आचार यांचें स्थिरीकरण होऊन आम्ही ध्यानस्थ योग्याप्रमाणें अंतर्मुखतेच्या डोलांतच स्वस्थ पडून होतों. आणि त्यामुळें प्रथम आमच्या बाजारपेठा आणि नंतर आमची सत्ता आम्ही सहजच गमावली. ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं हा चमत्कार कसा घडवून आणला याचा सविस्तर इतिहास जेव्हां कोणी लिहील त्यावेळीं हें सर्व रहस्य संपूर्णपणें आपणांस कळून येईल. इकडील कापडाची बाजारपेठ हळुहळू कशी काबीज करण्यांत आली आणि त्यासाठीं कसे भगीरथ प्रयत्न करण्यांत आले, इकडील कापडांचे नमुने जमा करून, आपल्या देशीं नेऊन, त्यांच्या नकला कशा करण्यांत आल्या, इकडील रंगकामाच्या वनस्पतींविषयीं तिकडे कशी माहिती पसरविण्यांत आली आणि पुढें जेव्हां यांत्रिक युगाला सुरुवात झाली त्यावेळीं या सर्व अनुभवाचा फायदा घेऊन आपली वस्त्रनिर्मितीची शक्ति भारतीयांपेक्षां अनेक पटींनीं वाढवून आपला माल स्वस्त करून भारतीय कापडाची बाजारपेठ कशी मोडकळीस आणली गेली, हें सर्व आपण लक्षपूर्वक अभ्यासण्यासारखें आहे. दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, कै. बाबू रमेशचन्द्र दत्त किंवा कै. मेजर बसू यांच्यासारख्या फारच थोड्या विद्वानांनीं या विषयाचा इतिहास जनतेसमोर मांडलेला आहे. आणि जो मांडलेला

आहे तोहि सर्व इंग्रजी भाषेंतच मांडलेला आहे. ज्या स्वदेशीय हजारों बांधवांचा या इतिहासाशीं निकटचा संबंध आहे त्या इंग्रजी न जाणणाऱ्या लाखों देशबांधवांस हा उद्बोधक इतिहास जर कळून येईल तर त्यांचे डोळे साफ उघडल्याशिवाय राहाणार नाहींत. भारतीय वस्त्रकलेच्या विध्वंसाचा आणि दुर्दशेचा दुःखप्रद इतिहासदेखील परदेशीय उद्योगी लोकांच्या लिखाणावरूनच आपणांस कळून घ्यावा लागतो. आपले हे उद्योग बुडत आहेत हें देखील स्पष्टपणें आमच्या लक्षांत वेळींच आलें नाहीं आणि अद्यापिहि ते कसे व कां बुडाले आणि त्या कामीं दुसऱ्यांच्या दोषांपेक्षां आपले दोष किती कारणभूत झाले हें आपण अद्यापिहि जनतेस पटवून दिलेलें नाहीं.

ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवहारासंबंधानें छापून झालेलीं पुस्तकेंच केवळ पाहिलीं तर त्यांतूनच या विषयासंबंधानें अफाट माहिती आपणांस एकत्र करितां येईल. आज ज्याप्रमाणें इंग्रज व्यापारी आणि इंग्रज अधिकारी यांच्या दृष्टिकोणांत स्वार्थभेदामुळें आपणांस दिसून येतें, त्याप्रमाणेंच पूर्वींही ईस्ट इं. कंपनीचे अधिकारी व खाजगी व्यापारी यांच्यांत चुरस व भांडणें लागलेलीं दिसून येतात. अशा भांडणांमधूनच उभयपक्षांच्या उखाळ्यापाखाळ्या आणि दोषदर्शन आपोआपच होतें. आणि कोणी कोणाला कसें बुचाडलें याबद्दल एकमेकांवर हल्ले चढवितांना सहजच सत्य असेल तें प्रगट होतें असें या भांडणाचा अभ्यास आपणांस सांगतो. परंतु तोही अभ्यास आपणांकडे अत्यल्पच झालेला आहे. हा स्वदेशोपयोगी अभ्यास ज्या स्वतंत्र शाळा आणि स्वतंत्र विद्यापीठें अलीकडे निघालीं त्यांनीं देखील म्हणण्यासारखा केला नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. बोल्ट यानें व्हेरेल्स्ट याच्या अमदानीच्या प्रसंगीं तक्रार करण्याकरितां जे ग्रंथ, ऐन मराठी राज्य चालू असतां—मराठ्यांचे झेंडे दिल्लीवर आपण फडकवीत असतां—प्रसिद्ध केले आणि ज्यांत भारतीय वस्त्रविनाशपर्व वर्णिलेलें आहे, ते कितीकांच्या पाहण्यांत आहेत ? अशा सर्व ग्रंथांचा एकत्र संग्रह होऊन अभ्यास होणें अत्यंत अगत्याचें आहे आणि यासाठींच अभ्यासप्रधान व विद्याप्रधान विद्यापीठांचीच अवश्यकता आहे. परदेशीय कारखानदारांच्या उपयोगासाठीं तयार करण्यांत आलेलीं इकडील रंगीबेरंगी कापडाच्या हुबेहूब नमुन्यांचीं छापील पुस्तकें, ज्यांच्या केवळ १०।२०च प्रती काढण्यांत आल्या होत्या असें ऐकिवांत आहे, तीं पाहण्यांत येत नाहींत हें सांगावयास नकोच. ह्या सर्व ग्रंथांच्या साहाय्यानें **भारतीय वस्त्रनिर्मितीच्या उत्कर्षापकर्षाचा इतिहास** निरनिराळ्या पर्वांत रचून सांगोपांग तयार केला पाहिजे. अशा इतिहासाला उपोद्घलक म्हणून अद्यापहि तुरळक तुरळक आढळणारे असे जुन्या काळच्या वस्त्रनिर्मितीचे प्रत्यक्ष नमुने जमा करून जतन करून ठेवण्याची अत्यंत आवश्यकता आहे आणि म्हणूनच रा. पारेख यांच्यासारख्यांच्या प्रयत्नास हरप्रकारें उत्तेजन देऊन त्यांची कदर आपण केली पाहिजे.

रा. पारेख यांनीं जुन्या वस्त्रांचे नमुने मिळवून ते निरनिराळ्या पडद्यांवर त्यांच्या त्यांच्या महत्त्वाप्रमाणें लहानमोठ्या तुकड्यांच्या रूपानें बसविले आहेत. कांहीं अत्यंत महत्त्वाचीं मोठीं वस्त्रें त्यांस अखंड मिळालीं तशींच त्यांनीं ठेविलीं आहेत. रा. पारेख यांच्या या संग्रहांत बहुतकरून इ. स. च्या १८१९ व्या शतकांतीलच नमुने आहेत. सुरत, त्रिचनापल्ली, राजमहेन्द्री, मच्छलीपट्टण, बऱ्हाणपूर इत्यादि दक्षिणेंतील आणि मुजफ्फरपूर, डाक्का वगैरे उत्तरेंतील अनेक ठिकाणचीं वस्त्रें, विशेषतः त्यांवरील नानाप्रकारचें भरतकामाचे व जरीकामाचे, नक्षीचे, चित्रांचे, किनारीचे व विणीचे नमुने हे अत्यंत प्रेक्षणीय आहेत. कोठें राजसभा व राजसैनिक, हत्तीघोडे वगैरे, तर कोठें नानाप्रकारचीं झाडें, पशू व पक्षी असे, वस्त्रांवर कुशलतेनें काढलेलें या संग्रहांत आढळतात. हीं कुसरीचीं कामें पाहात असतां पुष्कळ प्रसंगीं तत्कालीन चित्रांतील कामांशीं त्यांचें असलेलें साम्य पाहून फार मौज वाटते. प्रेक्षकांना ज्या वेळेस रा. पारेख या साम्याची जाणीव करून देत असत त्यावेळीं रा. पारेख यांची सूक्ष्मदृष्टी चांगलीच प्रत्ययास येत असे. मोगली व जयपुरी कलमाचीं चित्रें समोर धरावीं आणि त्या चित्रांच्या चौकटींत काढलेले नमुने, फुलें, फुलझाडें, पक्षी, प्राणी इतकेंच नव्हे तर खुद्द चित्रांच्या अंतर्भागीं असलेलीं माणसें, त्यांचे वेष, पोषाख, पोषाखांतील वस्त्रांवर दाखविलेलें काम यांत आणि रा. पारेख यांच्या वस्त्रांत दिसून येणारें काम, यांतील मेळ पाहून रा. पारेख यांच्या नमुन्यांचें विश्वसनीयत्व पटून फार कौतुक वाटत असे.

डाक्क्याच्या मलमलीचे नानाप्रकारचे सुमारें पन्नास पाऊणशे नमुने रा. पारेख यांनीं प्रदर्शनांत ठेवले होते. सुमारें २।३ पेरांच्या लांबीरुंदीचे डाक्क्याच्या मलमली कापडांच्या नाजुक नमुन्याचे तुकडे, जाड कागदाच्या चौकटींत मोठ्या बंदोबस्तानें बसवून रा. पारेख यांनीं मांडलेले होते. या प्रत्येक नमुन्यांत कांहींतरी निराळा नमुना होता. कित्येकांची वीण तर इतकी पातळ होती कीं त्यायोगें तो तुकडा एकाद्या अत्यंत विरळ अशा कांचेच्या कांतीव पडद्याप्रमाणें दिसे. आणि त्यांतून पलीकडील १०।१५ फुटांवरील जिनसा अगदीं स्वच्छ दिसत असत. त्याहाळूनच पहावें त्यावेळीं हा नाजूक नमुना कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें पातळ धाग्यांनीं विणलेला असा मग लक्षांत येत असे. जवळ जाऊन पहावें तों असल्या पातळ नमुन्यांत मध्यें निराळीच काडी टाकून चौक साधलेले किंवा निरनिराळ्या आकृती साधलेल्या किंवा फुलें उठविलेलीं अशीं जेव्हां नजरेस येत तेव्हां मन थक्क होऊन जाई. कांहीं नमुन्यांत तर मधल्या पातळ गाभ्याच्या दोन्ही बाजूंस दोन निराळे नमुने उठविलेले आढळून येत असत! असे हे डाक्क्याच्या कामाचे प्रेक्षणीय नमुने पाहिले म्हणजे असल्या या कापडाचीं पागोटीं, लुगडीं वगैरे वस्त्रें एकाद्या डबींत किंवा आंब्याच्या कोयींत सहज बसत असें जें म्हणतात तें खरेंच असलें पाहिजे, असें सहज पटे.

साध्या कापडावर रंगाचें छापकाम केलेल्या छिटांचे वगैरे पुष्कळ नमुने रा. पारेख यांनीं मांडलेले होते. सोबतच्या चित्रांत सुरतेचा छापकामाचा दोन मोरांचा जो नमुना दिला आहे तसला नमुना विलायतेंत तयार करून त्यावेळीं छापून आणलेला रा. पारख यांनीं प्रदर्शनांत ठेविला होता. त्यावरून इकडील बाजारपेठ आमचेच नमुने घेऊन त्यांचीच नक्कल करून कशी काबीज करण्यांत आली हें कळून येई. सुरतेचे जे आणखी दोन नमुने सोबत छापून प्रसिद्ध केले आहेत, ते बारकाईनें पाहिल्यास जुन्या कामाच्या कसबाची बरीच कल्पना येईल. आणि रा. पारेख यांचा हा संग्रह समक्ष पहाण्याची प्रेरणा होईल.

आमची अशी इच्छा आहे कीं, हिंदुस्थानांत पूर्वी तयार होत असलेल्या निरनिराळ्या वस्त्रांचे नमुने जमा करून, त्यांची गांववारी, जातवारी, प्रतवारी वगैरे लावून, त्यांचे रंगीत नमुने त्यांतील बारकावे कळतील अशा रीतीनें छापून व त्याबद्दल इतर सर्व प्रकारची संपूर्ण माहिती देऊन तयार केलेला एक विश्वसनीय वस्त्रवर्णनकोष प्रसिद्ध व्हावयास पाहिजे आहे; आणि मूळचे नमुने मंडळासारख्या एकाद्या सार्वजनिक संस्थेंत व्यवस्थेनें जतन करून ठेवावयास हवेत. रा. हरगोविंददास या कामीं शक्य ती मदत करण्यास तयार आहेत. तेव्हां या संधीचा फायदा अवश्य करून घेतला पाहिजे.

---

(३) **पाक्षिक सभा**–गेल्या तिमाहींत ४ पाक्षिक सभा होऊन त्यांत १२ निबंध वाचले गेले. त्यांची यादी पुढीलप्रमाणे.

पा. स.	अ.	लेखक.	निबंध.
५	१२	श्री. स. ग. जोशी	वाईचे काजी व रामचंद्र निळकंठ
	१३	मातृभूमि कार्यालय-ग्वाल्हेर	पेशवाईंतील दोन पत्रें
६	१४	श्री ग. ह. खरे	भिवघाट येथील कानडी शिलालेख शके १०९५ व श. १०९८–११०२
	१५	”	कऱ्हाड येथील एक मूर्ती
	१६	श्री. वि. गो. दिघे	अफझलखानाचें एक खुर्दखत श. १५७१
७	१७	श्री. बाळासाहेब घोरपडे	स्वराज्यांत गुणाची कदर
	१८	श्री. स. ग. जोशी	पालीच्या खंडोबास नेमणूक
	१९	श्री. वि. गो. दिघे	रणदुल्लाखानाचें एक खुर्दखत श. १५६१
	२०	श्री. ग. ह. खरे	कऱ्हाड येथील ३ फारसी शिलालेख
८	२१	श्री. स. ग. जोशी	कोयाजी बांदल
	२२	”	मणवलीसंबंधीं एक कौल

(४) सभासदः—गेल्या तिमाहींत नवीन झालेल्या सभासदांची यादी.

क्रमांक	नांव.	गांव.	वर्ग.
१७४०	प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी	नागपूर	४
×१७४१	श्री. कृष्णाजी गणेश लिमये, संपादक ज्ञानप्रकाश	पुणें	२
१७४२	रा. ब. पांडुरंग चिमणाजी पाटील, L.Ag., M.SC.	"	२
१७४३	श्री. हरि नारायण नेने, M.A., L.T.	नागपूर	४
१७४४	" मल्हार यशवंत देशपांडे	पुणें	४
१७४५	प्रो. के. एम्. व्यंकटरमण	"	४
१७४६	श्री. दामोदर मारेश्वर भट	मिरज	नहा. ४
×१७४७	" नबाबजादा सय्यद ममताज अलीखां	मुंबई	३
१७४८	मे. आय्. एच्. टॉटन, कलेक्टर	सोलापूर	१
१७४९	" भिकाजी विनायक साठे, ठेकेदार	"	नहा. २
१७५०	रा. ब. एन्. सी. लिमये, सेक्रेटरी रिपनहॉल लायब्र.	"	२
१७५१	श्री. विनायक विष्णु साळवे, अ. ऑ डि स्कू.बो.	"	२
१७५२	" धर्मवीर रावजी सखाराम दोशी	"	नहा. २
१७५३	डॉ. भालचंद्र वामन मुळे	"	१
१७५४	डॉ विष्णु गणेश वैशंपायन, एम्. एल्. सी.	"	२
१७५५	श्री. वैकुंठलाल एस्. ठाकोर	"	नहा. २
१७५६	,, चनबसाप्पा मल्लाप्पा ऊर्फ बाबासाहेब वारद	"	३
१७५७	,, गुंडो गोपाळ जतकर, B.A., LL.B. सेक्रेटरी जनरल लायब्ररी	"	४
१७५८	,, रघुनाथ रामचंद्र धडफळे	"	४
१७५९	,, बापूजी बाळकृष्ण कामत हेडमास्तर नार्थकोट हाय०	"	४
१७६०	डॉ. एस्. के. आपटे	"	४
१७६१	श्री. हरि विष्णु केळकर, B.A., LL.B.	"	४
१७६२	मिस्.एम्. जी. हम्माकी	"	४
१७६३	प्रिन्सिपॉल मिस्. इ. वी. फॉउलर	"	४
१७६४	श्री. वासुदेव विनायक कोलगेकर, B.A., LL.B.	"	४
१७६५	डॉ. महादेव दत्तात्रय जेऊरकर	"	४
१७६६	श्री. अनंत काशीनाथ जोशी चीफ ऑफि. म्यु.	"	४
१७६७	,, काशीनाथ बाळकृष्ण मेहेंदळे	"	४
१७६८	रेव्हरंड वुइल्यम हॅझन	"	४
१७६९	डॉ. वासुदेव काशीनाथ किर्लोस्कर	"	४

क्रमांक	नांव.	गांव.	वर्ग.
१७७०	श्री. शंकर गोविंद मोहोनी वैद्य	सोलापूर	×
१७७१	,, लक्ष्मण गोविंद काकडे, संपादक कल्पतरु	,,	×
१७७२	,, शंकर सीताराम सुमंत, ठेकेदार	,,	२
१७७३	श्रीमंत हरिभाई देवकरण गांधी	,,	तहा. २
१७७४	श्री. जे. एम्. जसावाला	,,	२
*१७७५	,, चनमल्लाप्पा नागप्पा लिगाडे	,,	तहा. २
*१७७६	,, वामन काशिनाथ परांजपे	,,	तहा. ×
१७७७	,, रामचंद्र वासुदेव परांजपे	,,	×
१७७८	,, दत्तात्रय महादेव घाणेकर	,,	×
१७७९	डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड	,,	×
१७८०	श्री. बाळकृष्ण बल्लाळ जोशी, B.A., LL.B.	महाड	२
१७८१	,, विष्णु त्रिंबक चांदे मास्तर	,,	×
*१७८२	,, महादेव बजाजी वीरकर, B.A., LL.B.	,,	तहा. २
१७८३	,, जी. एन्. कात्रे सबजज्ज	,,	×
१७८४	,, श्रीधर सखाराम अंबेकर, मामलेदार	,,	२
१७८५	,, गोपाळ हरी जोशी मास्तर	,,	×
१७८६	,, गणेश दामोदर टिळक हेडमास्तर हाय.	,,	×
१७८७	श्री. नरहर रामचंद्र ऊर्फ बाळासाहेब ओक	,,	×
१७८८	,, दत्तात्रय नरहर वैद्य, वकील	,,	×
१७८९	,, जगनलाल गुप्त	बुलंदशहर	×
१७९०	,, चिटणीस, विद्यार्थी वाचनालय संस्था, महाड	महाड	×

× वर्गणी येणे आहे. * वर्गणी अंशतः येणे आहे.

---

(५) **ग्रंथालय**—गत्या तिमाहींत पुढील पुस्तकें मंडळास भेटीदाखल किंवा अभिप्रायार्थ आलीं.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
कॅमर्स	इंग्लिस वुर्डनबुक इंग्लिस–नेदरलंदस् अंद् नेदरलंदस्–इंग्लिस् २ व्हॉल्युमस्	वाडेकर आर्. डी.
महाकविर्गंगारामः	श्रीहारभूषणम्	खांडेकर गणेश गोपाळ
जोशी वा. म. आणि पटवर्धन ना. म.	वाङ्मयमाला	वैद्य चिं. वि.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
यशवन्त कवि	चंद्रशाळा	ठकार टी. आर्
सरदेसाई गो. स.	अफेअर्स ऑफ नार्दर्न इंडिया: पेशवा माधवराव दि फर्स्ट १७६१–१७७२	गव्हर्नमेंट ऑफ बाँबे
सरदेसाई गो. स.	चित्रमय हिंदी राजवंश	दिघे वि. गो.
सरदेसाई गो. स.	इंडेक्सेस टु दि सिलेक्शन्स् फ्रॉम् दि पेशवा दप्तर नं. १ ते २५	गव्हर्नमेंट ऑफ् बाँबे
सरदेसाई गो. स.	हँड बुक टु दि रेकार्ड्स् इन दि एलिनेशन् ऑफिस	गव्हर्नमेंट ऑफ बांबे
सरदेसाई गो. स. कुलकर्णी कृ. पां. काळे या. मा.	ऐतिहासिक पत्रव्यवहार	सरदेसाई गो. स. (अभिप्रायार्थ)
हवालदार ग. रा	निर्जन ग्राम (कविता)	हवालदार ग. रा.

(६) इतर-वृत्त.

श्री. शं. ना. जोशी हे मंडळाच्या प्रचारासाठीं गोमंतकांत गेले असून तेथें व्याख्यानें व इतर कार्यक्रम सुरू आहे.

प्रो. दत्तो वामन पोतदार बी. ए. यांस हिंदुस्थान सरकारनें इंडियन हिस्टॉरिकल कमिशनचे कॉरेस्पांडिंग मेंबर म्हणून ता. १७ नोव्हेंबर १९३३ पासून आणखी तीन वर्षे पुनः निवडलें आहे.

Marathi Contents of this issue.

Articles

1. **Konkan–its derivation and extent** (p. 1)—by **C. V. Vaidya, M. A. LL. B.** Discusses various derivations and asserts that the word कोंकु with the suffix अण् is the derivation acceptable. As to the boundaries of it, opines that the country of the Cheras lay on the south while Aparānta was on the north.

2. **Fish-machine or the Compass** (p. 6)—by **P. H. Thatte.** Description of the machine : points to the east and west instead of the north and south like a modern compass ; the needle is given the shape of a fish. Such machines were in use before the English rule in India. Indians who clonoized Jawa also used this kind of machine.

3. **Some word-scenes from the Mahanubhava literature (p. 9)—by H. N. Nene, M. A. L. T.** 5 scenes giving a vivid idea of some phases of the social condition of the Maratha people in the 12th century A. D.

4. **A Chandraprabha image from the mandal (p. 16)—by G. H. Khare**—Description of the image and its attendant deities; its identification from the moon emblem of the principal emage and the cat, the veicle of the attendant female deity Jvālāmālinī; belongs to the medieval ages; brought from the vicinity of Karad, a place wellknown for Budhist and Brahmanical remains.

5. **Ashvamedha of Vipra-Narayana (p. 19)—by Prof. Potdar**—The manuscript presented by Mr. A. B. Valavalkar; the work is not published as yet; was written by Narayana Gopaji at Hātāḷe on the south bank of the Tapti in one of the following śaka years viz. 1582, 1642, 1702 or 1762.

Sources

Medieval (p. 57-72)—(18) Kanarese inscriptions from Pulunj (Solapur)—concluded-by G.H. Khare: (a) Of the time of Yādava Singhaṇa-Śaka 1121; mentions the grants made by Singhaṇa, Mahājanas of Puḷunj, Mahāpradhāna Siṁheya Sāhani and others to one Lingāyata saint Ammugideva for the local god Siddhasōmanātha. (b) Of the same rein i. e. Ś. 1148, giving the Vyaya saṁvatsara as the 27th reignal year of Singhaṇa. (19) A kanarese inscription from Bhivghāṭ (Satara)—by G. H. Khare-to be continued.

Persian (p. 81-88) (15) 4 Inscriptions from Junnar-by G. H. Khare. No. 70 records the construction of a cistern by Haji Aqa in A. H. 986 and during the reign of Husaini Murtaza. No. 71 mentions the construction of a masjid by Zabit khan in A. H. 989 and during the same reign. No. 72 gives only the name of Malik Ambar Jangizkhani and the year 1033 A. H. No. 73 records the building of an edifice by Mukhliskhan in 1084 A. H. (16) Two letters from the Deshmukh of Bidari-by the same. The second, No. 75 refers to some movements in A. D. 1686 of the Mughal army that was swarming in the Deccan. (17) 4 Inscriptions from Karad. Satara)-to be continued.

इत्यादि शब्दांत आला असून दुसरा म्हणजे नवीन ळ निळय (८), बळिय (२२), तळार (२४), हळ्ळिदिं (६२), इत्यादि शब्दांत आहे. र दोन प्रकारचा आहे. पैकीं जुना र मूरु (२७), कुरुवलगे (४९), केरेयिं (५०), इत्यादि शब्दांत असून नवीन प्रकार, कळांतरदिं (२७), हिरिय (५६), रायसेट्टि (५५), इत्यादि शब्दांत आढळतो. व दोन प्रकारचा आहे. पैकीं पहिला प्रकार, देव (१५), जाद्व (३०), हणवं (४२), पडुवलु (४९), इत्यादि शब्दांत आढळतो. दुसरा प्रकार भुवन(७), कवि (१९), पडुवलु (४६), इत्यादि शब्दांत आढळतो. ए दोन प्रकारचा आहे. एक सर्वसामान्य तऱ्हेनें काढला असून कित्येक ठिकाणीं ऐ कार करण्यासाठीं जो ए कार अक्षरास जोडतात तोच निव्वळ एकारासाठींही अक्षरांस जोडला आहे. उ. हूळजेय (४६), बट्टेयिं (४६), निवेसन (४८). अनुस्वार अक्षरांवर व अक्षरांपुढें अशा दोन्ही रीतींनीं काढलेला आढळतो.

लेखनपद्धति— विसर्गाबद्दल कांहीं ठिकाणीं परसवर्ण केला आहे. उ. नमाश्शिवाय (२). संस्कृत ल बद्दल अनेक ठिकाणीं ळ लिहिला आहे. ल क्वचितच आला आहे. स, श, ष यांची अनेक ठिकाणीं अदलाबदल झाली आहे. उ. भूशित (४), सरणागत (१०), सडु (११), स्रवण (१२), शर्कर्म (१८), वरुशं (२८), सर्व्वनमश्य (२०), निवेसन (४८), सासन (४७). कांहीं ठिकाणीं ऋ बद्दल रि वापरली आहे. उ. क्रिपया (४), ह्रिद्याकृष्ट (१९). ऐ बद्दल य वापरल्याचीं कांहीं स्थानें आहेत. उ. शिवाचारय्क, लिंगय्को (५). रेफाबद्दल रु ही कांहीं ठिकाणीं आला आहे. उ. दरुशन (१२), वरुश (२८). इ बद्दल यि ही वापरलेली आहे. उ. सोम यिति (३). पहिल्या दहा ओळींत अनेक ठिकाणीं विसर्ग गाळले आहेत. यादव शब्दाऐवजीं जादव (३०) व मात्सर्य्यऐवजीं माच्छर्य्य (१२) लिहिलें आहे.

भाषा— या लेखांत संस्कृत व कानडी अशा दोन्ही भाषा उपयोजिल्या आहेत. पहिल्या १० ओळींपर्यंत व पुढें ६४, ६५, ६६ या ओळींत संस्कृत श्लोक असून बाकी सर्व मजकूर कानडी गद्य आहे. १९ ओळीं-

पर्यंतचा भाग वरवर पाहणारास जरी संस्कृत दिसला तरी वस्तुतः तो मजकूरही कानडीच आहे.

कालनिश्चय— या लेखांत कालाचा उल्लेख 'सीद्धार्थि सवंत्सरद माघ सु ११ सोमवार व्यतिपातदंदु' असा आहे श. ११०० ते १२०० या दरम्यान श. ११२१ व श. ११८१ अशा दोन सालीं सिद्धार्थी सवंत्सर येतो. पैकीं श. ११८१ हें साल सिंघणाच्या मृत्यूनंतर येतें. तेव्हां तें येथें विवक्षित असणें शक्य नाहीं. अर्थात् श. ११२१ हेंच साल येथें विवक्षित आहे. मात्र श. ११२१ सालीं सिंघण राज्यावर बसला होता असें त्याच्या पाठीमागें जीं विशेषणें आहेत त्यांवरून दिसतें. सिंघणाचे कांहीं शिलालेख असे आहेत कीं, त्यांवरून सिंघणास श. ११२२ सालीं राज्याधिकार मिळाला असें ठरतें. त्या लेखांचा विचार केला तरीही सिंघण ११२१ सालीं राज्यावर असल्याचें ठरूं शकणार नाहीं. श. ११२०, ११२१ किंवा ११२२ या सालांपैकीं कोणत्याही सालीं माघ शुद्ध ११ ला सोमवार येत नाहीं. तेव्हां वार व मिती यांचा मेळ नाहीं असें म्हटलें पाहिजे. तिथी मुख्य धरली असतां तिजशी जुळती इंग्रजी तारीख इ. स. १२०० जानेवारी २८ ही येते.

स्थलनिश्चय—या लेखांत जीं स्थलनामें आहेत त्यांचीं हल्लींचीं मराठी व इंग्रजी नांवें व मुख्य स्थलापासूनचीं अंतरें पुढें देतों.¹ बहुतेक सर्व स्थलें ओळखतां आलीं असून तीं हल्लींच्या सोलापूर जिल्ह्यापैकीं पंढरपूर, माढें व सोलापूर या तीन तालुक्यांत आहेत.

पूर्ण–पर्णजा–जे, हूळजे (ओ. २, ३, २१, ३३, ४३, ४४, ४६)= पुळुं–ळुंज. द्वारावती (ओ. २९)=द्वारका. इथ्थे (ओ. ३४)=इटे(Eeteh)= पुळुंजची पश्चिम २ मैल. कवढि (ओ. ४०, ४१) = उत्तर कोंकण. पहा, मुंबई गॅझिटियर, व्हॉ. १, भाग २, पृ. २८३. सोइजण (ओ. ४५) = सौदने (Sowduneh)= पुळजेची उत्तरेशान्य ७ मैल. कुरुवलगे (ओ.४९)–नाड (ओ. ५५) = कुरूल (Koorool)= पुळजेची पूर्वेशान्य ११ मैल. देगावे (ओ. ५२) = देगाव (Dehgaon)= पुळजेची आग्नेय ६ मैल. लळिगे (ओ. ५२, ५३) = नळी (Nulee) = देगावची पश्चिम २। मैल.

---

१ इ. स. १८५२ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीनें करविलेल्या नकाशावरून.

पत्थरिगे (ओ. ५६) = पाथरी (Pathree)= कुरोलीची पूर्व ५॥ मैल. कोरवळिळ (ओ. ५६)= कुरोली (Korowlee)= पुळजेची पूर्वेशान्य १६ मैल. चिंचवळिळ (ओ. ५८, ७०)=फूल चिंचोली (Chincholi Phool)= पुळजेची उत्तर ४ मैल. आसुठिगे (ओ. ६०) = अष्टे (Ashteh) = पुळजेची वायव्योत्तर १८॥ मैल. रवळपळ (ओ. ६०)=रोपळे (Ropleh)= अष्ट्याची दक्षिण ५ मैल. तुंगतूह (ओ. ६२)=तुंगत (Toongat) = पुळजेची वायव्योत्तर १०॥ मैल. एवन्तिगे (ओ. ६२)=येवती (Yewtee) = तुंगतची उत्तर ४॥ मैल. पोरगावे (ओ. ६३, ६४)=पोहरगाव (Pohurgaon)=पुळुजेची पश्चिम ४ मैल.

लेखसार–यांत पहिल्या दोन श्लोकांत नमन झाल्यावर पुढें ज्या देवाला दान केलें त्या पुळुंजच्या सिद्धसोमदेवाचा व त्याचा भक्त अग्मिदेव याचा उल्लेख आहे. नंतर सिद्धसोमदेवासाठीं म्हणून त्याचा भक्त अंमुगिदेव याला, पुळुंजचे महाजन, यादव सिंघण, संकेय, देवेय व दायियनायक हे साहणि, कुमार सोइदेव, गंगिदेव, संकमदेव, बिज्जराणा, रवेयिदेव, जोइदेव इत्यादींनीं निरनिराळीं दानें दिल्याचें सांगितलें आहे. पुढें महामंडळेश्वर विक्रमादित्य याची बायको सिरियादेवी हिनें त्यानें वीर नागरसाचें देवालय बांधलें असतां, महाप्रधान सिंहेय साहणि, शिकारी तिपुरेय नायक, रायसेट्टि, जोइसेट्टि, महाप्रधानाचा खाजगी शिकारी इसग्य नायक, वामन नायक, लाहिदेव नायक व तंमय्य नायक यांनीं दिलेल्या निरनिराळ्या दानांचें वर्णन आहे. शेवटीं २ शापाशीर्वादात्मक श्लोकांनंतर दामोदर दंडनायकाचा हिशेबी लेखक चामुंडरस नायक यानें लेख लिहिल्याचें सांगितलें आहे.

वाचन.*

(१) [चिन्ह*] ओं[1] नमस्तुंगशिरश्चुंबि चंद्रचामरचारवे [।*] त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभाय शंभवे [चिन्ह*] [॥१॥*]

(२) नमश्शिवाय भक्तेभ्य परमानंददायिने[।*]सदा समीहितप्राप्तिहेतुज्ञानविधायिने ॥[२॥*] पू

ठशांवरून. १ ओं खुणेचा. २ अनुष्टुभ् वृत्त.

(३) र्ण्णजायां पुरे जातस्सिद्धसोम थि(इ)ति श्रुत(तः) [।*] भक्ताना-
मुपकाराय त्रि(नृ)णां पापापनुत्तये [॥३॥*]

(४) एवं भूतो महालिंगो र(अ)हिकुंडळभूशित(तः) [।*] क्रिपया
चाम्मिदेवस्य प्रत्यक्व:(ग्वः) समजा

(५) यत ॥ [४॥*] तत्पादपंकजभृंगो मुनिवत्पूजितो यति(तिः) [।*]
शिवाचारय्क(रैक)निरतो लिंगय्को(गैको) लिंगवेद्क(कः) ॥[५॥*]

(६) एतच्चित्रगुणैर्य्युक्तो अंमिदेवो महामति(तिः) [।*] चकार
शासनं सम्यक्(ग्) गद्यपद्यसमन्वितं ॥[६॥*]

(७) [चिन्ह*] स्वस्ति समस्तभुवनस्तुत । समस्तजगतितळख्यात ।
समस्तजन सकारुण्य । वरदाभयहस्त । स

(८) मस्तगुणगणनिळय । कामक्रोधलोभमोहमदमाच्छर्य्यदुरितकुळदूर ।
माहेश्व

(९) रगणकुलांन्वयदिवाकर । अनादिसंसिद्धप्रसिद्धन । सासिद्धकुलां-
न्वयार्ण्णव । प्रव

(१०) र्द्धनसुधाकर । सर्व्वजीवदयापर । नगण्यपुण्यमूर्त्ति । सरणागतकर्म्म-
निर्म्मूळन । सकळ

(११) भूतचेतचैतन्यस्वरूप । नित्यनिरंजनप्रभावपरिपूर्ण्ण सद्गुदरुशन-
समाहि

(१२) त । दूरस्त्रवण दूरदरुशन । ज्ञानसंपंन । अणिमाद्यष्टगुणपरि-
पूर्ण्णघूर्ण्णितार्ण्णव

(१३) आचारकुळकुमुदिनिसरश्चंद्र होंगे हेंगे मंगे निरूपेक्षितशारिर ।
अज्ञानां

(१४) कुश । भक्तजनचिंतामणि । गुरुचरणस्मरण । परिणतांत [*:] करण-
स्वरूप । वीरनागरस

---

१ अनुष्टुभ् वृत्त

(१५) लब्धवरप्रसाद । श्रीसिद्धसोमनाथदेवश्रीपादपंकजभ्रमर । लिंगैकदेहि । तेजोनिधिसर

(१६) सरणसंतान । श्रीअंमुगिधे(दे)वरमर्गं । [चिन्ह*] स्वस्ति समस्त-विज्ञातानेकवेदवेदांगतत्वज्ञानमर्त्ते[1]

(१७) दुज्वाळामंडित पुंडरीकाक्षब्रह्मलक्ष्मीअक्षितविशाळवक्षस्थळहंसयुवति-विरा

(१८) जितमनोंनतरुं यजनयाजनाध्ययनाध्यापनदानप्रतिग्रहशाट्कर्म निरतरुं ।

(१९) अष्टादशस्मृतिपुराणकाव्यनाटकभंगीभाषणकविगमकीवादिवाग्मिन्हिद-याकृष्ट

(२०) मंत्राक्षररुं प्रतिपंनशिळाक्षररुमप्प श्रीमतु दक्षिणवारणासी सर्व्वनमश्यदु

(२१) तमदग्रहारं पूर्ण्णजेयशेषमहाजनंगळु श्रीसोमनाथदेवर्गे वूरिं मूडवोल

(२२) गण [प*] तिगेगेय्य मूड गण[प*] तिगेय्य बट्टेयिं बडगलु त्रित्ति[2] आ केय्य बळिय मने सि

(२३) द्धेश्वरदेवर केरियिं तेंकलु वूरुगोटे तनक केरि वूरिं पडुवलु हूदोट १ मं धारापू

(२४) र्व्वकं माडि कोट्टरु आ केरिय मने मळवकेयिगळाळि अपुत्रिकदंद आय दाय कोळ्ळि कळ्ळ तळार

(२५) गूलि हालु कूळु बिट्टि वूरुगोटे बेलि सुंक तोलगडे पालिकाय आ केरिय अंगडि घाणायि

(२६) न्तिदेल्लवं सर्व्वबाधेपरिहारवागि कादुडुवरु ॥ आ महाजनंगळिगे अंमुगिदेवरसरु

१ या वाचनाविषयीं शंका आहे. २ ही गे गाळावी. मूळांत जास्त आहे असें वाटतें.

(२७) दंम्म १ र कळांतरदिं कोट्ट प्रियश्राहे गजमल्लगद्याण ६ आ कळां-
तरद मुरु हॊनुमं

(२८) वरुशं प्रति नागरसन पर्व्वदलु आचंद्राक्र्कतारंबरं अशेषमहाजनंगळुं
भोजन माडुवरु ॥

(२९) [चिन्ह*] स्वस्ति समस्तभुवनभत्रनाश्रयं श्रीपृथ्विवल्लभं महाराजा-
धिराज परमेश्वर द्वारावतिपु

(३०) रवरादिश्वर विष्णुवंशोद्भव जादवकुळकमळकळिकाविकासभास्कर
गूर्ज्जरहृदयजर्ज्झर

(३१) माळवेश्वरमदनमहेश्वर दाहळहृत्कुतूहळ चोळगळगाळ प्रबळ-
तरहोइ

(३२) सणलक्ष्मीहरण सकळलक्ष्मीपतिप्रतापचक्रवर्त्ति श्रीसिंघणदेवरसरु
सिद्धार्त्थि सं

(३३) वत्सरद माघ सु ११ सोमवार व्यतिपातदंदु पूर्ण्णजेगे बंदाल्लि देवता
र्च्चनेय समेयंद

(३४) लु श्रीस्वयंभु सिद्धसोमनाथदेवर्गॆन्दायिश्थेयत्रनु सर्व्वनमश्यवागि
अंमुगिदेवरसर्गॆ

(३५) अकरपरिहारवागि धार[ा*] पूर्व्वकं माडि कोट्टरु । आ हळ्ळियलु ।
तहभत्तके सुं

(३६) क अंबिलि गद्याण ओवाडविल(लु)[चिन्ह*] आ हळ्ळिय वोळगण
देवपमहलेयन प्रभुत्वद कम

(३७) त मत्तरु नूरुमं बळिसहितवागि श्रीसिद्धसोमनाथदेवर्गॆन्दु अवर
मकळु जतलट्टद संके

(३८) य साहणिदेवेय साहणि दायियनायक कुवर सोइदेवयिन्ती
नाल्वरु अंमुगि

---

१ संस्कृत अ बद्दल कानडींत ए आदेश कधींकधीं होतो. पहा. एपि.इंडि.१३,३५

(३९) देवरसग्गें धारापूर्व्वकं माडि सर्व्वनमश्यवागि कोट्टरु आ हळ्ळिय कोळ्ळिवणवं श्रीसिद्ध

(४०) सोमनाथदेवर्गे राजबिज्जअय्यण देवन पर्म्म(र्व्व)वेंदु गंगिदेव संकम-देव बिज्जराणेय कवडिय खे

(४१) यिदेव कवडिय जोइदेवंगळु सर्व्वनमश्यवागि धारापूर्व्वकं माडि कोट्टरु । अह्लि फळितमं

(४२) दे हाग हणवं कोंडवनु गोमाससुगपान माडिदवनु स्वानगार्द्धप(भ) चांडाळ । [चिन्ह*] स्वस्ति समस्तप्रशास्तिसहि

(४३) तं श्रीमनु महाम(मं)डळेश्वरं साहसोत्तुंग भुजबळभीम विक्रमादित्य देवरसरु पूर्ण्ण

(४४) जेयलु वीरनागरसन देवाल्ययमं माडिसिदह्लि श्रीसिद्धसोमनाथदेवर्ग्गे स्वस्तियनवरतक

(४५) ल्याणाभ्युदयसहस्रफळभोगभागिनियरप्प सिरियादेवियरु सोइजण दह्लि बूरिं तेंक

(४६) हूळजेय बट्टेयिं पडुवलु तेंकलु लखुमादेविय केय्य सीमेइं पडुवलु हळ्ळ बडगलु सा

(४७) सर्सन मरियादे मत्तरु १०० अह्लि देवभावियिं तेंक हूदोट १ असगेश्वर देवर केरिइं

(४८) हिंदे केरि १ बणबेय निवेसन १ मं सर्व्वनमश्यवागि धारापूर्व्वकं माडि कोट्टरु ॥ [चिन्ह*] मत्तं दे

(४९) वर्गे श्रीमनु महाप्रधानं सिहेय साहणियरु कुरुवलेगयह्लि बूरिं पडुवलु मुं

(५०) जळेय केरेयिं मूड मत्तरु १०० अदर बळिय मने नारायणदेवर केरियिं मूडगण

---

१ हा स गाळावा, जास्त आहे.

(५१) मरदिं तेंक केरि १ म(मं) धार[ा*]पूर्व्वकं माडि कोट्टरु ॥ मत्तं श्रीसिद्धसोमनाथदेवर्गे श्रीमनु महापसा

(५२) यितं बेंटेकार तिपुरेय नायकरु देगावेयल्लि वूरिं पडुवलु ळळिगेय सीमेयिं

(५३) पडुवलु ळळिगेय बट्टेयिं बडगलु मत्तरुं २६ अ२र बळि ऊरुगव- नीयिं मूड मने १ ऊरिं मू

(५४) ड बाविय मूडदेसेय हूदोट १म(मं) सर्व्वनमस्यवागि कोट्टरु [चिन्ह*] स्वस्ति समस्तप्र

(५५) शस्तिसहितं श्रीमतु रायसेट्टि गंडभेरुंड जोइसेट्टियरु तमकुरुव- लगे नाडोळगण को

(५६) रवळ्ळियल्लि वूरिं मूड चट्टण हळ्ळदिं मूड पत्थरिगेय बट्टेयिं बडगलु हिरिय हळ्ळदिं

(५७) तेंकलु कोलमत्तरुं २६ कंचगार गेरिइं बडगलु मेळिसंखरदेवरिं मूडलु केरि १ बणंत्रे निवेशान [चिन्ह*] मत्तं

(५८) चिक्कवळ्ळियल्लि वूरिं तेंक हळ्ळदिं मूड चंमुराणेयन मळवदिं पडुवलु हूदोट १ सर्व्वनमस्य

(५९) वागि कोट्टरु स्वस्ति समस्तप्रशस्तिसहितं श्रीमनु महाप्रधान मंनेय बेंटेकार इसय्य नायकरु

(६०) श्रीसिद्धसोमनाथदेवर्गे आसुठिगेयल्लि रवळपळद बट्टे बिवद्ळेइं पडुवलु बित्ति १ जक्कियर भावि[3]

(६१) रेवण मडुव हूदोट १ वासुदेवन मनेय हत्तिद मने १ सर्व्वनमस्य धारापूर्व्वकं माडि कोट्टरु

(६२) श्री वामन नायकरु तुंगतूहद्लु वूरिं बडगलु हळ्ळदिं पडुवलु एवन्तिगे बट्टेइं मुड हूदो

१ धा ओळी खालीं लहान काढला आहे. २ या पुढील आकडा नीट लागला नाहीं. ३ जक्कियर भावि या शब्दप्रयोगासाठीं पहा. एपि. इंडि. १३, ४९

(६३) ट १ नित्तेशन १ मं सर्व्वनमश्यवागि कोट्टरु [चिन्ह*] श्रीमत् ल (आ?)हिदेव नायक तंमय्य नायकरु पोर

(६४) गात्तेयल्लि इरेयद सिद्धेश्वरदेवर केयि(र्यि) पडुव मत्तरु १२ मं सर्व्वनमश्यवागि कोट्टरु ॥ बहुभिर्व्वसुधा दत्ता

(६५) राजभिस्सगरादिभि [:।*] यस्य यस्य त(य)दा भूमि [:*] तस्य तस्य तदा फलं ॥ स्वदत्तं(त्तां) परदत्तं(त्तां) वा यो हरेत वसुधरा(रां) शष्टिव

(६६) रुशा सहस्त्राण (णि) विष्टायां जायते क्रिमिः ॥ श्री दामोदर दंडनायकर श्रीकरणं चमुंडरस नायकर लिपि

[आरंभी पण मागाहून खोदलेला भाग*]

(६७) चट्टिसेट्टि चाडिसेट्टि देवल्या इदु

(६८) गे—रयन्तरदु कोट्टरु आत्यंतिकवागि

(६९) अंमयंगळ केय्यल्लि ओंदु होंन कोंडु सर्व्वमान्यवागि सोमनाथदेवरि

(७०) गे चिंत्तवाळिळय चट्टेयिं पडुवलु जज्जुगी नायकन स्तळादिं मूडलु झंझे- श्वरदेवल (र ?) केइं तें

(७१) कलु गणपतिय केयिं बडगलु एरडुहात्ति मत्तरु केइय स्तळ वनुतळ पढियागि आ

(७२) केय्य बणत्ते खेयियिनिं तेंकलु सोमय्यानिं बडगलु आ केरे खेयियिनिं पडुवलु...

(७३) म- अंमयंगळिगे वाइयनु कयत्तागि मारिदरु आ त्रित्तिगे अशेष महा जनगंळु........

भाषांतर.

(ओ.१–६) ओं. नमस्तुंग (१). भक्तांना परम आनंद व इच्छित प्राप्तीच्या हेतूंचें ज्ञान देणाऱ्या शिवाला नमस्कार [असो] (२). भक्तां- वर उपकार करण्यासाठीं व मनुष्यांचें पाप नाहींसें करण्यासाठीं पूर्णजा- पुरांत झालेला, ' सिद्धसोम ' असा म्हटला जातो (३). अशा प्रकारें

१ स्तु खालीं घ काढला आहे. २ हा सात ओळींचा मजकूर चांगलासा लागत नाहीं, म्हणून पुढें भाषांतर दिलें नाहीं.

झालेला, सर्पकुंडलानीं भूषित, असा महालिंग अग्निदेवाच्या कृपेनें पुन्हा उत्पन्न झाला (४). त्याच्या पदकमलीं भृंग असलेला, ऋषीप्रमाणें पूजिलेला, शिवाचारांमध्यें पूर्ण निरत, लिंगरूप, लिंगज्ञानी, अशा विलक्षण गुणांनीं युक्त, महामति, अशा अग्निदेव यतीनें [हें] उत्तम गद्यपद्ययुक्त शासन केलें (५,६).

(ओ. ७–२८) स्वस्ति. सर्व जगानें स्तविलेला, सर्व जगतीतळावर प्रसिद्ध, सर्व लोकांविषयीं दयाळू, वरद व अभय अशा हातांनीं युक्त, सर्व गुणसमुदायाचें घर, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मात्सर्य या पापसमुदायापासून दूर, माहेश्वरगणांच्या समुदायांतील कुळांना सूर्य, अनादिकालापासून उत्कृष्ट सिद्ध असलेला, सिद्धसमुदायाचा समुद्र वाढविण्याचे कामीं चंद्र, सर्व जीवांविषयीं दयापरायण, अगण्यपुण्याची मूर्ति, शरणागताचें कर्म निर्मूल करणारा, सर्व प्राण्यांच्या चित्तांचे चैतन्यरूप, नित्य व निरंजन अशा प्रभावांनीं परिपूर्ण, षड्दर्शनांनीं युक्त, लांबचें ऐकणारा, लांबचें पाहणारा, ज्ञानसंपन्न, अणिमादि अष्टसिद्धींनीं पूर्ण असा खवळलेला समुद्र, आचारसमुदायरूपी कुमुद्वेलींच्या तळ्याला चंद्र, सोनें, स्त्री, जमीन यांना शरीरानेंही तिरस्कृत केलेला, अज्ञानाला अंकुश, भक्तजनांना चिंतामणि, गुरूच्या चरणांचें स्मरण असणारा, ज्याच्या अंतःकरणाचें स्वरूप परिणत आहे, वीर नागरसाकडून वररूपी प्रसाद मिळालेला, श्री सिद्ध सोमनाथ देवाच्या श्रीपदकमलांच्या ठिकाणीं भृंग, लिंगरूप देह झालेला, अशा श्री अंमुगिदेवाला

स्वस्ति, अनेक वेदवेदांगतत्त्वज्ञानें ज्यांनीं पूर्ण जाणलीं आहेत, विष्णूच्या विशाल छातीवरील, ब्रह्म, लक्ष्मी, सरस्वती, यांच्या चिन्हांनीं युक्त, मनानें उन्नत, यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह या षट्कर्मांत निरत असलेले, ज्यांच्या उपदेशाचीं अक्षरें अठरा स्मृति, पुराणें, काव्यें, नाटकें, कोटिक्रम, कवि, गमकी[1] व जाणणाऱ्या वाग्मींचेंही हृदय ओढतात, ज्यांना शिलालेख समजतात अशा, दक्षिण काशी, सर्वनमस्य, व अग्रहार असलेल्या पूर्णजा गावांतील सर्व महाजनांनीं श्री [सिद्ध] सोमनाथ देवासाठीं, गावाच्या पूर्वेस, गणपतीच्या शेताच्या पूर्वेच्या, गणपतीच्या शेताच्या वाटेच्या उत्तरेच्या २ वृत्ति [व] त्या शेताशीं संलग्न असलेलें घर,

१ गमकी = वाचक, लिपिय नोडुवं. पहा किटेल कोश.

सिद्धेश्वर देवाच्या रस्त्याच्या दक्षिणेस, गावाच्या कोटापर्यंत [असलेला] रस्ता, व गावाच्या पश्चिमेस असलेली एक बाग धारापूर्वक करून दिली. त्या रस्त्यावरील घर व मळई[1] शेत याबाबतींत निपुत्रिक, आय, दाय, लूट, चोर, तराळे[2], बेगार, दूध, दुष्ट, वेठ, गावाचा कोट, कुंपण, जकात, तोलगडे[3], पारिकार्य[3], त्या रस्त्यावरील दुकान, घाणा या सर्व गोष्टींचा त्रास होऊं नये अशा रीतीनें तीं दान करून दिलीं. त्या महाजनांना अम्मुगिदेवरसानें १ द्राम वार्षिक[4] व्याजानें दिलेल्या ६ गजमल्ल गद्याणांवरील व्याजाच्या ३ होनांत दरवर्षी नागरसाच्या पुण्यतिथिकालीं चंद्र सूर्य तारे आकाश असेतों सर्व महाजन भोजन घालतील.

(ओ. २९ ते ४३) स्वस्ति, समस्तभुवनाश्रय, श्रीपृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर, द्वारावतिपुरवराधीश्वर, विष्णुवंशोद्भव, यादवकुलरूपी कमलकलिकेचा विकास करणारा सूर्य, गुर्जरांच्या हृदयांना जर्जर करणारा, मालवराजरूपी मदनाला शंकर, डाहळदेशीय मनुष्यांचें कुतूहल, चोळाच्या गळयाचा काळ, प्रबळतर होइसणां(होयसळां) ची लक्ष्मी हरण करणारा, सर्व ऐश्वर्याचा मालक व प्रतापचक्रवर्ति अशा श्रीसिंघणदेवानें सिद्धार्थी संवत्सराच्या माघ शुद्ध एकादशीस, सोमवारीं, व्यतिपात असतां, पुळुंजेस येऊन देवतेच्या पूजासमयीं, श्रीस्वयंभू सिद्धसोमनाथ देवासाठीं म्हणून इथें हें गांव अंमुगिदेवरसाला कायमचें सर्वनमस्यरूपानें उदकपूर्वक करून दिलें. त्या गावांतील तपस्व्यांनीं सुंक, अंबिलि, गद्याण हीं द्यावयाचीं नाहींत. त्या गावापैकीं 'देवपमहलेय' च्या मालकीचे

१ मळव हा शब्द किटेल कोशांत सांपडत नाहीं. याचा अर्थ मळई जमीन असा असावा.

२ तळार हा शब्द तद्भव असून स्थळवार या शब्दांत त्याचें मूळ असल्याचें किटेल सांगतो. याच्या कामाचें 'चोरी झाली असतां ती भरून द्यावी' असें जें वर्णन आहे त्यावरून या शब्दाचा तराळ या शब्दाशीं संबंध जोडावासा वाटतो. पहा एपि. इंडि. १५, ८०

३ या शब्दांचे अर्थ नीट ध्यानांत येत नाहींत.

४ प्रिय या शब्दाचा अर्थ ध्यानांत येत नाहीं. पिरिय किंवा हिरिय शब्दाशीं संबंध असेल काय ? आहे शब्दाचा अर्थ बारा महिन्यांचा काळ. पहा इंपि. एंडि. १५, ८० टीप २

१०० कंमतं[1] मत्तर, बलिसह श्रीसिद्धसोमनाथ देवाला म्हणून, त्याची मुलगी, जतलट्टाचा संकेय साहणिदेवेय, साहणि दायिय नायक, कुमार सोइदेव या चारांनीं अंमुगिदेवरसाला धारापूर्वक, सर्वनमस्य रूपानें करून दिले. त्या गावाचें कोळिळवर्ण[2], श्रीसिद्धसोमनाथदेवाला, राजबिज्ज अय्यण देवाच्या पर्वदिनीं गंगिदेव, संकमदेव, बिज्जराणा, कवडी (द्वीपा)चे खेयिदेव व जोइदेव यांनीं सर्वनमस्यरूपानें उदकपूर्वक करून दिलें. तेथें उत्पन्न झालेल्याचे हागै[3], पण घेणारा, गोमांस खाणारा, सुरापानी, कुत्रा, गाढव, चांडाळ आहे.

(ओ. ४३–५४) स्वस्ति, सर्व प्रशस्तिसह असलेला, महामंडळेश्वर, मोठा साहसी, भीमासारखा शक्तिमान, अशा विक्रमादित्य देवानें पुळजेंत वरिनागरसाचें देवालय बांधिलें असतां, श्रीसिद्धसोमनाथ देवासाठीं, अखंड कल्याण व अभ्युदय यांचीं हजारों फळें भोगण्यांत भाग घेणारी सिरियादेवी हिनें, सोइजणमध्यें, गावाच्या दक्षिणेस, हूळजेच्या वाटेच्या दक्षिणपश्चिमेस, लखुमादेवीच्या शेताच्या सीमेच्या पश्चिमेस, नाल्याच्या उत्तरेस, १०० मत्तर, (तसेंच) तेथील देववापीच्या दक्षिणेस एक बाग, असगेश्वर देवाच्या रस्त्याच्या पाठीमागील एक रस्ता, कडब्याचें (कडब्यासाठीं) एक घर, सर्वनमस्यरूपानें, उदकपूर्वक (दान) करून दिलें. आणि देवासाठीं, महाप्रधान सिंहेय साहाणि यानें, कुरुवलगे गावांत, गावाच्या पश्चिमेस, मुंजळेच्या तलावाच्या पूर्वेस, १०० मत्तर, त्यांतील घर, नारायणदेवाच्या रस्त्याच्या पूर्वेस व झाडाच्या दक्षिणेस एक रस्ता, उदकपूर्वक (दान) करून दिला. आणि श्रीसिद्धसोमनाथ देवाला, (राजाची) फार मर्जी असलेला[4] शिकारी, तिपुरेय नायक यानें देगाव

---

१ कम्मत म्हणजे मालकानें स्वतःच्या साधनसामुग्रीनें पण मजुरांकरवी कसलेली (जमीन). पहा. एपि. इंडि १५, ३२८ टीप २

२ कोळिवण या शब्दाचा अर्थ नीट समजत नाहीं. कोळिळ शब्दाचा कोलीत असा अर्थ किटेल देतो. कदाचित् टेंभुर्णीचें रान असा या शब्दाचा अर्थ असेल.

३ हाग=$\frac{1}{4}$ पण. एक नाणें.

४ महापसायित याचा राजाच्या कपड्यांवरचा मुख्य असा दुसरा अर्थ आहे. पण तो येथें लागूं पडत नाहीं. पहा. एपि. इंडि. १३, ३१४.

मधील, गावाच्या पश्चिमेचे, लळिगेच्या सीमेच्या पश्चिमेचे, लळिगेच्या वाटेच्या उत्तरेचे २६ (?) मत्तर, त्या गावापैकीं वेशीच्या पूर्वेचें एक घर, गावाच्या पूर्वेच्या विहिरीच्या पूर्वेचा एक बाग, सर्वनमस्य म्हणून दिला.

(ओ. ५४–५९) स्वस्ति, सर्वप्रशस्तियुक्त, रायसेट्टि, गडंभेरुंड जोइसेट्टि,यांनीं कुरुवलगे देशापैकीं,कोग्वळ्ळिमधील, गावाच्या पूर्वेस, चट्टाच्या ओढ्याच्या पूर्वेस, पत्थरिगेच्या वाटेच्या उत्तरेस, थोरल्या ओढ्याच्या दक्षिणेस, (असलेले) कोल मत्तर २६ (?), कासाराच्या रस्त्याच्या उत्तरेस, मेळिसंखरदेवाच्या पूर्वेस, (असलेला) रस्ता, कडब्याच्या गंजीसाठीं घर, आणि चिंचवळ्ळिपैकीं गावाच्या दक्षिणेस, नाल्याच्या पूर्वेस, चंमुराण्याच्या मळईच्या पश्चिमेस असलेला एक बाग, सर्वनमस्य-रूपानें दिला.

(ओ. ५९–६६) स्वस्ति, सर्व प्रशस्तींनीं युक्त, महाप्रधन खाजगी शिकारी इसय्य नायक यानें श्रीसिद्धसोमनाथ देवाला, आसुठिगे गावापैकीं रंवळपळयाची वाट व बिवदळे यांच्या पश्चिमेस एक वृत्ति, यक्षींची विहीर, रेवणकृत एक बाग, वासुदेवाच्या घरास लागलेलें एक घर, सर्वनमस्यरूपानें धारापूर्वक करून दिलें. श्रीवामन नायकानें तुंगतूह गावापैकीं, गावाच्या उत्तरेस, नाल्याच्या पश्चिमेस, एवन्तिगेच्या वाटेच्या पूर्वेस, एक बाग व एक घर, सर्वनमस्यरूपानें दिलें. श्रीमंत लाहिदेव नायक व तंमय्य नायक यांनीं पोरगावेपैकीं इरेयाच्या सिद्धेश्वरदेवाच्या शेताच्या पश्चिमेस असलेले १२ मत्तर सर्वनमस्यरूपानें दिले. बहुभिः० स्वदत्तां० श्रीदामोदर दंडनायकाचा हिशेबी लेखक चमुंडरस नायक यानें लिहिलें.

२

हा शिलालेख मला पुळुंज येथेंच मिळाला. येथील मुख्य देवाच्या म्हणजे लिंगेश्वराच्या देवळास हेमाडपंती थाटाचे २ सभामंडप आहेत. या दोहोंपैकीं दर्शनास जातांना प्रथम लागणारा मागाहूनचा असून त्या-पुढचा अगोदरचा असावा. पहिला मंडप ओलांडून दुसऱ्यांत जातांना जें दार लागतें त्या दाराच्या डाव्या अंगास भिंतींत हा शिलालेख आहे.

---

३ गवनी याचा अर्थ गावाची वेस असा आहे. पहा एपि. इंडि. १३, २१

याच्या पुढेंच नवीन मंडपाचा खांब आला आहे व भिंत आणि खांब यां-मधील फट कमरेइतकी बांधून काढली आहे. यामुळें लेखाचा बहुतेक भाग बुजून गेला आहे. जो भाग दिसत आहे तोही तिन्ही बाजूंनीं फुटून गेला आहे. यामुळें लेखाचा फारच थोडा भाग शाबूत आहे. दिसणाऱ्या भागाची लांबीरुंदी ११ व ९ इंच आहे.

अक्षरांचें सामान्य स्वरूप मागें वाचलेल्या लेखाप्रमाणेंच कानडी वळणाचें आहे. लेखाची भाषा कानडी आहे.

लेखाचा काल २७ व्यय संवत्सर सुव ...... सोमवार असा आहे. २७ हें वर्ष राज्याभिषेकाचें आहे. या वर्षाला जुळतां असा संवत्सर व्यय हा दिला आहे. मी पूर्वी वाचलेला लेख सिंघणाचा आहे. हाही लेख सिंघ-णाचा आहे असें वाटतें. यादवनारायण, प्रतापचक्रवर्ती व सिंहण हे शब्द फुटक्या भागांतून लावतां येतात. सिंघणाचा काळ शक ११३२ ते श. ११६९ असा आहे. या काळाच्या दरम्यान गत शक ११४८ ला व्यय संवत्सर येतो. श. ११४८ हें जर राज्याभिषेकाचें २७ वें वर्ष आहे तर श.११२९ हें राज्याभिषेकाचें पहिलें वर्ष येतें. डॉ. फ्लीट यांनीं इतर २ लेखां-च्या आधारानें श. ११२२ हें सिंघणाच्या यौवराज्याभिषेकाचें पहिलें वर्ष मानावें असें नमूद केलें आहे. या लेखानेंही तीच गोष्ट सिद्ध होत आहे.

मागील लेखांत पुळुंज गांवाला संस्कृत भागांत पूर्णजा व कानडी भागांत हूळजे असें म्हटलें आहे. येथें ' **पूर्नजे** ' असा शब्द आला आहे.

हा व पाठीमागील लेख आणि येथील इतर लेख यांत अंमुगिदेवाचा उल्लेख येतो. यास निरनिराळीं दानें दिलीं आहेत. हें देऊळ पूर्वी वीरशैवांचें होतें व हल्लींही आहे. आर्. नरसिंहाचार्य यांनीं आपल्या ' कर्नाटककवि-चरिते ' या ग्रंथाच्या पहिल्या व्हॉल्यूममध्यें पृ. १९४ वर अमुगिदेवय्य नांवाच्या एका वीरशैव वचनकाराची माहिती दिली आहे. त्याचा काल त्यांनीं सुमारें ११६० इसवी हा दिला आहे. श. ११२१ च्या लेखांत एका अंमुगिदेवाची कांहीं माहिती आली आहे. तेव्हां नरसिंहाचार्य यांनीं उल्लेखिलेला अंमुगिदेव व या लेखांत आलेला यांचा कांहीं संबंध असेल काय ? शिलालेखांत **अंमुगिदेव** असें नांव आहे व नरसिंहाचार्य **अमुगिदेव** असें नांव देतात. त्याच्या वचनांत अमुगेश्वरलिंग असें नांव येतें, येवढा तिहींमध्यें फरक आहे. काल मात्र जवळ जवळ एकच आहे.

(१) मुगिदेव[1] ....
(२) [श्रीम] तु यादव [ना]....
(३) ....ण प्रतापचक्रवर्ती सि [ह]....
(४) ....र्षद २७ नेय व्यय सं [व]....
(५) ....क सुध........सोमवारदं
(६) [स] व्वनमस्थ पूर्नजय....
(७) .... [नं]नाळिगे अंमुगिदेवन तं....
(८)....ककेगे द समेय[2]

---

१९ भिवघाट येथील कानडी शिलालेख*

(श्री. ग. ह. खरे)

उपलब्धि:—प्रस्तुत शिलालेख मु. नेलकरंजी ता. आटपाडी स. औंध येथील रानांत असलेल्या भीमाशंकराच्या देवळांत होता. पूर्वी तो लेख स्थानिक लोकांनीं देवळाच्या बांधकामांत घातला होता. पण श्रीमंत पंतप्रतिनिधि यांच्या नजरेस ती गोष्ट येतांच त्यांनीं तो बांधकामांतून काढवून औंध येथें आणविला आहे. लोकांनीं तो बांधकामास योग्य करण्यासाठीं त्याच्या उजव्या अंगाचा भाग तोडून काढल्यामुळें प्रत्येक ओळीचा उजव्या बाजूचा शेवटचा कांहीं भाग नाहींसा झाला आहे. या लेखाची लांबी, रुंदी ४′ ४″ व १′ १″ ते १′ ४″ असून वरचा सुमारें ९ इंच भाग व खालचा २॥३ इंच भाग कोरा आहे. पैकीं वरच्या कोऱ्या भागांत पूर्वी शिवलिंग वगैरे चित्रें असण्याचा संभव आहे. सध्यां तो छिनून काढलेल्या स्थितींत आहे. लेखावर ऊन, पाऊस, वारा व मनुष्यानें अज्ञानानें केलेले आघात यांचा परिणाम होऊन तो अगदीं अस्पष्ट होऊन गेला

---

१ या ओळींतील अक्षरें इतर ओळींतील अक्षरांच्या मानानें लहान आहेत.
२ पुढंजचे आणखी दोन लेख मजपाशीं आहेत. ते पुढें सवडीनें प्रसिद्ध करीन.
* पा. स. ६।१८५५

असल्यानें वाचणें व त्याचे ठसे घेणें अवघड झालें आहे. बऱ्याच ठिकाणीं लेख अगदीं लागेनासा झाला आहे.

लिपी, लेखनपद्धति व भाषाः—लेखाची लिपी शकाच्या १२ व्या शतकांतील कानडी लिपीशीं जुळणारी आहे. जुने र व ळ यांचा उपयोग क्वचितच केला आहे. म चें एकच रूप आढळतें. जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचा उपयोग कोठें केलेला दिसत नाहीं. व, स, क, या अक्षरांबद्दल कांहीं ठिकाणीं य, श, ख हीं अक्षरें वापरलेलीं दिसतात. या लेखांतील आरंभींचा ' नमस्तुंग० ' हा श्लोक सोडून देतां बाकी सर्व लेख जुन्या कानडी भाषेंत असून गद्य आहे. जुनें कानडी संस्कृतप्रचुर असल्यानें या लेखांतही संस्कृत शब्दप्रयोग पुष्कळ आहेत.

कालः— या लेखांत कालाचे दोन उल्लेख आहेत. पैकीं पहिला विजय संवत्सर पौष शुद्ध १५ सोमवार उत्तरायणसंक्रमण या अर्थी आहे. या उल्लेखावरच कळचुर्य सोयिदेव राज्य करीत असतांना असें म्हटलें असल्यानें हा विजय संवत्सर त्याच्या कारकीर्दींतील होय. सोयिदेव श. १०८९ ते १०९८ पर्यंत राज्य करीत होता व श. १०९५ ला विजय संवत्सर येत असल्यानें या विजय संवत्सराच्या उल्लेखानें गत शक १०९५ हें साल विवक्षित आहे. या सालीं पौष शुद्ध द्वादशीला सोमवार होता पण मकरसंक्रांत आणखी एक आठवड्यानें म्हणजे सोमवार पौष वद्य तृतीया या दिवशीं लागत आहे. श. १०९४ किंवा १०९६ या दोन्ही वर्षीं वरील तऱ्हेचा योग जुळून येत नाहीं. तेव्हां मितींत कोठें तरी चूक झाली आहे असें म्हणावें लागतें. पौष शुद्ध द्वादशीस इंग्रजी तारीख १७ डिसेंबर ११७३ ही येते. कालाच्या दुसऱ्या उल्लेखांत संकमदेव राज्य करीत असतां येवढ्याच अर्थाचे शब्द लागतात. कळचुर्य संकमदेव श. १०९८ ते ११०२ पर्यंत राज्य करीत होता. तेव्हां या लेखांतील दुसऱ्या भागांतील दान श. १०९८ ते ११०२ या दरम्यान झालें असावें.

स्थळ—या लेखांतील स्थळांचीं नावें नीटशीं लागत नाहींत. पण एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे कीं, ज्या गांवांतील जमिनी देवास दान केल्या आहेत तीं गावें पाडे नांवाच्या नाडांत म्हणजे देशांत होतीं. ज्या गावाच्या हद्दींत हा लेख होता तें गांव आटपाडी तालुक्यांत आहे. पूर्वीं तें आटपाडी महालांत होतें. या महालाची दक्षिणेकडील स्वाभाविक हद्द भिवघाटाचा

ले. ७० } { श. १५००–०१
हि. ९८६ } { इ. १५७८–७९

(१) ब अहृद दौलत खाकान आदिल व फरीदून–हश्मत दारा–मदारा निजाम मुल्क व मिलत हामी दीन

(२) हुसेनी मुर्तजा आं शेर हैजा बरस्म खादिमान आस्तानश हझारान खुस्रव [व*] जम्शीद व दारा

(३) जहां रोशन शुद अझ खूर्शीद अदलश जुलाम जुल्म पिन्हान शुद चूं उन्का चुनीं हौज लतीफ बासफाई

(४) मुरत्तब शुद बसई हाजी आका च हौजी दर कमाल खुर्रमी बूद बुवद तारीख ऐन खुर्रमीहा ९८६

अर्थ

न्यायी राजा, फरीदून प्रमाणें शूर, दारा प्रमाणें नम्र, मुलूख व धर्म यांचा व्यवस्थापक, धर्माचा मार्गदर्शक, रणव्याघ्र, अशा हुसेनी मुर्तजाच्या राज्याच्या कारकीर्दीत, हजारों खुस्रु, जमशीद व दारा (याप्रमाणें असलेल्या) त्याच्या उंबरठ्याचे चाकरांच्या (वागण्याच्या) पद्धतीनें, त्याच्या न्यायसूर्यामुळें जग प्रकाशित झालें व उन्क्याप्रमाणें जुलमाचा अंधार लुप्त झाला. असा सुंदर व स्वच्छ हौद हाजी आका याच्या प्रयत्नानें पूर्ण झाला. जणू पूर्ण आनंदाचा हौद होता. ऐन खुर्रमीहा (आनंदाच्या झऱ्यांत) यांत मिती आहे.

२

हा लेख जुन्नर येथेंच हल्लींच्या पोष्टाच्या जागेजवळ देशमुखांचा एक वाडा आहे त्या वाड्याच्या पश्चिम दरवाज्याला लागूनच असलेल्या मशीदींत आहे. हा मुख्य मेहराबीच्या वरती असून त्यावर कोणी चुना फासून लेखाचीं उठावदार अक्षरें रंगानें काळीं केलीं आहेत. या लेखाच्या ओळी तीन असून त्यांपैकीं १॥ ओळी अरबी व १। ओळ फारसी आहे. या लेखाचा ठसा आणण्याचें मी रहीत केलें कारण हा लेख मला खरा नाहीं असें वाटतें. याचीं कारणें अशीं (१) ही मशीदच इतकी भिकार आहे कीं ती १०० वर्षांपूर्वीची असेल कीं नाहीं याची शंका येते. (२) वर सांगितलेल्या रीतीनें दोन भाषांचें मिश्रण असलेले लेख माझ्या

१ एक काल्पनिक पक्षी.

पाहण्यांत नाहींत. (३) लेखनपद्धति व भाषा या दोहींत दोष आहेत. (४) मला शंका आली म्हणून मी एका अक्षराचा नुक्ता थोडा धक्का लावून पाहिला. तों तो एकदम निखळून पडला व तो मातीचा किंवा फार तर न कमावलेल्या चुन्याचा असावा असें वाटलें. (५) यांत ९८९ हा सन घेतला आहे तो बहुधा हौदाच्या लेखावरून घेतला असावा.

ले. ७१ } हि. ९८९ } { श. १५०३–०४ { इ. १५८१–८२

(१)[1] काल इल्लह तबारक व तआला मआमिर मसाजिद इल्लह मन (मवन?) अमन बिल्लह व अल–यौम–उल–आखिर व काल

(२) रसूल इल्लह सली इल्लह अलिय्यह व आलह मिन बनी (नबी? मस्जिद बनी (मबनी?)........दर झमान

(३) पादशाह जम–जाह खादिम–उल–बैत रसूल इल्लह मुर्तज़ा निज़ाम–शाह तअमीर नमूद ई मस्जिद्रा खैर–ख्वाह मुस्लिमानांन ज़ाबितखान फी ९८९

अर्थ

जमशीदचें ऐश्वर्य, परमेश्वराच्या प्रेषिताच्या घराचा चाकर,(असलेल्या) पादशहा मुर्तजा निजामशहा याच्या कालीं, मुसलमानांचें बरें इच्छिणाऱ्या जाबितखानानें ही मशीद बांधविली. (हि.) ९८९ मध्यें.

३

हा लेख जुन्नरलाच दगडगडी म्हणून जें एक आवार आहे त्याच्या वेशीवर बसविलेला आहे. हा बराच उंच असल्यामुळें याचा ठसा मला आणतां आला नाहीं. मी दूरदर्शकानें पाहून उतरून आणला आहे. या लेखाची लांबीरुंदी सुमारें १॥′ व १′ असून बाजूंस व मध्यें उठावाची जागा सोडून बाकीच्या भागांत हा उठावदार असा खोदला आहे. याच्या तीन ओळी असून लेखनांत वर्ण व स्वर निदर्शक सर्व खुणा वापरल्या आहेत. लेखाचा काल हि. १०३२ हा आहे. मुळांत हिजरी हा शब्द नाहीं. पण

१ अरबी भाग चांगला लागत नाहीं व तो धर्मग्रंथांतील एकादा भाग असावा म्हणून त्याचें भाषांतर दिलें नाहीं.

२ या शब्दाच्या वाचनाविषयीं शंका आहे.

जंगीझखानी मलिकंबराचा उल्लेख असल्यानें हा निर्देश हिजरीचाच असला पाहिजे.

ले. ७२ } { श. १५४५–४६
हि १०३३ } { इ. १६२३–२४

(१) बन्दह दर्गाह रुह्हानी
(२) याकूत मलिक अन्बर जन्गीझखानी
(३) फी सनतुन् सलास् व सलसीन व अल्फ

अर्थ

परमेश्वराचा चाकर याकूत मलिकंबर जंगीझखानी. १०३३ सालांत.

४

हा शिलालेख जुन्नर येथील म्युनिसिपल कचेरीच्या पूर्वेकडील दाराच्या दक्षिणेस भिंतीच्या दर्शनी भागावर जोत्यापासून सुमारें ५ फूट उंचीवर बसविलेला आहे. याची लांबीरुंदी सुमारें १,′ १′ फूट असून अक्षरें उठावाचीं आहेत. या लेखाच्या लेखनाचा विशेष हा आहे कीं, यांत फारसी किंवा अरबी लेखनास पूर्णत्व येण्याकरितां जीं चिन्हें वापरावीं लागतात तीं सर्व यथावत् वापरलीं आहेत. अर्थात यांत नुक्ते, जेर, जबर, पेश, इजाफत वगैरे चिन्हें तर आहेतच पण कोणतें अक्षर व्यंजन आहे, कोणतें पूर्ण आहे हें दाखविणारीं चिन्हेंही वापरलेलीं आहेत. लेखाची भाषा फारसी असून कविताबद्ध आहे, हें दुसरी ओळ व चौथी ओळ यांचें यमक जोडून दाखविलें आहे त्यावरून उघड होतें. यांत कालाचा दोन तऱ्हांनीं उल्लेख केला आहे. एक उल्लेख आंकड्यांनीं केला आहे व दुसरा चौथ्या ओळींत अब्जद् पद्धतीनें केला आहे. त्या ओळींतील ‘ कह ’ हा शब्द सोडून बाकींच्या शब्दांतील अक्षरांच्या किंमतींची बेरीज केली तर ती नेमकी १०८४ च भरते. अर्थात दोन्ही उल्लेखांचा मेळ आहे हें स्पष्ट होतें. लेखांतील उबैदी हा बहुधा या पद्याचा कर्ता असावा. मुख्लिसखानानें ही इमारत बांधली हें स्पष्टच सांगितलें आहे. हा दगड कोणत्या इमारतीवरील आहे हें सांगतां येत नाहीं. कदाचित् तो त्याच इमारतीचा असेल किंवा दुसऱ्या इमारतीचा काढून तीस लावला असेल. पुणें गॅझेटियरमध्यें हा दगड म्युनिसिपल कचेरीच्या दक्षिण किंवा रस्त्यावरील भिंतीस लावलेला आहे असें म्हटलें आहे तें मात्र चुकीचें दिसतें. तसेंच या

लेखाचा काल हिजरी १०४९ असा दिला आहे तोही चूकच दिसतो कारण माझ्या वाचनांत १०८४ हा सन येत असून तो अब्जद पद्धतीच्या उल्लेखाशीं तंतोतंत जुळत आहे.

ले. ७३ हि. १०८४	श. १५९५–९६ इ. १६७३–७४

(१) बस्त दार–उल–अमारत मुख्लिसखान
(२) रव्नके ई दियार गश्त अज़ू
(३) साले इतमामे आं उबैदी गुफ्त
(४) कह ई बिना यादगार गश्त अज़ू

सनह १०८४

अर्थ

मुख्लिसखानानें महानुभावित्वाचें घर बांधलें. या प्रदेशाची भरभराट त्यामुळें झाली. त्याच्या पूर्ण होण्याचें साल उबैदीनें सांगितलें कीं, हा पाया त्याचें स्मरण करविणारा झाला. सन १०८४.

---

१६ बीदरी–देशमूख*

(श्री. ग. ह. खरे.)

प्रस्तुतचे कागद श्री. भाऊराव आपटे एम्. ए.एल्.एल्.बी. मामलेदार संस्थान जमखंडी यांनीं मजला पाहण्यास दिले. त्यांनीं ते बीदरी येथील देसायांकडून आणले. त्यांपैकीं दोन पुढें देत आहें[१].

* २५ वें संमेलन.

१ या शिवाय आणखी २ कागद श्री. आपटे यांनीं मला दाखविले होते. पैकीं पहिला सु. १०६५ किंवा हि. १०७५ रबार १(= श. १५८६ कार्तिक शुद्ध २ = इ. १६६४ आक्टोबर ११) या तारखेचा आणि मिया हबीबुल्लह हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर यांस पाठविलेला फर्मान असून त्यांत रामनायक बिन निमनायक देसाई ठाणें बीदरी, याजकडे बीदरी,जनवाड, कवतगी, नदलबागे, नागनूर, मरीजीगलगी, तगूर, मातीचूर, मोतीपूर, जंबगी व तगलगी या गांवांतील पूर्वीची १९॥ चावर, १॥ दिरम

१

ले. ७४ सु. १०६५ हि. १०७५ रबर ९	बिस्मि. अल्मु.	श. १५८६ कार्तिक शुद्ध १० इ. १६६४ आक्टोबर १९

[वा. शि.]

खुर्शीद खानुम साहिबह

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब राए नायक नाम देसाई थानह बीदरी आंकह अझ शुहूर सनह खम्स सितैन व अल्फ चूं मञ्जअ नागनूर थानह मज्कूर बमायहताज महल अुलिया–जनाब हश्मत–कुबाब इस्मत–पनाह इफ्फत–दस्तगाह कुद्वत–उत–ताहिरात झुब्दत–उल–मखि- रात खातून सरापर्दह हया बानूए हरीम इज्झत व वफा मूनिस खिल्वत– सराए कद्स पर्दह–नशीन नसीमन उन्स मुखद्दिरह नकाब अज़्मत हद्बरह सुरादिकात रफअत दामत इस्मतहा व इफ्फतहा बर हुक्म फर्मान अश्रफ रवानस्त दरीं वला बदर्गाह मुअल्ला रोशन गर्दीद कह ऊ दर हर बाब बदेह मज्कूर तस्वीश दादह हश्त सरगावान बुर्दह अस्त अझीं मअना रिआ- याए देह मज्कूर परागन्दह शुदह व मी शवन्द हर्गाह मञ्जअ मज्कूर बमायहताज महल बमुअज्जमह बर हुक्म फर्मान अश्रफ रवां बाशद ऊ दर हर बाब बमहाल देह मज्कूर तस्वीश दादह हश्त सरगावान अझ देह बुर्दह रिआयाए देह मज्कूररा पैदल[1] कर्दन चह हद व अन्दाझह ऊस्त अकनून मी बायद कह मञ्जअ मज्कूर मअ कुल बाब व कुल वजूहात बमायहताज महल मअज्जमह दानिस्तह आंचह गावान अझ देह मज्कूर बुर्दह अस्त दर हाल बलकह दर साअत वापिस बदहद पेश्तर बहेच वज्ह मिन–उल–वजूह जरह तस्वीश बहाल बदेह मज्कूर न रसानद दरीं बाब ताकीद बलीग दानिस्तह हस्ब–उल–हुक्म अश्रफ बअमल आवरद अगर

व नवीन दिल्ली १७। चावर ९ दिरम, मिळून ३६॥। चावर १०॥ दिरम इतकी जमीन चालावण्याबद्दल हुकूम आहे. (फर्मानांत ७२ दिरम =१ चावर असा हिशेब दिसतो.) दुसरा कागद सु. १०८६ किंवा हि. १०९६ जिल्हज २५ (= श. १६०७ कार्तिक वद्य १२= इ. १६८५ नाव्हेंबर १३) या तारखेचा आणि सीदी याकूत हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर यांच्या नांवचा फर्मान असून त्यांत जोशांचे बाबतींतील जनवाड हें गांव रामचंद्र रायनायक यास इनाम दिल्याचें नमूद आहे.

१ कदाचित् तबद्दल असा शब्द असेल.

बाइस बदेह तस्वीश दहद यक़ीन दानद कह नतीजह आं मुस्तहसन न ख्वाहद शुद तादानद बर हुक्म फर्मान अश्रफ रवद तहरीरन फी-अत-तारीख ९ माह रबीअ-उस-सानी सनह १०७५

[समासांत*] पर्वानगी हुज़ूर खुर्शीद जुहूर अश्रफ अक्दस हुमायून आअला

सारांश

बादशाह → राय नायक देसाई ठाणें बीदरी

मौजे नागनूर हा गांव खुर्शीद खानुम साहिबा इजकडे चालूं आहे. तुम्ही या गावास प्रत्येक बाबतींत त्रास देतां व ८ गाई बैल घेऊन गेला. यामुळें या गांवची रयत परागंदा झाली आहे व होत आहे. हा गांव खुर्शीद खानुम साहिबाच्या ताब्यांत असतां तुम्हीं असें करावें हें केवढें धाष्टर्य ? तरी जे गाईबैल या गांवांतून घेऊन गेला ते याच वेळीं परत करा व दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें थोडासाही त्रास देऊं नका. जर पुन्हां त्रास द्याल तर खात्री असूं द्या कीं, त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. ता. ९ रविलाखर हि. १०७५

२

ले. ७५ जु. २० मोहरम १२	अ	श. १६८८ मार्गशीर्ष शुद्ध १५ इ. १६८६ नोव्हेंबर १९

[वा. शि.*]

[रा] मचन्द देसमुख व मुतसद्दियान व पतवारियान सेथियह व महाजन पर्गनह बीदरी मुज़ाफ सूबह दार-उज-ज़फर बीजापूर बिदानन्द दर्री वला बवज़ूह पैवस्त कह आंहा बा रिआयाए दिहात पर्गनह मज्कूर बसबब उबूर असाकिर मन्सूरह व आवारगी गनीम आकिबत-वखीम बेजा शुदह बायद कह बजम्इयत खातिर बवतन असली खूद आमदह आबाद शवन्द व बदस्तूर साबिक बाखिझात मुतआल्लिकह खूद पर्दाख्तह बकाफह रिआया तसल्ली व दिलासा कर्दह सर गर्म किश्त व कार साझन्द व दर आंचह मअमूरी व आबादानी पर्गनह व अफ्झूनी जिराअत बाशद सई बलीग बकार बुरन्द दुवाझ्दहुम १२ शहर मुहर्रम सनह ३० जुलूस

[पाठीवर *] बतरीक कौल शुद्द[1]

सारांश

रामचंद्र देशमुख, मुतसद्दी, पटवारी, शेटे व महाजन पर्गणे बीदरी सुभे विजापूर यांनीं जाणावें कीं, यावेळीं आमच्या कानावर आलें कीं, तुम्ही परगण्यांतील रयतेसह विजयी सैन्याच्या उतरून जाण्यामुळें व शत्रुसैन्याच्या भटकण्यामुळें निराश्रित झाला आहां. तरी तुम्ही आपल्या मूळ वतनावर जाऊन सुखी व्हावें आणि पूर्वीप्रमाणें आपआपल्या चाकरींत गढून राहून व रयतेस दिलासा देऊन तीस शेतकाम करण्यास लावावें. तसेंच ज्यांत परगण्याची आबादानी व भरभराट होईल व जिराअत उत्कर्ष पावेल तें करण्याचा सक्त प्रयत्न करावा ता. १२ मोहरम जुलूस ३०

१७ कऱ्हाड येथील ४ फारसी शिलालेख*

(श्री. ग. ह. खरे)

प्रस्तुच्या ४ लेखांपैकीं ३ कऱ्हाड येथील जामे मशीदींतील आहेत. पैकीं पहिले दोन मशीदींतील मधल्या कमानीसमोरच्या खांबांवर असून तिसरा मशीदीच्या उत्तरेकडील भिंतीच्या पूर्वबाजूस बसविलेला आहे. ४ था इदग्यावर आहे.

१

हा लेख दक्षिणेच्या खांबावर उत्तर बाजूस जमिनीपासून सुमारें ५ फुटांवर आहे. याची लांबीरुंदी १´,६॥″ व १´, २॥″ आहे. पैकीं ३॥ इंच रुंदीची एक धांदोटी मुख्य लेखाच्या वरच्या बाजूस असून ११ इंच रुंदीचा मुख्य लेख आहे. या मुख्य लेखाभोंवतीं नक्षीदार किनारी असून मध्यें ४ ओळींचा हा खोदला आहे. या लेखाची लिपी नस्ख पद्ध-तीची पण तुघ्रयाची छाया पडलेली अशी आहे. यामुळें यांतील मजकूर

१ जवळ जवळ याच मजकुराचें, मुरारी नायक देशमुखास लिहिलेलें, पण १५ रबिलाखर जु. ३० चें एक पत्र आहे.

* पा. स. ७।१८५५

ओळवार द्यावयाचा तर शब्दांतील अक्षरांची फोडफाड करावी लागेल व शब्द पूर्ण द्यावयाचे तर ओळवार लिहिण्यांत ढिलेपणा उत्पन्न होईल. लेखांत स्वर-व्यंजन चिन्हें क्वचित असून अक्षर निर्णायक बिंदूही व्यवस्थित दिलेले नाहींत.

ले. ७६ हि. ९८०,९८३	लिलह	श. १४९४।९५ व ९७।९८ इ. १५७२।७३ व ७५।७६

(१) खादिमी ई बय्तश बई फकीर हकीर
(२) खाक-सार पहिलवान अली बिन अहमद इस्फहानी
(३) अल-मुखातिब तीर-अन्दाज खान फर्मूदह शुद सनह ९८०
तमाम शुद बतारीख सनह ९८३
(४) ई तायखरी[1] बख्वानद अझ बराए बिना कुनिन्दह मस्जिद
तहिय्यह बका याद कुनद

अर्थ

परमेश्वरासाठीं. (१) या घराची सेवा या भिकारी, क्षुद्र, (२) मातीमोल, पहिलवान, अली बिन अहमद इस्फहानीस (३) तीर अंदाझखान किताब असलेल्यास फर्माविलेली आहे. सन ९८० [हि.]. [घर[2]] पूर्ण झालें. सन ९८३. (४) ही तारीख वाचील त्यानें इमारत बांधणाऱ्याच्या आभारांचें कायम स्मरण करावें.

२

हा लेख मशीदीच्या मधल्या मिहराबेसमोरच्या दोन खांबांपैकीं उत्तरेच्या खांबावर दक्षिण भागावर जमिनीपासून सुमारें पांच फूट उंचीवर खोदला आहे. याची लांबीरुंदी १' ६॥" व १०" असून भोंवतीं नक्षीदार किनार आहे. याही लेखाच्या ४ च ओळी आहेत. याची लिपीही पूर्वीच्या लेखाप्रमाणें नस्खी असून तुघ्रयाची मात्र याजवर छाया पडलेली दिसत नाहीं. पूर्वीच्या लेखाप्रमाणें यांतही स्वरव्यंजनचिन्हें क्वचित असून अक्षरनिर्णायक बिंदू व्यवस्थितपणें दिलेले नाहींत. याशिवाय यांत लेखनाच्या नियमांचा भंग केलेला आहे. उदाहरणार्थ तिसऱ्या ओळींत ईमाम व सलामत, खान व अला, अली व कान हे शब्द एकमेकांस जोडले आहेत. याचीही भाषा फारसी आहे.

---

१ तायख एवजीं तारीख असें वाचावें. 'रे' अक्षर गळलें आहे.

२ घर हा शब्द मशीद या अर्थी वापरला आहे.

अभिप्राय.

It is a real pleasure to go round the museum and study the various historical collections most valuable in every respect. It will be better if the managing committee will appoint some volunteers to guide the visitors and give short explanation. It makes a great difference when we are able to see and appreciate the things collected with understanding.

I hope the exhibition will prove a great success and the public will appreciate the work of the mandal.

30-6-33. Zubaida Syed.

A most interesting collection.

1-7-33. H. R. Lambert.

Shree Ganaraj,

I am very much pleased to see the collection of the old articles and so many historical things and records of letters. I am very much thankful that Mr. Potdar has given me an opportunity to see the mandal.

Friday, July 1933. K. M. Patwardhan.

Through the courtesy of Prof. Potdar, Mr. Jatar, my wife and I were shown over the most interesting exhibits collected by the mandal with infinite pains and arranged with so much care and thought. The collection contains some excellent specimens of Moghal-Rajput schools of painting and many rare objects of historical interest. They give a vivid picture of the life in the past, especially in the Maratha period in the Deccan. The institution may justly be proud of its achievements and with the devoted hand of earnest workers steadily increasing, it has a great future. We wish it all success.

16-8-33. B. De, I. C. S., C. I. E.
Commissioner (on leave)

प्रसिद्ध झाले !

मध्वमुनीश्वरांची कविता (पुर. क्र. ३०)

किं. ३ रु. सभासदांस २॥ रु.

मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (पुर. क्र. ३१)

किं. १ रु. सभासदांस १२ आणे.

मंडळांतील नाणीं (स्वीय क्र. ३७)

किं. १ रु.

विक्रयालय शाखा

मंडळाच्या या शाखेचे विद्यमानें खालील व इतर खास ऐतिहासिक मालांचीं पुस्तकें विकत मिळतील.

१ भा. इ. सं. मंडळ–स्वीय ग्रंथमाला.

२ भा. इ. सं. मंडळ–पुरस्कृत ग्रंथमाला.

३ श्रीशिवचरित्रकार्यालयाचे ग्रंथ.

४ कै. राजवाडे–मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (उपलब्ध खंड)

५ कै. खरे– ऐतिहासिक लेखसंग्रह.

६ 'पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद' ह्या हल्लीं चालूं झालेल्या नवीन मालेचीं पुस्तकें.

याशिवाय या शाखेमार्फत सभासद व इतर मागणीदारांचे सोयीसाठीं ऐतिहासिक व वाङ्मयिक ग्रंथ मिळवून पाठविण्यांत येतील. प्रत्येक ऑर्डरीबरोबर निम्मी रक्कम पाठविली पाहिजे.

BHARATA ITIHASA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIV] **QUARTERLY**

(55)

December, 1933.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १४ वें] **त्रैमासिक** [अंक ३ रा.

(५५)

पौष १८५५

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १ रुपया

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

निवेदन

वर्ष १४ अंक ३ आज प्रसिद्ध होत आहे.

या अंकांत शिवचरित्र साहित्य खंड ४ था, त्याची सूची, अनुक्रमणिका, मुखपृष्ठ, निवेदन या गोष्टी देऊन संपविला आहे. त्याचीं पूर्वींचीं पृष्ठें त्रैमासिक वर्ष ११ अंक २, ३, ४, वर्ष १२ अंक २, ३, ४, वर्ष १३ अंक १, २, ३, ४ आणि वर्ष १४ अंक १ यांत आलीं असून तीं सभासदांनीं एकत्र करून पुस्तक बांधवावें.

पुढील अंकांत इतर खंड पुरे करावयाचे आहेत.

त्रैमासिकाबाबत कांहीं **नवी योजना** आमचे मनांत घाटत आहे. त्यामुळें जुनीं प्रकरणें आधीं पुरीं करणें अवश्य आहे. पुढें काय ठरतें तें यथाकाल वाचकांस कळेलच.

हनुमज्जयंति
१८५६

चिटणीस.



भारत इतिहास संशोधक मंडळ मंदिर.



एक शिवमूर्ती ?   प्र. ६

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १४ वें] त्रैमासिक [अंक ३ रा.

१ तेराव्या शतकांतील शिमग्याचा सण*

(श्री. ह. ना. नेने M. A., L. T.)

' लीळाचरित्रा'च्या पुढील तीन उताऱ्यांत शिमग्याच्या सणाचा उल्लेख आला असून, तो सण कोणत्या प्रकारें साजरा केला जात असे याचें थोडेसें विस्तारानें वर्णन आहे. ' रत्नमाळा स्तोत्रामधील या लीळेचा संस्कृत उतारा बरोबर जोडला असल्यानें ज्यांना हें जुनें मराठी कळणार नाहीं त्या संस्कृत वाचकांची सोय झाली आहे.

२ ती होळीची ' पुनीव ' होती. ' सीमगेया कारणें...आले. ते दीसीं पुनीव ः '; रत्नमालास्तोत्रांत ' वसंतफाल्गुणे राकापर्व ' असे शब्द आहेत. त्यावरून फाल्गुन पौर्णिमेचे दिवस हे त्यावेळीं वसंतांत गणले जात होते काय अशी शंका येते. आपण सध्यां चैत्र व वैशाख हे महिने वसंतऋतूचे समजतो,

३ होळी रचणें, प्रदक्षिणा घालणें, होळीला पोळी (अपूप) देणें, ती होळींतील उंच अशा सोटाला बांधणें, इत्यादि प्रकारांचें वर्णन पुढील उताऱ्यांत आलें आहे. दुसऱ्या उताऱ्यांत धुळवडीचें वर्णन आहे. चक्रधरांनीं आपल्या पायाच्या अंगठ्यानें राख उधळली व ' हो जेरे ः हो जेरे ' असे (जनानाम् उपहासकं वाक्यं) लोकांना हसूं आणणारे शब्द उच्चारले. यानंतर एकमेकाच्या अंगावर फेकाफेकी सुरू झाली. ' राख, माती, चीखुल ' एकमेकांच्या अंगावर उधळणें हें एक सारखें प्रहरभर चालूं होतें. मग तेलानें अंग माखून व नीट चोळून सर्वांच्या आंघोळी झाल्या.

४ सारंगपंडित आपल्या बायकामंडळीसह गोसाव्यांच्या दर्शनास आले होते. पण शिमग्याचे दिवस असल्यानें त्यांनीं गांवाबाहेर मठांत न राहतां, गांवांत जाऊन राहण्यास त्यांना चक्रधरांनीं सांगितलें. ' गोसावी असतां, आम्हासि काइसें भए ' असें सारंगपंडित म्हणाले तरी देखील गोसाव्यांनीं त्यांना पुढील सूचना स्पष्टपणें

* पा. स. १०।१८५५

दिली. ' या देखतां हाटाचीए चौहटां तोंडीं तोंडीं थापवेऱ्हीं मारिजाल. ' यावरून असें दिसतें कीं, त्यावेळीं देखील शिमग्याच्या दिवसांत बायकांनीं इकडे तिकडे हिंडणें बीभत्सपणाच्या भीतीमुळें मोठें कठीण होतें. श्रीचक्रधर गोसाव्यांना देखील आपल्या समक्ष बीभत्सपणाचा प्रकार होणार नाहीं अशी खात्री वाटत नव्हती. तथापि श्रीगोसाव्यासारखी नीतिमंत प्रतिष्ठित माणसें त्यावेळीं हा सण कसा साजरा करीत होतीं हें पाहण्यासारखें आहे.

होळीला प्रदक्षिणा घालणें, पोळी वाहणें, नैवेद्य देणें, दुसऱ्या दिवशीं राख उधळणें, चिखल–माती–राख एकमेकांच्या अंगावर टाकणें, ' हो जेरे ' यासारखे हास्यकारक शब्द उच्चारणें इत्यादि प्रकारांत हीं वडील माणसें सामील होत असत असें दिसतें. आपल्या डोळ्यासमोर भलतेच प्रकार होऊं नयेत अशाबद्दल ते काळजी घेत. तोंडानें अपशब्द उच्चारणें किंवा ' शंखनाद ' करणें असल्या कृतींत ते भाग घेत नव्हते.

५ जुन्या मराठी शब्दांच्या दृष्टीनें ' आइती ' ' पुनीव ' ' बीढार ' ' हाट चौहाट ' ' माडा ' ' फुटा ' ' अंगी ' ' पालव ' ' नावेक ' ' आरोगण ' ' धाटा ' ' मर्दना–मादर्ने ' इत्यादि शब्द मननीय आहेत. ' गोसावी असतां आम्हांसि काइसें भए (देवे सति किमस्माकं भविष्यति),' ' या देखतां हाटाचीए चौहटां ... मारिजाल (अस्य दृष्टेः पुरःस्थितं जनास्त्वां ताडयिष्यन्ति),' ' तरि काइ इतुलेंयाचि पुरतें ईश्वर्य म्हणा (एतावत्तु किमैश्वर्यं). ' इत्यादि ठिकाणची वाक्यरचना लक्षांत घेण्यासारखी आहे.

' थापवेऱ्हीं ' म्हणजे ' चपराकांनीं,' होळी लावणें, बीजें करणें, आंगी लेणें, इत्यादि वाक्प्रचार ध्यानांत ठेवण्याजोगे दिसतात.

विभक्तींच्या दृष्टीनें पुढील रूपें ध्यानांत धरावीं. सीमगेया कारणें (चतुर्थी) दरिसना (दर्शनासाठीं, चतुर्थी), आइतीसीं (तृतीया), आम्हासि भए (चतुर्थी) चौहटां (सप्तमी), भटाचां घरीं (षष्ठी-सप्तमी), होळीए प्रदक्षिणा (चतुर्थी) श्रीचरणेंचेनि आंगुठेनि (तृतीया).

क्रियापदांचीं पुढील रूपें मननीय आहेत. मारिजाल (मारले जाल, कर्मणि), कीजो (करावें, विध्यर्थ) इत्यादि.

सीमगां सारंगपंडितीं सीपणें.

(*उत्तरार्ध २० वी लीळा*)

१

सीमगेयां कारणें सारंगपंडित गोसावीचेया **दरिसना** आले : उगाणेयाचा बैलु अवघीए सणीची **आइतिसीं** (सामग्रीसह) आले : ते दिसीं **पुनीवः**

गोसावी दरीसन (दर्शन) जालें : वीळिचा पुजा अवस्वरु जाला : मग सर्वज्ञें भणीतलें : **पांडेया** (सारंगपंडित) तुम्ही परिग्रही (बायकोसह) असा : तुम्हीं गांवां आंतु **बीढार** (बिऱ्हाड) कराः जी जीः **गोसावी असतां आम्हासि काइसें भए** : सर्वज्ञें भणीतलें : या देखतां **हाटाचीए** (बाजाराच्या) चौहटां (चौकांत) तोंडीं तोडीं **थापवेऱ्हीं** (चपराकांनीं) मारिजाल : तरि हें नव्हे ईश्वरु : तरि काइ : इतुलेंयाचि पुरतें ईश्वर्य म्हणा : हो कां : जी : मग सारंगपंडित गांवां आंतु गेले : एल्हंभटाचां घरीं **बीढार** (बिऱ्हाड) केलें : मग वीळिचां (वेळेवर) गोसावीया नाथोबा करवि होळी रचवीली : उपाध्यां करविं गोसावी होळीए प्रदक्षिणा करवीली : सर्वज्ञें भणीतलें : एथिचा विधि हा जाणे : मग उपाधीं (उपाध्यानें) जीए वेळ होळी लावावी : तीए वेळ होळी लाविली : मग **बाइसातें** (एक शिष्यीण) **माडा** (अपूप, पोळी) मागितला : तो वांधला : **नैवेद्य** दाखवीला : मग गोसावी तेथ **बीजें केलें** (गमन केलें) : होळीए प्रदक्षिणा केली : गोसावी **फुटेयाचे** (आंगावरील धोतर) दोन्हीं **पालवे** (पदर) श्रीमुगुटावरि घातले होते : प्रदक्षिणा करितां चंदन दीसे : **नावेक** (थोडा वेळ) गोसावी उभे होते : मग बीजें केलें : गोसावीयासि आरोगणा (खाणें) जाली : मग पहुड (निजणें) जाला ॥ २० ॥

२

उदेयांचि सारंगपंडित पुजाअवस्वराचीए **आइतीसीं** आले : सरीयाचें चंदन उगाळिलें : गोसावीयासि सर्वांगीं ओळगवीलें : गोसाविया पुजावस्वरु जाला : भक्तजना चंदनाचे टीळे लाववीले : तांबोळें दीधलीं : मग गोसावी **मेघवाणी** (मेघवर्णी) पागेचा **धाटा** (वस्त्र) केला : फुटेयाचे दोन्ही पालव श्रीमुगुटावरि घातले : गोसावियासि सेंदुर ओळगवीलें : कापुर कस्तुरी पानें पोफळें फुलें : मग गोसावीये होळीए पासीं **बीजें केलें** : मग **श्रीचरणेचेनि आंगुठेनि** (आंगठ्यानें) हो जे रे : हो जे रे : भणोनि राख उधळिली : आणि सीपणें प्रवर्तलें : सर्वज्ञें भणितलें : पांडा (सारंगपंडित) नको : सारंगपंडित **आंगीया** लेउनि आले होते (धूतकंचुकसंयुक्तः) : तेयावरि घातलें : **राख : माती : चीखुल** : ऐसा पाहारु एक सीपणें जालें : मग सर्वज्ञें भणितलें : आतां पुरें **कीजो** गा (करा गा) : मग गोसावी बीढारा **बीजें गे(के)लें** ॥ २१ ॥

३

गोसावी **मर्दना** (आंग माखणें) जाली : मार्दनें (अंग चोळणें) जालें : गोसावी नाहातां उरलें तेल तया तेलां आंतु घातलें : मग गंगे न्हालें :

१

वसंतफाल्गुणे राकापर्वं चैकं बभूव ह ।
परेशदर्शनार्थं वै शार्ङ्गनामा समाययौ ॥ १ ॥
श्रीप्रभोर्दर्शनं जातं पूजयामास तं द्विजः ।
सायंकाळे[ऽ*] ब्रवीद्विप्रं चक्रपाणिः सुरेश्वरः ॥ २ ॥
ग्रामांतर्गच्छ विप्रेन्द्र यतस्त्वं सपरिग्रहः ।
देवे सति किमा(म)स्माकं भविष्यति परेश्वर ॥ ३ ॥
परः प्रोवाच विप्रेन्द्रमस्य दृष्टेः पुर[ः*] स्थितम् ।
जनास्त्वां ताडयिष्यन्ति तर्हि किं भवेदिदम् ॥ ४ ॥
एतावत्तु किमैश्वर्यमित्युक्तं जगदात्मना ।
स्वीकृत्य वाचमीशस्य ग्रामान्तः प्रागमद्द्विजः ॥ ५ ॥
तद्दिने होळिकामीशः प्राकारयद्वि(द्वि)जोत्तमैः ।
जनार्दनेन तत्सर्वमकारि परमेच्छया ॥ ६ ॥
बद्ध्वा चापूपकं स्तम्भे नैवेद्यं च समर्पयन् ।
तत्रागत्य परः स्वामी तेनाकारि प्रदक्षिणा ॥ ७ ॥
क्रीडन्नेवं जगत्स्वामी स्वकं स्थानं जगाम ह ॥

२

ततोऽसौ प्रातरुत्थाय सारंगाख्यो द्विजोत्तमः ।
प्रागमच्चक्रपाणिं तं ननाम चरणौ प्रभोः ॥ १ ॥
पुष्पतांबु(बू)ळकस्तु(स्तू)रिचंदनादिविलेपनैः ।
पूजयामास चक्रेशं वशं तस्योपचारकैः ॥ २ ॥
ततः परेण संवेष्ट्य वस्त्रं तन्मेघवर्णकम् ।
होळिकान्तिकमागत्य रक्षामुद्धृत्य चांघ्रिणा ॥ ३ ॥
प्राह वाक्यं जगद्बन्धुर्जनानामुपहासकम् ।
क्रीडयामास दासैस्तै[ः*] प्रावर्तत कुतूहलम् ॥ ४ ॥
धृतकंचुकसंयुक्तः सारंगाख्यः कृतस्तथा ।
विहरन् याममेकं च खेळायित्वा मठं व्यगात् ॥ ५ ॥

३

ततः परेशस्य च मर्दनाभून्निमज्जनं चाथ परेशदासाः ।
परस्परं सस्तुरनाथबन्धोरुद्वर्तनेनैव च तैल्यकेन ॥ १ ॥
पंक्तिः परेशस्य ततः प्रजाता समागता दासजनाश्च सर्वे ।
उपाविशन् भोक्तुमनाथबन्धोर्दृशा पवित्रं परमं तदन्नम् ॥ २

२ दोन मनोरंजक मूर्ती.*

(श्री. ग. ह. खरे)

शिव, पार्वती व दाक्षायणी : भोर संस्थानापैकी कारी येथें जेधे नांवाचें एक मराठा देशमुख घराणें आहे. त्यांचे घरांत या देवतेच्या ३ मूर्ती आहेत. या मूर्ती त्यांच्या पूर्वजांनीं कर्नाटकांतून आणिल्या असें ते सांगतात. या मूर्ती तांब्याच्या असून ज्या सिंहासनावर त्या बसविल्या आहेत तें सिंहासन व पाठीमागील प्रभावळ पितळेची आहेत. या तीन मूर्तीपैकीं मधली मूर्ती शंकराची आहे. तिन्ही मूर्ती उलट्या कमलांवर बसलेल्या आहेत. शंकराच्या मूर्तीचा उजवा पाय खालीं सोडलेला व डावा पाय मांडी घातलेला असा आहे. यास ललितासन असें म्हणतात. शंकरास चार हात आहेत. पैकीं उजव्या बाजूचा खालचा हात अभयमुद्रा दाखवीत असून वरच्या हातांत परशू आहे. डाव्या बाजूच्या वरच्या हातांत उडी मारणारें हरिण असून खालच्या हाताच्या बोटांपैकीं करंगळी उघडी आहे. अनामिका व मधलें बोट हीं मिटलेलीं आहेत. तर्जनी व आंगठा हीं एकमेकांस चिकटवून त्यांचें वर्तुळ केलें आहे. ग्रंथांतरीं करण व वितर्क या दोन मुद्रा वर्णन केल्या असून त्या, बोटांच्या या मुद्रेशीं कांहींशा मिळत्या आहेत. पण सर्वस्वी मिळत नाहींत. कारण करणमुद्रेंत करंगळी व तर्जनी हीं उघडीं करून ठेवावयाचीं असतात व मधलीं दोन बोटें आंगठ्यानें तळ हाताशीं दाबावयाचीं असतात. पण येथें तसें केलेलें नाहीं. तसेंच वितर्कमुद्रेंत आंगठा व तर्जनी हीं एकमेकास मिळवून त्यांचें वर्तुळ बनवून बाकीचीं उघडीं ठेवावयाचीं असतात. पण हीही मुद्रा या शंकराच्या मूर्तीच्या आतां वर्णिलेल्या बोटांच्या स्थितीशीं जुळत नाहीं. (पहा Budhist Iconography पृ. १९३, १९९) तिन्ही मूर्तींचे मुकुट एकाच पद्धतीचे असून शंकर व पार्वती यांच्या मुकुटांवर एका बाजूस सूर्य व दुसऱ्या बाजूस चंद्र दाखविला आहे. शंकराच्या गळ्यांत कंठी, दुहेरी माला व जानवें हीं असून शिवाय छातीस उरोबंधही दाखविलेला आहे. खांदे, कोपरें, मनगटें, घोटे यांवर भूषणें असून घोट्यावरील दागिना गुजराथी स्त्रियांच्या घोट्यावर असलेल्या साखळीप्रमाणें दिसतो. कमरेस वस्त्र असून त्यावर कटिबंध आहे. कानांत मकरकुंडलें आहेत. डाव्या अंगास मांडी घातलेली पार्वतीची मूर्ती आहे. हिची व उजव्या बाजूच्या मूर्तीची उंची शंकराच्या सुमारें ३/४ इतकी असून वजन शंकराच्या निमें भरेल असा माझा अजमास आहे. हिच्या दोन हातांपैकीं उजवा वरद मुद्रेचा असून डावा कमलकलिका धारण करीत आहे. पार्वतीच्या गळ्यांत कंठी, दोन माला हे दागिने असून स्तनबंधानें उन्नत स्तन बांधलेले आहेत.

* पा. स. ४।१८५५

खांदे, कोपरें व मनगटें यांवर भूषणें आहेत. कानांत बाळ्या आहेत. कुंडलें नाहींत. कमरेला नेसत्या वस्त्रावर कटिबंध आहे. उजवी स्त्री पार्वती एवढीच आहे. तिच्या उजव्या हातांत अर्धोत्फुल्ल कमलकलिका असून डावा वरद मुद्रेचा आहे. पार्वतीच्या मानानें हिला दागिने कमी आहेत. उन्नतस्तनी असून स्तनबंध नाहीं. कमरेस वस्त्रावर पार्वतीप्रमाणें कटिबंध आहे. पण कानांत पार्वतीप्रमाणें बाळ्या न घालतां फक्त कुंडलें अडकविलेलीं आहेत.

ही दुसरी मूर्ती कोणाची असावी याबद्दल माझा बरेच दिवसांपासून विचार चालू होता. पण निश्चय होईना. शेवटीं म्हैसूरच्या आर्किऑलॉजी खात्याच्या १९१६ च्या रिपोर्टांत तुरुवेकेरे येथील गंगाधरेश्वर देवळांतील धातुमूर्तीवरून ही तिसरी मूर्ती दाक्षायणीची असावी असा माझा ग्रह झाला आहे.

अलीकडे कित्येक ठिकाणीं दाक्षायणी व पार्वती या एकच असून पार्वतीच पूर्वजन्मीं दाक्षायणी होती अशी कथा प्रचलित झालेली आहे. पण पूर्वीं अशी कथा प्रचलित होती कीं नाहीं याविषयीं संशय आहे. अमरकोशांत पार्वतीच्या नांवांत सती किंवा दाक्षायणी हीं दोन्हीं नांवें नाहींत (श्लोक ३६,३७). पण टीकाकार क्षीरस्वामी ' देश्यां ' असा शेरा मारून पार्वतीची ' जगन्माता, आर्या, भैरवी, सती, दाक्षायणी, गणनायिका ' अशीं आणखी पर्यायनामें देतो. तसेंच अमरकोशाच्या कित्येक आवृत्तींत ' आर्या दाक्षायणी चैव गिरिजा मेनकात्मजा ' अशी एक ओळ प्रक्षिप्त म्हणून दिलेली असते. यावरून पार्वतीच पूर्वजन्मीं सती होती ही कल्पना कोणी तरी मागाहून बसविलेली आहे असें दिसतें. निदान हल्लीं तरी पूर्वजन्माची स्मृति सांगून दोन व्यक्तींचें ऐक्य कल्पणें लोकांस पटणार नाहीं. वास्तविक प्रकार असा दिसतो कीं, शंकराची सती दाक्षायणी ही पहिली बायको असून दक्षयज्ञांत शंकरास न बोलावल्यामुळें चिडून जाऊन दक्षाचा यज्ञ मोडतांना ती मारली गेली असावी किंवा दुसऱ्या कथेप्रमाणें शंकरांनीं तिचा त्याग केल्यामुळें उत्पन्न झालेल्या उद्वेगाच्या भरांत तिनें स्वतःच्या देहाचा त्याग केला असावा. नंतर शंकरांनीं पार्वती ही दुसरी बायको केली. अर्थात् त्या दोघींना स्वतंत्र अस्तित्व असल्यामुळें मूर्ती करतांनाही शंकरास क्वचित् दोन बायका दाखवीत असावे. सती व पार्वती या एक मानल्यास त्यांच्या एकाच वेळीं दोन मूर्ती का करावयाच्या हें नीट सांगतां येत नाहीं.

एक शिवमूर्ती?: प्रस्तुतची मूर्ती मंडळाच्या संग्रहांतील आहे. सिंहासनासह या मूर्तीची उंची साडे सहा इंच असून ती पितळेची आहे. सिंहासनावर कमलाकार बैठक असून तिवर कातडें अंथरून ही मूर्ती आसनमांडी घालून बसलेली आहे. या कातड्यास दोन्ही बाजूस प्रत्येकीं दोन छोटे पाय असून पाठीमागें बकरा किंवा हरिण यांच्याप्रमाणें लहान शेपटी आहे व पुढें डोकें आहे. या डोक्यास चढत्या पिळाची दोन

सरळ शिंगें आहेत. हें तोंड बकरा किंवा बैल किंवा हरिण यांच्या तोंडासारखें दिसतें. मूर्तीच्या डाव्या मांडीवर पार्वती बसलेली आहे. मूर्तीला आठ हात असून त्या हातांत दक्षिणाधःकरक्रमानें (१) धनुष्य, (२) अक्षमाला, (३) त्रिशूल, (४) शंख, (५) चक्र, (६) डमरू, (८) कमंडलू या वस्तू आहेत. सातवा हात वरदमुद्रेचा असून तो शक्तिच्या पाठीमागून आलेला आहे. मुख्य मूर्तीच्या गळ्यांत कंठी, हार, व जानवें हीं असून डोक्यावर मुकुट आहे. कान, खांदे, दंड, मनगटें, कमर, घोटे, पावलें, आंगठे, तर्जनी, करंगळी, यांवर त्या त्या ठिकाणचीं भूषणें असून मूर्तीची दृष्टी समोर आहे. शक्तीच्या उजव्या हातांत कमलकलिका असून डावा हात पुरुषमूर्तीच्या सातव्या हातावरून खालीं सुटलेला आहे. शक्तीचे दोन्ही पाय खालीं सुटलेले म्हणजे भद्रासनाचे आहेत. शंकराच्या प्रमाणेंच शक्तीच्या अंगावर दागिने असून स्तन उन्नत दाखविले आहेत.

आतां ही मूर्ती शंकराची आहे असें जरी मी म्हणत आहे तरी त्याबाबतींत माझा पूर्ण निश्चय झालेला नाहीं. याचें कारण असें:—

या मूर्तीच्या हातांत जीं आयुधें आहेत त्यांपैकीं अक्षमाला व कमंडलू हीं आयुधें ब्रह्मदेवाचीं, त्रिशूल व डमरू हीं आयुधें शंकराचीं आणि शंख व चक्र हीं आयुधें विष्णूचीं आहेत. एक हात मोकळाच आहे. राहिलेल्या एका हातांत धनुष्य आहे. या धनुष्याचें वैशिष्ट्य असें कीं, त्याच्या कांबीवरच त्याची दोरीही दाखविली आहे. यामुळें त्यास धनुष्यही म्हणतां येईल व थोड्या अडचणीनें दंडही म्हणतां येईल. तेव्हां ब्रह्मा, विष्णु, महेश या तिघांचीही आयुधें येथें पाहण्यास सांपडतात. ज्याप्रमाणें कोणा भक्तानें हरि व हर यांचें जोड रूप कल्पून एक नवीनच हरिहर तयार केला त्याप्रमाणें कोणी भक्तानें ब्रह्मा, विष्णू, महेश एकत्र करून हें रूप तयार केलें नसेल ना ? अर्थात् या मूर्तीस मग ब्रह्मेशानजनार्दन असें म्हटलें पाहिजे. पण असें म्हणतां येणें जर शक्य नसेल तर मग हिला शिवमूर्ती म्हणूनच संबोधावें लागेल.

३ आळंदीच्या यात्रेचा पेशवाईतील बंदोबस्त.*

(श्री. दि. वि. काळे, एम्. ए.)

श्रीज्ञानदेवांच्या समाधीमुळें पवित्र झालेल्या पुण्याजवळील आळंदी क्षेत्रास श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या वेळेपासून निरनिराळ्या निमित्तानें सनदा व दानें मिळालेलीं आहेत ही गोष्ट सर्व इतिहासज्ञांच्या परिचयाची आहेत. श्री. गणेश

* २१ वें संमेलन.

हरी खरे (भा. इ. सं. मंडळ) यांनीं आपल्या श्रीक्षेत्र आळंदी (शके १८५३) या छोट्या पुस्तकांत ऐतिहासिक राजपुरुषांचे आळंदी क्षेत्राशीं आलेले संबंध कालानुक्रमानें एकत्र आणिले आहेत. त्यावरून राजमाता जिजाबाई, शिवाजीमहाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज, चिमाजी आप्पा, बाळाजी बाजीराव पेशवे, कान्होजी आंग्रे यांची थोरली स्त्री लक्ष्मीबाई, उमाबाई दाभाडे इत्यादि बऱ्याच स्त्रीपुरुषांचे उल्लेख ज्यांत आहेत असे अनेक कागद-पत्र छापले गेले आहेत असें दिसतें. चिमाजी आप्पा आदिकरून राजपुरुष यात्रेला येत व आळंदीला यात्रेच्या निमित्तानें मोठी व्यापारी उलाढाल चाले हें दर्शविणारे कागद-पत्रही छापले गेले आहेत असें त्यावरून दिसतें.

छापील साधनग्रंथांतील हे उल्लेख शके १६९६–९७ म्हणजे इ. स. १७७४–७५ पर्यंतचे आहेत. एलिअनेशन ऑफिसमध्यें यानंतर सु. स. ११९९–१२०२ म्हणजे इ.स. १७९८–१८०१ पर्यंतचे आढळले आहेत. त्यावरून यात्रेच्या बंदोबस्ताचें काम पेशवाईअखेर अखेर पर्यंत आस्थेनें केलेलें दिसतें.

इतर कांहीं उद्देशानें पेशवे दप्तरांतील हिशेबाचे कागद तपासतांना '**यादी जकात प्रांत पुणें व जुन्नर**' व 'अजमास **जकात–पुणें व जुन्नर**' असे दोन कागद पहावयास मिळाले. हे त्या त्या मामलतदाराकरितां सरकारकडून तयार झालेले कागद आहेत. यांत आळंदीच्या यात्रेच्या रखवालदारीबद्दल व यात्रेच्या प्रसंगीं घ्यावयाच्या दलालीबद्दल उल्लेख आहेत.

पहिला उल्लेख असा– खर्चाकडे

'२२००। तिसा तिसैन ११९९ (इ. १७९८) आलंदीचे यात्रेचे रखवालीस सरकारचे लोक सालाबाद जातात ' त्यांच्याकरितां खर्च पडले आहेत.

यावरून इतर उत्पन्नाची कदर न बाळगतां केवळ यात्रेकरूंच्या सोईकरितां दरसाल सुमारें दोन अडीच हजार रुपये सरकारच्या खजिन्यांतून खर्च पडत होते ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते. सार्वजनिक ठिकाणीं बंदोबस्त ठेवण्याची जबाबदारी हल्लींच्याप्रमाणेंच पूर्वीचें पेशवाई सरकारही घेत असे, ह्याला वरील उल्लेख म्हणजे भरपूर पुरावा आहे.

याच बाबतींत मामलेदाराशीं व्हावयाच्या करारांत खालील काम कायमचें समाविष्ट केलें आहे.

'(१३) आलंदीचे यात्रेसमई रखवालीस राऊत असामी ५० व हशम गाडदी आा १५० अवलीपासून जात्रा अखेरपावेतों दरसाल देत जावे.'

या उल्लेखांवरून आळंदीहून पंढरपुरास ज्ञानोबाची पालखी जाते त्यावेळीं बरोबर जाण्याकरितां हे लोक देत असावे असें एके काळीं मला वाटत होतें. परंतु

राजवाडे खं. ३ मधील उल्लेखावरून तो तर्क खोटा ठरतो असें मला वाटतें. तेंहि येथें नमूद करून ठेविलें पाहिजे.

आळंदीबद्दलचा दुसरा उल्लेख 'आळंदीचे यात्रेस वगैरे दलाली ज्या कुलास जे सुदामत घेत आले त्याप्रमाणे घ्यावे. नवीन जाजती घेऊं नये' असा आहे. जकातीचें उत्पन्नाचा अजमास (कागद) बनवितांना मामलेदाराला दिलेला हा दंडक आहे. यांत जकात याच अर्थानें दलाली हा शब्द वापरला असला पाहिजे. हल्लीं यात्रेकरूंकडून दर माणशीं वसूल केला जातो तो डोईपट्टीचाहि कर हा असूं शकेल. परंतु हल्लींप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला एकच नियम लागू करण्याची पद्धति त्यावेळीं नव्हती कीं काय असा संशय उत्पन्न होतो. तसें नसेल तर हुकूम देतांना पूर्वीपासून चालत आलेला कर घ्यावा आणि ज्या कुलास जे घेत आले असतील ते घ्यावें असें म्हणण्यांत स्वारस्य रहात नाहीं.

तथापि एकंदरींत आळंदीसारख्या यात्रेच्या ठिकाणीं पोलीस पाठवून बंदोबस्त करण्याचें काम त्यावेळचें सरकार आजच्याइतकेंच काळजीनें करीत असे, यात्रेंत चोऱ्या होऊं नयेत म्हणून जपत असे व हल्लींप्रमाणेंच यात्रेकरूंवर किंवा व्यापाऱ्यांवर जकात घेत, असे पेशवे दप्तरांतील वरील दोन उल्लेखांवरून दिसतें.

---

४ अंतापूर येथील एक मूर्ति.*

(श्री. सर. आबासाहेब मुजुमदार)

गेल्या मे महिन्यांत मी मुल्हेर येथें गेलों होतों. तेथें मुक्काम ५–६ दिवस होता. मुल्हेर येथें कासीरजाचे शिष्य उद्धव यांची समाधी आहे व एक डोंगरी किल्ला आहे. मुल्हेरपासून तीन मैलांवर अंतापूर म्हणून गांव आहे. तेथें नयन महाराज म्हणून एक सत्पुरुष शके १५७५ ते १६७२ पावेतों होऊन गेले. सदरहू नयन महाराजांच्या पुजेचे देवांत एक मुरलीधराची मूर्ती आहे. त्या मूर्तीचे पाठीवर " श्री संवत् १५१६ वर्षे शके १४८१ प्रवत्तमान श्री मुद्राकर राज्ये काश्यपसगोत्रोत्पन्नाय पाठक विठ्ठलसुत गोविंद पाठके श्रीकृष्णमूर्ति से ४ लीधी काकल सोनी कासीव्यश्वनाथवासी " या प्रमाणें लेख आहे. तो नागरी लिपींत आहे. सदर मूर्ति नयन महाराजांच्या पूजेंतील आहे असे त्यांचे विद्यमान वंशज सांगतात. सदर मूर्तीचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. मूर्ती काशाची आहे. चतुर्भुज, देहुडाचरण, उजव्या वरच्या हातांत गदा व खालच्या हातांत मुरली, डाव्या वरच्या हातांत शंख व खालच्या

---

* २१ वें संमेलन.

हातांत मुरली आणि शेल्याच्या पदराला एक गोल मुद्रा आहे. दुसऱ्या बाजूला लांबोळी मुद्रा आहे. प्रभावळीस उजव्या बाजूस शंकराची शाळुंका व पिंडी आहे. खालीं सूर्य आहे. डाव्या बाजूस डाव्या सोंडेचा गणपती व खालीं चंद्र असे आहेत. डोक्यावर छत्र व कलश आहे. कानांत मकरकुंडलें आहेत. गळ्यांत चार पदरी गोफ असून छातीवर श्रीवत्सलांछन आहे. मूर्तीच्या खालचे बाजूस गरूड आहे. तो नागावर बसलेला आहे. जवळ सवत्स धेनू आहे. दोन्ही बाजूस दोन गोपी उभ्या आहेत. दोघींच्या हातांत चवऱ्या आहेत, त्यांच्या दुसऱ्या हातांत लोण्याचे गोळे व कलश आहेत. सदरहू मूर्ती फार सुंदर असून दर्शनीय आहे.

सदर नयन महाराज यांची जन्मतिथी शके १६७५ चैत्र शुद्ध १३ व समाधीकाल शके १६७२ मार्गशीर्ष शुद्ध ६ बुधवार रात्रीं दोन प्रहरीं. यांचें पाळण्यांतील नांव कमलनयन असें होतें. वडिलांचें नांव लक्ष्मण पंडित, आईचें नांव शांताबाई. बायकोचें नांव पद्मावती असें होतें. यांची, पुढील वंशावळ अशी आहे.

नयनमहाराज → बाळकराम → रघुनाथबावा → रामजीबावा.

रामजी → → बाळाबोवा → भिकाराम → → धोंडूराम
→ आण्णाबोवा → रामकृष्ण
→ रावजीबोवा → → सावळाराम
→ श्रीकृष्णबोवा → हरी → → दत्तात्रेय
→ शांताराम
→ बळवंत
→ गोटुराम
→ सोमनाथ

नयनमहाराजांची गुरुपरंपरा पुढील आरतींत स्पष्टपणें दिली आहे. यांच्या अभंग, पदें, कांहीं किरकोळ प्रकरणें, वगैरेंची ३१४ बाडें पाहिलीं. त्यांचें चरित्र आहे, परंतु तें मी आणलें नाहीं. याचें कारण सदर नयनमहाराजांचें चरित्र व इतर बाडें श्री. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं नेल्याचें समजलें. त्यांनीं ती माहिती छापली असेल अशा समजुतीनें तें आणलें नाहीं.

आरती

ओवाळु परंपरा गुरु देवाची, माझ्या सद्गुरु देवाची। उजळीतां बुद्धि विरे जीवसिवाची ॥ धृ ॥ आदि नारायण पिता लक्ष्मी माता। ज्याचा मी सेवक त्याचा पुत्री विधाता ॥ ओवाळु ॥१॥ रामानुज देवाचार्य माझे जिवलग। हरि आनंद राघवानंद अनुराग ॥ ओवाळु ॥२॥ रामानंद अनंतानंद करुणासागर कृष्णानंद। अग्रानंद सिद्धि आगर ॥ ओवाळु ॥ ३ ॥ अमरानंद गोवर्धन स्वामी योगेश। स्मरतां हे नाम होय ज्ञानप्रकाश ॥ ओवाळु ॥ ४ ॥ काशिराम श्रीगुरु उद्धवराम। आरतीचा नित्य नेम नयनी निष्काम ॥ ओवाळु ॥ ५ ॥

मंडळ-वृत्त.

(१) **पाक्षिक सभा**-गेल्या तिमाहींत ५ पाक्षिक सभा होऊन त्यांत १३ निबंध वाचले गेले. त्यांची यादी खाली दिली आहे.

पा. स.	अ.	लेखक.	निबंध.
९	२३	श्री. शं. ना. जोशी	काटी देशमुखांचे दोन कागद; श. १५१५ व श. १५७४
	२४	श्री. ग. ह. खरे	कऱ्हाड येथील फारसी शिलालेख
	२५	"	मंडळांतील चंद्रप्रभ जिनमूर्ति
१०	२६	श्री. स. ग. जोशी	राजारामाच्या समाधीचे बंदोबस्ताची यादी; इ. स. १८५१
	२७	श्री. यशवंतराव फफे	(१) पारनेरच्या वसुलाबाबत वगैरे यादी शके १७०१. (२) १७१० तील त्रिस्थळी यात्रेचा जमाखर्च. (३) नोंद सेखोजी आंग्रे यांची मृत्युतिथि शके १६५४. (४) गोपीनाथ दिक्षीत ओक यांचें आंग्रे यांस पत्र
	२८	श्री. ह. ना. नेने	तेराव्या शतकांतील शिमग्याचा सण.
	२९	श्री. ग. ह. खरे	खासे पेशव्यांचीं दोन जुनीं चित्रें (१) सवाई माधवराव (२) दुसरा बाजीराव
११	३०	श्री. शं. ना. जोशी	औरंगजेब कालीन वाईतील ब्राह्मणांची यादी.
	३१	श्री. शं. ना. जोशी	पंढरपूरची हकीकत
	३२	श्री. ग. ह. ओक	खंडेराव दाभाडे यांची मृत्युतिथि
१२	३३	श्री. ग. ह. खरे	घोडें येथील एक फारसी शिलालेख हि. ९९४
	३४	श्री. रा. गो. काटे (सेलू)	कृष्ण दयार्णवाची अनुपलब्ध कविता
१३	३५	श्री. आ. रा. देसाई	श्री देवनारायण (वालावली) आणि संस्थापक चंद्रभान व सूर्यभान

(१) सभासदः—गेल्या तिमाहींत नवीन झालेल्या सभासदांची यादी पुढें दिली आहे.

क्रमांक	नांव.	गांव.	वर्ग.
×१७९१	श्री. गोविंद शिवराम उपळेकर, जवाहिरे सराफ	कोल्हापूर	तहा. १
१७९२	श्री. कृष्णाजी सिताराम पिटकर	मुंबई	४
१७९३	श्री. आत्माराम रामचंद्र देसाई	नाशीकरोड	४

(३) देणगी—गेल्या तिमाहींत पुढील वस्तूंच्या देणग्या मंडळास मिळाल्या.

(१) दोन जुनीं चित्रें—(सवाई माधवराव आणि हरिपंत फडके व महादजी शिंदे. (२) दुसरे बाजीराव—(श्री. नरहर नारायण पटवर्धन—वांई)

(२) ५ आंध्रकालीन नाणीं—(श्री. गोपाळ वासुदेव धोपाटे—कऱ्हाड)

(३) ज्ञानेश्वरी लेखनकाल श.१५५३।५४ (श्री. गणेश विष्णु कवितकर—पुणें)

(४) काचेवरील एक जुनें चित्र (श्री. रघुनाथ हणमंत कोटणीस—वकील सांगली)

(५) एक यक्षमूर्ती (श्री. तु. र. ठकार—सांगली)

(४) ग्रंथालय—गेल्या तिमाहींत देणगीदाखल मिळालेल्या ग्रंथांची यादी पुढें दिली आहे.

प्रो काळे व्ही. जी.—एकॉनॉमिक्स ऑफ प्रोटेक्शन इन इंडिया.[१] क्रुइकशँक ई. डब्ल्यू. एच.—दि व्हॅल्यू ऑफ सायंटिफिक अन्ड इन्टयुइटिव्ह थॉट इन दि ॲडव्हान्स ऑफ मॉडर्न मेडिसिन.[१] ग्यानचंद—सम ॲस्पेक्टस ऑफ फिस्कल रीकन्स्ट्रक्शन इन इंडिया.[१] चोपरा आर. एन.—दि मेडिकल ॲन्ड एकॉनॉमिक ॲस्पेक्टस ऑफ सम इंडियन मेडिसिनल प्लँट्स.[१] झा गंगानाथ—हिंदू लॉ इन् इट्स सोर्सेस.[१] धार एन. आर न्यू कन्सेप्शन्स इन बायो केमिस्ट्री.[१] पाटील रा. शा.—श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रीय सत्कार.[२] पिले पी. पी.—इंडिया अन्ड दि इन्टरनॅशनल लेबर ऑर्गॅनिझेशन.[१] फडके स. कृ.—भिषक् चूडामणि विष्णु कृष्णशास्त्री पुराणिक यांचें विवेचक चरित्र.[३] बानर्जी शास्त्री ए. पी.—अर्ली इन्स्क्रिप्शन्स ऑफ बिहार अन्ड ओरिसा.[१] बारटक्के महादेव गोविंद—श्रीनामदेवमहाराज यांची वंशावळी[४]

× वर्गणी येणें आहे.

वेंद्रे वा. सी.-तारीख-इ-इलाही. मिरात-इ-सिकंदरी.[५] रानडे रा. द. आणि सातवळे-कर श्री. दा.-श्रीनिवास स्मारक लेखमाला श. १८५५.[६] लेसी. डब्ल्यू जी.-सम ॲस्पेक्ट्स ऑफ् दि सेन्सस ऑपरेशन्स ऑफ १९३१ इन् बिहार ॲन्ड ओरिसा[१] वाढदिवस मंडळ-श्रीसयाजी गौरवग्रंथ. शाहा के. टी.-फेडरल फिनॅन्स इन इंडिया[१]. सरकार जदुनाथ-बिहार अन्ड ओरिसा ड्यूरिंग दि फॉल ऑफ दि मोगल एम्पायर[१]. सरकार एस्. सी.-एज्युकेशनल आयडियाज अन्ड इन्स्टिट्यूशन्स इन एन्शंट इंडिया[१]. सरदेसाई गो. स.-पेशवे दप्तर नं. ३२ उत्तरकालीन पेशवे-कौटुंबिक रहाणी[७]. सरदेसाई गो. स.-पेशवे दप्तर नं. ३१ जमाव विभागांतील कागद[७]. सरदेसाई गो. स.-शाहू आणि पहिले दोन पेशवे[७] पेशवे दप्तर नं. ३० १७००-१७४०. साह एम. एन.-सिक्स लेक्चर्स ऑन ॲटॉमिक फिजिक्स[१]. सेन एच. के.-हाय टेम्परेचर फ्लेम्स अन्ड देअर थर्मोडिनॅमिक्स[१]. ह्यक जे. ए.-इन्डियन बँकिंग वुइथ स्पेशल रेफरन्स टू बिहार अन्ड ओरिसा[१].

इतर-वृत्त.

डिसेंबर १९३३ च्या शेवटीं भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या निमित्तानें प्रो. द. वा. पोतदार हे नागपूर येथें गेले असतां तेथें त्यांच्या हस्तें वाङ्मयेतिहास संशोधन मंडळ स्थापन करण्यांत आलें. मंडळाचें कामही सुरू झालें आहे.

श्री. शं. ना. जोशी हे गोमंतकांतील आपलें प्रचारकार्य संपवून परत आले. तिकडे त्यांनीं १८ व्याख्यानें दिलीं, ४६ सभासद मिळविले. सभासद वर्गणी व पुस्तक विक्री मिळून सुमारें चारशें रुपये प्राप्ती झाली. सविस्तर वृत्तांत पुढील अंकीं येईल.

---

(६) दुखवटा.

गेल्या ९।१० महिन्यांत बरेच सभासद दिवंगत झाल्यानें मंडळाचें मोठें नुकसान झालें आहे. पैकीं श्री. **शिवराम काशीनाथ ओक** हे धारेस संस्थानच्या इतिहासखात्यांत रा. लेले यांस उत्तम प्रकारचें साहाय्य देत असत. **रा. ब. मुकुंदराव बर्वे** यांचे अनेक इतिहासग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध आहेत. ते त्यांच्या इतिहास-प्रेमाचे निदर्शक आहेत. मंडळावर त्यांचें बहुत प्रेम असे. **रा. सा. विनायक त्र्यंबक आगाशे** मंडळाचे एक हयात सभासद व मंडळाचे हितज्ञ आणि पुण्यांतील एक अत्यंत सन्माननीय नागरिक होते. रा. **श्री. ग. गोखले**, एम्. ए. हे फार्सीचे विद्वान असल्यानें त्यांचें साहाय्य त्या कामीं प्रथम प्रथम मंडळास विशेष झालें. रा. **माधवराव व्यंकटेश लेले** हे इतिहासाभ्यासंगी व इतिहासलेखक प्रसिद्ध होते. डॉ.

---

१ युनिव्हर्सिटी ऑफ् पाटणा. २ नेने वि. पां. ३ पुराणिक ग. वि. ४ बारटक्के म. गो. ५ पां. बापट प्र. वा. ६ काळे दि. वि. ७ गव्हर्नमेंट ऑफ बाँबे.

ग. स. सहस्रबुद्धे हेही मंडळाचे एक प्रेमी सभासद होते. रा. **केशव महादेव बाळ** हे आर्यभूषणचे एकनिष्ठ व्यवस्थापक आणि आपल्या मंडळाचे प्रेमळ सभासद होते. रा. बाळ यांचे दक्षतेमुळें मंडळाची छपाई चोख होण्यास फार साहाय्य होत असे आणि सार्वजनिक संस्थांच्या कामाची जबाबदारी ते योग्य प्रकारें ओळखीत. त्यामुळें सार्वजनिक संस्थांना त्यांचा मोठा फायदा होई. रा. **रामचंद्र बळवंत वैद्य,** B. Ag., B. Sc., वर्धा, व पंडित श्री. **न. र. गोडबोले** हे दोघेही मंडळाचे आस्थेवाईक सभासद होते. मंडळावर प्रेम करणारे हे सर्व सभासद दिवंगत झाल्याबद्दल मंडळास अतिशय दुःख होत आहे. तत्कुटुंबियांनीं मंडळही त्यांच्या दुःखांत वाटेकरी आहे असें समजावें.

कै. श्री. हरगोवन पारेख

गेल्या अंकीं ज्यांच्या अपूर्व वस्त्रचित्रसंग्रहाचें व कामगिरीचें आम्हीं वर्णन केलें व ज्यांच्या मदतीनें पुण्यास व सोलापुरास प्रदर्शनें भरविलीं त्या श्री. हरगोवन पारेख यांस जानेवारी महिन्यांत मुंबई मुक्कामीं मृत्यु आला हें कळविण्यास आम्हांस अत्यंत दुःख होतें. रा. हरगोवन हे मुंबईस प्रदर्शनासाठींच आले होते. एक मोठा **राष्ट्रीय अजबखाना** स्थापण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. कै. पुरुषोत्तम मावजीशेट यांस पारेख यांचेंच बहुमोल साहाय्य होत असे. पारेख यांचा संग्रह फार अपूर्व आहे. मावजी यांचा संग्रह, पारेख यांचा संग्रह, पारसनीस यांचा संग्रह, जालान यांचा संग्रह असे अनेक बहुमोल संग्रह केवळ खाजगी संग्रह म्हणून त्यांच्या पश्चात् सावकारी किंवा वारसासंबंधांत गुरफटून जाऊन जनतेस त्यांचा उपयोग होईनासा होतो. कधीं कधीं तर गहाण, विक्री, वांटणी वगैरे होऊन ते हळुहळू नष्टच होतात.

ही आपत्ति योग्यसा कायदा करून टाळतां येईल. पण तो काळ दूर आहे. तूर्त लोकांनींच कांहीं खटपट केली पाहिजे. सुरतेचे धनिक लोक पारेख यांच्या संग्रहास सार्वजनिक रूप देतील अशी आम्हांस आशा आहे. कै. हरगोवन हे फार सुशील, मधुरभाषणी, खटपटी, कल्पक व धाडसी होते. महाराष्ट्रीयांवर त्यांचें प्रेम होते. ते सुरतेच्या महाराष्ट्रमंडळाचे एक तहाहयात सभासद होते. त्यांचें वयहि फार नव्हतें. भा. इ. सं. मंडळाचे साहाय्यानें आपल्या खटपटीस मूर्त स्वरूप आणण्याचाहि त्यांचा हेतू होता! आतां सर्व जागच्याजागींच राहिलें! त्यांचें सर्व मित्र, आप्तेष्ट, ग्रामस्थ व समव्यवसायी, त्यांचें कार्य पुढें सुव्यवस्थित चालविण्याची कांहीं तरी योजना करतील तर कै. पारेख यांच्या आत्म्यास समाधान वाटेल!

मंडळ-वृत्त.

Marathi Contents of this issue.

Articles.

1. **The Holi festival in the 13th century** (p. 1)—by H. N. Nene, M.A., L.T.—Description from a Mahānubhāvīya work of the 13th century of the Holī festival and the Dhūlīvandana ceremony observed by Chakradhara the founder of the Mahānubhāva sect.

2. **Two interesting Icons** (p. 5)—by G. H. Khare—(A) Śiva, Pārvatī and Sati together; identified from similar images described in Mysore Archaeological report for 1916 (B) Śiva?: has śakti on his left theigh; holds bow? rosary, trident, disc, in the four right hands, and counch, ḍamaru and kamaṇḍalu in the three left hands; while the 8th is in āliṅgana and varada pose. The icon sits on a skin having a tail and 4 feet resembling those of a ram or tortoise, and a head of a ram or bullock. Identification not certain. The icon should be either of Śiva or Brahmēśāna-janārdana.

3. **Management of the Alandi fair in Peshwa's times** (p. 7)—by D. V. Kale M. A. Details of the management and sources of income from original papers in the Peshwa daftar are given.

4. **An image of Muralīdhara from Antāpur (Nasik)** (p. 9)—by Sar. G. N. Mujumdar—Date of installation S. 1516; inscribed; has four hands holding a mace and a flute, in the two right ones and a counch and a flute in the two left ones; in tribhaṅga pose; has Garuḍa as vehicle;

Sources.

Persian[1]: (17) Four inscriptions from Karāḍ (Satara). First three Nos. 76, 77, 78 are from the Jam'a masjid; the last No. 79 is from the Īdgāh. In No. 76 the management of the masjid is entrusted to one 'Ali bin Aḥmad Isfahānī alias Tīrandāzkhān in 980 A. H. and the edifice was completed in 983 A. H. No. 77 contains some benedictory sentences. No. 78

1. By G. H. Khare.

tells that probably the minarets were constructed by Kāmil-khān. No. 79 is a grant of one *chavar* of land for Īdgāh and burial ground; date A. H. 980.

(18) A letter from the Pisāls of Ozarḍe (Satara). This refers to the assistance rendered by Sūryājī Pisāḷ in capturing the fort of Rāygaḍ and the Deshmukhi of Parganah Wai bestowed on him as before.

(19) An inscription from Ghoḍe (Poona). Here it is told that one Mīr Muhammad Zamān after demolishing thirty and three temples by the favour of God, erected the Masjid at Ghode in A. H. 994.

Miscellaneous[1] (71) The list of persons authorised to use Palaki in the time of the last Peshwa. (72) The last efforts of Bajirao II : The letters give details regarding the battles of Khadki and Ashti fought between the British and the Maratha armies, the flight of Bajirao II, as also the actions which took place between the Scindia, Holkar, Bhoslah and the British regiments during the same war *viz*. of 1817 and 1818 A. D.

---

1. By Y. N. Kelkar.

२

ले. ७७ } { श. / इ.

(१) दर झमान शाह आलम–पनाह सायह लुत्फ

(२) अल्लह शाह आली आदिल शाह खैर आफियत

(३) ईमान सलामत बाशद व खान अली–शान

(४) मुहिब्ब खान्दान इब्राहीम कामिलखान

अर्थ

शहा, जगदाश्रय, ईश्वरी कृपेची छाया, अशा शाह अली आदिल-शहाँ याच्या कारकीर्दीत उत्तम सौख्य, (परमेश्वरावर) निष्ठा, सुरक्षितता असो व खान आली शान इब्राहीम कामिलखान (राजकुलाचा) मित्र (राहो).

३

हा लेख वर सांगितल्याप्रमाणें मशीदीच्या उत्तरेच्या भिंतींत पूर्वेच्या अंगास पायथ्याशींच आहे. हा एका मिहराबींत बसविलेला असून तिच्या तीन बाजूस अरबी मजकुराचा लेख आहे. तो बहुधा कुराणवाक्यें असल्यामुळें उसा आणिला नाहीं. याची लांबी, रुंदी २′ ९″ व १′ ७″ आहे. याच्या ओळी ५ आहेत. याची लिपी नस्ख व तुघ्रयाची छाया असलेली आहे. लेखनाच्या बाबतींत पहिल्या लेखावरील शेरे यासही लागू पडत आहेत. याची भाषा कवितावद्ध फारसी. यांत कालाचा उल्लेख नाहीं.

ले. ७८ } { श. / इ.

(१) बदौर शाह अली आदिल शाह आं

(२) कह अझ काफस्त ता काफश नकू–नाम

(३) बिना ई मस्जिद आली बफर्मूद

---

१ 'अली' असें पाहिजे.

२ या 'आ'वर निष्कारण द्वित्वदर्शक चिन्ह खोदलें आहे.

३ 'आली' असें पाहिजे.

४ या व पुढील ३ लेखांत जो अली आदिलशहा आला आहे तो पहिला अली आदिलशहा होय. त्याचा काल हि. ९६५ ते ९८८ (=श. १४८० ते १५०२=इ. १५५८ ते १५८०) असा आहे.

ऐ. फा. सा.सं. १–१२

(४) रफीअ–उश–शान कामिलखान बाकाम
(५) बिनाये शुद कशीदह सर बर अफ्लाक
(६) झ सन्गश बुर्दह...सल्फा जाम
(७) बहफ्त इक्लीम खूद गर्दून न दीदह
(८) चुनीं आली बिनाये फर्रुख–अन्जाम

अर्थ

त्या राजा अली आदिलशहाच्या–ज्याचें उत्तम नांव काफ (पर्वता) पासून काफ (पर्वता) पर्यंत आहे–कारकीर्दींत या भव्य मशीदीचा पाया, (ज्याची) शक्ति उच्च आहे (अशा) कामिलखानानें स्वेच्छेनें फर्माविला. इमारत आकाशाच्यावर डोकें काढलेली झाली. तिच्या दगडापासून...अशी उंच सुखपरिणामी इमारत आकाशानें स्वतः सातीं लोकांत न पाहिलेली (आहे).

४

*प्रस्तुत लेख कऱ्हाडच्या आग्नेय कोपऱ्यास जो ईदगा आहे त्याच्या मधल्या कमानींत आहे. इदग्याचा वरचा भाग जरी विटांचा आहे तरी लेख दगडावर खोदून तो विटांच्या बांधकामांत बसविला आहे. दगडाची लांबीरुंदी ११॥", ११॥" आहे. भोंवतालीं कड असून मध्यें लेख आहे. लेखाच्या ओळी ६ आहेत. अक्षरवटिकेविषयीं विशेष सांगण्यासारखें असें कांहीं नाहीं. लिपी मागच्या तीन लेखांप्रमाणें नस्खी नसून नस्तअलीक आहे. भाषा फारसी आहे. लेख असा—

ले. ७९ } { श. १४९४।९५
हि. ९८० } { इ. १५७२।७३

(१) दर झमान शाह आलम–पनाह सायह
(२) लुत्फ इलाह शाह अली[1] आदिलशाह
(३) यक चावर झमीन बराए दफ्न
(४) मुस्लिमानान व ईदगाहरा मरहमत

* पा. स. ५।१८५५ 1 अली असें रूप हवें.

(५) कर्दह वक्फ कर्दन्द कसीरा हक

(६) नीस्त कह दरीं जा दखल दहद सनह ९८०

सारांश

अली आदिलशाह याच्या कारकीर्दीत एक चावर जमीन मुसलमानांच्या दफनासाठीं व इद्‌ग्याकरितां दान करून सार्वजनिक केली. कोणाला या जागेंत अडथळा करण्याचा हक्क नाहीं. सन ९८० [हि.].[1]

---

१ या लेखांविषयीं प्रथमच एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, यांपैकीं पहिल्या दोन लेखांचीं भाषांतरें सातारा गॅझिटियरमध्यें व श्री. गुप्ते यांनीं आपल्या कऱ्हाड या पुस्तकांत दिलीं आहेत. पण श्री. गुप्ते यांस फारसी अवगत नसल्यामुळें गॅझिटियरचें भाषांतर किंवा अर्थाविषयीं मतभेद–कोणी तज्ञानें सांगितल्यामुळें–नमूद करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. यामुळें दोन्ही पुस्तकांत कांहीं चुका राहिल्या आहेत. उ. पहिल्याच लेखांत ज्यास मशीदीची चाकरी सांगितली त्याच्या नांवाविषयीं घोटाळा झाला आहे. दोघांनींही पहिलवान हा शब्द अली या नांवाचा भाग म्हणून मानला आहे. तो शब्द मी विशेषण म्हणून समजतों (गॅ.पृ.४७५, कऱ्हाड पृ. १८). या अलीला तीर अन्दाझखान ही पदवी मिळाली होती. गॅ. व क. मध्यें तुझयेतखान व तीर औझादखान अशीं नांवें सांपडतात (गॅ. पृ. ४७५, क. पृ. १८). या शिवाय माझें भाषांतर व वरील दोन ठिकाणीं दिलेलीं भाषांतरें हीं ताडून पाहिल्यास माझेंच सरस आहे व योग्य आहे असें दिसून येईल.

दुसऱ्या लेखाचें भाषांतर तर बरेंच चुकलें आहे. याचें कारण मूळ लेख नीट वाचला गेला नव्हता असें दिसतें उ. खैर, आफियत, ईमान, खिलात या गोष्टी बादशहास मिळोत असें भाषांतर दोन्हीं ठिकाणीं आहे. पण बादशहा व त्याचा विशेषणात्मक लवाजमा यांचा झमान या शब्दाशीं संबंध आहे. अर्थात् या सर्व गोष्टी बादशहाच्या कारकीर्दींत सर्वांना मिळोत असा तेथें अर्थ आहे. श्री. गुप्ते यांनीं या लेखाच्या बाबतींत दुसऱ्या एका विद्वानाचें म्हणून जें म्हणणें दिलें आहे तें अगदींच चूक आहे.

तिसरा लेख अगदीं नवीन म्हणजे दोन्ही पुस्तकांत न उल्लेखिलेला असा आहे. चौथ्या लेखाचा गॅझिटियरमध्यें उल्लेख नसला तरी श्री. गुप्ते यांनीं आपल्या पुस्तकांत त्याचें भाषांतर दिलें आहे व तें बरोबर आहे.

१८ ओझर्डे-पिसाळ.*

(श्री. ग. ह. खरे)

ले. ८० } अ { श. १६११ माघ शु. ३
ज़ु. ३३ रखर १ } { इ. १६९० जानेवारी ३

मुतसद्दियान मुहिम्मात हाल व इस्तिक्बाल पर्गनह बायीं मुज़ाफ बसूबह दार-उज-ज़फर बीजापूर बिनानन्द चूं हस्ब-उल-हुक्म वाला खिद्मत देसमुखी पर्गनह मझ्बूर मुताबिक फर्दी कह मुश्तमिलबर इल्तिमास सियादत व निकाबत-पनाह शराफत व नजाबत-दस्तगाह शहामत-मर्तबत अयालत-मन्झिलत जू-अल-फकारखान बहादर महतवी बरीं मअना कह सूर्या वलद फिरन्गो दर तस्खीर किलअह इस्लामकदह तरद्दुद नमूदह[1] व अझ कदीम बखिद्मत देसमुखी कियामह दाश्त नाहरखान बेइत्तिलाअ ऊ बइज़्हार ई कह अगर खिद्मत देसमुखी मरहमत शवद पर्गनहरा आबाद साझद सनद खिद्मत मझ्बूर हासिल कर्दह सूर्या मज्कूर उम्मीदवार अस्त कह बदस्तूर साबिक बहाल शवद व सनद हुजूर बियाबद व चूं महाल मझ्बूर बिल-फअल वीरानस्त ता आबाद शुदन तक्लीफ आदाए पीशकश न गर्दद बअर्ज़ रसीद मन्जूर हुक्म शुद बदफ्तरखानह वाला रसीदह अझ तगीर नाहरखान बदस्तूर साबिक बनाम सूर्या मुकर्रर गश्तह व शरह फर्द मुफस्सिल दर ज़मन तहरीर याफ्तह बायद कह देसमुखी पर्गनह मझ्बूर बमुशारुनइलैह मुकर्रर दानिस्तह लवाझिम व लवाहिक ई कार मुवाफिक ज़ाबितह व मअमूल बह ऊ मुतअल्लुक शनासन्द सबील देसमुख मझ्बूर आंकह रिआया व बरायारा अझ हिस्न सलूक खूद राज़ी दाश्तह दर आं चह किफायत सर्कार व रिफाहियत रिआया व तकसीर जिराअत व आबादानी बाशद बअमल आउर्दह झियादह अझ रुसूम मुकर्ररह यक दाम तमअ व तवक्कुअ न नुमायद व मुर्तकब बिदअतहा न

---

* पा. स. ४।१८५४

१ पाठीवरील शेऱ्यांत 'दर तस्खीर इस्लामकदह हमराह खानझाद खिद्मत नमूदह' असे शब्द आहेत. त्यांचा अर्थ 'इस्लामगड (रायगड) घेण्यांत खानझाद यांजबरोबर चाकरी केली' असा होतो.

गर्दद दर्री बाब ताकीद दानद गुर्रह शहर रबीअ–उस–सानियह सनह ३३ अझ जुलूस इक्बाल अबद इत्तिसाल कलमी गश्त

सारांश

वर्तमान व भावी मुत्सद्दी पर्गणे वाई सुभे विजापूर यांनीं जाणावें कीं, झुल्फकारखान यांनीं विनंति केली कीं, सूर्या वलद फिरंगो यानें इस्लामगड घेण्यांत तरतूद केली आणि पूर्वींपासून देशमुखीच्या चाकरीवर आहे. नाहरखान यानें लटकेंच जाहीर केलें कीं, देशमुखीचें काम मिळाल्यास पर्गणा आबाद करतों आणि सनद मिळविली. सूर्यास उमेद आहे कीं, पूर्वींप्रमाणें आतां व्हावें व हुजूरची सनद मिळावी. आणि महाल मजकूर सध्यां वैराण असल्यानें तो आबाद होईतों पेशकस आदा करण्याची तकलीफ होऊं नये. हा अर्ज समजला. हुकूम मंजूर होऊन दफ्तरखान्याकडे गेला आणि नाहरखानाची देशमुखी तगीर होऊन पूर्वींप्रमाणें सूर्याकडे मुकरर झाली. चिठ्ठीचा तपशील पाठीवर लिहिला आहे. तेव्हां प्रस्तुतची देशमुखी सूर्याकडे मुकरर समजून तिचीं कर्तव्यें व हक्क जाबता व वहिवाट याप्रमाणें त्याजकडे आहेत असें समजावें. त्याचें कर्तव्य असें कीं, त्यानें रयतेस राजी ठेऊन ज्यांत सरकारची किफायत, रयतेचें समाधान, शेतीची भरभराट व आबादानी असेल तें करावें. मुकरर झालेल्या रुसुमापेक्षां एक दाम जास्त घेऊं नये व जुलमास आरंभ होऊं नये. ता. १ रबिलाखर सन ३३ जुलूस.

---

१९ घोडें येथील एक फारसी शिलालेख हि.९९४*

(श्री. ग. ह. खरे)

उपलब्धि–घोडें हें गांव पुणें जिल्ह्यांत पुणें नाशिक रस्त्यावरील मंचर गांवापासून पश्चिमेस सुमारें ४ कोसांवर पेठ्याचें ठिकाण आहे. तेथें महालकरी कचेरीजवळच असलेल्या जुम्मा मशीदींत प्रस्तुत लेख आहे.

* पा. स. १२।१८५५

१ या लेखाचा पुणें गॅझिटियरमध्यें जरी उल्लेख आहे तरी कोणी एका मीर मुहम्मदनें इ. स. १५८० च्या सुमारास ही मशीद बांधली याशिवाय जास्त माहिती त्यांत नाहीं.

ह्या मशीदीच्या मधल्या कमानीच्या दोन्ही बाजूंस दोन वाटोळे खांब असून त्यांच्या पूर्व भागावर हा लेख कोरला आहे. अर्थात् याचे दोन भाग झालेले आहेत. दोन्ही भागांच्या आरंभींच्या कांहीं मजकुरावर मिहराब आहे. बाकीचा भाग मोकळा आहे. प्रत्येक लेखाची लांबी रुंदी, ३′,१०″× १,′ १″ आहे.

लिपी व भाषा– या लेखाची लिपी नस्तअलीक आहे. स्वरनिदर्शक चिन्हें खोदलेलीं नाहींत. अक्षरनिर्णायक नुक्ता, हमझा, तश्दीद, इत्यादि चिन्हें खोदलेलीं नाहींत. लेखाची भाषा पहिल्या भागाच्या आरंभींच्या २ ओळी सोडल्यास फारसी आहे.

काल– लेखांत कालाचा उल्लेख दोन तऱ्हांनीं म्हणजे आंकड्यांत व अक्षरांत केला आहे. पैकीं आंकड्यांतील उल्लेख ९९४ असा आहे. व तो बहुधा हिजरी सनाचा असावा. अक्षरांतील उल्लेख این بنای خیر نهاد असा आहे. यांतील अक्षरांना अब्जद पद्धतीची किंमत दिल्यास ती
این=१+१०+५० =६१+ بنای =२+५०+१+१०=६३ ⎫ = ९९४ च
+خیر=६००+१०+२००=८१०+نهاد=५०+५+१+४=६० ⎭ येते.
हिचें हिंदू व ख्रिस्ती रूपांतर श. १५०७।०८ व इ. स. १५८६ असें होतें.

स्थलः– या लेखांत खराबाबाद हें एकच स्थलनाम आलें असून तें बहुधा घोडें या नांवाचें मुहम्मदीयांनीं ठेवलेलें अलंकारिक नांव असावें.

ले. ८१ }	{ श. १५०७–०८
हि. ९९४ }	{ इ. १५८६

(१) इन्न–	(१) या अल्लह या
(२) अल-मसाजिद् लिल्लह	(२) मुहम्मद्
(३) फला तदअू मअ अल्लह अहद्न्	(३) या अली
(४) कुशाद् बाझूए हिम्मत	(४) जनाब मीर मुहम्मद् झमान
(५) बखैर व झर अफ्शान्द्	(५) चू हिम्मत बस्त
(६) चू कस्त्र खल्दीन बर	(६) बदस्त खूद् दर दौलत
(७) कर्द मस्जिदी बुनियाद्	(७) बरूएरवीश कुशाद्
(८) बफिक्र रफ्तम व जुस्तम	(८) शिकस्त सी व सह

(९) झ अक्ल तारीखश
(१०) खिर्द शिगुफ्त व बगुफ्त
(११) ई बिनाए खैर निहाद्
(१२) ९९४ [सनह]

(९) बुतखानह अझ रह तव्फीक
(१०) फगन्द् तर्ह बिनाये
(११) दर्रीं खराबाबाद्

भाषांतर

(१)

खरोखर मशीदी परमेश्वरासाठीं आहेत. तेव्हां परमेश्वराबरोबर [आणखी] एकाला[हीं] बोलवूं (हाक मारूं) नका. हिमतीचे हात कल्याणापर्यंत पसरले व द्रव्य खर्च केलें. (त्यायोगें जेव्हां) स्वर्गीय वाड्यासारख्या मशीदीचा पाया घातला (तेव्हां) मला काळजी लागली व ।कलेपाशीं तारखेचा शोध केला. [तेव्हां] ज्ञान विकसलें व म्हणालें ‘ ही कल्याणस्वभावी इमारत’. सन ९९४ [हिजरी]

(२)

हे परमेश्वरा, हे मुहम्मदा, हे अली. जनाब मीर मुहम्मद् झमान ।नें जेव्हां ऐश्वर्याचें दार आपल्या हातानें आपल्या बाजूस उघडावें [अशी] हिम्मत धरली [तेव्हां] परमेश्वराच्या कृपेसाठीं तीस व तीन देवळें मोडलीं [व] या खराबाबादेंत इमारतीचा पाया घातला.

---

१ या लेखांत आलेला मीर मुहम्मद् झमान याचे इतरत्र उल्लेख आले आहेत. उ. बुर्हान–इ–मआसिर पुरवणी मध्यें शाह मुराद् यानें अहमदनगरास घातलेल्या वेढ्याची हकीकत देतांना तटास पडलेल्या खिंडाराचें रक्षण करण्यासाठीं धाऊन आलेल्या उमरावांमध्यें सय्यिद् मीर मुहम्मद् झमान याचें नांव आहे. तसेंच याच वेढ्याचें बाबतींत तह करण्यासाठीं मोगलांकडे पाठविलेल्या लोकांमध्यें मीर मुहम्मद् झमान रिझवी मश्हदी याचा समावेश केला असून त्यास मोगली सेनापति खानखानान याशीं बोलणें करण्याचें काम सांगितलें होतें. हें काम त्यानें उत्तम तऱ्हेनें बजाविल्याचे नमूद् आहे (I.A. Vol. 53 pp. 340, 343, 345). हा परक्या-लोकांपैकीं होता असेंही दिसतें (सदर पृ. 299, 340).

२ या लेखांत आल्याप्रमाणेंच इतरत्र कांहीं लेखांतून मुसलमानांनीं मोठ्या दिमाखानें आपण हिंदूंचीं देवळें पाडल्याचें सांगितलेलें दिसतें. उ. दिल्ली येथील कुव्वत–उल-इस्लाम मशीदींतील लेखांत ती मशीद् बांधण्यासाठीं ज्यांवर प्रत्येकी २० लाख देहली-वाल (एक नाणें) खर्च झालें होते अशा २७ देवळांचें सामान ! उपयोगांत आणलें

मागील पानावरून पुढें चालू

असल्याचें सांगितलें आहे. (Ep. IndoMos. 1911–12. p.13). धार येथील हि. ८५९ (=इ.१४५५) च्या एका लेखांत चंगाल नांवाचा एक साधू मक्केहून आला व त्यानें शेकडों मूर्ती व देवळें फोडल्याचें नमूद आहे (Ep. Indo Mos. 1909–10 p. 2.). कुराणामध्यें अशा तऱ्हेनें देवळें पाडावीं व मूर्ती फोडाव्या अशी आज्ञा आहे कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. पण देवळें पाडणें व मूर्ती फोडणें यांत यश येणें हें परमेश्वरी रुपा झाल्याचें लक्षण आहे असें कित्येक मुसलमान त्यावेळीं समजत होते कीं काय कोण जाणें.

श्री

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ३८

शिवचरित्र साहित्य

खंड ४ था.

प्रकाशक

प्रो. दत्तो वामन पोतदार,

श्री. सर. गं. ना. मुजुमदार,

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ पुणें.

मुद्रक

अनंत विनायक पटवर्धन

आर्यभूषण प्रेस, ९३६।३ भांबुर्डा पेठ, पुणें.

श. १८५६] किंमत १॥ रुपया. [इ. स. १९३४

निवेदन.

शिवचरित्र साहित्याचा चौथा खंड आज पुरा होत आहे. याचीं पृष्ठें मंडळाच्या त्रैमासिकाच्या ११ व्या वर्षाच्या २, ३ व ४ या अंकांत, १२ व्या वर्षाच्या २, ३ व ४ या अंकांत, १३ व्या वर्षाच्या १, २, ३ व ४ या अंकांत आणि १४ व्या वर्षाच्या १ व ३ या अंकांत आलीं आहेत. यांत ११४ पानांत ६७५ ते ७५६ म्हणजे ७२ लेख छापले आहेत. हे लेख एकंदर २६ घराण्यांतून मिळविलेले आहेत. नेहमींप्रमाणें याही खंडांत घराणेवार कागद छापले असल्यानें कौलिक संदर्भतंतूचा व्यवच्छेद होऊं नये म्हणून कांहीं शिवोत्तरकालीन कागदही छापलें जाणें अपरिहार्य आहे. पण अशा कागदांची संख्या अतिशय थोडी आहे.

यांतील सर्वच प्रकरणें आपापल्या परीनें महत्त्वाचीं असलीं तरी ३, ५, ६, १८, १९, २०, २१, २५, २६ हीं त्यांतल्या त्यांत जास्त महत्त्वाचीं आहेत. या खंडांत आलेले लेख वरवर पहाणारासही कांहीं गोष्टी सहज समजून येतात त्या अशाः—ले. ६७६ व ६७७ हीं पत्रें राक्षसतागडीच्या लढाईच्या सुमाराचीं म्हणजे अतिशय जुनीं असल्यानें भाषेच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. प्रजा व साधू यांच्या हितसंबंधांत विरोध आला असतां शिवाजी रयतेच्या हितसंबंधास जास्त महत्त्व देई ही गोष्ट ले. ६८३, ६८४ व ६८५ वरून स्पष्ट दिसून येते. शिवाजीनें श. १५८१ मध्यें अफजलखानास मारिलें. पण त्याचा परिणाम मावळांतील देशमुखांवर विशेष झाला नाहीं हें ले. ६८८ वरून स्पष्ट होतें. ले. ६८९ हा अहमदनगरचा निजामशहा व पोर्तुगीज यांमधील तह आहे. हा तह मराठी भाषा व मोडी लिपी यांत लिहिला आहे. निजामशाही मुलखांत द्वैभाषिक (फारसी व मराठी) लेखही पुष्कळ सांपडतात. त्यांवरून वाटतें कीं, निजामशाहींत मराठीला फारसीच्या बरोबरीनें मान असावा. ले.६९४ व ७०४ यांत जिझिया पट्टीचा हिशेब दिला आहे. समकालीन कागद व समकालीन रचित ग्रंथ यांच्यामध्येंही कागदांस जास्त महत्त्व आहे ही गोष्ट हे लेखांक स्पष्ट करतात. समकालीन व अर्वाचीन ग्रंथकारांनीं जिझिया हा डोईवरचा म्हणजे प्रत्येक व्यक्तीवरचा कर आहे म्हणून सांगितलें आहे. पण हा डोईवरचा कर नसून चुलीवरचा किंवा विभक्त कुटुंबावरचा कर आहे ही गोष्ट या लेखांनीं स्पष्ट समजते. ले. ७१७ वर मिती नाहीं. पण त्यांतील शिवाजी व नामदारखान यांचें युद्ध झाल्याचा उल्लेख महत्त्वाचा असून त्यायोगें जेधे शकावलींतील हकीकतीस दुजोरा मिळतो. ले. ७१८, ७१९, ७२१ यांमध्यें खंडोजी व बाजी घोरपडे अशा दोन व्यक्ती आल्या असून त्यांनाच शहाजीला नेस्तनाबूद करण्यासाठीं पाठविल्याचें ऐतिहासिक फारसी साहित्य ले. ४८ वरून दिसून येत आहे. पंचवीस होनास 'कुण-

थिणी बन्या नीटस गोरिया जातिवंत चौघी पाच जणी ' मिळत असें ले. ७२३ मध्यें सांगितल्याचें दिसतें. ले. ७२६, ७२८ व ७२९ हीं तीन पत्रें राजारामाच्या वेळचीं आहेत. त्यांतील कळवळा व मराठी राज्याविषयीं अभिमान उत्पन्न करण्याची रीत पाहण्यासारखी आहे. ले. ७३० मध्यें आलेला उल्लेख एका नवीन सुहूर सनाचा आहे. या दृष्टीनें तें पत्र महत्त्वाचें आहे. ले. ७३३ ते ७४१ हीं पाटगावच्या मौनी बावासंबंधीं पत्रें असून तीं शिवाजी व त्याचे वंशज यांच्या साधू पुरुषांच्या ठिकाणीं असलेल्या भक्तीचीं निदर्शक आहेत. ले. ७४४ मध्यें हातीं लागणारी लूट स्वतःच्या निर्वाहासाठीं वापरण्यास मिळावी अशाबद्दल किल्लेकऱ्यांनीं परवानगी मागितली आहे. तेव्हां तेथें अंदाधुंदीचा कारभार चालत नव्हता हें स्पष्ट होतें. ले. ७४६ शिवाजी केळंजा किल्ला घेत असतां झालेल्या लढाईचें वर्णन करीत आहे. ले. ७४७, ७४८, ७५० हे आदिलशाही, निजामशाही व शहाजी यांच्या अगदीं नवीन हालचालींची माहिती देत असल्यानें अतिशय महत्वाचे आहेत.

सारांश या खंडांत आलेलीं पत्रें अनेक दृष्टींनीं महत्त्वाचीं आहेत. त्यांचा संशोधक व इतिहासाभ्यासी योग्य परामर्ष घेतील अशी आशा आहे.

हनुमज्जयंति १८५६ चिटणीस.

अनुक्रमणिका

२६ कानदखोरें-मरळ देशमूख

अल्फ बाबाजी जुझारराऊ देशमूख ता। मजकूर गलबलियामधे आपले जमियेतीनसी साहेबाचे मसलतेस येउनू येकतारी केली त्यावरुनू देशमुखावरी मेहेरवान होउनू इनाम अजेरामऱ्हामती मौजे कोंढावळे बु॥ अज रकम नख्त महसूल कमावीस दाहा टके २४०॥९ आहे याखेरीज बाजेबाब हिसेब होईल ते बेरीज येकंदर करार त्यापैकीं इनाम नख्त १०० टके येकसे याची जमीन हे तोरतरनगाऊ करुनू त्याचे नावे मौजे साकरनावे देउनू इनाम दिल्हे आसे दुमाले करणे औलाद व आफलाद चालवणे दर हर साल ताजे खुर्दखताचे उजूर न करणे तालिक घेउनू आसली खुर्दखत देशमुखापासी फिराऊन देणे मोर्तब असे

रुजू

तेरीख १७ साबान

ले. ७९९ मू. चा. सं.	[शिवाजीची मुद्रा *]	श. १५९० वैशाख शुद्ध १९ इ. १६६८ एप्रील १६

ई कौलनामा अज रख्तखाने राजेश्री सिवाजी राजे साहेब दामदौलतहू ता। बाबजी जुझारराऊ मरळ देसमूख ता। कानदखोर सु॥ समान सितैन अल्फ दादे कालनामा यैसा जे तुमचे बाबे कारकून ता। मजकूर हुजूर मालूम केल की देसाई मजकूर बाबाजी येसवंतराऊ यास हरामखोरीचा [नति] चा पावला या धास्तीने बाजे देसमुखाबराबरी वतन सोडून बा[हेर] गेले अहेत यैसियास साहेबी मेहेरवान होऊन देसाई मजकुरास [कौल] दिधलियां अपल्या वतनावरी येऊन किर्दीमामुरी करून साहेबा ... दुरुस करील तरी साहेबी त्याच्या पोटाची विले करून कौल दिल्हा पाहिजे म्हणौऊन मालूम केले बराये मालुमाती मनास अणून कौल दिल्हा असे कोणे बाबे शक न धरिता बेशक होऊन अपल्या वतनावरी येऊन किर्दीमामुरी करून सुखे असणे व तुमच्या पोटाची विले .... मिरास

दारा बरहुकूम करून देऊन तुम्ही सुखे अपल्या [वतना] वरी येऊन राहाणे दरी बाब कौल असे [मोहोर*]

[नि*] तेरीख १४ जिल्काद[1]

ले. ७९६ } { श. १५९१ पौष वद्य ४
म. चा. सं. } { इ. १६६९ डिसेंबर ३१

कौलनामे अज रख्तखाने राजेश्री शिवाजी राजे साहेब दामदौलतहू ता। बावाजी झुझारराउ मरल देशमूख ता। कानदखोरे मालूम बाद सुहूर सन सबैन अल्फ दादे कौलनामा येसा जे तुमचे बाबे राजश्री मोरोपंत पेशवे यानी मालूम केले की बावाजी शकजादा होउनू परागंदा झाला आहे हाली उमेदवार आहे की साहेबाचा कौल मरहमत जालिया शक दूर-करून येउनू भेटोन आसावे तरी कौल मरहमत केला पाहिजे म्हणून त्यावरून तुम्हास कौल मरहमत केला असे शक धरून परागंदा जाहालेस हा गुन्हा माफ केला असे तरी याउपरी कोणे बाबे शक व अंदेशा न करिता येउनू सुखे असणे कौल असे

तेरीख १७ साबाने

---

१ पत्राच्या डाव्या अंगास पुढील शिक्का—

श्रीशिवन । रपति हर्ष । निदान महा । देव म । त प्रधान

२ सर्व पत्र एक टाकीच आहे. वगळें अक्षर कोठेंहि नाहीं. तेरीख १७ शाबा हीं अक्षरें वेगळीं आहेत. शिक्के मागील लेखाप्रो.

सूची.*

* हीमध्यें विषयदिग्दर्शनही केलें आहे.

सूची.

१ मल्हार बाजी
१ कृष्णाजी माणकेश्वर
१ बाबूराव गणेश फडणीस
१ नारो निळकंठ मजमदार
१ चिंतो वामन देशमूख
१ रंगनाथ महादेव
१ माणकोजी सिंदे
१ दौलतराव घाटगे
१ बाळाजी लक्षमण
१ परशराम खंडेराव
१ नारो गोविंद
१ बयाजी नाईक जोधले जासूद
१ माहादाजी सोनवणी चाबूक
१ राघो केशव ठोसर
१ जनार्दन नारायण
१ येशवंतराव सखाराम पानसे

---

७२ दुसऱ्या बाजीरावाची शेवटची धडपड.*

(श्री. य. न. केळकर)

ले. २४२ } श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध २ / इ. १८१७ नोव्हेंबर १०

पौा छ २९ जिल्हेज सन समान अशर कार्तिक शुा २ विज्ञापना विशेष नगराकडे काही पलटणे आल्याचे वर्तमान ऐकिले त्यावरून

* २० वें संमेलन
ऐ. सं. सा. खं. २-९

नारोपंत आपटे व नारायण दिक्षीत सरंजामसुद्धा पाठविले त्या लस्करचा बेदिलपणाच आहे पलटणचे लोकापौ दोन तीनशे माणूस फुटले त्यापौ शेपंनास येथे येऊन राहिले आहेत करमळेकराहि येका दोन दिवसी दोन हजार सामानासुद्धा येऊन पोहचणार निपाणीकर व चिंतामणराव आपा पुलावर आले म्हणोन बातमी आहे निपाणीकर याचा सरंजाम जफ्त केला होता तो सोडला मला व कुशाबास आज दोन दिवस आज्ञा होते की तुम्ही आंणाकडे जावे त्यातील मजकूर हरीजवल तोंडजबानी सागितला आहे गगाबाई राजमाचकर यासहि आपलेकडे जावयास सागितले आहे इंग्रजाची रस्त बंद करावयास नाक्यानाक्यानी लोक पाठविले आहेत पेशावरास (देशावरास) पत्रे गेली आहेत सध्या पुणे सोडून श्रीमंत पलीकडे जात नाहीत आज सर्व प्रकर्ण गोखले आहेत राजश्री धोंडोपंत याणी यावे आसी कालपासून येक दोन वेल आज्ञा जाली आहे हे विज्ञापना

ले. २४३ } श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ३ / इ. १८१७ नोव्हेंबर ११

पौ। छ १ मोहोरम कार्तिक सन समान अशर मयातैन व अलफ

विज्ञापना विशेष आज्ञा घेऊन निघालो तो प्रहर नऊ घटका दिवसाचे सुमारे येऊन पोहोचलो श्रीमंत महाराज कलद्रीत हज्यामत करीत होते श्नानाचे जाग्याजवल मी उभा राहिलो होतो मला पाहाताच हसले नंतर पुसिले की गंगाबाई आली का निघाला केव्हा नंतर सवितर मार सागितला आज्ञा जाली की आंणा किती दिवस राहाणार मी विनंती केली की दोन च्यार दिवस आहेत इकडील बेत पाहून पुढे जाणार किल्याचे बंदोबस्ताचा मार सांगितला होता त्याप्रमाणें श्नानाचेच वलेस सविस्तर सागितला ठीक आहे म्हणोन सागितले आठ च्यार दिवस तेथे राहिल्यास चिंता नाही म्हणोन बोलले त्यावर मी विनंती केली की राजश्री आपाजीपंत

शेवडे यास आज्ञा असावी की बळकुबलेस किल्यावर घ्यावे त्यावरून मारनिल्हेस मजकडे घेउन ये म्हणजे सांगतो त्यास संधि पाहून त्याची भेट करतो ती राजश्री बाबाचे प्रकृतीचा मार सागितला ऐकोन घेऊन सागितले की आसी प्रकृत आहे त्यापेक्षा येण्याची घाई करू नये मी बोलल[लो] की आंणा खाली गेले तरी बाबा डोणज्यास राहून प्रकृत बरी जाली म्हणजे माहाराज आस्तील तेथे येणार तेव्हा बोलले की प्रकृतीचा विच्यार पाहून कर्णे ते करावे आंणापासी असल्यास चिंता नाही मागोन बोलले की आमचेजवळ आस्तात तेव्हा प्रकृत बरी आस्ते मनातील हसील पाहाता जवळ आसावे हे चागले परंतु प्रकृतीचा मार सागितल्यावरून तेथे आसावे आसी आज्ञा जाली चिंतामणराव आपा आज आस्तमान पावेतो येऊन पोहचणार निपाणीकराहि तेथून निघाल्याची बातमी आहे नगरास फिरंग्यानी शहरात अमल बसविला मामलेदार कैद करून बेडी घातली व माधवराव वैद्य खासनीस व हिमतखान पन्ही यासहि कैद करून बेड्या घातल्याचे खचित वर्तमान आहे च्यार पलटणे आल्याची बातमी आहे त्यापौ पाचशे तुरक स्वार मात्र सिरूरास येऊन पोहोचले बाकी मागेच आहे त्याचे मागे विचूरकराकडील फौज आहे व इकडून नारोपंत आपटे गेलेच आहेत अल्पस्टीन व पोट याची आतले आत कटकट होऊन पोटाने जीव दिल्याची बातमी आहे परंतू आद्याप खचित नाही इग्रजाचा भरणा पुण्यानजीक विशेष नाही नगरास आमल बसविला परंतू शहरास उपद्रव नाही राजश्री वामनराव आपटे व बापू याचे मते येखादे पल्यास जावे तेथे राहू नये हे चागले माहाराजाचे म्हणण्यात आठ च्यार दिवस राहून तालामाला इकडील पाहावा त्याप्रमाणे केल्यास चिंता नाही तीर्थरूप राजश्री बाबानी तेथे यावे हे सर्वांचे मते व श्रीमताचेही मनातील भाव पाहाता आसाच आहे श्रृत व्हावे हे विज्ञापना

ले. २४४ } श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ५
इ. १८१७ नोव्हेंबर १३

पौा छ ३ मोहोरम उर्फ कार्तिक मास सन समान अशर मयातेन

विज्ञापना विशेष साडूबरोबर पत्रे आली ती पावोन लिहिला मार सविस्तर कलला हवालदाराचा मार कानावर घालून आज्ञा होईल त्याप्रो लिहून पाठवितो सगुणाबाईचा मार कानावर घालावा तर गंगाबाईची गाठ पडली नाही कालपासोन माहाराजास शेत्य जाले आहे लढाईचा बेत आज होता परंतु राहिला राजश्री नारोपंत आपटे सिरुराजवल आहेत त्याचे कुमकेस काल रात्रौ हजार स्वार गेले अक्कलकोटकर राज्याकडील च्यारशे स्वार नारोपंताकडे जात होते त्याची व तुरकाची राजणगावापासी पडोन लढाई जाली आकलकोटकराकडील खासा पडला लोक पकडले ते नारोपंत जवल गेले पलटणे आद्याप सिरूरास आल्याची बातमी नाही तुरुक मात्र आले धुलपास वस्त्रे काल देऊन कोकणात घाटबंदी करावयास रवाना केले काल तिसरे प्रहरी मानकरी मंडळी लहानमोठी डेऱ्यास मुजऱ्यास आली होती वरकड मार अधिकोतर नाही शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना राजश्री बाबाजीपंत गोखले नीा गोखले हे तलेगावचे समोर गेले होते त्याणी इग्रजाकडील बैल येत होते ते शे दीडशे वलून आणोन लोहोगडास ठेविले व दोन गोरे होते ते धरून गळी दिल्हे बैलावर किराणा जिनस भरला आहे हे विज्ञापना

ले. २४५ } { श. १७३९ कार्तिक शुद्ध ५
इ. १८१७ नोहेंबर १३

श्री

पौा छ ४ मोहरम कार्तिक सन समान अशर मैयातैन

विज्ञापना ताा छ ५ (३ ?) मोहरम गुरुवासर अस्तमान पावेतो सुखरूप असे यानंतर मैराळा सिपाई याजबरोबर पत्र आले तेथे आज्ञा

की च्यार आा सिपाई तुम्हाजवल आसोन नित्य पत्रे यावी व प्रचीतगडचे बंडाचे पारपत्यास लोक आहेत ते आणविले म्हणौन ऐकिले त्याचा शोध करून लिहून पाठवावे म्हणोन लिहिले त्यास सिपाई असोन नित्य वर्तमान कलवावे यात मजकडून आतर पडले नाही आलो ते दिवसी खडूस पाठविलाच होता काल सुभाना पटेकरी याजपासी पत्र दिल्हे म्हणौन दुसरा सिपाई पाठविला नाही आज प्रतःकाली जासूद पाठविलाच होता दोन प्रहरी राजश्री नागोपंत आबाकडील सिपाई आले होते त्याबरोबर मार लिहून पाठविलाच आहे नित्य पत्र पाठवावयाविसी कमी पडणार नाही लोकाचा मार राजश्री अंताजीपंत मामास विच्यारिला त्याणी सागितले की आणावयाचा बेत केला होता परंतू माहाराजाची आज्ञा जाली की लोक आणविले असता कोकणपटीचा बंदोबस्त राहाणार नाही याजकरिता आणावयाचा बेत राहिला याप्रो मारनिल्हेनी सागितले राजश्री नारोपंत आपटे आज तिसरे प्रहरी आले व इग्रजाकडीलहि सरंजाम येऊन खडकीस पोहोचला सात हजार पावेतो गला व दारूगोली मिळोन बैल आहेत पाच चार हजार बैल जिनसाचा नारोपंत यानी पाडाव केला तिसरे प्रहरी इग्रजाचे लस्करात तोफेचे बार खुषीचे जाले म्हणौन आपलेही तोफखान्यात दाहा बार जाले श्रीमंत राजश्री आपासाहेब आज तीन च्यार घटका रात्रीचे सुमारी येणा[र] मोतीबागेत तिसरे प्रहरी आले सडेच आहेत कुटुंब वाईस आहे देशावरास पत्रे नेहमी चालीच आहेत राजश्री आत्मारामपंत जोशी व बापाजी मोरेश्वर भेटले होते त्याचे म्हण्यात दिपवालीस सिंद्याचा व इग्रजाचा बिघाड जाला म्हणौन बातमी आहे परंतू खचित वर्तमान नाही वरकड मार अधिकोतर नाही प्रतिनिधी लस्करात येऊन राहिले आहेत त्याची खास पागा शेसवासे घोडे आहे व काही पायदळ आहे हवाल्दाराचा मार संधी पाहून कानावर घालतो श्रृत व्हावे हे विज्ञापना आपासाहेब येऊन दाखल जाले येथच राहावयाचा बेत आहे हे विज्ञापना

ले. २४६ } श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ६
इ. १८१७ नोव्हेंबर १४

पौा छ ४ मोहरम सन समान अशर मयातैन

विज्ञापना विशेष आज प्रतःकालचे पत्र आले तेथे आज्ञा की काल पत्र आले नाही नित्य येक पत्र येत जावे त्यास काल सुभाना पटे-करी याजबरोबर तपसिलवार मजकुराचे पत्र लिहून पाठविले ते पावलेच आसेल आज प्रतःकाली राजश्री आपाजीपंत शेवड्याचे पत्र घेऊन पाठविले ते पावलेच आसेल आज यजमानाचा बेत सासवडास जाण्याचा खचित होता उंटे वगैरे सरंजाम घाटापावेतो गेला परंतू मंडळीचा आग्रह न जावे आसा पडला त्यावरून राहणे जाले व खटले माघारे आले राजश्री नारोपंत आपटे याजकडील बातमी आज आली त्यातील मार इग्रजाकडील पाच तोफा व आठशेपर्यंत पायदल व पाचशे तुरक स्वार व व दोनशे पटाण याप्रो सामान आहे नारोपंत व बाबाजीपंत गोखले गेले आहेत ते मागे पुढे त्या-जवर जाऊन पडतात याजपासी तोफा व पायदल कमी यामुळे तुटून त्या-वर जावत नाही इग्रजाचे सरंजामाचे च्यार हजार बैल सरकारात पाडाव करून आणिले व येक गोरा ठार मारला व तोफ येक आणिली व त्याज-कडील सावकाराची येक बायको धरून आणिली आहे राजश्री चिंतामणराव आपा काल जेजुरीस आले आज येथे येणार आसे आहे इग्रजाचे लोक आले ते अलंदीचे मयदानात आल्याची बातमी आहे नगर दरोबस्त लुटून दाणा व नख्त जे सापडले ते किल्यात नेल्याची बातमी आहे किले कर्नाळा येथे बंदोबस्त कमी म्हणोन माहाराजास वर्दी कोणाकडून ला[ग]ली आसेल ती आसो मला बोलावून नेऊन पुसिले की किल्याचे लगत बंदोबस्त कमी आहे म्हणोन ऐकतो हे काय त्यावर मी विर्नती केली की बंदोबस्तास कमी नाही बंदोबस्त आम्हाकडून यथास्थित आहे बापू गोखले वगैरे मंडळी बसली होती त्यादेखत बोलणे जाले राजश्री सखारामपंत यास बोलाऊ पाठविले आहे ते आले म्हणजे आपल्यास मुदाम पत्रे लिहून पाठवितो वरकड मार

आधिकोतर नाही प्रकृती यजमानाची आज बरी आहे हे विज्ञापना रा। छ ३ मोहरम आडीच प्रहर

ले. २४७ } श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ६
इ. १८१७ नोव्हेंबर १४

पै॥ छ ९ मोहरम मंदवार प्रातःकाल च्यार घटका दिवस

विज्ञापना ता। छ ४ मोहरम भृगुवासर दोन प्रहर पावेतो सुखरूप असे यानंतर फुलगावाकडे जाता संगमापुढे श्री खंडोबाचे देवालय आहे तेथे रात्रौ इग्रजाकडील छबिना येऊन उभा राहिला होता व त्या माथ्यावर तोफ आणोन ठेवली होती म्हणोन बातमी आली परंतु तोफ आली नाही छबिना मात्र होता दिघी व लोहोगाव आणिक भोवताले गाव आहेत ते दरोबस्त लुटून टाकिले व धानोरी जाली ती येथून दिसत होती माहाकाळी तोफ आणोन लागू करावी असा बेत होऊन तोफखान्यातून तोफ आणविली आहे कोठून लागू करतील ती पहावी श्रीमंत राजश्री आपासाहेब आले ते रात्रौ खटल्यासुधा डेऱ्यातच होते निद्रा कलद्रीतच जाली आज त्याजकडील डेरे उजवे बाजूस जाले स्नानसंध्या खाशाची इकडे जाली भोजन मात्र तिकडे जाले श्रीमंत सौ। सरस्वतीबाई काल रात्रौ अस्पर्श जाली म्हणोन त्याचे जाण्याचा बेत सासवडास जाला होता बरोबर मी व अमृतराव पेडशे यानी जावे म्हणोन आज्ञा जाली होती परंतू तूर्त जाण्याचा बेत राहिला राजश्री आमृतराव व गणपतराव पेडशे यास प्रथम दिवसापासोन आज्ञा जाली आहे की सरस्वतीबाईजवल आसावे याजकरिता त्याचे विद्यमानचे शंभर स्वार व शंभर पायदल ठेवावयास त्यास आज्ञा जाली यजमानाची प्रकृती आज बरी आहे वरकड मार आधिकोतर नाही शेवसी श्रुत होय हे विज्ञापना खडकीपासी त्याचे लस्कर आहे आज दोन प्रहरी त्याचे लगत डोगर तेथे तोफ इग्रजानी लस्करचे मारगिरीवर आणोन ठेविली आहे राजश्री बापू गोखले तयार होऊन तलाऱ्यास जाणार आहेत हे विज्ञापना

ले. २४८ श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ७
इ. १८१७ नोव्हेंबर १५

पॉा छ ५ मोहरम मंदवार

विज्ञापना विशेष आज दोन प्रहरानंतर इंग्रजाचे लोकानी दहावीस बार बदुखेचे सोडले व टेकडीवर दोन तिनिशे माणूस आले हे येथून पाहिलेनंतर कुच्याची नौबत होऊन राजश्री बापू गोखले वगैरे मंडळी दरोबस्त तयार होऊन तोफासुधा त्याचे तोंडावर गेले माहाराज डेऱ्याबाहेर मंडप होता तेथे जाऊन बसले होते लोकानी मुजरे करून बापूबरोबर गेले नंतर माहाराज निघाले ते मुदबखचे पाठीमागे राजश्री गंगाधरपंत मराठे याचे पाल उचोट्यास होते तेथे जाऊ[न] इंग्रजाचे व आपले लस्करचा तमाशा पाहात होते तेथे सारा दरबार भरला होता बापू मागे फिरोन आले ते तेथेच आले व चितामणराव आपा आज आले त्याची भेटहि तेथे होऊन नंतर स्वार संधेस आली श्रीमंत राजश्री आपासाहेबहि जवल होते त्याच्या गोष्टी हिमतीच्या माहाराजापेक्षा आधिक दोन च्यार वेळ ते बले की आपण घोड्यावर बसोन मागे उभे राहावे नाही तर मला तरी आज्ञा व्हावी ऐकोन घेतले वरकड मार आधिकोतर नाही चितामणराव आपाचे फौजेचा आदमास उदईक लिहून पाठवीन आपास ज्वर येतो श्रृत होय हे विज्ञापना

ले. २४९ श्री { श. १७३९ कार्तिक शुद्ध ८
इ. १८१७ नोव्हेंबर १६

पॉा छ ७ मोहरम सोमवार

विज्ञापना ताा छ ६ मोहरम रविवार प्रत:काल च्यार घटका दिवस पावेतो वर्तमान यथास्थित असे यानंतर काल रात्रौ इंग्रजाकडील छापा येणार असे वर्तमान होते त्यावरून अस्तमानापासोन आपले लस्क-

रची तयारीच होती राजश्री बापू गोखले व आबा पुरधरे वगैरे मंडळी छबिन्यास गेले होते आज प्रातःकाली आले मोकाबला आला नाही आपआपले भागात तयार मात्र होते राजश्री चिंतामणराव आपा व माधवराव रास्ते डेऱ्यास जवळ राहिले होते किलेकोटाचे बंदोबस्ताविसी सरकारची आज्ञा जाली त्याप्रो मार राजश्री सखारामपंत वाकणकर याजपासी सागितलेला आहे ते विनंती करतील त्याप्रो बंदोबस्त जागोजागा होण्याविसी आज्ञा व्हावी आपा निपाणीकर येडूरमाजरीस आले त्याजकडून सांडणीस्वार आले ते काल तिसरे दिवसी येऊन पोहचले तेही येका दो दिवसी येथे येऊन दाखल होतील माहाकाली तोफ तोफखान्यातून काल काढली ती भवानी पेठेत रात्री नंवद बैलावर आली आज लस्करात पोहचेल पुढे कोठून लागू होईल ती पाहावी घरचे घोड्याची सोय राजश्री गणपतराव पेडशे आगर आबा पुरदरे याजकडे करून लिहून पाठवावे म्हणोन आज्ञा त्यास पडशे याजकडे सोय आहे घोडी सरंजाम सुधा व त्याबरोबर कारकून कोणता द्यावयाचा असेल तो देऊन रवाना करावयास आज्ञा जाली पाहिजे राजश्री हरीपंत यास कागदपत्राची माहितगार तालुक्याची आहे येथे काम लागल्यास राजश्री रावोपंतास पुरती माहितगार बोलावयाची नाही याजकरिता मर्जी आसल्यास मारनिल्हे पुणे मुकामी आसल्यास चागले दोन्हीपौ मोहरा च्यार राजश्री मोरोबा मोने याजकडे आहेत त्या घेऊन मागाहून पाठऊन देतो शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना

ले. २९० } श्री { श. १७३९ कार्तिक वद्य ११
{ इ. १८१७ डिसेंबर ४

पौ छ ४ सफर सन समान

विज्ञापना ताा छ २४ मोहरम गुरुवार मुा भालवणी येथे सुखरूप असे यानंतर आपणाकडून पत्र राजश्री अमृता ठाकरे याजबरोबर आले ते पावले व तोंडजबानी मार मशारनिल्हेनी सागितला

ऐ. सं. सा. खं. २-१०

त्यावरून सविस्तर कलला इकडील मार तर आद्याप प्रथम दिवस आहे आपलेकडील स्वार खास पागेचे होते त्यास आदा जाला होता तो ऐवज सखाराम दिक्षित याणी सिलकेस काढला आहे राजश्री माहादाजीपंत जोसी याणी ऐवज घेतला तो कोणाजवल ठेविला याचा शोध नाही राजश्री राघोपंत मराठे याचे स्वाधीन करावा म्हणोन मी सांगितले होते आज मुा बहुतकरून पंढरपुरास जाणे होईल असे दिस्ते कर्नाटकातू[न] दोन तीन पलटणे पाल्छापुरापावेतो आली म्हणोन बातमी आहे व पुण्याकडील आमचेमागे आहेत त्याचा व स्वारीचा छीटा वीस कोसाचा अस्तो पुढे रोख मोगलाईतला आथवा खानदेशाचा दिस्तो ईश्वर इच्छेने पूर्ववतप्रो दिवस येतील ते सुदीन अर्जुना सिपाई आपणाकडे पाठविला आहे यास पंढरपूरचे मार्गाने रवाना केल्यास शोध लावीत येईल सरकारी कामे आपलेकडे आहेत त्याचा बंदोबस्त यस्थास्थित असावा म्हणोन सरकारची आज्ञा होते आपण हली कोकणात जरी राहाणे तरी बहुत सावधपणे असावे मी ल्याहावे आसे नाही शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना अमृताने आपलेकडील वर्तमान माहारा[जा]स कलविल्यावर बहुत वाईट वाटले हे विज्ञापना राजश्री माहादाजीपंत वलेकर निा ढमढेरे याचा लाखोटा आहे तो मौजे कलमोसी ताा सावर्डे येथे पावता होण्यास आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना

ले २५१ } श्री { श. १७३९ कार्तिक वद्य १२
{ इ. १८१७ डिसेंबर ९

पौा छ ९ सफर सन समान इदुवार

विज्ञापना ताा छ २९ मोहरम मंदवार पावेतो सुखरूप असे यानंतर आपले पत्र पंढरपुरास दाखवावयास संधी जाली नाही मुकामी आल्यावर रात्रौ पत्र आले म्हणोन सांगितले उदईक पाहू म्हणोन आज्ञा

जाली रसालगडचा राहाण्याचा पर्याय ठीक आहे म्हणोन सागितले व राजश्री बालोबाबाचे पत्र घेऊन पाठवावे म्हणोन आज्ञा जाली त्यावरून माारनिल्हेचे पत्र घेऊन पाठविले आहे वस्तभाव आगदी गेली हे वर्तमान ऐकिले त्यावर बोले की दागिने घालण्याची हाउस फरच होती हली दागिने घालणारणीचे मनाजोगे जाले गाफिलपणा बहुत केला आपले विषयास आविगत करून घेतली तेव्हा आमची स्थळे त्याचे स्वाधीन आहे त्याचा बंदोबस्त कसा राखतील म्हणोन माहाराज बोले त्यावर मी विनंति केली की माहाराजानी स्थळाविसी काडीमात्र कालजी करू नये सिव्हागडास आसा पर्याय जाला त्यास उपाय कोणाचाच नाही त्यावर आज्ञा जाली की होणार ते हो[त]च आहे परंतू तू बोलतो याप्रोा लिा पाठव त्यावरून लिहिले आहे आपण माार डाक बसविण्याचा माार लिहिला होता व बाबाचे म्हणे पडले की डाक तुम्ही आम्ही मिळऊन बसऊ म्हणजे ठीक पडेल व खर्चही कमी लागेल याजकरिता आपले विच्यारास येईल तसा बंदोबस्त व्हावा स्वारीचा बेत कोणीकडे जाण्याचा समजत नाही मोगलाचा व इग्रजाचाहि तूर्त श्नेहे आहे हरिभक्तपरायण राजश्री रामचंद्र गोवि[द] याचे घर पैठणात आहे तेथे गोविद बक्षानी जत्पी केली मुलेमाणसे त्या गलबलीत कोणीकडे गेली त्याचा आद्याप ठिकाण लागत नाही जुमस (?) इग्रजानी ठाणे बसविले म्हणोन बातमी आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ले. २९२ } श्री { श. १७३९ कार्तिक वद्य १३
इ. १८१७ डिसेंबर ६

पैा छ ९ सफर सन समान

विज्ञापना ताा छ २६ मोहरम मंदवार मुा करकंम भोसे येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असे यानंतर बाळ सिपाई व बहिरा जासूद चिपलोनचे मुकामीहून पत्रे घेऊन छ १९ मोहरमी निघाले ते पंढरपूरचे मुकामी छ २९ मिनहूस भृगुवारी प्रातःकाली पावले पत्रे पाहून सविस्तर

मार केल्ला माहाराजास पत्र होते ते प्रविष्ट केले व माझे पत्रातील मारहि बोलो ऐकोन घेऊन उतर केले तो मार आलादा पत्री लिहिला आहे त्यावरून कलेल इकडील मार तर इग्रजाकडील तीन पलटणे व पाचशे तुरुक स्वार व हजार पंधराशे मराठे लोक घोरपड्याकडील पुण्याहून निघाले ते बोरघाटाने वीरवाल्ह्याचे सुमार आल्याचे वर्तमान पाडळीस कार्तीक शुा ११ स आले त्यावरून राजश्री तात्यासाहेब विंचूरकर व राजश्री नारोपंत आपटे व राजश्री रामचंद्रपंत सुभेदार व राजश्री रघुनाथराव आपटे येकूण च्यार खाशाबरोबर कमकसर दाहा हजार स्वारांचा भरणा सडा होता त्याणी निरेचे पुलाचे पलीकडे वीरवाल्ह्याचे रानात गाठ घातली तेथे लढाई जाली सरकारचे लोकानी येक दोन गोरे मारले याचीहि च्यार पाच खासे जखमी जाले रामचंद्रपंत सुभेदार यास गोलीची जखम हातास लागली इतका मार वद्य द्वितीयेस जाला व त्रितीयेस स्वारी निघाली ते पुण्याचे सुमारे देवरास सालप्याचे घाटा अलीकडे दोन कोसावर मुकाम जाला तेच दिवसी दोन प्रहर रात्रीचे सुमारे वर्तमान पलटणे जवळ आल्याची बातमी ऐकोन कूच जाले ते प्रातःकाली स्वारी कोरेगावी आली तेथे राजश्री आपा निपाणीकरही होते त्याच्या भेटी जाल्या भोजनोत्तर स्वारी निघाली ते न्हावीचा घाट चढोन पुसेसावलीस मुकाम जाला राजश्री बापू गोखले व राजश्री आबा पुरधरे उभयता सालप्याचे घाटास तोंडावर सरंजाम घेऊन राहिले सरकारचे सरंजामात तोफा नाहीत त्याबरोबर १२ तोफा घोड्याच्या आहेत ते बाजूस व मागे पुढे तोफा लयनेचे बुरूज बाधोन मधे बहिरबुनगे घालून चालतात घोडेस्वाराचा उपाय चालत नाही पंचमीस रात्रौ खासे कलद्रीस दोन प्रहर रात्रीचे सुमारे समई आत होती तिचे काजळीने आग लागली रूभरी होती त्यात वाराहि बहुतच सुटला होता यामुळे विझवावयाचा उपाय चालला नाही मागील आवई ऐकोन कूच होऊन स्वारी दर मजल माननदीवर आली तेथे राजश्री बापू व आबा येऊन भेटले पुन्हा न्हावीचा घाट चढल्याची बातमी

ऐकल्यावर बापू आबा तेथे राहिले स्वारी मजल दर मजल भाळवणी पिली-वरून पंढरपुरास आली हली पलटणचे मागे विंचूरकर नारोपंत आपटे रामचंद्रपंत रघुनाथराव आहे तोडावर बापू व आबा आहे परंतू याच्याने कोणतेहि अधिक उणे घडत नाही निपाणीकर हली रात्रंदिवस नेहमी जवल आहे कोणताहि विच्यार त्याचेच धोरणाने होतो राजश्री चितामणराव आपा वगैरे पटवर्धन मंडळी समागमेच आहे कर्नाटकातून च्यार पलटणे व काही तुरुक स्वार आले ते श्रीकृष्णा उतरून आलीकडे आल्याचे वर्तमान आहे पुढे पुण्याकडील पलटणे व ही कोणत्या जाग्यास मिलतील हे न कले सिंदे होलकर व भोसले याजकडील आद्याप काहीच कागदपत्र आले नाहीत राजश्री बापाजी मोरेश्वर व नारायणराव वैद्य समागमे आहेत सरकारची पत्रे पहिले लढाईपासून तीन तीन आजपावेतो गेली व हुजरेहि गेले आहेत परंतू आद्याप तिकडील मार काहीच समजत नाही लाट साहेब तीस पलटणे घेऊन सिंद्याचे व होलकराचे लस्करापासून दाहाबारा कोशाचे अंतराने आहेत म्हणोन बापाजीचे सागण्यात आहे राजश्री गोविंदराव काले बरोबरच आहे परंतू विच्यारात येणे कमी राजश्री दादा गद्रे व राजश्री राघोपंत थथे समागमे आहे उपयोग नाही सध्या त्याचे खर्चाची आडचण मात्र आहे राजश्री अमृता ठाकरे याणी आपले कडील सविस्तर वर्तमान माहाराजास सागितले व पत्रहि प्रविष्ट केले त्यावरून त्याचेहि मनास बहुतच वाईट वाटले पाडलीचे मुकामी शुा १२ स आपलेकडील वर्तमान माहाराजानी ऐकिल्यावरून मजला आज्ञा जाली की तू जातीने जाऊन सारे मंडळीस भेटून ये मग पुन्हा आज्ञा जाली की तू स्वारी सोडून जाऊ नको तुझे बरोबर दुसरा कोणी पाठवावयाजोगा असल्यास त्यास पाठऊन वर्तमान आणीव त्यावरून येशा बखट्यास आपल्याकडे पाठविले होते आपण भोरास आहा म्हणोन वर्तमान ऐकोन भोरास गेले तेथे राजश्री बापू चिपलोनकर भेटले त्याणी आपला सविस्तर मार सागितला आपण कूच करून गेल्यास च्यार पाच दिवस जाले

आतर फार पडला व घाटबंदी जाल्याचे वर्तमान ऐकोन मजकडे आले हे वर्तमान माहारा [जा] स सांगितले त्यावरून आज्ञा जाली की मुदाम गडी त्याजकडे पाठऊन वर्तमान आणीव त्यावरून अर्जुना सिपाई व किले वारूगड येथील कोकणचे माहितगार दोन आा सिपाई येकूण तीन आा छ १९ मोहरमी रवाना केले त्याबरोबर पत्रे दिल्ही नाहीत वाटेने पत्रे निभत नाही म्हणोन ऐकिले म्हणोन पत्रे पाठविली नाही मजकडील दिक्षिताकडे स्वार होते हली त्याजकडील लोकाची घालमेल करून लोक हुजूर आणले दिक्षिताची खास पागेची घोडी वो राजश्री सखाराम दिक्षित याचेकडे ठेऊन बंदोबस्त करून दिल्हा माझे स्वारात कारकून मोरो निलकंठ होता तो पुण्यास राहिला दुसरा कोणी तरी पाहिजे याजकरिता राजश्री कृष्णाजी नरसी पंढरपुरास भेटले त्याची खाजगत घोडीहि होती त्यास समागमे घेऊन राजश्री वामनराव आपटे याजकडून सोय करविली आहे राजश्री रामाजीपंत रानडे याचे चिरंजीव राघोबा रानडे कुटुंबसुधा यात्रेस आले पुढे श्रीखंडोबाचे दर्शन घ्यावयाचे आहे त्यास नागपूर सोडून दीड मास जाला तिकडे पलटणचा भरणा बहुतसा नाही लढाईचे वर्तमान त्याणी वाटेस ऐकिले म्हणोन सागितले पुण्यातील माार ऐकण्यात आहे की लोकाची घरे खणो लागले राजश्री मोरोबा मोने याचे घर खणोन वित विसय नेला म्हणोन गडी आला तो सागत होता हली सरकारची फौज लढवई थोडीच आहे परंतु लुटारू फार ज्या गावा-कडून स्वारी जाते त्या गावची दशा पुसो नये इग्रज मागाहून येतात त्याचा उपद्रव काडीमात्र गावास नाही हली सारे खले मिलोन तीस चाळीस हजाराचा सुमार आहे धान्याची महर्गता फार लस्करात शेटचा नाही काही दुकाने आहेत ती तुटपुंजी याप्राो व्यवस्था आहे पुढे भेट होईल तो सुदीन शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ले. २९३ } श्री { श. १७३९ मार्गशीर्ष शुद्ध ३
{ इ. १८१७ डिसेंबर ११

पौा छ ८ सफर उर्फ मार्गशीर्ष मास सन समान अशर मुा रसालगड

विज्ञापना ताा छ २ सफर गुरुवार मुकाम लस्कर नजीक बाभुळगाव येथे सुखरूप असे या नंतर छ १९ मोहरमची पत्रे आली होती त्यावर पत्र येऊन काहीच वर्तमान समजत नाही त्यास असे होऊ नये वरचेवर पत्र पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे जंजिरे सुवर्णदुर्ग येथे इंग्रजाची गलबते येऊन लढाई सुरू जाली आहे म्हणोन राजश्री बालोबा बाबाचे पत्र आले त्यावरून माारनिल्हेनी माहाराजास विनंती केली की ताो हायचे मामलेदारास सरकारची पत्रे कुमकेस सरंजाम देण्याची आसावी त्यावरून कोकणचे मामलेदारास पत्रे लिहिली आहेत त्यात आपले नावचेहि पत्र आहे त्यात माार की आपले तालुक्याचा बंदोबस्त ठेऊन सरंजाम लोक व दारूगोळी जंजिरे माारी द्यावी बाबानी मला सागितले की सरकारची पत्रे आहेत परंतू तू येक पत्र लिहून दे त्यावरून त्याणी सागितले त्याप्राा आलादा पत्र लिहून दिल्हे आहे आपलेकडून होईल तेथपर्यंत लोकाची व दारूची वगैरे सामानाची पैरवी जाली तर चागले किले अंजनवेलचे बाऱ्यास फतेमाऱ्या इंग्रजाच्या आल्या म्हणोन येथे वर्तमान आहे परंतू आपल्याकडून लिहून आले नाही तरी किले विजयदुर्ग व अंजनवेल येथील आधिक उणा माार आसेल तो लिहून पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे पाा पारनेर येथे इंग्रजानी ठाणे घातल्याची वार्ता आहे परंतू तेथून मुदाम कोणी आला नाही व कान्होराकडीलहि माार काही समजत नाही इंग्रजाचे पलटणाचा माार तर टेंभुरणीचे आलीकडे तीन मजला आलो ते पंढरपुरास येऊन भीमेचे आलीकडे आल्याचे वर्तमान आहे राजश्री बापू गोखले तोंडावर आहेत मागे विचूरकर व आपटे आहेत ते मजल दर मजल येतच आहेत सरकारचे स्वारीचा व इंग्रजाचे पलटणाचा

वीस बेवीस कोसाचा छिटा आहे मुकाम मजकुराहून सिधटेक पाच कोस आहे स्वारी जाण्याचा बेत कोणीकडे जाण्याचा हे समजत नाही अर्जुना सिपाई पाठविला तो आद्याप पावला नाही किंवा तेथून रवाना होऊन स्वारीत आला नाही हे समजत नाही राजश्री रावजी रास्ते व गणपतराव पर्भू याणी सरकारात विनंती केली की तो सालसी येथे जाऊन सिबंदी ठेऊन इग्रजाचे ठाण्यात आमल बसवितो त्यावरून त्यास आज्ञा केली की सिबंदी ठेऊन सरकार तालुक्यातून जाल तेव्हा उपद्रव लागेल याजकरिता मामलेदाराकडून आमची खातरजमा करावी म्हणजे चागले त्यावर मशारनिल्हेनी मला बोलाऊन पुसिले की आसा पर्याय आहे लोक आम्ही ठेऊन अंजनवेल विजेदुर्ग यामाग्रे येऊ परंतू बालाग्र उपद्रव करणार नाही व समयास तुमचे तालुक्यास उपयोगाहि पडेल याजकरिता माहाराजाजवल बोलावे की उभयताकडून आमचे तालुक्यास उपद्रव लागणार नाही याविसी बहुत मार बो[ल]ले त्यास मी सागितले की सरकारातून तुम्हास पाठवीत आसल्यास मजकडून गुंता नाही तुमची खातरजमा करणे ती आज मजकडून व्हावयाची नाही यजमान हली तालुक्यात आहेत त्याचे पत्र येईल त्याप्रो मी माहाराजांस विनंती करीन याप्रो साफ उतर केले पुढे कसा बेत होईल तो पाहावा जाला मार कलावा म्हणोन लिहिला आहे शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना

ले. २९४ श्री श. १७३९ मार्गशीर्ष शुद्ध ६ इ. १८१७ डिसेंबर १४

विज्ञापना तागाईत मार्गशीर्ष शुा ६ मंदवासर प्रातःकाल पावेतो सिधटेक येथे सुखरूप असे यानंतर जंजिरे सुवर्णदुर्ग येथे इग्रजाची पलटणे येऊन लढाई सुरू जाली आहे व किले सिवनेर येथेहि लढाई सुरू जाली म्हणोन सरकारात वर्तमान ऐकिले त्यावरून रोा बालोबा बाबा व आन्याबा सुभेदार यास आज्ञा जाली कोकणपटीचे किले व माहाल आहेत याचा ऐवज रसदेचा आहे तो येका जगा तुम्ही जमा करून ज्य.

ठिकाणी लढाईचा प्रसंग पडेल तेथे कुमक करून बंदोबस्त यथास्थित राखीत जावा याप्रो मजकूर बाबाकडून कलला व त्याणी मला बोलाऊन नेऊन सांगितले की आसी आज्ञा जाली त्यावरून तुमचे तालुक्यात येथून कारकून पाठऊन तुमचेपेक्षा बंदोबस्त आधिक करतो आसे नाही व मामले तुम्हाकडेसच कायम आहेत त्याची घालमेल नाही त्यापेक्षा घरोब्याचे रीतीने आमचे तर्फेचा जो बंदोबस्त आधिकउणा राखणे तो आपण राखावा सिबंदी जाजती ठेवणे व दारूगोली खरेदी कर्णे ती करावी परंतु माझा येक कारकून आपले जवल आसावा म्हणजे पुढे सरकारातून ऐवज मजुरा पडावयास दिकत पडणार नाही व बाबानीहि आपल्यास पत्र आलादा लिहिले आहे व मजपासोन येक पत्र लिहोन घेतले आहे ते त्याणी आपले जासुदासमागमे पाठविले आहे व आणखीही त्याचे सागण्यात आहे की किल्ले प्रतापगड व जंजिरे सुवर्णदुर्ग हे दोनी तालुके मजकडे आहेत तेथेही आपण कारकून पाठऊन सरंजाम कमती असेल तो करवावा व लोक जाजती पाहिजे आसल्यास ठेऊन द्यावे आणि आधिक उणा मार लिहून स्वारीत कलवीत असावा याप्रो त्याचे सागणे आहे पा पारनेर येथे व कसबे कान्हूर येथे इग्रजाचे ठाणे बसले तेथे पत्र लिहून मी पाठविले आहे सविस्तर मजकूर समजला म्हणजे लिहन पाठवीन आज कूच होऊन स्वारी श्रीगोद्यास जाणार आसा बेत दिस्तो इग्रजाचे पलटणचे स्वारीचे आंतर पधरावीस कोसाचे आहे सरकारच्या फौजा मागे पुढे आहेतच वरकड मार आधिकोतर नाही श्रृत होय हे विज्ञापना गुहागरास व दहिवडास लोक आहेत त्यास खर्चास व गुहागरचे बागेस खर्चास राजश्री बापू गोडबोले व भिकाजीपंत वाघ याणी तालुके अंजनवेल व विजयदुर्गपौ ऐवज देविला आहे त्याची पत्रेही आलादा आहेत हे विज्ञापना

———

ऐ. सं. सा. सं. २-११

ले. २९९) श्री { श. १७३९ मार्गशीर्ष शुद्ध ९
{ इ. १८१७ डिसेंबर १७

विज्ञापना ता। मार्गसीर्ष शु।। ९ सौम्यवासर मु।। लोणी प्रतःकाल पावेतो सुखरूप असे यानंतर आपणाकडून छ १९ मोहरमची पत्रे आली त्यावर आलीकडे पत्र येऊन काहीच वर्तमान कलत नवते परंतू जानू गायकवाड पुण्याहून आला तो काल तलेगाव ढमढेऱ्याचे तेथे येऊन पोहचला त्याणे आपले कडील मार तोडजबानी सागितला त्यावरून संतोष जाला जंजिरे सुवर्णदुर्ग गेला रत्नागिरीस लढाई चा[ल]ली आहे हे वर्तमान सरकारात आले त्यावरून मला आज बोलाऊन नेऊन पुसिले की किले विजेदुर्ग येथील बंदोबस्त कसा राखिला आहे धुलपाचा अधिकार त्या किल्यात काय आहे म्हणौन माहाराजानी पुसिले त्यावरून मी विनंति केली की आम्ही आपलेकडून बंदोबस्त यथास्थित राखिला आहे व आणानहि निश्चये केला आहे की पराकाष्ठा आहे तेथपावेतो आंतर होणार नाही त्यावर आज्ञा जाली की किल्याचा अधिकार मुख्यत्वे तुम्हाकडे धुलप जातीने येथे येऊन तुमचे त्याचे विच्यारे बंदोबस्त जाला तर कसे मी विनंति केली की जसी आज्ञा होईल त्याप्रा। करावयाचे मग आज्ञा जाली की लौकर माणसे तयार करून पत्रे रवाना कर त्यावर मी विनंति [केली] की आज्ञेप्रा। पत्र मी लिहून पाठवितो या मजकुराचे पत्र धुलपास पाहिजे त्याविसी काय आज्ञा त्यावर आज्ञा जाली की सरकारचे पत्र त्यास आसेल तर तुमचे त्याचे बनार नाही खलेली करतील यास्तव राजश्री बापू गडबोले आगर बालोबा विचूरकर पत्र देतील बाबाहि जवलच होते त्याणी सागितले की राजश्री गंगाधरपंत मराठे त्याचे बोलणार आहेत त्याचे पत्र घेऊन पाठवावे त्यावरून मा।रनिल्हेचे पत्र घेऊन आलादा पाठविले आहे पावेल किल्याचा बंदोबस्त आपण यथास्थित राखाल ही सरकारची खातरजमा आहे दिवस तर हली प्राप्त जाले आहेत याजकरितां कोणी हिमतीचा व लौकिकाचा मनुष ठेऊन बंदोबस्त जाला म्हणजे चागले

जंजिरे सुवर्णदुर्ग फितुराने गेला म्हणोन बाजारबातमी आहे यास्तव बहुत सावधपणे बेत राखिला पाहिजे हली आपण त्या प्रातीच आहा किले रसालगड येथे आपण जाऊन पोहचला म्हणोन वर्तमान राजश्री बालोबा बाबानी ऐकिले त्यावरून त्यास संतोष जाला जंजिरे सुवर्णदुर्गचा आसा पर्याय जाला तेणे करून त्याचे मनात मध्यम वाटले रसालगडास दारू-गोली व लोक वगैरे सामान जे लागेल ते करावे कसाहि समय प्राप्त जाला तरी आपण डगमगू नये नक्ष करून दाखवावा म्हणोन माारनिल्हेनी आपणास ल्याहावयास सागितले व त्याणीहि आपल्यास आलादा पत्र पाठविले आहे कोकणात हली प्रसग गुदरला आहे वस्तभाव काही ठेवणे जाल्यास किले वासोटा किले रायगड ही दोन्ही स्थले चागली मजबूद व सरंजामहि पोख्त आहे आपलेहि राहण्याचा बेत जाला तरी चागले हली छत्रपति त्रिवर्ग बंधू मोतोश्रीसुद्धा लस्करात येऊन पोहचले हली स्वारी जाण्याचा रोख गंगातीरचा दिसतो पुढे कोठ पावेतो जाणार हे समजत नाही आपल्याकडून पत्रे प्रतापगडास राजश्री निळोपंत देशपाडे याज-कडे येत जावी म्हणजे त्याजकडून हमेशा माणसे बाबाकडे येतात त्या बरोबर पत्रे मला येऊन पोहचतील आठा चौ रोजी माहाराज नेहमी पुस-तात की आपणाकडून काही पत्र आले किंवा नाही त्याप्रातीचे वर्तमान काय आहे तेव्हा उगेच राहावे आसो पाळी यते याजकरिता पत्रे वरचेवर पाठविण्याविसी आज्ञा होत आसावी व माहाराजासहि पत्रे आपली येत आसावी म्हणजे चागले कान्होराकडून हुसेन व कमाल सारवान मुाा माारी येऊन भेटले बाहेरचे माणूस चौकसी केल्या वेलग (वेगळ) गावात जाऊ देत नाहीत राजश्री नरसोपंत पलसीस जाऊन राहिले आहेत राजश्री गंगाधरबाबा व काल्याचे खटले वगैरे सारीच तेथेच आहे राजश्री नारोपंत आपटे या प्रांती बंदोबस्तास राहाणार नरसोपंत यास लस्करात बोलाविले आहेत त्याची व नारोपंताची गाठ घालून कान्होरचा तूर्त बंदोबस्त करितो पुढे कसे होईल ते पाहावे त्रिंबकजी डेगळे आण्याचे

मुकामी आल्याचे वर्तमान आहे वरकड मा।र आधिकोतर नाही शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना कोकणात हली सारे खटले येके ठिकाणी रहाणे चागले नाही सोईसोईने दोचौ ठिकाणी राहावे हे चागले आपले बेतास येईल ते खरे हे विज्ञापना

ले. २९६ } श्री { श. १७३९ मार्गशीर्ष वद्य ६
इ. १८१७ डिसेंबर २९

पौ॥ छ २९ सफर मार्गसीर्ष वा॥ ११ मंदवार

विज्ञापना ता॥ मार्गसीर्ष वा॥ ६ रविवार पावतो मु॥ वोतूर प्रातःकाल पावेतो सुखरूप असे स्वामीकडून रामजी नलवडा व पदू लोखंडा छ ११ सफरी पत्रे घेऊन निघाले ते छ १९ मिनहूस पावले रामजी गोली छ १३ रोजी निघाला तो आज प्रातःकाली येऊन पोहचला नलवडा याजबराबर महाराजास पत्र होते ते प्रविष्ट केले पत्रावलोकनी मर्जी बहूत संतोष जाली राजश्री बापू गोखले व आपाजी निपाणीकर मंडळी होती त्यास पत्रातील मा।र माहाराजानी सागि[त]ला प्रचीतगडचा मा।रहि मी ते वेलेसच बोले बापूनी उतर केले की आता त्याचा उपद्रव लागणार नाही व त्याणी पत्र दिल्हे आहे हे तूर्त पाठविले अहे मागाहून त्याचा जासूद घेऊन पाठवितो वरकड तपसिलवार मजकूर रामजीबरोबर लिहून पाठवितो राजश्री बालेबा बाबावर मर्जी चांगली पहिलेप्रा॥ आहे भो[स]-ल्याची लढा[ई] पुन्हा दुसरी होऊन इग्रजाचा मोड होऊन भोसल्याच्या फौजा मागे लागल्या असी पत्रे आली राजश्री बापू गोखले याणी गोव्याच्या फिरग्याकडील दोन पलटणे आणविली होती ती साताऱ्याचे सुमारे आली संगमनेराकडे पलटणे च्यार आली यामुले स्वारी हली जुनराचे सुमारे जाणार तिकडून कोणीकडे जातील ते पाहावे राजश्री बापू गडबोले व बापू गोखले याची पत्रे किले पाडवगड व किले केलजा येथे राहाण्याविसीची पाठविली आहेत वैराटगड राजश्री आन्याबा रातेकर याजकडे आहे ते स्वारीत नाहीत त्याचे पत्र मागाहून घेऊन पाठवितो दोही किल्याची पत्रे

पाठविली आहेत रामजी गोली याजबरोबर सविस्तर तपसीलवार लिहून पाठवितो श्रुत होय हे विज्ञापना

ले. २५७ } श्री { श. १७३९ पौष वद्य १३
इ. १८१८ फेब्रुवारी ३

पौा छ १० राखर समान इदुवासर

विज्ञापना ताा पौष वाा १३ भौमवासर प्रहर रात्र अवसीची पावेतो मुाा लस्कर नजी[क] भोसे येथे सुखरूप असे यानंतर इकडील माार साताऱ्याहून निघाले ते दिवसीं सरकारची स्वारी वहुतापुढे आली मागोन रवयेत येत होती तो इग्रजाचे लोकानी निकड केली काही थोडी बहुत झाबडली निपाणीकर व गोखले पटवर्धन वगैरे फौजा तोडावर होत्या आणखी दोन तीन दिवस रात्रौ पाहाटेच्या मजली करून स्वारी पढरपुरास द्वादसीस दाखल जाली पुण्याकडील पलटणे दुसरी आली व पुसेसावली कडील आली त्याच्या गादणी फलटणच्या मागे पडल्या पुसेसावली-कडील होती ती पुण्याकडे गेली पुण्याकडील आली ती हली स्वारीचे मागे दोन पलटणे व च्यार तोफा आहेत त्याचा मुकाम आज नात्या-पोत्यावर आहे म्हणोन बातमी आहे व गलगल्याकडे कर्नाटकात पलटणे होती ती हली तासगावापुढे येक मजल आली म्हणोन बातमी आहे हली स्वारीचा रोख टेभुरणिकडे आहे पुढे कोणीकडे जाणार याचा बेत समजण्यात येत नाही भोसले याची लढाई नागपुरास जाली तेव्हा खासे मुधोजी बोवा इग्रजास सापडले त्याचेकडील विठलराव दिवाणजी होते त्याचे चिरंजीव कांही जमा[वा]निसी नागपुरास होते व पाच सा हजार आर[ब] होते त्याणी दुसरी लढाई केली तो इग्रजानी कच खाली तीन पलटणे कापून काढली तेव्हा भोसले यास साडस लाऊ लागले की तुमच्या फौजा आम्हापासी लढाई घेतात हीं घेऊ नये त्यावरून त्याणी आपले कारभाऱ्यास पत्रे पाठ-विली की तुम्ही दोस्ती कराल तर बरे नाही तर माझे प्राणासी गाठ आहे त्यावर आरबानी आपले तलबेचे बोलणे लाविले त्यावरून इग्रजानी त्याचे

तलबेचा आकार आठ लक्षा जाला तो ऐवज दिल्हा आणि दोन खासे गोरे व येक पलटण आरब व विठलराव याचे चिरंजीवाचे बहादारीस देऊन काढून दिल्हे ते हल्ली दर कूच सरंजामसुधा टेभुरणी नजीक येऊन दाखल जाले उद्या पर्वा इतक्या सुमारे सरकारच्या भेटी होतील तेव्हा सविस्तर मार समजल्यावर बाहिरू जासूद याची रवानगी करीन सिंद्याची आद्याप लढाई जाली नाही होलकराची लढाई जाली पस्तीस तोफा इग्रजानी नेल्या आसी वार्ता आहे वरकड मार आधिकोतर नाही आशा बातम्या आहेत परंतु आपण आपले मनात काही आंदेशे आणोन नयेत ईश्वर इच्छेने सर्व गोष्टी यथास्थित होऊन सरकारची स्वारी पुण्यास लवकरच येईल आपण किले कोटाचे बंदोबस्त राखून हुशारीने आसावे पो सांगोल्यापौ ऐवज जमला आहे त्याच्या हुंड्या पढरपुराहून चिपळोणास करावयास राजश्री पांडुरंगपंत पोतनीस यास सागितले आहे व गुराचे गवताचा व कडब्याचा बंदोबस्त आज्ञेप्रो मारनिल्हेस करावयास सागितला आहे राजश्री भगवंतराव सिंदे फलटणचेच मुकामीहून सागोल्यास गेले त्याची माझी गाठ पडली नाही आगोधर गाठ पडली होती त्याणी सागितले की तूर्त च्यार हजार रुपये पाठवितो मग काय हुंड्या पाठवितील त्या पाहाव्या सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ले. २९८ श्री { श. इ.

विज्ञापना आसी जे भोसल्याचे घरी फितूर जाला तो मुख्य त्यात नागोपंत आहेत हली इग्रजाची पलटणे ताव्याचे मुकामी निरच पुलापासोन सात आठ कोशावर आहेत व येक पलटण वसंतगडाकडे सरकारचा तोफखाना आला आहे तिकडे गेले परंतु तोफखान्याची गाठ पडली नाही कर्नाटकातून पलटणे येक आले ते पिलवचे मुकामी आहे याप्रो मार आहे इग्रजाची तयारी मनस्वी चाली आहे पुढे काय घडेल ते पाहावे हली सर्व भरवसा सिंद्यावर आहे त्याची पत्रे खातरजमेची आली गणपतराव निा

भोसले याची भेट मंदवारी नरसीपू[र?]चे वाड्यात जाली त्याचे लोकाचा मुकाम तेथे होऊन ते सडे स्वारी समागमे अकळुजेस आले भोजनास पंगतीस होते पोशाक येक दिल्हा बापू गोखले याचे राहुटीस राहिले होते रविवारी त्याचे लस्करहि आले दोन हजार पावेतो सरजाम आहे तीन च्यार हती व दोन आबऱ्या आहेत वरकड मार आधिकोतर नाही शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना

ले. २५९ } श्री { श. १७३९ फाल्गुन शुद्ध ६ इ. १८१८ मार्च १२

पौ छ १० जमावल सन समान अशर मयातैन फाल्गुन शुा ११ सौमवार

विज्ञापना ताा फाल्गुन शुा ५ (पाचाचे सहा खोडून केलेले दिसतात) गुरुवासरपावेतो सुखरूप असे यानंतर स्वामीकडून जानू मिठा व बहिरू जासूद माघ वा ६ चे मितीची पत्रे घेऊन निघाले ते फाल्गुन शुा ४ स मुा अस्तगाव नजीक राहाते येथे अस्तमानी येऊन पोहचले त्याबरोबर पत्रे होती ती पावोन लिहिले मार कळले व तोंड जबानी मजकूर सागितला त्यावरून सविस्तर समजला त्यानंतर इकडील मजकुराची कलमे बितपशील

१ माघ शुा १५ स करमभोशाचे सुमारे स्वारीचा मुकाम होता पुढे पंढरपुराकडे जाण्याचा बेत होता परंतु वेळापुराकडे व अकळुजेकडे पलटणे व तुरुक स्वार आल्याची बातमी मिा मजकुरी पहाटेस आली त्यावर तेथून कुच्याचा बेत जाला प्रहर दिवसाचे सुमारे श्रीमंत भोजनास बसले होते तो बापू गोखले याची बातमी आली की तुरुक स्वार जवल आले ते तसेच शेपंनास लोकानिसी त्याचे तोंडावर गेले आणि श्रीमंतास निरोप पाठविला की आपण × × वर जावे मी पुढे गेलो बापू डेऱ्यापलीकडे × × ध्यावर गेले

तो पलटण व तुरुक द्रि[ष्टी] पडो लागले श्रीमंत व मंडळी भोजनास बसली होती बापूचा निरोप ऐकताच तसेच उठोन स्वारी म्यान्यात प्रथम जाली त्याची निकड बहुत जाली तेव्हा श्रीमंत घोड्यावर बसले खासा स्वारी पुढे तुरुक मागे याप्रो दोन तीन कोश दवड जाली राजश्री आबा पुरधरे व त्रिंबकजी डेगले मागे जातीने उलटले परंतु दाहा पाच आा त्याजपासी राहिले श्रीमंतानी नागवी तरवार हाती आर्ध कोश पावतो घेतली मागे उलटावयास दोन वेल पाहिले परंतु जमाव आगदी नाही खाशापासी पस्तीस आसामी राहिले होते गोखले या:न समजले की राजे व श्रीमंत गेले तेव्हा त्याणी दाहा पाच आा × × × त्यात गेले इतके लोकांनी पाहिले त्या[पासून] आजपावेतो गोखल्याचा आद्याप काही ठिकाणा नाही श्रीमंत सौा सरस्वतीबाई यांस अमृ[त]राव पेडसे याणी घोड्यावर घेऊन निघाले समागमे गणपतराव व मी व दाहा पाच आा बारगीर याप्रो वाटे निराळे उजवे बाजूस निघोन गेलो आमचे व तुर्काचे आंतर आपले पुण्यातील वाड्यापासोन घाणेकराचे घराइ[त]के होते ईश्वरे ते समई कृपा केली त्या घाईत बाईस वमन जाले व ढाल झाले ऊन मनश्वी बहुत वाखा जाला त्या समई एक आत्फागिऱ्या भेटला मुलुख मोगलाई गा ××× लून जावयाचे नाही आडरानातून च्यार कोश गेलो तो इतक्यात गोखल्याकडील हजार स्वार भेटले मग मजलीस च्यार घटका रात्रीचे सुमारे जाऊ[न] पोहचलो सौा सखूबाई ढमढरी व गगाबाई राजमाचकर घोड्यावरून पडली नंतर अक्कलकोटकर याचे स्वारानी पाठीसी बाधोन आणिली गगाबाईची घोडी पळोन गेली त्यावर तिचा खासगत आठ हजाराचा विषय होता व श्रीमंत राजश्री नीलकंठरावबावा याचे जवाहीर पंनास हजाराचे होते ते गेले व घोडी गेली याप्रो वर्तमान जाले आपा निपाणकरही खाशाजवल नवते मग त्याचा काय मतलब असेल तो खरा बापू वेगल सारी मंडळी सुखरूप राजश्री नारोपंत आपटे

अनुक्रमणिका.

प्रसिद्ध झाले !

मध्वमुनीश्वरांची कविता (पुर. क्र. ३०)

किं. ३ रु. सभासदांस २॥ रु.

मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (पुर. क्र. ३१)

किं. १ रु. सभासदांस १२ आणे.

मंडळांतील नाणीं (स्वीय क्र. ३७)

किं. १ रु.

विक्रयालय शाखा

मंडळाच्या या शाखेचे विद्यमानें खालील व इतर खास ऐतिहासिक मालांचीं पुस्तकें विकत मिळतील.

१ भा. इ. सं. मंडळ–स्वीय ग्रंथमाला.

२ भा. इ. सं. मंडळ–पुरस्कृत ग्रंथमाला.

३ श्रीशिवचरित्रकार्यालयाचे ग्रंथ.

४ कै. राजवाडे–मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (उपलब्ध खंड)

५ कै. खरे– ऐतिहासिक लेखसंग्रह.

६ 'पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद' ह्या हल्लीं चालू झालेल्या नवीन मालेचीं पुस्तकें.

याशिवाय या शाखेमार्फत सभासद व इतर मागणीदारांचे सोयीसाठीं ऐतिहासिक व वाङ्मयिक ग्रंथ मिळवून पाठविण्यांत येतील. प्रत्येक ऑर्डरीबरोबर निम्मी रक्कम पाठविली पाहिजे.

BHĀRATA ITIHASA SANSHODHAKA MANDALA

Vol. XIV] **QUARTERLY** [No. 4

(56)

March, 1934.

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

वर्ष १४ वें] **त्रैमासिक** [अंक ४ था.

(५६)

चैत्र १८५६

Printed by Mr. Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/3 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar, 314 Sadashiv Peth, Poona City.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. **फुटकळ अंक १ रुपया**

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1

हें त्रैमासिक मुंबई इलाख्यांतील सरकारी, निमसरकारी व सरकारमान्य अशा प्राथमिक व दुय्यम शाळा आणि शैक्षणिक (training) संस्था यांसाठीं मंजूर झालें आहे.

निवेदन.

आपल्या त्रैमासिकाच्या चौदाव्या वर्षाचा हा शेवटचा अंक आहे. गेल्या तीन वर्षांपासून त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध होत असलेल्या पुस्तकांपैकीं शिवचरित्र साहित्य खंड ४ हा ग्रंथ गेल्या अंकांत पूर्ण करण्यांत आला असून, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १, ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ व ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड २ हीं पुस्तकें या अंकांत त्यांच्या सूची वगैरे देऊन पुरीं केलीं आहेत. यामुळें हे ग्रंथ स्वतंत्र पुस्तकरूपानें त्रै. च्या ग्राहकांस बांधतां येतील व इतरांस मंडळाकडे विकत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

मंडळाचें २१ वें संमेलन व २४ वा वाढदिवस याविषयीं स्वतंत्र निमंत्रणपत्रिका सोबत आहे तिजकडे लक्ष द्यावें.

त्रैमासिकांत नवीन सुधारणा करण्याचें घाटत आहे. योग्य वेळीं तें जाहीर होईल.

ज्येष्ठ शुद्ध ११।१८५६ **चिटणीस**

अनुक्रमणिका

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.

बाविसावें वार्षिक संमेलन

व

चोविसावा वाढदिवस.

बाविसावें संमेलन.

सप्रेम सा. न. वि. वि.

भा. इ. सं. मंडळाचें बाविसावें संमेलन मि. ज्येष्ठ(वैशाख) वद्य ५।६।७ शक १८५६ शनिवार, रविवार व सोमवार तारीख २।३।४ जून १९३४ रोजीं मंडळमंदिरांत सालाबादप्रमाणें नियमानुसार सकाळसंध्याकाळ भरणार आहे. त्याविषयीं जाहीर पूर्वसूचना प्रमुख पत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे. संमेलनांत शोधविषयक निबंधवाचन, प्रदर्शन व चर्चा वगैरे कार्यक्रम होतील. नियमाप्रमाणें शके १८५५ सालचे हिशेब, अहवाल व १८५६ चें अंदाजपत्रक हीं सभेपुढें सादर करण्यांत येतील. कारभारीमंडळावर दोन साधारण सदस्यांची निवड, हिशेबतपासनीस यांची नेमणूक वगैरे सर्व रीतसर कार्यक्रमही वरील वेळीं होतील. सभासदप्रवेश, वर्गबदली व राजीनामे वगैरे मामुली कामेंही नियमांप्रमाणें चालतील. असल्यास कांहीं ठराव व योजनाही मांडण्यांत येतील.

नवीन ग्रंथ

स्वीय ग्रंथमाला	किं.रु.
१ शिवचरित्र साहित्य खंड ४ था	१॥०
२ A History of the Late Revolution in the Kingdom of Golconda (In press)	
३ ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ला	१॥०
४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ रा	२
५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड २ रा	१॥०
६ मंडळांतील नाणीं	१

चोविसावा वाढदिवस.

आषाढ शुद्ध १ शके १८५६ तारीख १२ जुलै १९३४ गुरुवार रोजीं मंडळाचा वाढदिवस मंडळमंदिरांत सकाळ–संध्याकाळ साजरा होईल. त्या दिवशीं मंडळाची साधारण सभा भरेल व कारभारी मंडळातर्फे कामें असल्यास नियमान्वयें सादर करण्यांत येतील.

शिवाय शोधनिबंध व व्याख्यानें, चर्चा वगैरे कार्यक्रम होईल. संमेलन व वाढदिवस यांचे विस्तृत तपशील मागाहून प्रसिद्ध होतील.

तरी संमेलन व वाढदिवस या उभयप्रसंगीं सर्व सभासदांनीं आपल्या जिज्ञासू मित्रमंडळींसह अवश्य हजर राहून दोन्ही प्रसंग यशस्वीरीत्या पार पाडण्यास साहाय्य करावें. कोणाची वर्गणी बाकी असेल ती त्यांनीं द्यावी. बाकी नसली म्हणजे मताचा हक्क कायम राहतो व संस्थेसही उत्तेजन मिळतें.

या प्रसंगीं नवीन सभासद होण्यासाठीं आपल्या इष्टमित्रांस आपण अवश्य विनंति करावी. सर्व सभासदांनीं या कामीं साहाय्य दिलें पाहिजे. तसेंच जागजागीं जीर्ण पोथ्या, जुनीं फारसी-मराठी-कानडी-संस्कृत कागदपत्रें, चित्रें, नाणीं, शस्त्रें, वस्त्रें, पात्रें आढळतात; तर त्यावर लक्ष ठेवून त्यांची माहिती कळवावी किंवा मिळवून पाठवावी. निदान माहिती द्यावी. असो. अशा प्रकारें हरतऱ्हेनें साहाय्य करावें व यशाचें श्रेय घ्यावें अशी विनंति आहे. कळावें, बहुत काय लिहिणें ही विनंति.

वैशाख वा। त्रयोदशी
शके १८५६
पुणें २

आपले
दत्तो वामन पोतदार
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार
चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें २

नवीन ग्रंथ.

पुरस्कृत ग्रंथमाला

(१) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (श्री. कृ. वा. पुरंदरे) छापत आहे.

(२) मध्वमुनीश्वराची कविता (श्री. प्र. व्यं. गुब्बी) रु. ३

(३) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा (श्री. वि. गो. दिघे) रु. १

बावसाव समलन.

बाविसावें संमेलनप्रसंगीं आतांपर्यंतच्या माहितीवरून साधारणपणें पुढील विषयांवर शोधनिबंध सादर करण्यांत येतील असें वाटतें. पक्का कार्यक्रम संमेलनप्रसंगीं मिळेल.

नांव	विषय
१ श्री. शंकर श्रीकृष्ण देव, धुळें	१ रामेण रामदासेन लिखितम्
२ श्री. दत्तात्रय विष्णु आपटे, पुणें	१ मराठींतील ऐतिहासिक साधनांचा परामर्ष २ चंद्रचूड दप्तर व शिंदे घराणें
३ प्रो. दत्तो वामन पोतदार व श्री. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी	१ एक राजकारणी कवि (निरंजन माधव म्हणजेच बनाजी माधवराव)
४ रा. सा. बाबासो देशपांडे	१ शिवपूर्वकालीन सोळाव्या शतकांतील महाराष्ट्र
५ श्री. गणेश हरी खरे	१ गेल्या वर्षांत मंडळाकडे आलेलीं सुमारें २५० नाणीं. २ मिरज येथील १५ फारसी शिलालेख ३ संशोधन—वृत्त ४ कांहीं दानपत्रें (१) यादव कृष्ण याचा तासगांव ताम्रपट (२) मनगोळी ताम्रपट श. ११०७ (३) मिरज येथील कानडी शिलालेख श. ११६३
६ श्री. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे	१ बाळाजी विश्वनाथाचें सासवड येथील वृंदावन.
७ श्री. स. ग. जोशी	१ चंद्रराव मोरे यांचें अभयपत्र. २ अनाजी दत्तो यांचीं दोन पत्रें ३ वांईचे देशपांडे यांचा शके १५११ चा महजर ४ वाईचा प्राचीन कोट कोणी पाडला?

८ श्री. दि. वि. काळे	१ शिवाजी चित्रचर्चा
९ श्री. वा. कृ. भावे	१ पेशवाईतील सत्पुरुषांची समाज-सेवा
१० श्री. गो. ग. आचवल	१ अंजनवेलचा त्रोटक इतिहास
११ श्री. य. न. केळकर	१ विश्रामबाग वाड्यासंबंधीं कांहीं जमाखर्च
	२ गोवा प्रांतावरील व्यंकटरावाची स्वारी
	३ वसई मोहिमेची साधनचिकित्सा
१२ श्री. वि. गो. दिघे	१ Practice of Indigenous Labour in Maharashtra
	२ Capture of Salsette by the English and its Significance.
१३ श्री. ग. ह. ओक	१ निजाम व बाजीराव यांची एक अप्रसिद्ध लढाई
	२ पेशवाईतील मनोरंजक व इतर निवडक माहिती
	३ पेशवाईतील पेढ्यांची उभारणी, विकास व संरक्षण
१४ श्री. तु. र. ठकार	१ पेशवाईतील जमीनमहसूल व कर-पद्धति
१५ श्री. ह. ना. नेने, नागपूर	१ महानुभावांचा श्रीकृष्ण
१६ प्रो. चिं. ब. जोशी	१ महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास
१७ श्री. य. गो. कानेटकर	१ वॉरन हेस्टिंग्सचे दिवाकर पंडिताकडे राजकारण
१८ श्री. गो. कृ. मोडक	१ कांहीं शब्दव्युत्पत्ति
१९ श्री. वि. अं. कानोले	१ रघुनाथ शेषेकृत कृष्णकौतुक लीलाग्रंथ
	२ मुद्गलभट्ट वैद्यकृत विमलबोध

श्री

भारत--इतिहास--संशोधक--मंडळ

त्रैमासिक.

वर्ष १४ वें.

आषाढ शक १८५५ ते चैत्र शक १८५६

संपादक व प्रकाशक
प्रो. दत्तो वामन पोतदार
व
श्री. सर. गं. ना. मुजुमदार
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

मुद्रक
अनंत विनायक पटवर्धन
आर्यभूषण प्रेस, ९३६।३ भांबुर्डा पेठ, पुणें.

वार्षिक वर्गणी ३ रुपये] (ट. ह. निराळें) [फुटकळ अंक १ रुपया

अनुक्रमणिका.

साधनें

दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १

ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १

शिवचरित्र साहित्य खंड ४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १

चित्रें

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

वर्ष १४ वें] त्रैमासिक [अंक ४ था.

मंडळ-वृत्त

गोवा प्रांतांतील प्रचारकार्य

मंडळाचे प्रचारकार्याचा वृत्तान्त यंदाच पुनः म्हणजे दुसऱ्यांदा देण्याचा प्रसंग आला ही आनंदाची गोष्ट आहे. या वर्षाच्या दुसऱ्या अंकांत सोलापूर येथील ऐ. प्रदर्शन, व्याख्यानें व त्या अनुषंगानें झालेलें प्रचारकार्य दिलेंच आहे. त्याच्याच शेवटीं, महाड येथें श्रीगणेशोत्सवप्रसंगानें गेलों असतां झालेल्या कामाचा उल्लेख केला आहे. आतां पोर्तुगीज हिंदुस्थानांतील काम थोडक्यांत द्यावयाचें आहे. सोलापूर व महाड झाल्यानंतर मध्यंतरीं पुण्यास प्लेग चालू असतां मीं महाडकडेच म्हणजे गोरेगांव येथें स्थलांतर केलें होतें. अर्थात् तेथेंहि दोन व्याख्यानें श्री.वि.वा. जोशी बीरवाडीकर आणि शेट रा. भ. धुवाड यांच्या साहाय्यानें झालीं. विषय उघडच इतिहासप्रधान होते. गोरेगांवीं मंडळास सदस्य मिळविण्याचे ऐवजीं मंडळाचे ग्रंथांची विक्री केली. दिपवाळी आटोपतांच पुण्याचा प्लेग संपत आला व मी गोरेगांवहून परत आलों. आणि मार्गशीर्ष अखेर श्री. य. न. ऊर्फ आण्णा केळकर यांजसमवेत गोवाप्रांतीं गेलों. संशोधन करणें, निरनिराळ्या साधनांची सोय करून लोकांस इतिहासासंबंधीं माहिती देणें इ. कामाकडे अधिक लक्ष्य असलें तरी प्रचारकार्यहि कर्तव्य आहे. एऱ्हवीं मंडळकार्य साधावयाचें कसें ! यथाशक्ती व यथामती तेंहि करावयाचेंच म्हणून मी मंडळाच्या अनुमतीनें गोमन्तकांत प्रचारकार्यार्थ गेलों. जातांना श्री. य. न. ऊर्फ आण्णा केळकर यांची संगत लाभल्यामुळें प्रचारकार्याचा प्रारंभ चांगला झाला. श्री. आण्णा केळकर यांस त्यांच्या 'वसई मोहिमे' वरील ग्रंथाकरतां तिकडील त्या मोहिमेंतील स्थलें पाहणें, पोर्तुगीज रेकर्डवरील विद्वान् अंमलदार प्रो. पिसुर्लेकर यांच्याशीं त्याबाबत चर्चा करणें इ. काम होतें. प्रो. पिसुर्लेकर हे मंडळाचे फार दिवसांपासूनचे सदस्य आहेत. त्यांजकडेच गेल्यामुळें दोघांचीहि

कार्ये उत्तमप्रकारें चालू झाली. पहिले ८।१० दिवस दसई मोहिमेच्या चर्चेंत, तसेंच रेशमागोश, आग्वाद, रायतूर हे किल्ले, पारोळ्याचें रणमैदान, धावजीमळा, इ. ऐतिहासिक प्रसंग घडलेलीं स्थलें व जुनें गोवें पाहण्यांत गेले. नंतर श्री. केळकर पुण्याकडे परतले व मीं माझ्या कामास पणजीपासूनच प्रारंभ केला. माझ्या कामाची रूपरेषा मीं अशी आंखली होती. मराठी शिक्षणसंस्था–बहुतेक प्रत्येक गांवीं मोठ्या कष्टानें व अत्यंत आपुलकीनें चालू ठेवलेल्या मराठी शाळा–मराठी ग्रंथसंग्रहालय व वाचनालय–ह्यांचीहि गोष्ट मराठीशाळांप्रमाणेंच मोठी कौतुकास्पद आहे– नंतर सार्वजनिक असें जाहीर स्थल, ह्या ठिकाणीं एक, दोन, तीन इतिहासविषयक व्याख्यानें द्यावयाचीं, नंतर तत्रस्थांच्या संमतीनें गांवांतील बुद्धिवान, धनवान व जाणिक सद्गृहस्थांस भेटून मंडळाची माहिती द्यावयाची आणि अशांत जे कोणी आपखुषीनें सभासद होत, वर्गणी वा देणगी देत किंवा ग्रंथ घेत त्यांविषयीं 'यत्स्वल्पमपि तद्बहु' असें आनंदानें मानून पुढल्या गांवीं जावयाचें. व्याख्यानांत प्रसंगानें मंडळाची माहिती देई. पण मं. चे सभासद होण्याबद्दलचें बोलणें करण्याकरतां स्वातंत्र्यानें त्यांच्या त्यांच्या घरींच जाई. आणखी एक धोरण मला असें ठरावेंसें वाटलें कीं, एकाद्याकडे जातांना दुसऱ्या कोणा तत्रस्थास मजबरोबर चला असें, कांहीं विशेषच असेल तर तें सोडून, न म्हणतां चाललें तर बरें. अशा प्रकारें मी गोमन्तकांत १५ गांवीं मिळून दीड महिना फिरलों. ह्या फिरतींत २।३ ठिकाणीं ऐ. कागद मिळाले. एके ठिकाणच्या नकला करून घेतल्या. मुख्यतः प्रचारकार्यच करावयाचें असल्यामुळें संशोधनकार्याकडे अधिक व मुद्दाम लक्ष्य दिलें नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं गेलों तेथील व्याख्यानविषय, स्थल व अध्यक्ष इत्यादींची यादी दिली म्हणजे त्यांत प्रचारकार्याचा वृत्तान्त आला. व्याख्यानांचे सारांश देण्याची जरूर नाहीं. ह्या संचारांत जें कार्य झालें त्याची कल्पना अन्यत्र दिलेल्या सभासद यादीवरून येईल. सामान्यतः पांचशें रुपयांपर्यंत काम झालें.

ह्या कामीं मला ज्यांचें सहाय्य झालें त्यांचा आभारोल्लेख करणें हें अत्यंत अवश्य कर्तव्य होय. प्रो. पां. स. पिसुर्लेकर–पणजी; डॉ. मोरजकर व श्री. खलप–म्हापसें, श्री. दत्तुशास्त्री पणशीकर–पेडणें, श्री. यशवंतराव सरदेसाई, श्री. द. व्यं. पै, श्री. केशव नाईक, श्री. सुकेरकर इ.–मडगांव; श्री. दादासो वैद्य, श्री. तळवलकर, श्री. प्रियोळकर–फोंडा, श्री. हेगडे देसाई–कॅपे, श्री. पाळंदीकर व श्री. कंटक–वास्को द गामा, श्री. बोरकर–साखळी इ. अनेक सज्जनांचें सहाय्य झालें. ह्या सर्वांचा मंडळातर्फे मी फार फार आभारी आहे. –**शं. ना. जोशी**, वांईकर.

व्याख्यान स्थल	**व्याख्यान विषय**	**अध्यक्ष**
सरस्वतीमंदीर–पणजी	महाराष्ट्राची ऐ. संस्कृती	प्रो. पिसुर्लेकर
महालक्ष्मी देऊळ "	ऐ. पत्रपद्धती	श्री. शांबाराव देसाई

व्याख्यान स्थल	व्याख्यान विषय	अध्यक्ष
आल्मेद् कॉलेज-म्हापसें	फोंडा व शिवाजी महाराज	पं.दादा केरींकर वैद्य
वैश्य विद्यालय	महाराष्ट्राच्या इतिहासांत गोमन्तकाचें स्थान	०
बाजारपेठ ,,	ऐ. पत्रव्यवहार	कवीश्वर बोवा
सारस्वतविद्यालय ,,	म्हणी कशा पडतात !	०
वैश्य विद्यालय ,,	ऐ. खेळ	०
शीलोन्नति मंदीर-पेडणें	पेडण्यासंबंधीं ऐ. उल्लेख	श्री. महात्मे
वाचन मंदीर-साखळी	नव्या युगाचे नवे कायदे	प्रो. पिसुर्लेकर
वास्को द गामा-	शिवशाही व गोमन्तक	श्री. हळदीपूरकर
मडगांव	महाराष्ट्रेतिहास व गोमन्तकस्थ थोर पुरुष	प्रो. धर्मानंद कोसंबी
सारस्वत समाज	ऐतिहासिक संस्कृती	श्री. द. व्यं. पै
	गोवेंकरांचे इतिहासासंबंधीं कर्तव्य	,, ,, ,, ,,
सारस्वत विद्यालय	मराठी भाषेचा अभ्यास	०
दत्तमंदीर-सांगे	शिवजन्मप्रसंग	डॉ. शिरवैकर
विद्यार्थी वाचनालय-केंपे	इतिहास-कल्पनेची वाढ	प्रो. शिरवैकर

पाक्षिक सभा-श. १८५५ वर्षांतील चवथ्या तिमाहींत १४ ते १७ ह्या ४ पा. स. झाल्या. त्यांत पुढीलप्रमाणें १० निबंध वाचले गेले.

पा.स.	अ.	लेखक.	निबंध.
१४	३६	श्री. शं. ना. जोशी	सोंधेकर कागद
	३७	प्रो द. वा. पोतदार	रामटेक येथील ऐतिहासिक चित्रें
	३८	श्री. स. ग. जोशी	औरंगजेब-कालीन बावधनचें निवाडपत्र
	३९	,, ग. ह. खरे	बिरबल-चित्रचर्चा
१५	४०	,, ,, व. टी. ठकार	कुबरेमूर्ति
१६	४१	प्रो. के. जी. कुंदणगार (श्री. कुळकर्णी)	नार्हिंग्लज (चिकोडी) येथील एक शिलालेख श. १५६२
	४२	रा.सा ग. के. देशपांडे	प्रवासवृत्त (तोंडी)
	४३	श्री. ग. ह. खरे	आटपाडी-देशपांडे
१७	४४	,, शं. ना. जोशी	आवेढे गांवच्या (प्रां. गोवा) पेठेचा कौलनामा (श. १६८१)

पां.स. अ.	लेखक.	निबंध.
४५	,, ह. ना. नेने–नागपूर	बत्तीस लक्षणी टीका
४६	,,य.गो.कानेटकर–संगमनेर	महार मांग यांच्या हक्काचा पैठण येथील निवाडा
४७	,, गो. ग. आचवल	अंजनवेलचे गोपालगड हें नांव केव्हां पडलें!
४८	,,ग. ह. खरे	रिसवड–देशमुखांचे फारसी मराठी कागद

पाक्षिक सभांचें वार्षिक संकलित वृत्त.

शके १८५५ सालीं २५ पाक्षिक सभांपकीं १७ झाल्या. संमेलन व वाढदिवस ह्या समारंभांमुळें ३, प्लेग व दिपवाळीनिमित्त २, निबंध नाहीं म्हणून १ व सुट्टीमुळें २ अशा ८ होऊं शकल्या नाहींत. २,१२,१५,१६ ह्या सभा रा. सा. वि. त्र्यं. आगाशे, डॉ. सहस्रबुद्धे, श्री. मा. व्यं. लेले, श्री. श्री. ग. गोखले, श्री. के. म. बाळ, श्री. रा. ब. वैद्य; श्री. न. रा. गोडबोले, ह्या मंडळसमासदांच्या मृत्यूमुळें दुःखवट्यांचा ठराव करून व एकेकच निबंध वाचून बरखास्त केल्या गेल्या.

ह्या सभांना उपस्थित असलेल्या सभासदांची व पाहुण्यांची सरासरी संख्या ९ व ३ अशी पडते. पुढीलप्रमाणें सभासद हजर होते. श्री. ज. स. करंदीकर २, श्री. द. वि. आपटे ११, श्री. वा. सि. बेंद्रे ३, प्रो. चिं. ब. जोशी २, श्री. दि. वि. काळे ७, प्रो. द. वा. पोतदार १२, श्री. ग. ह. ओक १२, श्री. शं. ना. जोशी १३, श्री. ग. ह. खरे १३, श्री. तारकुंडे ८, श्री. वि.म. कोल्हटकर १३, श्री. स. ग. जोशी ७, श्री.चिं.ग. कर्वे १, रा.सा. मोडक ३, श्री.य.गो. कानेटकर ३, श्री.वि. वि. देशपांडे९, श्री. स. खं. आळतेकर १, रा. सा. गं. के. देशपांडे २, श्री. भाऊराव आपटे १, प्रो. स. वि. आपटे १, प्रो. वि. ना. कुंभारे १, प्रो. ओतुरकर १, श्री. वि. गो. दिघे ३, श्री. वा. रु. भावे १, श्री. ना. म. भिडे १, श्री. वि. वि. छत्रे १, श्री. चिं. वि. वैद्य २, श्री. आचवल१, डॉ. केतकर १, श्री. चित्रावशास्त्री१, श्री. रु.गं. परांजपे १, श्री. अ. वा. फडणीस १, रा. ब. पां. चिं. पाटील १, श्री. य. ग. फफे २, श्री. गो. रु. मोडक १, श्री. साठे २, श्री. टी. रघुनाथ ठकार १.

सभांना प्रो. चिं. ब. जोशी १, श्री. द. वि. आपटे ४, प्रो. कुंभार १, श्री. चिं. वि. वैद्य २, श्री. स. ग. जोशी १, रा. ब पा. चिं. पाटील १, श्री. ग. ह. ओक१, श्री. ज. स. करंदीकर २, श्री. दि. वि. काळे १, श्री. वा. रु. भावे १, रा. सा. मोडक १, आणि बाबासो देशपांडे १, ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें होतें.

मंडळ-वृत्त.

वरील पाक्षिक सभांमधून १८ जणांनीं ४७ निबंध वाचले ते असे—

श्री. द. वि. आपटे	२	ग. सा. ना. गो. चापेकर	१
श्री. वि. वा. जोशी	१	श्री. ग. ह. ओक	२
श्री. ग. ह. खरे	११	श्री. शं. ना. जोशी	७
श्री. वि. गो. दिघे	२	श्री. मा. ह. ऊर्फ बाळासो घोरपडे	१
श्री. स. ग. जोशी	६	श्री. का. गो. पिंगळे	२
श्री. य ग. फफे	४	श्री. ह. ना. नेने	२
श्री. रा. गो. काटे	१	श्री. आ. रा. देसाई	१
प्रो. द. वा. पोतदार	१	श्री. के. जी. कुंदणगार (कुळकर्णी)	१
श्री. य. गो. कानेटकर	१	श्री. गो. ग. आचवल	१

ह्यांच्या निबंधांचीं नांवें वेळोवेळीं त्रैमासिकांतून आलींच आहेत. निबंध-वाचनाशिवाय चित्रप्रदर्शन व चर्चा, साभार स्वीकार केलेल्या ग्रंथांची आणि नूतन सभासदांच्या नांवांची यादीही त्रैमासिकांत येत गेली असल्यामुळें येथें देण्याचें कारण नाहीं.

सभासद—गेल्या तिमाहींत मंडळास पुढील नवीन सभासद मिळाले. × ही खूण असलेल्या सभासदांची वर्गणी येणें आहे.

क्रमांक	नांव	गांव	वर्ग
१७९४	प्रि. डॉ. नंदीमठ एस. सी., एम्. ए., पी एच. डी.	बेळगांव	४
१७९५	श्री. विठ्ठल सदाशिव सुखठणकर	नवीन गोवे	×४त
१७९६	श्री. शांबा कृष्णाजी सूर्यराव सरदेसाइ	पणजी	४
१७९७	श्री. गणपतराम जेथाराम मेथा	वा.गामा	३
१७९८	श्री. शांताराम नीळकंठराव नाडकर्णी	,,	४
१७९९	श्री. लक्ष्मण नारायण से. बांदेकर	,,	२
१८००	श्री. सखाराम राया धुमे	,,	४
१८०१	श्री. विश्वनाथ बाळकृष्ण शेट्ये	,,	४
१८०२	श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाइ	कँप गोवा	४
१८०३	श्री. महादेव मंगेश शिरवैकर	सांगे गोवा	४
१८०४	श्री. दत्तो रघुनाथशेट मोरजकर	,,	३
१८०५	श्री. रघुवीर शंभू शेट बोरकर	,,	४
१८०६	श्री. कल्याण गोविंद साळेलकर	,,	४
१८०७	श्री. अनंतराव सांबराव वाळावलीकर	,,	४
१८०८	श्री. जयंत विश्वनाथ नाडकर्णी	,,	४
१८०९	श्री. श्रीपाद नीलकंठ भेंडे	केपें गोवा	२

क्रमांक	नांव	गांव	वर्ग
१८१०			
१८११	श्री. रघुनाथ गणेश तळवडकर	फोंडा	४
१८१२	श्री. शिवा फटू पै आंगले	पणजी	४
१८१३	श्री. व्यंकटेश विनायकराव सूर्यराव सरदेसाई वकील	नवीन गोवें	४
१८१४	प्रो. रामचंद्र शंकर नाईक	"	४
१८१५	श्री. कमळोबा मंगेशराव देशपांडे	"	२
१८१६	श्री. रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादासाहेब वैद्य	फोंडा	४
१८१७	डॉ. यशवंतराव तळावलीकर	पणजी	४
१८१८	श्री. वामनशेट खलप	म्हापसे	४
१८१९	श्री. गुंड सिताराम आमोणकर	"	४
१८२०	श्री. मुकुंद विनायक भोबे	"	४
१८२१	श्री. श्रीपाद अच्युत कळंगुटकर	"	३
१८२२	श्री. दत्तात्रेय मुकुंद नाईक	"	४
१८२३	डॉ. वामन शंभु बोरकर	"	४
१८२४	श्री. भास्कर विश्वनाथ महात्मे	पेडणे	४
१८२५	श्री. सगुण हरी प्रभु पावसेकर	"	४
	डॉ. श्रीपाद आत्माराम देसाई	"	४
१८२६	श्री. नारायण लक्ष्मण सावकार पेढीवाले	म्हापसें	४
१८२७	श्री. लक्ष्मण सदाशिव लाड	साखळी	२
१८२८	श्री. रामचंद्र राजेंद्र वडियार सोंधेकर राजे	फोंडा	३
१८२९	श्री. रामकृष्ण सखाराम शेणवी देसाई	पेडणे	×४
१८३०	श्रीमंत बाळासाहेब मिरजकर	मिरज	हितकर्ते

देणगी—गेल्या तिमाहींत पुढील वस्तू मंडळास देणगीदाखल मिळाल्या—

श्री. ग. स. छत्रे, मिरज—दोन शिलालेखांचे फोटो व एन्लार्जमेंटस्.

श्री. हरी रावजी चांदोरीकर—नवसारी—तीन शिलालेखांचे फोटो व २७ जुनीं नाणीं.

श्री. गो. ह. करमरकर—उरण—एक जुनें नारायणरावाचे वधाच्या कवितांचें बाड आणि २३ नाणीं.

श्री. वैद्यराज डॉ. आर. बी. मेरजकर—म्हापसें (गोवाप्रांत) ३ फोटो, हरवळे येथील गुहा, रुद्रेश्वर व भीमकुंड धबधबा.

श्री. फटाले—श्रीनामदेव वंशावळ.

ग्रंथालय—गेल्या तिमाहींत पुढील पुस्तकें मंडळाकडे भेटीदाखल आलीं.

(ॲबॅट ॲन्ड गोडबोले) इंग्लिश ट्रान्सलेशन ऑफ महिपतीज भक्तविजय.[१] (ॲबॅट जास्टिन इ.) शिवाजी ॲज नोन टु हिज वेस्टर्न कॉन्टेम्पोररीज.[१] (आरशीवाला एम.सी.) दि पर्शियन रॉयलरीडर नं.१ व २ ॲन्ड नोटस ऑन दि पर्शियन रीडर[२] नं. १ व २. (आळतेकर स. खं.) श्रीसमर्थचरित्र[३] (२ प्रति). (कानडे रा.गो.) गुरुवर्य विष्णु गोविंद विजापूरकर.[२] (काळे वा. गो. आणि कर्वे द. गो.) भारतीय अर्थशास्त्र.[२] (केसरी महोत्सवमंडळ) केसरीप्रबोध.[८] (केळकर एन. सी.) प्रेझर्स ॲन्ड प्रिव्हिलेजिस ऑफ दि पेन.[२] (केळकर न. चिं.) लोकमान्य टिळकांचें पुण्यस्मरण.[२] (गेइकी) फिजिकल जिऑग्रफी.[२] (गोखले पु. पां.) गोखले आणि (अभिप्रायार्थ). (पेडणेंकर गौड ब्राह्मणसभा) रिपोर्ट इ. स. १९२९ मे अधिवेशन[५] ११२. (घोडे का. पु.) गोविंदगीत व गोमाता.[५] (चटर्जी ज्योतींद्रनाथ) गाथा[६] (अथर्वणः जरथुस्त्रस्य). (ढवळे पु. दि.) नागपूरचा वाटाड्या.[७] (तामस्कर गो. द.) मराठोंका उत्थान और पतन.[२] (तुळजापुरकर द. आ.) माझें रामायण.[२] (दीक्षित) वा. बा.) नारायण दीक्षित पाटणकर.[२] (देशप्रभु वा. आ.) आचार्य पीठांची अवनति.[४] (देशप्रभु वा.आ.) शहाजी–जिजाईच्या लग्नाचे परिणाम.[५] (देसाई द.स.) पेडणेकर गौडब्राह्मण सभा अधिवेशन[१] ३ रें. (पारखी र.शं.) ग्रंथालयशास्त्राचा ओनामा.[२] (पारसनीस द. ब.) श्रीमहापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर.[२] (पिसुर्लेकर पी. एस. एस.) पोर्तुगिज इ मराठाज.[५] (पिसुर्लेकर पी. एस. एस.) पेर्तुगिज रेकार्डस ऑन रुस्तुमजी माणिकजी दि पार्शी ब्रोकर ऑफ सुरत.[५] (श्रीपुरुषोत्तम पंडित कवि) श्रीशिवकाव्यस्य पूर्वार्धम्.[२] पेशवे दप्तर नं. ३५ दि कॅपचर ऑफ सॅलिसिट,[७] पेशवे दप्तर नं. ३६ दि फर्स्ट मराठा वार,[७] पेशवेदप्तर मिसलेनियस पेपर्स[७] (पर्शियन). (पै द.व्यं.) निवडक भाषणें.[५] (पै द.व्यं.) गोमांतकचा भूगोल[५] भाग २ रा व गोमांतकची राज्य व्यवस्था.[५] (बरवे गो.वि) गोमातेचा हंबरडा.[५] व गोपालन[५]. (बालकृष्ण) शिवाजी दि ग्रेट व्हाल्युम वन[२] (२ प्रति). (बालकृष्णशास्त्री महानुभाव) श्रीचक्रधर चरित्र भूमिकापर ऐतिहासिक दृष्टि अर्थात् महंत श्रीमुकुंदराज जो की निराधार कल्पनाओं का खंडन (२ प्रति) (भट वि.मो.) हिंदुस्थानचा सोपा व सचित्र इतिहास. (महाराष्ट्र संमेलन, गोवा) १५ वे अधिवेशनाचा वृत्तांत.[५] (मॅक केब जे.) रॉबर्ट ओवेन[२] (मारमा गोवा इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट) पोर्ट ऑफ मारमागोवा.[५] (पोर्तुगिज इंडिया) (मुनशी कनैयालाल माणेकलाल) पृथ्वी वल्लभ. (मुष्टी फंडसंस्था गोवें) अहवाल[५] १९१२–१९२९,१९२९–१९३१ (मुळें र.भि.) मानव.[२] (राघवेंद्रराव शर्मा) हैद्राबाद व देशी संस्थानें[२](दोन प्रती) (रोजेट पी.एम्.) थिसॉरस ऑफ इंग्लिश वर्डस अँड फ्रेजिस, पार्टस वन अँड टू.[२](लाँगमन्स जिऑग्रफिकल सेरिज) दि वर्ल्ड ऑफ सीनियर स्टूडन्टस बुक थर्ड.[२] (वकील अने थूथी) गेट वे ऑफ इंडिया इतिहास मालाः इतिहा-

सनी बातो[२] भाग १।२।३ (वकील, धूर्या व काळे) इतिहासांतील गोष्टी भाग[२] १।२।३ (वैद्य व्यं. वि.) गोपाळ कृष्ण[२]. (व्हानडाईक जे. सी.) दि माउंटेन[२] (श्रीशठारिमुनिः) सहस्रगाथा रत्नावली प्रथमो भागः[२] (शिंदे वि. रा.) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न. श्री शिवाजी प्रताप.[२] शिवाजी सौव्हेनीर.[२] (सगुणबाला) सरोज[२]. (सरकार जे. एन) शिवाजी अँड हिज टाइम्स[२] आवृत्ती ३ री. (सरदेसाई) मराठी रियासत[३] मध्य विभाग १, ३, ४ व ब्रिटिश रियासत पूर्वार्ध.[२] (साने का. ना.) भाऊसाहेबांची बखर.[२] (सावंत सुभाव रामकृष्ण) गोमान्तकस्थ हिंदी लोक व फिरंगी संस्कृति.[४] (हिस्टॉरिकस्) १८५४ सालचें नागपूर[७] व नागपूरचे आप्पासाहेब भोंसले.[७] (हवालदार ग. रा.) ईलियडचें मराठी भाषांतर[२] आणि रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक चरित्र[२] भाग १।२. (हाय कमिशनर फॉर इंडिया) ए शॉर्ट कॅटलॉग ऑफ दि इंडिया होम लायब्ररी.

इतरवृत्त.

मार्च महिन्यात पुण्यास भरलेल्या अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेसाठी आलेले हिंदुस्थानांतील कित्येक नामांकित विद्वान संस्था पाहण्यासाठीं आले होते. सर राधाकृष्णन्, प्रो. भट्टाचार्य, डॉ. धीरेंद्रलाल दे–कलकत्ता, प्रो. सेनापती–कटक, डॉ. शैलेश्वर सेन, श्री. जयदेवसिंघ, डॉ. रासविहारीदास, प्रो. मार्डेकर–कोल्हापूर, श्री. श्रीनिवास अयंगार–म्हैसूर, प्रो. दामले–धारवाड, प्रो. नायडू–अंनमलाईनगर, प्रो. नरसिंह–मद्रास, प्रो. त्रिवेदी–भावनगर, डॉ. सहायी–पतियाळा वगैरेंनीं संस्था पाहून अतिशय समाधान व्यक्त केलें.

याशिवाय औरंगाबाद येथील उस्मानिया कॉलेजमधील ३० विद्यार्थी व ३ शिक्षक, पुणें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, प्रॅक्टिसिंग स्कूल व न्यू इंग्लिश स्कूल या संस्थांतील सुमारें १२५ विद्यार्थी व त्यांचे शिक्षक हे ऐतिहासिक संशोधन व वस्तुप्रदर्शन यांची माहिती करून घेण्यासाठीं आले असतां त्यांस दोहोंविषयीं माहिती देण्यांत आली.

---

१ जे. एफ. एडवर्डस २ काळे दि. वि. ३ आळतेकर स. खं. व काळे दि. वि. ४ पळसुले त्रिं. गो. ५ जोशी शं. ना. ६ चिलिमोरिया ए. एन. ७ पोतदार द. वा. ८ गव्हर्नमेंट ऑफ बॉंबे ९ बाळकृष्ण शास्त्री महानुभाव व खरे ग. ह.

श्री

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ४१

दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें

खंड २ रा.

लेखक

गणेश हरी खरे.

श्रीक्षेत्र आळंदी, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ मंडळांतील नाणीं, ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १, शिवचरित्र साहित्य खंड १ इत्यादि पुस्तकांचे लेखक व संपादक.

मुद्रक

अनंत विनायक पटवर्धन

आर्यभूषण प्रेस, ९३६।३ भांबुर्डा पेठ, पुणें.

श. १८५६] किंमत २ रुपये [इ. १९३४

प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तक हा दक्षिणच्च्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें या मालेचा दुसरा खंड आहे. यांत १३ प्रकरणें असून २० साधनांचा परामर्ष घेतला आहे. यांत ४ ताम्रपट व १२ शिलालेख यांचीं मूळें दिलीं आहेत व राहिलेल्या ४ साधनांवर टिपणें लिहिलीं आहेत. या ४ साधनांपैकीं दौलताबाद ताम्रपटाचें मूळ इतरत्र प्रसिद्ध झालेलेंच आहे. उरलेल्या तीन साधनांचीं मूळें मी देऊं शकलों नाहीं.

या पुस्तकांत जे ताम्रपट शिलालेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांचीं मूळें किंवा ठसे हे मंडळाच्या सग्रहांत आहेत. अभ्यासंना ते केव्हांही पहावयास मिळतील.

या खंडांत ज्या ताम्रपटशिलालेखांचीं मूळें दिलीं आहेत ते सर्व पहिल्या खंडाप्रमाणें नवीन आहेत. त्यांचीं मूळें इतरत्र कोठेंही प्रसिद्ध झालेलीं नाहींत. फक्त असोगें ताम्रपट (प्रकरण क्र. १३) पहिल्या खंडांत प्रसिद्ध झाला आहे. पण त्यावेळीं तो केवळ मजकडे आलेल्या वाचनावरून प्रसिद्ध केला होता. पुढें तो ताम्रपटच प्रत्यक्ष मंडळसंग्रहांत दाखल झाला. तेव्हां मूळ व मजकडे आलेलें वाचन यांत मोठी तफावत पडलेली दिसून आली. अर्थात् त्याचें सुधारलेलें वाचन देणें भागच झालें. एपिग्राफिया इंडिका सारख्या अव्वल दर्जाच्या नियतकालिकांतही असे प्रसंग आलेले आहेत. उदाहरणार्थ, अमगाची ताम्रपट घ्या. याचें प्रसिद्धीकरण अनेकदां झालेलें आढळतें.

यांत आलेल्या साधनांचें वर्गीकरण केल्यास तीं कालदृष्ट्या श. ७३२ व १५२० या दोन शकांमधील आहेत. भाषेच्या दृष्टीनें पाहिल्यास ४ लेख ज्ञानेश्वर पूर्वकालीन मराठी, एक ज्ञानेश्वरकालीन मराठी, एक ज्ञानेश्वरोत्तर कालीन मराठी, ३ जुन्या कानडींतील आणि ७ संस्कृत आहेत.

ज्ञानेश्वरपूर्वकालीन मराठी भाषेचे फारच थोडे नमुने आपणास माहीत आहेत. महानुभावांचे १२ ग्रंथ जरी ज्ञानेश्वर पूर्वकालीन आहेत तरी या खंडांत प्रसिद्ध केलेल्या सावरगाव (श. १०८६), नेर (श. १०८६), नेवासे (श. ११६१), या शिलालेखांच्या मानानें बरेच अलीकडचे आहेत. या खंडांतील व याच मालेच्या पहिल्या खंडांतील मराठी शिलालेख सोडून दिले तर इतरत्र प्रसिद्ध झालेले ज्ञानेश्वरपूर्वकालीन शिलालेख सारे सहा आहेत. या दोन खंडांत ज्ञानेश्वरपूर्वकालीन मराठी भाषेंतील ५ लेख आले आहेत. ही संख्या थोडी असली तरी मराठीचे अति प्राचीन नमुने म्हणून या लेखांना फार महत्त्व आहे हें सांगण्याची जरूर नाहीं.

नेवासे येथील मराठी शिलालेख श. ११६१ चा म्हणजे ज्ञानेश्वरांच्या अगोदर सुमारें ५० वर्षे कोरलेला आहे. या लेखांत कर्णेरेश्वर देवाचा उल्लेख आहे. कर्णेरेश्वर हें करवीरेश्वर या रूपाशीं संबद्ध असें रूप आहे. ज्ञानेश्वरांनीं करवीरेश्वराचे देवळांत बसून ज्ञानेश्वरी लिहिली असा प्रवाद आहे. तो 'खरा कीं खोटा हें सांगतां येत नाहीं. पण नेवासे येथें करवीरेश्वर किंवा कर्णेरेश्वर या देवाचें देऊळ होतें येवढें मात्र या लेखावरून निश्चयानें ठरतें.

या खंडांतील परभणी ताम्रपटाकडे बऱ्याच लोकांचें लक्ष वेधलेलें दिसतें. त्यांत आलेल्या चालुक्य कुलाच्या माहितीमुळें ज्याप्रमाणें कानडी विद्वानांचें त्याजकडे लक्ष गेलें त्याप्रमाणें त्यांत सोमदेव सूरी या जैन कवीविषयीं माहिती आल्यानें जैन विद्वानांचें त्याजकडे लक्ष लागलें. दोघांनाही वरील ताम्रपट आपआपल्या परीनें महत्त्वाचा वाटल्यामुळें त्यांनीं तो अनुक्रमें प्रबुद्ध कर्नाटक व्हाल्यूम १५ अंक १ व एक जैन नियतकालिक यांत थोड्या फरकानें छापला. याशिवाय श्री गोविंद पै व श्री. पां. भि. देसाई यांनीं भारती १ लें वर्ष ८, ९ व १० अंक व जय कर्नाटकाच्या १९३३ सालच्या डिसेंबरचा अंक यांत लेख लिहून परभणी ताम्रपटावरील विवेचनासंबंधीं अनुकूल व प्रतिकूल विचार प्रकट केले आहेत. त्यांतल्या त्यांत श्री. गोविंद पै यांचा लेख विस्तृत व विशेष विचारप्रवर्तक आहे. पण या विषयासंबंधींची चर्चा अजून चालूं आहे. तेव्हां त्याविषयीं अनुकूल प्रतिकूल विचार प्रकट करणें योग्य नसल्यानें तो प्रश्न तसाच सोडून देतों. एकंदरींत तो ताम्रपट महत्त्वाचा ठरला येवढें मात्र निश्चित.

तेर येथें कानडी लेख सांपडला हें विशेष आहे. आज तेरच्या आसपास कानडी बोलणारांचा मागमूसही नाहीं. पण सुमारें ८०० वर्षांपूर्वी तेथें मराठी भाषा जाणणाऱ्यांप्रमाणें कानडी भाषा जाणणारेही असावेत असें वाटतें. कांहीं अंशीं तीच गोष्ट पुळुंज येथील लेखांचीही आहे. सध्यां पुळुंज येथें किंवा पुळुंजच्या आसपास कानडीचा पत्ताही नाहीं. पण सात साडेसातशें वर्षांपूर्वी तेथें कानडी जाणणारे कांहीं लोक होते येवढेंच नव्हे तर पुळुंज व तिच्या आसपासचीं ग्रामनामेंही कानडी होतीं असें तेथील लेखांवरून दिसतें.

तेर व लातूर येथील लेखही महत्वाचे ठरल्याशिवाय राहणार नाहींत असें वाटतें. या दोन्ही ठिकाणच्या लेखांच्या बाबतींत मी खात्रीनें सांगूं शकतों कीं, लेखांच्या प्रसिद्धीकरणानें युरोपियन संशोधकांनीं त्या गांवांविषयीं केलेल्या संशोधनांत मी महत्त्वाची भर टाकली आहे.

ज्येष्ठ शुद्ध १ । १८५६   ग. ह. खरे.

अनुक्रमणिका.

शोधपत्रक

पृ.	ओ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	४	[न]गाळा	
५	५	दिधली	दीधली
१२	१४	कूपट्टोग्गारिका	कूपट्टोग्गारिका
१२	१६	पर्व्व	पूर्व्व
१६	३३	" १८। " १६	आहे १८। आहे १६
४९	१५	पर	परं
४९	१५	निळयन्त	निळयन्तं
५२	३	पाम्बर	पाम्बर
६८	३	साहणिदेवेय	साहणि, देवेय
७२	१३	शुद्ध १५	शुद्ध १२
८५	शेवटची ओळ	इन साउथ	ऑफ सदर्न

संक्षेप

इंडि. अँटि. व्हॉ. इंडियन अँटिक्वेरी व्हॉल्यूम.

एपि. इंडि. व्हॉ.=एपिग्राफिया इंडिका व्हॉल्यूम.

एपि. कर्ना.=एपिग्राफिया कर्नाटिका.

जे. बी. बी. आर. ए. एस.=जर्नल ऑफ दि बॉंबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी.

द. म. इ. सा. खं.=दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधनें खंड.

भा. इ. सं. मं. त्रै. व. अं.=भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष अंक.

E p–Epi. Ind.=Epigraphia Indica

J. Journal

J. R. A. S.=Journal of the Royal Asiatic society

डोंगर आहे. तेव्हां येथें पाडे या शब्दानें आटपाडी हें गांव विवक्षित असावें. संस्कृत ईकारांत स्त्रीलिंगी ग्रामवाचक नामें कानडींत एकारांत नपुंसकलिंगी होतात. जसें वनवासी→बनवसे वगैरे. त्याप्रमाणे येथें पाडीचें पाडे झालें असावें. दानांत ज्या गावांचा उल्लेख आला आहे त्यांचीं नावें करजयरव(खे)ड व नारविगावे अशीं लागतात. या दोन नांवांचें मिळून कदाचित् नेलकरंजी असें जोड नांव झालें असण्याचा संभव आहे. भिवघाटाच्या बरोबर दक्षिणेस २।३ मैलांवर करंजें नांवाचें एक गांव आहे. तें करजय या नांवानें विवक्षित असलें तर वरील संभव ठरत नाहीं. मग नारविगावे हें दुसरीकडे कोठें तरी शोधलें पाहिजे असें होतें. पहिल्या दानाच्या वेळीं सोविदेवाचा मुक्काम मंगळवाड येथील स्थिर शिबिरांत होता असें लेखांत नमूद आहे. मंगळवाड म्हणजे हल्लींचें मंगळवेढें हें गांव असावें. पूर्वीं हें गांव फार प्रसिद्ध असून तेथें एक लहानसा संस्थानिक असल्याचें संस्कृत व फारसी साधनांत नमूद आहे. श. १०६९ च्या म्हसवड येथील अप्रसिद्ध लेखांतही मंगळिवेड हें कळचुर्य बिज्जणाचें स्थिर शिबिर होतें असें सांगितलें आहे. आणखीही अनेक ठिकाणीं मंगळवेढें हें स्थिर शिबिर असल्याचें कळचुर्यांच्या लेखांत नमूद आहे. मात्र बहुतेक ठिकाणीं मंगळिवेड असें रूप आहे. ज्या देवाबद्दल दानें झालीं तो देव 'भंडिवण' मध्यें होता असें लेखांत आहे.

लेखसार– लेखामध्यें आरंभीं 'नमस्तुंग' हा श्लोक असून त्यापुढें १३ ओळींपर्यंत ज्या देवास दानें दिलीं आहेत त्या 'भंडिवण' मध्यें वास्तव्य करणाऱ्या भीमनाथ किंवा भीमेश्वर या स्वयंभू देवाची स्तुति केली आहे. हा स्तुतीचा भाग चांगलासा लागत नाहीं तरी विष्णु, ब्रह्मदेव, इंद्र, गंधर्व, विद्याधर, ऋषि, योगी, भोगी वगैरे याच्या पद्कमलाच्या ठिकाणीं रत असतात, हा भक्तजनांना इच्छिलेलें देतो, वगैरे अर्थाची स्तुती केल्याचें दिसत आहे. या स्तुतीनंतर १४ ते ३४ ओळींत पहिल्या दानाचें वर्णन आहे. त्यांत प्रथम समस्तभुवनाश्रय, पृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर, इत्यादि सार्वभौमत्वदर्शक पण सामान्य विशेषणांनीं व परममाहेश्वर, काळांजरपुरवराधीश्वर, सुवर्णवृषभध्वज, डमरुतूर्यनिर्घोषण, कळचुर्यकुळकमळ मार्तंड, कळचुर्यकुळप्रतापचक्रवर्ति, रायमुरारि, इत्यादि कळचुर्यकुळासंबंधीं व वैयक्तिक विशेषणांनीं सोयिदेव याची स्तुति करून तो मंगळवाड येथें

राज्य करीत असतां त्याचा चाकर महाप्रचंडदंडनायक (?) याच्या विनंती-वरून विजयसंवत्सरीं पौष शुद्ध द्वादशीला उत्तरायण संक्रमणाच्या पर्वकाळ-प्रसंगीं वरील देवाला त्याचे अंगरंगभोग व जीर्णोद्धार वगैरेसाठीं पाडेनाडा-मधील करजय गांवांतील दोन मत्तर जमीन दिल्याचें नमूद केलें आहे असें वाटतें. ३४ व्या ओळींत पुढील दानाला सुरवात करतांना प्रथम कळचुर्यकुळप्रतापचक्रवर्ति, निःशंकमल्ल या पदव्यांनीं युक्त असा सोयिदेवाचा भाऊ संकमदेव हा राज्य करीत होता असें सांगून त्याच्या महाप्रधान महामंडळेश्वर वगैरे विशेषणांनीं युक्त अशा कोणी नारविगावे मधील जमीन दान दिल्याचें सांगितलें आहे. यापेक्षां जास्त माहिती लेख घाण झाला असल्यानें मिळूं शकत नाहीं.

२० तेर येथील चार शिलालेख.*

(श्री. ग. ह. खरे)

तेर हें गांव बार्शीलाइट रेल्वेच्या कुर्डूवाडी—लातूर फाट्यावरील तेर या स्टेशनपासून पूर्वेस सुमारें २–२॥ मैल आहे. सध्यां हें गांव हैद्राबाद संस्थानापैकीं धाराशीव अथवा उस्मानाबाद जिल्ह्यांत मोडतें. हें सामान्य लोकांत गोरोबा कुंभार नांवाच्या संतकवीचें समाधिस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. युरोपियन विद्वानांत, टालेमीनें व पेरिप्लूसमध्यें उल्लेखिलेलें तगर म्हणजेच सध्यांचें तेर अशी समजूत आहे. पैकीं डॉ. फ्लीट यांनीं तगर म्हणजेच तेर हें सिद्ध करून दाखविलें[1] असून डॉ. बार्नेट यांनीं डॉ. फ्लीट

* पा. स. ४।१८५६

१ डॉ. फ्लीट यांनीं एके वेळीं कोल्हापूर किंवा त्याच्या जवळचें करवीर म्हणजेच तगर असें प्रतिपादन केलें होतें (बाँबे गॅझिटियर १ ला व्हाल्यूम २ रा भाग पृ. ५४०). पण पुढें त्यांनीं आपलें हें मत बदलून वरील तेर म्हणजेच जुनें तगर असें ठरविण्याचा प्रयत्न एका लेखांत केला आहे. याचें आरंभीं तगर शहराविषयींचीं त्यावेळच्या विद्वानांमध्यें प्रचलित असलेलीं मतें देऊन तीं कशीं तर्काधिष्ठित नाहींत हें दाखविलें आहे आणि नंतर आपण तगर म्हणजेच तेर असें कां म्हणतों याचीं कारणें दिलीं आहेत. तीं अशीं–(१) नगरचें ज्याप्रमाणें नेर किंवा क्वचित् नार होतें त्याप्रमाणें तगरचें (तगर → तयर → तेर या क्रमानें) तेर हें रूप होईल. (२) हें गांव शहर

यांचा सिद्धांत बरोबर आहे असें मानलें आहे.[1] मि. कझिन्स व बर्जेस यांनीं डॉ. फ्लीट यांचा सिद्धांत बरोबर असल्याबद्दल जरी स्पष्ट विधान केलें नसलें तरी त्यांचे मतें हें गांव फार प्राचीन आहे.[3] हिंदी विद्वानांत कै. राजवाडे याखेरीज इतर विद्वानांनीं डॉ. फ्लीट यांचें मत गृहीत धरलें आहे.[4] कै. राजवाडे यांनीं मात्र पूर्वीचें तगर म्हणजे हल्लींचें, निजामच्या राज्यांतील कनकगिरीपासून उत्तरेस सहा, कोसांवर असलेलें तवरगिरी, तावरगेरे किंवा तवरेसर हें आहे असें सिद्ध करण्याचा यत्न केला आहे.[5] अगदीं अलीकडे निजामच्या राज्यांतील पुराणवस्तुसंशोधन-

म्हणूनच सवत्र समजण्यांत आलं आहे. (३) प्लिन्कूलच्या म्हणण्याप्रमाणेंच भडोच ते पैठण व पैठण ते तेर हीं अतरें आहेत. त्यानें सांगितलेली दिशाही जवळजवळ बरोबर आहे (J. R. A. S. 1901P.537). हेंच मत त्यानीं पुढेंही सांगितलें आहे. पहा एपि. इंडि. ७,२२४;१२,२५३

२ पहा एपि. इंडि. १९,३१ आणि अँटिक्विटीज ऑफ इंडिया पृ.२६२

३ पहा ॲन्युअल रिपोर्ट ऑफ दि आर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया १९०२–०३ पृ. १९६, प्रोग्रेस रिपोर्ट ऑफ दि आर्किआलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया इ. १९०१।१९०२ पृ. १ आणि J.R.A. S. 1902 P. २३०. या तिसऱ्या ठिकाणीं डॉ. बर्जेस यांनीं, कझिन्स यांनीं पुराणवस्तुसंशोधनाच्या दृष्टीनें तेर गांवची चार दिवस पहाणी केली असतां त्यांना काय माहिती किंवा वस्तू मिळाल्या याचें थोडक्यांत वर्णन दिलें आहे. त्याचें सार असें–(१) सत्यपुर (म्हणजेच तगर) महात्म्य (प्रश्नाच्या दृष्टीनें निरुपयोगी). (२) श. १०७६ च्या एका लेखाचा छाप, फोटो व ओतीव प्रतिकृति. (३) एक बौद्ध चैत्य व तेर गांवाबाहेर पश्चिमेस असलेल्या अर्वाचीन जैन देवालयांतील ४ बौद्ध शिल्पें. (४) दोन अतिशय जुनीं, विटांचीं व उत्तम कोरीव काम असलेलीं लाकडी दरवाजांचीं देवळें. (५) २५० वर्षांचा जुना व तेरच्या काझीचा उल्लेख असलेला एक फारसी ताम्रपट. (६) ५ नाणीं: ३ मुसलमानी, १ अस्पष्ट व १ अस्पष्ट पण आंध्र.

४ पहा McCrindle's Ancient India as described by Ptolemy and edited by S. N. Majumdar p. 385

५ पहा इतिहास आणि ऐतिहासिक वर्ष दुसरें अंक १५ वा पृ.२५७. या लेखांत कै. राजवाडे यांनीं श. ५३४ च्या हैद्राबाद ताम्रपटांत आलेल्या हकिकतीवरून तगर गांवाचा निश्चय करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचें तात्पर्य असें—ताम्रपट देणारा: वातापिनगरींत असणारा **चालुक्य दुसरा पुलकेशिन्.** दान घेणारा: **तगराधिवासी ज्येष्ठशर्मन्.** दान दिलेला गाव: **माकरप्पि.** उत्तरेस व दक्षिणेस असलेले गाव: **कदृप्प** व **रोल्कूरुकी.** यांत कै. राजवाडे पुढील अनुमानें काढतात.-

खात्यामार्फत त्यांचे वार्षिक रिपोर्टांत तेर येथील एक फोटो प्रसिद्ध झाला आहे व एक परिच्छेद त्यासाठीं खर्चला आहे.[१] यापेक्षां जास्त प्रयत्न तगर शहराची निश्चिती ठरविण्यासाठीं झाल्याचें माझ्या पाहण्यांत नाहीं.

मला स्वतःला डॉ. फ्लीट यांचें म्हणणें जास्त पटलें. तसेंच डॉ. फ्लीट यांच्या लेखानंतर कझिन्स यांनीं या गांवाला प्रत्यक्ष जाऊन जी माहिती

(१) तगर वातापी (=बदामी) जवळ असलें पाहिजे. (२) माकरप्पि हें गांव नगर शहरीं राहणाऱ्या ब्राह्मणाला चालवितां येईल इतकें नगर शहराजवळ असलें पाहिजे. (३) तगर वातापी व माकरप्पि यांच्या जवळ कोठें तरी असलें पाहिजे. (४) माकरप्पि हें गांव माकरब्बि या रूपानें हल्लीं बल्लारि जिल्ह्यांतील हूविन हड गल्लि (=हडगल्ली?) तालुक्यांत विद्यमान आहे. (५) तेव्हां असें गांव म्हणजे तवरगिरी किंवा तावरगेरे हें होय; कारण हें बदामी पासून ३०।३५ कोस व माकरब्बि पासूनही तेवढेंच आहे. (६) या गांवाच्या आसपास शिलामय प्रदेश असल्यामुळें त्यास शिलाहार हें नांव देणें योग्य होतें. (७) म्हणून तगरहून निघालेल्यांनीं शिलाहार हें नांव धारण करणें योग्य होतें. पण कै. राजवाडे यांच्या सिद्धांतावर अनेक आक्षेप घेतां येण्यासारखे आहेत. पहिला आक्षेप असा कीं, तगर व तवरगिरी–गेरे हीं दोन्हीं गांवें एक ठरविल्यास पेरिप्लूस व टॉलेमी यांच्या हकीकतीचा मेळ कसा घालावयाचा. त्यांनीं तगर हें गांव पैठणच्या पूर्वेस किंवा पूर्वोत्तरेस आहे म्हणून सांगितलें आहे आणि तवरगिरी तर पैठणच्या कितीतरी दक्षिणेस आहे. दिशेचा प्रश्न बाजूस ठेवला तरी दोघेही नगर पैठणपासून दहा दिवसांच्या अंतरावर होतें असें म्हणतात. पैठण व तावरगेरे यांमधील अंतर यापेक्षां कितीतरी जास्त आहे. दुसरा आक्षेप असा कीं, तवरगिरीस प्राचीन अवशेष आहेत काय? ज्या गांवाचा व्यापारी शहर म्हणून परके लोकही उल्लेख करतात तेथें प्राचीन अवशेष खात्रीनें सांपडावेत. पण कै. राजवाडे असे अवशेष असल्याचें दाखवूं शकले नाहीत. कांहीं शिलाहार जसे स्वतःस तगरपुराधीश्वर म्हणवितात तसे कांहीं स्वतःस कोपण पुरपरमेश्वर हें बिरुद घेतात. तेव्हां शिलाहार व तगर या दोन नांवांचा नसता संबंध जोडणें योग्य नव्हे. शिवाय शिलाहार हें जर देशवाची नांव असतें तर तें शेंकडोंनीं उपलब्ध झालेल्या लेखांत कोठें तरी आलें असतें. असे अनेक आक्षेप कै. राजवाडे यांच्या विधानांवर घेतां येतील. सारांश काय कीं, प्रतिग्रही ब्राह्मण तगराधिवासी होता तेव्हां त्याला मिळालेलें गांवही तगराजवळच असावें येवढाच काय तो मुद्दा विचारणीय आहे.

१ पहा हैद्राबाद संस्थानच्या आर्किऑलॉजी खात्याचा रिपोर्ट इ.१९२९–३० पृ. ५ व चित्र

मिळविली व जी त्यांनीं आणि डॉ. बर्जेस यांनीं प्रसिद्ध केली तीवरून मला तेर येथें जाण्याची विशेष इच्छा उत्पन्न झाली व मी तेथें गेलों. तेथें मला चार शिलालेख मिळाले.[1] ते पुढें देत आहे. तत्पूर्वी येथें एक गोष्ट सांगून

१ मला या ठिकाणीं जे पुराण अवशेष आढळले ते असे-गांवांत त्रिविक्रमाच्या देवळांत म्हणजे ज्याला इतरांनीं त्याच्या शिल्पावरून बौद्ध चैत्य म्हटलें आहे त्यांत मुख्य मूर्ती त्रिविक्रमाची असून त्याशिवाय नारायण, बलिपत्नी इत्यादि मूर्ती आहेत. या सर्व मूर्ती भग्न आहेत. त्रिविक्रमाचा वरचा भाग शाबूत आहे. नारायणाची मूर्ती दोन तीन ठिकाणीं भंगलेली असली तरी दागिन्यांनीं खूप खचलेली आहे. त्याच्या गदेवर गरुडाची मूर्ती खोदलेली आहे. जिला बळीची बायको असें म्हणतात ती उभी व हातांत ओवाळण्यासाठीं ताम्हन वगैरे वस्तु घेतलेली असून ती ज्या भग्न सिंहासनावर उभी आहे त्याच्याच दर्शनी पट्टीवर कानडी लेख आहे. या सर्व मूर्ती देवळाच्या अगदीं आंतल्या दालनांत आहेत. बाहेरच्या दालनांत समोरच नग्न भैरव असून त्याच्या डावीकडे कार्तिकस्वामी आहे. भैरवाचे खालचे दोन्ही हात तुटलेले असून वरच्या दोन हातांत डमरू व त्रिशूळ हीं आयुधें आहेत. कार्तिकस्वामी मोरावर बसलेला असून त्याच्या तीन हातांत तलवार ! खड्ग, ढाल हीं आयुधें आहेत व चौथा हात कमरेवर आहे. तोंड एकच आहे. बाहेरच्या दालनापुढें लाकडी मंडप आहे. दरवाजाही लाकडी आहे. दरवाजाच्या समोर कांहीं वीरगळ व मूर्ती भिंतीच्या कट्ट्यांत बसविलेल्या आहेत. मूर्ती इतक्या महत्वाच्या नाहींत. वीरगळांत दोनच दालनें आहेत. पैकीं पहिल्यांत लढाईचें दृश्य व दुसऱ्यांत मृतवीर कैलासांत शिवपूजा करीत असल्याचा देखावा असा क्रम आहे. या देवळाच्या सभोंवतीं पूर्वी ओवऱ्या व इतर बांधकाम असावें असें वाटतें. सध्यां सभोंवतीं जोतें, खांबांचे तळखडे इत्यादि अवशेष दिसतात. गांवांतील दुसरें महत्वाचें देवालय म्हणजे उत्तरेश्वराचें. हें देऊळ विटांचें बांधलेलें आहे. त्याचा दरवाजा लाकडी असून त्यावरील नक्षीकाम व शिल्पकाम अतिशय सुंदर आहे. पण कोणाचें लक्ष नसल्यामुळें सध्यां हें देऊळ जमिनींत अर्धवट गाडलें गेलें आहे. या देवळाजवळच मध्यें कमळ व भोंवतीं बारा राशी काढलेला दगड पडला आहे. याशिवाय दोन भग्न सूर्यमूर्तीही आहेत. दोन्ही उभ्याच आहेत. प्रत्येक मूर्तीच्या दोन्ही बाजूंस एक एक स्त्री उभी असून एकीच्या दोन्ही हातांत कमळें पण खालचा भाग अस्पष्ट झालेला व दुसरीचे दोन्ही हात अस्पष्ट असून खालीं घोड्यांचीं सात तोंडें आहेत. घोड्याचीं सात तोंडें किंवा कमळ यावरून त्या मूर्ती सूर्याच्या आहेत हें स्पष्ट आहे. गांवाबाहेर पश्चिमेस नागठाण व पार्श्वनाथ बस्ती अशीं दोन जैन स्थानें आहेत. नागठाण म्हणजे एक चोकोनी, दुदालनी दगडी देऊळ आहे. आंतल्या दालनांत भिंतींत समोरच चैत्य व त्यावर नागवृक्ष काढलेली एक शिला बसविलेली आहे. नागवृक्षास फांद्या, पानें वगैरे ऐवजीं नाग व त्याचे फणेच काढलेले आहेत. चैत्याच्या

ठेवतों कीं, माझ्या कोणत्याही लेखांत तेर या गांवाचें नांव तगर या रूपांत आलेलें नाहीं. पण त्या बरोबरच हेंही सांगून ठेवण्यास हरकत नाहीं कीं, तेर येथें मुसलमानपूर्वकालीन अवशेष फार मोठ्या प्रमाणांत अस्ताव्यस्त पडलेले किंवा गाडले गेलेले असून उत्खनन केल्यास फार महत्त्वाची माहिती उपलब्ध होण्याचा संभव आहे.

१

उपलब्धि व वर्णन—हा लेख त्रिविक्रमाच्या देवळांत गाभाऱ्यांत असलेल्या एका भग्न, घोटीव, काळ्या दगडाच्या सिंहासनाच्या दर्शनी पट्टीवर खोदलेला आहे. सिंहासनाप्रमाणें लेखही थोडा फुटलेला आहे. लेखाची लांबी १ -१″ व रुंदी ११″ आहे. ओळी दोन आहेत, पण दुसरी अर्धीच आहे.

अक्षरवटिका, लेखनपद्धति व भाषा—अक्षरांचें स्वरूप शकाच्या अकराव्या शतकांतील कानडी अक्षरांशीं जुळणारें आहे. लेखनपद्धती विषयीं कांहीं सांगण्यासारखें नाहीं. भाषा कानडी आहे.

दोन्ही बाजूंस प्रत्येकीं दोन भक्त काढले आहेत. शिवाय मध्यभागीं व बाजूस बहुधा पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. नागठाण सोडून पार्श्वनाथ बस्तींत गेलें म्हणजे एक चार दालनी इमारत लागते. तिच्या अगदीं बाहेरच्या दालनांत उत्तर व दक्षिण बाजूंच्या भिंतींत समोरासमोर बैठ्या तीर्थंकर मूर्ती आहेत. पैकीं दक्षिणेकडील पार्श्वनाथ आहे. उत्तरेकडील कोण हें लांछन काढलेलें नसल्यानें समजत नाहीं. आंतल्या दालनांत उजव्या व डाव्या बाजूस प्रत्येकीं एक खोली आहे. त्यांपैकीं उजवीकडच्या खोलींत एक उभी पार्श्वनाथ मूर्ती असून बाजूंस तिच्या भग्न सिंहासनावर एक लेख आहे. हें सिंहासन मूळ या मूर्तीचें दिसत नाहीं. अगदीं शेवटच्या दालनांत उंच सिंहासनावर तीर्थंकरांची बैठी मूर्ती व एक एक चौरीधर आहे. सिंहासनावर काढलेल्या सिंह लांछनावरून ती मूर्ती चोविसावा तीर्थंकर वर्धमान किंवा महावीर याची आहे हें स्पष्ट होतें. याशिवाय मुख्य इमारतीच्या आग्नेय कोपऱ्यांत एक खोली असून तीन तीर्थंकर मूर्ती आहेत. तेर हें गांव व हा बस्ती यांच्या मध्यें एक हेमाडपंती थाटाचें नवरंगी शिवालय आहे. हें शिवालय, बस्ती व त्रिविक्रमाचें मंदिर या तिहींविषयीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, यांपैकीं कोणालाही शिखर नसून द्राविडी शिखरावर ज्याप्रमाणें शेवटीं एकाद्या कबरीच्या दगडासारखा भाग असतो तशा आकाराचा भाग आहे. असें इतरत्र फारसें कोठें आढळत नाहीं. गांवाबाहेर कनक भावी नांवाची एक विहीर आहे. भावी हा वापी शब्दाचा कानडी भाषेंत रूढ असलेला अपभ्रंश दिसतो. मराठींत बाव, बावडी असा अपभ्रंश होतो.

काल व स्थल—यांत कालाचा उल्लेख नाहीं; पण पुढें केलेल्या चर्चे-वरून तो श. १००० च्या आसपासचा आहे असें दिसतें. वारिस्तळे असा एका स्थानाचा उल्लेख आला आहे. तें कोठें आहे हें सध्यां समजत नाहीं.

चर्चा—या लेखांत महामंडळेश्वर जोगमरस या नांवाची एक व्यक्ति आली आहे. जोगमरसाचा उल्लेख दोन तीन ठिकाणीं आला आहे. हैद्राबाद संस्थानांतील हिरे मुद्दनूर येथील लेखांत याविषयीं महामण्डलेश्वर जोगमरस अथवा जोगमराण, सूर्यवंशी, दरिकाडु नाडाचा मालक व मंगळ-वाडाचा मंडळेश्वर, बायको तारादेवी, मुलगी सावळदेवी (हीच चालुक्य साहावा विक्रम याची बायको असून ती श. १००० च्या सुमारास नव-ऱ्यानें अंगभोगासाठीं दिलेल्या नारेगल प्रांतावर अधिकार चालवीत होती) अशी माहिती आली आहे.[१] माडगीहाळ शिलालेखांत कुंतळ देशांत तरिकाडु (=दरिकाडु) नाड असून त्यांत मंगळिवेड (=मंगळवेड=मंगळ-वेढें) हें गांव आहे असें सांगून नंतर कल्याणिच्या कळचुर्यांची वंशावळ दिली आहे. तींत जोगम हा बिज्जलाचा आजा म्हणून सांगितला असून ती गोष्ट इतर प्रामाणिक लेखांशीं जुळणारी आहे.[२] एपिग्राफिया कर्नाटिका मध्येंही तलिकाड जोगमनृप असा एक उल्लेख आला आहे.[३] हे सर्व उल्लेख कळचुर्य जोगमाविषयींच आहेत असें डॉ. बार्नेट यांचें म्हणणें असून तें मान्य करण्यासारखें आहे.[४] या लेखांतील जोगमरसही कळचुर्य जोगमच असावा. मात्र येथें एक शंका येते. हिरे मुद्दनूर लेखांत जोगमाला सूर्यवंशी म्हटलें आहे आणि कळचुर्य कुळ तर सोमवंशी म्हटलें जातें.[५] तेव्हां सूर्यवंशी जोगम व सोमवंशी जोगम एक कसे मानावयाचे? पण हा प्रश्न सोडविणें कठीण नाहीं. आपण पाहिलेंच आहे कीं, एकच चालुक्य कुल सूर्य व सोम अशा दोन्ही वंशांतील सांगितलें आहे.[६] तेव्हां येथें तसें होणें अशक्य नाहीं. कोल्हापूर ताम्रपटांत 'सूर्यान्वयांबररविस्सच बिज्जणोपि चक्रे गृहं

---

१ बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४४८ व टीपा ३,४.

२ एपि. इंडि. १५,३१९. ३ एपि. कर्ना. व्हॉ. ११ Dg42 (पृ ८८)

४ एपि. इंडि. १५,३१८ टीप ३ री. ५ बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४६८ ६ पाठीमागें पृ. ४१.

सुरपतेर्भुवि यस्य कोपात्' असें विधान आहे.[१] यांतील बिज्जण कांहीं लेखांत सांगितल्याप्रमाणे जोगमाचा बाप मानला तर हें कुल सूर्यवंशी होतें असें ठरेल. कोल्हापूर ताम्रपट श. १०३७चा असल्यानें जुनी कल्पना काय होती हेंही समजतें. ज्या भोजाविषयीं वरील विधान आलें आहे त्यानें माझ्या मतें श. ९९० पासून पराक्रमास सुरवात केली असल्यानें कालाच्या दृष्टीनें जोगमाचा बाप बिज्जल व भोज हे एका कालीं येऊं शकतात.

दक्षिणेंतील अनेक लेखांतून अनकोज, कालकोज, केदारोज, दासोज, देमोज, देवोज, नागोज, मल्लोज, माचोज, मुद्दोज, हरोज अशा तऱ्हेचीं शिल्प्यांचीं नांवें येतात.[२] तेव्हां वारिमल्लोज, हें शिल्प्याचें नांव आहे हें उघड ठरतें.

वाचन[३]

(१) श्रीमत् महामण्डळेस्वर जोगमरसर विद्यामन्तरू वारिमल्लोजर पुत्र
बिरुदरू वारिस्तळेय कालभैरवरू[४] [५]— — —
(२) न बेस मंगळ महाश्री ॥ ९[६]

अर्थ

श्रीमंत महामंडळेश्वर जोगमरसाच्या विद्यावंत, वारिमल्लोजाचा पुत्र (हें) बिरूद असलेल्या वारिस्थळीच्या कालभैरवाची कृति मंगल महाश्री

२

उपलब्धि:–हा लेख तेर येथें गांवाच्या पूर्वेस नदीच्या जवळच असलेल्या मारुतीच्या चौकोनी पाराच्या पश्चिम बाजूस टेकून ठेवलेला आहे.

वर्णन:–या लेखाची लांबी ४′–३″, रुंदी १′ ते १′–१॥″ व जाडी अदमासें १′ आहे. या दगडाच्या पहिल्या १′–२॥″ जागेंत डावीकडून

---

१ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ला पृ. ३८ ओळी २०, २१. २ ए डिक्शनरी ऑफ हिंदू आर्किटेक्चर परिशिष्ट २.

३ वाचन प्रत्यक्ष पाहून व ठशावरून केलें आहे. ४ या अक्षराविषयीं शंका आहे. ५ येथून पुढील तीन अक्षरांचे खालचे भाग फक्त दिसत आहेत.

६ ९ या आकड्यासारखें चिन्ह आहे.

उजवीकडे सन्मुख ब्रह्मदेव व शिवलिंग असून त्यांच्यावर सूर्यचंद्र आहेत. खालीं लेख सुरू होतो. पण तो इतका अस्पष्ट आहे कीं, शेवटच्या ९ ओळीखेरीज बाकीच्या मजकुरांतील दहापांचापेक्षां जास्त अक्षरें लागत नाहींत. तेव्हां पुढील माहिती ही शेवटच्या भागाविषयीं आहे असें समजावें.[1]

अक्षरवटिका:– अक्षरांचें स्वरूप शकाच्या अकराव्या शतकांतील नागरी अक्षरवटिकेशीं जुळणारें आहे. **लेखनपद्धती**विषयीं विशेष सांगण्यासारखें नाहीं. **भाषा** जुनी मराठी आहे

स्थल–या लेखांत गांवाचें नांव आलेलें नाहीं.

काल–यांत कालाचा उल्लेख शक १०८६, सभानु संवत्सर, गुरुवार, वैशाख शुद्ध त्रयोदशी असा आला आहे. चालू शक १०८६ ला जुळता संवत्सर सुभानु येतो. तेव्हां येथील उल्लेख चालू शकाचा धरला पाहिजे. चालू श. १०८६ च्या वैशाख शुद्ध त्रयोदशीस गुरुवार येत असून त्या दिवशीं त्रयोदशी मध्यममानानें ४३ घटका ४८ पळें होती. या मितीशीं जुळती खिस्ती तारीख इ. स. ११६३ एप्रिल १८ ही येते.[2]

चर्चा–हा लेख मराठी आहे यांतच महत्त्व आहे. यांतील भुमिं, चालीसां निवर्तनां, मले, तीनि, तेयां, देववित्यासिए, वहिला, नीतणें, मान्यें त(स)लटीर्चीं, इत्यादि शब्दरूपें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत.

सार–या लेखांत आरंभीं महत्वाची माहिती आली असली पाहिजे हें उघड आहे. पण तो भाग लागत नसल्यानें फुकट गेला आहे. जो भाग लागतो त्यांत पुण्यस्थानाच्या उद्यापनसमयीं दिलेल्या दानांचा तपशील आहे.

१ या लेखाचे बाबतींत मि. कझिन्सनीं पुढील मत दिलें आहे ' Beside the platform stands a slab containing a long but much abraded inscription with a date which is hardly legible (Annual Report of the archaeological survey of India 1902–03 p. 196)


२ डॉ. बर्जेस यांनीं याचा काल शक १०७६ असा दिला आहे. पण तो चूक दिसतो.

वाचन[1]

(१) स्वस्ति श्री शक १०८६ ।।। सुभानु संवत्सरांतर्गत वैसाख
(२) शुद्ध त्रयोदश्यां गुरौ पुण्यस्थान तदुद्यापन समयु स
(३) मागता स—ते महाजन स्वरसप्रत्त देसास भुमिं
(४) चालीसां निवर्त्तनां त्रिस्रोत्रमान्य । क्रयगृहीत म
(५) ले तीनि च तेयां देववित्यासिए ।। वाहिला महाजे
(६) न स्थलिं निवेद्या तिस्तालिवणा नीतणें ४ मा
(७) न्यें ।। त(न?)ळटीचीं नीतणे २(३?) ३ मान्ये । स्वदत्तां परदत्तां वा
(८) यो हरेत वसुंधरां । षष्ठिं वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृ
(९) मिः ।

३

उपलब्धि—हा लेख तेर गांवच्या पश्चिमेस असलेल्या जिन बस्तींतील एका पार्श्वनाथमूर्तीच्या सिंहासनावर कोरलेला आहे. लेख कोरण्याची पद्धति व त्यांतील मजकूर यांचा विचार करतां लेख असलेलें सिंहासन हल्लींच्या पार्श्वनाथमूर्तीचें नसावें हें निश्चित ठरतें.

वर्णन—लेखाची लांबी २′ १″ आणि १′ १″ व रुंदी १० ″ आहे. म्हणजे त्याचा आकार  असा आहे. लेखाच्या ओळी ९ आहेत. पैकीं शेवटच्या ओळीचीं अक्षरें अगदीं लहान आहेत. लेख मध्येंच फुटला आहे व पार्श्वनाथाची मूर्ती बसवितांना तिच्या पायाखालीं घातलेल्या चुन्यानें भरून गेला आहे. तो चुना खरवडून काढला तरीही अक्षरांत चुना जाऊन बसल्यानें व लेखाचा कांहीं भाग मूर्तीच्या जवळजवळ पायाखालीं गेल्यानें त्याचा छाप चांगला येत नाहीं.

अक्षरवटिका, लेखनपद्धति, भाषा—अक्षरांचें स्वरूप १३।१४ व्या शतकांतील नागरी असून त्यांतील दोन विशेष म्हणजे श्रीवर कांहीं ठिकाणीं मात्रा आहेत व कांहीं ठिकाणीं पृष्ठमात्रा आहेत (स्वस्ति श्री ओ. १, श्रीमूल ओ. २, बुधवारे ओ. १). शिष्य ऐवजीं सिष्य (ओ. ४) लिहिलें आहे.

१ वाचन मूळ व ठसा या दोहोंच्या सहाय्यानें केलें आहे.

काल—यांतील कालाचा उल्लेख श. १३१३ [प्रजापति] संवत्सर, फाल्गुन वद्य ११ बुधवार असा असून तो पिल्ले जंत्रीप्रमाणें बरोबर येतो. या जंत्रीप्रमाणें श. १३१३ फाल्गुन वद्य ११ मंगळवार व बुधवार या दोन दिवशीं येत असून बुधवारीं अगदीं थोडी आहे. त्या दिवशींची ख्रिस्ती तारीख स. १३९२ मार्च २० ही येते.

स्थल—लेखांत स्थलाचा उल्लेख नाहीं.

चर्चा—वर्धमानस्वामीच्या चैत्यालयाचा जीर्णोद्धार केल्यावेळीं आलेल्या एका गृहस्थांनीं दान दिलेल्या पादुकासंबंधीं हा लेख आहे. अर्थात् श. १३१३ पूर्वी तेथें जुनें, वर्धमान म्हणजेच महावीर याचें देऊळ होतें हें स्पष्ट झालें. मि. कझिन्स यांना हा जैनबस्ती अर्वाचीन् वाटला तें बरोबर नाहीं, असें यावरून सिद्ध होतें.

वाचन[१]

(१) ॥ स्वस्ति श्री शाके १३१३ [प्रजापति] संवत्छरे फाल्गुन वदि ११ बुधवारे ॥

(२) ॥ श्री मूलसंघीय श्री [वर्धमान] स्वामि चैत्यालंयकृत जीर्णो ॥

(३) ॥ द्धारे समायात सिद्धांताचार्य श्रीमत्पूज्यपादस्वामिनां प्रिय ॥

(४) ॥ सिष्य श्रीविद्यानंद स्वामिनां संजा

(५) ॥ता—गा [धि]- स्येयं पादुका ॥ श्री ॥

(६) ॥ .... दालासुतस्य न—स्व (स्य) ॥

४

उपलब्धि—हा, तिसरा लेख ज्या बस्तींत सांपडला त्याच बस्तीच्या पुढील सोप्यांत पडलेला आढळला.

वर्णन—हा लेख संपूर्ण नाहीं. पण जो भाग सांपडला आहे त्याची लांबी व रुंदी, अनुक्रमें २′–३″ व १′–८″ असून आरंभीं, डाव्या बाजूस व उजव्या बाजूस अनुक्रमें ४,″ २,″ २″ इंच जागा मोकळी सोडून मधल्या जागेंत लेख आहे. लेख जसा फुटला आहे तसा अस्पष्टही झाला आहे. त्यामुळें नीट लागत नाहीं. यांत एकंदर ओळी २० आहेत.

---

[१] वाचन मूळ लेख पाहून व ठशांच्या सहाय्यानें केलें आहे.

अक्षरवटिका,–लेख नागरी लिपींत आहे यापेक्षां जास्त कांहीं सांगतां येत नाहीं.

काल–लेखांत कालाचा उल्लेख शक १५२० विलंबी संवत्सर भाद्रपद मास, शुक्लपक्ष, पंचमी, शनिवार असा आहे. गत शक १५२० ला विलंबी संवत्सर व भाद्रपद शुद्ध पंचमीला शनिवारही येतो. या मितीशीं जुळती ख्रिस्ती तारीख इ. स. १५९८ आगस्ट २६ ही आहे.

स्थल–लेखांत तैर किंवा तेर येवढें एकच ग्रामनाम आलें आहे. तैर हें रूप तगर → तयर → तैर असें साधतां येईल व तें तगर या रूपाशीं तेर या रूपापेक्षां जास्त जवळचें आहे.

सार–या लेखांत आरंभीं ' श्रीमत्परमगंभीरस्याद्वादामोघलांछनं। जीयात्त्रैलोक्यनाथस्य शासनं जिनशासनं ' हा श्लोक थोड्या अशुद्ध रूपांत आला असून पुढें मितीचा तपशील आला आहे. पुढील भाग अगदींच अस्पष्ट आहे. पण त्यांत तैर किंवा तेर हें गांवाचें नांव व वर्धमान आणि पार्श्वनाथ यांच्या चैत्यालयांचा मात्र निश्चित उल्लेख आहे.

---

२१ लातूर येथील दोन शिलालेख*

(श्री. ग. ह. खरे.)

लातूर हें गांव निजामच्या राज्यांतील उस्मानाबाद जिल्ह्यापैकीं लातूर तालुक्याचें मुख्य ठिकाण असून बार्शी लाइट रेल्वेच्या कुर्डुवाडी–लातूर फाट्यावरील मुख्य ठिकाण आहे. मी या ठिकाणीं गेलों असतां मला जे दोन लेख मिळाले ते पुढें देत आहे. पैकीं पहिला फार महत्त्वाचा आहे.

१

उपलब्धिः–हा लेख गांवाच्या दक्षिण अंगास भूतनाथाचें म्हणून एक देऊळ असून त्याच्या मंडपांत, गाभाऱ्यांत शिरतांना, डाव्या अंगास, गाभारा व मंडप यांस दुभागणाऱ्या भिंतीपाशीं अर्धवट पुरलेला असा आढळला.

वर्णनः–हा लेख ज्या दगडावर कोरला आहे त्याची लांबी, रुंदी, जाडी, २′ ५″, १′ व १०″ असून त्याच्या तीन बाजूंवर लेख आहे व चौथ्या बाजूवर चित्रें काढलीं आहेत. लांबीपैकीं वरचा ५″ भाग चोहों-

* पा. स. ४।१८५६

बाजूंनीं निमुळता केला आहे. तेव्हां त्यावर लेख नाहीं हें उघड आहे. तीन बाजूंवर जरी लेख आहे तरी त्यावर लोकांनीं पाणी ओतल्यामुळें तो इतका खराब झाला आहे कीं, त्याची आरंभींची बाजूच फक्त कांहींशी लागत आहे. पण तीवरूनही बरीच महत्त्वाची माहिती उपलब्ध होत आहे.

अक्षरवटिका, लेखनपद्धति, भाषाः–अक्षरांचें स्वरूप शकाच्या अकराव्या शतकांतील नागरी अक्षरांशीं जुळणारें आहे. पृष्ठमात्रा वापरलेली दिसत नाहीं. न् बद्दल अनुस्वार (तस्मिं ओ. ७) वापरला आहे. कांहीं ठिकाणीं श बद्दल स वापरला आहे (विस्रुत ओ. ३, पुरस्रेष्ठ ओ. १२). भाषा संस्कृत आहे.

कालः–या लेखांत कालाचा उल्लेख अक्षरीं व आकड्यांनीं अशा दोन्ही तऱ्हांनीं आला आहे. दोन्ही उल्लेख दुसऱ्या बाजूवर आहेत (ओ. ७–११). उल्लेख असे–'शक नृपकालात् एकोनपंचाशदुत्तरे वत्सरसहस्रे अतीते १०४९॥ प्लवंग संवत्सरे फाल्गुने मासि शुक्लाष्टम्यां सुक्रवारे' दक्षिणी पद्धती-प्रमाणें गत श. १०४९॥ ला प्लवंग संवत्सर येतो व फाल्गुन शुद्ध अष्टमीला शुक्रवारही येतो. याशीं जुळती ख्रिस्ती तारीख इ. ११२८ फेब्रुवारी १० ही येते.

स्थलः–या लेखांत लत्तलौर असें एकच स्थलनाम आलें असून त्याविषयीं विवेचन पुढें आलें आहे.

चर्चा– या लेखांत कल्याणी येथील चालुक्यांच्या, आहवमल्ल, त्याचा मुलगा परमर्दि व त्याचा मुलगा भूलोकमल्ल अशा तीन पिढ्या दिल्या असून त्या इतर प्रामाणिक लेखांशीं जुळणाऱ्या अशाच आहेत. मात्र येथें एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, आहवमल्ल, परमर्दि व भूलोक-मल्ल हीं नांवें नसून, पहिला सोमेश्वर, त्याचा मुलगा सहावा विक्रमादित्य व त्याचा मुलगा तिसरा सोमेश्वर यांचीं बिरुदें आहेत[1]. तिसरा सोमेश्वर श. १०४८ मध्यें गादीवर बसला असें त्याच्या लेखांवरून म्हणता येतें[2]. यामुळें बिरुदें किंवा तारीख यांत वैशिष्ट्य नाहीं. पण हा लेख एका निराळ्याच कारणानें महत्त्वाचा ठरला असल्यानें त्याचें विवेचन येथें करणें जरूर आहे.

---

१ पहा बॉंबे गॅझिटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४२८, समोरील वंशावळ व पृ. ४३८, ४४६ व ४५५

२ कित्ता पृ. ४५५ व हिस्टॉरिकल इन्स्क्रिप्शन्स इन साउथ इंडिया पृ. ९९

दक्षिणेंतील अनेक कुलांतील राजपुरुषांनीं स्वतःच्या मूलस्थानाचें दर्शक असें एक बिरुद आपल्या नांवाबरोबर लाऊन घेतलेलें दिसतें. उदाहरणार्थ शिलाहार स्वतःस तगरपुरवराधीश्वर असें, कदंब वनवासी पुरवराधीश्वर असें किंवा कल्याणीचें कळचुर्य स्वतःस कालांजन-जर किंवा कालंजरपुराधीश्वर असें म्हणवीत. त्याचप्रमाणें मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील पहिला अमोघवर्ष यानें आणि सौंदत्तीच्या कांहीं रट्ट राजांनीं स्वतःस लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूरपुरवरेश्वर, लत्तलूरपुरवराधीश्वर इत्यादि प्रकारचें एक बिरुद लावून घेतलेलें आढळतें. या बिरुदाचा अर्थ लत्तलूर हें मूलस्थान असलेले अथवा लत्तलूरपुराहून निघून आलेले असा करावा लागतो हें सिताबल्दी येथील लेखावरून स्पष्ट होत आहे. त्यांत धाडिभडक अथवा धाडिभंडक या नांवाच्या मोठ्या राष्ट्रकूट वंशांतील राजाला व त्याचा अधिकारी वासुदेव याला लतलौरविनिर्ग्गत हें विशेषण लावलें आहे.

निरनिराळ्या लेखांतून या गांवाचे नांव निरनिराळ्या रूपांत आलें आहे. निळगुंद[१] व शिरूर[२] या लेखांत याचें लत्तलूर असें रूप सांपडतें तर मंटूर[३] व इट्टगी[४] लेख आाणि सौंदत्ती[५] येथील दोन लेख यांत लत्तलूर् असें रूप येतें. तेरदळ[६] लेखांत याचें लत्तनूर असें रूप आलेलें दिसतें तर कल्होळें[७] येथील लेख, भोज येथील ताम्रपत्र[८] व सौंदत्तीचा[९] आणखी एक लेख यांत याचें लत्तनूर् असें रूप येतें. आणि सिताबल्दी[१०] लेखांत तर याचें लतलौर असें रूप आलें आहे.

हें गांव कोठें असावें याविषयीं निरनिराळ्या विद्वानांनीं निरनिराळे तर्क केले आहेत. पैकीं दोनच येथें नमूद करण्यासारखे आहेत.[११] डॉ.फ्लीट यांनीं एक वेळ असें सुचविलें होतें कीं, मध्यप्रांतापैकीं बिलासपूर जिल्ह्यांतील रतनपूर म्हणजेच लत्तनूर असणें शक्य आहे. कारण ल व र यांची अदलाबदल

१ एपि. इंडि ६,१०३. २ इंडि. अँटि. १२,२१८. ३ इंडि.अँटि. १९,१६४. ४ एपि. इंडि. १३,४७ ५ जे. बी. बी.आर्. ए. एस्. १०,२१३ व १९६. ६ इंडि. अँटि. १४, १८. ७ जे. बी. बी. आर्. ए. एस् १८; २२१. ८ इंडि. अँटि. १९, २४७. ९ जे. बी. बी. आर्. ए. एस्. १०; २६८. १० एपि. इंडि. १,३०६. ११ बाकींच्या करितां पहा एपि.इंडि.७,२२५ टीप ४ आणि गोयकारांची गोयाभायली वसणूक पैलें खंड पृ. ३४, ३५.

होत असल्यानें लत्तनूरपूर या शब्दापासून रतनपूर व्युत्पादणें अवघड नाहीं.[1] पण पुढें त्यांनीं, वरील तर्क अप्रतिष्ठित वाटल्यामुळें सोडून दिला[2] आणि नवीनच तर्क पुढें मांडला. त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, मला लत्तलूर विषयीं जरी कायमचा निकाल लावतां येत नसला तरी लातूर या गांवीं शोध घेतला असतां त्याचा परिणाम लातूर म्हणजेच लत्तलूर अशी माहिती मिळण्यांत होईल असा मला पक्का भरंवसा आहे.[3] पण या सूचनेकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं व वरील प्रश्न तसाच राहिला.[4]

अलीकडे शणै गोयबाब श्री. वा. र. वर्दे वालावलकर यांनीं असें सुचविलें आहे कीं, पोर्तुगीज हिंदुस्थानांतील (गोवें प्रांतांतील) साष्टी महालांतील लोटली हें गांव म्हणजेच पूर्वीचें लत्तलूर होय. या विधानाला त्यांचा पुरावा म्हणजे लोटलीस प्राचीन अवशेष पुष्कळ सांपडतात येवढाच[5]. यापेक्षां जास्त पुरावा देण्याची त्यांनीं खटपट केली नाहीं येवढेंच नव्हे तर डॉ. फ्लीट यांचें हें नवीन मत खोडूनही काढलें नाहीं. उलट जें मत डॉ. फ्लीट यांनीं स्वतःच सोडून दिलें तें मात्र कसें चुकीचें आहे हें दाखविण्याचा प्रयत्न केला.[6] त्यावरून येवढें मात्र दिसतें कीं, श्री. वर्दे यांना डॉ. फ्लीट यांचें नवीन मत ठाऊक नसावें.

१ एपि. इंडि. ७,२२५

२ याचें सयुक्तिक कारण डॉ. फ्लीट यांनीं कोठेंही सांगितलें नसलें तरी त्यांनीं तसें कां केलं असावें हें श्री. वर्दे यांनीं स्पष्ट केलें आहे. तें असें–ज्या लेखांत रतनपुराचा उल्लेख आला आहे त्यांतच असें सांगितलें आहे कीं, जाजल्लदेवाचा आजा रत्नराज किंवा रत्नेश्वर यानें हें शहर वसविलें. या लेखाचा काल जाजल्लदेवाच्या कारकीर्दीतील म्हणजे इ. स. १११४ हा आहे. दर पिढीला २५ वर्षें हा काल दिला तरी जाजल्लदेवाचा आजा जो रत्नराज त्याचा काल इ. स. १०६४ च्या सुमाराचा येईल व या वेळीं रतनपुराची स्थापना झाली असें ठरेल. पण लत्तलूराचा पहिला उल्लेख तर यापूर्वीं सुमारें २०० वर्षें म्हणजे श. ७८८ (इ. स. ८६६) चा आढळतो. अर्थात् लत्तलूर रतनपुराच्या अगोदर दोनशें वर्षें तरी अस्तित्वांत होतें. तेव्हां या दोन शहरांचें ऐक्य दाखवितां येणार नाहीं (गोयकारांची गोयाभायली वसणूक पैलें खंड पृ. ३६) ३ एपि. इंडि. ७, २२६.

४ डॉ. बार्नेट यांनीं दोन ठिकाणीं डॉ. फ्लीट यांचा तर्कच प्रमाण मानला आहे (पहा एपि. इंडि. १३, ४१ व ॲंटिक्विटीज ऑफ इंडिया पृ.२६२).

५ गोयकारांची गोयाभायली वसणूक पैलें खंड पृ.३६,३७. ६ किस्ता पृ.३६

नंतर मी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या ४ थ्या खंडांत (पृ.२६५) या संबंधीं एक लेख लिहिला. त्यांत श्री. वर्दे यांचें वरील मत कसें सुप्रतिष्ठित नाहीं हें दाखवून माझ्या मतें योग्य असलेली लत्तनूर या शब्दाची व्युत्पत्ति दिली व तीवरून तें गांव राष्ट्रकूटांचें मूळ गांव कसें होऊं शकतें हें सांगितलें आहे. व्युत्पत्तीबाबत माझें तेथील विवेचन अगदींच सूत्ररूप असल्यानें तेंच म्हणणें थोडेसें वाढवून पुन्हा येथें मांडतों. लत्तनूर याचें मूळ रूप रट्टनूरु किंवा रट्टरूरु असें असावें. या दोन शब्दांचे विग्रह रट्टन + ऊरु आणि रट्टर + ऊरु असे आहेत. हे दोन्ही शब्द कानडी असून त्यांचा अर्थ अनुक्रमें रट्टाचें गांव आणि रट्टांचें गांव असा होईल. दोहोंत फरक येवढाच कीं, रट्टन हें रट्ट शब्दाचें षष्ठीचें एकवचन आहे, तर रट्टर हें त्याच शब्दाचें, त्याच विभक्तींतील अनेकवचन आहे. रट्टनूरु शब्दापासून लत्तनूरु व रट्टरूरु शब्दापासून लत्तलूरु असे अपभ्रंश होऊन नंतर लत्तनूर व लत्तलूर हीं साधीं रूपें झालीं असें म्हणावयास हरकत नाहीं. किंवा लत्तनूर शब्दापासूनच न चा ल होऊन लत्तलूर हें रूप बनलें अथवा लत्तलूर यामध्येंच ल चा न होऊन लत्तनूर हें रूप झालें असाही युक्तिवाद करतां येईल व तोही अपभ्रंशाच्या नियमांना धरूनच आहे. तात्पर्य माझ्या मतें लत्तनूर किंवा लत्तलूर हें ग्रामनाम कानडी आहे. आणि तें तसें धरलें म्हणजे व्युत्पत्तीवरूनही लत्तनूर किंवा लत्तलूर हें राष्ट्रकूटांचें किंवा रट्टांचें मूळ गांव असें ठरतें. लत्तनूर पासून लतलौर व लातूर हीं रूपें कशीं तयार होतात हें डॉ. फ्लीट यांनीं इतरत्र दाखविलें असल्यानें त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं.[1]

अशा तऱ्हेनें भाषाशास्त्राच्या दृष्टीनें जरी जुनें लत्तनूर व नवें लातूर हीं एक ठरली तरी प्रत्यक्ष त्या गांवीं जाऊन वरील तर्कास अनुकूल अथवा प्रतिकूल पुरावा मिळतो कीं काय हें पाहणें आवश्यक असल्यानें मी तेथें गेलों व सांगण्यास आनंद वाटतो कीं, मला डॉ. फ्लीट यांच्या विधानास अनुकूल असा पुरावा मिळाला. तो असा—पुढें दिलेल्या लेखांत 'अस्ति दिव्यं पुरश्रेष्ठं लत्तलौराभिधानकं। महाजनैः पंचशतैर्वेदविद्भिर्निषेवितं॥ देवोस्ति प्रथितस्तत्र नाम्ना पापविनाशनः। यं दृष्ट्वा देवदेवेशं सिध्यंति मनुजा भुवि॥' असे दोन श्लोक आहेत. यांत लत्तलौर हें एका गांवाचें जुनें नांव आलें आहे व तेथें पापविनाशन नांवाचा देव होता

१ एपि. इंडि. ७,२२७

म्हणून सांगितलें आहे. सध्यां ज्या देवळांत शिलालेखाचा दगड आहे त्यास भूतनाथ म्हणतात. पण या देवळाजवळ जी मोठी विहीर आहे तिचें नांव पापनाशी असें असून हा शिलालेख पूर्वी या विहिरींत होता व विहीरीची अलीकडे जेव्हां दुरुस्ती केली तेव्हां तो या देवळांत आणून बसविला असें तेथील लोक सांगतात. तेव्हां लत्तलौर हें नांव लातूर करितांच आलें आहे हें उघड होतें. आणि अशा तऱ्हेनें राष्ट्रकूटांचें मूळचें गांव कोठें व कोणतें होतें ही गोष्ट निश्चित ठरते.

वाचन[१]

(१) ....
(२) ....
(३) .... [२]स्वस्त्यस्ति विस्तृतगुणै
(४) कनिधिश्चलुक्यवंशो यशो(शः)कुसुमवासि
(५) तदि–काय: ॥ शंभोरवाप्तजननो जनरं
(६) जनश्रीभूकामिनीविपुलकुंतलमंड
(७) लाभ(भः)॥१[॥*] [३]तस्मिं(स्मिन्)आहवमल्लदेवनृपति
(८) र्जातो पृथिव्या(व्याः) पतिः ॥ तत्सूनुः परमर्दि
(९) देव इति या(यः) ख्यातो महेंद्रप्रभः [।*] तस्या
(१०) त्मप्रभवे जयांकिततनौ भूलोकमल्ले
(११) नृपे [।*] राज्यं शासति रामवत्सुविपुलं
(१२) धर्म्या–भू सुप्रजाः ॥[२॥*] [४]अस्ति दिव्य पुरस्रे
(१३) ष्ठं लत्तलौराभिधानकं । महाजनैः पं
(१४) चशतैर्व्वेदविद्भिर्न्निषेवितं ॥ [३॥*] [४]देवो[ऽ*]स्ति

---

१ प्रत्यक्ष पाहून व ठशांचे सहाय्यानें केलें आहे. पहिल्या दोन ओळी व तिसऱ्या ओळीच्या आरंभीचा कांहीं भाग मुळींच लागत नाहीं. हा सर्व मजकूर लेखशिलेच्या एका बाजूवरील आहे. मितीचा मजकूर वर काल या सदरांत दिला आहे. त्याशिवाय इतर कांहीं शब्द लागतात. पण त्यांचें निश्चित स्वरूप समजत नसल्यानें ते येथें दिले नाहींत.

२ वसंततिलका वृत्त ३ शार्दूलविक्रीडित वृत्त. ४ अनुष्टुभ्वृत्त

(१५) प्रथितस्तत्र नाम्ना पापविनाशनः । यं
(१६) दृष्ट्वा देवदेवेशं सिध्यंति मनुजा भुवि ॥ [४॥*]

२

उपलब्धि—हा लेख लातूर गांवाच्या पश्चिमेस असलेल्या सिद्धेश्वराच्या देवळांत मंडपांतील पिंपळाच्या बुंध्यापाशीं व त्यांत घट्ट बसलेला असा आहे. यावर घाणीचा जाड थर बसला असल्यानें अक्षरें खोल खोदलीं असूनही अस्पष्ट झालेलीं आहेत.

वर्णन—लेखशिलेची लांबी रुंदी २′, ७″ व १′, १″ ते १′, ४″ आहे. आरंभीं योनीसह लिंग व वाममुख नंदी असून त्याखालीं १० ओळी लेख आहे. लेखाखालीं पुन्हां मोकळी जागा आहे.

अक्षरवटिका, लेखनपद्धति, भाषा—लेखांतील अक्षरांचें स्वरूप सामान्यतः शकाच्या १२।१३ व्या शतकांतील नागरी आहे. सर्वत्र पृष्ठमात्रा आहे. श बद्दल स (स्रीसिद्धेस्वर ओ. १) व ब बद्दल व (व्राह्मण ओ. ४) वापरला आहे. भाषा संस्कृत आहे.

स्थल व काल—कालाचा उल्लेख नाहीं. स्थलाविषयीं शंका आहे.

सार—सिद्धेश्वर देवालाच म्हणून ३६ निवर्तनें जमीन दिलेली आहे. ब्राह्मण व तपस्वी यांचाही तीवर अधिकार नाहीं असें सांगितलें आहे.

वाचन[1]

(१) स्री सिद्धेस्वरदेवस्य वसते
(२) हा र ने य अकरधारो[2] अ[2]-
(३) री एं ग्रोमें हलं निवर्त्तनानि ३६
(४) प्रतिपालनयिम् । व्राह्म
(५) णतपोधनानामधिका
(६) रो [3]नास्ति । [3]स्वदत्तां परदत्तां
(७) वा यो हरेत्त(त) वसुंधरीं(रां) षष्ठी[ष्टिं]
(८) वर्षसहस्राणि विष्ठां(ष्ठा)यां
(९) जाया(य)ते क्रि(कृ)मि(मिः) । मंगल मह
(१०) श्री ऽ ॥

१ ठशावरून केलें आहे. २ या अक्षराविषयीं शंका आहे.
३ अनुष्टुभ् वृत्त

Summary of Articles.

(G. H. KHARE)

9 *

Ś. 1086.—Sāvargaon (Tuljapur, Usmānābād, Nizam's dominions) Marāthī inscription of Kadamba Māraḍadēva (p. 1).

Date—सकु १०८६ तारण संवत्सरे आश्विन सुध १ गुरौ (A. D. 1164 Sept. 19).

It first mentions the tributary prince Kaḍamba Māraḍadēva Rāṇaka and then his two officers Mādhava Nāyaka and Lāhimpa Nāyaka who granted 2 *damas* per month for (the upkeep of) the temple of Ambādēvī.

10

Two Marāṭhī inscriptions from Nēvāsā (Ahmadnagar) (p. 3 and 5).

1

S'. 1161.—In a private house near the Mōhinīrāja temple in Nēwāsā Khurd.

Date—शकु ११६१ विकारी संवत्सरे (A. D. 1239)

The hereditary worshiper of Kaṇairēśvara was sīlū Paṇḍita who belonged to the Mādhyandina branch (of white Yajurvēda) and Śaunaka *gotra.* 18 *nivartanas* of land within the limits of Pāṁpūvīhari (Pimprī) were granted to the said God.

2

Near the Nārada temple in Nēwāsā Budruk. No date.

Here it is given that to build stone monasteries and to give water to the poor is the store of merit.

---

* Continued from the number of the last article in the previous volume.

11

S'. 1207.—Pūr (Sāswad, Poona) Marāṭhī inscription of (Yādava) Rāmacandra (p. 5)

Date—सकू १२०७ वर्षे प (पा) र्थिव सवछरे आस्विन (ना) दौ

Here mention is made of (Yādava) Rāmacandra, his subordinate Hēmādi Paṇḍita, the keeper of accounts, and some officers, whose names are not quite legible

12

Two more inscriptions from Veḷāpūr (Sholapur) (p. 7 and p. 8).

1

Notice of a much damaged Jaina inscription in the village.

2

S'. 1222.—On a slab to the south of the village.

Date—शकु १२२२ सर्वरी सं{व}स(त्स)रे ज्येष्ठादौ.

Here are mentioned the King (Yādava) Rāmacandra, his subordinate Jō dēva, his subordinate Brahmadéva Rānē and his brother Baidēva Rāṇa who built a monastery and some rooms near Vaṭēśvara at Velāpura in Māṇa country. The writer was Māidēva, the son of Dāmōdara Pāṇḍita.

13

S'. 1055.—Asōgē plates of Kadamba Jayakēsin (III of Goa[1]) (p. 9).

Revised text, with some remarks on the description, characters and orthography of the plates, is given here after examining the original[1].

---

1. For the summary of these plates, the reader is requested to refer to the Sources of the Mediaeval History of the Dekkan vol. I p. 92.

14

S. 732 (731).—Bahulāvāda (East Khandesh) plates of Rāstrakūta Gōvinda (III) (p. 13).

Date—(ll. 40–43) शक नृपकालातीतसंवत्सरशतेषु सप्तसु द्वातृं(त्रिं)शदधिकेषु सर्व्वधारी नाम्नि संवत्सरे अ(आ)षाढ बहुल अमावास्यां सूर्यग्रहणपर्वणि (A. D. 809 July 16, when there was a solar eclipse visible in India).

As regards the main part, these plates have all the verses found in the Nesari plates[1] excepting nos. 7, 12, 14, 16, 19, 21–25 of the latter.

Gōvinda III, while at Mayūrakhandi granted the village Bahulāvāra to Mahi(hi)dharabhatta who belonged to the Vatsa *gotra* and was residing at Nimva(ba)sthali.

Arunāditya, the son of Vatsarāja wrote the grant and Vādaiyya was the messenger.

15

S. 520.—Pōrgaon (Nizam's dominions) spurious plates of Cālukya Vikramāditya (II) (p. 23).

Date—(ll. 33–36) विंसत्योत्तरपंचसतीशु सकवर्षप्रतितिशु...आनंद संवत्सरे... फाल्गुणमासमावास्यां व्यतीपातविष्टयान्तिवारे सूर्य्यग्रहणे (No solar eclipse was visible in India at the time.)

In the Cālukya family was born Pulakēśin; his son Kīrtivarman; his son Vikramāditya; his son Vinayāditya, who first took the kingdom of the Pallavas and then Kāñcī and subdued the Cēras, Cōlas and Pāndyas; his son Vikramāditya who subdued the Kings of Kaimkala, Mālava and Kalinga.

This Vikramāditya granted to Gōvardhana? of the Kāśyapa *gotra* the village Nagarśaigē (Nāgarasōgē), which had been already given to this and other brāhmans.

Śrī Rāmapunya-Vallabha, the grand minister of peace and war, wrote the grant.

1. Sources of the Mediaeval History of the Dekkan vol. I p. 18.

16

A Note on the Daulatābād plates[1] of Cālukya Jayasiṁha II (p. 31).

In this note both the village which was granted and the villages which surrounded it, are identified.

17

S'. 888.—Parbhaṇī (Nizam's dominions) plates of Cālukya Arikēsarin (III) (p. 33).

Date—(ll. 38–39) शकाब्देष्वष्टाशीत्यधिकेष्वष्टशतेषु गतेषु [प्रव] र्तमान-क्षयसंवत्सरवैशाखमो (पौ)र्णमास्या (स्यां) बुधवारे (A. D. 966 April 8)

In the Cālukya family which belonged to the solar race, was born Yuddhamalla, who (1) ruled on a quarter and one lack country, (2) caused to bathe his elephants in oil at Pōdana and (3) protected Vengi with the three Kalingas; his son Arikēsarin (I); His sons Narasiṁha or Narasingha (I) and Bhadradēva; Narasiṁha's son Baddiga, who confined Bhima, who on his part pierced Sangama, in a seafight; his son Yuddhamalla (II); his son Narasingha (II); his son Arikēsarin (II), who married Lōkāmbikā belonging to the Rāṣṭrakūṭa family; their son Bhadradēva or Badyaga, who caused the construction of Śubhadhāma-Jinālaya; his son Arikēsarin (III), whose capital was Leṁbuḷapāṭaka and who was the donor of the present grant.

To the Gauḍa-Sangha belonged Yaśōdēva; his disciple Nēmidēva; his disciple the poet Sōmadēva, the author of Yaśōdharacarita, Syādvādōpaniṣat and other witty verses.

Arikēsarin, the vassal of Rāṣṭrakūṭa Kriṣṇa Rāja (III) granted to the above-mentioned poet Sōmadēva, the village Vanikaṭupulu for the sake of partial repairs, new plastering, Baḷi and other offerings to the shrine Śubhadhāma-Jinālaya situate in the capital Lembuḷapāṭaka.

The grant was composed by the poet Peddaṇa and engraved by Rēva of the Śubhadhāma-Jinālaya.

1. For the originals the reader may refer to the Hyderabad Archaeological Series No 3, of 1917.

18

Ś. (1121).—Two Kanarese inscriptions from Puḷuñja (Pandharpur, Sholapur) (p. 56).

1

Date—सीद्धार्थि संवत्सरद माघ सु ११ सोमवार व्यतिपातदंदु (A. D. 1200 Jan. 28)

After extoling the God Siddha-Sōmadēva and his devotee Ammidēva, the inscription goes on to record several grants to the God made by the Mahājanas of Puḷuñja, Yādava Siṁghana, the Sāhanis Saṅkēya and Dēvēya, Dāyiva-Nāyaka, Sōidēva, Gaṅgidēva, Saṁkamadēva, Bijja Rāṇē, Khēyidēva and Jōidēva. Then it introduces a tributary prince Vikramāditya who built the temple of Vīra Nāgarasa and records various grants made by Siriyādēvī, the wife of Vikramāditya, the prime minister Siṁhēya Sāhaṇi, the favourite royal hunter Tipurēya-Nāyaka, Rāyaseṭṭi, Jōiseṭṭi, Isayya-Nāyaka, the private hunter of the prime minister, Vāmana-Nāyaka Lāhidēva-Nāyaka and Taṁmayya-Nāyaka.

Cāmuṇḍarasa, the accountant of Dāmōdara the general, wrote the record.

2

Date—यादव...सि [ह] ... षंद २७ नेय व्यय सं [व]. ... (The date shows that Singhana ascended the throne in Ś. 1122.)

19

Ś. (1095).—A Kanarese inscription from Bhivghāṭ (Satara) (p. 71).

Notice of a damaged inscription apparently written, partly during the reign of Kaḷacurya Sōyidēva and partly during the reign of his brother Saṅkamadēva, in which occurs the praise of the God Bhīmadēva or Bhīmanātha situate in Bhaṇḍivaṇa and then records some grants made to the God within the limits of two villages Karajaya-Khēḍa and Nāravigāvē belonging to the Pāḍē country.

20

4 inscriptions from Ter (Usmānābād, Nizam's dominions) (p. 74).

1

On the pedestal in the temple of Trivikrama; undated: mentions that the pedestal was the work of Kālabhairava who had the biruda, the son of Vārimallōja, and was the servant of a tributary prince Jōgamarasa.

2

S. 1086.—On a slab resting against the plinth of Māruti temple to the east of the village.

Date—शकु १०८६ ... सुभानु संवत्सरांतर्गत वैसाख शुद्ध त्रयोदश्यां गुरौ (A. D. 1163 April 18)

This inscription though much damaged is in Marāthī and seems to record some grants of land in *nivartana* measure.

3

S'. 1313.—On a pedestal in the Jaina Caitya outside the village.

Date—शके १३१३ [प्रजापति] संवत्छरे फाल्गुन वदि ११ बुधवारे (A. D. 1392 March 20).

The pedastal was dedicated by......Vidyānanda, the disciple of Pūjyapāda who had been there at the time of the repairs of the Vardhamāna Caityālaya belonging to Mūla-Sangha.

4

S'. 1520.—Notice of a damaged inscription in the same Caitya.

Date—शके १५२० विलंबि संवत्सरे भाद्रपदे मासि शुक्लपक्षे पंचम्यां शनौ (A. D. 1598 August 26).

The inscription seems to refer to the Caityās of Vardhamāna and Parśvanātha and to the village Ter, in the form Tair or Ter.

21

Two inscriptions from Lātūr (Usmānābād Nizam's dominions) (p. 84).

1

S'. 1049.—In the temple of Bhūtanātha.

Date—शक नृपकालात एकोनपंचाशादुत्तरे वत्सरसहस्रे अतीते १०४९ ॥ प्लवंग संवत्सरे फाल्गुन मासि शुक्लाष्टम्या सुक्रवारे (A. D. 1128 February 10)

In the family of Cālukyas was born Āhavamalla (Sōmēśvara I), his son Paramardi (Vikramāditya VI), his son Bhūlōkamalla (Sōmēśvara III). Then the record goes on to extol the God Pāpavināśana situated at Lattalaura, the modern Lātūr. (The suggestion of the Late Dr. Fleet that the ancient Lattalūra or Lattanūra is modern Lātūr seems to be significant and the inscription decides finally the question of the identification of Lattalūra or Lattanūra, which is mentioned in several inscriptions as a place from which Rāṣṭrakūṭas and Raṭṭas seem to have hailed. The editor suggests that the word Lattanūra and Lattalūra can be derived from the Kanarese words Raṭṭanūru and Raṭṭarūru which mean the village of Raṭṭa and Raṭṭas. This derivation, if accepted, shows that even from the point of etymology Lātūr seems to be the original place of the Rastrakūtas and the Raṭṭas.)

2

At the temple of Siddhēśvara; undated; but mentions that 36 *nivartanas* of land were granted for the upkeep of the temple.

सूची.

क = कदंब, कु = कुल, गा = गांव गो = गोत्र, चा = चालुक्य, ती = तीर्थंकर, दे = देव, न = नदी, ना = नाणें, प = पर्वत, मम = महामंडळेश्वर, या = यादव, रा = राजा, रारा = राष्ट्रकूट राजा, लो = लोक, वि = विषय

क = कदंब, कु = कुल, गा = गांव, गा = गोत्र, चा = चालुक्य, ती = तीर्थंकर, दे = देव, न = नदी, ना = नाणें, प = पर्वत, ममं = महामंडळेश्वर, या = यादव रा = राजा, रारा = राष्ट्रकूट राजा, लो = लोक, वि = विषय

क = कदंब, कु = कुल, गा = गांव, गो = गोत्र, चा = चालुक्य, ती = तीर्थंकर दे = देव, न = नदी, ना = नाणें, प = पर्वत, मम = महामंडलेश्वर, या = यादव, रा = राजा, रारा = राष्ट्रकूट राजा, लो = लोक, वि = विषय

क = कदंब, कु = कुल, गा = गांव, गो = गोत्र, चा = चालुक्य, ती = तीर्थंकर, दे = देव, न = नदी, ना = मार्ग, प = पर्वत, मर्म = महामण्डलेश्वर, या = यादव, रा = राजा, रारा = राष्ट्रकूट राजा, लो = लोक, वि = विषय

क = कदंब, कु = कुल, गा = गांव, गो = गोत्र, चा = चालुक्य, ती = तीर्थंकर, दे = देव, न = नदी, ना = नाणें, प = पर्वत, मम = महामंडळेश्वर, या = यादव, रा = राजा, रारा = राष्ट्रकूट राजा, लो = लोक, वि = विषय

श्री

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ४०

ऐतिहासिक फारसी साहित्य

प्रथम खंड

संपादक

गणेश हरी खरे

श्रीक्षेत्र आळंदी, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ व २, मंडळांतील नाणीं, इत्यादि पुस्तकांचे लेखक व शिवचरित्रसाहित्य ३ रा खंड याचे एक संपादक.

प्रकाशक

प्रो. दत्तो वामन पोतदार,

श्री. सर. गं. ना. मुजुमदार,

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

मुद्रक

अनंत विनायक पटवर्धन

आर्यभूषण प्रेस, ९३६।३ भांबुर्डा पेठ, पुणें.

शा. १८५६] किंमत १॥ रुपया. [इ. स. १९३४

प्रस्तावना

ऐतिहासिक फारसी साहित्याचा पहिला खंड आज पुरा होत आहे. हा खंड भागशः मंडळाच्या त्रैमासिकांतून प्रसिद्ध होत होता. यांत एकंदर एकोणीस प्रकरणांत ८१ लेख प्रसिद्ध केले आहेत. पैकीं १४ शिलालेख असून ६७ फर्मानें आणि खुर्द-खतें किंवा दुय्यम कागद आहेत. शिलालेख मी स्वतःच निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन ठशाचे रूपानें आणले असून कागद मिळण्यास श्री. सर. आबासो मुजुमदार, श्री. वि. वा. जोशी, श्री. स. ग. जोशी, श्री. द. वि. आपटे आणि मी स्वतः या सर्वांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत.

अशा तऱ्हेनें लेख मिळवून आणल्यानंतर ते वाचणें, त्यांच्या यथाशास्त्र नकला करणें, त्यांचे सारांश काढणें किंवा भाषांतरें करणें, त्यांवर टीपा देणें व मुद्रण प्रत तयार करणें हें सर्व काम मी एकट्यानेंच केलें असलें तरी लेख वाचण्याच्या कामीं मंडळाचे मुनशी व प्रो. वर्मा (फर्ग्यूसन कॉलेज) यांचें साहाय्य झालें आहे.

या पुस्तकांत आलेले फारसी लेख नागरी लिपींत छापले आहेत हें कोणतें ही पान पाहिलें असतां सहज ध्यानांत येईल. तसें करतांना एक विशिष्ट पद्धत अमलांत आणली आहे. तिचा खुलासा पुढें दिला आहे. या पद्धतीमुळें एक मोठा फायदा झाला आहे. महाराष्ट्रांतील ऐतिहासिक संशोधन करणाऱ्यांमध्येंही फारसी जाणणारे व वाचणारे क्वचितच सांपडतील. संशोधकांस मूळ लेखांत असलेल्या शब्दांचें महत्त्व अतिशय असतें. पण हे लेख मी फारसी लिपींतच छापतों तर संशोधकांसही त्यांचा उपयोग झाला नसता. तेव्हां हे लेख मी लिप्यंतर करून छापले आहेत.

मात्र हें नागरी लिप्यंतर वाचतांना एक सूचना देऊन ठेवावीशी वाटते. मराठीमध्यें अकारांत शब्दांचें शेवटचें अक्षर जणूं व्यंजनाप्रमाणें उच्चारतात त्याचप्रमाणें फारसींत करावयाचें. येवढेंच नव्हे तर शब्द जर दोन किंवा अधिक अवयवांचा असेल तर प्रत्येक अवयवाचें शेवटचें अक्षर बहुधा व्यंजन असल्यामुळें त्याचा उच्चारही व्यंजनाप्रमाणें करावा.

या खंडाचें नांव जरी ऐतिहासिक फारसी साहित्य असें आहे व त्यामुळें यांत पेशवेकालीन लेख घालणें जरी अयुक्त झालें नसतें तरी यांत जे लेख आले आहेत ते सर्व शिवकालीन व शिवपूर्वकालीन आहेत. हे सर्व लेख जरी महाराष्ट्रांतच मिळालेले आहेत तरी ते कोणत्याही एका विशिष्ट रियासतीसंबंधीं नाहींत. निजामशाही, कुतुबशाही, आदिलशाही, मोगलाई आणि फारूकशाही या रियासतींमधील लेखांचा

या पुस्तकांत मुख्यतः समावेश झाला आहे. या लेखांचें ऐतिहासिक महत्त्व काय आहे हें लेखांस जोडलेल्या टीपा किंवा प्रस्तावना यांवरून अभ्यासूंस कळून येण्यासारखें असलें तरी अस्सल कागदांचें सामान्यतः महत्त्व व त्या दृष्टीनें या खंडांतील कागदांचें वैशिष्ट्य येथें सांगणें अवश्य आहे म्हणून तसें करतों.

इतिहासाच्या साधनांत उत्तरकालीन साधनांपेक्षां समकालीन साधनांची किंमत जास्त समजली जाते व समकालीन साधनांतही रचित ग्रंथापेक्षां अस्सल पत्रव्यवहार, राजकीय हुकूम इत्यादींना जास्त महत्त्व आहे. रचित ग्रंथांमध्यें, ते ग्रंथ हेतुपूर्वक रचले जात असल्यानें वस्तुस्थिति लपविणें, तिचा विपर्यास करणें, माहिती अपुरी असणें, इत्यादि दोष कळत वा न कळत शिरत असतात व यामुळें समकालीन ग्रंथही खऱ्या माहितीच्या बाबतींत प्रमाणभूत ठरूं शकत नाहींत. या उलट समकालीन कागदपत्र हे इतिहास लिहिण्याच्या उद्देशानें लिहिलेले नसतात. त्यांचा मुख्य उद्देश इच्छिलेलें काम होऊन यावें हा असतो. यामुळें त्यांतील भाषा असंदिग्ध, निश्चित, जोरदार अशी असते. अर्थात् तीवरून लेखकाचा हेतु, निर्दिष्ट काम वगैरे समजण्यास अडचण पडत नाहीं. म्हणून आजकाल सर्व देशांत अशा समकालीन कागदपत्रांना इतिहासाचें साधन म्हणून फार महत्त्व दिलें जातें.

या दृष्टीनें हिंदुस्थानाच्या इतिहासाकडे पाहिलें तर त्याचे दोन भाग पडतील. एक मुसलमानपूर्वकालीन व दुसरा अर्वाचीन. पैकीं मुसलमानपूर्वकालीन इतिहास समजण्याचें मुख्य साधन समकालीन शिलालेख ताम्रपट व नाणीं हें होय. समकालीन वाङ्मय त्यावेळच्या इतिहासास उपयोगी पडत असलें तरी त्यावेळच्या इतिहासाचा अभ्यास करणारे विद्वान अशा वाङ्मयाची वास्तविक किंमत ओळखत असल्यानें त्यालाच साधनांमध्यें मुख्य स्थान देण्याची चुकी त्यांचे हातून होत नाहीं.

अर्वाचीन कालाच्या इतिहासाची गोष्ट तशी नाहीं. त्या कालाविषयीं माहिती देणारे समकालीन व उत्तरकालीन रचित ग्रंथ मिळतात. या ग्रंथांतून अतिशय विस्तृत व तपशीलवार माहिती दिलेली असते. त्यामुळें पुष्कळ विद्वानांचा देखील असा भ्रम झालेला आहे कीं, या ग्रंथांवरून जी माहिती मिळते ती प्रमाणभूत मानावयास हरकत नाहीं. पण ज्यांनी ज्यांनीं हे ग्रंथ सूक्ष्मपणें वाचले आहेत त्यास कळून चुकलें आहे कीं, रचित ग्रंथ पश्चात्कालीन असोत वा समकालीन असोत त्यांच्या माहितीवर विश्वास ठेवण्याची सोय नाहीं. त्यांनीं अनेक प्रकारच्या चुका अजाणतेपणें किंवा जाणून बुजून करून ठेवल्या आहेत. फेरिस्ताचेंच उदाहरण घ्याना. यानें हिंदुस्थानचा भला मोठा इतिहास हि. १०१२ च्या सुमारास लिहून संपविला. हि. ९३२ मध्यें बहामनी कुलाची इतिश्री झाली. पण सुमारें ७५ वर्षांनंतर बहामनी कुलाचा, दक्षिणेंत कित्येक वर्षें राजाश्रयानें राहून, इतिहास लिहि-

णाऱ्या फेरिस्त्याला त्या कुलांतील शेवटचा तख्तनशीन बादशहा जो कलीमउल्ला त्याच्या तख्तनशीन बापाचें नांव ठाऊक असूं नये हें आश्चर्य नव्हे काय ! फेरिस्त्यानें कलीमउल्लाच्या भावालाच त्याचा बाप बनविला आहे. जवळ जवळ समकालीन इतिहासांत जर अशा ढोबळ चुक्या तर पूर्वकालीन इतिहासांत किती चुका असतील बरें !

समकालीन व दरबारी इतिहासकार प्रामाणिकपणें इतिहास लिहीत असें म्हणावें तर तेंही दिसत नाहीं. आलमगीरनामा औरंगजेबाच्या पहिल्या दहा वर्षांची हकीकत देतो. लेखक दरबारचा अखबारनवीस होता. त्यानें शायस्तेखान पुण्याकडे आला असतां त्याच्या कांहीं हालचालींची रोजची हकीकत दिलेली आहे. अशा लेखकानें शिवाजीनें शायस्तेखानावर छापा घातल्याची हकीकत मुळींच सांगूं नये हें आश्चर्य नव्हे काय ?

शिवाय मुसलमानी इतिहासकारांनीं मुसलमानी राज्यांत हिंदूंनीं केलेल्या कामगिरीचे उल्लेख त्यांच्या नांवानें करण्याचें जाणून बुजून किंवा अजाणतेपणीं टाळल्याचें दिसतें. उदाहरणार्थ मुधोळचे घोरपडे घराणें घ्या. या घराण्यांतील लोकांनीं बहामनी व आदिलशाही रियासतींत अतिशय महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे, हें त्यांस मिळालेल्या फर्मानांवरूनच सिद्ध होतें. असें असतां फेरिस्त्यानें एकापेक्षां अधिक ठिकाणीं त्यांचा उल्लेख करूं नये हें कृत्रिम दिसत नाहीं काय !

जी गोष्ट मुसलमानी इतिहासकार व दरबारी लेखक यांची तीच मराठी बखरकारांची. मुसलमानी इतिहासकारांनीं सुलतानांना नाजिरवाण्या किंवा स्वतःस नापसंत अशा गोष्टी गाळल्या तर बखरकारांनीं अभिमानास्पद अशा हकीकतीही गाळलेल्या दिसून येतात. मग त्या जाणून बुजून असोत किंवा अजाणता असोत. शिवाजीनें सुरतेवर दोन वेळां स्वाऱ्या केल्या हें कांहीं बखरकारांना ठाऊक नाहीं. श. १५७१ सालीं विजापूरच्या सुलतानानें शहाजीस कैद केलें असतां शिवाजीनें शिरवळच्या विजापुरी अंमलदारांशीं लढाई केली ही गोष्ट तरी बखरकारांना कोठें माहीत होती ! येवढेंच काय पण शिवाजीचा जन्म केव्हां झाला हें तरी बखरकारांना नीट कोठें ज्ञात होतें !

तात्पर्य, मुसलमानी इतिहासकार अथवा दरबारी लेखक काय किंवा मराठी बखरकार काय, दोघांच्याही हातून हकीकती लिहितांना अक्षम्य चुका झाल्या आहेत. म्हणून खरा इतिहास समजण्यास समकालीन कागदपत्रांची अतिशय जरूरी आहे.

असें असलें तरी मुसलमानपूर्वकालीन इतिहासाचे अभ्यासक समकालीन साधनें जमविण्याचा व प्रकाशित करण्याचा जसा प्रयत्न करतात तसा अर्वाचीन कालाच्या इतिहासाचे अभ्यासक करतात कीं नाहीं याविषयीं शंका आहे.

महाराष्ट्रांत साधनें प्रकाशित करण्याविषयीं चाललेला सरकारी अथवा बिन-सरकारी प्रयत्न आणि एपिग्राफिया इंडो-मॉस्लेमिका या सरकारी नियतकालिका-तर्फे चाललेला प्रयत्न हे जर सोडून दिले तर हिंदुस्तानच्या इतर भागांत अर्वाचीन इतिहासाला उपयुक्त अशीं समकालीन साधनें प्रसिद्ध करण्याची कोणी जोराची खटपट करीत असल्याचें दिसत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, सोळाव्या शतकापूर्वीचे कागदपत्र हातांच्या बोटांवर मोजण्याइतके थोडे प्रसिद्ध झाले आहेत. कोणी म्हणतील कीं, त्यावेळचे कागदपत्र सांपडत नसले तर कसे प्रसिद्ध होणार ! पण हें म्हणणें खरें नसल्याचें मुधोळच्या घारपडे घराण्यांतील कागद-पत्रांवरून किंवा रॉयल एशियाटिक सोसायटी व तिच्या शाखा यांच्या नियतकालि-कांत अथवा इतरत्र प्रसिद्ध झालेल्या थोड्या बहुत कागदपत्रांवरून म्हणतां येतें.

असो. कोणत्याही कारणानें कां होईना इतर प्रांतांतून, अर्वाचीन इतिहासाला उपयुक्त अशीं अव्वल दर्जाचीं साधनें प्रसिद्ध होत नसलीं तरी महाराष्ट्रांत ती स्थिति नाहीं. येथें आज कित्येक वर्षें मूळ अव्वल दर्जाचीं समकालीन साधनें प्रसिद्ध करण्याचा उपक्रम चालू आहे. आणि त्यायोगें इतिहासांत विलक्षण बदल होत आहे. तो इतका कीं, श्री. रा. सा. गो. स. सरदेसाई यांनीं मराठी रिया-सतीचा इतिहास शेवटास नेला नाहीं तोंच त्याची सुधारलेली आवृत्ती काढणें जरूर झालें आहे.

पण महाराष्ट्रांतील संशोधकांनीं मराठी साधनें प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत जितकी तळमळ दाखविली तितकी फारसी साधनांच्या बाबतींत दाखविली नाहीं. वास्त-विक अर्वाचीन इतिहासांतील मुसलमानी अमदानींत फारसीस मोठें महत्त्व असल्यानें अनेक तऱ्हेचा महत्त्वाचा पत्रव्यवहार फारसीमधून झाला असला पाहिजे. म्हणून फारसी-कडे संशोधकांनीं अतिशय लक्ष द्यावयास पाहिजे होतें. पण तसें तें दिलें गेलें नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, जीं साधनें कांहीं दिवसांपूर्वी मिळणें सहज शक्य होतें तींच आतां दुर्मिळ झालीं आहेत येवढेंच नव्हे तर त्यांपैकीं कित्येक नाहींशींही झालीं असतील. या दृष्टीनें मंडळानें पूर्वी प्रसिद्ध केलेल्या फारसी पत्रव्यवहार या पुस्तकाचें किंवा प्रस्तुत खंडाचें महत्त्व अतिशय आहे.

मात्र ही केवळ सुरवात आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. अशा प्रकारचीं हजारों फर्मानें व शेकडों शिलालेख जेव्हां प्रसिद्ध होतील तेव्हांच आपणांस विश्वसनीय उपयुक्त सामुग्री मिळाली असें होईल. या बाबतींत इतर देशांत झालेल्या उद्योगाकडे पाहिलें तर आपले उद्योग त्याच्या पासंगासही पुरणार नाहींत इतके क्षुद्र वाटतात. फ्रान्समध्यें १८१९ ते १८२९ दरम्यान साधनांचे कमींत कमी १३५ ग्रंथ बाहेर पडले. तसेंच १८३४ मध्यें बॅरंटे याच्या अध्यक्षत्वाखालीं निघालेल्या संस्थे-मधून ३५० साधनग्रंथ बाहेर पडले आणि ग्यूझोनें स्थापलेल्या कमिटीनें

आतांपर्यंत ३३० साधन ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. इंग्लंडमध्यें १८५७ मध्यें स्टेशनरी ऑफिसनें कॅलेंडर्स ऑफ स्टेट पेपर्स ही माला प्रसिद्ध करण्यास सुरवात केली आणि त्याचवर्षी 'रोल्स सीरीज' सुरू होऊन तीत १८९६ पर्यंत २४० अस्सल साधनांचे ग्रंथ प्रसिद्ध झाले. शिवाय १८६९ सालीं स्थापन झालेलें हिस्टॉरिकल मॅन्युस्क्रिप्ट्स् कमिशन अजूनही साधनांचे खंड प्रसिद्ध करीत आहे. याखेरीज माइन (Migne) नें १८४६–१८६४ च्या दरम्यान धार्मिक इतिहासाला उपयुक्त असे ३८२ साधनग्रंथ प्रसिद्ध केले. जर्मनीनेंही साधनांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत अशीच बहुमोल कामगिरी केली आहे. पण हे सर्व प्रयत्न निव्वळ सरकारी होते. यांतच खाजगी प्रयत्नानें प्रसिद्ध झालेले ग्रंथ जमेस धरले तर मला वाटतें कीं, आमच्या हिंदुस्थानाच्या पुष्कळ पटीनें लहान असलेल्या प्रत्येक देशानें आपल्या इतिहासाला उपयुक्त अशा साधनांचे कमींत कमी १००० ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्या मानानें आमचे प्रयत्न फारच अल्प प्रमाणावर नाहींत काय ?

आमचे बरेचसे प्रयत्न खाजगी स्वरूपाचे आहेत हें खरें आहे. आम्ही सामान्य लोक दारिद्र्यांत बुडून गेलों आहों हेंही नाकबूल नाहीं. साधन ग्रंथ छापणें धंद्याचे दृष्टीनें फायदेशीर होत नाहीं म्हणून सामान्य प्रकाशक असलीं पुस्तकें छापीत नाहींत हेंही खोटें नाहीं. पण हें सर्वांचेंच काम आहे. विशेषतः ज्यांचा इतिहास प्रकाशांत आणण्याचा प्रयत्न होत आहे त्या सरदार, जागीरदार, राजेरजवाडे यांनीं, या बाबतींत हल्लींपेक्षां जास्त लक्ष घालून अतिशय सढळ हातानें मदत करावी हें त्यांचें कर्तव्य आहे. या नवयुगांत त्यांच्यामध्येंही जागृति होत आहे. तिचा परिणाम त्यांचें लक्ष पूर्वजांच्या इतिहासाकडे जोरानें वेधण्यांत होईल अशीं सचिन्हें दिसत आहेत. प्रकाशकांची गोष्टही तशीच आहे. एकही प्रकाशक आज गरीब स्थितींत सांपडणार नाही. त्यांना सुस्थितींत आणण्यास लेखकच बहुतांशीं कारणीभूत झालेले असतात. मग त्यांनीं उतराई होऊं नये काय ?

अस्सल साधनांच्या महत्त्वाविषयीं येवढें सामान्य विवरण केल्यावर या खंडांतील कागदांचें वैशिष्ट्य येथें थोडक्यांत दाखवितों. ले. ३ हा माझ्या मतें फारूकी कागद आहे. मला वाटतें अजूनपर्यंत इंग्रजी अथवा इतर नियतकालिकांत कोठेंही फारूकी फर्मान एकही प्रसिद्ध झालेलें नाहीं. या दृष्टीनें या कागदास निःसंशय महत्व आहेच. पण त्या शिवाय या कागदांत तारखेचा जो उल्लेख आहे त्यावरून आपणांस सुहूर सनाच्या एका नवीन प्रकाराची माहिती मिळत आहे. या कागदावरून फारूकी सुलतानही हिंदू प्रजेपासून जिझियापट्टी वसूल करीत ही नवीन गोष्टच समजत आहे. ले. ६१ ते ६६ यांचीही अशीच गोष्ट आहे. महाराष्ट्रीय संशोधकांस कुतुबशाही फर्मानाचें स्वरूप माहीत होतें असें वाटत नाहीं. इंग्रजींत दोन ठिकाणीं कुतुबशाही फर्मानें छापल्याचें माझ्या लक्षांत आहे; पण एके ठिकाणी तें शिलेवर खोदलें अस-

त्यानें कागदांवरील फर्मानांचें तेंच स्वरूप होतें अशी कोणाची कल्पना होत नव्हती व दुसऱ्या ठिकाणच्या फर्मानास मोगली हें नांव देऊन चुकीची समजूत करून घेतली आहे. वरील लेखांवरून कुतुबशाही फर्मानांचें वास्तविक स्वरूप समजण्यास मदत होते. त्यामध्यें आलेली माहितीही नवीन असल्यानें इतिहासांत जास्त भर पडत आहे. ले. ६३ मध्यें कुतुबशाही सेनापतित्व कर्नाटकचा सुभेदार व सरलश्कर मूसाखान यांजकडून काढून मिया मुश्क यास केव्हां दिलें ह्याची तारीख दिली आहे. तसेंच अलूर पालमपेठच्या गढीवर घसरा केल्याची नवीन हकीकत ले. ६५ वरून समजते.

पण या घोरपडे घराण्यांतील फर्मानांचें आणखी एका निराळ्या दृष्टीनेंही महत्व आहे. ले. ६० मध्यें बेरोजगारीवर लढाईस जाण्याचा उपाय सांगितला आहे. त्यावरून त्यावेळीं लढाई हा किती महत्वाचा धंदा गणला जात असें हें स्पष्ट होतें. घोरपडे घराण्यांतील लोक रोजगारासाठीं ज्याप्रमाणें आदिलशाहींत लढाईच्या कामावर जात त्याप्रमाणें कांहीं घोरपडे मंडळी कुतुबशाहींत जाऊन तेथें आपणांस कार्यक्षेत्र मिळवीत. येवढेंच नव्हे तर तेथें मोठ्या इतमामानें राहतां यावें अशा तऱ्हेनें कार्य करून दाखवीत. घोरपडे घराण्यांतील लोकांप्रमाणें महाराष्ट्रांतील इतर कुलांतील लोकही याच मार्गाचें आक्रमण करीत असावेत याला भोसले घराणेंही साक्ष आहे. आज महाराष्ट्रांतील लोक सर्व हिंदुस्थानभर पसलेले दिसतात. वरवर पाहणारास मराठ्यांचा हा प्रसार पेशवाईंत झाला असें वाटण्याचा संभव आहे. पण माझ्या दृष्टीनें तर ह्या प्रसाराची सुरवात शहाजीच्या पूर्वीच्या काळांत झाली असली पाहिजे. प्रसिद्ध राक्षस तागडीच्या लढाईंत दोन्ही पक्षांच्या सैन्यांत मराठे वीर होते असें दाखवून देतां येईल.

अस्सल कागद नवीन माहिती कशी देतात याचीं आणखीही उदाहरणें आहेत. ले. ४८ मध्यें शहाजी विजापुरी दरबारांतून निर्वासित झाल्याची व त्याचा मुतालीक दादाजी कोंडदेव हा कोंढाण्याच्या बाजूस असून त्यास दफे करण्यासाठीं बाजी व खंडोजी घोरपडे यांस पाठविल्याची हकीकत आहे. शहाजीवर विजापूर दरबारची गैरमर्जी एकापेक्षां अधिक वेळा झाल्याचें आपणास माहीत आहे. पण या लेखांत सांगितलेल्या वेळीं म्हणजे श. १५६६ मध्यें शहाजीवर गैरमर्जी झाल्यामुळें त्याजकडील जागीर हिसकावून घेण्याचा प्रयत्न झाल्याचें कोणत्याही ठिकाणीं सांगितलेलें नाहीं. तेव्हां या लेखांतील प्रसंग नवीन आहे असें मानण्याशिवाय गत्यंतर नाहीं. ले. ४० व ले. ४३ हे श. १५५९ आषाढ व श. १५६० वैशाख या वेळचे आहेत. पहिल्यांत रोहिडा किल्ला घेऊन हरामखोरांना दफे करण्याबद्दल व दुसऱ्यांत किल्ल्याजवळ जाऊन तेथून———ला हल्ला न देण्याबद्दल सांगितलें आहे. या दोन लेखांवरून श. १५५९ व श. १५६० या दोन सालांत रोहिडा किल्ल्याजवळ कांहीं

गडबड चालली होती हें खास ठरतें. ग्रंथांतरीं या गडबडीचा उल्लेखही नाहीं. येथें उल्लेख आहे. पण स्पष्ट नामनिर्देश, नसल्यामुळें या गडबडीची निश्चित माहिती होत नाहीं हें खरें असलें तरी नवीन प्रसंग ज्ञात होतो हें नाकबूल करतां येणार नाहीं.

मुसलमानी तवारिखांमधून प्रायः अपयशाच्या प्रसंगांची माहिती गाळलेली असते हें या संग्रहांतील कांहीं फर्मानांवरून दाखवून देतां येईल. उदाहरणार्थ ले. १६ व ले. १७ हीं दोन फर्मानें पहा. यांत अंबरखान व झुंजारराव घाटगे यांना चाळापूरला शत्रूनें हैराण केलें आहे तेव्हां तुम्ही तेथें जाऊन शत्रूला दूर करावें व पीशजंगखानास मदत करावी म्हणून सांगितलें आहे. तेव्हां चाळापूरच्या बाजूस युद्धाला चांगलें तोंड लागलें होतें हें स्पष्ट आहे. पण मुहम्मदनाम्यांत या गोष्टीचा उल्लेख नाहीं.

राजकीय बाबींप्रमाणें धार्मिक व सामाजिक बाबींवरही प्रकाश पाडणारे लेख या खंडांत आहेत. नमुना म्हणून त्यांचें येथें दिग्दर्शन करणें अस्थानीं होणार नाहीं.

ले. ८१ मध्यें मीर मुहम्मद झमान यानें मी परमेश्वरी प्रसादामुळें तीस व तीन देवालयें मोडून मशीदीचा पाया घातला असें सांगितलें आहे. पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, जुन्या मुसलमानी ऐतिहासिक ग्रंथांतून हिंदूंच्या धर्मभावना दुखविणाऱ्या देवळें मोडणें, मूर्ती फोडणें, जबरीनें बाटविणें, स्त्रिया पळविणें इत्यादि गोष्टी मुसलमानी राजांनीं केल्याबद्दल ज्या हकीकती आहेत त्या वस्तुस्थितिनिदर्शक नसून ग्रंथकारांच्या मनच्या कल्पना आहेत. उदा. या लेखाच्या टीपेंत मीं उल्लेखिलेल्या धार येथील लेखासंबंधीं त्याचे संपादक म्हणतात की, या लेखांत सांगितलेली हकीकत खरोखरच घडली कीं नाहीं याविषयीं शंका आहे. कारण या लेखांत उल्लेखिलेला भोज कोणता हें निश्चित ठरवितां येत नाही. कांहीं ठिकाणीं ग्रंथकारांनीं आपल्या कोत्या कल्पना वर्ण्य पुरुषाच्या नांवावर दडपल्या नसतील असें म्हणवत नाहीं किंवा कांहीं ठिकाणीं ग्रंथकारांनीं अतिशयोक्तीचीं वर्णनें केलीं नसतील असा निर्वाळा देतां येत नाहीं. तरीही वरच्यासारख्या लेखांतून दिलेली कबूली पाहिली म्हणजे देवळें पाडणें व मशीदी उभारणें असें विनाशक व विधायक दोन्ही प्रकारचें कार्य करण्यांत यशस्वी होणें हें परमेश्वराच्या कृपेचें लक्षण आहे असें कांहीं मुसलमान लोक समजत होते येवढें मात्र निश्चित ठरतें. ही त्यांची समजूत कोणत्या धर्मग्रंथांतील कोणत्या उपदेशावर अधिष्ठित झाली होती याशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. या लेखावरून तत्कालीं ही समजूत प्रचलित होती येवढें मात्र सांगतां येतें.

ले. १८ व ले. २१ लेख राजा व प्रजा यांचें संबंध कसे होते या विषयीं कांहीं कल्पना आणून देण्याच्या दृष्टीनें महत्वाचे आहेत. पहिल्यांत बादशहानें लाच घेणाऱ्या माणसांना तंबी पोचविण्याबद्दल निक्षून सांगितलें असून दुसऱ्यांत साय-गांव येथील शेतकरी सरकारी पैसा भरणा न करतां आपली हद्द सोडून सातारा जिल्ह्याच्या हद्दींत गेले असतां त्यांवर साताऱ्याच्या हवालदारानें केलेल्या जुलुमाबद्दल त्याची खरड काढलेली आहे. ब्रिटिशपूर्वकालाविषयीं आपली समजूत सामान्यतः अशी आहे कीं, तो काळ अंदाधुंदी जुलूमजबरदस्ती वगैरेंनीं भरलेला होता. पण हीं पत्रें स्पष्ट दाखवितात कीं, त्यावेळीं राजा व प्रजा यांचे संबंध जिव्हाळ्याचे असून प्रजेवर जर अधिकारी जुलूम करूं लागले व त्यांत प्रजेकडे थोडी चूक असली तरी राजा प्रजेची बाजू घेऊन भांडण सामोपचारानें पण अधिकाऱ्यांचा निषेध करून मिटविण्याचा प्रयत्न करी.

एवंच या खंडांतलि बहुतेक साधनें आपापल्यापरीनें अतिशय बोधप्रद अशींच आहेत. पण त्या सर्वांविषयीं येथें विवेचन करूं लागलों तर विस्तार होईल. तेव्हां मला सूत्ररूपानें येवढेंच सांगावेसें वाटतें कीं, समकालीन अस्सल पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं महत्वाचा असल्यानें तो प्रसिद्धीस आणण्यासाठीं इतिहासाभ्यासी लोकांनीं अश्रांत परिश्रम केले पाहिजेत व जाणत्या लोकांनीं सढळ हातानें द्रव्याची मदत केली पाहिजे.

ज्येष्ठ शुद्ध ११।१८५६ संपादक.

अनुक्रमणिका

लिप्यंतराची पद्धत.*

अ	= ا किंवा ء	त	= ت
अ	= ع	**त**	= ط
ई	= ی	द	= د
ऊ	= و	न	= ن
ए, ऐ	= ی	प	= پ
ओ, औ	= و	फ	= ف
क	= ک	ब	= ب
क	= ق	म	= م
ख	= خ	य	= ی
ग	= گ	र	= ر
ग	= غ	ल	= ل
च	= چ	व	= و
ज	= ج	श	= ش
ज	= ذ	स	= س
ज़	= ض	**स**	= ص
ज़़	= ظ	स़	= ث
झ	= ز दंत्य तालव्य	ह	= ه
झ	= ژ	**ह**	= ح

शुद्धिपत्र

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
४	१५	गुशायद्	कुशायद्
४	१७	हमहरा अझदर	हमह अझ
२१	६	धर्मशाळा	एक मजली घर
२४	२	वेढा घातला	हैराण केलें
५०	१०	श. १५६७	श. १५६६
५०	११	इ. १६४५	इ. १६४४
६६		टीप काढून टाकावी.	
७३	२२	हगरस	जगरस
७६	६	शेतगांव	कुळाचा ओढा
९५	१७	कृपेसाठीं	कृपेमुळें

* या पुस्तकांतील पहिल्या चाळीस पानांतील लिप्यंतर थोडें निराळें आहे. त्यांत **ह** = ه, **झ** = ز, **ज** = ظ,ض,ذ, **स** = ث व ص अशी पद्धत ठेविली होती. पण पुढें मुद्रकांनीं वरील पद्धतीचें थोडें जास्त त्रासदायक लिप्यंतर ही जुळविण्याचें कबूल केल्यामुळें वरील लिप्यंतर चालूं केलें.

सूची.

श्री

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ४२

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड २ रा.

संपादक व प्रकाशक
प्रो. द. वा. पोतदार
श्री. सर. गं. ना. मुजुमदार
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

मुद्रक
अनंत विनायक पटवर्धन
आर्यभूषण प्रेस, ९३६।३ भांबुर्डा पेठ, पुणें.

श. १८५६] किंमत १॥ रुपया. [इ. १९३४

निवेदन

ह्या संकीर्णसाहित्याच्या दुसऱ्या खंडांत मं. त्रै. वर्ष १२,१३ व १४ मधील अंकांतून आलेल्या ऐ. पत्रांचा संग्रह केला आहे. संख्येनें थोडीं असलेलीं हीं पत्रें, त्यांत बारीक तपशील आला असल्यामुळें महत्वाचीं वाटतील. तसेंच ऐ. व्यक्तींचें आडनांव, घराणें इ. सांगणारे उल्लेखहि तितकेच उपयुक्त होत व अशा दृष्टीनेंच हीं पत्रें विचारांत घेतलीं पाहिजेत.

ऐ. सं. सा. तील पत्रें सामान्यतः पेशवेकालीन असतात तशीच हीहि असून त्यांत राजकारणाबरोबर धार्मिक, सामाजिक, जमीनबाब, घराणीं इत्यादींसंबंधीचाहि मजकूर आला आहे. प्र. ५५ मध्यें गुमास्ता, अडती व शेटजी ह्यांचे नाना फडणीस, खालचे अमलदार व शेवटचे बाजीराव ह्यांजवर रूपक करून जें सांगितलें आहे तें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. तसेंच. ले. २१९ वरून थोरल्या बाजीराव पेशव्यांचें उत्तरेकडील यशस्वी राजकारण व रजपुतांशीं ठेवलेलें सख्यत्वाचें धोरण हीं चांगलीं निदर्शनास येतात. ले. २२० हा राव सो। सरदेसाईकृत थो. बाजीरावांच्या रियासतींतील पृ. ३१३ वरील पत्रा पूर्वीचें (१५।२।१७३५) पत्र (६।२।३५) आहे व क्र. २२१ हें पत्र तेथेंच पृ. ३५४ वर आलेंच आहे. क्र. २३१ हा कर्जपट्टीवसूलीबाबतचा हुकूम आहे. पेशव्यांनीं कर्ज अगर इतर पट्ट्या सर्व सरदारांवर प्रसंगीं आकारल्या होत्या. पण अधिकाऱ्यांकडून त्यांची वसूली होत असतां अन्याय होऊं लागले हें कळतांच सदर आज्ञापत्रांत थोरले माधवराव म्हणतात 'गोरगरिबावरी पटी घालून रुपया घेणं हे गोष्ट कार्याची काय ?...शहरांत हरताळ पडेल व मग पैसाहि नाही आणि बद्दू व्हाल दोहींकडून तोटाच ' इ. इ. राजकीय व इतर आलेले विषय पुढील पत्रांतून वाचनांतींच वाचकांनीं ध्यानांत आणावें. येथें आतां अधिक अवसर नाहीं.

प्रस्तुत खंडास नेहमींप्रमाणें सूची जोडली आहे. सूचींत नांवें गांवें ह्यांच्याबरोबर विषयही गोंविले आहेत. आणि व्यक्तिनामें देतांना आडनांव असेल तर तें आधीं दिलें आहे. ह्यांत परिचित व्यक्तींचीं नांवें छत्रपति भोसले, पेशवे इ. तशींच दिलीं आहेत.

ज्येष्ठ शुद्ध ११।१८५६ संपादक.

अनुक्रमणिका.

* ५६ हा अनुक्रमाचा आंकडा गळलेला आहे.

व रघुनाथराव क + गारीस गेले होते ते समई जवल नव्हते मग येऊन मिळाले कलम

१ सरकारची स्वारी मजल दर मजल वडनेर पाा चांदवड येथे माघ वाा १० स पोहोचली तिसरे दिवसी मुकाम तेथेच जाला किले घोडप मुाा मजकुरापासोन च्यार कोशावर होता परंतु राा भिकार्जीपंत आले नाही येक कारकून येकादसीस आला होता त्यास किल्याचे सरंजामाची व्यवस्था पुसिली त्याणी सांगितली ती अलादा पत्री किले घोडप व किले मुल्हेर येथील लिहिली आहेत त्यावरून ध्यानांत येईल द्वादसीस कुच जाला न + री उतरोन पलीकडे जाण्याचा बेत होता परंतु तो राहून कांचणा किल्यानजीक मुकाम जाला तत्राप भिकाजीपंत आले नाहीत व फडफर्मासही काही पाठविली नाही तिसरे दिवसी तर्तीच राहून [पुढला बंद बहुदा गहाळ पहिल्या पानावर मजकुराच्या डाव्या अंगास हा मजकूर आहे*] राहून सांगितले की तू याप्रमाणे लिहून पाठव त्यावरून .... मजकूर लिहिला आहे श्रुत होय हे विज्ञापना

ले. २६० श्री { श. इ.

विज्ञापना तागायत इकडील वर्तमान नर भोसले व होलकर याचा ग्रंथ आटोप्यात आला तूर्त दोलतराव सिंदे मात्र हुशारीने आहेत त्याजकडून च्यार पलटणे व दाहा हजार फौज रवाना जाली आहे ती नरमदा पावेतो आली होलकराकडील तीन च्यार पलटणे व दाहा हजार फौज.... निघाली ती देसी येणार असे आहे भोसल्याकडील गणपतराव आले आहेत त्यास पांच हजार रुपये तूर्त दिल्हे पेंढारी आले होते त्याचा बंदोबस्त होईना यामुले निघोन गेले कोणीकडे जातील ते पाहावे स्वारी तूर्त याच प्रांती आहे सारे लक्ष सिंद्याकडे आहे मग काय होईल ते पहावे हे विज्ञापना

ऐ. सं. सा. सं. २-१२

७३ सोंधेकरांची महादजी शिंद्यांकडे सहाय्ययाचना.*

(श्री. शं. ना. जोशी, वांई)

ले. २६१ श्री शा.[1] इ.

राजश्री माधवराव सिंदे मुख्य वजीर सवाई मनसबदार कुली फौजेचा मखतयार बाहदर राजे यांचे राजेंद्र गोसावी यांसी

छ श्रीसकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य— श्रो सवाई बसवलिंग राजेंद्ररु सोधा कृतानेक रामराम विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वानंदादि वैभव लेखनी संतोषवीत असिले पाहिजे विशेष कृपावलोकनपत्र पाठविलेचें अपेक्षीत समई पोहचून अन्वय मननाअंती हर्ष पावलो तदान्वये भला माणूस रवाना करावा परंत परस्वाधीनतेमुलें पार होणे दुर्गट यानिमित्य विलंब जाहाला हाली अम्हांकडील बसणैयनवरु व राजश्री श्रीनिवासराव दिवान यांस आपले संनिध पाठविले असे हे विनंती करून घेतील तें चित्तीं आणून अम्ही हे अपले पदरचे म्हणवितो तेव्हां पूर्ण साभिमानयुक्त संस्थानी स्थापना होई तों अर्थ करून दिगांत विश्रांत कीर्ति व्हावया सूज्ञ अहा: अपले राहणे दूर प्रांती जाहालें अम्हाकडील माग अपणास श्रवण न होता अजपर्यंत परस्थली श्रम पावलों सध्या अपले अगमन समीप होऊन अम्हाकडील वर्तमान अवगत जाहाले नंतर अम्ही श्रम पावणेचे युक्त न्हवे हेविषीं बहुत काय लिहावे कृपालोभ पूर्ण असू दिला पाहिजे[2] [व.मु.*]श्री । मधुलिंग । ने

[ब. शि.*] श्री सोंदा । नगरेशस्य । सोमार्क रामप्रभा । मुद्रा सदाशिवस्यै । षा सद्राजेंद्रस्य । राजते ।

* शा. स. १४।१८५५ १ इ. स. १७६३ नंतर.

२ शि. च. साहित्य खं.३ पृ.८३-१०८ वर सोंधेकरांचे कागद छापले आहेत.

सूची

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

वि. सू.:–ह्या मालेंतील ग्रंथ मोबदल्यांत मिळत नाहीत. परंतु सभासदांस विशेष सवलतीनें मिळतील.

(१) महगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश (पृ. २४३–रा. ब. वा. अ. बांबर्डेकर. रु. २ व रु. १ऽ१४)

(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (मूळ व भाषांतर)=शिवाजीची पन्हाळ्यावरील स्वारी (पृ ५०–स. म. दिवेकर. रु. ऽ१० व ऽ८)

(३) श्री शिवभारत (कवींद्र परमानन्दकृत) मूळ व मराठी भाषांतर (पृ ५८९ –स. म. दिवेकर. रु. ६ व ५ऽ१२)

(४) शिवचरित्रप्रदीप (पृ. ३२५– द. वि. आपटे. व स. म. दिवेकर, कागदी व कापडी. रु. ३॥ व ४ आणि रु. ३। व ३॥)

(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला. (पृ. २००–कै. रा. सा. कृ.वि.वझे रु.३ व रु.२)

(६) शिवकालीन जंत्री शके १५५१–१६५० (पृ. २००–कै. ग. स. खरे रु. ५)

(७) साधन–चिकित्सा (पृ. ३२०–वा. सि. बेन्द्रे. रु. ३॥ व रु. ३)

(८) ऐतिहासिक पोवाडे (पृ. ६१५–य. न केळकर. रु. ३ व रु. २॥)

(९) वाटारकर निंबाळकर–इतिहास (पृ. ३०० रु. १॥ व १ऽ३ ऽ३)

(१०) भूनेश–आख्यान (पृ. ७५ ऽ१२ व ऽ१०)

(११) कऱ्हाड (पृ. ५४–य. रा. गुप्ते बी. ए. रु. ऽ८)

(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (पृ. ६००–कै. वि. का. राजवाडे रु. ३ व २ऽ६ ऽ६)

(१३ त १६) तयार नाहींत.

(१७) पुरंदरे–दप्तर, भाग २ रा. (उत्तर पेशवाईंतील पत्रव्यवहार रु. ३ व रु. २॥)

(१८) The Deliverance or the Escape of Shivaji the Great from Agra (R. S. G. K. Deshpande रु. ३ व रु. २॥)

(१९) लोक–कथा, पुस्तक १ लें (शं.ग.दाते कापडी रु.१॥व रु.१ आणि कागदीऽ१४व१।)

(२०) पानसे घराण्याचा इतिहास (–राव. ब. पानसे रु. ३ व रु. २॥)

(२१) कै. व सुदेवशास्त्री खरे–चरित्र (रा. मो. भट रु. २॥ व रु. २।–)

(२२) लोककथा भाग२रा. (पृ.८०–श्री.शं.ग.दाते रु.१ऽ८ व १ऽ४ व १ऽ४वऽ१४)

(२३) संपूर्ण भूषण (पृ. २३०–श्री. रा. गो. काटे–रु. १ऽ८ व १ऽ४)

(२४) शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा (पृ. २८२–श्री. शं. ना. जोशी व श्री ग. ह. खरे रु. ३ व २ २ऽ८).

(२५) राजधानी रायगड (पृ. १६४–श्री. वि. वा. जोशी. रु. १ व ऽ१२

(२६) Shivaji the Founder of Maratha Svaraja (pp. 410 –C V. Vaidya Rs. 3 and Rs. 2–8–0)

(२७) आर्द (पृ. २०–ग ह. खरे ऽ२)

(२८) महगांवचा शिलालेख आणि कुडाळप्रांताचा प्राचीन इतिहास (पृ. १६५– अ. ब. वाळावलकर रु. १ऽ२ व ऽ१२)

(२९) पुरंदरे दप्तर भाग ३ रा (श्री. कृ. वा. पुरंदरे) छापत आहे.

(३०) मध्वमनीश्वराचा कविता (पृ. २५८–श्री. प्र. व्यं. गुळ्वी ३ व २ऽ८)

(३१) मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा(पृ. ९०–श्री. वि. गा. दिघे रु. १ व ऽ१२)